॥ ब्रह्मपुराण ॥



प्र. न. जोशी



ज्ञान मन्दिर ग्रन्थालय
स्कैन किया
जंगमवाड़ी मठ, वाराणसी


प्रसाद प्रकाशन
पुणे ४११ ०३०






आपले वेद आपली पुराणे



ब्रह्मपुराण

प्र. न. जोशी

प्रसाद प्रकाशन




प्रकाशक :
श्री. मनोहर य. जोशी
बी.ए.बी कॉम.
प्रसाद प्रकाशन,
१८९२, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ३०.

गुरुपौर्णिमा १९०३.

आपले वेद आपली पुराणे
ठेव योजनेतील ग्रंथ.

मुद्रक :
प्रमोद वि. बापट,
प्रमोद प्रिंटर्स,
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११ ०३०.



सोमनाथ, राजस्थान

प्रकाशकाचे निवेदन

'आपले वेद, आपली पुराणे' या योजनेतील पहिले पाच ग्रंथ म्हणजे ऋग्वेद, ब्रह्मपुराण, पद्मपुराणाचे दोन भाग व विष्णुपुराण एकदमच प्रकाशित होत आहेत.

सोप्या भाषेत वेद व पुराणे समजावून सांगणारे ग्रंथ प्रकाशित करावेत अशी कल्पना बरेच दिवस माझ्या मनात होती. ही कल्पना माझे वडील कै. य. गो. जोशी यांनी ज्या पद्धतीने ज्ञानेश्वरी सोप्या भाषेत समजावून सांगणारा 'सुबोध ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला त्यावरून सुचली. मात्र संपूर्ण ज्ञानेश्वरीचे रूपांतर सुबोध ज्ञानेश्वरीत आहे. विस्तार, पुनरुक्ती, काही कालबाह्य भाग इ. अनेक कारणांमुळे पुराणांचे व वेदांचे संपूर्ण भाषांतर देणे शक्य नव्हते व त्याची किंमतही कोणाही माणसाच्या आवाक्याबाहेरची झाली असती.

वेदांत व पुराणांत आहे तरी काय ? ही प्रत्येकाची उत्सुकता असते. ते कुतूहल पुरे करणारे पण त्याचबरोबर प्रत्येक वेदांची व पुराणाची यथार्थ कल्पना देऊ शकणारे असे हे ग्रंथ आहेत.

आजपर्यंत पुराणांच्या मराठीकरणाचे काही प्रयत्न झाले आहेत. त्यांचा शोध घेतला. परंतु अठराही महापुराणांचे संपूर्ण भाषांतर आतापर्यंत झालेले नाही. पद्म, मत्स्य, लिग, विष्णु, शिव, स्कंद अशा काही पुराणांची भाषांतरे पूर्वी झालेली आढळतात. परंतु वेद व पुराणांचा सोप्या भाषेत परिचय करून देण्याचा जसा प्रयत्न आम्ही करीत आहोत तसा प्रयत्न कोणी केल्याचे आढळले नाही.

संपूर्ण योजना मी मनाशी तयार केली. सम विचारांचे श्री. स. कृ. देवधर व श्री. प्र. न. जोशी यांच्याशी अनेक वेळा चर्चा केली व योजनेचा पक्का आराखडा तयार केला. परंतु आजच्या महागाईच्या दिवसांत वाचकांना परवडेल अशा किंमतीत संपूर्ण संच देणे कठीण वाटू लागले. प्रकाशनासाठी फार मोठ्या भांडवलाचीही गरज होती. अनेक दिवस

विचार करता करता ठेवयोजनेची कल्पना मनात आली. ‘ प्रसाद ’वर लोकांचा पूर्ण विश्वास आहे. ‘ प्रसाद ’ मासिकाची ठेव-योजना बरीच वर्षे यशस्वीपणे चालू आहेच. यावरूनच ही ठेवयोजना तयार केली व आता मात्र हे काम नक्की उभे राहील अशा विचाराने मी ऑगस्ट, ८० च्या ‘ प्रसाद ’च्या अंकात योजना प्रसिद्ध केली. ती प्रसिद्ध होताच वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला व अल्पावधीतच लक्षावधी रुपये जमा झाले.

योजना कार्यवाहीत आणण्यासाठीही अनेक सुहृदांचे मोलाचे साह्य झाले आहे. निदान दोन पिढ्या टिकेल अशा उत्तम कागदाची आमची गरज श्री. बाबुरावजी पारखे यांनी तत्परतेने भागविली आहे. प्रमोद प्रिंटर्सचे श्री. प्रमोद बापट यांनी निष्ठेने छपाईची जबाबदारी उचलली आहे मुद्रित शोधनाच्या बाबतीत श्रीमती सुमती धायगुडे यांचे सहकार्य लाभले आहे. ग्रंथाची सजावट करण्यात चित्रकार वसंत सहस्रबुद्धे यांनी मदत केली आहे. ग्रंथ बांधणीच्या मोठ्या उद्योगात श्री. बा. द. कातुरे यांनी तत्परतेने साह्य केले आहे. या सर्व इष्टमित्रांचे साह्य ग्रंथयोजना पूर्ण होईपर्यंत मिळणार आहे. म्हणून तूर्त त्यांचा निर्देशच येथे केला आहे. आता निश्चितपणे संपूर्ण संच ठरलेल्या मुदतीत प्रकाशित होईल.

यानंतर अशाच योजनेत सांस्कृतिक महत्त्वाचे आणखी काही ग्रंथ प्रकाशित करण्याचा मानस आहे. त्यालाही वाचकांचा प्रतिसाद मिळेल असा विश्वास आहे.

मनोहर य जोशी

लेखकाचे निवेदन

'आपले वेद-आपली पुराणे' या संकल्पित ग्रंथमालेतील पुराणांपैकी पहिले ब्रह्मपुराण वाचकांच्या हाती देण्यात अत्यंत संतोष वाटत आहे. प्रथमच हे स्पष्ट करायला हवे की, हा ग्रंथ म्हणजे ब्रह्मपुराणाचे भाषांतर नाही, अनुवाद नाही, साररूपही नाही. सर्वसामान्य अशा बहुश्रुत वाचकास आपल्या पूर्वपरंपरेचा वैचारिक व सांस्कृतिक धागा ध्यानात यावा, अशी फार इच्छा असल्याचे या योजनेस जो प्रतिसाद मिळाला त्यावरून वाटले. ज्यांना संस्कृत परिचयाचे नाही, ज्यांना मूळ संस्कृत पुराणे सहज उपलब्ध होत नाहीत, ज्यांना उपलब्ध झाली तरी त्यांच्या अवाढव्य विस्तारामुळे ती वाचणे शक्य होत नाही; त्यांच्यासाठी प्रत्येक पुराणातील निवडक विषयांची पुनः रचना करून, पुनरुक्ती टाळून त्या त्या पुराणाचे यथायोग्य दर्शन घडविण्याचा येथे प्रयत्न केला आहे. या प्रयत्नात माझे स्वतःचे असे काही नाही. संस्कृत विद्येचे संशोधक, प्राचीन संस्कृतीचे अभ्यासक यांच्यासाठी हा उपक्रम नाही हे स्पष्टच आहे.

निम्मे आयुष्य संतसाहित्य, संतचरित्रे, संतबोध यांच्या चिंतनात, मननात गेल्यावर आता जिज्ञासा अशी झाली की, ज्ञानेश्वरांनी तरी 'अष्टादश पुराणें। तींचि मणिभूषणें' असा पुराणांचा उल्लेख का केला? 'पाहिलीं पुराणें धांडोळिलीं दरुषणें' असे तुकाराममहाराज म्हणतात तेव्हा त्यांच्या पाहण्यात कोणती पुराणे आली होती ? 'पुराणांचा इतिहास। गोडरस सेविला' हा गोड रस कोणता ? 'तुका म्हणे ऐसे आहे हें पुराणीं। नव्हे माझी वाणी पदरिंची' असे महाराज म्हणतात तेव्हा त्यांच्या समोर कोणते पुराण होते ? अशा प्रश्नांच्या उत्तरांच्या शोधात मी गेली काही वर्षे आहे. पूर्वीपासून घरी बहुतेक सर्व पुराणे असल्याने या शोधास गती मिळाली. 'प्रसाद'चे उत्साही चालक श्री. म. य. तथा बापूसाहेब जोशी यांची कार्यकुशल व गुणग्राही योजना मला उपकारक ठरेल असे वाटल्यावरून मी हे पुराणांच्या दर्शनाचे नवे काम स्वीकारले आहे. त्यांच्या उत्साहाचे चीज मराठी बोलणारा मनुष्य निःसंशय करील असा विश्वास वाटतो.

'रेणुका', लक्ष्मी पार्क — प्र. न. जोशी
नवी पेठ पुणे ३०. १९-७-१९८१

ब्रह्मपुराण-परिचय

ब्रह्मपुराणाचे स्वरूप –

अनेक सुंदर व भावपूर्ण स्तोत्रांनी, प्रार्थनांनी इतर महापुराणां-प्रमाणेच ब्रह्मपुराणही समृद्ध बनले आहे. यातील बहुतेक निवेदन ब्रह्मदेवांनी केलेले असल्याने यास ब्रह्मपुराण असे नाव आहे. विष्णु-पुराणातील सूचीनुसार हे ब्रह्मपुराण पहिले महापुराण आहे. देवी-भागवतामध्ये मात्र याचा पाचवा क्रमांक आहे. मत्स्यपुराणानुसार ब्रह्मपुराणाचे १३००० श्लोक आहेत. आदिब्रह्मपुराण म्हणून ८००० श्लोकांचे जे आणखी एक पुराण उपलब्ध आहे त्याच्याशी या ब्रह्मपुराणाचे साम्य बऱ्याच बाबतींत आहे. नारदपुराणात ब्रह्म-पुराणाचा क्रम पहिलाच असल्याने या पुराणास आदिपुराण असेही म्हणतात. सूर्यपूजा व सूर्योपासना यांचा विस्तार या पुराणात असल्याने सूर्यपुराण म्हणूनही याची महती सांगितली जाते. आदिपुराण व सौर-पुराण या नावाची उपपुराणे मात्र या ब्रह्मपुराणाहून वेगळी आहेत. पुराणांतून वेदांचे उपबृंहण असते. पुराणे वेदांचा विस्तार करतात. याची साक्ष या पुराणातील सांख्यायन ब्राह्मण, ऐतरेय ब्राह्मण, बृहद्देवता इत्यादी वैदिक उपाख्यानांवरून पटते. या ब्रह्मपुराणाची निर्मिती इसवी सनाच्या सातव्या वा आठव्या शतकात झाली असावी असे अभ्यास-कांचे निरीक्षण आहे. कदाचित दहाव्या, अकराव्या शतकात यात थोडी भर पडली असावी.

या ब्रह्मपुराणातील सारा कथाभाग, सारे वर्णन, सारे तत्त्वज्ञान यांचे स्वरूप संवादात्मक आहे. लोमहर्षण सूत व शौनकादी ऋषी यांच्या-तील संवादांतून अनेक उत्तमोत्तम कथा, आख्याने, उपाख्याने यांनी ब्रह्मपुराण समृद्ध बनले आहे. इतर महापुराणांप्रमाणेच याही पुराणात चौदा मन्वन्तरे, विवस्वानाच्या संततीचा विस्तार, सूर्यवंश व चंद्रवंश यांचे वर्णन, भारतवर्षाचे वर्णन, अनेक द्वीपे व पाताल, नरक, स्वर्गलोक,

इत्यादींचे विस्तारपूर्वक विवेचन आहे. श्रीकृष्णाच्या स्मरणाने पापापासून जीव मुक्त होत असल्याचे आश्वासनही येथे आहे. सूर्यादी ग्रह, भुवः आदी लोक, सर्व जग निर्माण करणारा परब्रह्मस्वरूप श्रीविष्णू; इत्यादींचे विस्तृत वर्णन ब्रह्मपुराणात मिळते. भगवान सूर्याचा महिमा, त्याचा अवतार, त्याची स्तुती, त्याची अष्टोत्तरशत नामे; असा एक महत्त्वाचा विषय ब्रह्मपुराणाचा आहे. सूर्याचे एकवीस नावांचे एक सुंदर स्तोत्र येथे आहे. विकर्तन, विवस्वान्, मार्तण्ड, भास्कर, लोकप्रकाशक, महेश्वर, लोकसाक्षी, तमिस्रहा, सप्ताश्ववाहन, गभस्तिहस्त अशा काही लक्षणीय नामांचा उल्लेख करता येईल. सूर्यमाता अदितीने केलेली सूर्याची स्तुती साधी पण भावगर्भ आहे.

कथा, उपकथा, आख्याने

ब्रह्मपुराणाचा बराचसा भाग विविध कथा, उपकथा, आख्याने यांनी व्यापला आहे. पृथू राजाचे चरित्र, सगर राजा, शिव-पार्वतीकथा, कण्डुमुनी, दक्षयज्ञविध्वंस, राजा इंद्रद्युम्न, मार्कंडेय मुनी; अशा विविध कथांचे संदर्भ महत्त्वाचे आहेत. बत्तीस अध्यायांत तर भगवान श्रीकृष्णाचे समग्र चरित्र रसाळपणाने ब्रह्मपुराणात आले आहे. तीर्थ, नदी, मास इत्यादींचे माहात्म्य सांगण्याच्या निमित्ताने ब्रह्मपुराणात विविध कथांचा वा आख्यानांचा खजिनाच उघडलेला दिसतो. पुरुषोत्तमक्षेत्रामधील नृसिंह व श्वेतमाधव, मत्स्यमाधव, गौतमी गंगा, वाराहतीर्थ, कुशावर्त, नीलगंगा, कपोततीर्थ, पैशाचतीर्थ, क्षुधातीर्थ, भानुतीर्थ, गारुडतीर्थ, गोवर्धनतीर्थ, श्वेततीर्थ, शुक्रतीर्थ, इंद्रतीर्थ, ऋणमोचनतीर्थ, सुपर्णातीर्थ, इलातीर्थ, चक्रतीर्थ, पिप्पलतीर्थ, नागतीर्थ, मातृतीर्थ, श्रीरामतीर्थ, उलूकतीर्थ, इन्द्रतीर्थ, लक्ष्मीतीर्थ, भानुतीर्थ, भद्रतीर्थ, विप्रतीर्थ, चक्षुस्तीर्थ, अनंत वासुदेव, कोणार्क, भुवनेश्वर, विरजतीर्थ; अशा शेकडो पवित्र स्थानांची व तीर्थांची माहात्म्ये कथांच्या रूपाने ब्रह्मपुराणात आली आहेत. मत्स्यमाधवाचा महिमा सांगताना समुद्रमार्जनाचा विधी अष्टाक्षर मंत्राचे माहात्म्य सांगताना स्पष्ट केला आहे.

जंबुद्वीपात भारतवर्ष

जंबुद्वीप, सप्त समुद्र, पाताळ व स्वर्गलोक, नरक, भारतवर्षातील अनेक नद्या व पर्वत, पवित्र स्थाने, असे भूवर्णन, ब्रह्मांडवर्णन इतर महापुराणांप्रमाणे ब्रह्मपुराणही करते. भूमंडलात जंबू, प्लक्ष, शाल्मल, कुश, क्रौंच, शाक, पुष्कर अशी सात द्वीपे आहेत. लवण, इक्षू, सुरा, घृत, दधी, दुग्ध, जल अशा सात समुद्रांनी हे द्वीप वेढलेले आहे. याच्या मध्यभागी सुवर्णमय मेरू पर्वत असून त्याची उंची चौऱ्यांशी हजार योजन आहे. दक्षिणेस हिमवान, हेमकूट, निषध व उत्तरेस नील, श्वेत व शृंगवान असे पर्वत आहेत. मेरू पर्वताच्या दक्षिणेस भारतवर्ष आहे. मेरू पर्वताच्या पूर्वेस मन्दराचल, दक्षिणेस गन्धमादन, पश्चिमेस विपुल व उत्तरेस सुपार्श्व पर्वत आहेत. या चारही पर्वतांवर क्रमशः कदंब, जंबू, पिंपळ व वट असे चार प्रकारचे वृक्ष आहेत. असेच चार दिशांना अरुणोद, महाभद्र, असितोद व मानस नावांचे जलाशय आहेत.

भगवान विष्णूच्या चरणांपासून निघालेली गंगा नदी, सीता, अलकनंदा, चक्षू व भद्रा या नावांनी प्रवाहित होते. भारतवर्षात शतद्रू (सतलज), चंद्रभागा (चिनाब), नर्मदा, सुरमा, तापी, पयोष्णी, निर्विन्ध्या, कावेरी, गोदावरी, भीमरथी, कृष्णावेणी, कृतमाला, ताम्रपर्णी, त्रिसांध्य, ऋषितुल्या आणि इतर शेकडो नद्या असून त्यांचे जलपान व स्नान पापनाशी आहे. अशा प्रकारचा भूगोल पुराणांतून बहुधा सर्वत्र येतो. कुरू, पांचाल, मध्यदेश, कामरूप (असम), पौण्ड्र कलिङ्ग (उडिसा), मगध, दक्षिण प्रदेश, अपरान्त, सौराष्ट्र, अर्बुद, मरू, मालवा, अशी अनेक देशवाचक नावेही ब्रह्मपुराणात येतात.

अधर्माची गती

नित्यनैमित्यिक आचार, व्यवहार, धर्मविधी, सदाचार इत्यादींचे वर्णन ब्रह्मपुराणाने संक्षेपाने केले आहे. वर्णाश्रमधर्म, स्वर्गनरकफल, युगान्ताची अवस्था, प्रलय अशा अनेक बाबींचा निर्देश ब्रह्मपुराण करताना दिसते. धर्माचा महिमा, अधर्माची गती, श्राद्धविधी, प्रायश्चित्त-

प्रकार, दानमहत्त्व असे आणखी काही महत्त्वाचे विषय ब्रह्मपुराणात आले आहेत. पापपुण्याचा विचार हा पुराणाचा खास विषय याही पुराणात आहे. येथील कर्मानुसार कोणास कोणता भोग भोगावा लागतो याचाही निर्देश येथे आहे. काही नमुने येथे देण्यासारखे आहेत. देवकार्य व पितृकार्य न करता मरणारा कावळ्याच्या जन्मास येतो. नंतर शंभर वर्षांनी तो कोंबडा होतो. त्यानंतर तो एक महिना सर्पयोनीत निवास करतो. नंतर मनुष्य होतो. पित्याच्या समोर ज्येष्ठ बंधूचा अपमान करणारा पुढच्या जन्मात क्रौंच बनतो. शूद्र पुरुषाने ब्राह्मणीच्या बरोबर गमन केले तर त्याला कीटकाचा जन्म येतो. मृत्यूनंतर तो डुक्कर होतो. दह्याची चोरी करणारा मनुष्य बगळा होतो. बेडूक होतो. फल-मूल चोरणारा मुंगी होतो. पाणी चोरणारा कावळा व चांदी चोरणारा कबूतर होतो. सुवर्णपात्र चोरणारा कृमी बनतो. रेशमाची चोरी करणारा वानर होतो, तर वस्त्र चोरणारा पोपट होतो. साज चोरणारा हंस बनतो. चूर्णाची चोरी करणारा पुढल्या जन्मी मोर होतो. असे हे पौराणिक कर्मविपाकशास्त्र ब्रह्मपुराणातही वैपुल्याने आहे. अधर्माची गती सांगून लोकांना सावध करण्याचा हा प्रयत्न असावा.

महत्त्वाचा आचारधर्म

गृहस्थाच्या सदाचारावरही ब्रह्मपुराणाने यथोचित लक्ष दिले आहे. गृहस्थाने हव्य, कव्य, अतिथिपूजन नेमाने करावे. पशू, पक्षी, मुंगी, संन्यासी, भिक्षुक, पथिक, ब्राह्मण अशा सर्वांना त्याने राजी राखावे. गृहस्थाने सदाचार पाळलाच पाहिजे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांची साधना गृहस्थाने करावी. प्राप्तीचा चौथा हिस्सा पारमार्थिक कल्याणासाठी राखून ठेवावा. ब्राह्मणाने पहाटेच्या वेळी उठावे. स्नान करून, मनाचा संयम करून पूर्वाभिमुख बनून संध्या करावी. सूर्यास्ताच्या पूर्वी सायंसंध्या करावी. वाईट गोष्टी करणे, खोटे बोलणे, कठोर बोलणे, नास्तिक बनणे, दुष्ट पुरुषाची सेवा करणे, या गोष्टी ब्राह्मणांनी करू नयेत. मन स्वाधीन ठेवून सकाळी व संध्याकाळी हवन करावे. ग्राम, निवासस्थान, तीर्थक्षेत्र, शेत, गोशाला, इत्यादी ठिकाणी

मलमूत्रविधी करू नयेत. दुसऱ्या स्त्रीकडे नग्नावस्थेत पाहू नये. आपली विष्ठा आपण बघू नये. रजस्वला स्त्रीचे दर्शन, तिच्याशी संभाषण, तिला स्पर्श या गोष्टी टाळाव्यात. पाण्यात मलमूत्रत्याग व मैथुन करू नये, गृहस्थाने आपली देवता, आपले पितर इत्यादींचे पूजन करून अन्न ग्रहण करावे. हात-पाय धुऊन, आचमन करून, उत्तरेकडे मुख करून, आसनावर बसून, मौनवृत्तीने भोजन करावे. गुरुजन आले तर त्यांना उठून आसन द्यावे. त्यांना प्रणाम करून त्यांचा आदर-सत्कार करावा. नग्नावस्थेत कधी स्नान करू नये की झोपू नये. दोनही हातांनी डोके खाजवू नये. ब्राह्मण, अग्नी, गाय, सूर्य यांच्याकडे तोंड करून मूत्रविधी करू नये. गुरूच्या दुर्वर्तनाची चर्चा करू नये. ब्राह्मण, राजा, दुःखी मनुष्य, विद्यावृद्ध पुरुष, गर्भिणी स्त्री, रोगपीडित मनुष्य, मुका, आंधळा, बहिरा मनुष्य, उन्मत्त मनुष्य, व्यभिचारिणी स्त्री; असे काही जण रस्त्यावरून समोर आले तर त्यांना डावलून दुसरीकडे वळावे.

विद्वान पुरुष, देवालय, चैत्यवृक्ष, चौक, गुरू, विद्यावंत यांना उजव्या बाजूस राखून चालावे. दुसऱ्याने वापरलेली पादत्राणे, वस्त्रे, माळा, इत्यादी वस्तू वापरू नयेत. चतुर्दशी, अष्टमी, पौर्णिमा, पर्वदिन अशा वेळी तैलमर्दन वा स्त्रीसंग करू नये. बुद्धिमान माणसाने पाय हलवीत बसू नये. पायाने पाय दाबू नये, कोणाला लागेल असे बोलू नये. निंदा अथवा चुगली करू नये. दंभ, अभिमान, वाकडा व्यवहार यांचा त्याग करावा. मूर्ख, उन्मत्त, व्यसनी, कुरूप, हीनांग, निर्धन मनुष्याची थट्टा न करावी. पूर्व वा उत्तर दिशेस तोंड करून दात घासू नयेत. दात घासताना मौन धारण करावे. उत्तर व पश्चिम दिशांना डोके करून कधी झोपू नये. दुर्गंधीयुक्त पाण्यात स्नान करू नये. विद्वान माणसाने स्नान केल्याशिवाय कधीच चंदन लावू नये. दूषित अन्न खाऊ नये. शिळे व वास मारणारे अन्न सेवन करू नये. सूर्योदयाच्या व अस्ताच्या वेळी झोपू नये. विद्वान पुरुषाने कधीच परकीय स्त्रीशी समागम करू नये. परस्त्रीसमागम आयुष्याचा नाश करणारा आहे. ब्रह्मपुराणाने स्पष्टपणे म्हटले आहे की,

परदारा न गन्तव्याः पुरुषेण विपश्चिता ।
इष्टापूर्तायुषां हन्त्री परदारगतिर्नृणाम् ।।
न हीदृशमनायुष्यं लोके किंचन विद्यते ।
यादृशं पुरुषस्येह परदाराभिमर्शनम् ।।

(१२१. ६०-६२)

शूद्र ब्राह्मण कसा होतो ?

ब्रह्मपुराणातील हा आचारधर्म प्रामुख्याने ब्राह्मणांना उद्देशून असला तरी शूद्रादी लोकांकडे पुराणांचे लक्ष नव्हते असे नाही. कर्मानुसारच उच्च मनुष्य नीच बनतो व नीच मनुष्य उच्च बनतो हा एक महत्त्वाचा सिद्धान्त ब्रह्मपुराण सांगताना दिसते. पार्वतीने प्रश्न केला म्हणून शिव तिला स्पष्टपणे सांगतात की, ‘ब्राह्मणत्वाची प्राप्ती अत्यंत कठीण आहे. शुभे, ब्राह्मण स्वभावानं ब्राह्मण असतो. याच प्रकारे क्षत्रिय, वैश्य, शूद्र स्वभावानुसार बनतो. ब्राह्मणानं पापकर्म केलं तर तो आपल्या स्थानावरून भ्रष्ट होईल, उत्तम वर्ण त्याला मिळाला असला तरी त्याची अधोगती होईल. ब्राह्मण आपल्या कर्मानुसार क्षत्रिय होईल, वैश्य होईल, शूद्र होईल. आपल्या धर्मापासून, स्वभावापासून भ्रष्ट झालेला ब्राह्मण शूद्रच मानावा. कर्मभ्रष्ट ब्राह्मण वैश्य, क्षत्रिय, शूद्रच होय. आणि जो शूद्र ज्ञान-विज्ञानयुक्त बनून पवित्र धर्माचे पालन करतो त्याला ब्राह्मणधर्माचे फल प्राप्त होते.

यस्तु शूद्रः स्वधर्मेण ज्ञानविज्ञानवाञ्शुचिः ।
धर्मज्ञो धर्मनिरतः स धर्मफलमश्नुते ।।

(२२३-२१)

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांच्याबद्दलची ही धारणा ब्रह्मपुराणाची पाहिल्यावर वर्णसंकर वा अन्नसेवन यांचा विधिनिषेध वेगळ्या दृष्टीने समजावून घ्यावा लागेल. शूद्रान्न घेणारा ब्राह्मण शूद्रत्वास जातो, यासंबंधी अन्य विचारही करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगून ब्रह्मपुराण म्हणते,

तेन शूद्रान्नशेषेण ब्रह्मस्थानादपाकृतः ।
ब्राह्मणः शूद्रतामेति नास्ति तत्र विचारणा ।।

अनाचारी ब्राह्मणही आपल्या स्थानापासून भ्रष्ट होतो, असा निर्वाळा या पुराणाचा आहे. सदाचारी शूद्र वैश्य होतो, सदाचारी वैश्य क्षत्रिय बनतो व सदाचारी क्षत्रिय ब्राह्मण होतो. उत्तरोत्तर शुभ कर्मे करून, सदाचार करून शूद्रासही ब्राह्मणत्वाची प्राप्ती होऊ शकते. उत्तम कर्माने शूद्रही ब्राह्मण बनू शकतो. उलट जन्माने ब्राह्मण असणारा जर दुराचारी निघाला तर तो ब्राह्मणत्वापासून शूद्रत्वास पोचतो. ब्रह्म-पुराणाने एक महत्त्वाचा सिद्धांत सांगितला आहे तो असा की, जन्म, संस्कार, वेदाध्ययन, संतती यांनी द्विजत्व वा ब्राह्मणत्व सिद्ध होत नाही, तर ते सदाचाराने ठरते. आचारांवरून ब्राह्मणत्व सिद्ध होत नाही तर ते सदाचाराने ठरते. आचारांवरून ब्राह्मणत्व सिद्ध होते. उत्तम आचर-णाचा शूद्रही ब्राह्मण बनू शकतो हे ब्रह्मपुराणाने स्पष्ट केले आहे.

कलियुगातील अधर्म

शेवटी शेवटी ब्रह्मपुराणात कलियुगातील धर्माचेही विवरण आले आहे. कलियुगात वर्ण व आश्रम यांचे महत्त्व टिकणार नाही. वेदांची आज्ञा कोणी पाळणार नाही. शिष्य गुरूची आज्ञा पाळणार नाहीत. अग्निहोत्राचा नियम उरणार नाही. पुत्र आपला धर्म राखणार नाही. जो बलवान तो स्वामी होईल, सर्व वर्णांचे लोक कन्येची विक्री करतील. कलियुगात जो तो धर्मच सांगत सुटेल. थोडेसे धन प्राप्त होताच अभिमान होईल. स्त्रियांचे रूपवर्णन त्यांच्या केसांवरून केले जाईल. सुवर्ण, रत्न, मणी, किंमती वस्त्र यांच्या अभावी स्त्रिया केसांचाच शृंगार करतील. कलियुगातील स्त्रिया धनहीन पतीचा त्याग करतील. धनवान पुरुष युवतींचा स्वामी बनेल. जो अधिक देईल त्याचे स्वामित्व लोक पत्करतील. निवासस्थान उभे करण्यातच संपत्ती संपून जाईल. दान, पुण्यसंपादन उरणार नाही. बुद्धी द्रव्यसंग्रह करण्यात व्यग्र होईल. आत्मचिंतन संपेल. सारे धन उपभोगातच संपून जाईल. धर्माचे अधिष्ठान उरणार नाही. स्त्रिया स्वेच्छाचारिणी होतील. हावभावविलास यात त्यांच्यांत स्पर्धा निर्माण होईल. अन्यायाने धन मिळविणाऱ्या पुरुषावर त्या अनुरक्त होतील. एक एक पैशासाठी एक दुसऱ्याची हानी सहज

करू शकेल.

कलियुगात सर्व लोक समानतेची चर्चा करतील. गाय दूध देत आहे तोपर्यंतच तिचे कौतुक होईल. अनावृष्टी व क्षुधा यांनी प्रजा सतत हैराण होईल. सर्वांचे डोळे आकाशाकडे लागतील. पाऊस नसल्यामुळे लोक झाडाची पाने, फुले, मुळे खाऊन राहातील. कित्येकजण आत्मघात करून घेतील. बहुतेक सर्व लोक स्नान न करताच भोजन घेतील. अग्निहोत्र, देवपूजा, अतिथिसत्कार, श्राद्धतर्पणविधी इत्यादी क्रिया होणार नाहीत. कलियुगातील स्त्रिया लोभी, नाटकी, अधिक खादाडशील, मंद भाग्याच्या होतील. दोनही हातांनी त्या आपली डोकी खाजवीत राहातील. क्रोधी होतील. स्वतःचे पोट स्वतः भरण्याचा उद्योग करतील. त्यांना देहशुद्धीची चाड राहाणार नाही. त्या सतत असत्य बोलतील. कुलवती स्त्रियाही परपुरुषावर आसक्त होतील. राजे प्रजेचे रक्षण करणार नाहीत. उलट प्रजेचे द्रव्य मात्र हरण करतील. ब्रह्मपुराणात म्हटले आहे,

अरक्षितारो हर्तारः शुल्कव्याजेन पार्थिवाः ।
हारिणो जनवित्तानां सम्प्राप्ते च कलौ युगे ।।
(२२९.३४)

युगान्त काल जवळ आला की अनाचार कसा माजेल याचे मोठे हृदयभेदक वर्णन ब्रह्मपुराणही करते. पाखंडवृत्ती, पाखंडी ब्राह्मणही विष्णूची उपासना सोडतील, ब्राह्मण व वेद यांच्यापासून लाभ काय ? अशी चर्चा होत राहील. चारही वर्ण शूद्राप्रमाणे वागतील. कलियुगात सासू व सासरा लोकांना गुरुस्थानी वाटतील. प्रिय भार्या व तिचा भाऊ हेच तेवढे सुहृद वाटतील. लोक सासुरवाडीस आसक्त होऊन आई कोणती ? बाप कोणता ? जो तो आपल्या कर्माप्रमाणे मरेल व तगेल, असे म्हणतील. ब्रह्मपुराण स्पष्टपणे सांगते की,

कस्य माता पिता कस्य यदा कर्मात्मकः पुमान् ।
इति चोदाहरिष्यन्ति श्वशुरानगता नराः ।।
(२२९.५५)

आणि असे तत्त्वज्ञान

युगान्त, प्रलयकाल, कलियुगधर्म सांगून झाल्यावर ब्रह्मपुराणात, शेवटी शेवटी त्रिविध तापांचे वर्णन आले असून भगवत्तत्त्वाची चर्चाही विस्ताराने वाचायला मिळते. योग व सांख्य, कर्म, ज्ञान, परमतत्त्व, अध्यात्म, क्षराक्षरविचार अशा काही तात्त्विक विषयांचे विवेचन साधकांना व जिज्ञासूंना मार्गदर्शन करणारे आहे. सांख्यतत्त्वज्ञानास महत्त्व देणाऱ्या या पुराणातील कराल जनक-वसिष्ठसंवाद बारकाईने वाचण्यासारखा आहे. प्राचीन परंपरेतील सांख्य २५ मूलतत्त्वे मानतात. नंतरचे तत्त्वज्ञ ईश्वर हे २६ वे श्रेष्ठ तत्त्व मानतात. ब्रह्मपुराणाने या नव्या विचारसरणीचा पाठपुरावा केला आहे. या तत्त्वविवेचनाबरोबर ब्रह्मपुराणात पाप-पुण्यविचार, मरणोत्तर स्थिती, यमलोक, स्वर्गनरक, श्राद्धकल्प, नीतितत्त्व इत्यादींचीही तात्त्विक चर्चा सुंदर सुंदर व बोधप्रद कथांच्या रूपाने आलेली आहे.

ब्रह्मपुराणाचा उपसंहार करताना रोमहर्षण मुनींनी सांगितले आहे ते फलश्रुतीच्या पद्धतीचे असले तरी महत्त्वाचे आहे. त्यांच्या मताने हे पुराण वेदतुल्य व सर्वपापहारी आहे. ऐकणाऱ्या ऋषींनीही या मतास संतुष्ट मनाने मान्यता दिली आहे. प्रयाग, पुष्कर, कुरुक्षेत्र, अर्बुदारण्य (आबू) इत्यादी क्षेत्रांत उपवास करून जे फल मिळते ते या पुराणाच्या श्रवणाने मिळेल. भगवान विष्णूच्या पदाची प्राप्ती श्रोत्यांना होईल. जो हे पुराण वाचील व दुसऱ्यास ऐकवील त्याला वैकुंठधामाची प्राप्ती होईल. त्याला यश, कीर्ती, आयुष्य, सुख, धन, पुष्टी, आरोग्य यांची प्राप्ती होईल.

* *

अनुक्रमणिका

१ प्रास्ताविक

२. कथा-उपकथा

३. तीर्थक्षेत्रमाहात्म्य

४. सृष्टि रचना

५. सदाचारदर्शन

६. तत्त्वज्ञानदर्शन

७. स्तोत्रमंजूषा

★ ★ ★



भुवनेश्वराचे लिंगराजमंदिर

१ प्रास्ताविक

हे सर्व जगत् कसे निर्माण झाले ?

यस्मात्सर्वमिदं प्रपञ्चरचितं मायाजगज्जायते ।
यस्मिंस्तिष्ठति याति चान्तसमये कल्पानुकल्पे पुनः ।।
यं ध्यात्वा मुनयः प्रपञ्चरहितं विन्दन्ति मोक्षं ध्रुवम् ।
तं वन्दे पुरुषोत्तमाख्यममलं नित्यं विभुं निश्चलम् ।।

हे सर्व प्रपंचरचित मायाजगत् ज्याच्यापासून उत्पन्न होते, ज्याच्या ठिकाणी स्थिती पावते आणि अंतसमयी ज्याच्या ठिकाणीच विलीन होते, तसेच ही प्रक्रिया ज्याच्यामुळे कल्पामागून कल्प चालत राहते व ज्याचे ध्यान करून मुनी मायारहित अशा चिरस्थायी मोक्षाला प्राप्त होतात, त्या निर्मल, नित्य, विभू (व्यापक) व निश्चल अशा पुरुषोत्तमाला– श्रीविष्णूला– मी नमस्कार करतो.

फार पूर्वीची हकीगत आहे. परमपवित्र असे नैमिषारण्य अतिशय मनोहर असून त्यात अनेक ऋषिमुनी एकत्र झाले होते. विविध पुष्पांनी त्याची शोभा वाढलेली होती. नाना प्रकारचे पक्षी, मृग, पवित्र जलाशय, अनेक गायी यांनी या वनाची शोभा वर्धित झालेली होती. या नैमिषा-

रण्यात ऋषिमुनींनी बारा वर्षेपर्यंत चालणारा एक यज्ञ सुरू केला होता. जव, गहू, चणे, उडीद, मूग, तीळ इत्यादी धान्यांनी यज्ञमंडप सुशोभित झाला होता. होमकुंडात अग्निदेव प्रज्वलित झालेला असून त्याच्या मुखात आहुत्या पडत होत्या. स्थानिक ऋषिमुनींनी बाहेरून आलेल्या अनेक ऋषिमुनींचे यथायोग्य स्वागत केले होते. सर्व ऋषिमुनी विश्रांती घेण्यासाठी बसलेले असताना महाबुद्धिमान लोमहर्षण सूतजी तेथे आले. ऋषिमुनींनी प्रसन्नतापूर्वक त्यांचा सत्कार केला. सन्मान स्वीकारून सूतजी एका श्रेष्ठ आसनावर विराजमान झाले. चर्चा सुरू झाली तेव्हा सर्वांनी व्यासशिष्य लोमहर्षण यांना नम्रतापूर्वक विचारले,

'सूतजी, आपण वेद, शास्त्रे, पुराणे, सर्व काही जाणता. तर आमचा संशय दूर करावा. हे सर्व जगत् कसे उत्पन्न झाले ? भविष्यकाळात या जगताचे काय होणार ? स्थावर-जंगम-रूपात असलेली ही सृष्टी प्रथम कोणत्या अवस्थेत होती ? शेवटी कोठे विलीन होणार आहे? '

ब्रह्मदेवापासून सृष्टीचा विकास

लोमहर्षणांनी सारा वृत्तान्त कथन केला.

निर्विकार, शुद्ध, नित्य, विश्वाचा आधार, ज्ञानस्वरूप, विश्वेश्वर अशा त्या परमात्म्याला नमस्कार असो. इतिहासपुराणांचे ज्ञाते, वेदपारंगत, संपूर्ण शास्त्रे जाणणारे असे पराशरनंदन भगवान व्यास माझे गुरुवर्य. त्यांना माझा प्रणाम असो. फार पूर्वी दक्ष इत्यादी मुनींनी विचारल्यावरून भगवान ब्रह्मदेवाने सांगितलेली पापनाशिनी कथा मी आपणांस आज सांगणार आहे. यात वेदांच्या अर्थाचा विस्तार आपणांस दिसेल.

जी नित्य, सदसत्स्वरूप तथा कारणभूत अव्यक्त प्रकृती आहे तीच प्रमुख असून तिच्या साह्याने पुरुषाने या विश्वाची निर्मिती केली. अमिततेजस्वी ब्रह्मदेव म्हणजे हा पुरुष. यांनी सर्व प्राण्यांची सृष्टी निर्माण केली. प्रकृतीपासून महत्तत्त्व, महत्तत्त्वापासून अहंकार, अहंकारापासून सर्व सूक्ष्म भूत उत्पन्न झाले. त्यानंतर स्वयंभू भगवान नारायणांनी नाना प्रकारची प्रजा उत्पन्न करण्याच्या हेतूने प्रथम जलाची

निर्मिती केली. पूर्वकालात भगवानांचे निवासस्थान हे जल होते. भगवानांनी आपल्या शक्तीने एक सुवर्णमय अंडे निर्माण केले. यातून भगवान ब्रह्मदेव उत्पन्न झाले. द्युलोक– भूलोक, आकाश, पृथ्वी, दिशा, काल, मन, वाणी, काम, क्रोध, रतिभावना यांची निर्मिती यातूनच झाली. ब्रह्मदेवांनी मरीची, अत्री, अंगिरा, पुलस्त्य, पुलह, क्रतू, वसिष्ठ असे सात प्रजापती निर्माण केले. यानंतर ब्रह्म्याने आपल्या रोषातून रुद्र प्रकट केला. सनत्कुमारांचा जन्म झाला. या सात महर्षींनी पुढील सृष्टीचा विकास केला. ब्रह्मदेवांनीच विद्युत्, वज्र, मेघ, रोहित, इंद्रधनुष्य, पक्षी यांची निर्मिती करून यज्ञासाठी त्यांनीच ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद निर्माण केले. छोटया-मोठया देवदेवतांची निर्मिती झाली.

ब्रह्मदेवाची प्रजा

परंतु इतके करूनही सृष्टीचा विकास होत नव्हता. म्हणून ब्रह्मदेवांनी आपल्या शरीराचे दोन भाग करून एक अर्धा पुरुष, अर्धा स्त्री अशी रचना केली. पुरुषाचे नाव मनू असून त्याची पत्नी अयोनिजा शतरूपा होती. तिने दहा हजार वर्षे तप करून तेजस्वी अशा पुरुषाची पती म्हणून प्राप्ती करून घेतली. याच पुरुषाला स्वायंभुव मनू तथा वैराज पुरुष असे नाव मिळाले. या शतरूपास वैराज पुरुषापासून वीर, प्रियव्रत, उत्तानपाद नावांचे पुत्र झाले. वीरास काम्या नावाची एक कन्या झाली. हीच कर्दम प्रजापतीची पत्नी झाली. काम्यास सम्राट, कुक्षी, विराट व प्रभू असे चार पुत्र झाले. उत्तानपादाची पत्नी सुनृता. यांना ध्रुव, कीर्तिमान, आयुष्यमान व वसू असे चार पुत्र झाले. ध्रुवास शंभू नावाच्या पत्नीपासून श्लिष्टी व भव्य या दोन पुत्रांचा लाभ झाला. श्लिष्टी व त्याची पत्नी सुछाया यांना रिपू, रिपुंजय, वीर, वृकल व वृकतेजा असे पाच पुत्र झाले. रिपू व बृहती यांना चाक्षुष झाला. चाक्षुषाचा पुत्र चाक्षुष मनू. याला दहा पुत्र झाले. कुत्स, पुरू, शतद्युम्न, तपस्वी, सत्यवाक्, कवी, अग्निष्टुत, अतिरात्र, सुद्युम्न व अभिमन्यू हे ते दहा पुत्र असून पुरूस अंग, सुमना, स्वामी, क्रतू, अंगिरा

व मय हे सहा पुत्र झाले. अंगास वेन नावाचा पुत्र होऊन त्याच्या जुलमी अत्याचाराने सर्व ऋषिमुनींचा त्रास वाढला. या वेनाचा पुत्र पृथू हा धनुष्य व बाण यांनी सिद्ध असून महातेजस्वी होता. त्यानेच या पृथ्वीचे पालन केले. राजसूय यज्ञाच्या वेळी अभिषिक्त होणारा हाच पहिला राजा. यानेच पृथ्वीस सुशोभित केले. देव-देवता, ऋषी, पितर, दानव, गंधर्व, सात अप्सरा यांच्यासह राजा पृथूने उत्तम रीतीनें राज्य केले.

२ कथा-उपकथा

पृथ्वीचे दोहन करणारा पृथू

फार पूर्वीची कथा आहे. अत्रिकुलात उत्पन्न झालेला प्रजापती अंग हा मोठा धर्मात्मा होता. त्याचा पुत्र वेन. त्याला धर्मतत्त्वाचे प्रेम बिलकुल नव्हते. मृत्युकन्या सुनीथा ही त्याची आई. या वेनाने धर्माचे सर्व नियम भंगून काम व लोभ यांचाच आश्रय केला. यज्ञ व होमहवन होऊ न देण्याची त्याने प्रतिज्ञाच केली. मीच यज्ञरूप अशी त्याची भावना होती. वेनाची ही वृत्ती पाहून मरीची ऋषी त्याला म्हणाले,

'वेना, यज्ञाची दीक्षा आम्ही सर्व ऋषींनी घेतली आहे. आपण असा अधर्म करू नये. यज्ञादी कर्म म्हणजे आपला सनातन धर्म आहे.'

'अरे, माझ्याशिवाय दुसरा धर्मनिर्माता आहे तरी कोण ? विद्या, पराक्रम, तपस्या, सत्यप्रीती यांत माझी बरोबरी कोण करू शकेल ? मीच सर्व धर्मांचे उत्पत्तिस्थान आहे. तुम्ही अडाणी लोक मला जाणीत नाही. मी मनात आणलं तर या पृथ्वीला भस्म करून टाकीन. पाण्यात बुडवून टाकीन.'

वेन राजाचा क्रोध वाढला. सर्व ऋषिमुनींनी मोठ्या कष्टाने वेनाला बांधून पकडले. याच वेनापासून निषादवंशाची सुरुवात झाली.

आणि याच वेनापासून अग्नीप्रमाणे तेजस्वी अशा पृथूचा जन्म झाला. पृथूच्या जन्मामुळे साऱ्या प्राणिसृष्टीस कमालीचा आनंद झाला. वेन स्वर्गवासी झाला. राजा पृथूस राज्याभिषेक झाला. या पृथूने दयाळुपणाने राज्य करून पृथ्वीवर एक समृद्ध जीवन उभे केले. धनधान्यांनी पृथ्वी सजली, नटली. या पृथू राजाची स्तुती सूत, मागध व बंदीजन यांनी मनापासून केली. पृथूने संतुष्ट होऊन अनूप देशाचे राज्य सूताला व मगधाचे मागधाला दिले. साऱ्या प्रजेच्या कल्याणासाठी पृथूने मोठमोठे पराक्रम केले. पृथ्वी त्याच्या पराक्रमाने भीतिग्रस्त होऊन गायीचे रूप धारण करून त्याच्यासमोर आली अन् म्हणाली,

'राजन्, सर्व लोकांचा भार माझ्यावर आहे. मीच या जगताला धारण केले आहे. माझा नाश झाला तर सर्वच जगताचा विनाश होईल. भूपाला, तुला प्रजेचं खरंच कल्याण करायचं असेल तर प्रथम माझं रक्षण कर.'

'भद्रे, ज्या वधानं सर्व प्राण्यांचं रक्षण होणार आहे त्यात पाप कसलं ? तू जर माझ्या प्रजेसाठी कल्याणदायी न बनलीस तर मी तुझाही वध करीन. मी स्वतःच नवीन पृथ्वी बनून सर्व कारभार करीन. म्हणून तूच माझ्या प्रजेच्या सुखासाठी प्रयत्न करावेस. तू या समयास माझी पुत्री बनावंस. त्यानंतर मी हे धनुष्यबाण खाली ठेवीन.'

'वीर नरेन्द्रा, तू म्हणशील तसं मी सर्व करीन.'

राजाने पृथ्वीचे साह्य घेऊन समस्त जगताचे कल्याण केले. पृथ्वीवरील पर्वत नीट वाढू लागले. धान्यासाठी पृथ्वीचा काही भाग समतोल झाला. नगर, गाव, नदी, नाले यांची व्यवस्था झाली. अन्ननिर्मिती, गोरक्षण, शेती, व्यापार यांची वाढ झाली. केवळ कंदमुळे खाऊन जगणारी प्रजा पृथू राजाच्या पराक्रमाने विविध प्रकारचे रसमय अन्न निर्माण करून सुखी झाली. पृथू राजाने पृथ्वीचे पूर्णपणाने दोहन करून प्रजा संतुष्ट राखली. ऋषी, देवता, पितर, नाग, दैत्य, यक्ष, पुण्यजन, गंधर्व, पर्वत, वृक्ष यांची नीट व्यवस्था लागली. सर्व प्रजेचे नीट पालन-पोषण झाले. समस्त चराचर सृष्टीचा आधार पृथ्वी झाली. पृथ्वीवर

सर्व प्रकारचे धान्य उगवू लागले. गोरूपा पृथ्वी आता मेदिनी नावाने विख्यात झाली. समुद्रापर्यंत पृथ्वीवर पृथूचेच राज्य होते. राजा पृथूच्या पराक्रमाने पृथ्वी अन्न निर्माण करण्यास समर्थ बनली. ती समृद्धशाली बनली. नाना नगरे, नाना गावे यांनी पृथ्वीची शोभा वाढली. वेदशास्त्र-संपन्न ब्राह्मणांनी पृथू राजाची मनापासून स्तुती केली. निरनिराळ्या राजांनी पृथूचे स्वागत केले. पृथू युद्धातही अग्रगण्य बनला. तीन वर्णांच्या लोकांना राजा पृथूचे नाव पवित्र वाटू लागले. सर्वांनाच पृथू वंदनीय वाटला. पृथ्वीचे दोहन करून पृथूने या जगताचा संसार नीट सुरू केला.

राजा सगराची कुलपरंपरा

राजा सत्यव्रत व राणी सत्यरथा यांचा मुलगा हरिश्चंद्र. याचा पुत्र रोहित. रोहिताला हरित व हरिताचा पुत्र चंचू. चंचूचा पुत्र विजय. याचा पुत्र रुरुक धर्म व अर्थ यांचा ज्ञाता होता. या रुरुकाचा वृक, वृकाचा बाहू व बाहूचा सगर पुत्र होय. गर म्हणजे विषाच्या बरोबर याचा जन्म झाल्याने तो सगर नावाने प्रसिद्ध झाला. या राजाने भृगुवंशी और्वमुनीपासून आग्नेय अस्त्र प्राप्त करून तालजंघ व हैहय नावांच्या क्षत्रियांचा पराभव केला.

राजा बाहू फार व्यसनी होता. हैहय नावाच्या एका क्षत्रिय राजाने तालजंघ व शक यांच्या साह्याने त्याचे राज्य हिरावून घेतले. यवन, पारद, कांबोज, पल्लव इत्यादी गणांनीही हैहयाच्या बाजूने पराक्रम केला. राज्य गेल्याबरोबर राजा बाहू आपल्या पत्नीबरोबर वनात गेला. तेथे त्याने आपला प्राण समर्पण केला. बाहूची पत्नी यादवी या वेळी गर्भवती होती. राजाबरोबर सहगमन करण्यासाठी ती तयार झाली. तिने वनात एक चिता तयार केली. त्यावर आपल्या पतीसह आरूढ होऊन ती अग्नीत प्रवेश करणार होती. भृगुवंशी और्वमुनीस तिची फार दया आली. त्याने राणीस चितेत प्रवेश करण्यापासून परावृत्त केले. या राणीस तिच्या सवतीने जहर दिले होते. और्वमुनींच्या आश्रमात राणीचा गर्भ जहरा-सह बाहेर आला. या सगराचे जातकर्मादी संस्कार और्वमुनींनीच केले.

त्याला वेदशास्त्रांचे शिक्षण दिले. आग्नेय अस्त्राचे वरदानही त्याने सगरास दिले. या सगराने हैहयवंशी क्षत्रियांचा विनाश करून खूपच कीर्ती संपादन केली. त्याने शक, यवन, कांबोज, पारद, पल्लव गणांचाही नाश केला. वीर सगराच्याकडून मार खाल्लेले हे सर्वजण महर्षी वसिष्ठांना शरण गेले. काही शर्थींवर वसिष्ठांनी त्यांना अभय देऊन सगर राजास थांबविले. आपली प्रतिज्ञा व गुरूची आज्ञा यांचा मेळ घालून त्याने शत्रूंचा बंदोबस्त केला.

धर्मविजयी सगर राजाने सर्व पृथ्वीला जिंकून अश्वमेध यज्ञाची तयारी केली. त्याचा घोडा सर्वत्र संचार करू लागला. पूर्वदक्षिण किनाऱ्यावर तो घोडा दौडत असताना कोणीतरी त्याला चोरून नेले आणि पृथ्वीच्या आत लपविले. सगर राजाने आपल्या पुत्रांकडून तो प्रदेश खणून काढला. या सखल प्रदेशात आदिपुरुष भगवान विष्णू महर्षी कपिलांच्या रूपाने झोपलेला होता. तो जागा होताच त्याच्या डोळ्यांतील तेजाने सगरपुत्र जळून भस्मसात झाले. बर्हिकेतू, सकेतू, धर्मरथ व पंचनद हे चार फक्त वाचले. कपिलरूपी भगवानांनी त्यांना वर दिला की, राजा इक्ष्वाकूचा वंश अक्षय राहील. त्याची कीर्ती कधीच कमी होणार नाही. सखल भागाचा समुद्र झाला व तो सगराचा पुत्र म्हणून सागर नावाने ओळखला गेला. अश्वमेध यज्ञाचा अश्व प्राप्त झाल्यानंतर यज्ञाचे अनुष्ठान थाटाने पूर्ण झाले. या सगर राजाला असे सांगतात की साठ हजार पुत्र होते.

सगर राजाच्या दोन राण्या होत्या. थोरली विदर्भ नरेशाची कन्या असून तिचे नाव केशिनी होते. धाकटी अरिष्टनेमीची कन्या असून धर्मपरायणा होती. हिच्याएवढी रूपवान दुसरी कोणी नव्हती. महर्षी और्वांनी या दोघींना दोन वर दिले. ‘ एक राणी साठ हजार पुत्रांना जन्म देईल. दुसरीला एकच पुत्र होईल. तो मात्र वंश चालवील. या दोन वरांपैकी जिला जो पाहिजे तो तिने घ्यावा.’ एका राणीने साठ हजार पुत्र मागितले. दुसरीने वंश चालविणारा एक पुत्र पसंत केला. पहिलीला साठ हजार पुत्र झाले. दुसरीस पंचजन नावाचा एक पुत्र

झाला. या पंचजनाचा पुत्र अंशुमान्. या पराक्रमी अंशुमानाचा पुत्र दिलीप. दिलीपाचा पुत्र भगीरथ. यानेच गंगा नदीस मोठ्या प्रयासाने स्वर्गातून पृथ्वीवर आणले व तिला आपली पुत्री बनविले. या भगीरथाचा पुत्र श्रुत, श्रुताचा नाभाग, नाभागाचा अंबरीष व अंबरीषाचा पुत्र सिंधुद्वीप होय. याचा नातू ऋतुपर्ण. हा द्यूतविद्येत प्रवीण असून महाराज नलाचा मित्र होता. याच परंपरेत आणखी एक दिलीप नावाचा पुत्र होऊन त्याचा पुत्र महाबाहू रघू अयोध्येचा सम्राट बनला. रघूचा पुत्र अज व अजाचा पुत्र दशरथ. दशरथाचा पुत्र धर्मात्मा श्रीरामचंद्र. या रामचंद्राचे पुत्र लव व कुश. सूर्यवंशातील ही इक्ष्वाकू परंपरा अशा अत्यंत तेजस्वी राजपरंपरेने शोभणारी आहे.

चंद्रवंशीय जन्हुपरंपरा

ब्रह्मदेव जेव्हा सृष्टीच्या रचनेचा विचार करीत होते तेव्हाच त्यांच्या मनापासून अत्री ऋषींची निर्मिती झाली. हे अत्री चंद्रमाचे पिता. या चंद्रमाने सर्व पृथ्वीवर आपला प्रभाव गाजविला. चंद्रमाची तपस्या पाहून ब्रह्मदेवाने त्यास बीज, औषध, जल, ब्राह्मण यांचा राजा बनविले. मृदू वृत्तीच्या चंद्रमाने राजसूय यज्ञासाठी एक अनुष्ठान करून त्यात लाखोंची दक्षिणा वाटली. याच यज्ञात सिनी, कुहू, द्युती, पुष्टी, प्रभा, वसू, कीर्ती, धृती, लक्ष्मी अशा नऊ देवतांनी चंद्रमाचे सेवन केले. राजाधिराज सोम दशदिशांना प्रकाशित करीत राहिला. या दुर्लभ ऐश्वर्याने चंद्राची बुद्धी भ्रांत झाली. त्याच्यातील विनय संपून त्याचे वर्तन अनीतिमान झाले. ऐश्वर्याच्या मदाने मोहित होऊन त्याने एकदा बृहस्पतीची पत्नी तारा हिचे अपहरण केले. अनेक देवदेवतांनी मध्यस्थी केली, पण चंद्राने तारा परत केली नाही. शेवटी ब्रह्मदेवाने या कामी लक्ष घालून तारेस बृहस्पतीकडे पाठवून दिले. या वेळी तारा गर्भिणी असलेली पाहून बृहस्पती रागावले. ते तारेस म्हणाले,

'तुला हा गर्भ दुसऱ्याकडून राहिला. हे चालणार नाही.'

तृणांच्या पानांवर तारेने तो गर्भ सोडून दिला. त्या गर्भाच्या तेजाने देवदेवता दिपून गेले. ब्रह्मदेवांनी तारेस विचारले,

'तारा, ठीक सांगतेस ? हा गर्भ कुणाचा ?'

'चंद्रमाचा.' तारेने हात जोडून सांगितले.

तेव्हा चंद्रमाने तो गर्भ उचलून घेतला व त्याचे नाव बुध ठेविले. हा बुध अतिशय बुद्धिमान निघाला. या बुधाचा पुत्र पुरूरवा एक मोठा विद्वान, तेजस्वी, दानशील, यज्ञकर्ता निघाला. निरंतर अग्निहोत्रात हा रमलेला असे. ब्रह्मवादी, शांत, धर्मज्ञ व सत्यवादी पुरूरव्याबरोबर अभिमान सोडून उर्वशीने विवाह केला. त्याने प्रयागमध्ये अनेक वर्षे राज्य केले. आयू, अमावसू, विश्वायू, धर्मात्मा, श्रुतायू, दृढायू, वनायू व बह्वायू हे सात पुत्र पुरूरव्यास झाले. अमावसूचा पुत्र राजा भीम, भीमाचा कांचनप्रभ, याचा सुहोत्र व याचा जन्हू. जन्हूची आई केशिनी. यानेच सर्पमेध नावाचे एक मोठे अनुष्ठान केले. याच्यावर लुब्ध होऊन एकदा गंगा त्याच्या समोर आली व त्याला आपला पती म्हणून तिने मानले. जन्हूने नकार देताच रागावलेल्या गंगेने त्याची सर्व यज्ञशाला वाहून टाकली. गंगेच्या या कृत्याचा जन्हूनूस फार राग आला. त्याने गंगेचा सर्व ओघच पिऊन टाकला. ऋषींच्या विनंतीवरून गंगेस जन्हूनूने पुत्री मानन मुक्त केले. गंगा आता जान्हवी म्हणून प्रसिद्धीस आली.

जन्हूने युवनाश्वाची कन्या कावेरीशी विवाह केला. यांचा पुत्र सुनद्य. या सुनद्याचा पुत्र अजक. अजकाचा बलाकाश्व व याचा कुश होय. कुशिक, कुशनाथ, कुशाम्ब व मूर्तिमान् हे कुशाचे चार पुत्र. कुशिक वनात राहून गवळ्यांच्या मुलांशी खेळत राही. इंद्राच्या समान आपणांस पुत्र व्हावा म्हणून त्याने तप केले. या कुशिकाची पत्नी पौरा. यांना इंद्ररूप असा गाधी नावाचा एक पुत्र झाला. या गाधीची एक मुलगी सत्यवती नावाची होती. शुक्राचार्यांचा पुत्र ऋचीकबरोबर सत्यवतीचा विवाह झाला. या सत्यवतीवर ऋचिकाचा मोठा लोभ होता. त्याने आपल्या पत्नीस एकदा म्हटले,

'शुभे, या चरूचा उपयोग तू कर. हा दुसरा चरू तू तुझ्या मातेस दे. तुझ्या मातेचा पुत्र मोठा क्षत्रिय होईल. तुला धीर, तपस्वी, शांतिपरायण असा एक पुत्र होईल.'

इतके बोलून ऋचीकमुनी तपस्येसाठी घनघोर जंगलात निघून गेले. याच सुमारास राजा गाधी आपल्या पत्नीसह फिरत फिरत ऋचीक मुनींच्या आश्रमात आले. मायलेकींच्या बोलण्यात काही गडबड झाली आणि चरूंची अदलाबदल झाली. पुत्रीचा चरू मातेने आणि मातेचा पुत्रीने घेतला. सत्यवतीने सर्वांचा गर्व हरण करणाऱ्या क्षत्रियाचा गर्भ धारण केला. तिचे शरीर तेजस्वी बनले. तिची मुद्रा भयंकर दिसू लागली. योगसामर्थ्यामुळे ऋचिकास संशय येताच त्याने पत्नीस विचारले, 'तुझ्या मातेनं चरू बदलला आहे. तुला फसविलं वाटतं ? तुला आता कठोर स्वभावाचा पराक्रमी पुत्र होईल व तुझा भाऊ मात्र शांत आणि तपस्वी होईल.' त्यावर सत्यवती म्हणाली,

'मुने, मला असा पुत्र नको. आपल्यासारख्या तपस्वी ब्राह्मणास असा बलवान पुत्र ? मला तो नको.'

'भद्रे, तुला आता असाच पुत्र होणार !'

'मुने, आपण मनात आणलं तर सर्व सृष्टीची रचना पुन: कराल, मग योग्य अशा पुत्राची निर्मिती आपणास अशक्य कशी ? मला शांत स्वभावाचा पुत्र हवाय.'

आपल्या तपोबलाने पत्नीच्या मनासारखे करण्याचे आश्वासन मुनीने दिले. ते म्हणाले, 'सुंदरी, पुत्र आणि पौत्र यांत अंतर नाही. तुझ्या मनाप्रमाणं सारं होईल.'

सत्यवतीनें पुत्रास जन्म दिला. त्याचे नाव जमदग्नी. हा तपस्यापरायण, जितेन्द्रिय व सर्वत्र समभावी होता. सत्यवतीही नावाप्रमाणे सत्यधर्माप्रमाणे वागणारी पुण्यात्मा स्त्री होती. इक्ष्वाकू वंशात एक रेणू नावाचा राजा होता. त्याच्या कन्येचे नाव रेणुका. हिलाच कामली असेही म्हणत. ही रेणुका जमदग्नींची पत्नी. त्यांचा मुलगा परशुराम हा महापराक्रमी, क्षत्रिय कुलांचा संहार करणारा निघाला. गाधीला जो पुत्र झाला त्याचे नाव विश्वामित्र. हा तपस्वी, विद्वान व शांत निघाला. त्याने तप करून ब्रह्मर्षी ही पदवी संपादन केली. याचे देवरात इत्यादी अनेक पुत्र प्रसिद्ध झाले. कात्यायन गोत्राचे कती, हिरण्याक्ष,

रेणू, सांकृती, गालव, मुद्गल, मधुच्छन्द, जय, देवल, हारीत अशी त्यांच्यापैकी काहींची नावे होत.

नहुष आणि राजा ययाती

आयूची पत्नी स्वर्भानुकुमारी प्रभा. यांचे पाचही पुत्र पराक्रमी निघाले. नहुष, वृद्धशर्मा, रंभ, रजी, अनेना असे हे शूर पुत्र आपल्या पराक्रमाने चमकले, रजी व त्याचे पुत्र यांनीही खूप पराक्रम केला. विशेषतः रजीच्या पराक्रमाने सर्वांनाच आकृष्ट केले. ज्या बाजूला रजी त्या बाजूला जय, धन, कीर्ती असल्याने देव व दानव आपापसांत भांडताना दोघेही साह्य मागण्यासाठी रजीकडे गेले. रजीने या वेळी पराक्रम करून इंद्राकडून गौरव करवून घेतला. इंद्र त्याच्या पुत्रासारखा झाला. अनेनाचाही वंश असाच वाढला. प्रतिक्षत्र हा त्याचा पुत्र. याच पराक्रमी वंशात पुढे काश, शल, गृत्समद असे तीन पुत्र झाले. गृत्समदाचा पुत्र शुनक. शुनकाचा शौनक. शलाचा पुत्र आर्ष्टिषेण. त्याचा पुत्र काश्य. काश्याचा काशिप. याच परंपरेत धन्वंतरी झाला. हा धन्वंतरी काशीचा महाराज असून सर्व रोगांचा नाश करणारा होता. यानेच भरद्वाज ऋषींच्याजवळ अध्ययन करून आयुर्वेदास प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. याच शाखेत अलर्क, केतुमान, धर्मकेतू, धृष्टकेतू, वत्सभूमी, भार्गभूमी अशी नामावली प्रसिद्ध झाली.

राजा नहुषाची पत्नी पितृकन्या विरजा. यांना यती, ययाती, संयाती, आयाती व पार्श्वक असे पाच पुत्र झाले. यतीने ककुत्स्थाची कन्या गौरी हिच्याशी विवाह केला होता. मोक्षधर्माचा आश्रय घेऊन तो ब्रह्मस्वरूप मुनी बनला. ययातीने पृथ्वीला जिंकून शुक्राचार्यांची कन्या देवयानी व असुरकन्या शर्मिष्ठा यांना पत्नी म्हणून जवळ केले. देवयानीने यदू व तुर्वसू यांना जन्म दिला. द्रुह्य, अनू व पुरू हे शर्मिष्ठाचे पुत्र. इंद्राने प्रसन्न होऊन ययातीला एक प्रकाशमान असा रथ दिला होता. मनोवेगाचे त्याला अश्व जोडलेले असत. या रथावर आरूढ होऊन ययातीने सहा रात्रींतच पृथ्वीवरील सर्व देव व दानव यांना

जिंकले. सर्व पृथ्वीवर त्याचेच राज्य सुरू झाले. आपल्या पाच पुत्रांत हे राज्य वाटून दिल्यावर त्याने एके दिवशी यदूस म्हटले,

'बेटा, काही कारणासाठी मला तुझं तारुण्य हवंय. तू माझा वृद्धपणा घे. मी तुझी युवावस्था धारण करून या जगतात राहीन.'

'राजन्, वृद्धावस्थेत खाण्यापिण्याचे बरेच निर्बंध येतात. मी काही तुमचा वृद्धपणा नाही घेणार. तुम्ही तुमच्या इतर पुत्रांना विचारा ना.'

'मूर्खा, माझा अनादर करतोस ? मी तुझा गुरू. माझी विनंती अमान्य करतोस ? हा कुठला धर्म रे ?'

रागात ययातीने यदूस शाप दिला. 'मूर्खा, तुझ्या संततीला कधीच राज्य मिळणार नाही.' राजाने क्रमाने द्रुह्यु, तुर्वसू, अनू यांनाही त्यांची युवावस्था मागितली. सर्वांनी त्याला नकार दिला. त्यांनाही ययातीने असाच शाप दिला. शेवटी छोटा पुत्र पुरूला राजाने विचारले,

'वत्सा, मी माझं वृद्धत्व तुला देईन. अन् तुझी युवावस्था मला घेईन.'

पित्याच्या आज्ञेप्रमाणे पुत्राने आपली युवावस्था पित्याला दिली आणि त्याची वृद्धावस्था पत्करली. ययाती पुन्हा तरुण व सतेज बनला. विविध कामनांच्या मागे लागून तो चैत्ररथ नावाच्या वनात गेला. तेथे तो विश्वाची नावाच्या अप्सरेशी पुष्कळ काळपर्यंत रमला. जेव्हा काम व भोग यांची तृप्तता झाली तेव्हा ययाती पुरूच्या जवळ आला. त्याने आपले वृद्धत्व त्याच्या जवळून परत घेतले. या प्रसंगी ययाती म्हणाला,

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।।
यत्पृथिव्यां व्रीहियवं हिरण्यं पशवः स्त्रियः ।
नालमेकस्य तत्सर्वमिति कृत्वा न मुह्यति ।।

'भोगांची इच्छा भोग भोगून कधीच तृप्त होणार नाही. परंतु अग्नीत तूप टाकल्यानंतर तो जसा प्रज्वलित होतो तशी ती इच्छा वाढतच जाते. या पृथ्वीवर जितके धनधान्य, सुवर्ण, पशू, स्त्रिया या सर्व एका माणसास पूर्ण पडणाऱ्या नाहीत. म्हणून विद्वान पुरुषाने मोहा-

पासून दूर असावे. मन, वाणी व क्रिया यांच्या मार्फत जेव्हा जीव प्राण्यांच्या बाबतीत पापबुद्धी धरीत नाही तेव्हाच तो ब्रह्मभावास पोचतो. तो कुणास भीत नाही की त्याची भीती कुणास वाटत नाही. इच्छा व द्वेष यांच्या पलीकडचा हा पुरुष ब्रह्मभावास पोचलेला असतो. वृद्ध झालेल्या माणसाचे केस पिकतात, दात तुटून जातात, पण धन व जीवन यांची आशा मात्र त्याची शिथिल होत नाही.' इतके बोलून आपल्या स्त्रीसहित राजर्षी ययाती वनात निघून गेला. त्याने दीर्घकाळ तपस्या करून भृगुतुङ्ग नावाच्या तीर्थात आपला अवतार संपविला. उपवास करून त्याने आपल्या देहाचा त्याग केला.

ययातिपुत्र आणि कार्तवीर्य

ययातीची कथा ऐकून झाल्यावर मुनिवरांनी ययातिपुत्रांची हकीगत विचारली. लोमहर्षण ऋषीनेही मोठ्या संतोषाने पुरूच्या वंशाचा विस्तार वर्णन केला. पुरूचा पुत्र सुवीर, त्याचा पुत्र मनस्यू. मनस्यूचा पुत्र राजा अभयद. याचा सुधन्वा, सुधन्वाचा सुबाहू, सुबाहूचा रौद्राश्व. या रौद्राश्वाला दशार्षेयू, कृकणेयू, कक्षेयू, स्थंडिलेयू, संतनेयू, ऋचेयू, जलेयू, स्थलेयू, धनेयू व वनेयू असे दहा पुत्र झाले. भद्रा, शूद्रा, मद्रा, शलदा, मलदा, खलदा, नलदा, सुरसा, गोत्रपला व स्त्रीरत्नकूटा या दहा कन्याही त्याच्याच. अत्रिकुलातील प्रभाकर हा या सर्वांचा पती होय. यांचे दहा पुत्र वेदांत पारंगत झाले. कक्षेयूचे सभारनर, चाक्षुष व परमन्यू हे तीन महारथी पुत्र होत. सभारनराचा पुत्र कालानल व कालानलाचा धर्मज्ञ संजय पुत्र. संजयाचा पुत्र वीर राजा पुरंजय. या पुरंजयाचा पुत्र जनमेजय. जनमेजयाचा पुत्र महाशाल हा मोठा यशस्वी झाला. महाशालाचा पुत्र महामना. त्याचाही लौकिक खूप वाढला. याला धर्मज्ञ उशीनर व महाबली तितिक्षू असे दोन पुत्र. नृगा, कृमी, नवा, दर्वा व दृषद्वती या पाच पत्नी उशीनराच्या. यांनाही पुत्र झाले. नृगाचा पुत्र नृग, कृमीचे कृमी, नवेपासून नव, दर्वापासून सुव्रत व दृषद्वतीपासून शिबी, अशी ही परंपरा झाली. शिबीला शिबी देशाचे

राज्य मिळाले. नृगाच्या वाट्यास यौधेय प्रदेश आला. नवराष्ट्राचा मालक नव व कृमिलापुरीचा राजा कृमी झाला. अंबष्ट देश सुव्रताच्या मालकीचा झाला. वृषदर्भ, सुवीर, केकय व मद्रक हे शिबीचे चार पराक्रमी पुत्र होत.

तितिक्षू हा पूर्व दिशेचा राजा. उषद्रथ, फेन, सुतपा, बली अशी ही परंपरा वाढली. बली मोठा पराक्रमी असून अंग, वंग, सुह्म, पुंड्र, कलिंग हे त्याचे पुत्र होत. या बलीस ब्रह्मादेवाने वर दिला होता, 'तू महायोगी होशील. तुझ्याएवढा बलवान कुणी राहणार नाही. धर्म-तत्त्वाची आवड तुला राहील. संग्रामात तुला कुणीही जिंकू शकणार नाही.' ब्रह्मदेवाच्या या वरप्राप्तीमुळे बलीच्या चित्तास शांती मिळाली. त्याच्या पाच पुत्रांच्या नावाने एक-एक जनपद तयार झाले. अंगाचा पुत्र दधिवाहन. याचा दिविरथ, याचा धर्मरथ व याचा चित्ररथ. राजा धर्मरथाने जेव्हा कालञ्जर पर्वतावर यज्ञ केला तेव्हा इंद्राने त्याच्याबरोबर सोमरसाचे पान केले होते. चित्ररथाचा पुत्र दशरथ हा लोमपाद या नावाने विख्यात झाला. शांता याचीच कन्या. दशरथाचा पुत्र चतुरंग, याचा पृथुलाक्ष, याचा पुत्र चंप चंपा नावाच्या नगरीत राही. चंपचा पुत्र हर्यश्व. याचा वैभांडिक. याचे वाहन इंद्राचा ऐरावत होते. यानेच मंत्रशक्तीच्या साह्याने या उत्तम हत्तीस पृथ्वीवर आणले. हर्यश्वचा पुत्र भद्ररथ. याचा बृहत्कर्मा, याचा बृहद्दर्भ व याचा बृहन्मना पुत्र. याच परंपरेनें अंगवंशाचा विस्तार करून नाव कमावले.

रौद्राश्वकुमार ऋचेयूचा पुत्र मतिनार. वसुरोध, प्रतिरथ व सुबाहू हे याचे महान तीन सुपुत्र. मतिनारच्या कन्येचे नाव इला. ही ब्रह्मवादिनी असून तिचा विवाह तंसूशी झाला. यांचा पुत्र धर्मनेत्र. याची पत्नी उपदानवी. यांना दुष्यन्त, सुष्मन्त, प्रवीर व अनघ असे चार पुत्र झाले. यांपैकी दुष्यन्ताचा पुत्र भरत हा महापराक्रमी निघाला. सर्वदमन असेही त्याचे नाव होते. त्याची आई शकुंतला. याचा पुत्र वितथ. सुहोत्र, सुहोता, गय, गर्भ, महात्मा कपिल हे वितथाचे पाच पुत्र होत. सुहोत्राचे दोन पुत्र. महासत्यवादी काशिक हा एक व दुसरा

राजा गृत्समती. या गृत्समतीचे पुत्र ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांत विभागले गेले.

सुहोत्राच्या बृहत नावाच्या पुत्रास अजमीढ, द्विमीढ, पुरुमीढ असे तीन पुत्र झाले. अजमीढास सुशांती, यास पुरुजाती, यास बाह्याश्व नावाचा पुत्र झाला. बाह्याश्वच्या पाच पुत्रांनी पाच जनपदे नावारूपास आणली. मुद्‌गल, सृञ्जय, बृहदिषु, यवीनर, कृमिलाश्व यांनी पांचाल देशास नावारूपास आणले. अजमीढाची एक पत्नी धूमिनी नावाची मोठी पतिव्रता होती. पुत्रकामनेसाठी तिने उग्र व्रत केले. विधिपूर्वक अग्नीत हवन केले. अग्निहोत्राच्या कुशांवर ती निजू लागली. राजा अजमीढापासून हिला याच वेळी एक पुत्र झाला. त्याचे नाव ऋक्ष. धुरकट रंगाचा हा पुत्र देखणा होता. ऋक्षापासून संवरण व संवरणास कुरू पुत्र झाले. कुरूंनी प्रयागाहून निघून कुरुक्षेत्रास राजधानी केली. यापासूनच कुरूचा महान वंश कौरव या नावाने चालला.

राजर्षी बाल्हिकाचा पुत्र सोमदत्त. याचे भूरी, भूरिश्रवा व शल हे तीन पुत्र. देवापी देवांचा उपाध्याय झाला. शांतनूने कौरववंशाचा भार सहन केला. या शांतनूस गंगेपासून देवव्रत नावाचा एक मुलगा झाला. हाच पुढे भीष्म या नावाने प्रसिद्धीस आला. काली या पत्नीपासून शांतनूस विचित्रवीर्य नावाचा एक पुत्र झाला. याच विचित्रवीर्याच्या स्त्रियांपासून कृष्णद्वैपायनाने धृतराष्ट्र, पांडू व विदुर यांना उत्पन्न केले. धृतराष्ट्रास गांधारीपासून शंभर पुत्र झाले. त्यांत ज्येष्ठ पुत्र दुर्योधन. पांडूचा पुत्र अर्जुन. अर्जुनापासून सुभद्राकुमार अभिमन्यू, यांपासून परीक्षित व यापासून जनमेजय. यास काश्या नावाच्या पत्नीपासून चंद्रापीड व सूर्यापीड नावाचे दोन पुत्र झाले. चंद्रापीडाचे अनेक पुत्र जानमेजय क्षत्रिय म्हणून प्रसिद्ध झाले. सत्यकर्ण, श्वेतकर्ण अशी ही परंपरा वाढत गेली. श्वेतकर्णास पुत्र नसल्यामुळे तो त्यासाठी वनात निघून गेला. तेथे यदुकुलात उत्पन्न झालेली सुचारूची पुत्री मालिनी आली होती. तिला श्वेतकर्णापासून गर्भ राहिला. श्वेतकर्ण यानंतर आपल्या संकल्पानुसार महाप्रस्थानासाठी निघाला. मालिनीही

त्याच्या मागोमाग गेली. मार्गात तिला मूल झाले. त्याला तसेच टाकून ती पतीच्या मागोमाग गेली. पर्वताच्या शिखरावर नवजात शिशू रडत होता. त्याच्यावर कृपा करण्यासाठी आकाशात मेघ जमा झाले. श्रविष्ठाच्या पैप्पलादी व कौशिक या दोन पुत्रांनी त्या शिशूला पाहिलं. त्यांनी त्याला चांगले पाण्याने धुऊन काढले. त्याचा पार्श्वभाग रक्ताने भरलेला होता. तो एका शिळेवर रगडून त्यांनी स्वच्छ केला. त्या दोघांनी या बालकाचे नाव अजपार्श्व ठेविले. रेमक व त्याची पत्नी यांनी त्याचे पालन केले.

तुर्वसूचा पुत्र वन्ही, त्याचा गोभानू, त्याचा त्रैशानू, त्याचा करंधम व करंधमचा मरुत्त पुत्र. करंधकुमारास पुत्र नव्हता. पुष्कळ दक्षिणा देऊन त्याने एक यज्ञ केला. महात्मा संवर्तास त्याने आपली संयता नावाची कन्या दिली. पुढे त्याने पुरूवंशीय दुष्यन्ताला दत्तक घेतले. दुष्यन्ताचा पुत्र करूरोम, करूरोमाचा आल्हाद व आल्हादास पांड्य, केरल, कोल व चोल असे चार पुत्र झाले. बभ्रुसेतू हा द्रुह्यकाचा पुत्र. बभ्रुसेतूस अंगारसेतू व यास मरुत्पती झाला. हा मरुत्पती युद्धात युवनाश्वकुमार मांधाताकडून मारला गेला. अंगारसेतूचा पुत्र राजा गांधार. याने गांधार देशावर राज्य केले. अनूचा पुत्र धर्म, धर्माचा घृत, घृताचा वनदुह, वनदुहाचा प्रचेता व प्रचेताचा सचेता. सहस्रपाद, पयोद, क्रोष्टू, नील व अंजिक हे देवकुमारांसारखे सुंदर पुत्र यदूचे. हैहय, हय व वेणुहय हे सहस्रपादाचे पुत्र. हैहयाचा पुत्र धर्मनेत्र. धर्मनेत्रास कार्त व कार्तास साहंज नावाचे पुत्र झाले. साहंजाचे दुसरे नाव महिष्मान. त्याचा प्रतापी पुत्र भद्रश्रेण्य. याचा दुर्दम व दुर्दमाचा कनक. कनकाचे चार पुत्र. कृतवीर्य, कृतौजा, कृतधन्वा व कृताग्नी.

कृतवीर्य पराक्रमी होता. त्याचा पुत्र सहस्रार्जुन. त्याने दहा हजार वर्षांपर्यंत कठोर तपश्चर्या करून दत्तात्रेयांपासून वर मिळविला. त्याने प्रथम युद्धकाळात आपणांस हजार हात असावेत असा वर मागितला. त्याने द्वीप, समुद्र व नगरे यांच्यावर मोठ्या कठोर पद्धतीने अधिकार गाजविला. सात द्वीपांत त्यानें सात यज्ञ केले. सुवर्णाचे यूप

व सुवर्णाच्या वेदी, दिव्य वस्त्रे व आभूषणे, देवता, गंधर्व यांची उपस्थिती असा यज्ञाचा थाट होता. नारद नावाच्या गंधर्वाने या यज्ञात गायन केले. कार्तवीर्याने आपल्या प्रजेचे पालन धर्मपूर्वक केले. सर्व प्रकारच्या रत्नांनी संपन्न असा हा चक्रवर्ती सम्राट बनला. यानेच कर्कोटक नागांचा पराभव करून माहिष्मतीपुरीपर्यंत आपले राज्य वाढविले. याने सर्वत्र आपला प्रभाव गाजविला. याने एकदा आपल्या बाणांनी अभिमानी रावणास विद्ध करून माहिष्मतीपुरीत बंदी बनविले. हा वृत्तान्त ऐकून पुलस्त्य ऋषी त्याच्यापाशी गेले. त्यांच्या विनंतीवरून कार्तवीर्याने रावणाची मुक्तता केली.

कार्तवीर्याच्या हजार बाहूंनी खेळल्या जाणाऱ्या धनुष्यांच्या बाणांचा व प्रत्यंचांचा एवढा प्रचंड आवाज होई की जणू प्रलयकालीन वीज चमकली आहे असे वाटे. पण त्याच कार्तवीर्याचा पराभव परशुरामाने केला. एका दिवसाची गोष्ट. तहानलेल्या अग्निदेवाने राजा कार्तवीर्यास भिक्षा मागितली. तेव्हा राजाने सात द्वीप, नगर, गाव, राज्य यांचीच भिक्षा त्याला वाढली. अग्निदेव प्रज्वलित होऊन सारा प्रदेश जाळन भस्म करण्यासाठी प्रवृत्त झाला. त्याने वरुणपुत्राचा रमणीय आश्रमही जाळून टाकला. याच वरुणाने पूर्वी एका महर्षीस आपला पुत्र म्हणून पाळले होते. हेच वसिष्ठ म्हणून नावारूपास आले. आपव हे यांचेच नाव. महर्षी वसिष्ठांचा आश्रम जळून गेला तेव्हा त्यांनी कार्तवीर्यास शाप दिला,

'हैहय, तू माझ्या या वनाचा व आश्रमाचा नाश केलास. तू हे फार मोठं पाप केलं आहेस. म्हणूनच माझ्यासारखा आणखी एक ब्राह्मणच तुझा वध करील. जमदग्निनंदन परशुराम तुझ्या हजार हातांचा नाश करील.'

महर्षी वसिष्ठांच्या या शापानुसार परशुरामाच्या हातून कार्तवीर्यास मृत्यू आला. कार्तवीर्याच्या शंभर पुत्रांपैकी केवळ पाच वाचले. शूरसेन, शूर, वृषण, मधुपध्वज, जयध्वज अशी त्यांची नावे होती.

जयध्वज अवंतीचा राजा झाला. याचा पुत्र महाबली तालजंघ. या हैहयवंशात अनेक क्षत्रियकुले नावारूपाला आली.

वृषादी यादव या पृथ्वीवर उत्पन्न झाले. या वृषाचा पुत्र मधू. या मधूच्या पुत्रांनी वृषण वंश वाढविला. वृषणाचे वृष्णी व मधूचे माधव, यदूचे यादव, हैहयचे हैहयक्षत्रिय अशा नावांनी हा वंश वाढत गेला. अशा रीतीने राजा ययातीच्या पाच पुत्रांनी वंशविस्तार केला. याच यदूच्या वंशात क्रोष्टूच्या कुलात वृष्णिवंशावतंस श्रीहरी कृष्ण प्रकट झाले. या वंशाचे वर्णन वाचून, ऐकून माणसाची सर्व पापे नष्ट होतील.

क्रोष्टूचा वंश व स्यमंतकमणी

क्रोष्टूला दोन पत्नी. एक गांधारी व दुसरी माद्री. गांधारीने महाबली अनमित्राला जन्म दिला. व माद्रीस युधाजित व देवमीढुष असे दोन पुत्र झाले. यांच्याच वंशातून वृष्णींचे कुल वाढले. वृष्णी व अंधक हे माद्रीचेच दोन पुत्र. वृष्णीलाही दोन पुत्र झाले. एक श्वफल्क व दुसरा चित्रक. श्वफल्क मोठा धर्मात्मा असून त्याचे राज्य रोग-भयापासून मुक्त होते. काशीनरेशाच्या राज्यात तीन वर्षे वृष्टी झाली नव्हती. श्वफल्काने इंद्राला बोलावून घेतले. इंद्राने वृष्टीस सुरुवात केली. काशीच्या राजाची एक कन्या गांदिनी नावाची होती. ती प्रत्येक दिवशी ब्राह्मणास एक गाय दान देत असे. ती श्वफल्काची पत्नी झाली. हिच्यापासून अक्रूराचा जन्म झाला. हा मोठा दानी, यज्ञकर्ता, वीर, शास्त्रज्ञ, अतिथिप्रेमी असून याला आणखी काही बंधू व वरांगना नावाची एक बहीण होती. अक्रूरास सुगात्रीपासून प्रसेन व उपदेव नावाचे दोन कांतिमान पुत्र झाले.

चित्रक व देवमीढुष यांचाही वंश वाढत गेला. देवमीढुषचा पुत्र शूर. या शूराचा पुत्र महाबाहू वसुदेव आनकदुंदुभी नावाने प्रसिद्ध झाला. याच्या जन्मकालीच फुलांची वृष्टी झाली. या नरश्रेष्ठ वसुदेवाची कांती चंद्राप्रमाणे होती. या वसुदेवास देवभाग, देवश्रवा, वत्सवान इत्यादी पुत्र झाले. व शूरास पृथुकीर्ती, पृथा, श्रुतदेवा इत्यादी

पाच कन्या झाल्या. यांनाही अनेक वीरपुत्र झाले. वसुदेवाला चौदा सुंदर राण्या होत्या. यांतील रोहिणी, मदिरादी, वैशाखी, भद्रा इत्यादी बारा राजघराण्यांतील व सुतनु व बडवा या दोन दासी होत्या. वसुदेवाचा रोहिणीपासून झालेला ज्येष्ठ पुत्र बलराम होता. त्याला आणखीही काही पुत्र व चित्रा नावाची कन्या यांची प्राप्ती झाली. चित्राच पुढे सुभद्रा नावाने विख्यात झाली. वसुदेवाला देवकीपासून महायशस्वी थोर श्रीकृष्ण झाले. सुभद्रा व अर्जुन यांना अभिमन्यू झाला.

क्रोष्टूच्या वंशात पालित व हरी हे विदेह प्रांताचे रक्षण करणारे झाले. रुक्मेषू पृथुरुक्माच्या साह्याने राजा झाला. या दोन्ही भावांनी आपला भाऊ ज्यामधास घरातून हाकलून दिले. तेव्हा त्याने वनात जाऊन आश्रमाची स्थापना केली. या ज्यामधाची पत्नी शैब्या मोठी पतिव्रता होती. यांना संतान नव्हते. तरी राजाने पत्नीच्या भीतीने पुन्हा विवाह केला नाही. पण एकदा युद्धात त्याला एक कन्या मिळाली. तिला रथावर बसवून तो घरी आला. पत्नीने विचारले,

'ही कोण आहे ?'

'ही आपली सून.'

'सून ? मला तर कुणीच पुत्र नाही. मग ही सून कशी ?'

'तुला जो पुत्र होईल त्याची ही पत्नी.' ज्यामधाने सांगितले.

त्यानंतर राणी शैब्याने मोठी तपस्या केली. तिला एक पुत्र झाला. त्याचे नाव विदर्भ. त्याचा व त्या राजकन्येचा विवाह झाला. यांनाच ऋथ व कौशिक हे दोन मोठे शूर व युद्धविशारद पुत्र झाले. विदर्भास भीम, भीमास कुंती, कुंतीस धृष्ट हा एक पराक्रमी पुत्र झाला. याच परंपरेत आवन्त, दशार्ह, विषधर, व्योमा, जीमूत, विकृती, भीमरथ, नवरथ, दशरथ, शकुनी, करंभ, देवरात, देवक्षत्र, वृद्धक्षत्र इत्यादी संतती झाली. याच कुलात देवावृध झाला. याने पुत्रपाप्तीसाठी तपस्या केली. नदी पर्णाशाच त्याची पत्नी झाली. यांचा पुत्र सर्वगुणसंपन्न बभ्रू. या बभ्रूचा वंशही वाढला.

क्रोष्टूच्या गांधारीस अनमित्र झाला. यास निघ्न. यास दोन पुत्र.

एक प्रसेन व दुसरा सत्राजित. याचा प्राणप्रिय मित्र भगवान सूर्य. एके दिवशी सायंकाळी सत्राजित रथावर आरूढ होऊन स्नान व सूर्योपस्थान करण्यासाठी नदीच्या किनाऱ्यावर गेला. त्या वेळी स्वतः सूर्यनारायण प्रकट झाले. सत्राजिताने वंदन करून म्हटले,

'प्रभो, आपण ज्याच्यापासून हे सर्व जगत् प्रकाशित करता तो मणी मला द्यावा.'

भगवान सूर्याने तो स्यमंतकमणी सत्राजितास दिला. तो आपल्या गळ्यात घालून सत्राजित नगरात हिंडू लागला. सर्व लोक म्हणू लागले, 'पाहा ना. सूर्य निघाला आहे.' आपल्या घरी आल्यावर सत्राजिताने तो मणी आपला भाऊ प्रसेनजितास दिला. या मण्याचा प्रभाव मोठा होता. तो जेथे असेल तेथे धनधान्याची समृद्धी असे. रोगाचे नाव नसे. एकदा श्रीकृष्णाने त्या मण्याची इच्छा केली. पण तो त्याला मिळाला नाही. एकदा प्रसेनजित तो मणी घेऊन वनात शिकारीसाठी गेला. तो एका सिंहाकडून या मण्यासाठीच मारला गेला. आपल्या मुखात मणी धरून सिंह चालला असताना महाबली ऋक्षराज जांबवानाने पाहिले. सिंहाला त्याने ठार केले व तो मणी घेऊन आपल्या गुहेत गेला. इकडे वृष्णी व अंधक वंशांतील लोकांना संशय आला की श्रीकृष्णानेच मण्यासाठी प्रसेनचा वध केला. आपणांवर आलेला हा संशयाचा कलंक धुऊन काढण्यासाठी कृष्णाने मणी शोधून काढण्याची प्रतिज्ञा केली. प्रसेनच्या चरणचिन्हांचा शोध घेत घेत त्यांनी खूप भ्रमण केले. त्यांना प्रसेनचा मृतदेह पडलेला दिसला. पण तेथे मणी नव्हता. भगवान श्रीकृष्ण शोध घेत घेत जांबवानाच्या गुंफेकडे गेले. तेथे त्यांनी एक गाणे ऐकले. गाण्याचा भावार्थ असा होता– 'माझ्या सुकुमार पुत्रा, तू रडू नकोस रे. सिंहानं प्रसेनला मारलं. जांबवानानं सिंहाच्या मुखातून हा मणी मिळविला. आता हा स्यमंतकमणी तुझाच आहे.'

भगवान श्रीकृष्णांनी बलरामादी यादवांना गुंफेच्या दाराशीच बसविले व त्यांनी गुंफेत स्वतः प्रवेश केला. जांबवानाशी श्रीकृष्णांनी एकवीस दिवसपर्यंत युद्ध केले. जांबवानाचा पराभव झाला. त्याची कन्या

जांबवतीस घेऊन मण्यासह श्रीकृष्ण त्वरेने द्वारकेस आले. सर्व यादवांच्या साक्षीने सभेत कृष्णांनी तो मणी सत्राजितास समर्पण केला, व आपला मिथ्या कलंक धुऊन काढला. सत्राजितास दहा पत्नी असून त्यांना अनेक पुत्र झाले. त्यांत भगंकार, बातपती, वसुमेघ हे प्रमुख होते. सत्यभामा, व्रतिनी व प्रस्वापिनी या सत्राजिताच्या तीन कन्या होत. यांतील सत्यभामेशी श्रीकृष्णांचा विवाह झाला.

सत्राजितापाशी असलेला स्यमंतकमणी अक्रूराने भोजवंशी राजा शतधन्वाकडून अपहरण केला. शतधन्वाने सत्राजितास मारून तो मणी अक्रूराला दिला. पित्याचा वध झालासे पाहून सत्यभामा अतिशय कष्टी झाली. शतधन्वाची सारी हकीगत तिने श्रीकृष्णांना ऐकविली, व सत्यभामा रडत बसली. श्रीकृष्ण आपल्या भावास– बलरामास– म्हणाले,

'प्रभो, प्रसेनला सिंहानं मारलं. सत्राजितास शतधन्वानं. आता हा स्यमंतकमणी माझ्याकडं येईल.'

शतधन्वा व श्रीकृष्ण यांच्यांत घनघोर युद्ध झाले. या प्रसंगी अक्रूराने शतधन्वास साह्य दिले नाही. तो पळून जाऊ लागला. हृदया नावाच्या घोडीवर बसून शतधन्वा युद्ध करीत होता. श्रीकृष्णांनी त्यास मिथिला नगरीजवळ गाठून त्याचा पराभव केला. शतधन्वाचा वध झाला. पण त्याच्याजवळ श्रीकृष्णांना तो मणी दिसला नाही. युद्ध संपवून श्रीकृष्ण परत आले, तेव्हा बलराम म्हणाले,

'तो मणी मला दे.'

'मणी मिळालाच नाही.'

यानंतर काही दिवसांनी अक्रूर अंधकवंशीय वीरांच्या सह द्वारकेस आला. मणी या अक्रूराजवळ होता हे श्रीकृष्णांनी जाणले. सभेत अक्रूर येत आहेसे पाहून श्रीकृष्ण म्हणाले,

'आर्य, मणिश्रेष्ठ स्यमंतक आपणांजवळ आहे. तो मला हवाय. मी त्याची फार दिवस वाट पाहतोय.'

अक्रूराने तो स्यमंतक मणी श्रीकृष्णांच्या स्वाधीन केला. सरळपणाने मणी हाती येताच श्रीकृष्णांनी तो परत अक्रूरास दिला. स्यमंतक-

मणी गळ्यात घालून अक्रूर सूर्याप्रमाणे चमकू लागला.

पार्वतीची तपस्या व ब्राह्मण बालकाची मुक्तता

एकदा मुनींनी ब्रह्मदेवास प्रश्न केला,

'प्रभो, दक्षकन्या सतीनं महादेवांशी विवाह कसा केला ?'

'मुनिवर, पार्वती व महादेव यांची कथा सर्व पापांचा नाश करणारी आहे.' ब्रह्मदेवांनी सर्व कथा मुनिवरांना सांगितली.

एके दिवशी महर्षी कश्यप हिमालयाच्या घरी आले. त्यांना हिमालयाने विचारले,

'मुने, कोणत्या उपायानं मला अक्षय लोकाची प्राप्ती होईल ? सत्पुरुषांत मी पूजनीय कसा होईन ?'

'महाबाहो, हे सर्व, तुला उत्तम संतान होण्यानं प्राप्त होईल. गिरिराज, तू थोर तपस्या कर.'

यानंतर गिरिश्रेष्ठ हिमालयाने घोर तपस्या केली. त्याला ब्रह्मदेव प्रसन्न झाला. हिमालयाने सर्व गुणांनी संपन्न अशा संतानाची इच्छा प्रकट केली. ब्रह्मदेव त्याला म्हणाले,

'माझ्या वरानं तुला एक सुलक्षणी कन्या होईल. तुझ्यात कोटी कोटी तीर्थ निवास करतील. संपूर्ण देवांकडून तुझी पूजा होईल.'

थोड्याच दिवसांत गिरिराजास मेनापासून एक कन्या झाली. तीच अपर्णा. ही अनेक दिवस निराहार होती. एके दिवशी तिची माता तिला म्हणाली, 'बेटी उ मा— असं करू नकोस.' यामुळे पार्वती अपर्णा उमा नावाने ओळखली जाऊ लागली. या पार्वतीने घोर तपश्चर्या केली. तिला भगवान शंकरांना प्राप्त करून घ्यायचे होते. देवांचा देव महादेव हा स्वयंभू परमेश्वर तिला हवा होता. एकदा पार्वती आपल्या आश्रमातील अशोक वृक्षाच्या छायेत उभी असताना भगवान शंकर तेथे प्रकट झाले. त्यांच्या कपाळावर चंद्राकार तिलक होता. त्यांचे रूप विकृत होते. त्यांचे नाक कापलेले, कुबड निघालेले व केस भुरकट व जीर्ण झालेले होते. त्यांनी पार्वतीस म्हटले,

'देवी, मी तुला पत्नी म्हणून स्वीकारू ?'

उमाने योगाच्या साह्याने सर्व काही जाणले होते. ती त्यांची पूजा करून म्हणाली, 'भगवान, मी स्वतंत्र नाही. माझ्या घरी माझा पिता आहे. तेच माझं कन्यादान करतील.'

पार्वतीचे हे बोलणे ऐकताच ते तिच्यासह हिमालयाकडे आले व म्हणाले,

'शैलेन्द्र, तू तुझी ही कन्या मला द्यावीस.'

'भगवन्, या पृथ्वीवर देव ब्राह्मण आहेत. माझ्या मनात प्रथम-पासूनच एक कामना आहे. माझी मुलगी स्वयंवर करील. ती ज्याला पसंत करील तिच्याशी तिचा विवाह होईल.'

हिमालयाचे हे भाषण ऐकून महादेव उमेस म्हणाले,

'तुझ्या पित्यानं स्वयंवराची भाषा केली. तू ज्याला निवडशील त्याच्याशी तुझा विवाह होईल. कुणा रूपवानाला सोडून तू माझ्या-सारख्या भणंगाशी कसा विवाह करशील ?'

'महाराज, आपण असा विचार नका करू. मी आपणांसच निवडीन. आपणांस यात शंका कसली ?' इतके म्हणून उमेने आपल्यां हातांनी अशोकाच्या फुलांचा गुच्छ भगवान शंकरांना देऊन म्हटले,

'देवा, मी आपल्याला स्वीकारलं आहे.' हे ऐकून महादेव अशोकाला म्हणाले,

'अशोका, तुझ्या पवित्र फुलांच्या गुच्छानं या उमेनं मला वरलं आहे. म्हणून तू जरावस्थेस सोडून नित्य अमर होशील. तुला जसं वाटेल तसं फूल येईल व तू सर्व देवांना प्रिय होशील.'

एवढे बोलून भगवान महादेव उमेचा निरोप घेऊन निघून गेले. पार्वती त्यांचे रूप मनात साठवून एका शिलाखंडावर स्तब्ध बसली होती. या सुमारास स्वतः भगवान शिवांनी एका ब्राह्मण बालकाचे रूप धारण करून जवळच्या सरोवरातून ते प्रकट होत होते. त्याला एका मकराने पकडले होते. तेव्हा सरोवरातून बाहेर येताना ते म्हणाले, 'हाय, या मगरानं मला पकडून ठेवलं आहे. मी आता अचेतन होत आहे. कुणी

मला वाचवील का ?' एका पीडित ब्राह्मणाचा हा पुकार ऐकून देवी पार्वती उठून त्या ब्राह्मण बालकाच्या स्थानावर गेली. तिने पाहिले तो एक सुंदर बालक मकराच्या मुखात सापडून आक्रोश करीत आहे. देवी उमा त्या मगरास म्हणाली,

'मकरराज, हा एक आपल्या आई-बापांचा मुलगा आहे. याला तू त्वरित मुक्त करावंस.'

'देवी, आज सहाव्या दिवशी हा बालक मला सापडला आहे, आजचा माझा आहार हाच आहे, मी याला कसं सोडू ?'

'मकरा, मी हिमालयाच्या शिखरावर तपस्या केली होती. त्या सर्व पुण्याईच्या बदल्यात तू या मुलाला सोडून द्यावंस.'

'देवी, तू जी तपस्या केलीस ती सर्व मला अर्पण कर. मी याला सोडून देईन.'

'मकरराजा, मी माझी सर्व तपस्या तुला समर्पित केली आहे.'

'देवी, तपस्या फार मोठ्या कष्टानं होते. ती तू मला देऊन काय करणार ? नीट विचार कर, नाही तर ही तुझी तपस्या तू परत घे. अन् मी या सुंदर बालकासही सोडून देतो.'

'मकरा, मी माझा देह देऊन या बालकाचं रक्षण करीन. तपस्या काय ? ती मी पुन्हा करू शकेन, पण या ब्राह्मणास कोण राखणार ? तपस्या देऊन मी या ब्राह्मण बालकाचं रक्षण केलं आहे. ब्राह्मणापेक्षा तपस्या कधी मोठी असेल ? मी तपस्या तुला दिली आहे, ती परत कशी घेऊ ?'

सूर्यप्रमाणे चमकणाऱ्या मकरानें त्या बालकास सोडून दिले. देवीला नमस्कार करून तो निघून गेला. पार्वती पुन्हा आपल्या तपस्येत मग्न झाली, तेव्हा भगवान शंकर प्रकट झाले, ते उमेला म्हणाले,

'देवी, आता तपश्चर्या पुरे. तू तुझं तप मलाच समर्पित केलं होतंस. आता ते हजार पटींनी वाढलं आहे. आता तुझी तपस्या व त्याचं फल अक्षय झालं आहे.'

उमादेवी आता स्वयंवराची वाट पाहू लागली.

पार्वती-महादेवांचा विवाह

हिमालयाच्या विशाल पृष्ठभागावर पार्वतीच्या स्वयंवराची तयारी सुरू झाली. आपल्या कन्येची मनकामना त्याने ओळखली होती. शैल-राजानें महादेवाचे स्मरण करून रत्नांनी मंडित असा स्वयंवराचा थाट केला. सर्व लोकांतून निमंत्रित देवदेवता स्वयंवरासाठी येऊ लागले. सिद्ध आले. योगी आले. इंद्र, विवस्वान, भग, कृतान्त, वायू, अग्नी, कुबेर, चंद्रमा, अश्विनीकुमार, गंधर्व, यक्ष, नाग, किन्नर असे सर्वजण आल्यानें स्वयंवराची शोभा वाढली. सर्व ऋतूंत फुलणाऱ्या फुलांची माळ घेऊन स्वयंवरास पार्वती उत्सुक बनली. याच वेळी देवीची परीक्षा पाहण्याच्या हेतूने भगवान शंकर पाच शिखा धारण करून एका बालकाच्या वेषात तेथे आले आणि पार्वतीच्या मांडीवरच बसले. योगमायेने पार्वतीने सारा प्रकार जाणला व तिने मोठ्या प्रेमानें त्यांना मांडीवर बसू दिले. देवीच्या मांडीवरील हे लहान बालक पाहून सर्वत्र चर्चा सुरू झाली. वृत्रासुरास मारणाऱ्या इंद्राने तर आपल्या वज्राने एक प्रहार त्या बालकावर केला. पण शिशुरूपधारी महादेवाने त्या प्रहारास खंडित केले. बलवान आदि-त्यानेही एक तेजस्वी शस्त्र चालवून पाहिले. शंकरांनी तेही जडवत करून टाकले.

एवढ्यात ब्रह्मदेवांनी शिशुरूप महादेवांना ओळखले. त्यांनी त्यांच्यापुढें मोठ्या आदराने मस्तक झुकवून म्हटले,

'भगवान, आपण अजन्मा, अजर आहात. आपणच हे जग निर्माण केलंत, आपणच सर्व-व्यापक आहात. अमृत, परमात्मा, ईश्वर, महान् कारण आपणच आहात. ही देवी पार्वती प्रकृतीच्या रूपानं आहे. आपल्या सृष्टिकार्यात ही नेहमीच आपणांला मदत करते. ही आज पत्नी-रूपात आपणांस मिळत आहे. महादेव, देवी पार्वती, आपणांस नमस्कार असो,'

त्यानंतर ब्रह्मदेव जमलेल्या मंडळींना म्हणाले,

'अरे, तुम्ही किती मूर्ख ! हे साक्षात भगवान शिवशंकर आहेत. आपण यांना जाणलं नाही ?'

यानंतर शिवशंकरांनी आपले मूळचे त्रिनेत्रधारी रूप प्रकट केले. त्यांच्या तेजानें सर्वांचे डोळे मिटून गेले. त्यांनी देवांना दिव्य दृष्टी दिल्यावर मग त्यांचे रूप त्यांना दिसू लागले. सर्व देवदेवतांच्या देखत पार्वतीनें पुष्पांची माला महादेवांच्या चरणांवर सर्मपित केली. सर्वत्र आनंद झाला. पृथ्वीवर मस्तक टेकून सर्वांनी महादेव व पार्वती यांना वंदन केले. सर्व देवांसहित ब्रह्मदेवांनी हिमालयास म्हटले,

'शैलराज, तू अत्यंत स्पृहणीय, पूजनीय, वंदनीय महात्मा आहेस. कारण या साक्षात महादेवाशी तुझा संबंध जुळत आहे. आता त्वरित विवाहाची तयारी कर.'

'देवा, आपणच माझं सर्व कल्याण जाणता. जो विधी उचित तो मला सांगा. मी त्यानुसार करीन.'

महादेवाच्या विवाहासाठी एक सुंदर मंडप तयार झाला. नाना प्रकारच्या रत्नांनी तो सुशोभित केला होता. चित्रविचित्र मणी, सुवर्ण, मोती यांनी त्याची शोभा वाढली होती. मरकत मण्यांची फरशी घातली होती. सुवर्णाचे खांब, स्फटिकाच्या भिंती, दारांवर मोत्यांची झालर, चंद्रकांत व सूर्यकांत मणी होतेच. मनोहर सुगंधित वायू मंदसा वाहून शिवाबद्दलचा आपला आदर प्रकट करीत होता. चार समुद्र, इंद्रादी श्रेष्ठ देव, देवनद्या, महानद्या, सिद्ध, मुनी, गंधर्व, अप्सरा, नाग, यक्ष, राक्षस, जलचर, खेचर, किन्नर, चारणगण असे सर्वजण या विवाहाच्या उत्सवात रंगून गेले. तुंबरू, नारद, गंधर्व यांचे मनोहर गायन सुरू झाले. तपस्वी वेद म्हणत होते. ऋषी कथा सांगत होते. पवित्र असे वैवाहिक मंत्र म्हटले जात होते. भगवान शंकरांच्या या विवाहासाठी सारे ऋतू येथे उपस्थित झाले.

पार्वतीस नटवून विवाहमंडपात आणले. ब्रह्मदेवाने पुरोहित म्हणून सर्व काम आनंदाने केले. त्यांनी पार्वतीचा हात भगवान शंकरांच्या हातात दिला. स्वत: अग्निदेव हात जोडून तेथे उभा होता. श्रुतींचे गीत व महामंत्र यांनी सारे वातावरण पवित्र बनले. शास्त्रीय विधीने युक्त असा अमृतस्वरूप तुपाचा एक होम ब्रह्मदेवांनी केला. त्या होमकुंडास

त्या दिव्य दंपतीने प्रदक्षिणा केली. सर्व विवाहविधी यथासांग झाला.

पार्वती व महादेव यांच्या विवाहाचा सर्वांनाच अतिशय आनंद झाला. इंद्रादी देवांनी तर भगवान शंकरांची मनोमय स्तुती करताना म्हटले,

'भगवान शंकरास नमस्कार असो. पर्वत त्याचे लिंगमय स्वरूप आहे. तो पर्वतांचा स्वामी आहे. त्याचा वेग पवनाप्रमाणे आहे. क्लेशांचा नाश करून तो सर्वांना शुभ संपत्तीचं दान करतो. सूर्य व चंद्रमा हे त्याचे नेत्र. त्याच्या कपाळावरही तिसरा नेत्र असतो. तो स्मशानात क्रीडा करतो. हा देवेश्वर गृहस्थ असूनही साधू आहे. नित्य जटा व ब्रह्मचर्य यांना धारण करणारा हा देव आहे. जलात राहून तपस्या करणारा, योगजनित ऐश्वर्य देणारा, मनास शांत राखणारा, इंद्रियांचं दमन करणारा, प्रलय व सृष्टी यांचा कर्ता हा महादेव. त्याला नमस्कार असो. तोच सर्वांचा पिता आहे. सांख्यवर्णित पुरुष आहे. विश्वदेव आहे. शर्व, उग्र, शिव, वरद, भीम, सेनानी, पशुपती, शुची, वैरिहन्ता, सद्योजात, चित्र, विचित्र, प्रधान, अप्रमेय इत्यादी नावे धारण करणाऱ्या महादेवास नमस्कार असो. हा महादेव प्रकृती व पुरुष यांचा प्रवर्तक, कार्य व कारणाचा धनी, कर्मफलांची प्राप्ती करून देणारा आहे. कालाचा ज्ञाता, सर्वांचा नियंता, गुणांच्या विषमतेचा उत्पादक हाच आहे. देवदेवेश्वर महादेवाला नमस्कार असो. भूतभावन कल्याणमय प्रभूला नमस्कार असो.'

महादेवाची ही स्तुती ऐकून तोच देवांना म्हणाला,

'देवांनो, मी तुम्हांला दर्शन देण्यासाठी नेहमीच प्रसन्नमुख आणि सौम्य असतो. तुम्ही कोणताही वर मागावा.'

'भगवन्, असा वर आपण द्यालच. जेव्हा जरुरी पडेल तेव्हा मागू. त्या वेळी मात्र आपण मनोवांच्छित वर द्यावा.'

'तथास्तु' म्हणून महादेव शंकर आपल्या सुंदर आसनावर विराजमान झाले. तेव्हा वक्र स्वभावाच्या क्रूर कामदेवाने त्यांना आपल्या बाणांनी बांधण्याचा निश्चय केला. हा अनाचारी, दुरात्मा,

कुलाधम काम अनेक लोकांना फार त्रास देतो. नियम व व्रते यांचे पाला करणाऱ्या ऋषींच्या कार्यात हा नेहमीच विघ्न आणतो. एकदा हा कामदेव चक्रवाकाचे रूप धारण करून आपल्या पत्नीसह रतीचा अनुभव घेण्यासाठी शंकरांसमोर उपस्थित झाला. या आततायी कामाने आपल्या प्रभावास सुरुवात केल्यावर भगवान शंकरांनी आपल्या तिसऱ्या डोळ्यातील अग्नीच्या सहस्र ज्वालांनी त्याला दग्ध करण्याचा प्रयत्न केला. जळत राहणाऱ्या कामदेवाने करुण स्वरात आर्ततेने पुकार केला. भगवान शंकरांपुढे तो जमिनीवर येऊन पडला. त्याच्या सर्व अंगाचा दाह होत असून पृथ्वीवर त्याची एकसारखी धडपड सुरू झाली. तो मूर्च्छित झाला. त्याच्या पत्नीने– रतीने– अत्यंत दुःखाने करुण विलाप सुरू केला. तिनें महादेवास व पार्वतीस नम्रतापूर्वक प्रार्थना केली. तिचे दुःख जाणून महादेव-पार्वती म्हणाले,

'कल्याणी, कामदेवाचं तर आता पूर्णपणानं दहन झालं. आता त्याची उत्पत्ती कशी होणार ? परंतु शरीररहित होऊनही तो तुझं सर्व कार्य करीत राहील. जेव्हा श्रीकृष्णाचा अवतार होईल तेव्हा त्यांचा पुत्र म्हणून तुझा हा पती जन्म घेईल.'

असे वरदान मिळवून कामपत्नी प्रसन्न होऊन निघून गेली. कामदेवाच्या दहनानंतर भगवान शंकर उमेसहित हिमालयात प्रसन्नतेनें विहार करू लागले. एकदा त्यांना पार्वतीने विचारले,

'भगवन्, आता मी या पर्वतावर राहणार नाही. माझ्यासाठी दुसरं एखादं निवासस्थान शोधावं किंवा बनवावं.'

'देवी, मी तर नेंहमीच तुला दुसरीकडं राहण्याचं सुचवितो. पण तुलाच दुसरं स्थान पसंत पडत नाही. आजच तू अशी स्वतंत्र राहण्याची इच्छा का करीत आहेस ?'

'देवेश्वर, मी आज माझ्या पित्याच्या घरी गेले होते. तेव्हा माझ्या मातेनं मला एकान्ताच्या स्थानात नेऊन माझा सत्कार चांगला केला. ती म्हणाली, 'उमे, तुझा स्वामी दरिद्री आहे. तो नेहमी खेळण्यात रंगलेला दिसतो. देवादिकांची क्रीडा कधी अशी असते ?– महादेव,

आपण नाना प्रकारच्या गणांसह ज्या क्रीडा करता त्या माझ्या मातेला पसंत नाहीत.'

हे सर्व ऐकून महादेवांना हसू आले. ते म्हणाले,

'प्रिये, तुझी माता खरं तेच बोलली. यात तुला दुःख कसलं ? मी कधी हत्तीचं कातडं पांघरतो. कधी दिगंबर राहतो. कधी स्मशानात निवास करतो. नीटपणानं घर वगैरे न करता कधी गिरिकंदरांत तर कधी डोंगरांच्या शिखरांवर राहतो. आपल्या गणांसह भटकतो. यासाठी तुझी माता काही बोलली तर एवढा तिच्यावर राग कशासाठी ? तुझी आई जे सत्य तेच बोलली. या पृथ्वीवर आईएवढी हितकारी कोण आहे ?'

'सुरेश्वर, मला माझ्या हितकारी बंधु-बांधवांशी काही प्रयोजन नाही. जिथं आपण तिथं मी सुखानं राहीन.'

पार्वतीचे बोलणे ऐकून महादेव तिला घेऊन हिमालय सोडून देवांनी व सिद्धांनी सेवित अशा सुमेरू पर्वताकडे निघाले.

दक्षयज्ञाचा विध्वंस

फार पूर्वीची हकीगत आहे. महादेव मेरुपर्वताच्या ज्योतिःस्थल नावाच्या एका शिखरावर विराजमान झाले होते. गिरिजा पार्वती सतत त्यांच्या मागे बसून होती, आदित्य, वसू, अश्विनीकुमार, कुबेर, मुनी शुक्राचार्य, सनत्कुमार इत्यादी सेवा करण्यास तत्पर होते. अत्यंत भयंकर राक्षस, पिशाचगण, पार्षद, नंदीश्वर, गंगा, असे महादेवांची सेवा करीत होते. याच सुमारास प्रजापती दक्षाने शास्त्रोक्त रीतीने एका यज्ञाचे अनुष्ठान आरंभिले. इंद्रादी देव या यज्ञासाठी स्वर्गाहून आले. पृथ्वी, आकाश, स्वर्गलोकामधील देवदेवता उपस्थित झाले. प्रजापती दक्षाच्या पुढे हात जोडून उभे राहिले. आदित्य, वसू, रुद्र, मरुद्गण ऊष्मप, धूमप, आज्यप, सोमप, अश्विनीकुमार इत्यादी सर्व देवदेवता यज्ञासाठी उपस्थित झाले. जरायुज, अंडज, स्वेदज, उद्भिज आले. अनेक महर्षी आले, सर्व देवदेवतांनी तेथे जाण्यासाठी लगबग केली तेव्हा

पार्वतीनें महादेवांना विचारले,

'भगवन्, इंद्रादी देव कुठं निघालेत ?'

'महाभागे, प्रजापती दक्ष अश्वमेध यज्ञ करतोय. सर्व देव तिकडे निघालेत.'

'स्वामी, आपण या यज्ञासाठी जायचं नाही ? का नाही ?'

'देवी, देवदेवतांनीच हे केलं आहे. या यज्ञात आपला भाग नाही.'

'भगवन्, आपण तर सर्व देवांत श्रेष्ठ. आपला प्रभाव मोठा. पण या यज्ञात आपला भाग नाही हे समजून मला मोठं दुःख झालं.'

'देवी, तू म्हणतेस ते सर्व खरं आहे, मीच यज्ञाचा स्वामी. माझीच स्तुती सर्व देव करतात. वेदमंत्रांचं, सामवेदाचं गायन माझ्याचसाठी आहे.'

इतके म्हणून भगवान महादेवांनी आपल्या मुखातून क्रोधाग्निजनित अशी एक महाभूताची सृष्टी तयार केली. तिला ते म्हणाले,

'माझ्या आज्ञेनुसार तू दक्षाच्या यज्ञाच्या ठिकाणी जा व त्या यज्ञाचा नाश कर.'

महादेवांची आज्ञा होताच महाभूताने सिंहाचा वेष धारण करून दक्षाच्या सर्व यज्ञाचा विध्वंस केला. भगवान शिवाचा कोप वीरभद्र झाला. भयंकर अशी भद्रकाली मदतीस आली. वीरभद्राने आपल्या रोमकूपांतून अनेक रुद्रगण निर्माण केले. हजारोंच्या झुंडीने ते दक्ष यज्ञाच्या ठिकाणी आले व त्यांनी तेथे धुमाकूळ घातला. त्यांच्या गोंगाटाने सारे आकाश व्याप्त झाले. अग्नी व सूर्याचा प्रकाश मंदावला. यज्ञाचा यूप कुणी तरी मोडून टाकला. यज्ञाची सारी सामग्री रुद्रगणांनी नष्ट केली. यज्ञपात्रे फोडली गेली. मंडप पाडले गेले. यज्ञमंडपातील खाद्यपदार्थांची नासधूस झाली. सर्वत्र नासधूस होत असताना हात जोडून इंद्रादी देवांनी विचारले,

'बोला, आपण आहात तरी कोण ?'

'मी देव नाही की दैत्य नाही.' वीरभद्र म्हणू लागला, 'या यज्ञात भोजन करण्यासाठी मी आलो नाही. नुसतं कुतूहलानं पाहण्या-

साठीही आलो नाही, या यज्ञाचा विध्वंस करण्यासाठी आलो आहे. माझं नाव वीरभद्र. मी रुद्राच्या कोपातून प्रकट झालो आहे. पार्वतीदेवींच्या कोपापासून ही भद्रकाली झाली, राजेन्द्रानं भगवान उमापतींस शरण जावं, त्याचा क्रोधही वरदानाप्रमाणं आहे.'

इतके ऐकल्यावर दक्ष प्रजापतींनें मनातून भगवान महादेवांचे स्मरण केले, शंकरांस तो शरण गेला, त्याने शंकरांपासून यज्ञ पूर्ण होण्यासाठी वरदान मागितले. तो महादेवांना म्हणाला,

नमस्ते देवदेवेश नमस्तेऽन्धकसूदन ।
देवेन्द्र त्वं बलश्रेष्ठ देवदानवपूजित –।।

'देवदेवेश्वरा, मी आपणांला प्रणाम करतो. अंधकासुरास मारणाऱ्या रुद्रा, आपणांस नमस्कार असो. देवेन्द्र, आपण बलवान असून सर्व देव व दानव यांच्याकडून पूजिले जाता. आपणच सहस्राक्ष, विरूपाक्ष, त्र्यक्ष आहात. यक्षराज कुबेराचे आपण इष्टदेव आहात. आपले हातपाय सर्वत्र पसरलेले आहेत. गायत्रीचे उपासक आपलंच गायन करतात. सूर्याचे भक्त आपलीच उपासना करतात. आपण देवदानवांचे रक्षक आहात. आपणच ब्रह्मा, आपणच इंद्र आहात. आपल्या शरीरात चंद्रमा, अग्नी, वरुण, सूर्य, विष्णू, ब्रह्मा, बृहस्पती यांचा निवास आहे. आपणांस नमस्कार असो. आपण सर्वरूप, सर्वभक्षी, सर्व भूतांचे अंतरात्मा आहात.

'आपणच होम व आपणच मंत्र आहात. आपण नेहमी तांडवनृत्य करता व आपणच मुखानं नेहमी बाजा वाजविता. आपलं मुख नाना प्रकारांनी विकृत होतं. आपली जिव्हा तलवारीसारखी आहे. आपणांस तुंबी व वीणा यांचं प्रेम फार आहे. आपणांस नमस्कार असो. आपण पवन, सूर्य व सांख्यपरायण आहात. आपणांजवळ नेहमीच एक घंटा असते. घंटांची माला आपणांस फारच प्रिय आहे. आपला अंत कधी लागत नाही. आपण नेहमीच पर्वतीय वृक्षांना पसंत करता. आपणच यज्ञाचे अधिपती असल्यानं आपणांस नमस्कार असो. आपणच यज्ञवाहक, जितेन्द्रिय, सत्य स्वरूप, भग, तट, तटिनीपती म्हणजे समुद्र आहात.

आपणच अन्नदाता, अन्नपती, अन्नभोक्ता आहात. आपणांस नमस्कार असो. आपणांस सहस्र मस्तक व सहस्र पाय आहेत. आपणांस सहस्र नेत्र आहेत. आपलं रूप उदयकालीन सूर्याप्रमाणं लाल आहे. आपण बालरूप सूर्याप्रमाणं असून काल आपलं खेळणं आहे. आपण शुद्ध, बुद्ध, क्षोभण व क्षयरूप आहात. आपणांस नमस्कार असो.

'आपले केस गंगेच्या तरंगांनी शोभतात. आपण आपले केस खुले ठेविले आहेत. आपणच श्रेष्ठ, ज्येष्ठ असून पक्ष्यांप्रमाणं कलकल आवाज करणारे आहात. आपणांस नमस्कार असो. आपले नेत्र पांढरे, पिवळे, काळे व लाल रंगांचे आहेत. धर्म, अर्थ, काम, मोक्ष, संहार (क्रथ), संहारकर्ता (क्रथन), सांख्य इत्यादींचे अधिपती आपण आहात. आपण कधी काळं मृगचर्म अंगावर घेता. आपण कधी सर्पाचं यज्ञोपवीत घालता. ईशान, आपण रुद्रसमुदायरूप आहात. हरिकेश, व्यक्ताव्यक्तरूप अंबिकानाथ, त्रिनेत्रधारी, आपणांस नमस्कार असो. आपल्या मस्तकामधून गंगेचा ओघ वाहतो. चंद्रार्धसंयुगावर्त, मेधावर्त ही आपलीच नावं. आपणच प्रलयकालात अग्नी आहात. चराचर जगताची रचना व त्याचा संहार आपणच करता.

'विश्वेश्वरा, आपणच ब्रह्मदेव आहात. आपणच सर्वांची योनी म्हणजे जन्मस्थान आहात. चंद्रमा व ज्योती यांचं भांडार आपणच आहात. ब्रह्मवादी महर्षी आपणांला ऋक्, साम तथा ओंकार समजतात. सामगान करणारे ब्रह्मवेत्ते आपलंच गुणगान करतात. आपणच यजुर्वेद, ऋग्वेद, सामवेद व अथर्ववेद आहात. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादी वर्ण व चार आश्रम यांना आश्रय आपलाच आहे. आणि आपणच मृगांत मृगराज सिंह, सर्पांत तक्षक व शेषनाग, समुद्रांत क्षीरसागर, मंत्रांत प्रणव, शस्त्रांत वज्र व व्रतांत सत्य आहात. आपणच गदा आहात, बाण, धनुष्य, खट्वांग आपणच आहात. चंद्रमा, समुद्र, नदी, तलाव, सरोवर, लता, बेल, गवत, अन्न, पशू सर्व काही आपणच आहात. सुवर्णरेता या नावानं आपण प्रसिद्ध आहात. यज्ञ करणारा होता, होत्र (हवन) हवनद्वारा पूज्य आपणच आहात. त्रिसूपर्ण ऋचा व यजुर्वेदातील शतरुद्र

आपणच आहात. आपण पवित्रांत पवित्र व मंगलांत मंगल आहात.'

'आपणच प्राण, रजोगुण, तमोगुण, सत्त्वगुण आहात. गीत, वाद्य, नृत्य इत्यादी अंगं आपलीच आहेत. सुकाल, दुष्काल, कालनाशक आपणच आहात. खाऱ्या पाण्याचा समुद्र आपणच आहात. आपणच ब्रह्मा आहात. आपल्या मुखात कालाग्नीचा निवास आहे. त्रिदंड धारण करणाऱ्या यतीचं रूप आपणच आहात. पार्वतीचे स्वामी आपण आहात. आपणच सर्व शिल्पकारांत प्रमुख आहात. स्वाहा, वषट्कार, नमस्कार आपणच आहात. धाता, विधाता, निधाता, संधाता आपणच आहात. सर्व भूतांचा आत्मा आपणच आहात. ब्रह्मावर्त, सुरावर्त, कामावर्त आपलीच नावं आहेत. आपणांस नमस्कार असो. कण्हेर पुष्पांची माला आपणास प्रिय आहे. आपणच गोप्रचारक (इंद्रियांचे चालक) आहात. दंडधृक, चक्रदंड, रौद्रभागाविनाशन ही नावं आपलीच आहेत.

'धर्ममय वृषभावर आपणच स्वार झालेले आहात. संपूर्ण लोक आपलीच पूजा करतात. भगवन्, आपणांस नमस्कार असो. आपण सर्व-स्वरूप, सर्वव्यापी, संपूर्ण भूतांचे स्वामी, उत्पत्तीचं कारण, सर्व भूतांचा अंतरात्मा आहात. देवेश्वर, माझ्यावर प्रसन्न व्हावं. आपणच मला शरण्य आहात. माझी गती व प्रतिष्ठा आपणच आहात.'

भगवान शिवाची अशी मनापासून स्तुती केलेली पाहून शिव-शंकर म्हणाले, 'उत्तम वृताचं पालन करणाऱ्या दक्षा, मी तुझ्या स्तुतीनं प्रसन्न झालो आहे. तुला माझं सामीप्य प्राप्त होईल.'

दक्षराजाने केलेले शिवाचे स्तोत्र जो श्रवण करतो, जो नित्य म्हणतो त्याचे कधीच अमंगल होत नाही. त्याला दीर्घायुष्याची प्राप्ती होते. सर्व स्तोत्रांत दक्षकृत हे स्तोत्र श्रेष्ठ आहे. यश, स्वर्ग, ऐश्वर्य, धन, विजय, विद्या, यांच्या प्राप्तीसाठी या स्तोत्राचे पठण करावे. यक्ष, पिशाच, नाग, इत्यादीपासून या स्तोत्रामुळे कधीच विघ्न येणार नाही. या स्तोत्राचे पाठ करणारा सर्व पापांपासून मुक्त होतो. वैश्य, स्त्री, शूद्र इत्यादींना या स्तोत्राने रुद्रलोकाची प्राप्ती होते.

पुरुषोत्तमक्षेत्रात इंद्रद्युम्नास श्रीहरिदर्शन

प्राचीन सत्ययुगाची हकीगत आहे. इंद्रद्युम्न नावाचा एक प्रसिद्ध राजा होऊन गेला. तो इंद्राप्रमाणे पराक्रमी, सत्यवादी, शूरवीर, दानी, प्रियवक्ता, यज्ञकर्ता, ब्राह्मणभक्त, शास्त्रनिपुण होता. सर्व पृथ्वीचे पालन तो धर्माने, नीतीने करीत असे. एकदा त्याच्या मनात श्रीहरीची आराधना करावी, असा विचार आला. आपण कोणत्या क्षेत्रात जावे ? कोणत्या नदीच्या किनारी, कोणत्या ऋषींच्या आश्रमात जाऊन भगवान जनार्दनाची आराधना करावी ? या विचाराने त्याने सर्व सृष्टीचे निरीक्षण करून विश्वविख्यात अशा पुरुषोत्तमक्षेत्रात तो आला. तेथे त्याने अनेक मंदिरे बनवून त्यांत बलराम, श्रीकृष्ण, सुभद्रा यांची स्थापना केली. स्नान, दान, तप, होम, इत्यादी मार्गांनी त्याने आराधना करून मोक्ष प्राप्त करून घेतला.

हा इंद्रद्युम्न माळव्यातील उज्जैन नगरीचा राजा होता. अवंती नगरी व्यापार, कला, विद्या यांनी समृद्ध होती. रथ उत्तम रीतीने चालतील अशा चांगल्या सडका नगरीत होत्या. बाजारपेठा मोठ्या होत्या. घरे व गोपुरे यांनी नगर शोभत होते. राजहंसाप्रमाणे शुभ्र महाल शहरास शोभा देत होते. अनेक उत्सवांमुळे नगरीत नेहमी आनंद असे. गाणेबजावणे होत असे. हत्ती, घोडे, रथ व पायी चालणारे यांनी रस्ते भरलेले असत. अनेक प्रकारचे सैनिक असत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, विद्वान पुरुष यांनी नगरी समृद्ध होती. मलिन, मूर्ख, निर्धन, रोगी, अंगहीन, जुवेदार यांचा अभाव होता. स्त्री-पुरुष नेहमी प्रसन्न व हसतमुख होते. कुलवती स्त्रियांचा आचार श्रेष्ठ होता. वन, उपवन, उद्यान, देवमंदिर, वृक्ष, लतागुल्प, जलाशय यांनी त्या नगरीची शोभा वाढली होती. या नगरीत भगवान शिव महाकाल नावाने विराजत होता. तेथील एक शिवकुंड सर्व पापांचा नाश करणारे होते.

या नगरीस लागून क्षिप्रा नावाची एक नदी वाहते. देवाधिदेव भगवान जनार्दनाचा निवास येथेच होता. दिवसरात्र इतिहास, पुराण, नाना प्रकारची शास्त्रे, काव्यचर्चा यांत लोक रमून गेले होते. राजा

इंद्रद्युम्न पुत्रांप्रमाणे साऱ्या प्रजेचे पालन करी. तो धर्मात्मा शीलवान होता. दान, यज्ञ, तपस्या यांत रमून सोने, मणी, मोती, हत्ती, घोडे यांचे दान तो ब्राह्मणांना करी. भोग व मोक्ष देणाऱ्या सर्वयोगेश्वर श्रीहरीची आराधना करावी असा निश्चय एकदा राजा इंद्रद्युम्नाने केला. सनातन पुरुष पीतांबरधारी चतुर्भुज शंखचक्रगदाधर वनमालाविभूषित कमल-नयन श्रीवत्सशोभित मुकुट, अंगद आदी भूषणांनी अलंकृत श्रीहरीची आराधना कशी करावी ? या विचाराने मोठी सेना बरोबर घेऊन पुरोहित व सेवक यांच्यासह इंद्रद्युम्न अवंती नगरीपासून दूर निघाला. त्याच्या मागे रथारूढ सैनिक हत्यारांसह होते. अंतःपुरातील सर्व स्त्रिया वस्त्रे, भूषणे, अलंकार यांसहित राजाबरोबर होत्या. या सर्व लोकां-बरोबर राजा इंद्रद्युम्न दक्षिण समुद्राच्या तीरावर पोचला. त्याने तेथे रमणीय समुद्राचे दर्शन घेतले. त्या मनोहर प्रदेशात राजाने थोडा काळ विश्रांती घेतली.

या स्थानावर राजाने प्रसन्नचित्ताने निवास केला. या स्थानाचे महत्त्व फार आहे. एकदा भगवती लक्ष्मीने भगवान वासुदेवांना प्रश्न केला,

'भगवन्, माझ्या मनात आज एक प्रश्न उपस्थित झाला आहे. या मर्त्य लोकांत काम व क्रोध यांचा प्रभाव असतो. देवेश, या संसार-सागरातून मुक्ती कशी मिळेल ?'

'देवी, हे सर्व तीर्थांत उत्तम असे पुरुषोत्तमक्षेत्र आहे. या क्षेत्राचं नाव घेताच सर्व पापांपासून मुक्ती मिळते. या दक्षिणसमुद्राच्या तीरी एक महान वृक्ष उभा आहे. या वृक्षाच्या सहवासानं मनुष्य पापरहित होऊन विष्णुधामाला पोचतो. एकदा धर्मराज यमानं भगवान श्रीहरीची मनोभावे स्तुती केली. या क्षेत्रात एक इंद्रनील मण्याची बनलेली प्रतिमा आहे. ही सर्व कामना पूर्ण करणारी असून या प्रतिमेची मागणी यम-राजानं केली. भगवान श्रीहरीने ही प्रतिमा वाळूत लपवून ठेविली.'

अशा या त्रिभुवनविख्यात पुरुषोत्तमक्षेत्रात जाऊन राजा इंद्र-द्युम्नाने रमणीय स्थानांचे दर्शन घेतले. विंध्याचलाच्या विवरातून

निघालेली एक नदी येथून वाहते. या नदीचे नाव स्वित्रोत्पला. सर्व पापांचा नाश करणारी ही नदी गंगेसमान पवित्र आहे. हीच पुण्यसलिला नदी महानदी या नावाने प्रसिद्ध झाली. राजाने याच पवित्र स्थानावर आराधना करण्याचा निश्चय केला. कारण येथेच कल्पवृक्षासमान विशाल वटवृक्षाचे अधिष्ठान आहे. याच ठिकाणी इंद्रनील मण्याची बनलेली प्रतिमा भगवंतांनी लपविलेली होती. या ठिकाणी आराधना करून श्रीहरीचे दर्शन आपणांस व्हावे अशी इच्छा राजा इंद्रद्युम्नाने केली.

त्याने या ठिकाणी भगवानाचे एक सुंदर मंदिर निर्माण केले. सर्व ज्योतिष्यांना, विद्वानांना बोलावून राजाने प्रथम योग्य अशा भूमीचा शोध घेतला. राजाने कलिंगराज, उत्कलराज, कोसलराज इत्यादी राजांचे साहाय्य मागितले. पृथ्वीवरील सर्व प्रमुख राजांची मदत राजाने स्वीकारली. या क्षेत्रात एक अश्वमेध करून भगवान विष्णूचे मंदिर बनवावे असा राजाचा निश्चय होता. धन, रत्ने, सुवर्ण, मोती, कंबल, मृगचर्म, माणिक, हत्ती, घोडे, रथ यांचे साह्य घेऊन राजाने यज्ञाची तयारी केली. अनेक ऋषिमुनी आले. तपस्वी, संन्यासी, गृहस्थ, वानप्रस्थ, स्नातक, ब्रह्मचारी यांनी तेथे एकच गर्दी केली.

एक सुंदर यज्ञशाला उभी राहिली. शेकडो महाल तयार झाले. सुवर्ण, रत्ने, मणी यांनी यज्ञमंडपाची शोभा वाढली. खांबावर सुंदर चित्रकारी झाली. श्रेष्ठ ब्राह्मण पुरोहित, शिल्पी, कारागीर यांचा सन्मान झाला. यज्ञप्रसंगी अन्नदान भरपूर झाले. शुभ लक्षणांनी युक्त असा एक अश्व पृथ्वीप्रदक्षिणेस निघाला. राजश्रेष्ठ इंद्रद्युम्नाने खूप सुवर्णाचे, हत्ती-घोडयांचे, गायींचे दान वेदवेत्त्या ब्राह्मणांना केले. या महा-यज्ञाचे स्वरूप पाहून देव, दैत्य, चारण, गंधर्व, अप्सरा, सिद्ध, ऋषी इत्यादी सर्वांनाच संतोष झाला. कुणी मलिन, दीन व भुकेलेला राहिलाच नाही. पण अद्यापि आपणांस भगवंतांचे दर्शन का होत नाही, या एका प्रश्नाने राजा चिंतायुक्त झाला. रात्रभर त्याला झोप येईनाशी झाली. वाद्य, संगीत, नृत्य, सोने, चांदी यांत त्याचे मन रमेनासे झाले. याच विचारात मग्न असताना राजाने पांचरात्र विधीने भगवान

पुरुषोत्तमाचे चिंतनपूजन केले. त्याने भगवान विष्णूची मनोभावे स्तुती केली. तो म्हणाला,

'वासुदेवा, आपणांस नमस्कार असो. संपूर्ण लोकांचे स्वामी आपण असून आपण मोक्षदाते आहात. देवेश, प्रभो, अच्युता, जगन्नाथा, देवेश्वरा, मला तू धर्म, अर्थ, काम व मोक्ष देणारा वर द्यावास. कमलनयना, मी विषयांच्या समुद्रात डुबलो आहे. तूच माझं रक्षण करावंस. लोकेश, मी आपणांशिवाय इतरत्र कुणाला शरण जाऊ ? कमलाकान्ता, मधुसूदना, माझ्यावर प्रसन्न हो. प्रभो, आपणांसारख्या स्वामीस शरण गेल्यानं मला आता जीवन, मरण व मोक्ष यांचं भय उरलं नाही. प्रभो, मी अज्ञानी भावानं आपली स्तुती केली आहे. आपण माझ्यावर दया करून माझे अपराध क्षमा करावेत. वासुदेवा, माझी ही स्तुती सांगोपांग सफल व्हावी.'

राजा इंद्रद्युम्नाची ही स्तुती ऐकून गरुडध्वज भगवानाने त्याची सर्व कामना पूर्ण केली. भगवान देवाधिदेव वासुदेवाने शंख, चक्र, गदा, धनुष्यबाण इत्यादी आयुधांसह राजास दर्शन दिले. तो राजास म्हणाला,

'राजन्, तुझ्या या दिव्य यज्ञानं, भक्तीनं, स्तुतीनं मी संतुष्ट झालो आहे. येथील प्रतिमा हस्तगत करण्याचा उपाय मी तुला सुचवितो. या समुद्राच्या तटावर एक मोठा वृक्ष आहे. त्याचा काही भाग पाण्यात, काही जमिनीवर आहे. तू हातात एक कुऱ्हाड घेऊन पाण्यात जावंस. निःशंक बनून तू तो वृक्ष तोडून टाक. त्याच वेळी तुला एक दिव्य वस्तू दिसेल. त्याची तू एक दिव्य प्रतिमा तयार कर.'

या आदेशानुसार राजा इंद्रद्युम्न दुसऱ्या दिवशी सकाळीच समुद्राच्या तटावर गेला. त्याने तो तेजस्वी महावृक्ष पाहिला. तो खूपच उंच असून त्याच्या पारंब्या खाली लोंबत होत्या. त्याने तो वृक्ष तोडून टाकला. त्याने त्या वृक्षाच्या खोडात एक अद्‌भुत वस्तू पाहिली. तेथे विश्वकर्मा व भगवान विष्णू दोघेही ब्राह्मणाचे रूप घेऊन आले. त्यांच्या कंठांत दिव्य हार, शरीरास दिव्य अंगराग यांनी शोभा वाढविली होती. त्यांच्या तेजाने राजाही प्रभावित झाला. त्यांनी राजास सौम्य शब्दांत

विचारले,

'महाराज, आपण इथं कोणतं कार्य करीत आहात ? हा वृक्ष का तोडला ?'

'देवाधिदेव जगदीश्वर भगवान विष्णूची आराधना करण्यासाठी मला एक प्रतिमा हवी होती. स्वतः भगवानांनी मला स्वप्नात आदेश दिला होता.'

'राजा, तुझा विचार फार चांगला दिसतो. या दुःखमय संसारात भगवान विष्णूची आराधनाच उत्तम उपाय. राजा, ये. इथं या वृक्षाच्या शीतल छायेत आपण थोडा वेळ बसू. माझ्याबरोबर हा माझा मित्र एक शिल्पी आहे. सर्व प्रकारची शिल्पकर्मं तो उत्तम करतो. आपण त्याला सांगू त्याप्रमाणं तो प्रतिमा तयार करील.'

ब्राह्मणरूपी भगवंताने शिल्पीस प्रतिमा तयार करण्याची आज्ञा केली. तो म्हणाला, 'भगवान श्रीकृष्णाचं रूप परम शांत. त्याचे नेत्र पद्मपत्रांप्रमाणं विशाल. त्याच्या वक्षःस्थळावर श्रीवत्सचिन्ह व कौस्तुभ-मणी. हातात शंख, चक्र व पद्म अशी आयुधं आहेत. दुसऱ्या प्रतिमेचा वर्ण दुधाप्रमाणं पांढरा शुभ्र. त्यावर स्वस्तिकाचं चिन्ह असावं. त्या प्रतिमेच्या हातात हल म्हणजे नांगर असावा. तिसरी प्रतिमा भगवान वासुदेवाची बहीण सुभद्रादेवीची बनवावी. तिच्या शरीराचा रंग सुवर्णा-सारखा असावा. सर्व शुभ लक्षणांचा निर्देश या प्रतिमेत असावा.'

विश्वकर्म्याने वरील सूचनेप्रमाणे उत्तम लक्षणांनी युक्त अशा प्रतिमा तयार केल्या. पहिल्याने त्याने बलभद्राची मूर्ती बनविली. त्यानें निळे वस्त्र धारण केले होते. त्याच्या हातात मुसळ व गदा होती. दुसरी मूर्ती प्रत्यक्ष वासुदेव भगवानाची होती. नील मेघाप्रमाणे त्याची कांती होती. शरीरावर पीतांबर व छातीवर श्रीवत्सचिन्ह. विविध आभूषणांनी नटलेली तिसरी मूर्ती सुभद्रेची होती. सर्व प्रतिमा विश्वकर्म्याने एका क्षणात बनविल्या. ब्राह्मणांची ही कुशलता पाहून संतुष्ट झालेला राजा म्हणाला,

'ब्राह्मणाच्या रूपानं तुम्ही दोघे देव तर नाही ? तुम्ही यक्ष

आहात की विद्याधर ? आपण ब्रह्मा व विष्णू तर नाही ? मी आपलं यथार्थ रूप जाणलं नाही. मी आपणांला शरण आलो आहे.'

'राजा, मी देव, यक्ष, दैत्य, ब्रह्मा, रुद्र नाही. मला तू पुरुषोत्तम समजावंस. मी सर्व लोकांची पीडा दूर करतो. ज्याचा उल्लेख सर्व शास्त्रांत मिळतो, ज्याला योगी लोक ज्ञानगम्य वासुदेव म्हणतात तो परमात्मा मी आहे. मी स्वतःच ब्रह्मदेव, विष्णू, शिव, देवराज इंद्र आहे ! जगाचं नियंत्रण मीच करतो. पृथ्वी आदी पाच भूतं, त्रिविध अग्नी, जलाधिपती वरुण, धरती, पर्वत, सर्व स्थावर जंगमी मीच आहे. नृपश्रेष्ठा, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तुला हवी असलेली वस्तू मी देईन.'

प्रत्यक्ष भगवंतांची ही वाणी ऐकताच राजाचे शरीर रोमांचित झाले. त्याने भक्तिभावाने श्रीहरीची स्तुती केली. तो म्हणाला,

'लक्ष्मीकांता, तुला नमस्कार असो. श्रीपते, आपल्या या दिव्य शरीरावर हा पीतांबर किती शोभून दिसतो. श्रीनिवासा, आपण लक्ष्मीचं धाम आहात. आपणच आदिपुरुष, ईशान, निस्कल व सनातन परमदेव आहात. आपलं रूप वर्षाकालातील मेघाप्रमाणं श्याम आहे. शंख, चक्र, गदा, मुसळ धारण करून आपण सर्वांचं रक्षण करता. क्षीरसागराच्या पृष्ठभागावर आपण शेषनागाच्या शय्येवर शयन करता. आपण देवदेवेश्वर आहात. आपण वरदाता, व्यापक, सर्वलोकेश्वर, अविनाशी भगवान विष्णू आहात. आपणांला पुनःपुन्हा नमस्कार असो.'

राजाने भक्तिपूर्वक अंतःकरणाने हात जोडून प्रणाम केला. जमिनीवर डोके वाकवून राजा म्हणाला,

'नाथ, आपण माझ्यावर प्रसन्न आहात. मी आपणांस एक वर मागतो. देव, ऋषी, मुनी, असुर, गंधर्व, संन्यासी, योगी, ज्ञानी ज्या निर्गुण, निर्मल व शांत पदाची इच्छा करतात ते पद मला आपल्या कृपेनं मिळावं.'

'राजन्, तुझं कल्याण असो. सर्व काही तुझ्या इच्छेप्रमाणं होईल. नृपश्रेष्ठा, तू दहा हजार नऊशे वर्षांपर्यंत साम्राज्याचा उपभोग घेशील.

देवांना, असुरांना दुर्लभ अशा दिव्य पदाची प्राप्ती तुला त्यानंतर होईल. राजेन्द्रा, या पृथ्वीवर जोपर्यंत मेघ बरसतात, आकाशात चंद्र, सूर्य, तारे चमकतात, तोपर्यंत तुझी कीर्ती पसरत राहील. तुझ्या यज्ञापासून प्रकट झालेला हा तलाव इंद्रद्युम्न सरोवर याच नावानं ओळखला जाईल. या सरोवराच्या दक्षिण भागात जो एक वृक्ष आहे त्याच्या-भोवती केवडयाचं वन आहे. आषाढ शुक्ल पंचमीस आमच्या या प्रतिमा लोक समारंभपूर्वक मंडपात स्थापन करतील. मोठा उत्सव होईल. मंगलपाठपूर्वक आमची स्थापना होईल.'

अशा प्रकारचे वरदान देऊन विश्वकर्म्यासह भगवान अंतर्धान पावले. राजाला सर्व प्रकार पाहून, ऐकून हर्ष झाला. त्याचा देह रोमांचित झाला. श्रीकृष्ण, बलराम व सुभद्रा यांच्या प्रतिमा राजाने वाजतगाजत मणिकांचनजडित रथातून मिरवीत नेल्या व योग्य त्या ठिकाणी त्यांची प्रतिष्ठापना केली. सुवर्ण, मणी, मोती, सुंदर वस्त्र, रत्न, आसन असा सर्व थाट झाला. राजाने अशा प्रकारे कृतकृत्य होऊन सर्व परित्याग करून भगवान विष्णूच्या परमपदाची प्राप्ती केली.

मुनी मार्कंडेयांना बालमुकुंददर्शन

कल्पाच्या अंतकाली जेव्हा महासंहारास आरंभ झाला तेव्हाची ही गोष्ट. चंद्रमा, सूर्य, वायू यांचाही नाश होत होता. प्रथम प्रलयकारी प्रचंड सूर्याचा उदय झाला. नंतर जोराने मेघगर्जना होत राहिली. वीज कडाडू लागून पर्वतशिखरे व मोठमोठे वृक्ष मोडून पडू लागले. उल्कापात होत राहिला व नद्यांचे सारे जल आटून गेले. वायूच्या साह्याने संवर्तक नावाचा अग्नी सर्वत्र फैलावला. वरून, बाहेरून सूर्याचा ताप वाढला. देव, दानव, यक्ष आदी भयभीत झाले. वीस लाख योजनें पसरलेली ही पृथ्वी संवर्तक अग्नीमुळे जळून जाऊ लागली.

अशा या घोर प्रलयकालाच्या समयास धर्मात्मा मार्कंडेय मुनी एकटेच ध्यानस्थ होऊन बसले होते. प्रलयाग्नीची लाट त्यांच्याजवळ येऊन पोचली. त्यांचा कंठ, त्यांचे ओठ सुकून गेले. त्या महाभयानक

अग्नीची प्रखरता पाहून ते भीतीने इकडेतिकडे फिरू लागले. त्यांना कुठेच शांत निवारा मिळेना. ते मनात म्हणाले, काय करू ? कुठे जाऊ? कुणाला शरण जाऊ ? त्यांनंतर एकदम महाप्रलयास कारणभूत असणाऱ्या सनातन दिव्य पद पुरुषेश नावाच्या वटराजाच्या जवळ ते आले. ते मोठ्या आशेने त्या वडाच्या झाडाखाली निवाऱ्यास गेले. तेथे मात्र कालाग्नीचे भय नव्हते की अंगारांचा वर्षाव नव्हता. संवर्तक अग्नीही तेथे पोचू शकत नव्हता.

त्यानंतर थोड्याच अवधीत विद्युन्मालांनी आभूषित झालेले गजराजासमान मेघ आकाशात जमून आले. भयंकर वृष्टी होऊन पर्वत, वन, झाडे-वेली यांच्यासहित पृथ्वी जलराशीत डुबून गेली. अशी घनघोर वृष्टी बारा वर्षे होत राहिली. सर्वत्र पाणीच पाणी झाले. समुद्रांनी आपली मर्यादा सोडली. त्यानंतर प्रचंड वादळ झाले. या प्रभंजनाने आकाशातील मेघ इकडेतिकडे विखरून गेले. सर्व स्थावरजंगम नष्ट झाले होते. देव, असुर, मनुष्य, यक्ष व राक्षस हे सर्व संपले होते. त्या सुमारास मार्कंडेय मुनींनी श्रीपुरुषोत्तमाचे ध्यान केले. त्यांनी डोळे उघडून पाहिले तो सर्व पृथ्वी पाण्यात डुबलेली. वटवृक्ष, पृथ्वी, दिशा, सूर्य, चंद्रमा, अग्नी, वायू, देव, असुर, नाग इत्यादींचा अभाव होता. मुनिवर्य मार्कंडेयही पाण्यात गोते खाऊ लागले. त्यांनी मग पोहण्यास प्रारंभ केला. आर्त भावाने ते इकडून तिकडे पोहत होते. कुणीच रक्षक त्यांना भेटत नव्हता. पण त्यांचे ध्यान पाहून भगवान पुरुषोत्तम प्रसन्न झाले. ते प्रकट होऊन मुनिवरांस म्हणाले,

‘उत्तम व्रताचं पालन करणाऱ्या मार्कंडेया, तू बालक आहेस. थकून गेला असशील. ये, इकडं ये माझ्यापाशी. तुला आता भिण्याचं कारण नाही.’

मार्कंडेय मुनी भक्तिपूर्वक अंतःकरणाने भगवंतास शरण गेले. त्यांनी समोरच पाण्याच्या वर एक विशाल वटवृक्ष पाहिला. त्याच्या फांदीवर एक छोटासा पलंग होता. त्यावर एक बालरूपधारी श्रीकृष्ण-मूर्ती होती ! कोटिकोटी सूर्यांप्रमाणे त्या कृष्णाचे तेज होते. सुंदर देह,

चार हात, पद्मपत्रासमान विशाल डोळे, हातात शंख, चक्र, गदा इत्यादी आयुधे, गळ्यात वनमाला, कानात दिव्यकुंडले. भगवानास या रूपात पाहून मार्कंडेयांना नवल वाटले. त्यांचे शरीर रोमांचित झाले. प्रणाम करून ते भगवानास म्हणाले,

'अहो, या भयानक एकार्णवात हे एक बालक कसं निर्भय आहे!'

ते बालक मुनींना म्हणाले,

'बेटा, तू फार थकलास हे मी जाणतो. पण रक्षणासाठी माझ्यापाशी ये. इथं तुला पूर्ण विश्रांती मिळेल.'

बालकाची ही सूचना मिळताच मायामोहित होऊन त्यांनी बालकाच्या मुखात प्रवेश केला. त्याच्या उदरात त्यांनी अनेक जानपदांनी युक्त अशी सर्व पृथ्वी पाहिली. सर्व समुद्र, पर्वत, जंबू, शाल्मल, कुश आदी द्वीप, भारतादी संपूर्ण वर्ष, पर्वतशिखरे, प्राणी, जीवजंतू, देवदेवता, राक्षस, पिशाच, यक्ष, नाग, मुनी, सिद्ध त्यांना दिसले. ते योगमायेने पुन्हा भगवंताच्या शरीरातून बाहेर आले तेव्हा त्यांना पुन्हा मनुष्यविरहित अशी शून्य सृष्टी दिसली. वटवृक्षावर भगवान श्रीकृष्णाची हसरी बालमूर्ती मात्र तशीच होती. त्याला पाहून मार्कंडेयांनी हात जोडले. त्यांनी परमात्म्याची प्रार्थना केली,

'मायेनं बालरूप धारण करणाऱ्या देवदेवा जगन्नाथा, सुंदर नेत्रांच्या सुरश्रेष्ठा, पुरुषोत्तमा, मी दुःखित अंतःकरणानं तुला शरण आलो आहे. माझं तू रक्षण करावंस. संवर्तक अग्नीनं माझा देह तप्त झाला आहे. देवा, माझा तू उद्धार करावास. पुरुषोत्तमा, या अवलंबनशून्य जगतात मला तुझ्याशिवाय दुसरा आधार कोठला? माझ्यावर प्रसन्न हो.'

'मुनिश्रेष्ठा, तुझ्या मनातील इच्छा तू बोल. तुला जे हवंय ते मिळेल.'

'देवा, मी आपल्याला व आपल्या मायेला जाणू इच्छितो. पुंडरीकाक्षा, आपण अव्यय आहात. मी आपणांस जाणू इच्छितो. या सर्व जगताला पिऊन टाकून आपण या बालरूपात इथं कसे?'

'ब्रह्मन्, देवही मला नीट ओळखत नाहीत. पण तुला प्रेमामुळं मी सर्व सांगतो. ब्रह्मर्षे, तू पितृभक्त आहेस. मला शरण आला आहेस. म्हणूनच तर तुला माझं हे दर्शन झालं. पूर्वकालात मी जलास 'नारा' हे नाव दिलं होतं. त्या नारात माझा सदा अयन म्हणजे निवास. म्हणून मी 'नारायण' आहे. मीच विष्णू, मीच ब्रह्मा, मीच देवराज इंद्र. मीच शिव, चंद्रमा, प्रजापती, कश्यप, यक्षराज कुबेर व प्रेतराज यम आहे. माझं मुख अग्नी, पृथ्वी चरण, चंद्रमा व सूर्य हे नेत्र. द्युलोक मस्तक, आकाश व दिशा हे कान व जल हा स्वेद होय. दिशांच्यासहित आकाश हे माझं शरीर व माझ्या मनात वायू स्थिर आहे. मीच अनेक यज्ञांतील मुख्य देव. शेषनाग बनून सर्व पृथ्वीस धारण मी करतो. मीच वडवानल बनून समुद्राचं पाणी पितो. मेघरूपानं वर्षा मीच करतो. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद माझ्यातूनच प्रकट झाले. ज्ञानपरायण संन्यासी, संयमशील जिज्ञासू, अनासक्त, निष्पाप, अहंकारशून्य अध्यात्मतत्त्वज्ञानी ब्राह्मण नेहमी माझीच उपासना करतात. मीच संवर्तक ज्योती, अग्नी, सूर्य व वायू आहे. आकाशातील तारे मीच. रत्नांनी भरलेले समुद्र मीच. मुने, जेव्हा धर्माची ग्लानी होऊन अधर्माचा उद्‌भव होतो तेव्हा मीच प्रकट होतो.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति सत्तम ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥

'उत्पत्ती, पालन व संहार हे माझे तीन धर्म. मी सर्वव्यापी, अनंत व इंद्रियांचा नियंता आहे. मी एकटाच कालचक्राचं संचालन करतो. या ब्रह्माचं रूप माझंच आहे. मीच शंख, चक्र, गदा धारण करणारा नारायण आहे. मुनिश्रेष्ठा, जोपर्यंत ब्रह्मदेवाची झोप संपून तो उठत नाही तोपर्यंत मी या शिशुरूपातच राहीन. तो जागा झाला की सृष्टीची रचना करीन. पण मुने, तू माझी स्तुती कशासाठी केलीस ? काय हवं ते माग. मी तुला वर देईन.'

'देवेश, मी आज आपलं उत्कृष्ट दर्शन घेतलं. माझ्या मनातील सर्व मोह दूर झाला. भगवन्, मी इतकंच इच्छितो की पुरुषोत्तमक्षेत्रात

मी शिवाचं एक सुंदर मंदिर बनवून त्यात शंकराची प्रतिष्ठापना करीन. जगातील लोक यामुळं शिव अन् विष्णू एकच समजतील.'

'ब्रह्मन्, तू आताच माझ्या आज्ञेनं शीघ्र एक मंदिर तयार कर. त्यात भुवनेश्वर लिंगाची स्थापना करावीस. त्याच्या प्रभावानं तुझा शिवलोकात अक्षय निवास होईल. आमच्या दोघांत अंतर बिलकुल नाही. जो रुद्र आहे तोच विष्णू. जो विष्णू तोच शिव. वायू व आकाशाप्रमाणं आम्ही दोघं एकच आहोत. जो गरुडध्वज तोच वृषभध्वज. मुने, मंदिराच्या उत्तरेस एक सुंदर सरोवर निर्माण कर. त्या तीर्थास मार्कंडेयतीर्थ म्हणून प्रसिद्धी मिळेल.'

इतके बोलून सर्वव्यापी जनार्दन अंतर्धान पावले.

कंडू मुनी व अप्सरा प्रम्लोचा

'पुरुषोत्तमक्षेत्र सर्व जीवांसाठी अत्यंत सुखदायी आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारही पुरुषार्थांची प्राप्ती या क्षेत्रातील निवासामुळं होते. या तीर्थक्षेत्रात कंडू नावाचे एक महातेजस्वी मुनी राहत होते. ते अतिशय धार्मिक, सत्यवादी, पवित्र, जितेन्द्रिय असून सर्व प्राण्यांच्या हिताविषयी तत्पर होते. त्यांनी इंद्रियांवर विजय मिळवून क्रोधास जिंकले होते. ते वेदवेदांगांत पारंगत असून भगवान पुरुषोत्तमाची आराधना करून त्यांनी अनेक सिद्धी मिळविल्या होत्या.' व्यास महर्षी सांगत होते.

'साधुशिरोमणे,' श्रोत्यांतील मुनिवरांनी विचारले, 'हे कंडू मुनी कोण होते ? त्यांनी परमगतीच्या प्राप्तीसाठी काय काम केलं ?'

'मुनीश्वरांनो, या कंडू मुनीची कथा फारच मनोरंजक आणि रोचक आहे. गोमती नदीच्या किनाऱ्यावर एक सुंदर वन होतं. येथील एकान्त रमणीय होता. कंद, मूल, फल, समिधा, पुष्प, कुश इत्यादींची समृद्धी कंडू मुनींच्या आश्रमाभोवती होती.'

व्यासजींच्या वाणीचा ओघ सुरू झाला.

कंडूमुनींच्या आश्रमात नेंहमी सर्व ऋतूंतील फुले फुलत. केळींच्या बागा आश्रमाची शोभा वाढवीत असत. व्रत, उपवास, नियम, स्नान, मौन, संयम इत्यादींच्या साह्याने कंडू मुनींनी उग्र तपस्या या वनात

आरंभिली. ग्रीष्माच्या कडक उन्हात मुनी पंचाग्नीची साधना करीत. वर्षाकाली खुल्या वेदीवर निद्रा घेत असत. हेमंतऋतूतील प्रखर थंडीत भिजलेल्या वस्त्रानिशी ते कठोर तपस्या करीत. कंडू मुनींची ही खडतर तपस्या पाहून देवता, गंधर्व, सिद्ध, विद्याधर इत्यादींना मोठा विस्मय वाटला. मुनींचे हे अपार धैर्य, ही कठोर तपश्चर्या त्यांना नवलपूर्ण वाटली. मुनींची तपस्या पाहून इंद्रादी देव तर भयाने कंपित झाले. आपले स्थान जपण्यासाठी त्यांच्या मनात अस्थिरता निर्माण झाली. व्याकुळ होऊन त्यांनी मुनींच्या तपश्चर्येत विघ्ने निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्रिभुवनांचा स्वामी इंद्र याने एका सुंदर अप्सरेला बोलाविले.

'प्रम्लोचे, तू आत्ताच्या आत्ता त्या कंडुमुनींच्या आश्रमात जावंस. तेथे ते मुनी तपस्येत मग्न आहेत. त्यांच्या तप:साधनेत तू विघ्न निर्माण करावंस. सुंदरी, त्यांच्या चित्तात क्षोभ तुलाच निर्माण करता येईल.'

'सुरश्रेष्ठा, मी नेहमीच आपली आज्ञा मानणारी आहे. पण आजच्या या कार्यात मला माझ्या जीवाचीच भीती वाटते. मुनिवर कंडूचं मला फार भय वाटतं. ब्रह्मचर्य व्रताचं त्यांचं पालन अतिशय निग्रहाचं आहे. अत्यंत उग्र आहे. त्यांची तपस्या अतिशय कठोर आहे. अग्नी व सूर्य यांची प्रखरता त्यांच्या तपास लाभलेली आहे. मला पाहताच त्यांचा क्रोध जागा होईल. मला शापून ते दग्ध करतील.'

'सुंदरी, तू काळजी नको करूस. कामदेव, ऋतुराज वसंत, दक्षिण समीर यांचे साह्य तुला होईल असं मी करतो. या सर्वांना घेऊन तू त्या मुनिश्रेष्ठाच्या आश्रमात जा.'

इंद्रदेवाची आज्ञा मान्य करून प्रम्लोचा अप्सरा कामदेवादी सहकाऱ्यांसह आकाशमार्गाने कंडू मुनींच्या आश्रमात येऊन पोचली. सुंदर व चंचल नेत्रांच्या या अप्सरेने येथे एक सुंदर वन पाहिले. या वनातील आश्रमात तप करणारे, पापरहित कंडू मुनीही तिने पाहिले. प्रम्लोचा व कामदेव यांना या वनाचा व आश्रमाचा नंदनवनाप्रमाणे लोभ वाटला. सर्व ऋतूंत फुलणारी, फळणारी झाडे पाहून सुंदरीला

परम संतोष झाला. नाना प्रकारच्या पक्ष्यांचे कूजन ऐकून प्रम्लोचेला धन्यता वाटली. या सुंदर अप्सरेनें हळूहळू सर्व वनाचे निरीक्षण केले. आश्चर्यचकित होऊन तिनें कामदेव, वायू, वसंत यांची मदत मागितली. त्यांना ती म्हणाली, ‘आता मी त्या मुनिश्रेष्ठांपाशी जात आहे. या मुनीनं आपल्या देहरूपी रथास इंद्रियरूपी अश्व जुंपलेले आहेत. या रथाच्या सारथ्यास– या मुनिवरास– मी कामबाणानें विद्ध करणार आहे. त्याच्या मनाचा तोल मी बिघडवून टाकीन. तुम्ही सर्वांनी मला मदत करावी.’

प्रम्लोचा अप्सरा नटूनथटून कंडू मुनींच्या आश्रमापाशी आली. आश्रमाभोवतीचे हिंस्र प्राणी मुनींच्या प्रभावामुळे शांत वृत्तीचे बनलेले पाहून अप्सरा चकित झाली. नदीच्या तीरावर उभी राहून ती मुनींच्या आश्रमाकडे पाहत होती. एवढ्यात आम्रवृक्षावरील कोकिळाची एक मधुर तान वातावरणात उमटली. अप्सरेच्या मुखातून संगीतमय स्वर बाहेर पडू लागले. भलत्याच वेळी वसंत ऋतू प्रकट झाला आणि सारा आसमंत सुंदर फुलांनी समृद्ध बनला. सुगंधित असा मलयवायू वाहू लागल्यानें वातावरण उत्तेजित बनले. छोटया छोटया वृक्षांची फुले जमिनीवर टपटप गळू लागली. कामदेवानें आपल्या पुष्पबाणाचे शर-संधान मुनीवर केले. संगीताचा मधुर ध्वनी ऐकून कंडू मुनींचे मन विचलित झाले. कामबाणाच्या स्पर्शानें त्यांचे मन चंचल बनले व ते स्वत: अप्सरेच्या गीतमोहिनीत अडकले. अप्सरेच्या दिशेने त्यांची पावले वळली. दोघांनी एकमेकांस पाहिले. सुंदर प्रम्लोचेचे लावण्य पाहून मुनी विचलित झाले. त्यांच्या शरीरावर रोमांच उठले. त्यांनी चौकशी केली,

‘सुंदरी, तू कोण आहेस ? इथं का आलीस ? तुझं हे सुंदर हास्य मोठं सुखदायी वाटतं. तू माझं मन आकर्षित केलंस. सुमध्यमा, तू आहेस तरी कोण ?’

‘मुनिवरा, मी आपली सेविका आहे. आपल्या आश्रमातील सुगंधी फुलं घेण्यासाठी मी आले आहे. मुनिश्रेष्ठा, आज्ञा व्हावी, मी आपली काय सेवा करू ?’

अप्सरा प्रम्लोचाचे हे लाघवी भाषण ऐकून मुनींचे चित्त विरघळू लागले. त्यांचे धैर्य संपले. त्यांनी तिचा हात धरला व ते तिला आपल्या आश्रमात घेऊन गेले. कामदेव, वायू, वसंत यांना कृतार्थता वाटून ते स्वर्गलोकी निघून गेले. त्यांनी इंद्राला झाला प्रकार निवेदन केला. इंद्राला व सर्व देवदेवतांना संतोष वाटला. आश्रमात आल्याबरोबर कंडू मुनीने आपल्या तपाच्या सामर्थ्याने आपले यौवनसंपन्न असे सुंदर रूप अप्सरेपुढे प्रकट केले. कामदेवाप्रमाणे रूपवान व तरुण रूप मुनींना प्राप्त झाले. त्यांनी दिव्य वस्त्रे व आभूषणे परिधान केली. मुनींची ही दिव्य शक्ती पाहून चकित झालेली अप्सरा म्हणाली, ' मुनिवर, आपल्या तपाची केवढी ही शक्ती ! किती अद्‌भुत ! '

कंडू मुनी अप्सरा प्रम्लोचेच्या पूर्ण स्वाधीन झाले. स्नान, संध्या, जप, तप, होम, स्वाध्याय, देवपूजा, उपवास, व्रत, नियम, ध्यान इत्यादींचा त्यांना विसर पडला. रात्रंदिवस ते अप्सरेच्या संगतीत राहिले. तोच एक आनंद त्यांनी मानला. कामदेवाच्या प्रभावाखाली कंडू मुनी असल्यामुळे त्यांना स्वतःच्या तपाची हानी समजून आली नाही. सर्व प्रकारचे सांसारिक विषयभोग भोगण्यात ते रमून गेले. मंदराचलाच्या गुहेत त्यांनी या अप्सरेसह शंभराहून अधिक वर्षे रममाण होण्यात घालविली. एके दिवशी अप्सरेने विषय काढला, ' ब्रह्मन्, आज मी परत स्वर्गलोकी जाणार आहे. प्रसन्न वृत्तीनं मला अनुज्ञा द्या. '

' कल्याणी, इतक्यात कुठं निघालीस ? आणखी काही दिवस राहा ना. '

आणखी काही वर्षे अप्सरेसह कंडू मुनींनीं विषयभोगाचे सुख अनुभविले. अप्सरा पुनःपुन्हा स्वर्गलोकी जाण्याची अनुज्ञा मागत होती आणि मुनी तिला न जाण्याबद्दल विनवीत होते. आणखी काही वर्षे थांबण्यासाठी त्यांचा आग्रह सुरू असे. हा मुनी केव्हा तरी सावध होईल अन् आपल्याला शाप देईल अशी भीती अप्सरेला वाटत होती. तिचे मनही उदार होते. प्रणयभंगाचे दुःख ती जाणीत होती. मुनींना सोडून जाण्यास ती फारशी उत्सुक नव्हती. मुनिवरांची इच्छा पूर्ण करता करता

महिने गेले, वर्षे गेली, रात्रं-दिवस रमूनही मुनिवरांचे समाधान झाले नाही असे तिच्या ध्यानात आले. प्रणयाचे नित्य नूतन खेळ करण्यात दोघेही रमून गेली होती.

एके दिवशी कंडू मुनी उतावळेपणाने आश्रमातून बाहेर पडू लागले. अप्सरेने विचारले, 'कुठं निघालात एवढ्या त्वरेनं ?'

'शुभे, दिवस मावळण्याच्या बेतात आहे. संध्या केली पाहिजे. नाहीतर कर्मलोप होईल.' प्रम्लोचेला हसू आले. पण प्रसन्न वृत्तीने ती म्हणाली,

'सर्व धर्मांचा अभ्यास करणाऱ्या मुनिवर्या, महात्माजी, काय आजच दिवस मावळताना आपल्याला दिसला ? कोणालाही आश्चर्य वाटेल आपले हे बोलणे ऐकून.'

'कल्याणी, सुंदरी, आजच सकाळी तर तू या नदीकाठी आलीस, आजच मी तुला पाहिलं. तुझं नाव विचारलं. तू माझ्या आश्रमात आजच तर आलीस. अग आता संध्याकाळ झालीय. संध्या करायला निघावे म्हणतोय. तुला हसू कशाचं येतंय ?'

'ब्रह्मन्, मी सकाळी येथे आले हे तर ठीकच आहे. वेळ सकाळचीच होती. यात थोडंही असत्य नाही. पण त्या गोष्टीला शेकडो वर्षं होऊन गेलीत.'

मुनिवरांस आश्चर्याचा धक्का बसला. त्यांनी दचकून विचारले,

'सुंदरी, खरं सांग पाहू. तुझ्या संगतीत किती वर्षं गेली ? किती काळ मी रमलो ?'

'मुनिश्रेष्ठा, खरे सांगू ? आपण माझ्याबरोबर सुखविलासात नऊशे सात वर्षं, सहा महिने, तीन दिवस इतका काळ घालविला.'

'शुभे, तू हे सारं खरं सांगतेस ? की थट्टेचं बोलणं हे तुझं ? मला तर असं वाटतंय की मी एक दिवसच तुझ्याबरोबर राहिलो.'

'ब्रह्मन्, मी आपणांशी असत्य कसं बोलीन ? आपण धर्ममार्गाचं अनुसरण करणारे आहात. मी खोटं कशासाठी सांगेन ?'

अप्सरेचे बोलणे ऐकून कंडू मुनींच्या अंतःकरणास खेद झाला.

आपली स्वतःचीच निंदा करीत ते म्हणाले, 'हाय! मजसारख्या दुराचारीचा धिक्कार असो. माझी सारी तपस्या नष्ट झाली. ब्रह्मवेत्त्याचं धन हीच त्याची तपस्या.तीच आज मी संपवून बसलो आहे. माझा विवेकही संपला. सुंदरी, तुझ्या नादानं मला तर असं वाटतं की, कुणा विधात्यानं आमच्यासारख्यांची तपस्या नष्ट करण्यासाठी सुंदर नारीची निर्मिती केली असावी. मी माझं मन जिंकण्यासाठी निघालो होतो. क्षुधा, पिपासा, राग, द्वेष, जरामृत्यू यांपलीकडे जाऊन ब्रह्मज्ञानाची प्राप्ती व्हावी म्हणून मी तपस्या केली. पण सारं घडलं ते विपरीत. कामरूपी बलवान ग्रहानं माझी सारी तपस्या भंग पावली. या कामप्रवृत्तीमुळं मी तर नरकद्वारी चालली आहे. माझं सारं वेदाध्ययन, माझा स्वाध्याय, माझी व्रतं, माझी सगळी साधना यांच्यावर आज पाणी पडलं आहे... '

'पापिणी, तुझी इच्छा असेल तिकडं तू निघून जा. तुला जे साधायचं होतं ते तू साधलंस. मी माझ्या क्रोधानं तुला भस्म करून नाही टाकणार. तुझा तरी त्यात काय दोष? मीच अपराधी, मीच प्रमादशील. तुझ्या संगतीत मी चिरकाल सुखं भोगली, माझाच सारा कर्मभाग. तुला दोष कशासाठी देऊ? मीच प्रमादशील का बनलो? तू तर त्या इंद्राचं प्रिय करण्यासाठी आली होतीस. माझी तपस्या तू भ्रष्ट केलीस. आपल्या कटाक्षांनी तू मला जाळ्यात अडकविलंस. मोहाच्या पिंजऱ्यात बद्ध केलंस. तू मला अशा प्रकारानं घृणित केलंस. सुंदरी, आता तुझं काम झालं. कुठंही तू जाऊ शकतेस. जा. माझ्या दृष्टी-समोरून निघून जा.'

कंडू मुनींचा राग वाढत आहेसे पाहून अप्सरा आश्रमाच्या बाहेर आली. कंपित शरीराने तिने आकाशाचा मार्ग स्वीकारला. तिच्या अंगातून घामाच्या धारा ठिबकू लागल्या. वृक्षांच्या पानांनी पुसून पुसूनही घर्मबिंदू निथळत होते. कंडू मुनींनी तिच्या उदरात स्थापन केलेला गर्भ घामाच्या बिंदूंच्या रूपात बाहेर पडत होता! वृक्षांवरील पानांनी त्या घर्मबिंदूंना आसरा दिला. या सर्व बिंदूंना एकत्र करून

वायूने एका गर्भाची रचना केली. चंद्राने आपल्या अमृतकिरणांनी त्या गर्भास हळूहळू पुष्टी दिली. या गर्भापासून मारिषा नावाची एक कन्या उत्पन्न झाली. वृक्षांच्या या कन्येचे डोळे मोठे रेखीव व मनोहर होते. हीच कन्या पुढे प्रचेतसांची पत्नी व दक्षाची जननी म्हणून प्रसिद्ध झाली.

अंतःकरणात विषाद व दुःख उत्पन्न झालेले कंडू मुनी पुन्हा तपस्येस लागले. क्षीण झालेली शक्ती परत मिळविण्यासाठी ते श्रीविष्णूच्या निवासस्थानाकडे,पुरुषोत्तम क्षेत्राकडे निघाले. सर्व देवदेवतांनी परिवेष्टित झालेल्या श्रीहरीचे त्यांनी दर्शन घेतले. ब्राह्मणादी चार वर्ण व चारी आश्रमांचे लोक भगवान विष्णूच्या सेवेत लीन झाले होते. पुरुषोत्तमक्षेत्रात आल्यावर मुनींचे चित्त स्थिर झाले. आपले दोनही हात उंच उभारून त्यांनी स्तोत्र जपत भगवंताची आराधना केली. प्रार्थना करताना त्यांनी म्हटले,

'भगवान विष्णू सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहेत. अपार भवसागरातून तरून जाण्याचा मार्ग तेच आहेत. पंचमहाभूतांपेक्षा ते श्रेष्ठ परमात्मरूप आहेत. वेदांनाही त्यांचं वर्णन करणं अशक्य असल्यानं त्यांना ब्रह्मपार म्हणतात. इंद्रिय, मन यांनाही ते अगोचर आहेत. तेच सर्वांचे पालक आहेत. सर्वांची मनकामना तेच पूर्ण करतात. कारण व कार्य यांच्या रूपात तेच एक आहेत. ब्रह्म हेच प्रभू, सर्वस्वरूप, अविनाशी, नित्य अजन्मा आहे. क्षय वा नाना विकार यांच्या विरहित भगवान विष्णू पुरुषोत्तम या नावानं प्रसिद्ध आहेत. त्यांच्याच प्रभावानं माझे रागलोभादी विकार नष्ट होतील.

कंडू मुनींची प्रार्थना ऐकून त्यांनी म्हटलेले ब्रह्मपार स्तोत्र ऐकून भगवान विष्णू प्रसन्न झाले. आपल्या सेवकाची भक्ती जाणून ते प्रकट होऊन म्हणाले,

'मुने, तुझ्या मनात जे असेल त्याचा उच्चार कर. तुझी इच्छा बोल. तुझा भाव पाहून मी संतुष्ट झालो आहे. तू हवा तो वर माग. तुला वर देण्यासाठी मी इथं आलो आहे.'

भगवान विष्णूचे हे अमृतमधुर शब्द ऐकून कंडू मुनींनी डोळे

उघडले. दृष्टीसमोर स्वत: भगवंत उभे होते. त्यांचे रूप कसे होते ?

अतसीपुष्प संकाशं पद्मपत्रायतेक्षणम् ।
शङ्खचक्रगदापाणिं मुकुटाङ्गदधारिणम् ।।
चतुर्बाहुमुदाराङ्गं पीतवस्त्रधरं शुभम् ।
श्रीवत्सलक्ष्मसंयुक्तं वनमालाविभूषितम् ।।
सर्वलक्षणसंयुक्तं सर्वरत्नविभूषितम् ।
दिव्यचंदनलिप्ताङ्गं दिव्यमाल्यविभूषितम् ।।

या भगवंताचे अंग अळशीच्या फुलांप्रमाणे श्यामल आहे. डोळे पद्मपत्रांप्रमाणे विशाल आहेत. त्यांच्या हातांत शंख, चक्र, गदा ही आयुधे शोभा देणारी आहेत. त्यांच्या माथ्यावर मुकुट असून हातांवर भुजबंध शोभून दिसतात. त्यांना चार हात आहेत. त्यांच्या अंगाअंगामधून उदारता प्रकट होत आहे. सुंदर शरीरावर पीतांबर शोभत आहे. श्रीवत्सचिन्हाने युक्त अशा वक्ष:स्थलावर वनमाला रुळत आहे. सर्व शुभ लक्षणांनी श्रीहरी समृद्ध आहेत. त्यांच्या अंगावर सर्व प्रकारची रत्ने चमकत आहेत. त्यांच्या अंगास दिव्य चंदनाची उटी लावलेली असून गळयातील दिव्य हारामुळे शोभा वाढलेली आहे.

अशा दिव्य अन् सुंदर रूपाच्या भगवंताकडे पाहून कंडू मुनींच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्यांनी पृथ्वीवर पडून भगवंतास साष्टांग नमस्कार घातला अन् म्हटले,

'भगवान्, आज माझा जन्म सफल झाला. आज माझ्या तपस्येचं फल मला मिळालं. आज मी धन्य झालो. नारायण, हरे, श्रीकृष्ण, श्रीवत्साङ्क, जगत्पते, जगद्बीज, जगद्धाम, जगत्साक्षिन्, आपणांस नमस्कार असो. अव्यक्त विष्णू, आपणच सर्वांच्या उत्पत्तीस कारण आहात. प्रकृती आणि पुरुष या दोनही बाबतींत आपण उत्तम असल्यानं आपणांस पुरुषोत्तम म्हणतात. कमलनयन गोविंदा, जगन्नाथा, आपणांस नमस्कार असो. आपण हिरण्यगर्भ आहात. लक्ष्मीपती, पद्मनाथ, सनातन पुरुष आपणच आहात. आपल्या गर्भात ही पृथ्वी आहे. आपण ध्रुव व ईश्वर आहात. हृषिकेशा, आपणांस नमस्कार असो. आपण

अनंत, अनादी, अजेय आहात. आपण विजयी पुरुषांत श्रेष्ठ आहात. आपला जय असो. श्रीकृष्णा, आपण अजित व अखंड आहात. श्रीनिवासा, आपणांस नमस्कार असो. आपण मेघ आहात. आपणच धूम, आपणच पाऊस, आपणच प्रखर ऊन आहात. आपला अंत लागणं कठीण काम आहे. मोठ्या कष्टानंच आपण प्राप्त होता. दुःख व पीडा यांचा नाश करणारे श्रीहरी आपणच आहात. जलात शयन करणाऱ्या नारायणा, आपणांस नमस्कार असो. अव्यक्त परमेश्वरा, आपण सर्व भूतांचं पालनकर्ते आहात, ईश्वर आहात. भौतिक तत्त्वांनी आपण कधी क्षुब्ध होत नाही. सर्व प्राण्यांचा निवास आपल्यांतच आहे. सर्व भूतांचा आत्मा आपणच आहात. सर्व भूते आपल्या गर्भात असतात. आपणांस नमस्कार असो.'

'भगवन्, आपण यज्ञ, यज्वा, यज्ञधर, यज्ञधाता व अभय देणारे आहात. यज्ञ आपल्या गर्भात स्थिर आहे. आपले श्रीअंग सुवर्णाप्रमाणं कांतिमान आहे. पृश्निगर्भा, आपणांला नमस्कार असो. आपण क्षेत्रज्ञ, क्षेत्रपालक, क्षेत्री, क्षेत्रहन्ता, क्षेत्रकर्ता, जितेन्द्रिय, क्षेत्रात्मा, क्षेत्ररहित आणि क्षेत्रस्रष्टा आहात. गुणालय, गुणावास, गुणाश्रय, गुणावह, गुणभोक्ता, गुणाराम, गुणत्यागी ही सर्व आपलीच नावं आहेत. आपणांस नमस्कार असो. आपणच श्रीविष्णू आहात. आपणांसच श्रीहरी व चक्री म्हणतात. आपणच जनार्दन, वषट्कार आहात. भूत, भविष्य, वर्तमान यांचे प्रभू आपणच आहात. आपण भूतांचं उत्पादक असून अव्यक्त आहात. सर्वांची उत्पत्ती आपणांपासून असल्यानं आपणांस ' संभव ' हे नाव आहे. सर्व प्राण्यांचे भरण-पोषण आपणच करता. आपणच भूतभावन देवता आहात. आपण अजन्मा आहात.'

'भगवन्, आपणच श्रीविष्णू, शंभू, विश्वकर्मा व वृषभाची आकृती धारण करणारे आहात. आपणच शंकर, आपणच शुक्राचार्य, आपणच सत्य, आपणच तप आणि आपणच जनलोक आहात. विश्वविजेता, कल्याणमय, शरणागतपालक, अविनाशी, शंभू, स्वयंभू, ज्येष्ठ व परायण ही नावे आपणांसच शोभतात. आदित्य, ओंकार, प्राण,

अंधकारनाशक सूर्य, मेघ, सर्वच विख्यात देवतांचे स्वामी ब्रह्मदेव, सर्व काही आपणच आहात. ऋक्, यजु:, साम आपणच आहात. आपणच वायू, अग्नी, जल, पृथ्वी आहात. स्रष्टा, भोक्ता, होता, हविष्य, यज्ञ, प्रभू, विभू, श्रेष्ठ, लोकपती, अच्युत आपणच आहात. आपणच सर्वांचे दमन करता. शत्रूंचा नाशही आपणच करता. आपणच दिवसरात्र, वर्ष, काल, कला, काष्ठा, मुहूर्त, क्षण, लव ही सारी रूपं आपलीच आहेत. आपणच बालक आहात. आपणच वृद्ध, आपणच पुरुष, स्त्री, नपुंसक आहात. विश्वाच्या उत्पत्तीचं स्थान आपणच आहात. आपणच सर्वांचे नेत्र आहात. आपण स्थिर असून सर्वांना यश देणारे आहात. आपण सनातन पुरुष आहात, आपणांस कोणीच जिंकू शकत नाही. इंद्राचे धाकटे बंधू उपेन्द्र आपणच आहात. सर्व जगताला सुख देणारे आपणच आहात. वेदांची अंगं आपणच आहात. आपण अविनाशी, ज्ञेयतत्त्व, धाता, विधाता आहात. आपणच जलराशी समुद्र, वसू, वैद्य, धृतात्मा, इंद्रियातीत आहात. सर्वांच्या पुढं चालणारे आपण नेता आहात. यम व नियम आपणच आहात. उन्नत शरीराचे आपण प्रांशू असून चतुर्भुज आहात. अन्न, अंतरात्मा, परमात्मा ही आपलीच नावे आहेत. आपणच गुरू, गुरुतम, वाम व दक्षिण आहात. पिंपळादी वृक्ष आपणच आहात. आपण प्रजापती असून आपल्या नाभीतून सुवर्णकमल प्रकट झालं आहे. आपण दिव्य शक्तीनं संपन्न आहात. आपणच चंद्रमा व प्रजापती आहात. आपणच यम व आपणच दैत्यांचा नाश करणारे श्रीविष्णू आहात. आपणच संकर्षण देव, कर्ता, सनातन पुरुष, अमेयात्मा वासुदेव आहात.

'आपणच देवा, ज्येष्ठ, वरिष्ठ व सहिष्णू आहात. आपण लक्ष्मीचे पती असून आपणांला सहस्र मस्तकं आहेत. आपणाला सहस्र नेत्र व सहस्र पाय आहेत. आपण विराट असून सर्व देवतांचे स्वामी आहात. आपण देवदेवा, तरी दशांगुलांच्या मापानं शिल्लक आहात. आपणच देवा, ईशान, अमृत, मर्त्य आहात. हे सर्व जगत् आपणांपासूनच अंकुरित झालं आहे. आपणच दश प्राणवायूंच्या स्वरूपात स्थित आहात. आपणच विश्वरूप बनून चार भागांत स्थित आहात. आपण अमृतस्वरूप बनून

नऊ भागांच्यासह द्युलोकात राहता आणि नऊ भागांसहित सनातन पौरुषेय रूप धारण करून अंतरिक्षात निवास करता. आपणांपासूनच यज्ञाची निर्मिती होते. आपणच या जगतावर जलवृष्टी करता. गावठी व जंगली औषधी वनस्पती, पशू, मृग इत्यादी सृष्टी आपणांपासूनच निर्माण झाली. आपणच सात मुखांचे देदीप्यमान विग्रहानं युक्त असे काल आहात. हे स्थावर-जंगम जगत आपणांपासूनच निर्माण झालं आहे. आपणच देवा, अनिरुद्ध, वासुदेव, प्रद्युम्न, दैत्यनाशक संकर्षण आहात. कमलनयना, माझे रक्षण करा. नारायणा, माझा नमस्कार असो. भगवन्, विष्णो, पुरुषोत्तमा, सर्वलोकेश्वरा, कमलालया, गुणालया, गुणाकारा, वासुदेवा, सुरोत्तमा, जनार्दना, सनातना, आपणांस नमस्कार असो–'

'योगिगम्या परमेश्वरा, गोपते, श्रीपते, मरुत्पते, आपणांस नमस्कार असो. दिवस्पते, महीपते, पुंडरीकाक्षा, नारायणा, सुब्रह्मण्या, अच्युता, आपणांस नमस्कार असो. आपणच मधु-दैत्याचा वध केला. कैटभ दैत्याचा वध आपणच केला. आपणच समुद्राचं मंथन केलं. आपणास नमस्कार असो. विशाल नाक असणाऱ्या अश्वमुखाच्या भगवान हयग्रीवा, आपणांस नमस्कार असो. आपणच कच्छपाचं रूप धारण करून पृथ्वीला वाचविलं. आपणच आपल्या पाठीवर मंदारपर्वत धारण केला. महाकूर्म-स्वरूपा, महावराहस्वरूपा आपणांस नमस्कार असो. आपण अनन्त, सूक्ष्म, मुख्य, श्रेष्ठ, परमाणुस्वरूप आहात. आपणच योगीश्वर मंडळाचे आश्रयस्थान आहात. आपला निवास क्षीरसागरात असतो. शेषनागाच्या सुंदर शरीराची आपली शय्या असते. आपल्या कानांतील सुवर्णाची व रत्नजडित अशी कुंडलं तळपताना दिसतात.'

कंडू मुनींची अशी भावभक्तिपूर्ण प्रार्थना ऐकून भगवान विष्णू प्रसन्न झाले. त्यांनी पुन्हा 'वर' माग असे म्हणताच मुनिश्रेष्ठ म्हणाले, 'जगन्नाथा, हा संसार अतिशय दुस्तर व रोमांचकारी आहे. यात दुःखच सर्वत्र दिसतं. पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणं हा चंचल व विनाशी आहे. सर्व प्रकारच्या उपद्रवांनी हा भरलेला आहे. भगवंता, मी विषयासक्त

आहे. माझ्या मनास शांती नाही. देवेश, या संसारभयास कंटाळून मी आपणांस शरण आलो आहे. श्रीकृष्णा, या भवसागरातून तुम्ही माझा उद्धार करावा. सुरेश्वरा, मी आपल्या कृपेनं सनातन परमपदास येऊन मिळेन असं आपण करावं.'

'मुनिश्रेष्ठा, तू माझा परमभक्त आहेस. माझी सतत आराधना करतोस. माझ्या कृपेमुळे तुला अभीष्ट अशा मोक्षाची प्राप्ती होईल. विप्रवरा,

मद्भक्ताः क्षत्रिया वैश्याः स्त्रियः शूद्रान्त्यजातिजाः ।
प्राप्नुवन्ति परां सिद्धिं किं पुनस्त्वं द्विजोत्तम ॥
श्वपाकोऽपि च मद्भक्तः सम्यक् श्रद्धासमन्वितः ।
प्राप्नोत्यभिमतां सिद्धिमन्येषां तत्र का कथा ? ॥

माझे भक्त क्षत्रिय असोत, वैश्य असोत, स्त्री असोत वा शूद्र असोत, ते सर्व मलाच येऊन मिळतात. तर तुझ्यासारख्या तपोनिष्ठ ब्राह्मणाची काय कथा ? उत्तम श्रद्धेचा चांडालही तरून जातो. त्यालाही मोक्षाची प्राप्ती होते. मग इतरांच्या संबंधात शंका तरी कशासाठी ?'

असे म्हणून भगवान विष्णू अंतर्धान पावले. मुनिवर कंडूंचे चित्त स्वस्थ व आनंदित बनले. सर्व इंद्रियविषयांना जिंकून श्रीहरीच्या ध्यानात ते मग्न झाले. निर्लेप, निर्गुण, शांत, सन्मात्र स्वरूपाचे चिंतन करून त्यांनी मोक्षाची प्राप्ती करून घेतली.

भगवानांच्या अवताराचा उपक्रम

साधुपुरुषांचे रक्षण, दुष्टांचे दमन व धर्माची स्थापना यांसाठी प्रत्येक युगात परमात्मा अवतार धारण करतो. फार पूर्वीची गोष्ट. पृथ्वीवर असाच दुष्टांचा फार मोठा भार झालेला होता. मेरू पर्वतावर अनेक देवदेवता असल्याने पृथ्वी त्यांच्याकडे जाऊन ब्रह्मदेवादी देवांना म्हणाली,

'सुवर्णाचा गुरू अग्नी, गायींचे गुरू सूर्य आणि भगवान नारायण हे माझे गुरू होत. यावेळी कालनेमी दैत्यानं रात्रंदिवस प्रजेस कष्ट

देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. याचा भगवान विष्णूनं पूर्वी वध केला होता. तरी आता तोच उग्रसेनकुमार कंसाच्या रूपानं सर्वांना त्रस्त करीत आहे. अरिष्ट, धेनुक, केशी, प्रलंब, नरक, सुंद, बाणासुर इत्यादी महापराक्रमी दैत्य यांच्या सैन्यानं गरीब लोकांना धास्ती वाटू लागली आहे. सुरेश्वरा, आता या दैत्यांचा भार मला सहन होण्यासारखा नाही. आपणच यातून माझी सुटका करावी. '

पृथ्वीची ही करुण वाणी ऐकून सर्व देवांना चिंता वाटली. ते ब्रह्मदेवांना शरण गेले. तेव्हा ब्रह्मदेव म्हणाले,

' देवांनो, ही पृथ्वी म्हणते आहे ते सर्व ठीक आहे. चला, आपण सर्वजण मजबरोबर चला. आपण क्षीरसागरनिवासी श्रीहरीची प्रार्थना करू. तो अवतार धारण करून आपली सर्वांची चिंता दूर करील. ' सर्व देवदेवतांसह ब्रह्मदेव भगवान गरुडध्वजाची स्तुती करताना म्हणाले,

' सहस्रमूर्ते, मी आपणांस वारंवार नमस्कार करतो. आपणांस हजार बाहू, अनेक मुख, अनेक पाय आहेत. या जगाचे पालन, पोषण, संहार आपणच करू शकता. परमेश्वरा, आपणांस वारंवार नमस्कार असो. आपण अत्यंत सूक्ष्माहून सूक्ष्म, परम महान, अधिक गौरवशाली आहात. आपण आम्हांवर प्रसन्न व्हावं. देवा, ही पृथ्वी आपणांस शरण आली आहे. यावेळी भूतलावर मोठमोठे राक्षस उत्पन्न झाले आहेत. त्यांच्या अत्याचाराने पृथ्वीची पर्वतरूपी बंधनंही ढिली पडली आहेत. सर्व जगतास आपण आश्रय आहात. आपला महिमा अपरंपार आहे. भगवान, हा इंद्र, दोन अश्विनीकुमार, वरुण, रुद्र, वसू, आदित्य, वायू, अग्नी इत्यादी सर्व देव आपली स्तुती करीत आहेत. देवेश्वरा, आपल्या आदेशाची वाट पाहत आहेत. '

ब्रह्मदेवांचा सर्व वृत्तान्त ऐकून भगवान विष्णूने आपले दोन केस, एक पांढरा व दुसरा काळा, असे उखडून देवांना म्हटले, ' हे माझे दोन केस पृथ्वीवर अवतार धारण करून सर्व क्लेश दूर करतील. सर्व देवही आपापल्या अंशापासून अवतीर्ण होऊन भार हलका करण्यास मदत

करतील. दैत्यांचा नाश होईल. वसुदेवाची पत्नी देवकीदेवी आहे. तिच्या आठव्या गर्भापासून माझा हा कृष्णवर्णीय केस अवतार धारण करील. तोच कंसाचा वध करील. ' इतके बोलून भगवान अदृश्य झाले.

एके दिवशी महर्षी नारदांनी कंसाला म्हटले, 'देवकीच्या आठव्या गर्भापासून भगवान विष्णू अवतीर्ण होणार व तुझा वध करणार. ' हे ऐकून कंसाला फारच क्रोध आला. त्याने देवकी व वसुदेव यांना बंदिवासात टाकले. होणारा प्रत्येक पुत्र कंसास अर्पण करण्याचे ठरले. यांतील सहा अपत्यांचा कंसाने नाश केला. शेष नावाच्या श्रीहरीच्या अंशापासून देवकीच्या उदरात सातवा गर्भ राहिला. वसुदेवाची दुसरी भार्या रोहिणी गोकुळात होती. प्रसवकालात हा गर्भ रोहिणीच्या उदरात स्थापन होईल अशी योजना झाली. लोक समजू लागले की देवकीचा सातवा गर्भ भोजराज कंसाच्या भीतीने गळून पडला. अशा रीतीने गर्भाचे संकर्षण झाल्यामुळे रोहिणीचा हा वीरपुत्र संकर्षण नावाने प्रसिद्ध झाला. आठवा गर्भ अशाच रीतीने यशोदेच्या कुशीत ठेवण्याचे ठरले. यशोदेच्या उदरी महामाया जन्म घेणार असे ठरले. कंसाच्या हातून ही महामाया निसटली व आकाशात स्थिरावली. हीच पुढे भूती, संनती, कीर्ती, कान्ती, पृथ्वी, धृती, लज्जा, पुष्टी, उषा, आर्या, दुर्गा, वेदगर्भा, अंबिका, भद्रा, भद्रकाली, क्षेम्या इत्यादी नावांनी प्रसिद्ध झाली.

पूतनावध व वृंदावनगमन

भगवान विष्णूंचा गर्भ देवकीने धारण केला. सर्व ऋतू आता सुखमय वाटू लागले. देवकीच्या शरीरातून तेजाचे किरण चमकत राहिले. मध्यरात्रीच्या सुमारास भगवान जनार्दन प्रकट झाले. आकाशातून सर्व देवांनी फुलांची वृष्टी केली. विकसित झालेल्या नीलकमलांप्रमाणे डोळे असलेल्या बालकास पाहून वसुदेव-देवकीस परम आनंद झाला. कंसाच्या भीतीने वसुदेव बालकास म्हणाला,

'शंख, चक्र, गदा धारण करणाऱ्या देवदेवेश्वरा, आपण साक्षात भगवान अहात हे मी जाणलं. आपण कृपा करून हे आपलं दिव्य रूप

लपवावं. आपण इथं अवतीर्ण झाला आहात हे समजताच कंस फार कष्ट देईल सर्वांना.'

भगवानांना देवकीही म्हणाली,

' देवा, माझ्यावर प्रसन्न झालात. पण आपलं हे चतुर्भज रूप आपण आवरून घ्यावं. आपल्या या अवताराचं ज्ञान कंसाला होता कामा नये. '

' देवी, पूर्वजन्मी माझ्यासारखा पुत्र व्हावा म्हणून तूच तप केलं होतंस ना ? त्याचं फल आज तुला मिळालं. आज मी तुझ्या उदरी जन्म घेतला आहे. '

इतके म्हणून भगवान मौन झाले. रात्रीच वसुदेव बालकास घेऊन बाहेर पडले. योगनिद्रेने पहारेकरी निद्रित बनले होते. बाहेर खूप पाऊस पडत होता. नवजात बालकास त्रास न व्हावा म्हणून शेषनागाने आपला फणा त्याच्यावर धरून तो मागेमागे चालला होता. मार्गात मोठा पूर आलेली यमुना नदी होती. तिच्या पाण्यात मोठमोठे भोवरे होते. लाटा उसळत होत्या. पण वसुदेव नदीत उतरला अन् नदी त्याच्या गुडघ्यांएवढी होऊन वाहू लागली. वसुदेवांनी धीमेपणाने नदी पार केली, याच वेळी यशोदेने योगमायेस कन्येच्या रूपाने जन्म दिला होता. जन्म घेणारे अपत्य पुत्र की कन्या याचे भानही कुणास नव्हते. वसुदेवानें गुप्तपणाने आपल्या बालकास यशोदेच्या शय्येवर ठेविले व तिची कन्या घेऊन तो निघून गेला. जागी होताच श्यामसुंदर अशा मुलग्यास पाहून यशोदेस मोठाच हर्ष झाला.

इकडे कारागृहात नवीन कन्येस देवकीजवळ आश्रय मिळाला. मुलीच्या रडण्याचा आवाज ऐकून द्वारपाल सावध झाले. त्यांनी कंसास समाचार कळविला. कंसाने येऊन बालिकेस उचलिले. बाहेर येऊन तिला शिळेवर आपटीत असताना ती वेगाने आकाशात उडून गेली. आयुधांसहित अष्टभुजा बनून उंच स्वरात ती आकाशातून म्हणाली, ' अरे कंसा, मला मारून तुझा काय फायदा ? तुझा वध करणारा तर प्रकट झाला आहे. हा श्रीहरी पूर्वजन्मीही तुझा काळ होता. हे सर्व जाणून तू आता स्वतःच्या कल्याणाचा विचार करावास. '

हे सर्व ऐकून कंसाच्या मनास फारच उद्वेग वाटला. प्रलंब व केशी आणि सर्व प्रधान यांना बोलावून तो म्हणाला,

'प्रलंब, केशी, धेनुक, पूतना, सर्वजण माझं आता ऐका. दुरात्मा देवानं मला मारण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मी काही त्याला वीर-श्रेष्ठ समजत नाही. दैत्यवीरांनो, त्या कन्येच्या बोलण्याचं मला हसू आलं. आपण आता त्या दुष्टाचा नाश करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.'

इतके बोलून कंस कारावासात आला. वसुदेव-देवकीस म्हणाला, 'मी आपणास उगाच कष्ट दिले. माझ्या नाशासाठी दुसराच कुणी बालक जन्मास आला आहे. आपण आता स्वस्थ असावं.' इतके म्हणून कंसाने त्या दोघांना बंधनातून मुक्त केले. मुक्त झाल्यावर वसुदेव-देवकी नंदाच्या घरी आले. नंदाच्या घरी आनंदाचा उत्सव सुरू होता. उतरत्या वयात नंद-यशोदेस पुत्र झाल्याचा सोहळा सुरू होता. वसुदेवासही आनंद झाला. तो नंदास म्हणाला, 'आपण आता स्वस्थ असावं. याच गोकुळात रोहिणीच्या गर्भातून माझा एक पुत्र प्रकट झाला आहे. त्याचं पालन-पोषण तुम्ही करावं.'

गोकुळात बालकृष्णावर एक एक संकट येत राहिले. एके दिवशी रात्री पूतना आली अन् बाळास मांडीवर घेऊन स्तनपान करवू लागली. रात्री पूतना ज्या ज्या बालकांना स्तनपान करविते ती ती बालके एका क्षणात निर्जीव बनतात. श्रीकृष्णाने तिच्या स्तनास आपल्या हातांनी जोराने दाबून दूध पिणे सुरू केले. पूतनेच्या सर्व नाड्या आखडल्या. जोराने ओरडून पृथ्वीवर ती मरून पडली. तिचा भयानक आवाज ऐकून गोकुळातील गोपगोपी घाबरले. माता यशोदेने सावध होऊन चटकन कृष्णाला आपल्या मांडीवर घेतले. गायीचे शेपूट कृष्णाच्या मुखावर फिरवून तिने अरिष्टास दूर केले. नंदानेही ग्रहपीडा दूर व्हावी म्हणून काही उपाय केले.

एके दिवशी श्रीकृष्ण एका छकड्याच्या खाली झोपले होते. एकदम जाग येताच दूध पिण्यासाठी ते जोराने रडू लागले. रडता रडता त्यांनी आपले दोनही पाय छकड्याच्या दिशेने झाडले. या आघाताने

छकडा मोडून पडला. त्यावर असलेली मडकी, गाडगी फुटून गेली. आवाज ऐकताच अनेक गोपगोपी तेथे येऊन पोचले. त्यांनी पाहिले तो बालक कृष्ण छकड्याच्या खाली झोपलेला. एका गोपाने विचारले,

'हा छकडा कुणी उलटून पाडला ?'

'याच्याखाली एक बालक झोपलं आहे. त्यानं रडायला सुरुवात केली.' कुणीतरी म्हणाले.

हा सर्व वृत्तान्त ऐकून नंद-यशोदा यांना नवल वाटले. त्यांनी झटकन पुढे होऊन बालकास उचलून मांडीवर घेतले. या छकड्याखाली आपले मूल सुरक्षित राहिले असे पाहून तिनें छकड्याची पूजा केली.

या नवीन पोराची बाधा नष्ट व्हावी म्हणून नंदाने खूप प्रयत्न केले. एकदा वसुदेवांच्या सांगण्यावरून गर्ग मुनी गोकुळात आले. त्यांनी थोरल्याचे नाव राम व छोट्याचे नाव कृष्ण ठेवले. थोड्याच दिवसांत या बालकांच्या अद्‌भुत लीलांनी सारे गोकुळ चकित झाले. ही लहान मुले रांगू लागली. त्यांचे गुडघे खराब झाले. शरीरांवर राख, माती लागलेली अनेकांनी पाहिली. यशोदा व रोहिणी यांची नजर चुकवून ते कधी कधी गोठ्यात जाऊन गायींशी खेळत. दोघे बालक अनेकदा क्रीडा करीत. खोड्या करीत. एके दिवशी रागाने यशोदेने श्रीकृष्णास एका उखळाशी दोराने बांधून ठेविले. यशोदा जेव्हा घरकामात गुंतली तेव्हा उखळासकट फरपटत ओढत जाऊन दोन अर्जुनवृक्षांच्या मध्ये जाऊन तो अडकला. ओढ बसताच ते दोन वृक्ष उन्मळून पडले. जोराचा आवाज ऐकून अनेक गोपगोपी वृक्षांच्यापाशी आले. दोन महान वृक्ष पृथ्वीवर पडलेले व मध्ये उखळासह कृष्ण अडकलेला त्यांनी पाहिला. पोर मंदमंद हसत होता. त्याच्या उघड्या मुखातून दोन दातही चमकत होते. त्याच्या कमरेस एक दोर, दाम बांधलेला होता. म्हणून त्याचे नाव दामोदर पडले.

या गोकुळात असे उत्पात वारंवार होत गेले. सर्व गोपगोपींना वाटले, आता हे गोकुळ काही दिवस सोडावे. नाहीतर गायीगुरांनाही त्रास होईल. कुठे वनात गेले तरी चालेल, पण इथे नको. सर्व गोपगोपी आपापली गुरे, सामान, छकडे घेऊन गोकुळातून वृंदावनाकडे निघाले.

गोकुळातील रस्त्यांवर या गडबडीत धान्याचे अनेक दाणे पडले होते. त्यावर कावळे इत्यादी पक्षी तुटून पडले. वृंदावनातही बलराम व कृष्ण यांनी अनेक प्रकारच्या लीला केल्या. मोरपिसांचा मुकुट बनवून जंगली पुष्पांच्या माळा कानांत, गळ्यात घालून, मुरली वाजवून, पक्ष्यांप्रमाणे विविध आवाज करून कृष्णाने सर्वांना वेध लावला. हास्य, खेळ, क्रीडा यांनी सर्वांना आनंद वाटला. सारी पृथ्वी नवोदित वनस्पतींनी, वृक्षांनी सुशोभित झाली. नवीन पाण्याने नद्या भरून वाहू लागल्या.

कालिया नागाचे दमन

एके दिवशी श्रीकृष्ण बलरामास बरोबर न घेताच वृंदावनात गेला व गोपबालकांत खेळू लागला. जंगली वनपुष्पांच्या हारामुळे तो आज सुंदर दिसत होता. फिरत फिरत तो यमुनेच्या काठावर गेला. या सुमारास यमुना नदीतील एका कुंडात कालिया नागाचे वास्तव्य होते. तेथील सर्व पाणी कालियाच्या विषारी वास्तव्याने दूषित झाले होते. त्याच्या पाण्याने मोठमोठे वृक्ष मरत. पक्षी जलपान केल्यावर प्राण सोडीत. हे महाभयंकर कुंड मृत्यूचा एक सापळाच बनले होते. या कालियाने यमुनेचे सारे पाणी दूषित केले. या नागराजास शासन करायला हवे, असा विचार श्रीकृष्णाच्या मनात आला. कुमार्गी दुरितात्म्यांच्या नाशासाठी आपण अवतार धारण केला ना ?

आता या कदंब वृक्षावर चढून डोहात उडी टाकावी व त्या दुरात्म्याचा नाश करावा.

अशा विचाराने श्रीकृष्णाने कंबर कसली. आणि वेगाने त्याने कालियाकुंडात उडी मारली. त्यामुळे त्या मोठ्या कुंडातील पाणी क्षोभले. पाण्याचे तुषार भोवतीच्या वृक्षांवरही पडले. विषमिश्रित पाण्याच्या वर्षावामुळे झाडांची पाने करपून गेली. चारही दिशांना आगीचा संपर्क आला. नागकुंडात पोचताच श्रीकृष्णाने कालियाकडे पाहून आपले दंड थोपटले. नागराजाने क्रोधाविष्ट नेत्रांनी कृष्णाकडे पाहिले. त्याच्या डोळ्यांतून फण्यांतून विषारी धूत्कार निघत होते. त्याच्या अनेक पत्नी भोवती उभ्या होत्या. त्यांच्या गळ्यात मनोहर

हार होते. त्यांच्या कानात चंचल कुंडले चमकत होती. विविध सर्पांनी व कालियाने श्रीकृष्णाच्या शरीरास लपेटून टाकले. आपल्या विषारी फणांचा मारा सुरू केला. कृष्णाची ही अवस्था पाहून त्याचे सोबती रडत रडत व्रजाकडे आले. ते म्हणत होते, ' आपला श्रीकृष्ण कालिया डोहात बुडाला हो. मूर्च्छित कृष्णास कालिया त्या आता मारणार. तुम्ही लौकर त्याच्या साह्यासाठी चला.'

हा सर्व वृतान्त ऐकून सर्व गोपांवर जणू वज्राघात झाला. सर्व गोप, गोपी, यशोदा, नंद, रोहिणी कालियाडोहापाशी आले. गोपींना तर फारच शोक होऊन त्या धरणीवर पडून शोक करू लागल्या. एवढ्यात बलरामही आला. काय करावे हे नेमके कुणासच सुचत नव्हते. इतर गोप व गोपी म्हणू लागले, ' आता आम्ही सर्वजण यशोदे-सह या नागकुंडात प्रवेश करणार. आता गोकुळात परत जाऊन करायचं काय ? सूर्याशिवाय दिवस, चंद्राशिवाय रात्र कोण सहन करणार ?' दुधाशिवाय गाय, कृष्णाशिवाय व्रज, गोकुळ, अशी कल्पनाच त्यांना सहन झाली नाही.

गोपगोपींची ही वृत्ती पाहून रोहिणीनंदन बलरामही कष्टी झाला. गोपगणाच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहताना त्याने पाहिल्या. नंद व यशोदा यांची शुद्धच हरपून गेली. बलरामाने आपल्या संकेतमय भाषेत कृष्णास सांगितले,

' देवेश्वरा, तू तर या सर्व मानवी भावांपासून वेगळा आहेस. तू या सर्व जगाचे केंद्र आहेस. सर्व देवांना आश्रय तुझा. त्रिभुवनाच्या सृष्टीचा पालनकर्ता, संहारकर्ता तूच. आता हे व्रज गोपगोपी आपलेच बांधव आहेत. हे आज तुझ्यासाठी इतके दु:खी कष्टी बनले आहेत. आता हा खेळ पुरे. तू आपल्या सामर्थ्यानं या दुरात्म्याचा नाश कर.'

बलरामाचे भाषण ऐकून श्रीकृष्ण सौम्यपणाने हसला. त्याने एक मोठा आळस देऊन स्वत:भोवतीचे सर्पांचे वेढे सोडून टाकले आणि दोनही हातांनी नागराजाची फणा खाली दडपून कृष्ण त्यावर चढला व थयथया नाचू लागला. नागराजाच्या मस्तकावर कृष्णाच्या चरणांचे अनेक घाव झाले. नागाला चक्कर आल्यासारखे झाले. मूर्च्छित होऊन

तो जमिनीवर पडला. त्याच्या मुखातून बरेचसे रक्त बाहेर आले. त्याचे मस्तक, मान यांच्यांत ढिलाई झाली. हा सर्व प्रकार पाहून नागराजाच्या पत्नी श्रीकृष्णास शरण गेल्या. त्या नम्र भावाने श्रीहरीला म्हणाल्या,

'देवदेवेश्वर, आपण सर्वांत श्रेष्ठ ईश्वर. अचित्य परमज्योतिः-स्वरूप जे ब्रह्म त्याचाच अंश आपण परमेश्वराच्या रूपात आहात. जगन्नाथा, आम्ही फार कष्टी झालो आहोत. आमच्यावर कृपा व्हावी. प्राणत्याग करू पाहणाऱ्या या आमच्या पतीची भिक्षा आम्हांस द्यावी.'

नागराज कालियाही श्रीकृष्णाला म्हणाला,

'देवदेवा, माझ्यावर कृपा करावी. आपण अष्टैश्वर्यानं सुशोभित आहात. आपणांसारख्यांची स्तुती मी काय करावी ? परमात्मन्, आपण परेच्याही पलीकडचे आहात. परमेश्वरा, जाती, रूप, व स्वभाव या गोष्टी आपण मला जशा दिल्यात त्यानुसारच मी कर्म करतो. आपणच या जगाचे स्वामी. आपण जो दंड आज मला दिला तो मी वरदानाप्रमाणं स्वीकारतो. आता मला दुसरा कोणताच वर नको. अच्युता, आपण माझ्या बलाचा नाश केला आहे. माझ्या विषाचं हरण केलं आहे. आता मला नीटपणानं जगावं असा आशीर्वाद द्या.'

'सर्पा, या यमुना नदीच्या आसपास तू आता यापुढे राहू नयेस. तू तुझा परिवार घेऊन समुद्राच्या काठी जावंस. नागा, तुझ्या मस्तका-वरील माझं पदचिन्ह पाहून तो नागशत्रू गरुड तुला काहीच करणार नाही.'

इतके म्हणून श्रीकृष्णानें नागराजास सोडून दिले. श्रीकृष्णाला प्रणाम करून तो निघून गेला. त्याच्याबरोबर सेवक, संतान, बंधुबांधव यांनी नेहमीसाठीच त्या कुंडाचा त्याग केला. सर्प निघून जाताच गोपाळांनी कृष्णाचा आदरसत्कार केला. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू आले. यमुना नदीचे पाणी विषरहित पाहून सर्वांनाच अतिशय आनंद झाला.

धेनुकवध व गिरियज्ञ

एकदा बलराम व कृष्ण गायी चारण्यासाठी वनात गेले होते.

फिरत फिरत ते एका रमणीय अशा ताडवनात आले. त्या वनात धेनुक नावाचा एक राक्षस गाढवाच्या रूपात राहून नेहमी माणसे व गायीगुरे मारून भोजन करीत असे. त्या ताडवनातील फळांची समृद्धी पाहून गोपबालक संतुष्ट होऊन म्हणाले, 'रामभैया, कृष्णा, या सर्व भागाचं रक्षण येथील धेनुकासुर करतो. म्हणून झाडांवर ही फळं टिकून राहिली आहेत. आपण ही फळं मिळवू या.' गोपबालकांची इच्छा पाहून राम व कृष्ण यांनी ती फळे पाडली. पडणाऱ्या फळांचा आवाज ऐकून गर्दभाकार दैत्य क्रोधाविष्ट होऊन धावून आला. त्याने आपल्या मागील पायांचे दोन तडाखे बलरामाच्या छातीवर दिले. बलरामानेही त्याचे दोन पाय धरून त्याला आकाशात घुमविण्यास सुरुवात केली. या फिरविण्यामुळे धेनुकासुराचा प्राण आकाशात उडून गेला. बलरामाने शेवटी त्याला एका ताडाच्या वृक्षावर टाकले. या प्रहारामुळे आणखी काही फळे जमिनीवर पडली. धेनुकासुर मरण पावताच आणखी काही दैत्य आले. श्रीकृष्ण व बलराम यांनी त्यांना मारून वृक्षांवर फेकून दिले. सर्व वनात मरण पावलेल्या दैत्यांचा व फळांचा सडा पडला. या वेळे-पासून ताडवनात गायी संकटाशिवाय सुखाने चरू लागल्या.

हे मनोहर ताडवन गोपगोपिकांना अत्यंत रमणीय वाटले. श्रीकृष्ण व बलराम सुखानें या वनात खेळू लागले. श्रीकृष्णाचे वस्त्र सोनेरी रंगाचे व बलरामाचे निळ्या रंगाचे होते. कधी ते झोपाळ्यांवर झोके घेत. कधी बालगोपालांबरोबर कुस्ती खेळत. असाच व्यायाम ते करीत असता प्रलंब नावाचा आणखी एक दैत्य त्यांना पकडून नेण्यासाठी तेथे आला. एका गोपबालकाचा वेष घेऊन तो त्यांच्यात मिसळला. श्रीकृष्ण तर अजिंक्य समजून त्याने बलरामाला मारण्याचा निश्चय केला. हरिणांच्या प्रमाणे क्रीडा करताना पराजित बालक विजयी वीरास आपल्या पाठी घेत असे. दामाच्या बरोबर श्रीकृष्ण, प्रलंबाच्या बरोबर बलराम हा खेळ खेळू लागले. बलरामाने प्रलंबाला पराजित केले. प्रलंबाच्या पाठीवर बलराम बसताच तो एकदम दूर निघून गेला. तो मध्ये कुठे थांबलाच नाही. बलरामाचे ओझे आवरेनासे झाले तेव्हा प्रलंबानें

एखाद्या मेघाप्रमाणे आपले शरीर वाढविले. बलरामाच्या ध्यानात आले की हा दैत्य रंगाने जळालेल्या पर्वताप्रमाणे आहे. त्याच्या गळचात एक मोठा हार आहे. त्याच्या मस्तकावर एक मुकुट आहे. त्याचे रूप भयंकर आहे, असे बलरामाच्या ध्यानात आले. हे सर्व ध्यानात येताच बलराम ओरडला, 'कृष्णा, इकडं पाहा. हा एक दैत्य गोपबालकाचं रूप धारण करून आपल्यांत शिरला होता, आता हा दुरात्मा मला पळवून नेतो आहे, कृष्णा, मी आता काय करावं ?'

बलरामाचा प्रश्न ऐकून कृष्णास हसू आले. तो म्हणाला,

'सर्वात्मन्, आपण असं कसं बोलता ? आपण तर सर्व गुह्यांतील गुह्य आहात. आपण आपल्या स्वरूपाचं स्मरण ठेवावं व या दुरात्मा दैत्यास मारून टाकावं.'

श्रीकृष्णाची अशी अनुज्ञा मिळताच बलरामाने प्रलंबासुरास दाबण्याचा प्रयत्न केला. क्रोधाने त्याने त्याच्या मस्तकावर एक बुक्का मारला. या प्रहारामुळे प्रलंबाचे दोन डोळे बाहेर आले. मस्तक फुटून गेले. दैत्याच्या मुखातून रक्त बाहेर पडून तो मरून जमिनीवर पडला. बलरामाच्या या कृत्यामुळे गोपबालकांना अतिशय आनंद झाला.

अशा नाना प्रकारच्या लीला बलराम व श्रीकृष्ण वनात करू लागले. असे करता करता पावसाळा संपला. शरदऋतूचे आगमन झाले. जलाशयांतील कमळे उमलली. आकाश व नक्षत्रे निर्मळ झाली. अशा समयास समस्त व्रजवासी प्रतिवर्षाप्रमाणे इंद्रोत्सव करण्यासाठी तत्पर झाले. श्रीकृष्णाने वृद्ध गोपांना कुतूहलाने विचारले,

'इंद्राचा उत्सव हे काय प्रकरण आहे ? कशासाठी हा उत्सव ?'

'बेटा, देवराज इंद्र हाच मेघाचा व जलाचा स्वामी. त्याच्या प्रेरणेनं वृष्टी होते. मग शेतात धान्य पिकतं. आपला निर्वाह होतो. दूध देणाऱ्या या गायींना चारा तयार होतो. म्हणून आपण सर्वांनी इंद्रदेवाचा उत्सव...'

'पिताजी, आपण कुठं शेती करतो ? व्यापार आपण कधी करतो ? आपल्या या गायी याच आपल्या देवता. आपण सर्व लोक तर

वनवासी आहोत. आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता व दंडनीती अशा चार प्रकारच्या विद्या आहेत. कृषी, वाणिज्य व पशुपालन या तीन वृत्तींचा संबंध वार्ताशी आहे. शेतकऱ्यांचा उद्योग कृषिकर्म. क्रयविक्रय करणे वैश्यांचा उद्योग. आणि आपला केवळ गोपालन. आता आपण कुणाचं पूजन करावं ? आपल्या या व्रजभूमीच्या सीमांचं आपण पूजन करू. सीमेच्या आतील वन, त्यातील पर्वत यांची पूजा आपण करावी. गिरियज्ञ व गोयज्ञ यांचा आरंभ व्हायला हवा. इंद्राचा उत्सव करून आपला लाभ काय ? गाय व गिरिराज हीच आपली दैवतं. मंत्रयुक्त यज्ञाचं महत्त्व ब्राह्मणास. आपण गिरिराज गोवर्धनाची पूजा करू. संपूर्ण व्रजभूमीतून आपण दूध आणू व ब्राह्मण आणि इतर लोक यांना उत्तम भोजन देऊ. नटून थटून गायी गिरिराजाची प्रदक्षिणा करतील.'

श्रीकृष्णाचे हे बोलणे ऐकून नंदादी व्रजवासी लोकांना अतिशय हर्ष झाला. त्यांनी मोठ्या थाटाने गिरियज्ञाची तयारी केली. दूध, दही यांचा नैवेद्य दाखविला. शेकडो, हजारो ब्राह्मणांना भोजन दिले. गायी व बैल यांची पूजा करण्यात आली. त्यांनी गिरिराजाची प्रदक्षिणा मोठ्या आनंदाने केली. श्रीकृष्ण स्वतः गिरीच्या शिखरावर बसून म्हणू लागला, 'मीच मूर्तिमान गिरिराज आहे.' गोपगोपींनी समर्पण केलेला भोग त्यांनी घेतला व त्याच वेळी आपल्या मानवी कृष्णरूपाने गिरिराजाचे पूजनही केले. मनोवांच्छित गिरियज्ञ पूर्ण करून गोपगोपी पुनः व्रजात आले.

इंद्रद्वारा अभिषेक व रासलीला

इंद्रयज्ञ झाला नाही म्हणून इंद्रास फारच राग आला. मेघांच्या संवर्तक नावाच्या गणाला इंद्र म्हणाला, 'मेघांनो, माझी एक आज्ञा आहे. खोटी बुद्धी धारण करणाऱ्या गोपांनी व्रजात माझा यज्ञ बंद केला. तेव्हा तुम्ही या गोकुळावर प्रचंड वृष्टी करावी आणि तेथील गायींना त्रास द्यावा. उंच ऐरावतावर बसून मीही तुमच्या साह्यासाठी येतो.'

इंद्रदेवाची अशी आज्ञा मिळताच गायींचा संहार करण्यासाठी

प्रचंड वादळ सुरू होऊन वृष्टी होत गेली. साऱ्या पृथ्वीवर पाणीच पाणी झाले. नद्या, नाले भरून गेले. संपूर्ण व्रजभूमी जलमय झाली. पाण्याच्या प्रवाहात गायी बुडून जाऊ लागल्या. आपल्या अंगाखाली आपली वासरे घेऊन काही गायी भयभीत झाल्या. त्यांची मान कापत होती. त्यांनी थरथरत्या अंगाने डोळे मिटून घेतले. गायी, गोप, गोपी भीषण वृष्टीमुळे त्रस्त झाल्याचे श्रीकृष्णानें पाहिले ! हा सारा प्रकार त्या इंद्राने केला असल्याचेही त्याने जाणले. हा संपूर्ण गोवर्धन पर्वत मोठमोठ्या दगडांचा बनलेला आहे. आपण त्याचेच एक छत्र तयार करून संपूर्ण गोकुळावर धरावे का ?

इतके मनात येताच कृष्णाने गोवर्धन पर्वत उचलून आपल्या हातावर तोलून धरला आणि तो म्हणाला,

'पाहा, मी वर्षावृष्टीच्या विरुद्ध उपाय शोधून काढला आहे. तुम्ही सर्वजण आता या पर्वताखाली या. आता कसलंही भय नाही. हा पर्वत कोसळण्याची भीती नाही. या सर्वजण याखाली.'

सर्व गोपगोपी, गायीवासरे आपल्या संपूर्ण संसारासह गोवर्धनाच्या आश्रयाखाली आले. सर्वांनाच या आश्रयाचा अतिशय आनंद झाला. प्रेमपूर्वक वृत्तीने त्यांनी श्रीकृष्णाची स्तुती केली. नंदाच्या व्रजभूमीवर लागोपाठ सात रात्री एकसारखा पाऊस पडत होता. इंद्राच्या आज्ञेने संपूर्ण गोकुळाचाच नाश होणार होता. परंतु श्रीकृष्णाने गोवर्धनाखाली सर्व गोपालांना आणून इंद्राची प्रतिज्ञा खोटी ठरविली. इंद्राने आकाशातील मेघ हटविले. वृष्टी थांबली. आकाश स्वच्छ झाले. सर्व व्रजवासी मोठ्या आनंदाने पुनः आपापल्या घरी गेले.

गोवर्धन पर्वताच्या आश्रयाने कृष्णाने गोकुळाचे रक्षण केले हे पाहून त्याच्या दर्शनाची इंद्रदेवास इच्छा झाली. तो स्वतः ऐरावतावर बसून व्रजभूमीवर आला. देवराजाने गोवर्धनाजवळच श्रीकृष्णाचे दर्शन घेतले. गोपवेषात कृष्ण तेथे गायी चारण्यासाठी घेऊन आला होता. इतर गोपबालकांनी त्याला घेरले होते. वरून पक्षिश्रेष्ठ गरुडाने आपल्या पंखांची सावली श्रीकृष्णावर धरलेली होती. हे मनोहर दृश्य पाहून इंद्र ऐरावतावरून खाली उतरला व नम्रतेने म्हणाला,

'महाबाहू श्रीकृष्णा, मी आज इथं कोणत्या हेतूनं आलो आहे ते नीट समजावून घ्यावं. परमेश्वरा, संपूर्ण जगताचा आधार आपणच आहात. माझा यज्ञ बंद पडल्यामुळं क्रोधवश होऊन मी गोकुळाचा नाश करायला प्रवृत्त झालो. पण आपण या महापर्वताच्या आश्रयानं संपूर्ण व्रजाचं रक्षण केलं. वीरवर, आपल्या या अद्‌भुत कार्यामुळं मला फार संतोष झाला आहे. कृष्णा, आपण या गोवंशाचं चांगलं रक्षण केलं. आता मी या गायींच्या प्रेरणेनंच इथं आलो आहे. या ठिकाणी मी आपणांस अभिषेक करणार आहे. आजपासून आपणांस या गायींचे संरक्षक या नात्याने गोविंद हे नाव प्राप्त होईल.'

इतके म्हणून इंद्राने श्रीकृष्णाच्या मस्तकावर अभिषेक केला. हे अपूर्व दृश्य पाहून संतुष्ट गायींनी आपल्या स्तनांतून दुधाच्या धारा सोडून सारी पृथ्वी भिजवून काढली. अभिषेक पूर्ण झाल्यानंतर शचिपती इंद्र कृष्णास म्हणाला,

'महाभाग, मी हे सर्व गायींच्या आदेशानुसार केलं. आता आपण पृथ्वीवरील भार उतरवावा. माझ्या अंशापासून एक श्रेष्ठ पुरुष पृथ्वीवर अवतीर्ण झाला आहे. त्याचं नाव अर्जुन. आपण त्याचं रक्षण नेहमी करावं. मधुसूदना, हा अर्जुन एक श्रेष्ठ वीरपुरुष आहे. या भूमीचा भार उतरविण्यासाठी त्याची आपणांस फार मदत होईल.'

'देवराज, आपल्या अंशापासून भरतवंशात अर्जुनाचा जन्म झाला हे मला माहीत आहे. मी या भूमितलावर आहे तोपर्यंत अर्जुनाचं रक्षण करीन. मी असताना अर्जुनाचा युद्धात पराजय कुणीच करू शकणार नाही. महाबाहू कंस, अरिष्टासुर, केशी, कुवलयपीड, नरकासुर इत्यादी दैत्यांच्या वधानंतर महाभारत युद्ध होईल. यानंतरच या पृथ्वीचा भार हलका होईल. आता आपण जावं. पुत्राची चिंता करू नये. माझ्यासमोर कोणताही शत्रू अर्जुनास त्रास देणार नाही.'

देवराज इंद्रास हे ऐकून अत्यंत हर्ष झाला. श्रीकृष्णाला छातीशी लावून तो ऐरावतावर बसून पुनः स्वर्गलोकास गेला. श्रीकृष्णाचे पराक्रम पाहून गोकुळवासी लोक अतिशय संतुष्ट झाले. ते म्हणाले,

'महाभाग, आपण तर गोवर्धन पर्वत उचलून आमचं व आमच्या

गायींचं रक्षण केलंत. ही अनुपम बाललीला आपण समाजात नीच समजल्या गेलेल्या गवळ्यांच्या घरी राहून कशासाठी केलीत ? जलात प्रवेश करून आपण कालियाचं दमन केलंत, प्रलंबाला मारलंत, गोवर्धन-पर्वत हातावर उचलून धरलात. श्रीकृष्ण, आपण केवळ मनुष्य आहात यावर आमचा विश्वास बसणार नाही. आपण आहात तरी कोण ? देव, दानव, यक्ष की गंधर्व ? या बाबीचा विचार करण्यात तरी आता कसला फायदा ? आपण कुणीही असलात तरी आमचे बांधव आहात. म्हणून आपणांस नमस्कार असो. समस्त व्रजवासी स्त्री-पुरुष आपणांवर मनापासून प्रेम करतात. '

'गोपगण, आपला संबंध असण्यांत लज्जेची गोष्ट कसली ? तुमचं सर्वांचं प्रेम माझ्यावर आहे. तर मला आपल्या बांधवाप्रमाणेच समजावं. मी देव नाही की गंधर्व नाही. यक्ष नाही की दानव नाही. मी तर तुम्हा सर्वांचा बंधू आहे. याशिवाय दुसरा कोणता विचारच आपण मनात आणू नये. '

त्यानंतर एके दिवशी रात्री श्रीकृष्णाने पाहिले, आकाश स्वच्छ आहे. शरच्चंद्राचे मनोरम चांदणे सर्वत्र पसरले आहे. कुमुदिनींचा विकास झाला असून त्यांचा सुगंध दशदिशांत भरून राहिला आहे. वनात सर्वत्र फुलांवरून भुंगे गुंजारव करीत आहेत. वनसृष्टी अतिशय रमणीय बनली आहे. अशा या रम्य वेळी निसर्गशोभेच्या सान्निध्यात आपण रासक्रीडा करावी असा विचार श्रीकृष्णाच्या मनात आला. त्याने अत्यंत मधुर स्वरात संगीताची एक तान छेडली. गीताची मधुर लकेर ऐकताच गोपींनी घर सोडून उतावळेपणाने वनाकडे धाव घेतली. येथे मधुसूदन मुरली वाजवीत होता. तेथे पोचताच अनेक गोपींनी त्याच्या स्वरात आपले स्वर मिळवून धीरे धीरे गायन सुरू केले. कुणी-तरी मनातल्या मनात भगवंताचे स्मरण चालू केले. कुणी ' कृष्ण कृष्ण ' म्हणून मनात लाजल्या. कुणी प्रेमांध बनून लज्जेस तिलांजली देऊन कृष्णास खेटून उभ्या राहिल्या. कुणी गोपी थोर लोकांच्या भीतीमुळे घरातच डोळे बंद करून तन्मय होऊन श्रीकृष्णाचे ध्यान करू लागल्या. गोपींच्या मध्ये उभा राहून श्रीकृष्ण रासक्रीडेचा आनंद उपभोगण्यास

उत्सुक बनला. शरदऋतूच्या रमणीय चांदण्यात त्याने मोठ्या गौरवानें रासक्रीडेस प्रारंभ केला.

मध्येच श्रीकृष्ण एकाएकी गुप्त झाला. गोपींचे शरीर त्याच्या क्रीडेच्या अधीन होते. त्याचा शोध घेण्यासाठी त्या झुंडीने वृंदावनात भटकू लागल्या. त्यांच्या मनात श्रीकृष्णाच्या केवळ दर्शनाचीच लालसा होती. कृष्णाची चरणचिन्हे पाहून गोपी त्याचा शोध घेत होत्या. त्याच्या विविध लीलांच्या अनुकरणात काहीजणी मग्न झाल्या. पुष्कळ शोध करूनही श्रीकृष्ण मिळाला नाही तेव्हा त्याच्या दर्शनाबद्दल त्या निराश झाल्या. सर्वजणी यमुनेच्या तटावर येऊन त्याच्या मनोहर चरित्राचे गायन करू लागल्या.

इतक्यात श्रीकृष्ण येत आहे असे त्यांनी पाहिले. त्याचे मुखकमळ उजळले होते. गोपींना त्याच्याकडे पाहून अतिशय आनंद झाला. कृष्ण कृष्ण असा एकसारखा त्या जप करू लागल्या. त्याच्या सौंदर्याचे पान अनेक गोपींनी आपल्या नेत्रांनी केले. त्याचे रूप हृदयात साठवून अनेक गोपींनी आपले डोळे बंद करून घेतले व त्याचे ध्यान करू लागल्या.

प्रसन्न वृत्तीने कृष्णाने एक रासमंडल बनविले. समस्त गोपींच्यासह त्याने सुखद अशी रासक्रीडा केली. प्रत्येक गोपीला कृष्ण आपल्याबरोबर हवा होता. म्हणून कृष्णाने प्रत्येक गोपीचा हात पकडून रासमंडळाची रचना केली. त्याच्या हाताचा स्पर्श होताच प्रत्येक गोपीचे डोळे आनंदाने भरून आले. चंचल बांगड्यांच्या झणकाराच्या बरोबरच शरदऋतूची शोभा वाढविणारी गीते गायिली गेली. गोपी वारंवार श्रीकृष्णाच्या नामाचा उच्चार करीत राहिल्या. 'धन्य कृष्ण, धन्य कृष्ण' असा जप मोठ्याने होत गेला. त्याच्या अनुलोम—प्रतिलोम गतींना त्या साथ देत राहिल्या.

अशाच एका रात्री जेव्हा श्रीकृष्ण रासलीलेत मग्न होता तेव्हा अरिष्टासुर नावाचा एक उन्मत्त दानव तेथे माजलेल्या बैलाच्या वेषात व रूपात आला. त्याचा वर्ण काळा होता. शिंगे तीक्ष्ण होती. डोळे सूर्याप्रमाणे प्रखर होते. आपल्या खुरांच्या अग्रभागाने तो जमिनीस विदीर्ण करीत होता. वारंवार जीभ बाहेर काढून तो स्वतःचे ओठ

चाटत होता. क्रोधानें भरलेल्या त्या वृषभाने आपले पुच्छ मागाहून वर उचलले होते. त्याची गर्दन चांगली लांब व मुख विशाल होते. वृक्षांशी त्याने अनेकदा टकरा घेतलेल्या असल्याने त्याच्या मस्तकावर त्याची चिन्हे उमटली होती. एखाद्या मस्तवाल बैलाप्रमाणे माजलेला हा दैत्य गर्भवती गायींचा गर्भपात करायचा. सर्वांना मारीत मारीत हा वनात घुमायचा. त्याचे डोळे भयंकर होते. ते पाहताच सर्व गोपगोपी भीतीने व्याकुळ बनून 'कृष्ण कृष्ण' असा पुकार करीत. त्यांची अशी भीतियुक्त हाक ऐकताच कृष्णाने दंड थोपटून सिंहाप्रमाणे गर्जना केली. ती ऐकताच तो दुरात्मा वृषभासुर एकदम कृष्णाच्या अंगावर धावला. मधुसूदनाने झटकन त्याची दोनही शिंगे पकडली व त्याच्यावर प्रहार केला. शिंगे पकडली असल्यामुळे तो दानव हलू शकला नाही. त्याचा अहंकार बलासह नष्ट झाला होता. कृष्णाने त्या वृषभाची मान पिरगाळली व त्याचेच एक शिंग उपटून त्याने प्रहार केला. तेव्हा मुखातून रक्ताचा पाट वाहत असताना तो वृषभासुर मरण पावला. गोपांनी कृष्णाची मुक्तकंठाने स्तुती केली.

केशी दैत्याचा वध

श्रीकृष्णाचे बालवयातील हे पराक्रम नारदांनी कंसाला जाऊन सांगितले. कंसाला अतिशय क्रोध आला. त्याने आपल्या सभेत सर्व यादवांची व गोपांची निर्भर्त्सना केली. बलराम व कृष्ण अजून बालक आहेत. ते आणखी बलवान होण्याआधीच त्यांचा वध करायला हवा असे कंसाच्या मनात आले. तो आणखी वयाने मोठा होईल तर आपले काही चालणार नाही. आपल्या दरबारात महापराक्रमी चाणूर व बलवान मुष्टिक असे दोन पैलवान आहेत. त्यांच्या बरोबर त्या दोन बंधूंना मल्लयुद्ध करायला लावून त्यांना मारून टाकता येईल. धनुष्ययज्ञाचे निमित्त करून आपण त्या दोघा बंधूंना येथे बोलावू व त्यांचा नाश करू असा विचार कंसाने केला.

कंसराजाने वीरवर अक्रूरास बोलाविले. तो त्याला म्हणाला,

' दानपते, तू माझी एक गोष्ट ऐक. रथावर बसून तू नंदाच्या गावी जा. तिथं वसुदेवाचे दोन पुत्र आहेत. विष्णूच्या अंशापासून जन्मास आलेले हे दोन बंधू माझा नाश करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्या दुष्टांचं तेज वाढणारं आहे. येत्या चतुर्दशीला धनुष्ययज्ञाचा उत्सव आहे. त्यात कुस्ती खेळण्यासाठी त्या दोन मुलांना बोलवावं. माझे दोन पहिलवान सेवक चाणूर व मुष्टिक यांना डावपेच चांगले माहीत आहेत. त्यांच्याबरोबर नंदगावच्या त्या दोन कुमारांची कुस्ती होईल. वसुदेवाचे हे दोनही पुत्र अजून लहान आहेत. द्वारातून येताच माझा एक हत्ती कुवलयपीड त्यांना मारून टाकील. त्यांच्या मरणानंतर मी दुष्ट बुद्धीचे वसुदेव, नंद, उग्रसेन इत्यादींना मारून टाकीन. त्यानंतर मी गोकुळातील सर्व गोधन व वैभव लुटून आणीन. दानपते, तुझ्याशिवाय हे सर्व यादव दुष्ट असून क्रमशः त्यांचा वध करण्याचाच मी प्रयत्न करीन. यादवांच्या रहित असं हे समस्त अकंटक राज्य मी एकटाच भोगीन. वीरा, तू माझ्यासाठी गोकुळात जा. गोपांनाही इथं दूध, दही घेऊन येण्यास सांग. '

अक्रूर फार थोर भक्त होते. कंसाची ही आज्ञा ऐकून त्यांना प्रसन्न वाटले. या निमित्ताने का होईना पण कृष्णाचे दर्शन होईल, या विचाराने त्यांच्या मनास आनंद झाला. त्वरित रथावर स्वार होऊन ते मथुरेहून नंदाच्या गावी येण्यास निघाले. कंसाचा आणखी एक दूत महाबली केशी वृंदावनात आधीच आला होता. श्रीकृष्णाचा वध करावा असा एक हेतू त्याच्या मनात होता. त्याने घोड्याचे रूप धारण केले होते. तो आपल्या टापांनी पृथ्वीला खोदीत राही व आयाळीच्या केसांनी आकाशातील ढग उडवायचा. वृंदावनात येताच त्याने मोठी खिंकाळी मारून सर्व गोपगोपींना भीती दाखविली. ते सर्व भिऊन श्रीकृष्णाच्या सन्निध आले. कृष्ण त्यांना म्हणाला,

' गोपालांनो, या केशीला इतकं भिण्याचं काय कारण ? आपण तर गोपजातीचे आहोत. असं भिऊन आपला वीरोचित पराक्रम विसरावा काय ? अहो, या दैत्यात शक्ती ती अशी किती असणार ? तो काय करील आपलं ? तो तर जोरजोरानं खिंकाळून केवळ भीती माजवतोय.'

त्या दैत्याला उद्देशूनही श्रीकृष्ण म्हणाला,

‘ अरे दुष्टा, इकडं ये पाहू. मी कृष्ण आहे. जसे पिनाकधारी वीरभद्रानं पूषाचे दात तोडले तसे मी तुझे सारे दात आताच पाडून टाकतो. ’

इतके म्हणून श्रीकृष्ण केशीच्या समोर आला. तो दैत्यही जोराने धावत पुढेच आला. कृष्णाने आपला हात पुढे करून केशीच्या मुखात घातला. त्याच्या मुखातील सारे दात कृष्णाने उपटून टाकले. त्या केशीचा जबडा फाटून गेला. त्यातून रक्त वाहायला लागले. नसा तुटून गेल्या. लीद व मूत्र टाकून तो अश्वरूपी दैत्य जमिनीवर पडून पाय झाडू लागला. त्याच्या शरीरास घाम आला होता. थोड्या वेळात त्याची हालचाल थांबली. एखादी वीज पडून जसे झाडाचे दोन तुकडे होतात तसेच कृष्णाच्या भुजदंडाने त्या अश्वाचे दोन तुकडे होऊन तो मरून पडला. श्रीकृष्ण हसत उभा होता. त्याचा हा पराक्रम पाहून सारे गोप हर्षित झाले. सर्वांनी कृष्णाची मनापासून स्तुती केली. मेघांत लपून राहिलेल्या नारदांनाही केशीच्या वधामुळे फार आनंद झाला. ते म्हणाले,

‘ जगन्नाथा, आपणांस धन्यवाद देतो. आपण सहज खेळताना या केशीस मारून टाकले. हा देवांना भारी क्लेश द्यायचा. मधुसूदना, आपल्या या अचाट सामर्थ्यानं माझ्या चित्तास फारच संतोष झाला आहे. या अश्वरूपी दैत्याच्या भयानं देवराज इंद्र व संपूर्ण देवदेवता भीतीनं कंपित होत असत. जनार्दना, तुम्ही या केशीचा वध केल्यामुळं लोक तुम्हांस ‘ केशव ’ या नावानं हाक मारतील. रणधीरा, उग्रसेन-कुमार कंस जेव्हा आपल्या हातून मारला जाईल तेव्हा पृथ्वीवरचा हा भार कमी होईल. गोविंद, आपण देवांच्यासाठी फारच मोठं काम केलं म्हणून आपल्याबद्दल मला मोठा आदर वाटतो.’

श्रीरामकृष्णांची मथुरायात्रा

शीघ्र गतीने चालणाऱ्या रथावर अक्रूर आरूढ झाले व

श्रीकृष्णाच्या दर्शनाच्या ओढीनें नंदगावाच्या दिशेने निघाले. त्यांच्या मनात एकसारखे येत राहिले, आता आपण भगवान विष्णूचं दर्शन घेणार ! ज्याच्या स्मरणानं व ध्यानानं मनुष्याचं सारं पाप धुतलं जातं ते कृष्णाचं सुंदर मुख आपण आज पाहाणार. संपूर्ण वेद व वेदांगं ज्यामधून प्रकट झाली त्या मुखाचं दर्शन आज आपण घेणार. ब्रह्मदेव, इंद्र, रुद्र, अश्विनीकुमार, वसू, आदित्य इत्यादी ज्याचं रूप जाणीत नाहीत त्या श्रीहरीची व आपली भेट होणार ! तो सर्वात्मा, सर्वव्यापी, सर्वस्वरूप, सर्व भूतांत स्थिर असलेला सर्वव्यापी परमात्मा आज आपल्या डोळ्यांचा अतिथी होणार? आपल्या योगशक्तीनं ज्यानं मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह असे अवतार धारण केले ते भगवान श्रीकृष्ण आज आपणांशी बोलणार ! तो भगवान श्रीकृष्ण ' अक्रूरजी ' म्हणून आपणांला हाक मारणार ! ज्याचं स्मरण मनुष्यास पूर्ण कल्याणमयी होतं त्या पुरुष-श्रेष्ठ श्रीहरीला मी आज शरण जाणार !

अक्रूराचे हृदय भक्तीनें परिपूर्ण झाले. अक्रूर नंदगावात पोचले. गायींची धार काढण्याच्या जागीच त्यांना कृष्णाचे दर्शन झाले. श्रीकृष्ण गायींच्या वासरांत उभे होते. त्यांचे अंग नीलकमलाप्रमाणे शोभायमान होते. खुलू पाहणाऱ्या कमलाप्रमाणे त्यांचे नेत्र होते. त्यांच्या छातीवर श्रीवत्साचे चिन्ह होते. सरळ नाक व विलासयुक्त हसू यांनी शोभणारी त्याची मूर्ती अक्रूरास विलोभनीय वाटली. त्याची नखे लाल लाल होती. शरीरावर पीतांबर होता. गळ्यात वनपुष्पांचे हार होते. हातात एक स्निग्ध अशी निळी लता होती, कानांत श्वेत कमलपुष्पांची आभूषणे होती. यदुनंदन बलभद्र हंस, चंद्रमा व कुंदाप्रमाणे गौरवर्णाचा वाटला. त्याच्या शरीरावर निळ्या रंगाचे वस्त्र शोभत होते. या दोनही बंधूंना पाहून अक्रूराचे मुख प्रसन्नतेने फुलून निघाले. त्यांच्या संपूर्ण शरीरावर रोमांच आले.

अशाच अवस्थेत अक्रूरजी भगवान श्रीकृष्णांपाशी आले व ' मी यदुवंशी अक्रूर आहे ' म्हणून त्यांच्या चरणांवर पडले. श्रीकृष्णांनी ध्वजा, वज्र, कमळ इत्यादी चिन्हांनी सुशोभित अशा आपल्या हाताने त्यांना स्पर्श केला व त्यांना जवळ ओढून प्रेमपूर्वक आलिंगन दिले.

बलराम व श्रीकृष्ण यांनी त्यांच्याशी बोलून त्यांना ते आपल्या भवनात घेऊन गेले. सर्व समाचार ऐकून भगवान श्रीकृष्ण म्हणाले, ' हे सर्व मला माहीत आहे. जे उचित असेल ते मी जरूर करीन. इतर विचार सोडून द्या. कंस आता मरण पावला असंच समजा. मी बलरामासहित उद्या आपणांबरोबर मथुरेस येतो. वडील गोपही काही भेटसामग्री घेऊन बरोबर येतील. आपण कसलीच चिंता करू नये. आरामात एक रात्र आपण विश्रांती घ्यावी. आजपासून तीन रात्रींच्या आतच मी कंसास त्याच्या अनुचरांसहित मारून टाकीन. '

गोपांना मथुरेला निघण्याचा आदेश देऊन अक्रूर, कृष्ण व बलराम नंदाच्या घरात झोपले. सकाळ होताच सर्वांनी मथुरेस जाण्याची तयारी केली. अक्रूराच्या बरोबर बलराम व कृष्ण जाण्यासाठी निघताच गोपींच्या डोळयांत अश्रू जमा झाले. चिंतेनें त्या बेचैन झाल्या. एक दुसरीला म्हणत गेली,

' सखी, गोविंद मथुरेला निघाला. परत तो या गोकुळात येईल ना ? तो तेथे मोठ्या नगरात स्त्रियांचे मधुर वार्तालाप ऐकील. त्यांच्या विलासमय नयनांत तो आसक्त होईल. मग गावाकडील गोपींची त्याला आठवण कुठून राहाणार ? श्रीहरी तर आपल्या या व्रजाचा संपूर्ण प्राण. हा दुरात्मा त्याला मथुरेस नेऊन व्रजावर मोठाच प्रहार करीत आहे. मथुरानगरीच्या युवती त्याच्याशी भावपूर्ण शब्दांत गोष्टी करतील. त्यांच्या वागण्यात लालित्य आहे. त्यांच्या नेत्रकटाक्षांत एक प्रकारची जादू आहे. मग तो परत आपणांत कशासाठी येईल ? पाहा ना. तो गोविंद रथावर बसून मथुरेस निघाला. हा अक्रूर आमच्या गोविंदास कशासाठी मथुरेस नेत आहे ? कृष्ण आज एवढा निष्ठुर का बनला आहे ? पाहा ना. बलरामासह तो आता रथात बसलासुद्धा. अग, त्याला कुणी तरी रोखून धरा ग. काय म्हणतेस ? गुरुजनांपुढं आपणांस बोलता येत नाही ? पण आपण तर आता या विरहाच्या आगीत जळून मरत आहोत. काय ? हे नंदबाबाही मथुरेस निघाले ? या श्रीकृष्णाला रोखून धरणारे कुणीच नाहीत ?

' आज मथुरेचे लोक धन्य होतील. श्रीकृष्णाच्या मुखारविंदाचा

मकरंद आज ते आस्वादतील. आज तेथील स्त्रिया या कृष्णाच्या रूपाचं दर्शन घेतील. अरे, या विधात्याला थोडीसुद्धा दयामाया नाही ? श्रीकृष्णाचा अनुराग जसजसा शिथिल होतो आहे तसतशी आमच्या हातांतील कंकणं ढिली होत जाताहेत. या अक्रूराचं हृदय पाहा किती क्रूर हो ! तो पाहा, घोड्यांना कसा जलदीनं हाकतो आहे. पाहा ना. श्रीकृष्णाच्या रथाची धूळ किती उंच उडाली आहे. हाय, आता ती धूळही दिसत नाही. आता तो भगवान श्रीकृष्ण खूपच दूर गेला. '

गोपींच्या या कल्पनेतील श्रीकृष्ण खरोखरीच गोकुळापासून खूप दूर गेला. रथाचे घोडे फारच चपळ व तेजस्वी होते. दोन प्रहरीच ती सर्व मंडळी मथुरेच्या यमुनातटावर येऊन पोचली. अक्रूर दोघा भावांना म्हणाले, ' आपण दोघेजण इथंच रथावर बसा. मी यमुनेतील जलात नेहमीप्रमाणं स्नान करतो, पूजन करतो. ' अक्रूर यमुनेत उतरून स्नान करू लागले. त्यांनी आचमन केले. त्यांना यमुनेच्या पाण्यात सहस्र फणांनी युक्त असे बलराम दिसू लागले. त्यांचे शरीर कुंदाप्रमाणे गौर-वर्णाचे व डोळे कमलाप्रमाणे विशाल होते. वासुकी व रंभ आदी मोठ-मोठ्या नागांनी त्यांना घेरले होते. त्यांच्या गळ्यात सुगंधी अशी पुष्प-माला होती. सजल मेघाप्रमाणे सावळे कृष्णही अक्रूरांना तेथे दिसले. त्यांचे नेत्र विशाल व किंचित लालिमायुक्त होते. चतुर्भुज, सुंदर व चक्रादी आयुधांसह कृष्ण त्यांना प्रतीत झाले. दोघांनी पीतांबर नेसला होता. चित्र-विचित्र हार दोघांच्या गळ्यांत होते. कानांत कमलपुष्पे होती. या दोघा बंधूंना पाहून अक्रूरांना नवल वाटले.

स्नान वगैरे आटोपून ते रथात येतात तो त्यांना तेथेही बलराम व कृष्ण दिसले. ते परत नदीकडे आले. त्यांनी पाण्यात डुबी दिली. त्यांना तेथे श्रीकृष्ण दिसले. गंधर्व, मुनी, सिद्ध, मोठमोठे नाग श्रीकृष्ण व बलरामांची स्तुती करीत होते. दानपती अक्रूरास या सर्व प्रकारचे वास्तविक रहस्य उमगले. ते पूर्ण विज्ञानमय भगवान अच्युताची स्तुती करताना म्हणाले, ' परमात्म्या, तुला वारंवार नमस्कार असो. तुझा महिमा अचिंत्य आहे. न् तू सर्वव्यापक आहेस. तू कारणरूपाने एक, पण कार्यरूपानं अनंत आहेस. परमेश्वरा, तू वैदिक मंत्रांच्या शब्दरूपानं

आहेस. तूच हवि:स्वरूप आहेस. प्रभो, तूच प्रकृतीच्या पलीकडचा विज्ञानस्वरूप आहेस. तुला वारंवार नमस्कार असो. श्रीहरी, आपणच भूतात्मा, इंद्रियात्मा, प्रधानात्मा, जीवात्मा व परमात्मा आहात. सर्व धर्मात्मन् महेश्वरा, आपण क्षर व अक्षर आहात. माझ्यावर आपण प्रसन्न व्हावं. ब्रह्मा, विष्णू, शिव इत्यादी नावांनी आपलं वर्णन केलं जातं. भगवन्, आपलं स्वरूप, प्रयोजन, नाम आदी सर्व अनिर्वचनीय आहे ! आपणांस माझे नमस्कार असोत. कृष्ण, अच्युत, अनंत, विष्णू आदी नावांनी आपली स्तुती होते. सर्वात्मन्, आपण अजन्मा आहात. आपण विकार व भेद यांच्या रहित असून संपूर्ण विश्वात आपणांशिवाय दुसरी वस्तूच नाही. आपणच या विश्वाची सृष्टी करता व आपणच प्रलयकालीन सूर्य बनून या संपूर्ण जगाचा संहार करता. भगवान वासुदेवा, आपणांस नमस्कार असो.'

अशी प्रार्थना करून अक्रूराने श्रीकृष्णाची धूप, पुष्पे यांनी पूजा केली. सर्व विषय दूर करून मनात त्यांचे दीर्घकाळ पर्यंत ध्यान केले. यमुना नदीतून बाहेर येऊन ते रथापाशी आले. त्यांना पाहताच श्रीकृष्णांनी विचारले,

'अक्रूरजी, आपण आज यमुनेच्या पाण्यात कोणती अद्‌भुत गोष्ट पाहिली ?'

'भगवन्, मी आज जे जलात पाहिलं तेच आता माझ्यासमोर मूर्तिमंत बनून बसलं आहे. मधुसूदना, आता याविषयी अधिक काय बोलावं ?'

इतके बोलून अक्रूरांनी रथाच्या घोड्यांना इशारा दिला. संध्याकाळच्या सुमारास ते मथुरेत पोचले. अक्रूरांनी राम-कृष्णांना काही सूचना दिल्या व ते स्वत: निघून गेले. राम व श्रीकृष्ण मथुरेच्या राजमार्गावर उभे होते. नगरातील सर्व स्त्री-पुरुष त्यांच्याकडे आनंदभरित नेत्रांनी पाहू लागले. मार्गात चालताना त्यांनी एका रजकाचा अभिमान उतरविला. येता येता ते एका माळ्याच्या घरापाशी आले. त्यांना पाहताच माळ्याचे डोळे आनंदाने भरून आले. माळ्याने त्यांना साष्टांग नमस्कार केला. त्यांना फुलांची भेट मोठ्या श्रद्धेने दिली. मनो-

हर निर्मल व सुगंधी फुले पाहून श्रीकृष्ण संतुष्ट झाले. ते त्या माळ्यास म्हणाले, ' भद्र, माझ्या अधीन राहणारी लक्ष्मी तुझा त्याग कधीच करणार नाही. तुझं बल, तुझं धन सतत वाढत राहील. '

कंसाचा वध

त्यानंतर श्रीकृष्णांनी राजमार्गावर एक कुब्जा स्त्री पाहिली. तिच्या हातात अंगरागाने भरलेले एक पात्र होते. तिला पाहून कृष्णाने विचारले,

' कमललोचने, तू हा अंगराग कुणासाठी घेऊन निघाली आहेस ? खरं सांग ना. '

श्रीहरीवर अनुरक्त होऊन ती म्हणाली,

' प्रिय, आपण जाणीत नाही का ? कंसानं मला अंगराग लावण्याचं काम दिलं आहे. मी अनेकवक्रा या नावानं विख्यात आहे. माझ्याशिवाय कुणा दुसरीनं चंदन घासलं तर कंसाला पसंत नाही पडत. '

' सुमुखी, हे सुंदर सुगंधयुक्त अनुलेपन राजासाठीच योग्य. आमच्या शरीरास योग्य असलं तर एखादं अनुलेपन दे ना. '

' हेच घ्या ना. ' कुब्जेनें आदरपूर्वक म्हटले. तिने त्या दोघांच्या शरीरांना त्या चंदनाचा लेप दिला. त्यांच्या कपोलांवर पत्रवेलीरचनापूर्वक तिने अंगराग लाविला. यामुळे ते दोन पुरुष इंद्रधनुष्याप्रमाणे शोभू लागले. श्रीकृष्णाने प्रसन्न होऊन त्या कुब्जेचा वाकडेपणा दूर केला. तेव्हा ती सर्व युवतींत एक श्रेष्ठ सुंदरी बनली व प्रेमाने बोलू लागली,

' प्यारे, आज आपण माझ्या घरी यावं. '

' अच्छा, तुझ्या घरी येऊ आम्ही. '

असे म्हणून कृष्णाने कुब्जेस घरी पाठवून दिले व तो बलरामाकडे पाहून जोराने हसला. त्यानंतर ते दोन बंधू धनुषशालेत गेले. त्यांनी एक धनुष्य बलपूर्वक उचलून पाहिले तो त्याचा एक मोठा

आवाज झाला. साऱ्या मथुरेत तो आवाज घुमून राहिला. धनुष्य तुटलेले पाहताच रक्षकांनी त्या दोघांवर आक्रमण केले. तेव्हा त्या रक्षकसेनेचा पराभव करून ते दोघे धनुषशालेच्या बाहेर पडले. राम व कृष्ण हे मथुरेस आल्याची खूण कंसास आपोआप मिळाली. तो चाणूर व मुष्टिक यांना म्हणाला,

'दोन गोपपुत्र या नगरीत आलेले दिसतात. माझ्यासमोर तुम्ही त्यांच्याशी मल्लयुद्ध खेळा. ते दोघं माझे प्राण घेणारे असल्यानं तुम्ही त्या दोघांना मारावं.'

कंसाने हत्तीच्या माहुतालाही बोलावून घेतले. कुवलयपीड हत्तीला तयार करण्यासाठी त्याने माहुताला सांगितले. सर्व तयारी झाली. दुसऱ्या दिवशी सकाळीच मंचाजवळ नागरिकांनी गर्दी केली. स्वत: कंस व अनेक राजे आपापल्या जागी विराजमान झाले. अक्रूर, वसुदेव, देवकी इत्यादी मंचाशेजारी उभे राहिले. एकदा पुत्राचे दर्शन घ्यावे असे देवकीच्या मनात आले. रंगभूमीवर वाद्ये वाजत होती. त्यांच्या तालावर चाणूर व मुष्टिक मंचावर आले. राम व कृष्ण रंगभूमीच्या द्वारावर आले. कुवलयपीड नावाच्या हत्तीस मारून ते मंचाकडे गेले. हत्तीचा मद व त्याचे रक्त यांनी त्यांचे अंग माखले होते. मृगांच्या समुदायात दोन सिंह प्रवेश करीत आहेत असेच प्रेक्षकांना वाटले. एकदम सर्वत्र कोलाहल माजला. 'तो पाहा कृष्ण, तो बलराम' अशी त्यांच्या पराक्रमासह चर्चा प्रेक्षकांनी केली. देवकीच्या डोळ्यांतून पाणी व स्तनांतून दूध ठिबकू लागले. राणीवशातील स्त्रिया एकटक कृष्णाकडेच पाहत होत्या. त्या नगरातील स्त्रिया आपापसांत म्हणू लागल्या,

'सखी, श्रीकृष्णाचं मुख पाहा ना कसं कमलासारखं सुंदर आहे. कुवलयपीडाशी युद्ध झाल्यामुळं त्याच्या मुखावर घामाचे बिंदू टिपकत आहेत. जणू त्याच्या मुखकमलावर दवबिंदू चमकत आहेत. भामिनी, या बालकाच्या वक्षस्थलावरील वत्सचिन्ह पाहिलंस ? याच्या दोन भुजा शत्रूचा दर्प उतरविण्यास समर्थ आहेत. अग सखे, ते पाहिलेस ? चाणूर व मुष्टिक नाचताना पाहून बलरामाच्या मुखावर हास्य उमटलं ! पाहिलंस ? श्रीकृष्ण तर चाणूराशी युद्ध खेळण्यास उत्सुक झाला आहे.

अरे, या सभेत कुणी न्याय करणारा नाही ? कुठं हे नुकतेच युवावस्थेत प्रवेश केलेले बालक अन् कुठं वज्राप्रमाणं कठोर, विशालकाय महान असुर. या बालकाचं अंग कसं अजून कोमल आहे. चाणूर व मुष्टिक कसे मल्ल दिसतात.'

इतक्यात श्रीकृष्णाने आपल्या पायाच्या आघाताने सारी पृथ्वी दणाणून सोडली. सर्व लोकांच्या मनात हर्षाच्या भावना निर्माण झाल्या. बलभद्राचीही युद्धाच्या दिशेने तयारी झाली. श्रीकृष्ण व चाणूर मल्ल यांची कुस्ती सुरू झाली. मल्लविद्येतील कुशल मुष्टिक बलरामाशी लढू लागला. दोघे वीर आपल्या शत्रूंशी झटापट करीत होते. डावपेच लढवीत होते. आपले बल आपल्या प्राणशक्तीने प्रकट करीत होते. श्रीकृष्णाशी लढताना चाणूराची शक्ती हळूहळू कमी होत गेली. श्रीकृष्णाचे बल वाढत आहे असे पाहून कंसाने कुस्ती बंद करण्याचा निर्णय दिला. पण जमलेल्या लोकांनी व आकाशस्थ देवांनी हर्षभरित होऊन 'केशवा, या चाणूराला मारून टाक.' असे सांगितले.

कृष्णाने लक्ष देऊन पुन: लढण्यास सुरुवात केली. त्याने दैत्याचा एक पाय धरून त्याला आकाशात घुमविले आणि पृथ्वीवर आपटले. चाणूराचे अनेक तुकडे झाले. रक्ताचा चिखल झाला. बलरामानेही दैत्याच्या मस्तकावर बुक्क्यांनी प्रहार केले. छातीवर आघात करून त्याने दैत्याला पृथ्वीवर पाडले. त्याचे अंग चांगले ठेचून त्याचे जीवन समाप्त केले. श्रीकृष्णानें तोषल नावाच्या दैत्यासही असेच ठार केले. इतके मुख्य दैत्य मारल्यानंतर श्रीकृष्ण व बलराम हसत, खेळत उभे राहिले. याचा कंसाला भारी राग आला. त्याने आपल्या सेवकाना सांगितले, 'या दोन गोपपुत्रांना रंगशाळेतून घालवून द्या. पापी नंदासही पकडून बंदिखान्यात पाठवा. वसुदेवासही त्याच्या वयाकडं न पाहता त्याला कठोर शासन करा. या गवळ्यांच्या गायी, त्यांची संपत्ती सारं काही हिसकावून घ्या.'

कंसाचा हा आदेश ऐकून श्रीकृष्णास हसू आले. तो जोरानें मंचावर चढून राजाकडे गेला. राजाचा मुकुट पृथ्वीवर पडला. कृष्णानें त्याचे केस धरून त्याला फिरवून जमिनीवर आपटले. आपण स्वत: तो

कंसाच्या अंगावर चढला. सर्व पृथ्वीचाच जणू भार कंसावर पडल्यामुळे तो गतप्राण झाला. उग्रसेनकुमार राजा कंस या जगातून नाहीसा झाला. कंसाचा भाऊ सनामा याला या घटनेने फार राग आला. बलभद्राने तर त्याला खेळता खेळता मारून टाकले. मथुरेचा राजा कंस मारला गेला असे पाहताच सर्वत्र हाहाकार झाला. कृष्णाने यानंतर चटकन जाऊन वसुदेव व देवकी याचे पाय पकडले. बलदेवानेही कृष्णाला या कामी साथ दिली. वसुदेवाने हर्षभरित होऊन म्हटले,

'देवदेवेश्वरा, तू तर सर्व देवांत श्रेष्ठ आहेस. या दुराचारी दैत्याचा वध करण्यासाठीच तू आमच्या घरी अवतार धारण केलास. सर्व प्राणी शेवटी आपणांसच येऊन मिळतात. सर्व प्राण्यांच्या अंतर्यामी आपणच असता. भूतभविष्याची प्रवृत्ती आपणांपासूनच होते. अच्युता, अचिंत्य परमेश्वरा, यज्ञात आपलंच यजन केलं जातं. आपणच यज्ञ आहात. यज्ञाचा कर्ता, धर्ता आपणच आहात. आपण इतके मोठे असून मी व देवकीनं आपणांकडं पुत्ररूपानं पाहिलं, ही काही बरी गोष्ट नाही झाली. आपण अनादी, अनंत परमेश्वर! आम्ही मानवी जिव्हेनं आपणांस पुत्र म्हणून हाक मारायची. परमेश्वरा, माझ्यावर प्रसन्न हो, मला क्षमा कर. या विश्वाचं आपण रक्षण करावं. आपण माझे पुत्र नसून प्रत्यक्ष परमेश्वर आहात. ब्रह्मापासून वृक्षापर्यंत संपूर्ण जगत आपणांपासूनच निर्माण झालं आहे. परमात्म्या, आपण तर साक्षात श्रीविष्णू आहात. जगताचं कल्याण करण्यासाठी आपण या भूतलावर अवतीर्ण झालात. आमचा सर्व मोह दूर झाला.'

उग्रसेनास राज्याभिषेक, जरासंधाचा पराभव

भगवान श्रीकृष्णाचे अलौकिक कृत्य पाहून वसुदेव-देवकी यांच्या मनातील पुत्रभाव संपल्याचे पाहून श्रीकृष्णाने म्हटले,

'माताजी, पिताजी, मी व बलराम फार दिवस आपली भेट घ्यावी म्हणून उत्सुक होतो. आज आपलं दीर्घ काळानंतर दर्शन झालं.

ज्याला मातापित्याची सेवा घडली नाही त्या पुत्राचं जीवन व्यर्थच. जननीस केवळ कष्ट देण्यासाठीच त्याचा जन्म. साधुपुरुषही त्याची निंदा करतात. तात, गुरू, माता, पिता यांच्या सेवेनंच पुत्राचा जन्म सफल होतो. '

असे म्हणून दोघांनीही पुन्हा मातापित्यांस वंदन केले. यदुकुलातील सर्व थोर व्यक्तींना त्यांनी नमस्कार केला. सर्व नगरवासी लोकांच्या मनात कृष्णाबद्दल प्रेम निर्माण झाले. कंसाच्या पत्नी शोकपूर्ण अवस्थेत डोळयांतून अश्रू गाळीत होत्या. त्यांच्याकडे पाहून कृष्णाच्या डोळयांतूनही अश्रू ठिबकले. त्याने कंसपत्नींचे सांत्वन केले. उग्रसेनाची कैदेतून सुटका झाली. त्याची राज्यपदावर स्थापना करण्यात आली. मृतांचे और्ध्वदैहिक कार्य पूर्ण झाल्यावर उग्रसेन पुन्हा जेव्हा सिंहासनावर बसला तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला,

' महाराज, जे आवश्यक कार्य निघेल त्यासाठी आपण माझी मदत घ्यावी. मी जोपर्यंत आपला सेवक आहे तोपर्यंत आपण देवांनाही आज्ञा देऊ शकता. मग पृथ्वीवरील राजांची काय कथा ?'

इतके म्हणून कृष्णाने वायुदेवास सांगितले,

' वायो, तू त्वरित इंद्राजवळ जा. महाराज उग्रसेनास सुधर्मा नावाची एक सभा त्यानं यदुवंशियांना द्यावी. '

इंद्राने उग्रसेनास सुधर्मा नावाची सभा रत्नांनी संपन्न असलेली दिली. कृष्णाच्या कृपाछत्राखाली यादववीर या सभेचा उपयोग करू लागले. श्रीकृष्ण व बलभद्र हे पूर्ण ज्ञानी तर खरेच, पण शिष्य व आचार्य या परंपरेचा मान राखण्यासाठी ते काश्यपगोत्रीय अवंतिपुरनिवासी सांदीपनीच्या आश्रमात आले. विद्याधन मिळविण्यासाठी दोघांनी मन लावून गुरूंची सेवा केली. आपल्या आचरणाने इतर शिष्यांसमोर एक आदर्श उभा केला. रहस्य, संग्रह, धनुर्वेद इत्यादी विषयांचा अभ्यास त्यांनी चौसष्ट दिवसांतच पूर्ण केला. गुरूंना आश्चर्य वाटले. साक्षात सूर्य व चंद्रच आपले शिष्य आहेत की काय ? असे त्यांनी मानले. एकदा सांगितले की ते शास्त्र दोघांना पूर्णपणाने अवगत होई. विद्या पूर्ण झाल्यावर ते गुरुदेवांना म्हणाले,

‘ भगवन्, आपणांस गुरुदक्षिणा काय देऊ ? सांगा ना. ’

सांदीपनींनी आपला मरण पावलेला एक पुत्र परत मागितला. प्रभास क्षेत्रात हा त्यांचा मुलगा समुद्रात बुडाला होता. श्रीकृष्ण बल-रामासहित समुद्राच्या तीरी आले आणि समुद्राला म्हणाले,

‘ आमच्या गुरूचा पुत्र परत दे. ’

‘ भगवन्, मी सांदीपनीचा पुत्र नाही आणला. माझ्यात पंचजन्य नावाचा एक दैत्य आहे. त्याचा आकार शंखासारखा आहे. त्यानं या बालकास पकडून आणलं. तो दैत्य आजही माझ्या पाण्यात आहे. ’

श्रीकृष्णाने समुद्रात प्रवेश करून पंचजन्यास ठार करून त्याच्या हाडांचा एक शंख बनविला. त्याचा आवाज ऐकताच दैत्यांचे बल क्षीण होई. देवांची शक्ती वाढत जाई. अधर्माचा नाश होई. त्यानंतर श्रीकृष्ण व बलराम यमपुरीस गेले. तेथे त्यांनी शंखनाद केला व वैवस्वत यमास जिंकून त्यांनी आपल्या गुरूच्या पुत्रास सोडवून आणले आणि सांदी-पनींना तो समर्पित केला.

महाबली कंसाने जरासंधाची पुत्री अस्ती व प्राप्ती यांच्याशी विवाह केला होता. मगधदेशाचा एक बलवान राजा म्हणून जरासंधाचे नाव विख्यात होते. आपला जावई मारला गेल्याचे ऐकून तो मोठी सेना जमवून श्रीकृष्णाचा वध करण्यासाठी मथुरेवर चालून आला. मथुरेस त्याने चारही बाजूंनी वेढा दिला. त्याच्याजवळ तेवीस अक्षौहिणी सैन्य होते. बलराम व कृष्ण यांनी थोडेसे सैन्य घेऊन नगराबाहेर जरासंधाशी लढण्यास सुरुवात केली. सुदर्शनचक्र, शार्ङ्गधनुष्य, बाणांनी भरलेला अक्षय तूणीर व कौमदाची गदा अशा शस्त्रांनी श्रीकृष्णाने व बलरामाने जरासंधाचा पूर्ण पराभव केला. जरासंधाने पुन्हा जोराची तयारी करून मथुरेवर स्वारी केली. अशा स्वाऱ्या एका-मागून एक अठरा वेळा झाल्या. जरासंधाचे बळ मोठेच होते. प्रत्येक युद्धात यादवांनी त्याचा पराभव केला.

दक्षिण दिशेस यवनांचा एक राजा होता. कालयवन नावाच्या आपल्या पुत्रास त्याने राज्यावर बसविले व तो वनात निघून गेला. कालयवन मदानें उन्मत्त झाला. एकदा त्याने नारदांना विचारले,

'पृथ्वीवर बलवान राजे कोणकोणते आहेत ?'

नारदांनी यादवांचे नाव सांगितले. हत्ती, घोडे, रथ घेऊन कालयवनाने यादवांच्यावर आक्रमण केले. जरासंधाच्या पुन्हा आक्रमणाची भीती होतीच. म्हणून श्रीकृष्णाने यादवांच्या सुरक्षेसाठी एक दुर्जय असा दुर्ग निर्माण करावा असा एक विचार मनात केला. त्याने समुद्राच्या काठावर योजन भूमीवर द्वारकापुरी नावाची एक नवीन नगरी उभारली. तीत मोठमोठी उद्याने होती. त्या नगरीचे तट बरेच उंच होते. शेकडो सरोवरे, रुंद रस्ते, अनेक परकोट यांनी ही नवी नगरी इंद्राच्या अमरावतीप्रमाणे शोभू लागली. भगवान कृष्णाने सर्व मथुरानिवासी स्त्री-पुरुषांना तेथे नव्या नगरीत पोचविले. व तो परत मथुरेस आला. तेव्हा कालयवन नगरीवर प्रत्यक्ष चालून आला होता. कालयवनाने श्रीकृष्णाचा पाठलाग केला. श्रीकृष्णांनी एका गुहेत प्रवेश केला. त्या गुहेत महापराक्रमी राजा मुचुकुंद झोपलेला होता. कालयवनानेही त्या गुंफेत प्रवेश करून झोपला आहे तो श्रीकृष्णच समजून त्याला लाथ मारली. मुचुकुंद एकदम जागा झाला तेव्हा त्याच्या नजरेत यवनराजा आला.

फार पूर्वी राजा मुचुकुंद मोठमोठ्या दैत्यांशी लढला होता. युद्ध समाप्त झाल्याबरोबर त्याने आपणांस दीर्घकाल निद्रा यावी अशी प्रार्थना देवांना केली. 'राजा, तुला जो झोपेतून उठवील तो तुझ्या अंगातील अग्नीनं भस्म होईल' या वरानुसार मुचुकुंदाने कालयवनास जाळून भस्म केले. गुहेत श्रीकृष्ण उभाच होता. त्याला राजाने विचारले,

'आपण कोण आहात ?'

'मी यदुकुलातील वसुदेवपुत्र कृष्ण.'

श्रीकृष्णाला मुचुकुंद प्रणाम करून म्हणाला,

'भगवन्, मी आपल्याला ओळखले. आपणच श्रीहरीचा अंशभूत अवतार आहात. या मर्त्यलोकीच्या प्राण्यांचा उद्धार करणारे आपणच आहात. आपली वाणी मेघगर्जनेप्रमाणं गंभीर आहे. भगवान, माझ्यावर दया करा. आपणच समुद्र आहात. पर्वत, नदी, वन, पृथ्वी, आकाश, वायू, जल, अग्नी सर्व काही आपणच आहात. देव, पितर, यक्ष, गंधर्व,

राक्षस, सिद्ध, अप्सरा इत्यादींची निर्मिती आपणांपासूनच आहे. प्रभो, माझ्यासाठी आपण क्षमाशील व्हावं. आपणच सर्व जगाचं उत्पत्तिस्थान आहात. हे विश्व आपलंच रूप आहे. देवा, या सांसारिक श्रमानं संतप्त झालेल्या माझ्या मनास शांत करावं. मी आपल्याच निर्वाणस्वरूप परम-धामाची अभिलाषा करीत आहे.'

श्रीकृष्णाचा आशीर्वाद घेऊन मुचुकुंद तपस्येसाठी गंधमादन पर्वतावर निघून गेला. श्रीकृष्णानेही मथुरेचे राज्य उग्रसेनास अर्पण करून स्वत: तो निर्भय अशा द्वारकेस निघून गेला.

रुक्मिणीहरण व शंबराचा वध

त्यानंतर एकदा बंधुबांधवांना भेटण्यासाठी उत्सुक बनून बलराम नंदगावात आला. सर्व गोपगोपी त्याला उत्कंठतेने भेटले. त्याने सर्वां-बरोबर प्रेमाने बोलणे केले. काही हास्यविनोदही केला. कुणी गोपींनी त्याला मध्येच विचारले, ' चंचल प्रेमरसाचा आस्वाद घेणाऱ्या नागरी स्त्रियांचा प्रियतम कृष्ण सुखी आहे ना ? कृष्णास कधी आमच्या गीतांचं स्मरण होतं ? तो कधी एकदा आपल्या मातेचं दर्शन घेण्यासाठी इकडं येईल ? आम्ही त्याच्यासाठी काय नाही सोडलं ? माता, पिता, भ्राता, पती, बंधुबांधव या सर्वांचा आम्ही त्याच्यासाठी त्याग केला. पण बलरामजी, कृष्ण कधी इकडं येण्याची गोष्ट काढतो का ? आता तो नागरी स्त्रियांवर संतुष्ट झाला. आमची आठवण कशाला काढील?'

गोपींच्या मनाची व्यथा जाणून बलरामाने त्यांचे सांत्वन केले. हसत खेळत दोन महिने गोकुळात राहून बलराम पुन्हा द्वारकेस गेला. त्यांचा विवाह राजा रेवताची कन्या रेवतीशी झाला. निशठ व उल्मुक ही दोन मुले त्यांना झाली. याच सुमारास विदर्भात कुंडिनपूर नावाचे एक नगर होते. तेथील राजाचे नाव भीष्मक. त्याच्या पुत्राचे नाव रुक्मी व कन्येचे नाव रुक्मिणी. ही रुक्मिणी आपणांस मिळावी अशी श्रीकृष्णाची इच्छा होती. त्याने तशी प्रार्थना कुंडिननरेशास केली होती. पण रुक्मीने त्या विनंतीचा स्वीकार केला नाही. जरासंधाच्या प्रेरणेने

रुक्मिणीचा विवाह शिशुपालाबरोबर ठरला. या विवाहासाठी जरासंध आदी राजे कुंडिनपुरास आले. चैद्यनरेशाचा विवाह पाहण्यासाठी श्रीकृष्ण, बलभद्र इत्यादी यादवही आले होते.

विवाहास एक दिवस अवधी होता. बलभद्रादी बंधुजनांवर शत्रूस रोखण्याचे काम सोपवून श्रीकृष्णाने राजकुमारी रुक्मिणीचे हरण केले. या प्रकारामुळे पौंड्रक, दन्तवक्त्र, विदूरथ, शिशुपाल, जरासंध, शाल्व इत्यादी राजे फारच रागावले. त्यांनी श्रीकृष्णास मारण्याचा बेत केला. पण बलरामाने त्यांचा सर्व बेत हाणून पाडला. तेव्हा रुक्मीने प्रतिज्ञा केली की युद्धात श्रीकृष्णास मारल्याशिवाय कुंडिनपुरात प्रवेश करायचा नाही. त्याने कृष्णाचा पाठलाग केला. पण कृष्णापुढे कुणाचेच काही चालले नाही. अशा रीतीने रुक्मीचा पराभव झाल्यावर श्रीकृष्णाने रुक्मिणीशी विधिपूर्वक विवाह केला. त्यांच्या पोटी बलवान प्रद्युम्नाचा जन्म झाला. हा प्रद्युम्न कामदेवाचा अंश होता.

याच सुमारास शंबरासुर हा कालाप्रमाणे विकराल बनला होता. श्रीकृष्णाचा पुत्र प्रद्युम्न आपला वध करणार आहे असे समजून प्रद्युम्नाच्या जन्मास सहा दिवस होतात न होतात तोच त्याने सूतिकागृहातून प्रद्युम्नाचे अपहरण केले व त्याला दूरच्या समुद्रात फेकून दिले. त्या बालकास एका मत्स्याने गिळले. त्या मत्स्याचा जठराग्नी तप्त झाला असूनही प्रद्युम्नाचा जीव बचावला. काही कोळयांनी इतर मत्स्यांबरोबर याही मत्स्यास मारले व शंबरासुरास तो भेट दिला. त्याच्या घरात मायावती नावाची एक युवती गृहस्वामिनी होती. ही सुंदरी स्वयंपाकगृहात अधिकार चालवीत असे. जेव्हा तिनें तो मासा चिरला तेव्हा त्याच्या पोटातून एक सुंदर बालक बाहेर पडताना पाहिले. हा आहे तरी कोण ? या प्रश्नात पडलेल्या मायावतीस नारद म्हणाले,

‘ सर्व जगाचे पालक भगवान श्रीकृष्णांचा हा मुलगा होय. याला शंबरासुरानं चोरून समुद्रात फेकून दिलं होतं. तिथं याला या मत्स्यानं गिळलं. सुंदरी, मनुष्यांत रत्न असे हे बालक पूर्ण विश्वसनीय आहे.’

मायावतीने या बालकाचे संगोपन केले. त्याचे सुंदर रूप पाहून

ती त्याच्यावर मोहित झाली होती. हा बालक जेव्हा वयात आला तेव्हा या सुंदरीने त्याच्यापुढे कामनायुक्त भाव प्रकट केला. मायावतीनें प्रद्युम्नास सर्व काही शिकविले. एकदा प्रद्युम्नाने तिला विचारले,

'तू मातृभावाचा त्याग करून अशी विपरीत भावना का धरतेस ?'

'तू काही माझा पुत्र नाहीस. भगवान श्रीकृष्णाचा तू पुत्र आहेस. तुला काळरूपी शंबरानं समुद्रात फेकून दिलं होतं. तू मला मत्स्याच्या पोटातून मिळालास. प्रिय, तुझी पुत्रवत्सला माता आज तुझ्यासाठी रडत आहे.'

मायावतीचे हे भाषण ऐकून प्रद्युम्नास अतिशय क्रोध आला. त्याने शंबरासुरास युद्धासाठी पुकारले. त्याच्या साऱ्या सैन्याचा पराभव केला. त्याने शंबरास मारून आकाशमार्गाने मायावतीसह आपल्या पित्याच्या नगरीत प्रवेश केला. मायावतीसह प्रद्युम्नास पाहताच कृष्णाच्या राण्यांनी अनेक प्रकारचे संकल्प केले. त्याला पाहून रुक्मिणी म्हणाली,

'हा कुणातरी अभागिनीचा पुत्र दिसतो. माझा प्रद्युम्न जीवंत असता तर असाच दिसला असता. बेटा, तू कोण आहेस ? तुझ्याबद्दल मला इतकं प्रेम का वाटतं ?'

याच वेळेस नारदमुनी तेथे आले. त्यांनी रुक्मिणी देवीस सांगितले, 'राणी, हा तुझाच पुत्र प्रद्युम्न आहे. शंबरासुरास मारून हा आताच इथं आला आहे. आणि ही तुझी सून मायावती आहे. ही पूर्वजन्मीची रती आहे. हा तुझा पुत्र कामदेवाच्या रूपानं अवतीर्ण झाला आहे. ही तुझी पुत्रवधू आहे.'

हे सर्व ऐकून रुक्मिणी व श्रीकृष्ण यांना मोठाच आनंद झाला. चिरकालानंतर हरवलेला पुत्र सापडल्यामुळे द्वारकानिवासी सर्वांनाच आनंद झाला.

अनिरुद्धाचा विवाह, नरकासुराचा वध

रुक्मिणीस प्रद्युम्नाशिवाय चारुदेष्ण, सुदेष्ण, चारुदेह, सुषेण, चारुगुप्त, भद्रचारु, चारुविंद, सचारु, चारु अशा पुत्रांचा लाभ झाला. चारुमती नावाची एक कन्याही होती. रुक्मिणीशिवाय श्रीकृष्णाच्या आणखी सात पट्टराण्या होत्या. कालिंदी, मित्रविंदा, नग्नजिताची कन्या सत्या, जांबवानाची कन्या जांबवती, भद्रराजकुमारी भद्रा, सत्राजिताची कन्या सत्यभामा व मनोहर हसणारी लक्ष्मणा या त्या सात राण्या. महापराक्रमी प्रद्युम्नाचा विवाह रुक्मीच्या सुंदर कन्येशी झाला. यांचा पुत्र अनिरुद्ध. हा महाबली, पराक्रमी, युद्धात कधीच कुंठित न होणारा, वलसमुद्र व शत्रूंचे दमन करणारा होता. या विवाहाच्या प्रसंगी द्यूतात सापडल्यामुळे युद्धाचा प्रसंग उभा राहिला. द्यूताच्या फाशानेच वलरामाने रुक्मीस मारले. रुक्मीच्या पक्षातील राजांचाही त्याने पराभव केला. या सर्व प्रकारात श्रीकृष्ण गप्प राहिले. विवाहानंतर श्रीकृष्ण अनिरुद्धासहित यादवांबरोबर द्वारकेस गेले.

एके दिवशी इंद्र ऐरावतावर बसून द्वारकेस आले व कृष्णास म्हणू लागले, ‘ मधुसूदना, आपण जरी यावेळेस मनुष्यरूपात असला तरी आपण सर्व देवांचं रक्षण केलं आहे: तपस्वी जनांचं रक्षण आपणच केलं आहे. जनार्दना, मी यावेळेस एका विशिष्ट हेतूनं आलो आहे. भूमीचा पुत्र नरक आज प्राग्ज्योतिषपुराचा स्वामी आहे. तो सर्वांचा नाश करायला प्रवृत्त झाला आहे. जनार्दना, त्यानं देवांना, सिद्धांना, राजकन्यांना फार त्रास दिला आहे. या नरकासुरानं माझ्या मातेच्या, अदितीच्या कानांतील दोन कुंडलंही हिरावून घेतली आहेत. तो आता माझा ऐरावत हत्ती हिरावून नेणार आहे. आपण या असुराचं पारिपत्य करावं. ’

इंद्राचे भाषण ऐकून हसतच श्रीकृष्ण सिंहासनावरून उठले. त्यांनी आपल्या गरुडास बोलावून घेतले. श्रीकृष्ण प्राग्ज्योतिषपुराकडे निघाले. त्यांनी आपल्या सुदर्शनचक्राने सारे पाश नाहीसे केले. मुर नावाच्या दैत्यास श्रीकृष्णाने ठार केले. त्याच्या मुलांचाही नाश कृष्णाने केला. हयग्रीव, पंचजन यांचा पराभव करून श्रीकृष्णाने नगरीवर हल्ला

केला. नरकासुर मोठी सेना घेऊन सामना देण्यासाठी सिद्ध झाला. त्याने श्रीकृष्णाशी घनघोर युद्ध केले. गोविंदाने हजारो दैत्यांचा नाश केला. भूमिपुत्र नरक शस्त्रांचा व अस्त्रांचा वर्षाव करीत होता. श्रीकृष्णाने आपल्या चक्राने त्या असुराचे दोन तुकडे केले. नरक मरण पावताच पृथ्वी अदितीची कुंडले घेऊन आली व श्रीकृष्णास म्हणाली,

'नाथ, आपण वराहरूप धारण करून माझा उद्धार केलात, त्या वेळी आपल्या स्पर्शानं मला हा पुत्र झाला. तो आपणच दिला व आपणच नेला. ही दोन कुंडलं घ्या. आणि आता नरकासुराच्या संतानांचं रक्षण करा. प्रभो, आपणच कर्ता, विकर्ता, संहर्ता सर्व काही आहात. अच्युता, मी आपली स्तुती योग्य प्रकारानं केली आहे. आपणच परमात्मा, जीवात्मा, अविनाशी भूतात्मा आहात. सर्वभूतात्मन् माझ्यावर प्रसन्न व्हा. नरकासुरास क्षमा करा. तो आपलाच पुत्र. त्याला दोषरहित करण्यासाठी आपणच त्याला मारलंत.'

श्रीकृष्णाने तथास्तु म्हणून नरकासुराच्या महालातील सर्व रत्ने घेतली. त्याच्या बंदिखान्यातील सोळा हजार एकशे कन्यांची त्याने मुक्तता केली. अनेक हत्ती, घोडे यांना कृष्णाने द्वारकेस पाठवून दिले. श्रीकृष्णाने स्वर्गलोकात जाऊन अदितीचे दर्शन घेतले. तिला दोन कुंडले समर्पण केली. कृष्णाचा हा पराक्रम पाहून अदिती संतुष्ट होऊन म्हणाली,

'भक्तांना अभय देणाऱ्या परमेश्वरा, आपणांस नमस्कार असो. आपणच मन, बुद्धी व इंद्रिये यांचे प्रेरक आहात. अच्युता, संध्या, रात्री, दिन, भूमी, आकाश, वायू, जल, अग्नी, मन, बुद्धी, अहंकार इत्यादी सर्व आपणच आहात. आपणच सर्व कर्त्यांचे अधिपती आहात. नाथा, या जगतात जे काही घडतं ते आपल्या मायेनंच. मी आपली आराधना मोक्षासाठी नाही केली. पुत्राच्या कामनेनं मी आपल्याला भजलं. अविनाशी परमेश्वरा, माझ्यावर प्रसन्न व्हा. माझ्या अज्ञानाचा नाश करा. आपल्या हातात शंख, चक्र, गदा आदी आयुधं आहेत. मी आपल्या सूक्ष्म रूपास जाणीत नाही. भगवान माझ्यावर प्रसन्न व्हा.'

'देवी, आपणच आमची सर्वांची माता आहात. आपणच प्रसन्न

होऊन आम्हांस वरदान द्यावं.'

यानंतर सत्यभामाने इंद्राणीसहित अदितीला प्रणाम केला व म्हटले, 'देवी, आपण माझ्यावर प्रसन्न असावं.'

'माझ्या कृपेनं तुला कधीच वृद्धावस्था वा कुरूपता नाही येणार. तुझ्या सर्व कामना पूर्ण होतील.'

अदितीच्या आज्ञेनुसार देवराज इंद्राने भगवान श्रीकृष्णाची आदरपूर्वक पूजा केली. श्रीकृष्णानेही सत्यभामेबरोबर देवांच्यासह नंदनवनादी सर्व उद्यानांचे निरीक्षण केले. एके ठिकाणी त्याने पारिजाताचा एक वृक्ष पाहिला. त्याला परम सुगंधित अशा मंजिऱ्या आल्या होत्या. त्या वृक्षामुळे भोवती शीतलता आली होती. त्या वृक्षाची पाने ताम्रवर्णीय असून कांती सुवर्णासारखी होती. अमृतासाठी समुद्राचे मंथन होत असताना या वृक्षाची प्राप्ती झाली. या पारिजातवृक्षास पाहून सत्यभामा म्हणाली,

'नाथ, हा वृक्ष आपण द्वारकेला न्यायचा ? आपण नेहमी म्हणता सत्यभामा मला फार आवडते. आपलं बोलणं खरं असेल तर या वृक्षानं आपल्या अंगणाची शोभा वाढवावी.'

सत्यभामेचे बोलणे ऐकून श्रीकृष्णाने तो पारिजातवृक्ष आपल्या गरुडावर घेतला. बागेचा रक्षक म्हणाला,

'गोविंद, देवराजाची महाराणी शचीचा या वृक्षावर अधिकार आहे. आपण हा वृक्ष इथून घेऊन जाऊ नये. देवांनी अमृतमंथनातून केवळ शचिदेवीसाठीच हा वृक्ष आणला आहे. आपणांस हा इथून नेता येणार नाही. एखाद्या अज्ञानी माणसाप्रमाणं आपण याची अभिलाषा करता आहात. हा वृक्ष कुणीच नेऊ शकणार नाही. इंद्रदेव हे सहन करणार नाही. अच्युता, याचा परिणाम चांगला होणार नाही.'

वनरक्षकाचे हे बोलणे ऐकून सत्यभामा रागाने म्हणाली,

'हा पारिजातवृक्ष इंद्र व शची यांचाच कसा ? अमृतमंथनाच्या वेळी जर हा समुद्रातून आला असेल तर त्यावर सर्वांचा अधिकार आहे. त्या शचीला जर एवढी घमेंड असेल तर तुम्ही जाऊन तिला सांगा की, पारिजात वृक्ष घेऊन आम्ही निघालो आहोत. तुला प्रतिकार करायचा

तर कर.'

रक्षकांनी सत्यभामेचे बोलणे शचीच्या कानांवर घातले. शचीने इंद्रास प्रतिकारासाठी तयार केले. भगवान श्रीकृष्णाने युद्धप्रसंगी पांचजन्य शंख जोराने वाजविला. त्याच्या ध्वनींनी साऱ्या दिशा थरारून गेल्या. हजार, लाख बाणांचा वर्षाव सुरू झाला. बाणांनी संपूर्ण आकाश आच्छादून गेले. मधुसूदनाने साऱ्या अस्त्रांचे तुकडे करून टाकले. पक्षिराज गरुडाने वरुणपाश एखाद्या सर्पाप्रमाणे तोडून टाकला. यमराजाची गदा मोडून गेली. कुबेराची पालखी मोडून पडली. सूर्यचंद्राची प्रभा मंदावली. अग्निदेवाचे शेकडो तुकडे झाले. अष्ट दिशांचे आठ वसू शरण आले. अकरा रुद्र पराजित झाले. साध्य, विश्वदेव, मरुद्गण, गंधर्व इत्यादी देवांचा पराभव झाला. गरुडाने आपल्या पंखांनी, चोचीने, पंज्यांनी देवांना घायाळ करून सोडले.

देवराज इंद्र व भगवान मधुसूदन दोन मेघांप्रमाणे आपसांत बाणांनी लढू लागले. ऐरावत व गरुड यांच्यांतही घनघोर झगडा झाला. वज्र व चक्र यांचे युद्ध सुरू झाले. देवराज इंद्राचे वज्र व्यर्थ झाले. गरुडाने ऐरावतास विद्ध करून रणभूमीवरून पिटाळून लावले. तेव्हा सत्यभामा मध्येच म्हणाली,

'त्रिलोकीनाथ, आपण शचीचे पती ना ? आपण युद्धभूमीवरून पळून जाणं उचित नाही. इंद्रा, आता अधिक प्रयत्न करू नकोस. आपण हा पारिजात वृक्ष घेऊन जा. हे दुसऱ्याचं धन आहे. याचं अपहरण करून मला कसलाच लाभ होणार नाही.'

'मानिनी, खेदास आणखी कशासाठी वाढवितेस ? विश्वरूपधारी परमेश्वराशी मी युद्धात हरलो. यापासून मी काहीच बोध नाही घेणार ? त्या अजन्मा, अकर्त्या सनातन परमेश्वरास जिंकण्यास कोण समर्थ आहे ?'

देवराज इंद्राचे हे भाषण ऐकून भगवान कृष्ण म्हणाले,

'जगत्पते, आपण देवराज इंद्र, मी एक साधा मानव. आपणच माझा अपराध क्षमा करावा. हा आपला पारिजात वृक्ष. योग्य त्या स्थानावर तो ठेवा.'

'प्रभो, मी मनुष्य आहे असं म्हणून आपण मला कशासाठी लाजविता ? भगवन्, आम्ही आपल्या या सगुण रूपास जाणीत नाही. आपल्या सूक्ष्म रूपाचंही ज्ञान आम्हांस नाही. श्रीकृष्णा, हा पारिजात-वृक्ष आपण द्वारकेस न्यावा.'

श्रीकृष्ण सर्वांचा निरोप घेऊन भूमितलावर आले. सत्यभामेसाठी त्यांनी तो वृक्ष आपल्या अंगणात लावला. त्याच्या छायेखालून जाताना सर्वांना आपल्या पूर्वजन्मीच्या आठवणी येत राहिल्या. या वृक्षाच्या फुलांनी बारा कोसांपर्यंत पृथ्वी सुगंधित होत राहिली.

उषा-अनिरुद्धविवाह

नरकासुराच्या लोकांपासून श्रीकृष्णास बरीच संपत्ती हत्ती, घोडे, धन, रथ, रत्ने यांच्या स्वरूपात प्राप्त झाली. श्रीकृष्णाने सोळा हजार कन्यांशी विवाह केले. अनेक रूपे धारण करून त्याने सर्वांचे विधिपूर्वक पाणिग्रहण केले. प्रत्येक कन्येस समजले की, श्रीकृष्णाने फक्त आपल्या बरोबरच विवाह केला. जगताची रचना करणारे श्रीकृष्ण रात्री प्रत्येकीच्या महालात निवास करू लागले.

श्रीकृष्णास सत्यभामेपासून भानू आदी पुत्रांची प्राप्ती झाली. जांबवतीपासून सांब आदी पुत्रांचा जन्म झाला. सत्यापासून भद्रविंदादी व शैब्यापासून संग्रामजित् आदी पुत्रांची प्राप्ती श्रीकृष्णास झाली. माद्रीपासून वृकादींचा जन्म झाला. लक्ष्मणाने गात्रवानास जन्म दिला. कालिंदीपासून श्रुतआदींची उत्पत्ती झाली. रुक्मिणीनंदन प्रद्युम्न श्रीकृष्णाचा सर्वांत ज्येष्ठ पुत्र. या प्रद्युम्नास अनिरुद्ध, यास वज्र असे पुत्र झाले. अनिरुद्ध अतिशय बलवान असून त्याने बाणासुराची कन्या उषा हिच्याबरोबर विवाह केला होता. याच प्रसंगाची कथा व्यासांनी सविस्तर निवेदन केली.

बाणासुराच्या कन्येस, उषास स्वप्नात कोणातरी पुरुषाने आलिंगन दिले. उषेलाही त्याच्याबद्दल प्रेम वाटले. इतक्यात तिची झोप संपली. जागी होताच तो स्वप्नातील पुरुष तिला दिसला नाही. ती

उत्कंठित होऊन बोलू लागली, 'प्यारे, तू कुठं गेलास?' याच वेळी तिची एक मैत्रीण मंत्री कुंभांडकाची कन्या चित्रलेखा तिथे उभी होती. तिने विचारले, 'राजकुमारी, तू कुणाला हाक मारीत होतीस?' मैत्रिणीचा प्रश्न ऐकून उषा भानावर आली आणि लाजली. तिच्या मुखातून एक शब्द बाहेर येईना. विश्वास दाखवून चित्रलेखाने तिच्याकडून सर्व वृत्तान्त ऐकला. ती चित्रलेखेस म्हणाली,

'पार्वतीदेवीनंच मला वर दिला होता. त्यानुसार हा पुरुष दिसला. त्याला प्राप्त करून घेण्यासाठी तू उपाय सुचव.'

तेव्हा चित्रलेखाने एका पटावर प्रमुख देव, दैत्य, गंधर्व, मनुष्य यांची चित्रे काढून उषेला दाखविली. तिने मनुष्यांच्या चित्रांकडे अधिक लक्ष दिले. अंधक व वृष्णिवंशीय यांच्याकडे उषा अधिक आकर्षित झाली. श्रीकृष्ण व बलराम यांची चित्रे पाहून ती किंचित लाजलीही. प्रद्युम्नाचे चित्र पाहताच ती थबकली. अनिरुद्धाचे चित्र पाहताच ती एकदम लाज सोडून म्हणाली,

'हो ग. हाच हा. हाच माझा प्रियतम.'

यानंतर योगगामिनी चित्रलेखाने तिचे सांत्वन करून द्वारकेस प्रयाण केले.

एकदा बाणासुराने शंकरास प्रणाम करून म्हटले होते,

'देवा, युद्धाशिवाय मला या हजार बाहूंचा भारी खेद होत आहे. कधी युद्धाचा प्रसंग येईल? या माझ्या भुजा सफल होतील? युद्ध झालं नाही तर या हाताचं मी काय करू? या मला भारभूतच होतील.'

'तुझी मयूरचिन्हाची ध्वजा तुटेल तेव्हाच तुला हवा असा युद्धप्रसंग उद्‌भवेल.'

बाणासुराच्या मनास संतोष वाटला. शिवाला नमस्कार करून त्याने आपल्या घरी प्रयाण केले. काही दिवसांनंतरच त्याची मयूरध्वजा तुटून खाली कोसळली. हे पाहून त्याला फारच हर्ष झाला. याच सुमारास चित्रलेखा आपल्या योगबलाने अनिरुद्धास बाणासुराच्या भवनात घेऊन आली. अनिरुद्ध उषेबरोबर अंतःपुरात विहार करू लागला. रक्षकांना या वृत्ताचा सुगावा लागताच त्यांनी सर्व प्रकार दैत्यराजाच्या कानांवर घातला. बाणासुराने आपल्या सेवकांना अनिरुद्धा-

बरोबर युद्ध करण्याचा आदेश दिला. पण अनिरुद्धाने त्या सर्वांचा पराभव केला. बाणासुर स्वत: रथावर आरूढ होऊन अनिरुद्धाच्या वधासाठी प्रवृत्त झाला. त्याचाही अनिरुद्धाने पराभव करताच तो मंत्राच्या प्रेरणेने मायाद्वारा युद्ध करू लागला. त्याने अनिरुद्धास नागपाशानें बांधून टाकले.

इकडे द्वारकेत अनिरुद्धाचा शोध सुरू झाला. हा अनिरुद्ध गेला तरी कोठे ? अशी चर्चा करीत यदुवंशीय तपास करीत होते. नारदांनी प्रकट होऊन सांगितले, ‘अनिरुद्ध शोणितपुरात नागपाशानं बांधला गेला आहे. योगविद्येत चतुर असलेल्या चित्रलेखानं त्याला आपल्या-बरोबर तेथे नेलं.’ शोध लागताच श्रीकृष्ण गरुडावर स्वार होऊन त्वरित बलराम, प्रद्युम्न यांच्यासह बाणासुराच्या नगरात आले. नगरात प्रवेश करताच महाबली प्रमथांबरोबर त्यांना युद्ध करावे लागले. त्यांचा पराभव करून श्रीकृष्ण बाणासुरभवनाकडे निघाले. या वेळी तीन पाय व तीन मस्तके धारण करणाऱ्या माहेश्वरज्वराने बाणासुराचे रक्षण करण्यासाठी श्रीकृष्णाशी युद्ध केले. त्याने फेकलेल्या भस्माने कृष्णाच्या शरीराचा दाह झाला. त्याला स्पर्श करताच बलरामही शिथिल होऊन डोळे मिटून राहिले. या युद्धात माहेश्वरज्वरावर वैष्णवज्वराने आक्रमण केले. भगवान कृष्णाच्या शरीराचा ताप कमी झाला. माहेश्वरज्वरास फारच पीडा झाली. त्याची व्याकुळता पाहून पितामह ब्रह्मदेवाने म्हटले,

‘भगवन्, याला क्षमा करा.’

‘ठीक आहे.’ म्हणून श्रीहरीने वैष्णवज्वरास आपल्यात सामावून घेतले.

त्यानंतर श्रीकृष्णाने पाच अग्नी, अनेक दानव यांचा पराभव केला. तेव्हा स्वत: बाणासुर संपूर्ण दैत्यांसह श्रीकृष्णाशी लढण्यास सिद्ध झाला. भगवान शिव, कार्तिकेय बाणासुराच्या बाजूने लढण्यास तयार झाले. श्रीकृष्ण व महादेव यांच्यांत घोर युद्ध झाले. त्यांच्या शस्त्रास्त्रांच्या माऱ्याने सारे जग भीतीने कंपित झाले. जगताचा प्रलय जवळ आल्याचे भाकित देवांनी केले. भगवान श्रीकृष्णांनी जृम्भणास्त्र फेकून भगवान शंकरांना स्तब्ध केले. युद्ध सोडून ते जांभयाच द्यायला लागले. हे पाहून

दैत्यगणानें चारही दिशांना पलायन केले. जांभयांनी विवश होऊन शंकर रथामध्ये मागील बाजूस जाऊन बसले. गरुडाने कार्तिकेयाच्या भुजांना क्षतविक्षत करून टाकले. दैत्यसेना हळूहळू नष्ट झाली. आता प्रत्यक्ष बाणासुर लढायला तयार झाला. त्याचा सारथी नंदीश्वर होता. श्रीकृष्णाशी त्याने युद्ध सुरू केले. शस्त्रास्त्रांचा खणखणाट सुरू झाला. शेकडो सूर्यांप्रमाणे तेजस्वी सुदर्शनचक्र श्रीकृष्णाने बाणासुराकडे धाडले. या चक्राने दैत्यासुराच्या भुजा तोडून टाकल्या. भगवान श्रीकृष्णांनी त्याला मारण्यासाठी पुन्हा चक्राचा वापर केला. बाणासुराच्या अंगातून रक्ताच्या धारा वाहत होत्या. श्रीकृष्णाचा मनोभाव जाणून शंकरच मध्ये पडून म्हणाले,

‘कृष्णा, जगन्नाथा, मी आपणांला जाणतो. आपण या दैत्याचा वध करू पाहता. पण प्रभो, प्रसन्न व्हा. मी या बाणासुराला अभय दिले आहे. माझा शब्द आपण असत्य करू नये. मीच त्याला वर दिला व तो प्रमत्त झाला. याबद्दल आपणच मला क्षमा करावी.’

भगवान शंकरांचे हे शब्द ऐकून श्रीकृष्ण प्रसन्न झाले. बाणासुरावरील त्यांचा रागही कमी झाला. ते शंकरांना म्हणाले,

‘आपण जर याला वर दिला असेल तर हा जीवंत राहील. आपल्या शब्दांचा मान राखण्यासाठी मी हे सुदर्शनचक्र मागं घेतो. आपण आता मजविषयी वेगळा भाव मनात ठेवू नये.’

असे म्हणून श्रीकृष्ण अनिरुद्धापाशी गेले. नागपाशातून त्यांनी त्याची सुटका केली. श्रीकृष्ण, बलराम, प्रद्युम्न अनिरुद्धाला घेऊन द्वारकेस परत आले.

पौण्ड्रकाचा वध, बलराम-कौरव युद्ध

या श्रीहरीच्या आणखीही काही लीला सांगण्यासारख्या आहेत. पुण्ड्रकवंशी एक राजा वासुदेव नावाचा होता. तो अज्ञानमोहित होऊन भगवान वासुदेव बनला होता. स्वत:लाच तो अवतारी पुरुष मानी. स्वत:चे वास्तविक रूप विसरून त्याने भगवान बनण्यासाठी विष्णूची

सर्व चिन्हे धारण केली. इतकेच नव्हे तर त्याने भगवान श्रीकृष्णांनाच निरोप पाठविला,

'अरे मूढा, तू चक्र आदी माझी चिन्हं घेतलीस. वासुदेव नाव धारण केलंस, या सर्वांचा तू त्याग कर व त्वरित मला शरण ये.'

हा निरोप ऐकून भगवान श्रीकृष्णांना हसू आले. ते आपल्या दूतास म्हणाले,

'तू जाऊन त्या पौण्ड्रकाला सांग की, मी माझ्या सर्व चिन्हांसह तुझ्या नगरात येईन. माझं चिन्हरूप चक्र मी तुझ्यावर सोडीन. यात आता कसलाच संदेह नाही. तुला काय करायचं ते तू कर. उद्या सकाळीच मी तुझ्या नगरीत पोचतो.'

दूत निरोप घेऊन जाताच श्रीकृष्णांनी गरुडास बोलाविले. गरुडावर स्वार होऊन श्रीकृष्ण पौण्ड्रकाच्या नगरीत आले. श्रीकृष्णाच्या आक्रमणाची हकीगत समजताच काशिराज आपल्या सैन्यासह येऊन दाखल झाला. श्रीकृष्णांनी दुरून पौण्ड्रक एका विशाल रथावर बसलेला पाहिला. त्याच्या हातात कृत्रिम शंख, चक्र, गदा इत्यादी आयुधे होती. एका हातात कमलही होते. गळ्यात एक मोठा हार लटकला होता. शार्ङ्गधनुष्यासारखे एक धनुष्यही होते. गरुडचिन्हाकित एक ध्वजा रथावर फडकत होती. छातीवर कृत्रिम वत्सचिन्ह होते. मस्तकावर किरीट, कानांत कुंडले, शरीरावर पीतांबर; असा सर्व थाट होता. श्रीकृष्णांनी हे सर्व पाहिले अन् हसून त्यांनी लढाईला सुरुवात केली. त्यांनी प्रथम काशिराजाचा पराभव करून समान चिन्हे धारण करणाऱ्या पौण्ड्रकास म्हटले,

'पौण्ड्रका, तू मला तुझ्या दूताबरोबर निरोप पाठविला होतास नाही ? मी आता त्याचं पालन करतो. हे पाहा मी चक्र सोडले, ही गदा सोडली. हा गरुडही सोडला. आता हा तुझ्या भुजांवर आरूढ होतोय.'

असे म्हणून कृष्णांनी आपल्या आयुधांनी पौण्ड्रकास विदीर्ण करून टाकले. गदेच्या आघाताने तो पृथ्वीवर पडला. गरुडाने त्याचा कृत्रिम गरुड मोडून तोडून टाकला. पौण्ड्रक मरण पावल्यावर जिकडे तिकडे

हाहाकार माजला. काशिराजाने आपल्या मित्रासाठी पुन्हा एकदा श्रीकृष्णांवर हल्ला केला. श्रीकृष्णांनी त्याचे मस्तक उडवून काशीपुरीत फेकून दिले. भगवान श्रीकृष्णांनी काशिराज व पौण्ड्रक यांचा नाश करून फारच मोठे कार्य केले.

बलराम तर या पृथ्वीवर शेषाचा अवतार म्हणूनच प्रसिद्ध झाले. दुर्योधनाची कन्या कुमारी लक्ष्मणा स्वयंवरास निघाली होती. जांबवती-पुत्र वीरवर सांबाने तिला बलपूर्वक पळवून नेले. महापराक्रमी कर्ण, दुर्योधन, भीष्म, द्रोण इत्यादी लोक यामुळे रागावले. त्यांनी सांबाशी युद्ध करून त्याला कैद केले. यादवांना हे समजताच त्यांनी दुर्योधनाचा पराभव करण्यासाठी जोराची तयारी केली. तेव्हा बलरामांनी यादवांना थांबवून म्हटले,

'मी एकटाच कौरवांकडे जातो. माझं ऐकून ते सांबाला सोडून देतील.'

यानंतर बलराम हस्तिनापुरात जाऊन नगराबाहेरच्या उद्यानात थांबले. दुर्योधनाने त्यांना गायी, अर्घ्य, जल पाठवून त्यांचा सत्कार केला. तो स्वीकारून बलराम म्हणाले,

'तुम्ही सर्व लोकांनी सांबास सोडून द्यावं.'

बलरामांचे हे शब्द ऐकताच भीष्म, द्रोण, कर्ण, दुर्योधन इत्यादींना भारी राग आला. राजा बाल्हीकही संतापला. त्यांनी बलरामांना म्हटले,

'बलदेव, तुम्ही असं काय म्हणता ? असा कोण यदुवंशी आहे की, जो कौरवांना आज्ञा देतो ? आता तुम्ही परत जावं. सांबानं अन्याय केला आहे. म्हणून तुमच्या सांगण्यानं आम्ही त्याला कसं सोडावं ? आम्ही तुमचं स्वागत केलं. पण तुमचा अहंकार वाढतच गेला. तुमचा त्यात काय दोष ?'

कौरव बोलण्याचे थांबले. त्यांनी सांबाला मुक्त केले नाही. ते सर्वजण हस्तिनापुराकडे निघून गेले. बलरामांना अर्थातच या प्रसंगी क्रोध आला. त्या भरात त्यांनी आपल्या पायाच्या आघाताने पृथ्वी

दणाणून सोडली. संपूर्ण दिशा भरून जातील अशी गर्जना त्यांनी केली. त्यांच्या भुवया वक्र झाल्या. डोळचांतील लाली वाढली. ते म्हणाले,

'या कौरवांचा एवढा मद ? इतका अभिमान ? केवळ ते राजे झाले म्हणून ? काय कौरवच सम्राटपदाचे मालक आहेत ? महाराज उग्रसेनांची आज्ञाही ते आज मानीत नाहीत ? आजपासून उग्रसेनच सर्व राजांचा राजा. आता मी या कौरवांना या पृथ्वीवरून हाकलून देतो आणि मगच द्वारकेला जाईन. कर्ण, दुर्योधन, द्रोण, भीष्म, बाल्हीक, दु:शासन, भूरी, भूरिश्रवा, सोमदत्त अशा अनेक कौरवांना त्यांच्या हत्तीघोडचांसहित मी मारून टाकीन. सांबास त्याच्या पत्नीसह मी द्वारकेस नेईन. या पृथ्वीचा भार आतां उतरलाच पाहिजे.'

बलरामांनी आपला नांगर पृथ्वीवर रोवला आणि सारे नगर भयकंपित झाले. सर्व हस्तिनापुर डगमगले. सर्व कौरव व्याकुळ झाले. बलरामापाशी येऊन म्हणू लागले,

'महाबाहू बलरामा, क्षमा करा. मुसलायुध, आपला क्रोध आवरून धरावा. आम्हांवर प्रसन्न व्हावं. पत्नीसहित सांब आपल्या सेवेसाठी तत्पर आहे. आम्ही आपला प्रभाव जाणला नाही. फार मोठा अपराध आमच्याकडून झाला. आपण आता क्षमा करावी.'

कौरवांनी पत्नीसह सांबाला बलरामांपाशी उभे केले. भीष्म, द्रोण, कृपाचार्य यांनी बलरामांना प्रणाम करून वरदान मागितले. बलरामांनी सर्वांना क्षमा केली. कौरवांनी बलरामासहित सांबाची पूजा केली. व नववधूसह मोठचा सन्मानाने त्यांची रवानगी द्वारकापुरीस केली.

यदुकुलाचा संहार, पांडवांचे महाप्रस्थान

द्विविद नावाचा एक महापराक्रमी वानर होता. देवद्रोही दैत्यपती नरकासुराचा तो मित्र असून त्याचे देवांशी वैर होते. तो म्हणे, या कृष्णाने नरकासुराचा वध केला, मी याचा बदला घेईनच. त्याने या वचनानुसार यज्ञांचा विध्वंस व मर्त्य लोकाचा नाश सुरू केला. साधु-

पुरुषांची त्याने भरपूर निंदा केली. देहधारी अनेक जीवांची त्याने हत्या केली. तो चंचल वानर नगर, गाव, देश सर्वत्र हिंडून लोकांना त्रास देई. पर्वतावरील शिला लोटून तो कधी कधी लोकांना मारू लागला. पर्वत-शिखरे उखडून तो समुद्रात लोटून द्यायचा. समुद्रात स्वतःच घुसून त्याचे मंथन करायचा. समुद्रतटावरची गावे बुडवून टाकायचा. इच्छेनुसार हा वानर कधी विशालकाय रूप धारण करायचा. शेतीचे नुकसान करायचा. त्याच्या या लीलांमुळे सर्व जगत अतिशय कष्टी, दुःखी बनले होते.

एके दिवशी रैवत पर्वताच्या उद्यानात बलभद्र व महाभागा रेवती विहार करीत होते. त्यांच्याबरोबर आणखीही सुंदर स्त्रिया होत्या. त्यांच्या घोळक्यात बसून बलभद्र सुयशाचे गायन ऐकत होते. त्या वेळी तो द्विविद वानर तेथे आला आणि त्याने सर्वांची चेष्टा करायला प्रारंभ केला. युवतींच्याकडे पाहून तो जोराने हसू लागला. बलभद्रांनी त्याला रागावून दाटले, पण त्याचा उपयोग न होता तो अधिकच उपद्रव देऊ लागला. तेव्हा बलरामांनी रागाने उठून हातात मुसळ घेतले. वानराने एक मोठी शिला बलभद्रांच्या अंगावर लोटली, पण बलरामांनी मुसळाचा प्रहार करून त्या शिलेचे तुकडे केले. द्विविदाने एक जोराचा ठोसा बलरामांच्या छातीत मारला. त्यामुळे बलरामांना राग आला व त्यांनी बुक्क्यांनी द्विविदाच्या मस्तकावर प्रहार केले. त्यामुळे त्याच्या मुखातून रक्त वाहू लागले, व तो निर्जीव होऊन जमिनीवर पडला. त्या वेळी बलरामांच्या मस्तकावर फुलांचा वर्षाव होऊन त्यांची खूपच प्रशंसा झाली. 'वीरपुरुषा, फार चांगलं कार्य तू केलंस. हा दुष्ट वानर मरण पावला.'

अशा प्रकारे श्रीकृष्ण व बलराम यांनी अनेक दैत्य व दुष्ट राजे यांचा वध करून धर्माचे रक्षण केले. अर्जुनास साह्य करून श्रीकृष्णांनी अनेक अक्षौहिणी सैन्यांचा नाश करून या पृथ्वीचा भार उतरविला. आणि आपल्या कुलाच्या अखेरच्या दिवसांची योजना त्यांनी मनात चिंतली. पिंडारक नावाच्या महातीर्थात एकदा विश्वामित्र, कण्व, नारद आले. यदुकुमारांनी त्यांचे दर्शन घेतले. हे कुमार मदाने मत्त

झाले होते. त्यांनी जांबवतीकुमार सांबास स्त्रीचा वेष देऊन त्या मुनींच्या समोर उभे करून विचारले,

'महर्षींनो, या स्त्रीस पुत्राची इच्छा आहे. हिच्या पोटी कोण येईल ?' वेदसंपन्न ऋषींनी कुमारांचे हे कपट ओळखून म्हटले,

'या स्त्रीस एक मुसळ होईल व त्या मुसळानं सर्व यदुकुलाचा संहार होईल.'

'यदुकुमार परत नगरास आले. राजा उग्रसेनास त्यांनी ही सर्व हकीगत सांगितली. सांबाच्या पोटातून मुसळाचा जन्म झाला. उग्रसेनाने त्या मुसळाचे बारीक तुकडे करून ते समुद्रात फेकून दिले. ते चूर्ण गवताच्या रूपाने वाढले. भगवान श्रीकृष्णांनी होणारे नीट जाणले. विधात्याचे विधान बदलावे असे त्यांना कधी वाटले नाही. त्यांना माहीत असतानाच यादवांच्या संहाराचे कार्य सुरू झाले. मत्त यदुवीरांचा संहार न होता तर पृथ्वीचा भार आणखी वाढला असता. द्वारका वसविण्यासाठी त्यांनी समुद्रापासून भूमी मागितली होती. आता ते ती भूमी परत समुद्रास देऊन परमधामास जाणार होते.

द्वारकापुरीत रात्रंदिवस विनाशकारक असे अंतरिक्षातील उत्पात होऊ लागले. त्यांच्या शांतीसाठी सर्वांनी प्रभासक्षेत्रास जावे असे ठरले. त्यावेळी थोर भक्त उद्धवजी म्हणाले,

'भगवन्, आता मी काय करावं ? मला वाटतंय की, आपणच या यदुकुलाचा संहार करणार.'

'उद्धवा, तुझ्यावर माझी पूर्ण कृपा आहे. तू दिव्य गती धारण करून गंधमादन पर्वतावर पवित्र बदरिकाश्रमतीर्थाकडं जावंस. ते श्रीनरनारायणांचं स्थान आहे. त्या स्थानावर बसून माझं चिंतन कर. तुला उत्तम सिद्धी प्राप्त होईल. मी या कुलाचा संहार करून माझ्या धामास जाईन. द्वारकापुरी या समुद्रात बुडून जाईल.'

भगवान श्रीकृष्णांचे हे बोलणे ऐकून त्यांना नमस्कार करून उद्धवजी नरनारायणांच्या आश्रमाकडे गेले. त्यानंतर सर्व यादव श्रीकृष्ण बलराम आदींच्या सह प्रभासक्षेत्रास गेले. तेथे सर्वांनी यथेच्छ मदिरा-पान केले. पिता-पिता त्यांच्यांत बाचाबाची झाली. कलहाग्नीच्या

ज्वाला उठल्या. एक दुसऱ्यास शस्त्रांनी मारण्यास उत्सुक झाला. शस्त्रे संपल्यानंतर यादववीर गवताच्या काडयांनी झुंजू लागले. गवताच्या काडया मुसळाप्रमाणे झाल्या. एकमेकांवर भयंकर प्रहार होऊ लागले. प्रद्युम्न, सांब, कृतवर्मा, सात्यकी, अनिरुद्ध, पृथू, विपृथू, चारुवर्मा, सुचारू आदी यादववीर एकमेकांशी लढू लागले. भगवान श्रीकृष्णांच्या प्रयत्नास यश आले नाही. त्यांचा वध करण्यासाठी त्यांनी मूठभर गवत हातात घेतले. त्याचे मुसळ झाले. त्या मुसळाच्या साह्याने श्रीकृष्णांनी सर्व यादवांचा संहार केला. अन्य यादव आपापसांत लढून मरण पावले.

त्यानन्तर श्रीकृष्णाचा जैत्र नावाचा रथ जोराने चालू लागला. त्यांची शंख, चक्र, गदा, दोन तूणीर, खड्ग ही सर्व आयुधे सूर्याकडे निघून गेली. संपूर्ण यदुवंशाचा संहार होऊन केवळ श्रीकृष्ण व दारुक राहिले. त्यांनी फिरता फिरता पाहिले. एका वृक्षाखाली बलराम आसन लावून बसले होते. त्यांच्या मुखातून एक महाकाय सर्प बाहेर पडून जात होता. बलभद्रांनी या जगताचा निरोप घेतलासे पाहून भगवान श्रीकृष्ण दारुकास म्हणाले,

'तू द्वारकेला जा. वसुदेवास व उग्रसेनास हा सर्व वृत्तान्त सांग. बलरामजी गेले. आता श्रीकृष्णही परमधामास जाणार. संपूर्ण द्वारका आता समुद्रात बुडणार. तरी आपण सर्वांनी आता जाण्यासाठी रथ तयार करावेत. अर्जुनाची वाट पाहावी. अर्जुन द्वारकेतून बाहेर पडला की कुणीच तेथे थांबू नये. त्याच्याबरोबर सर्वांनी नगराबाहेर पडावं. आणि दारुका, अर्जुनाला तू सांग, द्वारकेत माझ्या स्त्रिया आहेत. त्यांचं रक्षण यथाशक्ती कर. आता यानंतर यदुकुलात अनिरुद्धकुमार वज्रनाथ राजा होईल.'

श्रीकृष्णांचे भाषण ऐकून दारुक द्वारकेस गेला व त्याने त्यांचा निरोप सर्वांना सांगितला. अर्जुन द्वारकेस आला. त्याने वज्रनाथास राजा बनविले. इकडे भगवान कृष्ण योगयुक्त बनून आपला एक पाय दुसऱ्या गुडघ्यावर टेकून बसले. त्याचवेळी जरा नावाचा एक व्याध तेथे आला. भगवानांचा चरण त्याला मृगाच्या आकाराचा वाटला. त्याने एक बाण मारला तो भगवानांच्या चरणास लागला.

जवळ येऊन तो पाहातो तो भगवान श्रीकृष्ण त्याला दिसले. त्याने त्यांना वंदन करून म्हटले,

'प्रभो, प्रसन्न व्हा. मी अजाणता हे काम केलं. क्षमा करावी.'

'व्याध, तुला कसलंच भय नाही. तू माझ्या प्रसादानं इंद्रलोकी जाशील.'

इतके म्हणून भगवान श्रीकृष्णांनी प्राणत्याग केला. अर्जुनाने सर्व यादवांचे प्रेतकर्म केले. वज्र आदी सर्व यादवांच्याबरोबर तो द्वारकेच्या बाहेर पडला. त्याच्याबरोबर श्रीकृष्णाच्या हजारो पत्नी होत्या. सुधर्मा सभा व पारिजात ही रत्ने स्वर्गात निघून गेली. श्रीकृष्ण परमधामास गेले व तेव्हापासून या पृथ्वीवर कलियुग सुरू झाले. द्वारका समुद्रात बुडाली. भगवान श्रीकृष्णाचे मंदिर तेवढे राहिले. अर्जुन सर्व द्वारकानिवासी लोकांना घेऊन पंचनद देशापर्यंत पोचला. हजारो अनाथ स्त्रिया एकट्या अर्जुनाबरोबर आहेत हे पाहून तेथील लुटारू लोकांनी त्यांना गाठले. त्या सर्वांनी अर्जुनाबरोबरच्या स्त्रियांना लुटले. त्यांनी सारे धन लुबाडले. अर्जुनास या ऐन प्रसंगी आपल्या गांडीव धनुष्याचा काहीच उपयोग झाला नाही. त्याला स्मरण करूनही अस्त्रांची नावे आठवत नव्हती. त्याच्या बाणांचा डाकूंवर कसलाच प्रभाव पडला नाही. त्याची शक्ती क्षीण झाली. त्याच्या मनात आले, आता श्रीकृष्णाचे बल संपले, आपले बाण निष्प्रभ झाले. त्याने मग धनुष्याच्या टोकानेच डाकूंना मारायला सुरुवात केली. पण त्याच्या या कृत्याने त्याचेच हसू झाले. त्या लुटारूंनी अर्जुनादेखत वृष्णी व अंधकवंशीय सुंदर स्त्रियांना पळवून नेले. अर्जुनाच्या मनास शोक होऊन तो म्हणाला,

'हाय हाय ! भगवान कृष्णानं मला एकटं सोडलं. धनुष्य तेच. बाण तेच. तोच रथ. घोडे तेच. पण सर्व काही व्यर्थ झालं. महात्मा कृष्णाचं सामर्थ्य उणं पडलं. मी अपमानित झालो. माझं अर्जुनत्व व भीमाचं भीमत्व त्या भगवान श्रीकृष्णामुळं होतं.'

अशा शोकाकुल मन:स्थितीत अर्जुन इंद्रप्रस्थास पोचला. तेथे त्याने वज्रास राज्यावर बसविले. भगवान श्रीकृष्ण नसल्याने अर्जुन अगदी एकटा पडला. त्याच्या मनाची उदासी वाढली. सारी पृथ्वीच

यौवन, श्री व कांती नसल्याने हीनदीन वाटू लागली. अनाथ स्त्रियांचे रक्षण आपण करू शकलो नाही याचा भारी खेद अर्जुनास झाला. पार्थाची ही शोचनीय मन:स्थिती पाहून व्यास त्याला एकदा म्हणाले,

'पार्था, आता हा उद्वेग सोडून दे. ही कालगती ध्यानात घे. कालमूलक सर्व आहे हे ध्यानात धर. नदी, समुद्र, पर्वत, पृथ्वी, देव-देवता, मनुष्य, पशू, वृक्ष, साप, विंचू सारं काही कालानं निर्माण केलं व त्यांचा संहारही कालच करणार. तुझ्याही अवताराचं कार्य झालं आहे. संपूर्ण दुष्ट राजे मरण पावले. यादवही संपले. भगवंतांचं कार्य संपलं तेव्हा ते स्वत:च्या इच्छेनुरूप आपल्या धामास गेले. पार्था, तू आता आपल्या पराजयाचं एवढं दु:ख कशासाठी करतोस ? हा पराजय काळानं केलेला आहे. त्या भगवान कृष्णानंच हे संहाराचं कार्य केलं आहे. ही सर्व त्या श्रीहरीची लीला आहे. पार्था, ध्यानात ठेव की,

जातस्य नियतो मृत्यु: पतनं च तथोन्नतेः ।
विप्रयोगावसानन्तु संयोगः संचयः क्षयः ।
विज्ञाय न बुधाः शोकं न हर्षमुपयान्ति ये ।
तेषामवेतरे चेष्टां शिक्षन्तः सन्ति तादृशाः ।।

'पार्था, ज्यानं जन्म घेतला त्याचा मृत्यू ठरलेला आहे. जो उंच चढला त्याचं खाली पडणं ओघानंच येतं. संयोगाचा शेवट वियोगात व संग्रहाची अखेर त्याच्या क्षयात आहे. हे समजून विद्वान पुरुष हर्ष व शोक यांच्या पलीकडचे होतात. इतर लोकही त्यांचंच अनुकरण करून तसेच बनतात. नरश्रेष्ठा, हे सर्व समजून तू सर्व बंधूंसह राज्य सोडून वनात जावंस. वीरा, जा. धर्मराज युधिष्ठिरास माझा हा निरोप सांग. परवा सर्वजणांनी नगर सोडून जावं.'

अर्जुनाने याप्रमाणे घडलेला सर्व वृत्तान्त धर्मराजाला सांगितला. सर्व पांडवांनी परीक्षितास राज्यावर बसविले व ते वनात निघून गेले.

श्रीहरीचे अनेक अवतार

त्या श्रीवत्सचिन्हांकित देवेश्वर भगवान विष्णूंचे सहस्र अवतार झाले. त्यांचा वराह अवतार हा वेदप्रधान व यज्ञस्वरूपाचा आहे. चार

वेद त्याचे चरण व यूप त्याच्या दाढा आहेत. अग्नी त्याची जिव्हा व कुश रोमावली आहे. दिवस व रात्र हे त्याचे नेत्र. वेद त्याचे अंग व श्रुती आभूषणे. गाढ उपनिषदे ही त्याच्या बसण्याचे आसन आहेत. पृथ्वीची छायारूपी पत्नी नेहमीच त्याच्या जवळ असते. समुद्र, पर्वत, वन यांसहित पूर्ण पृथ्वी एकार्णवात बुडाली होती. भगवंतांनी वराहाचे रूप धारण करून पृथ्वीस आपल्या दाढेतून वर काढले. सर्व पृथ्वीचा त्यांनी उद्धार केला.

या वराह-अवतारानंतर भगवान नरसिंहाचा अवतार झाला. प्राचीन काळातील सत्ययुगाची ही हकीगत आहे. दैत्यांचा आदिपुरुष देवशत्रू बलाभिमानी हिरण्यकशिपू. त्याने फार मोठी तपस्या केली. साडेअकरा हजार वर्षांपर्यंत शम, दम तथा ब्रह्मचर्य पालन करून, मौन राहून तो उपवास करीत राहिला. स्वत: ब्रह्मदेव त्याला प्रसन्न झाले. त्याने हिरण्यकशिपूस एक वर दिला. या वरानुसार तो अवध्य ठरला. देव, असुर, गंधर्व, यक्ष, नाग, राक्षस, तपस्वी, ऋषी, अस्त्र, शस्त्र यांपासून तो निर्भय बनला. दैत्य राजाने सर्व प्रजेस कष्ट दिले. आश्रमात राहणाऱ्या सत्यधर्मपरायण, जितेन्द्रिय, व्रतधारी मुनींना त्याने सतावण्यास प्रारंभ केला. वरदानाने मत्त होऊन त्याने अतिशय अत्याचार केले. कष्टी देवदेवतांची विनंती ऐकून स्वत: भगवान श्रीहरी हिरण्यकशिपूच्या घरी गेले. त्यावेळी त्यांचे अर्धे शरीर मनुष्याचे व अर्धे सिंहाचे होते. या नरसिंहदेहाचा वर्ण श्याम होता. त्याचे शब्द मेघाप्रमाणे गंभीर होते. मतवाल्या सिंहाप्रमाणे त्याची चाल होती. भगवान नरसिंहाने हिरण्यकशिपूचा वध करून त्याला यमलोकास पाठविले.

असेच एक वामनरूप धारण करून भगवानांनी दैत्यांचा नाश केला. असे वामनाचे रूप घेऊन ते बळीच्या यज्ञात गेले व त्यांनी त्याच्यापासून त्रिपादभूमीची मागणी करून त्याचा पराभव केला. त्यानंतर भगवान विष्णूने दत्तात्रेयांचा अवतार धारण केला. त्यावेळी वेद, वेदांतील प्रक्रिया, यज्ञ इत्यादी सारे नष्ट झाले होते. चार वर्णांचा संकर झाला होता. धर्म शिथिल बनला होता. अधर्माची वाढ होत

गेली. सत्य संपून असत्याचा जोर वाढला. अशा प्रसंगी दत्तात्रेयांनी वेदांचा उद्धार करून यज्ञक्रिया पुन्हा सुरू केली. चार वर्णांना वेगवेगळी कामे वाटून दिली. दत्तात्रेय फार बुद्धिमान, वरददायक होते. त्यांनी हैहयराज कार्तवीर्यास वर दिला व राजास दोनांच्या ऐवजी एक हजार हात निर्माण झाले.

यानंतर भगवंतांनी परशुरामाचा अवतार धारण केला. राजा कार्तवीर्य अर्जुन युद्धात दुर्जय ठरला. परशुरामाने त्याचे सहस्र बाहू कापून काढले. या परशुरामाने एकवीस वेळा क्षत्रियांचा नाश केला. त्याने अश्वमेध यज्ञाचे एक अनुष्ठान केले. या यज्ञात परशुरामाने कश्यपाला सर्व पृथ्वीचे दान केले. हत्ती, घोडे, सुंदर रथ, गायी यांचे दान करून परशुराम महेन्द्रपर्वतावर निघून गेला. चोविसाव्या त्रेतायुगात भगवानांनी दशरथनंदन रामचंद्राचा अवतार धारण केला. रामाने विश्वामित्रांबरोबर जाऊन यज्ञांचे रक्षण केले. राक्षसांचा नाश करून रामचंद्रांनी धर्माची स्थापना केली. संपूर्ण धर्मज्ञाता राम प्रजेच्या कल्याणास महत्त्व देत. या रामाला सीता व लक्ष्मण यांच्यासह चौदा वर्षांचा वनवास भोगावा लागला. जनस्थानात रामचंद्रांनी अनेक महत्त्वाची अशी देवकार्ये केली. रावणाने नेलेल्या सीतेचा शोध त्यांनी महान् पराक्रम करून लावला. रावणाचा वध केला. यानंतर राजा रामचंद्राने आदर्शभूत असे राज्य केले. त्याच्या राज्यात अमंगल अशी हवा नव्हती. कोणी कोणाचे धन चोरीत नव्हता. कधी विधवांचे विलाप ऐकू येत नव्हते. जल, अग्नी व वादळ यांचे भय प्राण्यांना उरले नाही. वृद्धांना बालकांचे प्रेतकर्म करण्याचा प्रसंग आला नाही. स्त्रिया पति-परायणा होत्या. पृथ्वीवर डाकूंचे नावही नव्हते. एक श्रीरामच सर्वांचे स्वामी व रक्षणकर्ते होते. कधी कुणास रोग झाला नाही. त्यांच्या राज्यात देव, ऋषी, मनुष्य एकत्रित राहू लागले. त्यांच्या राज्यात नेहमीच ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद यांचा घोष ऐकू येत असे. सत्त्ववान, गुणवान असा हा राजा रामचंद्र आपल्या तेजाने तळपला. सूर्य व चंद्र यांच्यापेक्षा रामचंद्रांची शोभा वाढली होती.

या रामचंद्रांनंतर श्रीहरीचा अवतार मथुरेत झाला. त्याचे नाव

श्रीकृष्ण. त्यांनी शाल्व, शिशुपाल, कंस, द्विविद, अरिष्ट, वृषभ, केशी, दैत्यकन्या पूतना, कुवलयपीड हत्ती, चाणूर व मुष्टिक मल्ल इत्यादींचा नाश केला. बाणासुराचे हजार हात त्यांनी कापले. युद्धात नरकासुराचा संहार केला. महाबली कालयवनास भस्म केले. सर्व प्राण्यांचे हित करणारा हा अवतार सर्वांनाच प्रिय वाटला.

यानंतर विष्णुयशा नावाचा एक प्रसिद्ध कल्कीचा अवतार होईल. भगवान कल्की शंभल नावाच्या गावी अवतार धारण करतील. याही अवताराचे कार्य सर्व लोकांचे हित करण्याचेच राहील. सर्व लोकांनी भगवंतांच्या या अवतारकथा ऐकाव्यात. त्यांच्या रूपगुणांचे व पराक्रमांचे कीर्तन करावे. पापापासून या कथा ऐकून मुक्त व्हावे. समृद्धी व प्रचुर भोग यांची प्राप्ती करून घ्यावी. या अवतारांच्या वर्णनामुळे सर्व पापे दूर होतात.

३ तीर्थक्षेत्र माहात्म्य

कोणादित्य व सूर्यपूजन

भारतवर्षाच्या दक्षिण समुद्राच्या किनाऱ्यावर ओण्ड्र नावाचा एक सुविख्यात देश आहे. त्या देशातील ब्राह्मण श्राद्ध, दान, विवाह, यज्ञ, आचार्यकर्म इत्यादी कार्यांत श्रेष्ठ आहेत. षट्कर्मपरायण, वेदपारंगत, विद्वान, इतिहासवेत्ता, सर्वशास्त्रार्थकुशल, पुराणार्थ-विशारद, रागद्वेषरहित अशी त्यांची कीर्ती आहे. कुणी वैदिक अग्निहोत्रात, तर कुणी स्मार्त अग्नीच्या उपासनेत मग्न असत. स्त्री, पुत्र, धन, यांनी विभूषित असे हे लोक पवित्र उत्कल देशात राहात असत. या देशातील सूर्यक्षेत्राचा महिमा विशेष आहे.

लवणसमुदाचा उत्तरतट अतिशय मनोहर व पवित्र आहे. तो सर्वत्र वाळूच्या राशीने आच्छादित असा आहे. चंपा, अशोक, कण्हेर, गुलाब, नागकेसर, ताड, सुपारी, नारळ इत्यादी वृक्षांनी या प्रदेशाची शोभा वाढली आहे. याच प्रदेशात भगवान सूर्यनारायणाचे एक क्षेत्र

आहे. त्याचा विस्तार सर्व बाजूंनी एक योजन असून तेथे सहस्र किरणांनी सुशोभित असा सूर्यनारायण निवास करतो. या स्थानाचा महिमा कोणादित्य या नावाने असून हे स्थान भोग व मोक्ष देणारे आहे. येथे माघ शुद्ध सप्तमीस इंद्रियसंयमपूर्वक उपवास करावा. सूर्यदेवाचे स्मरण करून समुद्राचे स्नान करावे. देव, ऋषी, मनुष्य यांना तर्पण करावे. स्नान करून समुद्राच्या काठी सूर्योदयाच्या वेळी पूर्वेस तोंड करून बसावे. तांब्याच्या पात्रात लाल चंदनाने व जलाने एक अष्टदल कमलाची आकृती बनवावी. केशरयुक्त व गोलाकार आकृतीजवळ तीळ, तांदूळ, जल, लाल चंदन, लाल फूल व कुश ठेवावेत. अंगन्यास व कर-न्यास करून मोठ्या श्रद्धेने आत्मस्वरूप भगवान सूर्याचे ध्यान करावे. अष्टदल कमलाचे पूजन करावे. आकाशातील सूर्यदेवास आवाहन करावे. हातांच्या सुमुख, संपुट आदी मुद्रा कराव्यात. देवास स्नान घालून ध्यान करावे. भगवान सूर्यनारायण श्वेत कमलावर विराजमान आहे. त्याचे डोळे पिवळसर व शरीर लाल आहे. त्याला दोन हात आहेत. वर देणाऱ्या या सूर्याचे रूप अतिशय सुंदर आहे.

सूर्योदयाच्या सुमारास स्निग्ध शेंदुराप्रमाणे अरुण वर्णाच्या सूर्याचे दर्शन घेऊन त्याला अर्घ्य द्यावेत. गंध, धूप, दीप, नैवेद्य समर्पण करून जप, स्तुती, नमस्कार करून देवास विसर्जित करावे. या पूजेमुळे मनो-वांच्छित भोगांची प्राप्ती होते. सूर्याला अर्घ्य दिल्याशिवाय श्रीविष्णू, शंकर अथवा इंद्र यांचे पूजन करू नये. सुंदर फुले आणि चंदन यांनी प्रत्येक दिवशी सूर्यनारायणाचे पूजन करावे.

भगवान सूर्याचा महिमा

मुनिवर्यांनी ब्रह्मदेवास विचारले, 'भोग-मोक्ष देणाऱ्या भास्कराच्या उत्तम क्षेत्राचं वर्णन आम्ही ऐकलं, पण या भास्कराची भक्ती कशी करायची ?' या प्रश्नास उत्तर देताना ब्रह्मदेवांनी सूर्याचा महिमा कथन केला. ते म्हणाले की मन, चित्त लावून इष्टदेवाबद्दल जी भावना व्यक्त होते तीस भक्ती वा श्रद्धा म्हणतात. अशी इष्टदेवाची कथा ऐकणारा, सांगणारा, भक्तांची पूजा करणारा, अग्नीच्या उपासनेत

मग्न होणारा भक्त असतो. तो सतत इष्टदेवाचे चिंतन करतो. त्याचेच मनन तो करतो. त्याच्याच पूजेत तो रमतो. इतर देवतांना नावे न ठेवता सूर्योपासक नित्य भास्कराच्या व्रतात निमग्न असतो. भगवान सूर्याचे स्तवन, त्याचा जप, उपाहारसमर्पण, पूजन, उपवासव्रत, भजन इत्यादींनी मनुष्य पापांपासून मुक्त होतो. भक्तिपूर्वक सूर्याला प्रदक्षिणा केल्यास सात द्वीपांसह पृथ्वीची परिक्रमा केल्यासारखे होते. षष्ठी वा सप्तमीस जो एकवेळ भोजन करून व्रत पाळून सूर्याची उपासना करतो त्याला अश्वमेधयज्ञाचे फल मिळते.

शुक्ल पक्षाच्या सप्तमीस रविवार असेल तर तीस विजयासप्तमी म्हणतात. त्या दिवशी स्नान, दान, तप, होम, उपवास केल्याने थोर पातकांचा नाश होतो. सफेद, लाल अथवा पिवळ्या मातीने सूर्याच्या मंदिरास लिंपावे. निराहार राहून सुगंधित पुष्पांनी सूर्याची पूजा करावी. तूप अथवा तेल वापरून जो सूर्यास दीप ओवाळतो तो कधी अंध होत नाही. दीपदान देणारा नेहमी ज्ञानाने प्रकाशित राहतो. जळत्या दिव्याची कधी चोरी करू नये. दीपहर्ता मनुष्य बंधन, नाश, क्रोध यांनी नरकाचा धनी होतो. उदयकाली प्रत्येक दिवशी सूर्यास अर्घ्य दिल्यानें एक वर्षात सिद्धी प्राप्त होते. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत सूर्याकडे टक लावून कोणत्या तरी मंत्राने वा स्तोत्राने त्याची आराधना करणे यास आदित्यव्रत म्हणतात. सूर्योदयास मोठ्या श्रद्धेने दानधर्म करून सर्व पापांपासून सुटका करून घ्यावी. अग्नी, जल, आकाश, पवित्र भूमी, प्रतिमेची वेदी इत्यादी ठिकाणी सूर्यास अर्घ्य द्यावेत. छत्र, ध्वजा, चांदवा, पताका, चवरी इत्यादी वस्तू श्रद्धेने सूर्यास अर्पण कराव्यात.

भगवान सूर्याच्या उदयाबरोबरच जगताचा अंधार दूर होतो. म्हणून त्याच्याशिवाय दुसरा मोठा देव नाही. तोच सर्व जगाचा स्वामी, साक्षी व पालक आहे. तोच वारंवार जीवसृष्टीची उभारणी व संहारणी करतो. तोच धाता, विधाता, सर्व भूतांचे आदिकारण व सर्व जीवांचा निर्माता आहे. तो कधीच क्षीण होत नाही. तो पितरांचा पितर व देवांचा देव आहे. सर्व योगी आपल्या कलेवराचा त्याग करून

वायुरूप तेजोराशीत, म्हणजे सूर्यातच प्रवेश करतात. अव्यक्त परमात्माच बारा रूपांत विभक्त होऊन आदित्यरूपाने प्रकट झाला आहे. इंद्र, धाता, पर्जन्य, त्वष्टा, पूषा, अर्यमा, भग, विवस्वान्, विष्णू, अंशुमान, वरुण व मित्र या बारा रूपांनी सूर्य जगास व्यापून राहिला आहे. म्हणून या बारा मूर्तींचे ध्यान करावे.

जर सूर्य सनातन आदिदेव आहे तर त्याने वरप्राप्तीसाठी तपस्या का केली ? या प्रश्नाचे उत्तर ब्रह्मदेवांनी दिले. एके काळची हकीगत. महायोगी नारद मेरू गिरीच्या शिखरावरून गंधमादन पर्वतावर आले. येथे मित्रदेव तपस्या करीत होता. नारदांच्या मनात कुतूहल उत्पन्न होऊन त्यांनी विचारले,

'भगवन्, सर्व वेद व पुराणं आपल्या महिम्याचं गायन करतात. आपण अजन्मा, सनातन, धाता व उत्तम अधिष्ठान आहात. आपण सर्वांचे माता-पिता आहात. मग आपण कुणाची आराधना करता ?'

'ब्रह्मन्, आपण भक्त असल्यानं मी हे सनातन असं गोपनीय रहस्य सांगतो. जो सूक्ष्म, अविज्ञेय, अव्यक्त, अचल, ध्रुव, इंद्रियरहित, सर्व जीवांचा आत्मा आहे त्यालाच क्षेत्रज्ञही म्हणतात. त्यालाच भगवान हिरण्यगर्भ असंही नाव आहे. तो स्वतः शरीररहित असूनही सर्व शरीरांत निवास करतो. पुन्हा तो कर्मांनी लिप्त नसतो. तो सगुण, निर्गुण, विश्वरूप व ज्ञानगम्य मानला गेला आहे. त्याला सर्व बाजूंनी हात-पाय आहेत. त्याला सर्व बाजूंनी डोळे, मुख, कान असून तो स्वेच्छाचारी आहे. तो सर्व क्षेत्रांत एकटाच सुखपूर्वक विहार करतो. तोच एकमात्र महान असून तोच सनातन महापुरुष आहे. तोच परमात्मा शंभर, हजार, लाख, कोटी रूपांनी प्रकट होतो. तो परमात्मा अक्षय, अप्रमेय, सर्वव्यापी आहे. त्याहून श्रेष्ठ देव नाही की पितर नाही. म्हणून मी त्याची पूजा करतो. त्याची आराधना करतो. तो सर्वात्मा, सर्वगत व निर्गुण आहे. मी भगवान सूर्याला असंच मानून त्याचं पूजन करतो. नारदा, याच भावनेनं सर्वांनी सूर्याची पूजा करावी.'

अदितीच्या गर्भातून मार्तंड

भगवान सूर्य सर्वांचा आत्मा, सर्वांचा ईश्वर व देवांचा देव आहे. अग्नीत विधिपूर्वक टाकलेली आहुती सूर्यालाच पोचते. सूर्यापासूनच वृष्टी होते. वृष्टीमुळे अन्न पिकते. अन्नामुळे प्रजेचा जीवननिर्वाह होतो. क्षण, मुहूर्त, दिन, रात, पक्ष, मास, संवत्सर, ऋतू व युग हे कालमापन सूर्यामुळेच शक्य होते. आदित्य, सविता, सूर्य, मिहिर, अर्क, प्रभाकर, मार्तंड, भास्कर, भानू, चित्रभानू, दिवाकर व रवी या बारा नावांनी सूर्याचा बोध होतो. सूर्यच चैत्रात विष्णू, वैशाखात अर्यमा, ज्येष्ठात विवस्वान्, आषाढात अंशुमान, श्रावणात पर्जन्य, भाद्रपदात वरुण, आश्विनात इंद्र, कार्तिकात धाता, मार्गशीर्षात मित्र, पौषात पूषा, माघात भग व फाल्गुनात त्वष्टा नावाने तापतो. यांशिवाय सूर्याची आणखी हजारो नावे आहेत.

मध्येच मुनींनी विचारले,

'भगवन्, आपण सूर्यास सनातन निर्गुण देव म्हटलं. तो बारा रूपांनी प्रकट झाला असंही आपण सांगितलं. हा तेजोराशी कोणत्या स्त्रीच्या गर्भातून प्रकट झाला ? काही सांगाल ?'

ब्रह्मदेवानें सूर्याच्या जन्माची कथा सांगितली. प्रजापती दक्षाच्या साठ कन्या. अदिती, दिती, दनू, विनता इत्यादी नावे त्यांचीच. त्यांतील तेरा कन्यांचा विवाह दक्षाने कश्यपांशी केला. अदितीने देवांना जन्म दिला. दितीपासून दैत्य व दनूपासून बलाभिमानी दानव यांची निर्मिती झाली. दक्षसुतांच्या पुत्रांनी, पौत्रांनी, दौहित्रांनी संपूर्ण जगत व्यापून गेले. माता अदितीच्या लक्षात आले की, दैत्य व दानव यांनी आपल्या पुत्रांना, देवांना सतत त्रास दिला आहे. तेव्हा तिने कष्टदायक अशी भगवान सूर्याची आराधना केली. ती म्हणाली,

'भगवन्, आपण अत्यंत सूक्ष्म, पवित्र व अनुपम तेज धारण करणारे आहात. आपणांस नमस्कार असो.'

अशी पुष्कळ दिवसपर्यंत तपस्या केल्यावर अदितीने भगवान सूर्यनारायणाचे दर्शन घेतले. ती सूर्यनारायणास म्हणाली,

‘ जगाच्या आदिकारणा सूर्या, आपण माझ्यावर प्रसन्न व्हावं. प्रभो, मी आपलं दर्शन नीट करू शकत नाही. मी ते नीट पाहीन अशी कृपा करा ना. आपण माझ्या पुत्रांवर दया करा. ते आपलेच भक्त आहेत. ’

‘ देवी, तुझी इच्छा काय आहे ? कुठलाही वर माग ना तू. ’

‘ देवा, आपण प्रसन्न व्हावं. अधिक बलवान दैत्य व दानव माझ्या पुत्रांच्या हातून त्रैलोक्याचं राज्य व यज्ञभाग हिरावून नेतात. गोपते, आपण त्यांच्यावर कृपा करावी. ’

‘ देवी, मी माझ्या हजाराव्या अंशानं तुझ्या गर्भातून प्रकट होईन. तुझ्या पुत्रांच्या शत्रूंचा मी नाश करीन. ’

आपले मनोरथ सिद्धीस जातात असे पाहून अदितीने तपस्या कमी केली. एका वर्षाच्या आतच भगवान सविताने तिच्या गर्भात निवास केला. या दिव्य गर्भास वाढविण्यासाठी ती कृच्छ्र व चांद्रायण व्रते करू लागली. तिचा हा कठोर नियम पाहून एकदा कश्यपाने रागावून विचारले,

‘ तू नित्य उपवास करून या गर्भास विनाकारण पीडा का देतेस ? ’

‘ पाहिलंत ? हा माझा गर्भ. मी याला मारलं नाही. ’ असे म्हणून अदितीने त्याच वेळी गर्भविमोचन केले. उदयकालीन सूर्याप्रमाणे अंडाकार गर्भाचा प्रकाश चमकत होता. कश्यपाने वैदिक मंत्रांनी त्याचे स्तवन केले. स्तुती ऐकून त्या गर्भातून एक बालक प्रकट झाले. त्याचे तेज संपूर्ण दिशांतून भरून राहिले. यावेळी एक आकाशवाणी झाली, ‘ मुनें, तूच अदितीस म्हणाला होतास ना ? ‘ त्वया मारितम् अण्डम्–’ तूच गर्भातील बालक मारलेस ? यासाठी तुझ्या या पुत्राचं नाव मार्तंड राहील. तो यज्ञभागाचा अपहार करणाऱ्या शत्रूचा नाश करील. ’

आकाशवाणी ऐकून देवांना अतिशय हर्ष झाला. दानवांचा उत्साह कमी झाला. इंद्राने देवांसह दैत्यांशी युद्ध केले. देव व असुर यांच्यांत युद्ध झाले. भगवान मार्तंडाने दैत्यांकडे पाहताच ते त्याच्या तेजाने जळून भस्म झाले. मग देवांना अतिशय हर्ष झाला. त्यांनी

अदिती व मार्तंड यांची स्तुती केली. देवांनी आपापल्या अधिकारानुसार यज्ञभागाचा स्वीकार केला. भगवान मार्तंडही आपल्या अधिकाराचे पालन करू लागला.

देवदेवतांनी सूर्याची मनापासून स्तुती केली. ते म्हणाले, ' भगवान, आपण आदिदेव आहात. तुम्हीच देवाधिदेव दिवाकर आहात. भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः, सत्य ही सारी तुमचीच स्वरूपं आहेत. यज्ञ, वेद, लोक यांत तुम्हांस परमात्मा म्हणतात. तुम्हांस नमस्कार असो. भगवन्, तुम्ही कारणाचं कारण आहात. पापांपासून तुम्हीच मुक्त करता. दैत्यांना पीडा तुम्हीच देता. तुम्हांस वारंवार नमस्कार असो. तुम्ही सर्वांनाच धन, सुख व उत्तम बुद्धी द्यावी. '

यानंतर सूर्याने सृष्टीचे पालन व्यवस्थित रीतीने केले.

एकाम्रक्षेत्र व पुरुषोत्तमक्षेत्र

एकाम्रक्षेत्र सर्व पापांचे हरण करणारे क्षेत्र आहे. वाराणशीप्रमाणेच कोटी शिवलिंगांनी युक्त असे हे क्षेत्र असून पूर्वकल्पात तेथे एक आम्र-वृक्ष होता. याच नावांनी आठ तीर्थांचे हे क्षेत्र प्रसिद्ध झाले. या क्षेत्रात विद्वानांची वसती असून हे धनधान्याने समृद्ध आहे. महल, प्रसाद, मंदिरे, रस्ते, उद्याने, यांनी या क्षेत्राची शोभा वाढलेली आहे. मुनि-वरांना या क्षेत्राची माहिती देताना ब्रह्मदेव म्हणाले,

या क्षेत्रात प्रत्येक दिवशी उत्सवच असतो. नाना प्रकारची वाद्ये वाजतात. देवमंदिरांत कार्यक्रम सुरू असतात. येथील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र सर्वच लोक मोठे धार्मिक असून आपापल्या धर्मकार्यांत मग्न असतात. या क्षेत्रात कुणी निर्धन, मूर्ख, द्वेष करणारा, नीच, मायावी, रूपहीन, दुराचारी, परद्रोही नाही. सर्वांनाच येथे सुख मिळते. नाना प्रकारच्या पक्ष्यांचा कलरव सुरू असतो. वृक्ष नेहमी फुलांनी–फळांनी भरलेले असतात. दीर्घिका, वापी, तडाग, पुष्करिणी सतत फुललेल्या कमलांनी शोभिवंत दिसतात. सर्व लोकांच्या हितासाठी भगवान शंकरांचा निवास या क्षेत्रात असतो. भोग व मोक्ष यांचे ते दाते आहेत. या क्षेत्रात त्यांनी बिंदुसरोवराची स्थापना केली. यात स्नान केल्याने

अश्वमेधयज्ञाचे पुण्य मिळते. येथे पितरांना पिंड दिल्यास त्यांना अक्षय तृप्ती मिळते.

स्नानानंतर शांत व मौन होऊन शंकरांच्या मंदिरात जाऊन त्यांची पूजा करावी. तीन प्रदक्षिणा घालाव्यात. शंकरांस दूध व तूप यांचा अभिषेक करून त्यांच्या सर्व अंगास सुगंधी चंदन लावावे. बिल्व-पत्र, ओक, कमळ वाहून महादेवांचे पूजन करावे. अशी पूजा करणारा मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होतो. भगवान शिवापासून चारही दिशांना दीड दीड योजनपर्यंत हे क्षेत्र भोग व मोक्ष देणारे आहे. त्याच्या उत्तरेस भास्करेश्वर नावाचे एक शिवलिंग आहे.

समुद्राच्या उत्तर तटावर त्या प्रदेशात एक गोपनीय असे मुक्ति-क्षेत्र आहे. या परमदुर्लभ क्षेत्राचा विस्तार दहा योजने आहे. येथील भूमी सर्वत्र वाळूने झाकलेली आहे. अशोक, अर्जुन, पुंनाग, नारळ, ताड, कैथ, कण्हेर, आम्र, बेल, गुलाब, कदंब, नागकेशर, पिंपळ, आवळा इत्यादी वृक्षांनी त्या स्थानाची शोभा वाढलेली आहे. शिवाय आणखी सुगंधित फुलांच्या वेली व लता आहेतच. ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यासी इत्यादींची वसती या क्षेत्रात आहे. सर्व विद्यांचे हे स्थान असून येथील भगवान श्रीकृष्ण पुरुषोत्तम नावाने प्रसिद्ध आहे. उत्कल प्रांताची सीमा जेथपर्यंत आहे तो समुद्रापर्यंतचा सर्व भाग श्रीकृष्णाच्या प्रसादाने संपन्न असा आहे. या देशात विश्वात्मा भगवान पुरुषोत्तमाचा निवास आहे. ते जगद्व्यापी जगन्नाथ आहेत. ब्रह्मा, शिव, इंद्र, अग्नी इत्यादी देवांचाही निवास या क्षेत्रात आहे. गंधर्व, अप्सरा, पितर, देव, मनुष्य, यक्ष, विद्याधर, सिद्ध, मुनी, वालखिल्यादी ऋषी, कश्यपादी प्रजापती, गरुड, किन्नर, नाग इत्यादींचा निवास येथेच आहे. सर्व तीर्थांचा राजा समुद्र. त्यात स्नान करून पुरुषोत्तमाचे दर्शन घ्यावे. त्याचे जीवन सफल होईल. कारण भगवंतांच्या मुखकमलदर्शनाने सर्व लोकांना आनंदच होतो. त्याचे नेत्र विशाल व सुंदर आहेत. त्याच्या भुवया, त्याचे केस, त्याचा मुकुट, कानांतील मनोहर कुंडले, त्याचे सुहास्य, त्याची दंतपंक्ती, सुंदर नाक, सुंदर कपोल, ललाट सर्व काही उत्तम गुणलक्षणांनी युक्त आहे.

याच पुरुषोत्तमक्षेत्रात इंद्रद्युम्नाने अश्वमेध यज्ञ करून पुरुषोत्तमप्रासाद निर्माण केला.

नृसिंह व श्वेतमाधव

बलराम, श्रीकृष्ण, सुभद्रा यांचे दर्शन घेऊन असुरराज हिरण्यकशपूचा वध करणाऱ्या भगवान नृसिंहाचे दर्शन घ्यावे. या नृसिंहाचे समस्त वर्णन खरोखर कोण करू शकेल ? या लोकात कोणतीही दैवी वा मानुषी सिद्धी नृसिंहामुळे आहे. स्वर्ग, मर्त्यलोक, पाताळ, दिशा, जल, गाव, पर्वत इत्यादी स्थानांवर नृसिंहाची गती अबाध आहे. भगवान नृसिंहास असाध्य अशी कोणतीच वस्तू नाही. सनातन कल्पराज, नृसिंहाच्या पूजेचा विधी, नृसिंहतत्त्व हे सर्व ऐकण्यासारखे आहे. साधकाने इंद्रियांवर विजय मिळवून साध्या आहारावर किंवा दूध पिऊन असावे. वन, एकान्त, पर्वत, नदीसंगम, सिद्धक्षेत्र इत्यादी ठिकाणी अथवा नृसिंहमंदिरात जाऊन भगवानाची विधिपूर्वक पूजा करावी.

शुक्ल पक्षाच्या द्वादशीस उपास करून जितेन्द्रिय भावाने वीस लाख जप करावा. हे करण्याने साधक उपपातक व महापातक यांतून मुक्त होईल. भगवान नृसिंहाला प्रथम प्रदक्षिणा करून चंदन व धूप आदींनी त्याची पूजा करावी. मस्तक झुकवून प्रणाम करावा. भगवानाच्या डोक्यावर कापूर, चंदनासह चमेलीचे फूल अर्पण करावे. यामुळे भगवान कृपा करील. ब्रह्मा, रुद्र आदी देवही त्याचे तेज सहन करू शकत नाहीत. नृसिंहभक्ताला पाहून असुर नष्ट होतात. तो आपल्या भक्तांचे रक्षण नेहमीच करतो. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, स्त्री, शूद्र, अंत्यज सुरश्रेष्ठ नृसिंहाची भक्तिपूर्वक पूजा करून कोटिजन्मांचे पाप दूर करतात. मनोवांच्छित फळ मिळवतात. संग्राम, संकट, दुर्गमस्थान, चोर-व्याघ्र-पीडा, विष, अग्नी, जल यांची बाधा, राजभय, समुद्रभय, ग्रहरोगभय इत्यादी आपत्तींतून नृसिंहाच्या स्मरणाबरोबर मुक्तता होते.

अनंत नावाच्या वासुदेवाचे दर्शनही भक्तिपूर्वक केल्याने सर्व पापांचा नाश होतो. ब्रह्मा, इंद्र, बिभीषण यांनीही त्याची प्रार्थना केली होती. श्वेतगंगेत स्नान करून श्वेतमाधवाचे व मत्स्यमाधवाचे दर्शन

करावे. सत्ययुगात श्वेत नावाचा एक बलवान राजा होता. तो मोठा बुद्धिमान, शूर, सत्यप्रतिज्ञ व दृढपूर्वक व्रत पालन करणारा होता. त्याच्या राज्यातील लोकांना दहा हजार वर्षांचे आयुष्य होते. कोणा बालकाचा मृत्यू होत नसे.

त्याच्या राज्यात कपालगौतम नावाचा एक धर्मात्मा ऋषी होता. त्याला एक पुत्र झाला. दात येण्यापूर्वीच त्यास मृत्यू आला. त्याला हातात घेऊन तो बुद्धिमान ऋषी राजाकडे आला. त्याकडे पाहून राजा म्हणाला,

'हे तुझं बालक यमलोकी गेलं आहे. सात दिवसांत परत आलं नाही तर मी जळत्या चितेत उडी टाकीन.'

इतके म्हणून राजाने लाख नीलकमलांनी महादेवाची पूजा करून तो त्याचा मंत्र जपू लागला. राजाची निष्ठा पाहून शंकर पार्वतीसह प्रकट झाले व म्हणाले,

'राजा, मी तुझ्यावर फार संतुष्ट आहे.'

राजाने महादेवाकडे पाहिले. महादेवाच्या अंगावर भस्म लावलेले होते. शरदाच्या चांदण्याप्रमाणे त्याची कांती होती. त्याचे नेत्र विकट होते. अंगावर व्याघ्रचर्माचे वस्त्र व ललाटावर चंद्रकोर. राजाने महादेवास नमस्कार करून विनम्र वृत्तीने म्हटले,

'प्रभो, आपणांस माझ्यावर दया करायची असेल तर या ब्राह्मणाच्या बालकास जिवंत करा.'

श्वेतराजाची ही विनंती ऐकून महादेवास संतोष झाला. त्याने कालास आज्ञा करून बालकास सजीव केले. व महादेव पार्वतीसह गुप्त झाला.

राजाने त्यानंतर हजारो वर्षे राज्य केले. त्याने भगवान केशवाची आराधना करून दक्षिण समुद्राच्या पुरुषोत्तमक्षेत्रात जगन्नाथाच्या जवळच एका सुंदर व रमणीय क्षेत्रात एक मंदिर निर्माण केले. श्वेतशिलेची एक मूर्ती स्थापन करून त्या श्वेतमाधवास त्याने साष्टांग नमस्कार केला. एक महिना त्याने मौन धारण करून निराहार राहून द्वादशाक्षर मंत्राचा जप केला. जप पूर्ण झाल्यावर त्याने भगवान देव-

देवेश्वराची स्तुती केली. तो म्हणाला,

'ॐ वासुदेवास नमस्कार असो. सर्वांना आपणांकडे खेचून घेणाऱ्या संकर्षणास नमस्कार असो. प्रद्युम्न, अनिरुद्धाला नमस्कार असो. वराहरूपधारी, अच्युता, ॐ बालरूपधारी, भगवान विष्णू, केशव, नारायण, माधव, गोविंद इत्यादी नावांनी शोभणाऱ्या देवास नमस्कार असो. हिरण्यरेता अग्निदेव, मधुसूदन, पीतांवरधारी वामन, गुणस्वरूप व निर्गुणस्वरूप, अशा देवा, तुला नमस्कार असो. वामनकर्मा, वामन-वाहना, अव्यक्तस्वरूपा, चैतन्यस्वरूपा, सौम्यरूपा, रुद्रा, उद्धारकर्त्या, भगवाना, तुला नमस्कार असो. ॐ दिव्यरूप सोम, अग्नी व वायू यांच्या रूपास नमस्कार असो. चंद्रमा व सूर्य यांची किरणं तुझे केस आहेत. गोब्राह्मणांचं हित करणारा तू आहेस. ऋग्वेदाच्या मंत्रांनी तुझीच पूजा होते. यजुर्वेदरूपधारी भगवानास प्रणाम असो. देवा, श्रीपते, श्रीधरा, परमात्म्या, सामयोगाच्या ज्ञात्या, तुला नमस्कार असो. अथर्वशीर्ष, अथर्वस्वरूप, अथर्वपाद, अथर्वकर असणाऱ्या परमेश्वरा, तुला नमस्कार असो. ॐ वज्रशीर्षा, तुला नमस्कार असो. इंद्रियांच्या नियंत्या, हृषीकेशा, तुला प्रणाम असो. भगवान वासुदेवा, श्रीहरी, मोहनाशका, विश्वसंहारकारी प्रभो, तेजःस्वरूपा, तुला नमस्कार असो. वासुदेवा, वंदनीया, वामदेवा, तुला नमस्कार असो. वसूची म्हणजे धनाची उत्पत्ती करणाऱ्या देवा, दिव्य मुकुट धारण करणाऱ्या देवा, यज्ञरूपा, यज्ञेश्वरा, योगी भगवाना, तुला नमस्कार असो. शरणागत-वत्सला, मी संपूर्ण भावानं तुला शरण आलो आहे. देवा, केशवा, अच्युता, माझ्या शरीराचा व मनाचा मल तू दूर कर. देवा, मी सर्व-संगाचा त्याग करून तुला शरण आलो आहे. आता केवळ तुझाच संग करीन. त्यामुळं मला आत्मलाभ होईल. मी आध्यात्मिक आदी तीन तापांनी खिन्न आहे. म्हणून मी तुला शरण आलो आहे. प्रभो, संसारी जीवास क्षणभरही सुख नाही. गोविंदा, माझं रक्षण कर.'

राजाची ही स्तुती ऐकून देवाधिदेव जगद्गुरू श्रीहरी सर्व देवांसह राजाच्या पुढे उभे राहिले. त्यांचा वर्ण नीलवर्णाच्या मेघाप्रमाणे श्यामल होता. डोळे मोठे होते. हातात पांचजन्य शंख, गदा, शर्ङ्गधनुष्य, खड्ग

अशी आयुधे होती.

'राजा, मी प्रसन्न आहे. इच्छेस येईल तो वर माग.'

'देवा, मी तुझा थोर भक्त असेन तर ब्रह्मलोकाच्याही वर असणाऱ्या वैकुंठलोकास मला घेऊन चल. जगत्पते, माझे मनोरथ पूर्ण होतील.'

'राजेन्द्रा, देव, मुनी, सिद्ध, योगी यांनाही ज्याची प्राप्ती होत नाही असं स्थान मी तुला देईन. मी इथं नेहमीसाठी राहीन. या तीर्थास सर्वजण श्वेतगंगा म्हणून ओळखतील. कुशाच्या अग्रभागानं जो या तीर्थाचं सेवन करील तो स्वर्गास जाईल. इथं स्थापन झालेल्या श्वेतमाधवाचं दर्शन जो घेईल त्याला शांत पद प्राप्त होईल.'

मत्स्यमाधवाचा महिमा

श्वेतमाधवाच्या जवळच मत्स्यमाधव आहे. पूर्वी एकार्णव जलात जो मत्स्यरूपाने माधव वेदांचा उद्धार करणारा झाला तोच हा मत्स्यमाधव. भगवानाचा हा आदी अवतार होय. येथे आल्यावर प्रथम मार्कंडेयसरोवरात स्नान करावे. येथे आणखी अक्षयवट, श्रीकृष्ण-बलराम, समुद्र व इंद्रद्युम्न अशी चार तीर्थे आहेत. ज्येष्ठी पौर्णिमेस ज्येष्ठा नक्षत्र असेल तर येथील यात्रा विशेष महत्त्वाची असते. कल्पवृक्षवट या रमणीय तीर्थात स्नान करून एकाग्र चित्ताने भगवान जनार्दनाची परिक्रमा करावी. वट, वटेश्वर, कृष्ण व पुराणपुरुष अशी नावे या वटाला मिळाली आहेत. वटास नमस्कार करून तीनशे धनुष्यांच्या अंतरावर दक्षिणेस जावे. येथे भगवान विष्णूचे दर्शन होते. यालाच स्वर्गद्वार असे नाव आहे. येथेच समुद्राच्या जलाने आकृष्ट केलेले सर्वगुणसंपन्न असे काष्ठ आहे. त्याला प्रणाम करावा.

स्वर्गद्वारापासून समुद्रावर जाऊन आचमन करून पवित्र भावनेने नारायणाचे ध्यान करावे. अष्टाक्षर मंत्राने अंगन्यास व करन्यास करावा. ॐ नमो नारायण हा मंत्र सर्व मनोरथ सिद्ध करणारा आहे. नारायणाची प्रार्थना करून खालील मंत्र म्हणावा.

त्वमग्निर्द्विपदां नाथ रेतोधः कामदीपनः ।
प्रधानः सर्वभूतानां जीवानां प्रभूरव्ययः ।।

अमृतास्यारणिस्त्वं हि देवयोनिरपां पते ।
वृजिनं हर मे सर्वं तीर्थराज नमोऽस्तुते ।।

' नाथा, आपणच अग्नी आहात. मनुष्य आदी सर्व जीवांचे वीर्य व कामाचा दीप प्रज्वलित करणारे आपणच आहात. आपण सर्व भूतांत प्रधान असून जीवांचे अविनाशी प्रभू आहात. समुद्रा, आपण तर अमृताचं उत्पत्तिस्थान व देवांचं जन्मस्थान आहात. तीर्थराजा, माझ्या मनातील सर्व पापं दूर कर. मी आपणांस नमस्कार करतो. '

हा मंत्र उच्चारून स्नान करावे. तीन वेळा अघमर्षण मंत्राचा जप करावा. स्नान झाल्यावर दोन निर्मल वस्त्रे परिधान करावीत. प्राणायाम, आचमन, संध्या, सूर्योपस्थान, गायत्री मंत्राचा जप इत्यादी झाल्यावर सूर्याला नमस्कार करावा. त्यानंतर देव, ऋषी, मनुष्य, पितर यांना तर्पण करावे. तर्पणविधी झाल्यानंतर समुद्राच्या तटावर मौन-भावाने आचमन करून एक चौकोनी मंडल करावे. त्यात अष्टदल कमल काढावे. त्यातील अजन्मा भगवान नारायणाची पूजा अष्टाक्षर मंत्राने करावी. ' ॐ नमो नारायणाय ' या मूल मंत्राने भगवान नारायणाची, अच्युताची पूजा करावी.

ब्रह्मदेवांनी याप्रमाणे मत्स्यमाधवाचा महिमा मुनींना समजावून दिला. समुद्राचा मार्जनविधी सविस्तर सांगितला. अष्टाक्षर मंत्राची महत्ता वर्णन केली. त्यानंतर भगवान पुरुषोत्तमाची पूजा, त्याच्या दर्शनाचे फल, इंद्रद्युम्नसरोवराचा सेवनविधी, ज्येष्ठी पौर्णिमेस दर्शनाचे माहात्म्य इत्यादी सर्व गोष्टी विस्ताराने मुनींना सांगितल्या. इंद्रद्युम्न-सरोवरात उतरताना म्हणावे,

अश्वमेधाङ्गसम्भूत तीर्थं सर्वाघनाशन ।
स्नानं त्वयि करोम्यद्य पापं हर नमोऽस्तु ते ।।

' अश्वमेध–यज्ञाच्या अंगापासून प्रकट झालेल्या, व सर्व पापांचा नाश करणाऱ्या तीर्था, मी आज तुझ्यात स्नान करीत आहे. माझं पाप दूर करावंस. तुला मनापासून नमस्कार असो. '

ज्येष्ठ महिन्यातच पौर्णिमेस पुरुषोत्तमाचे दर्शन घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण पृथ्वीवर जी तीर्थे आहेत, ज्या नद्या आहेत, जी

जी सरोवरे आहेत, ज्या पुष्करणी आहेत या सर्वांना ज्येष्ठ शुक्ल दशमी-पासून पौर्णिमेपर्यंत पुरुषोत्तमतीर्थाचे महत्त्व प्राप्त होते. दहा पापांचा नाश करणारी ही तिथी दशहरा म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी म्हणजे दशमीस जे लोक श्रीकृष्ण, बलराम व सुभद्रा यांचे दर्शन घेतात त्यांना सर्व पापांपासून मुक्ती मिळते. उत्तरायण व दक्षिणायनाच्या आरंभी या देवांचे दर्शन घेणारा मनुष्य मुक्त होऊन वैकुंठास जातो. फाल्गुनी पौर्णिमेस जो मनुष्य पुरुषोत्तमास झोपाळ्यावर विराजमान झालेला पाहतो तो त्याच्या धामास जातो. ज्येष्ठी पौर्णिमेस येथील यात्रेचे महत्त्व विशेष असते.

श्रीकृष्ण, बलराम, सुभद्रा यांचे माहात्म्य

श्रीकृष्ण, बलराम व सुभद्रा यांच्या स्नानाचे महत्त्वही विशेष आहे. ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमेस ज्येष्ठा नक्षत्र असेल तर येथील सर्व तीर्थमय कूपांत अत्यंत निर्मल व पवित्र स्नान करावे. या दिवशी या कूपात प्रत्यक्ष भगवती गंगा अवतीर्ण होते. याच दिवशी या स्थानास चांगले सजवून फुलांनी व मोत्यांनी नटवितात. विविध वाद्यांचा गजर होत असतो. एका मंचावर श्रीकृष्ण व भगवान बलराम असतात. मध्ये सुभद्रा असते. जयजयकार करून स्नानविधी चालू होतो. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अन्य जातींचे लोक त्यावेळी तेथे उत्साहाने जमलेले असतात. गृहस्थ, स्नातक, संन्यासी, ब्रह्मचारी यांचीही गर्दी झालेली असते. पुष्पमिश्रित जलाने भगवानास स्नान घातले जाते. शंख, भेरी, मृदंग, झांजा, घंटा इत्यादींच्या ध्वनींबरोबर स्त्रिया मंगलगीते म्हणतात. मुनी वेदपाठ व मंत्रोचार करतात. सामवेदाचे गायन होते. यती, गृहस्थ, ब्रह्मचारी स्नानाच्या वेळी प्रसन्नतेने भगवानांचे स्तवन करतात.

श्रीकृष्ण व बलराम यांच्यावर रत्नदंड विभूषित चवऱ्या ढाळल्या जातात. आकाशात यक्ष, विद्याधर, सिद्ध, किन्नर, अप्सरा, देव, गंधर्व, चारण, आदित्य, वसू, रुद्र, साध्य, विश्वदेव, मरुद्गण, लोकपाल इत्यादी जमून भगवानांची स्तुती करताना म्हणतात,

' देवदेवेश्वर, पुराण पुरुषोत्तम, आपणांस नमस्कार असो. जगत्-

पालका, जगन्नाथा, आपणच या सृष्टीची निर्मिती करता, पालन करता, संहार करीत असता. आपणांस आमचा प्रणाम असो.'

गंधर्व गातात, अप्सरा नृत्य करतात. मेघ पुष्पमिश्रित जलाची वृष्टी करतात. शीतल वायू वाहतो. मुनी, सिद्ध, चारण जयजयकार करतात. देवदेवता भगवानांस अभिषेक करण्यासाठी येतात. इंद्र, सूर्य, चंद्रमा, धाता, विधाता, वायू, अग्नी, पूषा, भग, अर्यमा, त्वष्टा, दोन पत्नींसह विवस्वान, मित्र, वरुण, रुद्र, वसू, आदित्य, अश्विनीकुमार, विश्वेदेव, मरुद्गण, साध्य, पितर, विद्याधर, पितामह, पुलस्त्य, पुलह, अंगिरा, कश्यप, अत्री, मरीची, भृगू, ऋतू, हर, प्रचेता, मनू, दक्ष, धर्म, काळ, यम, मृत्यू, यमदूत व इतर अन्य देवदेवता भगवानांच्या अभिषेकाच्या वेळी जमतात. सुवर्णमयं कलशांतील पुष्पमिश्रित पाणी आकाशगंगेतून शिंपडून स्तुती करताना ते म्हणतात,

'संपूर्ण लोकांचे पालन करणाऱ्या जगन्नाथा, आपला जय असो. जय असो. आपण भक्तांचं रक्षण करणारे भक्तवत्सल व शरणागतवत्सल आहात. सर्व भूतांत आपणच व्यापक आदिदेव आहात. वासुदेवा, असुरांचा संहार आपण करता. मत्स्यरूप धारण करणाऱ्या देवा, आपला जयजयकार असो. आपण देवांचा राजा असून सूर्य आपला नेत्र आहे. वेदांत आपणच श्रेष्ठ असल्याचं सांगितलं आहे. आपणच कच्छप-अवतार धारण केला होता. आपण श्रेष्ठ यज्ञस्वरूप आहात. आपल्या नाभीतून कमल उत्पन्न झाले म्हणून आपण पद्मनाभ आहात. पहाडांवर विहार करणारे आपण योगशायी आहात. महान वेग धारण करणाऱ्या विश्वमूर्ती, चक्रधरा, भूतनाथा, धरणीधरा, शेषशायना, आपला जय-जयकार असो.

'आपण पीतांबरधारी आहात. आपली कांती चंद्रम्याच्या समान आहे. योगात आपला निवास असतो. अग्निमुखा, धर्माच्या आवास-स्थाना, गुणांच्या भंडारा, लक्ष्मीच्या निवासस्थाना, गरुडवाहना, आपला जय असो. आपण आनंदनिकेतन, धर्मध्वज, पृथ्वीचं आश्रयस्थान व दुर्बोध चरित्राचे आहात. योगी पुरुष आपणास जाणतात. यज्ञात निवास करणारे आपण वेदांचे वेद्य आहात. शांती देणारे आपण योग्यांचे ध्येय

आहात. आपणच ज्ञानाचे स्वरूप आहात. आपणच लक्ष्मीनिधी आहात. भावभक्तीनं आपलं ज्ञान होतं. आपल्या हातांत मुक्ती आहे. आपलं शरीर निर्मल आहे. आपणच सत्त्वगुणांचं अधिष्ठान, समस्त गुणांनी समृद्धशाली, यज्ञकर्ता, निर्गुण तथा मोक्ष देणारे आहात. भूमंडळास शरण देणाऱ्या परमेश्वरा, आपला जय असो.'

'आपली कांती दिव्य असून आपण भगवती लक्ष्मीनं युक्त असता. आपले डोळे कमलांप्रमाणे शोभिवंत आहेत. आपण सृष्टिकारक व योगयुक्त आहात. अळसीच्या फुलाप्रमाणं आपलं अंग श्यामल रंगाचं आहे. आपण समुद्रावर शयन करता. लोककांता, आपला जय असो. आपण परम शांत, परम सारभूत, चक्र धारण करणारे, सर्पांचे हात असलेले, नीलवस्त्रधारी, शांतिरक्षक, मोक्षदायक, सर्व पापं दूर करणारे असून बलरामाचे छोटे बंधू आहात. आपला जय असो. चक्र व गदा धारण करणाऱ्या नारायणा, आपलं वक्षःस्थल वनमालेनं आच्छादित आहे. आपला जय असो. लक्ष्मीकांता, विष्णू, आपणांस नमस्कार असो. आपला जय असो.'

इतकी प्रार्थना झाल्यावर सर्वजण श्रीकृष्ण, बलराम व सुभद्रा यांचे दर्शन घेतात. सहस्र गोदान, विधिवत भूदान, अर्घ्य, आतिथ्यपूर्वक अन्नदान, विधिवत वृषोत्सर्ग, ग्रीष्मकालात जलदान, इत्यादींचे फल या दर्शनाने मिळते. संपूर्ण तीर्थांत स्नान केल्याचे फल मंचस्थ श्रीकृष्ण, सुभद्रा व बलराम यांच्या दर्शनाने मिळते. भगवानांच्या स्नानानंतरच्या उरलेल्या पाण्याने स्नान करावे. अथवा ते आपल्या शरीरावर शिंपडावे. पुत्राची इच्छा करणाऱ्या स्त्रीस यामुळे पुत्र होतो. सुखाची इच्छा करणाऱ्या स्त्रीस सौभाग्य मिळते. रोगार्त नारी रोगमुक्त होते. धनाची इच्छा करणाऱ्या स्त्रीस धन मिळते. सर्व पापांपासून मुक्ती मिळते. येथील दक्षिणाभिमुख यात्रा करून वेद, शास्त्र, पुराणे, महाभारत इत्यादी धर्मशास्त्रांत सांगितलेले पुण्यकर्म घडते.

गुण्डिचा यात्रा, द्वादश यात्रा

गुण्डिचा नावाचे एक उद्यानमंदिर पुरीत इंद्रद्युम्नसरोवराच्या

तटावर आहे. त्याची यात्रा भगवान श्रीकृष्ण, बलभद्र व सुभद्रा करताना करावी. त्यांचे दर्शन घेणारे विष्णुलोकास जातात. ब्रह्मदेवांनी याही यात्रेची महती मुनींना सांगितली. फार पूर्वी राजा इंद्रद्युम्नाने भगवानांना प्रार्थना केली.

'माझ्या सरोवरातीरी आपली यात्रा एक सप्ताह तरी व्हावी.'

'राजन्, तुझ्या सरोवरातीरी एक सप्ताहाची यात्रा होईल. सर्व फलं देणारी ही यात्रा गुण्डिचा नावानं विख्यात होईल. मंडपात असलेल्या माझी, बलरामाची व सुभद्राची पूजा करणारे सर्व लोक भगवानांच्या कृपेस पात्र होतील.'

या गुण्डिचा यात्रेचे फल मोठेच आहे. प्रबोधिनी एकादशी, फाल्गुनी पौर्णिमा, विषुव योग या दिवशी विधिपूर्वक यात्रा करून श्रीकृष्ण, बलराम व सुभद्रा यांचे दर्शन घेणारा मनुष्य वैकुंठधामास जातो. सर्व क्षेत्रांत पुरुषोत्तमतीर्थ हे पवित्र, रमणीय, भोगमोक्ष देणारे आहे. जो जितेन्द्रिय ज्येष्ठमासात येथे शास्त्रोक्त विधीने बारा यात्रा करतो त्याला शेवटी मोक्ष मिळतो.

या बारा यात्रांनी सर्व पापांचा नाश होतो. ज्येष्ठातील शुक्ल पक्षातील एकादशीस एकाग्र चित्ताने येथील पवित्र जलाशयावर आचमन करावे व इंद्रियसंयमपूर्वक पवित्र भावाने सर्व तीर्थांना आवाहन करावे. भगवान नारायणाचे स्मरण करून विधिवत् स्नान करावे. स्नानाच्या नंतर नाव, गोत्र, देवदेवता, ऋषी, पितर, व अन्य जीव यांचे स्मरण करून तर्पण करावे. पाण्यातून बाहेर येऊन स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. विधिपूर्वक आचमन करून एकशेआठ गायत्रीचा जप मनात करावा. सर्व वेदांची माता गायत्री आहे. सर्व पापांचा परिहार करणारी ती आहे. याशिवाय इतर काही सूर्यमंत्र म्हणावेत. त्यानंतर तीन वेळा परिक्रमा करून सूर्यदेवास नमस्कार करावा.

मौन धारण करून घरी यावे. हातपाय धुऊन, विधिवत् आचमन करून श्रीपुरुषोत्तमाची पूजा करावी. प्रथम भगवानास तुपाचे स्नान घालावे. नंतर दूध, नंतर मध, नंतर जल, चंदन, जल असे स्नान पूर्ण झाल्यावर भक्तीने त्याला वस्त्र अर्पण करावे. चंदन, अगर, कापूर,

केशर इत्यादी सुगंधी द्रव्ये अर्पण करावीत. कमल व मल्लिका आदी फुलांनी पूजा करावी. धूप जाळावा. तूप वा तेल घेऊन दीप लावावा. खीर, वडा, लाडू, फल इत्यादींचा नैवेद्य दाखवावा. श्रीपुरुषोत्तमाची पूजा करून ' ॐ नमः पुरुषोत्तमाय ' या मंत्राचा उच्चार एकशे आठ वेळा करावा. त्यानंतर भक्तिपूर्वक अंतःकरणाने म्हणावे.

नमस्ते सर्वलोकेश भक्तानामभयप्रद ।
संसारसागरे मग्नं त्राहि मां पुरुषोत्तम ।
यास्ते मया कृत्वा यात्रा द्वादशैव जगत्पते ।
प्रसादात्तव गोविंद सम्पूर्णास्ता भवन्तु मे ॥

' भक्तांना अभय देणाऱ्या सर्वलोकेश्वर पुरुषोत्तमा, तुला नमस्कार असो. मी या संसारसागरात डुबून गेलो आहे. माझा उद्धार करावा. जगत्पते, गोविंदा, आपल्या दर्शनासाठी मी बारा यात्रा केल्या आहेत. त्या सर्व आपल्या प्रसादानं परिपूर्ण व्हाव्यात. '

अशी प्रार्थना करून भगवानांना साष्टांग नमस्कार करावा. त्यानंतर पुष्प, वस्त्र, चंदन आदीने भक्तिपूर्वक वृत्तीने गुरूची पूजा करावी. कारण गुरू व भगवान यांच्यात अंतर नसते. श्रद्धा व एकाग्रता यांनी युक्त होऊन रात्रभर जागरण करावे. भगवान वासुदेवाची कथा ऐकावी, गावी. ध्यान, स्तुती करून या प्रकारे रात्र काढावी. दुसऱ्या दिवशी निर्मल प्रभात झाली की द्वादशीस बारा ब्राह्मणांना बोलवावे. हे ब्राह्मण स्नातक, वेदपारंगत, इतिहासपुराणज्ञाते, श्रोत्रिय व जितेन्द्रिय असावेत. स्वतः स्नान करून, भगवानांची पूजा करून ब्राह्मणांचा सन्मान करावा. त्यांना भक्तियुक्त अंतःकरणाने बारा गायींचे दान करावे. सुवर्ण, छत्री, जोडे, धन, वस्त्र इत्यादी वस्तू त्यांना समर्पित कराव्यात. यामुळे भगवान गोविंदही संतुष्ट होईल. ब्राह्मणांना खीर, गूळ व तूप यांत बनविलेले पक्वान्न, अशा पदार्थांचे भोजन द्यावे. त्यानंतर त्यांना पाण्याने भरलेल्या बारा घटांचे दान करावे. ब्राह्मणांबरोबरच विष्णुतुल्य ज्ञानदाता गुरूचे पूजन करावे. नंतर नमस्कार करून खालील मंत्र म्हणावा,

सर्वव्यापी जगन्नाथः शंखचक्रगदाधरः ।
अनादिनिधनो देवः प्रीयतां पुरुषोत्तमः ॥

'शंख, चक्र, गदा धारण करणाऱ्या सर्वव्यापी जगन्नाथा, आदि-अंतरहित भगवान पुरुषोत्तमा, माझ्यावर प्रसन्न हो.'

इतके म्हणून ब्राह्मणांना तीनदा प्रदक्षिणा करावी. मस्तक वाकवून त्यांना व गुरूंना नमस्कार करावा. त्यानंतर स्वजन, बंधू, अन्य उपासक, दीन, भिकारी इत्यादींबरोबर स्वतः भोजन करावे. या विधीमुळे एक हजार अश्वमेधांचे फल व राजसूययज्ञाचे फल मिळते. बुद्धिमान पुरुष या यात्रेमुळे सूर्याप्रमाणे तेजस्वी बनतो. विष्णुलोकात जातो.

तीर्थांचे प्रकार, वामनावतार व महेश्वराच्या जटांत गंगा

ऋषिमुनींच्या विचारण्यावरून ब्रह्मदेवांनी सर्व तीर्थांचे भेद थोडक्यात समजावून सांगितले. स्वर्गलोक, मर्त्यलोक व रसातलावर दैव, आसुर, आर्ष व मानुष हे चार प्रकार आहेत. जंबुद्वीपात भारत-वर्ष विख्यात तीर्थभूमी आहे. हिमालय व विंध्यपर्वत यांतून सहा नद्या ब्रह्मा, विष्णू व महेश यांच्यापासून निर्माण होऊन वाहतात. गोदावरी, भीमरथी, तुंगभद्रा, कृष्णवेणी, तापी, पयोष्णी या विंध्यपर्वतापासून दक्षिणेकडे वाहणाऱ्या नद्या. भागीरथी, नर्मदा, यमुना, सरस्वती, विशोका व वितस्ता या नद्यांचा संबंध विंध्याचल व हिमालय यांच्याशी आहे. या पुण्यमय नद्या देवतीर्थ म्हणून प्रसिद्ध आहेत. गय, कोल्लासुर, वृत्र, त्रिपुर, अंधक, हयधूर्मा, लवण, नमूची, शृङ्गक, यम, पातालकेतू, मय, पुष्कर या नावांनी प्रसिद्ध असलेली तीर्थे असुरतीर्थे म्हणून ओळखली जातात. प्रभास, भार्गव, अगस्ती, नरनारायण, वसिष्ठ, भरद्वाज, गौतम, कश्यप, इत्यादी ऋषिमुनींच्या नावे असलेली तीर्थे ऋषितीर्थं म्हणून ओळखली जातात. अंबरीष, हरिश्चंद्र, मांधाता, मनू, कुरू, कनखल, भद्राश्व, सगर, अश्वयूप, नचिकेता, वृषाकपी व अरिन्दम इत्यादी तीर्थे मानुषतीर्थे म्हणून ओळखली जातात.

महादैत्य बळी देवांनाही अजेय शत्रू बनला. त्याने धर्म, यश, प्रजापालन, गुरुभक्ती, सत्यभाषण, बल, पराक्रम, त्याग, क्षमा इत्यादीं-मुळे मोठा सन्मान प्राप्त करवून घेतला होता. त्याचा वाढणारा

महिमा पाहून देवांना भीती वाटू लागली. आता या बलीला कसे जिंकावे याची चर्चा ते करीत राहिले. राजा बलीचे राज्य आधिव्याधी व शत्रू यांनी विरहित होते. अनावृष्टी व अधर्म यांचे नावही नव्हते. स्वप्नातही दुष्ट पुरुषाचे दर्शन होत नव्हते. त्याची ही उन्नती देवांना खुपू लागली. त्यांना कधी शांती मिळाली नाही. त्यांच्या मनात द्वेष निर्माण झाला. बळीच्या यशरूपी अग्नीने ते जळू लागले. व्याकुळ चित्ताने भगवंतास शरण जाऊन ते म्हणाले,

'शंख, चक्र, गदा धारण करणाऱ्या जगन्नाथा, आम्ही पीडित आहोत. आमची सत्ता गेलेली आहे. आपणच आमचं रक्षण करावं. त्यासाठी शस्त्र धारण करावं. आपणांसारखे स्वामी असताना आमच्यावर एवढं दुःख यावं ? आमची वाणी आपलं स्तुतिगान करते. आम्ही त्या दैत्याला कसं वानावं ? सुरेश्वरा, आपण तीनही लोकांना जिंकून घ्यावं.'

'देवांनो, बली माझा भक्त आहे. त्याला देव अथवा असुर मारू शकणार नाही. तुमच्याप्रमाणेच त्याचंही पालनपोषण मला करावं लागतं. युद्ध न करताच मी त्याचं राज्य हरण करीन. बलीला बांधून तुमचं राज्य तुमच्या स्वाधीन करीन.'

इतके म्हणून भगवानांनी अदितीच्या गर्भात प्रवेश केला. जन्मकाळी अनेक प्रकारचे उत्सव झाले. यज्ञेश्वर यज्ञपुरुष स्वतः वामनरूपात अवतीर्ण झाले. याच वेळी बलवानांत श्रेष्ठ असणाऱ्या बलीने अश्वमेध यज्ञाची तयारी केली. मुख्य ऋषी, वेदज्ञाते पुरोहित शुक्राचार्य, यांनी यज्ञास प्रारंभ केला. हविष्य घेण्यासाठी जेव्हा देव आले तेव्हा दान करा, भोजन करा, सर्वांचा सत्कार करा, इत्यादी शब्दांनी सारा यज्ञमंडप भरून गेला. एवढ्यात विचित्र कुंडले धारण करून सामगायन करीत वामनांनी यज्ञशालेत प्रवेश केला. येताच त्यांनी यज्ञाची प्रशंसा सुरू केली. शुक्राचार्यांनी वामनास ओळखले. महातेजस्वी राजा बली क्षत्रियधर्माला अनुसरून आपल्या पत्नीसह धनाचे दान करून यज्ञदीक्षा घेऊन यज्ञपुरुषाचे ध्यान करीत होता. वामनास ओळखून शुक्राचार्य राजास म्हणाले,

'राजन्, हे बुटके ब्राह्मण यज्ञप्रसंगी आले आहेत. हे ब्राह्मण नसून

यज्ञवाहन यज्ञेश्वर विष्णू आहेत. बालकाचं रूप धारण करून काही याचना करण्यासाठी हे आले आहेत.'

'मी धन्य आहे. ज्याच्या घरी साक्षात यज्ञमूर्ती येतात, काही इच्छितात, ही फार चांगली गोष्ट आहे.' वामनांकडे वळून राजा बली म्हणाला,

'भगवन्, सांगा, आपणांस काय हवंय ?'

'राजा, मला केवळ तीन पावलं भूमी हवीय. मला धनाची अपेक्षा नाही.'

'ठीक आहे महाराज,' म्हणून बलीने रत्नजडित कलशात जल घेतले. वामनास तीन पदांची भूमी त्याने दान केली. शुक्राचार्यादी ऋषी चूपचाप बसून पाहत होते. वामनाने म्हटले,

'राजा, तू सुखी व्हावंस. माझी तीन पावलं भूमी माझ्या ताब्यात दे.'

'तथास्तु' म्हणून बलीने वामनाकडे पाहिले ! वामनाचे छोटे रूप जाऊन चांगले विराट रूप त्याला प्राप्त झाले होते. स्त्रीसहित दैत्यराज हे सर्व पाहून म्हणू लागला,

'जगन्मय विष्णू, आपण आपली शक्ती आणखी वाढवावी.'

'दैत्यराज, पाहा मी वाढलो आहे. पाहा ना.'

'वाढा, आणखी बलवान व्हा, विस्तारित व्हा.'

भगवान वामनाचा आकार खूपच वाढला. त्याचा एक पाय बलीच्या यज्ञभूमीवर स्थिरावला. दुसरा ब्रह्मलोकापर्यंत जाऊन पोचला तेव्हा वामन म्हणाला,

'दैत्यराज, आता माझा तिसरा पाय कुठे ठेवू ? जागा दाखीव ना.'

'जगन्मय देवा, आपणच तर या जगाची रचना केली आहे. आपणच विचार करावा. मी तरी काय करू ? माझ्या सत्यप्रीतीचं रक्षण करण्यासाठी आपण आपला तिसरा पाय माझ्या डोक्यावर ठेवावा.'

'दैत्यराज, मी तुझ्या भक्तीवर फार प्रसन्न झालो आहे. तुझं

कल्याण होईल. एखादा वर माग ना.'

'मी आता आपणांकडे याचना नाही करणार.' तेव्हा वामनाने स्वतःच प्रसन्न होऊन बलीस वर दिला. चालू काळी रसातलाचे राज्य भविष्यात इंद्रपद, स्वतंत्रता, अविनाशी यश इत्यादींची प्राप्ती बलीस झाली. अशा प्रकारे वामनाने बलीस त्याच्या स्त्री-पुत्रांसह रसातलाकडे पाठविले.

वामनाचा दुसरा पद ब्रह्मलोकापर्यंत पोचला होता. जन्मदाता भगवान विष्णूच्या चरणावर ब्रह्माने आपल्या जवळच्या कमंडलूतील पवित्र, वरददायक, शांतिकारक, शुभद, मोक्षदायक, अमृतमय, पावन जल अर्पण केले. शंकराने दिलेले हे जल श्रीविष्णूच्या चरणांवरून मेरू-पर्वतावर पडले. तेथून ते चार भागांत पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर दिशांत पृथ्वीवर आले. दक्षिणेचा प्रवाह शंकराने जटेत धारण केला. पश्चिमेकडील जल पुन्हा कमंडलूत आले. उत्तरेकडील जल विष्णूने ग्रहण केले. पूर्वेकडील जल देव, पितर यांनी ग्रहण केले.

गौतम ऋषी व गौतमी गंगा

भगवान शंकराच्या जटेत सामावलेल्या या जलाचे दोन भाग झाले. एक प्रवाह व्रत, दान, समाधी यांत तत्पर असणाऱ्या गौतमाने शिवाची आराधना करून भूतलावर आणला. दुसरा प्रवाह बलवान क्षत्रिय राजा भगीरथ याने पृथ्वीवर आणला. पण यासाठी मोठी तपस्या करावी लागली.

महर्षी गौतम कैलास पर्वतावर गेले व मौनभावाने कुशावर बसून, पवित्र बनून भगवान शंकरांचे स्तोत्र गाऊ लागले. ते म्हणाले,

'भोगाची अभिलाषा धरणाऱ्या जीवांना मनोवांच्छित भोग देण्यासाठी भगवान शंकर उत्तम गुणांनी युक्त असं विराट रूप धारण करतात. महेश्वरांचं हे पृथ्वीमय शरीर आपल्या विषयांच्या द्वारे सुख देतं. समस्त चराचरांचं भरणपोषण करतं. सर्वांचा अभ्युदय करतं. शांतिमय शरीराच्या शिवानं जगाची सृष्टी, पालन, संहार करण्या-

साठी पृथ्वीचा आधार म्हणून जलाचं रूप धारण केलं आहे. महेश्वरा, आपण समयाची व्यवस्था करण्यासाठी, अमृताचा ओघ वाहण्यासाठी, जीवांच्या उन्नतीसाठी सूर्य, चंद्रमा व अग्नी यांचं शरीर धारण केलं आहे. भगवान, सर्व जीवांची शक्ती वाढावी, अक्षरांचं उच्चारण त्यांना सुलभ व्हावं, यांसाठी आपण वायूचं रूप धारण केलंत.

' शंभो, असंच आपण आकाशाचं रूप धारण केलंत. यजमान, यज्ञ, यज्ञाचं साधन, ऋत्विक, यज्ञस्थान, फल, देश, काल हे सर्व आपणच आहात. आपणच परमार्थतत्त्व आहात. कर्ता, दाता, प्रतिनिधी, दान, सर्वज्ञ, साक्षी, परमपुरुष, सर्व काही आपणच आहात. भगवन्, वेद, शास्त्र व गुरूही आपल्या तत्त्वाचं नीट विवरण करू शकत नाहीत. आपणांपर्यंत बुद्धीच पोचत नाही. आपणच अजन्मा, अप्रमेय, शिव-शब्दानं ओळखले जाणारे आहात. आपणच सत्य आहात. आपणांस नमस्कार असो. भगवान शिवाची प्रिया शिवा देवीही नित्य आहे. भवात (शंकरात) तिचाच अनुराग पूर्णपणानं वाढला आहे. ही शिवा सर्व शुभ गुणांनी युक्त असून विश्वविधाता शिवाची विलक्षण शक्ती आहे. या जगताची उत्पत्ती, स्थिती, अन्नवृद्धी, लय, हे एकमात्र पार्वतीदेवीचं स्वरूप आहे. ती भगवान शंकरांची प्राणवल्लभा आहे. सर्व जीव हिच्यासाठी तपस्या करतात. शिवाच्या या प्रियतमेची कीर्ती मोठीच आहे. ही सर्व विश्वास व्यापून त्याला मंगलमय बनविते. याच भगवतीला उमा म्हणतात. तिचं रूप चंद्रमाप्रमाणं मनोहर आहे. '

गौतमांची स्तुती ऐकून वृषभांकित भगवान शिव त्याच्यापुढे प्रकट झाले. आणि प्रसन्न होऊन म्हणाले,

' गौतमा, तू केलेली भक्तिपूर्वक स्तुती ऐकून मी संतुष्ट झालो आहे. तुला काय हवं ते तू माग. '

' जगदीश्वरा, समस्त लोकांना पवित्र करणारी ही देवी आपल्या जटेत आहे तिला आपण ब्रह्मगिरीवर सोडावं. ही समुद्राला मिळण्यासाठी सर्वांसाठी तीर्थरूप बनून राहील. हिच्यात स्नान करून लोक सर्व पापं धुऊन काढतील. या नदीच्या तटावर एक योजनपर्यंत राहाणारे स्नान न करताही मुक्ती मिळवतील. '

'यापेक्षा दुसरं मोठं तीर्थं असणार नाही. गौतमीगंगा (गोदावरी) सर्व तीर्थांत अधिक पवित्र होईल.'

असे म्हणून शंकर अंतर्धान पावले. त्यांच्या जटेतून सर्वश्रेष्ठ गंगा प्रकट होऊन ब्रह्मगिरीवर आली. सर्व महर्षी, ब्राह्मण, क्षत्रिय यांनी आनंदित होऊन महर्षी गौतमांचा जयजयकार केला. गौतमांच्या विनंती-नुसार गंगा नदी स्वर्ग, मृत्यू व रसातलामध्ये वाहू लागली. स्वर्गात तिची चार रूपे, मर्त्य लोकात सात व रसातलात चार रूपे झाली. याप्रकारे गंगानदीचे पंधरा प्रकार झाले. ही गंगादेवी सर्वत्र, सर्वभूतस्वरूपा, सर्व पापनाशक, अभीष्ट देणारी आहे. गंगानदी देवमय आहे. या गंगेची परिक्रमा गौतमाने केली. त्यानंतर त्याने देवेश्वर भगवान त्र्यंबकाचे पूजन केले. स्वत: भगवान शंकरांनी गोदावरीत स्नान करण्याचे महत्त्व सांगताना म्हटले,

'प्रथम नांदीमुख श्राद्ध करून शरीराची शुद्धी करावी. मग ब्राह्म-णांना भोजन द्यावं. मग त्यांच्याकडून स्नान करण्याची अनुज्ञा घ्यावी. यावेळी पतित माणसाशी भाषण करू नये. ब्रह्मचर्याचं पालन करून गोदावरीत मग स्नान करावं. थकलेल्या माणसांना अन्न द्यावं. ज्यांच्या-जवळ कोणी नाही त्यांना कंबल व वस्त्र द्यावं. गौतमा, ही गौतमी गंगा माझ्या आज्ञेपासून स्नान करणारांना मोक्ष देईल. मुनिश्रेष्ठा, या दोनशे योजनांच्या गौतमीच्या परिसरात साडेतीन कोटी तीर्थं आहेत. माहे-श्वरी, गंगा, गौतमी, वैष्णवी, गोदावरी, नंदा, सुनंदा, कामदायिनी, ब्रह्मतेजससमानीता, सर्वपापप्रणाशिनी ही हिचीच नावं. मला मात्र गोदावरी हे नाव प्रिय आहे. पाच भूतांत हे जल पवित्र असून पाप-राशीचा नाश करणारं आहे. भगवान शंकरांच्या जटेपासून निर्माण झालेली ही गौतमी गंगा श्रेष्ठ आहे.'

भागीरथी गंगेचे अवतरण

वैवस्वत मनूच्या वंशात राजा इक्ष्वाकूच्या कुलात सगर नावाचा एक अत्यंत धार्मिक राजा होऊन गेला. यज्ञ करून दानधर्म करून तो

धार्मिक आचारविचाराने राहत असे. त्याला पतिभक्तिपरायणा अशा दोन पत्नी होत्या. त्यांच्यापैकी कोणासच संतान नव्हते. राजा मनातून त्यामुळे फार उदास असे. एके दिवशी महर्षी वसिष्ठांना त्याने बोलावून म्हटले,

'कोणत्या उपायानं मला संतान होईल ?'

'राजा, तू पत्नींसह ऋषिमुनींची सेवा करावीस.'

एवढे बोलून वसिष्ठ आपल्या आश्रमाकडे निघून गेले. राजर्षी सगराच्या घरी एक तपस्वी महात्मा आले. राजाने त्यांचे यथोचित स्वागत केले. संतुष्ट होऊन ते म्हणाले,

'राजा, वर माग.'

राजाने पुत्राची कामना प्रकट केली. त्यांनी वर दिला,

'राजा, तुझ्या एका पत्नीस वंशधर असा पुत्र होईल. दुसऱ्या स्त्रीस साठ हजार पुत्र होतील.' वरदान देऊन महात्मा निघून गेले.

या वरानुसार सगर राजास हजारो पुत्र झाले. त्याने एक अश्वमेधयज्ञ आरंभिला. अश्वाच्या रक्षणार्थ त्याचे पुत्र पृथ्वीवर भ्रमण करू लागले. इंद्राने मध्येच घोड्यास पकडून आपल्या सेवकांच्या हाती दिले. सगरपुत्रांनी अश्वाचा शोध पृथ्वीवर खूप केला. पर्वत, जंगले, सरोवरे इत्यादी शोधून ते दमले. एवढ्यात एक आकाशवाणी झाली. 'सगरपुत्रांनो, तुमचा घोडा रसातलात आहे' सगरपुत्रांनी रसातलात जाण्यासाठी पृथ्वीस खोदायला प्रारंभ केला. रात्रंदिवस त्यांचे काम सुरू होते. शेवटी ते रसातलात आले. तेथे कपिलमुनी झोपले होते. शेजारी अश्व बांधलेला होता. कपिलमुनीने सगरपुत्रांकडे रागाने पाहिले. ते त्या रोषपूर्ण दृष्टीने दग्ध होऊन गेले. यज्ञातील सगरराजास हा वृत्तान्त समजला. राजाचा आणखी एक पुत्र असमञ्जा नावाचा होता. तो मूर्खतावश होऊन नगरातील बालकांना पाण्यात फेकून द्यायचा. नगरातील लोकांनी राजाकडे तक्रार केली. राजाने असमञ्जास नगरातून वनात हाकलून दिले. या असमञ्जास अंशुमान नावाचा एक मुलगा होता. सगराने त्यास कपिलमुनीकडे पाठविले. त्याने मुनींची आराधना करून घोडा परत आणला. राजाचा यज्ञ पूर्ण झाला. अंशुमानच्या तेजस्वी

पुत्राचे नाव दिलीप होते. या दिलीपाचा बुद्धिमान पुत्र भगीरथ. आपल्या पितरांची दुर्गती पाहून कष्टी झालेला भगीरथ नृपश्रेष्ठ सगरास म्हणाला,

'महाराज, या सर्वांचा उद्धार कसा होणार ?'

'बेटा, हे तर भगवान कपिलऋषी जाणतील.'

भगीरथ रसातलात गेला. त्यांनी कपिलांस आनंदाने नमस्कार केला. ते भगीरथास म्हणाले, 'राजा, तू भगवान शंकरांची तपस्या कर. त्यांच्या जटेतील गंगेमुळे तुझ्या पितरांचा उद्धार होईल.'

यानुसार भगीरथ कैलासपर्वतावर गेला. तेथे दीर्घ तपस्या करून त्याने शंकरास म्हटले, 'प्रभू, मी एक बालक आहे. मी उमेसहित आपणांस प्रणाम करतो.' त्याची निष्ठा पाहून भगवान शंकर प्रसन्न झाले व म्हणाले,

'महामते, तू निर्भय होऊन एक वर माग.'

'देवेश्वरा, आपल्या जटेत सरितांतील श्रेष्ठ गंगा आहे. माझ्या पितरांच्या उद्धारासाठी तिनं प्रकट होऊन माझ्या मागं यावं.'

'बेटा, मी गंगा तुला दिली. आता तू तिची स्तुती कर.'

गंगेच्या प्राप्तीसाठी भगीरथाने मोठीच तपस्या केली. गंगेचे स्तवन केले. गंगा प्रकट झाल्यावर तो हात जोडून म्हणाला,

'देवी, महामुनी कपिलांच्या शापाने माझे पितर दुर्गतीत सापडले आहेत. माते, आपण त्यांचा उद्धार करावा.'

देवी गंगा सर्वांवर उपकार करणारी. स्मरण केले तरी ती सर्व पापांचा नाश करते. तिने भगीरथाच्या पितरांचा उद्धार केला. सगर-पुत्रांना तिने ह्या खोदलेल्या खड्डयांतून शोधले. तो खड्डा भरून टाकला. अशी ही गंगा माहेश्वरी, वैष्णवी, ब्राह्मी, पावनी, भागीरथी, देवनदी, हिमगिरिशिखराश्रया इत्यादी नावांनी प्रसिद्ध झाली. विंध्याद्रीच्या उत्तर भागातील गंगा भागीरथी बनली.

वाराहतीर्थ, कुशावर्त, नीलगंगा, कपोततीर्थ

गोदावरीच्या काठांने जी तीर्थे आहेत त्यांचे वर्णन करणे शक्य

नाही. जेथे भगवान त्र्यंबक गौतमाच्या पुढ उभे राहिले ते गौतमीचे उगमस्थान त्र्यंबक या नावानेच प्रसिद्ध झाले. भोग व मोक्ष देणारे हे तीर्थ होय. दुसऱ्या एका तीर्थाचे नाव वाराहतीर्थ. फार पूर्वी सिंधुसेन नावाचा एक राक्षस देवांचा पराभव करून यज्ञास घेऊन रसातलास गेला. पृथ्वीवर यज्ञाचा अभाव झाला. सिंधुसेनाचा पराभव होईना. देवांनी सर्व वृत्तान्त पुराणपुरुष भगवान विष्णूंना ऐकविला. विष्णू म्हणाले, ' मी वराहाचं रूप धारण करून शंख, चक्र, गदा हातात घेतो व रसातलात जातो. राक्षसांचा पराभव करून पुण्यमय यज्ञास घेऊन येतो. ' गंगा ज्या मार्गाने रसातलास गेली त्याच मार्गाने चक्र-धारी भगवान रसातलात गेले. वराहरूप धारण करून त्यांनी राक्षसांचा नाश केला व यज्ञास घेऊन ते आले. सर्व देव ब्रह्मगिरीवर त्यांची वाट पाहात होते. तेथे गंगेपाशी येऊन वराह भगवानांनी आपले रक्ताने माखलेले शरीर धुतले. तेथेच एक वराहतीर्थ निर्माण झाले. येथे स्नान केल्याने सर्व यज्ञांचे फल मिळते.

त्र्यंबकमध्येच कुशावर्त नावाचे एक तीर्थ आहे. येथे गौतमाने गंगेचे आवर्तन कुशांनी केले होते. येथील स्नानामुळे पितरांना तृप्ती मिळते. जेथे नदी नीलपर्वतापासून निघाली तेथे ती नीलगंगा या नावाने विख्यात झाली. शुद्धचित्ताने या नीलगंगेत स्नान केल्यास पितरांची तृप्ती होते. याच गोदावरीच्या काठी सर्वांत प्रसिद्ध असे एक कपोततीर्थ आहे. त्याचे स्वरूप ऐकण्यासारखे आहे.

या ब्रह्मगिरीवर एक महाभयंकर व्याध राहत होता. तो ब्राह्मण, साधू, यती, गायी, पक्षी इत्यादींची हत्या करी. तो मोठा पापी व असत्यवादी होता. त्याच्या हातात नेहमी धनुष्य दिसायचे. त्याची स्त्री व त्याचे पुत्र याच स्वभावाचे होते. आपल्या पत्नीच्या प्रेरणेने तो व्याध एक घनघोर जंगलात गेला. तेथे त्याने अनेक प्राणी व पक्षी यांचा वध केला. कित्येक प्राण्यांना पकडून त्याने पिंजऱ्यात ठेवले. फार दूर-वर फिरून तो आपल्या घरी निघाला. तिसऱ्या प्रहराचा समय होता. चैत्र-वैशाख महिने संपले होते. एका क्षणात वीज चमकून आकाश मेघांनी भरून आले. वारे वाहू लागले. पाणी पडू लागले. मुसळधार

पावसाने सर्वत्र कहर झाला. व्याध रस्ता चालता चालताच थकून गेला. पाण्याच्या अधिकतेने त्याला मार्गही नीट दिसत नव्हता. तो पापी मनात विचार करू लागला,

'मी आता जाऊ कुठं ? काय करू मी ? मी यमराजाप्रमाणे सर्वांचे प्राण घेतो. आज या पावसात माझा प्राण घेणारी पत्थरांची वृष्टी होत आहे. आसपास माझं रक्षण करणारा वृक्षही दिसत नाही.'

थोड्या दूर अंतरावर व्याधाने एक वृक्ष पाहिला. शाखापल्लवांनी तो सुशोभित होता. व्याध त्याच वृक्षाच्या छायेत जाऊन बसला. त्याची सर्व वस्त्रे भिजली होती. आपली बायको, मुले अशा पावसात जिवंत राहिली का नाही ? या चिंतेने तो व्यथित झाला. याच वेळी सूर्यास्त झाला. या वृक्षावर एक कबूतर आपल्या पत्नी व मुलांसह राहात होते. ते मोठ्या सुखाने निर्भय बनून येथे राही. त्याची स्त्री कबूतरी मोठी पतिपरायणा होती. हवा व पाणी यांच्यापासून या वृक्षावर संरक्षण असल्याने या कपोत पक्ष्यांना या झाडाचा मोठा आधार वाटे. एके दिवशी कपोत व कपोती दोघेही चारा शोधण्यासाठी बाहेर गेली व दुर्दैवाने कपोती त्या व्याधाच्या पिंजऱ्यात सापडली. कपोत एकटाच घरट्याकडे आला. व्याधाने कपोतीला पकडले पण अद्यापि त्याने तिचा प्राण घेतला नव्हता. आपल्या संतानांना मातृहीन पाहून कपोतपक्षी मोठ्या चिंतेत पडला. भयानक पाऊस पडत होता. सूर्य मावळून गेला होता. वृक्षावरील घरट्यात कपोती नव्हती. कपोत पक्षी विलाप करू लागला तेव्हा त्याच्या ध्यानी आले नाही की कपोती तेथेच पिंजऱ्यात बद्ध होऊन पडलेली आहे. तो म्हणू लागला.

'हाय, माझा आनंद वाढविणारी कल्याणी कपोती गेली तरी कुठं ? ती अजून का नाही आली ? ती माझी धर्मपत्नी, माझी स्वामिनी होती. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या सर्वांत तिचं साह्य असे. मी प्रसन्न पाहून ती हसायची. मी खिन्न दिसताच ती माझं दुःख निवारण करायची. उचित असा सल्ला देणारी ती माझी सखी होती. नेहमीच माझ्या आज्ञेचं पालन करायची. सूर्यास्त होऊन गेला. अजून ती परत कशी नाही आली ? पतीशिवाय तिला दुसरा मंत्र, दुसरं व्रत माहीत

नाही. पती हाच तिचा प्राण. तिचा मंत्र. माझी कल्याणमयी भार्या अजून आली नाही ? मी आता काय करू ? कुठं शोधू तिला ? माझं हे घर आज जंगलासारखं तिच्याशिवाय भीषण वाटतं. तिच्यामुळं भयंकर स्थानही शोभादायक असतं. जिच्यामुळं हे घर शोभतं अशी ती का आली नाही ? मी तिच्याशिवाय जिवंत राहू कसा ? मी माझ्या शरीराचा त्याग करू ? पण मग ही पिलं काय करतील ? हाय ! माझा सारा धर्मच आज लुप्त झाला की. '

आपल्या स्वामीचा हा विलाप पिंजऱ्यातील कपोतीने ऐकला. ती मोठ्या कळवळ्याने कपोतास म्हणाली,

' खगश्रेष्ठा, मी इथं पिंजऱ्यात अडकून पडले आहे. महामते, या व्याधानं फसवून मला पकडलं. पण आज मी किती धन्य आहे ! आज माझे पतिदेव माझं गुणगान करताना ऐकलं. मी तर आज कृतार्थ झाले आहे. पती संतुष्ट तर सर्व काही ठीक. पतीच जर असंतुष्ट तर स्त्रीचा नाशच. पण प्रभो, तुम्ही थोर. तुम्हीच माझं शरण. तुम्ही व्रत. तुम्ही स्वर्ग. तुम्हीच परब्रह्म व तुम्हीच मोक्ष. आर्य, माझी चिंता नका करू. आपली बुद्धी धर्मात स्थिर करा. तुमच्या कृपेनं मी आजपर्यंत पुष्कळ सुखभोग भोगले. '

आपल्या पत्नीचे हे बोल ऐकून कपोतपक्षी वृक्षावरून खाली उतरला. पिंजऱ्यापाशी येऊन त्याने बद्ध झालेली कपोती पाहिली. आपली प्रिया जिवंत आहे. व्याध मेल्यासारखा पडला आहे. पक्ष्याने कपोतीला सोडविण्याचा विचार केला. पण त्याला थांबवून कपोती म्हणाली,

' थांबा, या संसाराचं बंधन स्थिर राहणारं आहे. असं जाणून मला या बंधातून मोकळं करू नका. यात मला त्या व्याधाचा काही अपराध दिसत नाही. तुम्ही तुमची धर्मबुद्धी दृढ करावी. महाराज,

गुरुरग्निर्द्विजातीनां वर्णानां ब्राह्मणो गुरुः ।।
पतिरेव गुरुः स्त्रीणां सर्वस्याभ्यागतो गुरुः ।
अभ्यागतमनुप्राप्तं वचनैस्तोषयन्ति ये ।।
तेषां वागीश्वरी देवी तृप्ता भवति निश्चितम् ।

तस्यान्नस्य प्रसादेन शक्रस्तृप्तिमवाप्नुयात् ।।
पितरः पादशौचेन अन्नाद्येन प्रजापतिः ।
तस्योपचाराद्वै लक्ष्मीर्वि णुता प्रीतिमाप्युयात् ।।
शयने सर्वदेवास्तु तस्मात्पूज्यतमोऽतिथिः ।
अभ्यागतमनुश्रान्तं सूर्योढं गृहमागतम् ।।
तं विद्याद्देवरूपेण सर्वक्रतुफलो ह्यसौ ।
अभ्यागतं श्रान्तमनुव्रजन्ति देवाश्च सर्वे पितरोऽग्नयश्च ।
तस्मिन् हि तृप्ते मुदवाप्नुवन्ति गते निराशेऽपिच ते निराशाः ।।

'नाथा, ब्राह्मणांचा गुरू अग्नी. सर्व वर्णांचा गुरू ब्राह्मण होय. स्त्रियांचा गुरू त्यांचा पती. सर्व लोकांचा गुरू अतिथी. घरी आलेल्या अतिथीशी गोड वाणीनं बोलून त्याला तृप्त केलं की वाणीची देवी वागीश्वरी संतुष्ट होते. अतिथीला अन्न दिलं की इंद्र तृप्त होतो. त्याचे पाय धुतल्यानं पिता व त्याला भोजन दिल्यानं प्रजापती, त्याची सेवा-पूजा केली की लक्ष्मीसहित विष्णू व त्याच्या सुखपूर्वक शयनानं सर्व देव तृप्त होतात. सूर्यास्तानंतर घरी जर थकलेला भागलेला अतिथी आला तर त्याला देवता समजून त्याचं पूजन करावं. तो सर्व यज्ञांचं फल असतो. त्याच्यामुळं घरी सर्व पितर, देव, अग्नी आलेले असतात. अतिथी तृप्त झाला तर ते तृप्त होतात. तो जर निराश होऊन गेला तर तेही निराश होऊन जातात. म्हणून प्राणनाथा, आपण सर्व दुःखं सोडून शांती धारणा करावी. आपली बुद्धी धर्मरत करावी. अपकार करणारावरही उपकारच करावेत.'

'सुमुखे, तू तर आपणां दोघांना योग्य असं उत्तम सांगितलंस. पण या बाबतीत आणखीही काही बोलण्यासारखं आहे. ऐकतेस ? कोणी एक हजार प्राण्यांचं रक्षण करतो. दुसरा दहा प्राण्यांचा निर्वाह करतो. एखादा स्वतःचीच तेवढी काळजी करतो. आपण तर असे आहोत की आपलंच पोट आपण कसं तरी भरतो. आपल्यापाशी संग्रह किती ? तर चोचीत मावेल एवढा ! शुभे, आता तू सांग की या थकलेल्या अतिथीचा सत्कार मी कसा करू ?'

'नाथ, अग्नी, जल, मधुर वाणी, तृण, काष्ठ इत्यादीनं याचा

सत्कार करा. हा पाहा थंडीनं कसा गारठून गेला आहे.'

प्रिय पत्नीचा उपदेश ऐकून कपोतपक्षी वृक्षावर चढला. त्याने भोवती पाहिले. दूर कुठेतरी त्याला आग दिसली. त्याने चोचीतून एक जळती काडी आणली. व्याधापुढे त्याने अग्नी पेटवला. सुका पाला, काटक्या अग्नीत टाकून तो प्रज्वलित ठेवला. त्या अग्नीच्या उष्णतेने व्याध सावध झाला. त्याला मोठाच आराम वाटला. हा व्याध भुकेने व्याकुळ झालेला पाहून कपोती आपल्या स्वामीस म्हणाली,

'महाभाग, मला तुम्ही या आगीत टाकावं. मी आज या दुःखी व्याधास तृप्त करीन. सुव्रता, असं करून आपण या अतिथीचा सत्कार करून पुण्यलोकास जाऊ.'

'शुभे, मी जिवंत असताना तुला हा धर्म आठवतो ? मला आज्ञा दे. मीच आज हा अतिथीसाठी यज्ञ करीन.'

इतके म्हणून सर्वांना शरण देणाऱ्या भक्तवत्सल विश्वरूप चतुर्भुज महाविष्णूचे स्मरण करून अग्नीस तीन वेळा प्रदक्षिणा घालून 'व्याधा, माझा तू सुखानं उपभोग कर' असे म्हणून कपोताने आपला देह अग्नीस समर्पण केला. हे सर्व अग्निदिव्य पाहून व्याध म्हणू लागला,

'अरेरे, माझ्या या मनुष्यशरीराचा किती धिक्कार करावा ! माझ्यासाठी या पक्षिराजानं केवढं साहस केलं !'

एवढ्यात ती कपोती व्याधाला म्हणाली,

'महाभाग, तू आता मला सोडवावंस. पाहा, माझा हा पतिदेव माझ्यापासून दूर चालला आहे.'

व्याधाने त्वरित कपोतीला मुक्त केले. तिने अग्नीस व पतीस प्रदक्षिणा घालून म्हटले, 'स्वामीबरोबर चितेत प्रवेश करणं हेच स्त्रीचं मोठं धर्मकृत्य. पतीमागून जाणारी पत्नी स्वर्गात जाते.'

इतके म्हणून कपोतीने पृथ्वी, देव, गंगा, वनस्पती यांना नमस्कार करून अग्नीत प्रवेश केला. याच वेळी आकाशात जयजयकाराचा ध्वनी उमटला. सूर्याप्रमाणे एक तेजस्वी विमान उतरले. कपोत-कपोती सुंदर रूप धारण करून त्या विमानात बसले. आश्चर्यात पडलेल्या व्याधाला ते म्हणाले,

' व्याधा, आम्ही देवलोकात जातो. तू अतिथीरूपानं आलास. तुझं स्वागत करून आम्ही निघालो आहोत. तुला नमस्कार असो.'

त्यांना विमानातून स्वर्गास जाताना व्याधाने पाहिले. त्याने आपले धनुष्य फेकून दिले. पिंजरा मोडून टाकला व विमानाकडे हात जोडून तो म्हणाला,

' महाभाग, मी अज्ञानी. माझा त्याग नका करू. माझा पण उद्धार करावा. '

' व्याधा, तुझे कल्याण होईल. तू आता भगवती गोदावरीच्या तटावर जा. तिथं तू तुझं पाप सर्मपित कर. तिथं पंधरा दिवस तू डुबकी मार. तुझं पाप नाहीसं होईल. पापातून मुक्त झाल्यावर तू पुन्हा गौतमीत स्नान कर. तुला अश्वमेध यज्ञाचं फल मिळेल. ही गोदावरी नदी ब्रह्मा, विष्णू व महादेव यांच्या अंशांतून प्रकट झाली आहे. तूही आमच्या-सारखाच स्वर्गलोकात येशील. '

अशा रीतीने कपोत, कपोती व व्याध तीनही स्वर्गात पोचले. त्या वेळेपासून या स्थानाला कपोततीर्थ हे नाव मिळाले. येथे स्नान, दान, पितरांची पूजा, जप व यज्ञ करून अक्षय फल मिळवावे.

दशाश्वमेधिक व पैशाचतीर्थ

गोदावरी गंगेत एक कार्तिकेयतीर्थ असून ते कौमारतीर्थ या नावानेही ओळखले जाते. त्याचे नाव ऐकूनही मनुष्य कुलीन व रूपवान होतो. त्याच्या पुढील कृत्तिकातीर्थ सोमपानाचे फल देणारे आहे. दशाश्वमेधतीर्थाचे नाव कानी पडताच अश्वमेधयज्ञाचे फल मिळते. विश्वामित्राचे पुत्र महावली विश्वरूप. त्याचा पुत्र प्रथम. त्याचा पुत्र भौवन. हा भौवन सार्वभौम राजा झाला. त्याचा पुरोहित कश्यप सर्व प्रकारच्या ज्ञानांत निपुण होता. एके दिवशी त्याला भौवनाने विचारले,

' मुने, एकदमच मी दहा अश्वमेधयज्ञ करावेत म्हणतो. हे कुठं करू ?'

कश्यपाने प्रयागचे नाव सांगितले. दहा यज्ञ कोठे करायचे तेही सांगितले. पण भौवनाचा एकही यज्ञ सफल झाला नाही. राजाला

मोठीच चिंता वाटली. प्रयाग सोडून त्याने इतर ठिकाणीही प्रयत्न करून पाहिले. पण प्रत्येक ठिकाणी दोषच निर्माण झाले. तेव्हा राजा कश्यपाला घेऊन बृहस्पतीचा ज्येष्ठ बंधू संवर्ताकडे गेला व त्यास म्हणाला,

'भगवन्, मला असं एक ठिकाण सांगा की, जेथे एकाच वेळी दहा अश्वमेधयज्ञ मला करता येतील.'

'तुम्ही ब्रह्मदेवांजवळ जावं. ते प्रदेश सांगतील.'

महात्मा कश्यपाच्याबरोबर भौवन ब्रह्मदेवांपाशी गेला. ब्रह्मदेवाने सांगितले,

'राजेन्द्रा, तू गोदावरीच्या काठी जा. तोच यज्ञासाठी पुण्यकारक प्रदेश आहे. वेदज्ञ विद्वान महर्षी कश्यप आहेतच. त्यांची कृपा व गौतमी-गंगेचा प्रसाद यांमुळे तुझे दहा अश्वमेधयज्ञ पूर्ण होतील.'

इतकी माहिती घेऊन राजा भौवन कश्यपासह गोदावरीच्या काठी आला व त्याने यज्ञांची तयारी केली. यज्ञ पूर्ण होताच पृथ्वीचे दान करण्याचा प्रसंग आला. एवढ्यात आकाशवाणी झाली, 'राजा, तू पुरोहित कश्यपास पर्वत, वन, अरण्य यांसहित सर्व काही दान केलंस. आता भूमिदानाऐवजी अन्नदान करावंस. या तीनही लोकांत अन्नदाना-एवढं पुण्यकार्य दुसरं नाही. गंगातटावर तर अन्नदानाचं महत्त्व विशेष आहे.'

सम्राट भौवनाने ब्राह्मणांना खूपच अन्नदान केले. तेव्हापासून या तीर्थास दशाश्वमेध या नावाने ओळखले जाऊ लागले. त्याच्यापुढेच ब्रह्मवादी महर्षींकडून सन्मानित झालेले पैशाचतीर्थ आहे. गोदावरीच्या दक्षिण तटावर हे तीर्थ आहे. ब्रह्मगिरीच्या पार्श्वभागी अंजन नावाचा एक प्रसिद्ध पर्वत आहे. तेथे एक सुंदरी अप्सरा शापभ्रष्ट होऊन राहत होती. पण तिचे मुख वानरीचे असून तिचे नाव अंजना होते. केसरी नावाचा एक श्रेष्ठ वानर तिचा पती होता. केसरीच्या दुसऱ्या एका पत्नीचे नाव अद्रिका होते. हीपण शापभ्रष्ट अप्सरा होती. तिचे सर्व अंग सुंदर असले तरी मुख मात्र मांजरीप्रमाणे होते. अद्रिका ही अंजन पर्वतावर राहत होती.

एकदा केसरी दक्षिण समुद्राच्या तटावर गेला. एवढ्यात अंजन-

पर्वतावर महर्षी अगस्त्य आले. अंजना व अद्रिका यांनी त्यांचे यथोचित स्वागत-पूजन केले. महर्षी संतुष्ट होऊन म्हणाले,

'तुम्ही दोघींनी एक वर मागावा.'

'मुनीश्वर, सर्वांत बलवान, श्रेष्ठ, उपकारकर्ता पुत्र द्यावा.'

'तथास्तु' म्हणून महर्षी अगस्त्य निघून गेले.

काही दिवसांनंतर वायूच्या अंशाने अंजनाने हनुमानास जन्म दिला. निर्ऋतीच्या अंशाने अद्रिकेच्या गर्भातून पिशाचांचा राजा अद्री जन्मास आला. या दोनही स्त्रियांनी वायूस व निर्ऋतीस म्हटले,

'आम्हांस मुनींच्या वरदानानं पुत्र मिळाले. पण इंद्राच्या शापानं आमचं हे सारं शरीर कुरूप झालंय. यातून काय उपाय करावा?'

'तुम्ही गोदावरीत स्नान करावं. स्नान व दान करून तुम्ही शापातून मुक्त व्हाल.'

पिशाचरूपधारी अद्रीने आपला बंधू हनुमानास बरोबर घेऊन अंजनास गोदावरीत स्नान करायला लावले. अद्रिकानेही गोदावरीत स्नान केले. तेव्हापासून हे स्थान पैशाच वा आंजनतीर्थ या नावांनी ओळखले जाऊ लागले. समस्त अभीष्ट वस्तू देणारे हे तीर्थ आहे. ब्रह्मगिरीपासून त्रेपन योजने दूर पूर्वेस मार्जारतीर्थ आहे. तेथून पुढे हनुमानतीर्थ आहे, वृषाकपितीर्थ आहे. त्याच्याही पुढे संगमतीर्थ आहे.

क्षुधातीर्थ, अहल्यासंगमतीर्थ

फार पूर्वी कण्व नावाचे एक ऋषी होते. ते वेदवेत्ते असून मोठे तपस्वी होते. महर्षी कण्व भुकेने पीडित होऊन अनेक आश्रमांतून फिरत. एके दिवशी ते गौतमाच्या पवित्र आश्रमात आले. तो आश्रम जल व अन्न यांनी समृद्ध होता. गौतमाचे वैभव पाहून कण्व मनात वरमले. ते म्हणाले, हा गौतम एक श्रेष्ठ ब्राह्मण. मीही त्याच्यासारखाच एक तपस्वी. बरोबरीच्या माणसापुढे याचना करणे उचित नाही. मी भुकेने खरेच व्याकुळ झालो आहे, माझ्या शरीरात पीडा आहे. पण या गौतमाच्या घरी मी भोजन कसे करावे? इतका विचार करून कण्व-मुनी गंगेच्या तटावर आले. स्नान करून, कुशासनावर बसून ते क्षुधा-

देवीची स्तुती करू लागले,

'मोठं दुःख दूर करणाऱ्या भगवती गंगादेवी, तुला नमस्कार असो. सर्व लोकांना पीडा देणाऱ्या क्षुधादेवी, तुलाही नमस्कार असो. महादेवांच्या जटेतून प्रकट होणाऱ्या गौतमी तुला नमस्कार असो. महामृत्यूच्या मुखातून बाहेर आलेल्या क्षुधादेवीस नमस्कार असो. तुम्ही दोघी शांतिरूपा व दुरात्म्यासाठी क्रोधरूपा आहात. नदीच्या रूपानं सर्वांची पापं हरण करता व क्षुधारूपानं सर्वांना पापताप देता. कल्याणकारी गंगे, तुला नमस्कार असो. पापांचं दमन करणारी गंगा, नमस्कार असो. भगवती शांतिकरी, तुला नमस्कार असो. दारिद्र्याचा नाश करणाऱ्या देवी, तुला प्रणाम असो.'

कण्वांची ही प्रार्थना ऐकून त्यांच्यापुढे दोन रूपे प्रकट झाली., एक अत्यंत मनोहर असे गंगेचे रूप व दुसरे क्षुधेचे भयानक रूप. द्विजश्रेष्ठ कण्वांनी पुन्हा हात जोडून म्हटले,

'देवी गोदावरी, तू सर्व मंगलांचं मंगल करणारी आहेस. शुभे ब्राह्मी, माहेश्वरी, वैष्णवी, त्र्यंबका ही तुझी नावं आहेत. तुला नमस्कार असो. भगवान त्र्यंबकाच्या जटांतून प्रकट होणाऱ्या, गौतमाचं पाप दूर करणाऱ्या गोदावरी, तू सात धारांनी विभक्त होऊन समुद्रास मिळतेस. तुला नमस्कार असो. क्षुधादेवी, तू सर्व पापी लोकांसाठी पापमयी आहेस. तू दुःखमयी, लोभमयी आहेस. धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांचा तू नाश करतेस. तुलाही वारंवार नमस्कार असो.'

कण्वांची ही स्तुती ऐकून गंगा व क्षुधा दोघीही प्रसन्न झाल्या. त्या कण्वमुनींना म्हणाल्या,

'सुव्रता, तू मनोवांछित वर माग.'

'देवी, मला मनासारखे भोग मिळावेत. वैभव, आयुष्य, धन, मोक्ष यांची प्राप्ती मला व्हावी. क्षुधे, तू तृष्णा व दारिद्र्य यांची देवता अत्यंत पापमयी आहेस. माझ्या व माझ्या वंशजांच्या घरी तू कधीच राहू नकोस. जो क्षुधार्त मनुष्य या स्तोत्रानं तुझं स्तवन करील त्याचं दुःख व दारिद्र्य तू दूर करावंस. ते लोक या पुण्यमय तीर्थात भक्तिपूर्वक स्नान करतील, दान, जपादी कृत्यं करतील त्यांना धन-

संपत्ती मिळेल.'

'एवमस्तु' म्हणून गंगा व क्षुधा दोघी आपापल्या स्थानांकडे गेल्या. या तीर्थास काण्वतीर्थ, गांगतीर्थ व क्षुधातीर्थ अशी तीन नावे मिळाली.

गोदावरीच्या परिसरातच अहल्यासंगम नावाचे आणखी एक तीर्थ आहे. फार पूर्वीची कथा आहे. ब्रह्मदेवाने कुतूहलाने काही सुंदर कन्यांची निर्मिती केली. त्यांत एक सर्वांत श्रेष्ठ, उत्तम लक्षणांनी युक्त होती. या कन्येचे पालन कोण पुरुष करणार? अशा प्रश्नाच्या विचारात असताना ब्रह्मदेवास गुणांत श्रेष्ठ, तपस्वी, बुद्धिमान, वेदविद्या पारंगत अशा गौतम ऋषींचे नाव आठवले. त्यांना ही कन्या समर्पण करून म्हटले,

'मुनिश्रेष्ठा, जोपर्यंत ही कन्या युवती होत नाही तोपर्यंत आपण हिचं पालन करावं. ही युवती झाली की हिला माझ्या स्वाधीन करावं.'

गौतमांनी या कन्येचे पालनपोषण नीट केले. युवती होताच त्यांनी तिला नीट वस्त्राभूषणांनी नटवून ठरल्याप्रमाणे ही ब्रह्मदेवापाशी आणून दिली. त्या वेळी त्यांच्या मनात विकार कोणताच नव्हता, पण युवती अहल्यास पाहताच इंद्र, अग्नी, वरुण इत्यादी देव 'सुरेश्वरा, ही कन्या मला द्या ना.' असा ब्रह्मदेवांजवळ आग्रह करू लागले. इंद्राचा आग्रह विशेष होता. महर्षी गौतमांची महत्ता, गंभीरता, धीरता पाहून या सुमुखी कन्येस गौतमांनाच द्यावे असा विचार ब्रह्मदेवांनी केला. तेव्हा त्यांनी सर्व देवांना व ऋषींना म्हटले,

'सर्व पृथ्वीची प्रदक्षिणा करून इथं जो प्रथम येईल त्याला ही कन्या देण्याचं मी ठरवलं आहे.'

सर्व देवांनी अहल्येच्या प्राप्तीसाठी पृथ्वीची प्रदक्षिणा करायला सुरुवात केली. याच वेळी एका गायीस वासरू होत होते. गौतमांनी तिलाच पृथ्वी समजून प्रदक्षिणा केली. त्यांनी एका शिवलिंगासही प्रदक्षिणा केली व ब्रह्मदेवांपाशी येऊन म्हणाले,

'कमलासना, आपणांस वारंवार नमस्कार असो. ब्रह्मन्, मी सर्व पृथ्वीची प्रदक्षिणा पुरी केली आहे.'

'ब्रह्मर्षी, वेदांनाही दुर्लभ असणारं ब्रह्मरूप तुम्ही जाणता. ही कन्या मी तुम्हांलांच दिली आहे. अर्धवट प्रसूत होणारी गाय सप्तद्वीप पृथ्वीप्रमाणं आहे. शिवलिंगाचंही असंच फल आहे.'

असे म्हणून ब्रह्मदेवांनी अहल्या गौतम ऋषींना समर्पण केली. गौतम व अहल्या यांचा विवाह झाला. इंद्राच्या मनात ईर्षा निर्माण झाली. ब्रह्मगिरीवर गौतमांचा आश्रम गृहस्थीच्या रूपात चांगला सुरू झाला. त्यांच्या कीर्तीचा सुगंध ऐकून इंद्रालाही हेवा वाटला. त्याने एका ब्राह्मणाचे रूप घेतले व तो गौतमांच्या आश्रमात आला. त्याने अहल्येकडे पापी नजरेने पाहिले. या वेळी महर्षी गौतम आश्रमात नव्हते. इंद्राने कपटबुद्धी करून गौतमांचे रूप घेतले व तो आश्रमात आला. अहल्येने त्याला गौतमच मानले. इंद्राबरोबर ती सुखाने रमली. एवढ्यात गौतम ऋषी आश्रमात आले. नेहमीप्रमाणे अहल्या स्वागतास आली नाही याचा संशय गौतमांना आला. त्यांचे शिष्य एकदम म्हणाले,

'भगवन्, अशी विचित्र गोष्ट कशी झाली ? आपण आतही आहात. अन् बाहेरही. आपल्या तपस्येचा प्रभाव दिसतोय. आपणच दोन रूपं...'

शिष्यांचे बोलणे ऐकून गौतम ऋषी मनात चमकले. त्यांनी अहल्येस म्हटले,

'प्रिये, आज तू बोलत नाहीस ?'

बाहेरून आवाज ओळखीचा वाटताच ती जाररूप इंद्रास म्हणाली,

'अरे तू आहेस तरी कोण ?- मुनींचं रूप धरून इथं आलास ? तू माझ्याशी हे पापकर्म केलंस ?'

अहल्या भीतीने थरथर कापत शय्येवरून उठू लागली. तिची वेषभूषा बिघडली होती. इंद्रही लज्जित झाला होता. पत्नीचा अपराध ओळखून गौतम म्हणाले,

'तू हे साहस केलंस ?'

अहल्या लज्जेनं काही बोलू शकली नाही. मान खाली घालून ती उभी होती. ऋषींच्या दृष्टीस वेषधारी इंद्र पडला.

'अरे, ठीक बोलशील ? तू आहेस तरी कोण ? असत्य बोलशील

तर जाळून भस्म करीन.'

हात जोडून इंद्र म्हणाला, 'तपोधन, मी शचीचा स्वामी इंद्र. आज हातून पाप घडलं आहे. कामदेवाच्या बाणानं ज्याचं हृदय विदीर्ण झालं आहे तो कोणतं पाप करणार नाही ? आपण करुणासागर आहात. मला क्षमा करावी.'

'इंद्रा, तुझ्या आसक्तीचं प्रायश्चित्त तू आता भोग. योनीसारखी एक हजार छिद्रं तुझ्या अंगास पडतील.' नंतर ते अहल्येस म्हणाले,

'अहल्ये, तू सुकी नदी होऊन पडशील.'

'स्वामी, आपण थोडी कृपा करावी. इंद्रानं आपलं रूप घेतलं असल्यानं माझ्या हातून,... इथल्या रक्षकांना विचारावं आपण.'

'कल्याणी, तू नदी होशील हे तर खरंच, पण सरिताश्रेष्ठ गौतमी-गंगेस तू जेव्हा मिळशील तेव्हा तुला पुन्हा पहिल्यासारखं रूप प्राप्त होईल.'

महर्षींच्या सूचनेप्रमाणे गौतमीगंगेस अहल्या मिळाली. तिला पहिल्यासारखे रूप मिळाले. देवराज इंद्रानेही मुनींच्या सांगण्यावरून गोदावरीत स्नान केले. त्याच्या अंगास पडलेली हजार भोके डोळ्यांप्रमाणे होऊन इंद्र सहस्रलोचन बनला. आणि हे तीर्थ अहल्यासंगम या नावाने प्रसिद्ध झाले. इंद्रतीर्थ असेही नाव यास मिळाले.

जनस्थान, अश्वतीर्थ, भानुतीर्थ, अरुणा-वरुणा संगम

जनस्थानाचा विस्तार चार योजनांचा असून त्याच्या स्मरणानेच मुक्ती मिळते. वैवस्वत मनूच्या वंशात जनक नावाचा एक राजा होऊन गेला. त्याने वरुणाची कन्या गुणार्णवाच्याबरोबर विवाह केला. गुणार्णवा धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांच्या सिद्धीसाठी तत्पर होती. जनक राजाला अनुरूप अशीच ही भार्या होती. विप्रश्रेष्ठ याज्ञवल्क्य राजा जनकाचा पुरोहित होता. एके दिवशी राजाने आपल्या पुरोहितास विचारले,

'द्विजश्रेष्ठा, मोठमोठ्या मुनिवरांनी सांगितलं आहे की, भोग व मोक्ष हे श्रेष्ठ असले तरी भोगाचा शेवट विरसात होतो व मुक्ती मात्र नित्य निर्विकार आहे. म्हणून भोगापेक्षा मुक्ती श्रेष्ठ आहे. भोगापासून

मुक्तीची प्राप्ती कशी होते ? अत्यंत सुखपूर्वक मुक्ती कशी मिळेल ?'

'राजा, साक्षात् भगवान वरुण आपले गुरुजन, श्वशुर व हितकर्ते आहेत. त्यांनाच आपण विचारावं. ते आपणांस उपदेश करतील.'

याज्ञवल्क्य व जनक असे दोघेही वरुणापाशी गेले व त्यांनी त्याला मुक्तीचा मार्ग विचारला.

वरुणाने त्यांना सांगितले, 'मुक्ती दोन प्रकारांनी प्राप्त होते. एक कर्म करून व दुसरी कर्म न करताही. कर्म न करण्यापेक्षा कर्म करणं श्रेष्ठ असल्याचं वेदांत सांगितलं आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ कर्मानं बद्ध आहेत. नृपश्रेष्ठा, कर्मद्वारा सर्व प्रकारच्या सिद्धी मिळतात. म्हणून वैदिक कर्मांचं अधिष्ठान केलं पाहिजे. यामुळंच या लोकात भोग व मोक्ष या दोघांची प्राप्ती होते.

अकर्मण: कर्म पुण्यं कर्म चाप्याश्रमेषु च ।
जात्याश्रियं च राजेन्द्र तत्रापि श्रुणु धर्मवित् ।।
आश्रमाणि च चत्वारि कर्मद्वाराणि मानद ।
चतुर्णामाश्रमाणां च गार्हस्थ्यं पुण्यदं स्मृतम् ।।

अकर्मापेक्षा कर्म पवित्र आहे. भिन्न भिन्न आश्रम व वर्ण यांना अनुसरून कर्मं अनेक प्रकारची आहेत. अशी कर्म चार प्रकारची मानली गेली आहेत. त्यांत गृहस्थाश्रम अधिक पुण्यदायक आहे. भोग व मोक्ष यांची प्राप्ती याच आश्रमात होते. हेच माझं मत आहे.'

राजा जनक व याज्ञवल्क्य यांनी वरुणाचे पूजन करून म्हटले,

'सुरश्रेष्ठा, आपणांस नमस्कार असो, आपण सर्वज्ञ आहात. आता असं सांगा की भोग व मोक्ष देणारा असा कोणता देश आहे ?'

'या पृथ्वीवर भारतवर्ष आहे. यात दंडकवन पुण्यदायक आहे. तीर्थांत गौतमी गंगा श्रेष्ठ आहे. ती मुक्तिदायिनी मानली गेली आहे. येथे यज्ञ व दान केलं तर मोक्षाची प्राप्ती होते.'

वरुणाच्या या उपदेशानुसार जनकाने गंगातीर्थावर येऊन एक अश्वमेधयज्ञ केला. याज्ञवल्क्यांनी पुरोहिताचे काम केले. गौतमी गंगेच्या तटावर यज्ञ केल्याने जनकास मोक्ष मिळाला. जनक वंशातील अनेक राजांनी येथे असे यज्ञ केले. तेव्हापासून हे तीर्थ जनस्थान म्हणून प्रसिद्ध

झाले. येथे स्नान, दान केल्यानें भोग व मोक्ष यांची प्राप्ती होते.

अरुणा व वरुणा नावांच्या दोन नद्या आहेत. या दोघींचा संगम गोदावरी नदीत झालेला आहे. महर्षी कश्यपांचा पुत्र आदित्य सर्वत्र प्रसिद्ध आहे. तीन लोकांचा तो नेत्र असून त्याची किरणे अत्यंत दुस्सह आहेत. भगवान सूर्याच्या रथास सात घोडे जुंपले आहेत. सूर्यदेवाच्या पत्नीचे नाव उषा असून ती विश्वामित्राची कन्या त्रिभुवनसुंदरी आहे. तिला आपल्या स्वामीचा ताप सहन झाला नाही. यामुळे ती सतत चिंतेत राही. तिला दोन पुत्र होते. एक वैवस्वत मनू व दुसरा यम. एक कन्या यमुना नदीच्या नावाने विख्यात झाली. एके दिवशी उषाने आपल्यासारखीच एक छाया निर्माण केली व ती तिला म्हणाली,

'तू माझ्यासारखीच माझ्या पतीची सेवा कर. माझ्या मुलांचं पालन कर. मी जोपर्यंत परत येत नाही तोपर्यंत तूच माझ्या पतीची प्रेयसी.'

उषेने छायेकडे सर्व कारभार सोपवून तपस्येसाठी उत्तर कुरूकडे प्रयाण केले. तिने तेथे पोचून घोडीचे रूप धारण करून तपस्या केली. सूर्यास जेंव्हा हे समजले तेंव्हा त्याने घोड्याचे रूप घेऊन तिच्यापाशी येण्याचे केले. पतिव्रता उषा परपुरुषाच्या भीतीने पळून गौतमीच्या तटावर आली. तेथे तिची व पतीची भेट झाली. तेथेच अश्विनीकुमारांचा जन्म झाला. हेच स्थान भानुतीर्थ, अश्वतीर्थ, पंचवटीआश्रम या नावांनी विख्यात झाले. तापी व यमुना या दोन सूर्यकन्या गौतमी तटावर आपल्या पित्यास भेटण्यासाठी अरुणा-वरुणा या दोन नद्यांच्या रूपांनी आल्या. त्यांच्या संगमाचे नाव अरुणा-वरुणासंगम असे पडून तेथे सत्तावीस हजार तीर्थांचा समुदाय निर्माण झाला. या तीर्थांचे स्मरण, कीर्तन, श्रवण केले तर मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होऊन धर्मवान व सुखी होतो.

गरुडतीर्थ, गोवर्धनतीर्थ

शेषनागाचा मणिनाग नावाचा एक पुत्र महाबलवान होता. त्याला

नेहमी गरुडाचे भय वाटे. म्हणून त्यानें आपल्या भक्तीने शंकरांना प्रसन्न करून घेतले. भगवान शंकर म्हणाले,

'नागा, कोणताही वर माग.'

'प्रभो, मला गरुडापासून अभय असावं.'

'तुझ्या मनासारखं होईल. तुला गरुडापासून भीती नाही.'

निर्भय होऊन मणिनाग हिंडत हिंडत क्षीरसागराच्या समीप आला. जेथे गरुड राहतात तेथेही तो गेला. गरुडाने त्या नागाला पकडून आपल्या घरी नेले आणि बंदिस्त करून ठेविले. एवढ्यात नंदीने भगवान शिवांना विचारले,

'देवेश्वर, अलीकडं मणिनाग आलेला नाही. असं वाटतं की, गरुडानं त्याला खाल्लं असावं, अथवा बांधून ठेवलं असावं. तो जिवंत असता तर आला असता.'

'तो नाग गरुडाच्या घरी आहे. तू लौकर जाऊन भगवान विष्णूंची स्तुती कर आणि गरुडाच्या बंधनातून त्या नागास सोडीव व त्यास माझ्या सांगण्यावरून परत घेऊन ये.'

शिवशंकरांचा निरोप घेऊन नंदी स्वत: लक्ष्मीपती विष्णूकडे उपस्थित झाला. भगवान शिवांचा निरोप त्याने सांगितला. तेव्हा भगवान विष्णू गरुडास म्हणाले,

'विनतानंदना, माझं सांगणं ऐक. तो नाग या नंदीला परत कर.'

गरुडाने नाग परत केला नाही. उलट तो गर्वाने म्हणाला,

'मी आपला सेवक आहे. नाग मी आणला आहे. आणि आपण तो नंदीस देता आहात. माझी वस्तू आपण कशी देता ? माझी शक्ती आपण जाणीत नाही ? माझ्याच बलावर आपण संग्रामात दैत्यांवर विजय मिळविला.'

'पक्षिराज, ठीक आहे. मी तुझ्याच शक्तीवर विजय प्राप्त केला. तुझी शक्ती मोठी हे मी मानतो. पण तू असं कर ना. माझ्या या अंगुलीचा भार सहन कर ना.' भगवान विष्णूने आपली अंगुली गरुडाच्या मस्तकावर धरली. तिचा भार गरुडास सहन झाला नाही. दीन भावाने गरुड लज्जित होऊन म्हणाला,

'मी आपला अपराधी सेवक आहे. माझं रक्षण करावं.'

गरुडाने लक्ष्मीचीही प्रार्थना केली. लक्ष्मी कृपावंत होऊन विष्णूला म्हणाली,

'महाराज, या विपन्न गरुडाचं रक्षण करावं.'

'नंदिकेश्वरा, तू या गरुडाच्या बरोबरच नागाला घेऊन महादेवांकडे जा.'

गरुड व नाग यांना घेऊन नंदी शंकरांच्यापाशी आला. तेव्हा भगवान शंकर गरुडास म्हणाले,

'महाबाहो, तू लोकपावनी गौतमी गंगातटावर जा. सर्व अभीष्ट वस्तू देणारी आहे ती. त्या नदीत स्नान केल्यास तुला सर्व वस्तू प्राप्त होतील.'

भगवान शिवांचे वचन ऐकून गरुडाने गोदावरी नदीत स्नान केले. शिव व विष्णू यांच्या चरणी त्याने वंदन केले. वेगाने उडून तो पुन्हा विष्णूपाशी आला. तेव्हापासून सर्व अभीष्ट वस्तू देणारे हे तीर्थ गरुडतीर्थ म्हणून प्रसिद्ध झाले.

त्याच्याही पुढे सर्व पापांचा नाश करणारे गोवर्धनतीर्थ आहे. पूर्वी कोणी एक किसान ब्राह्मण जाबाली नावाचा होता. दोन प्रहर होईपर्यंत तो नांगराचे बैल सोडीत नसे. त्यांच्या पाठीवर तो चाबूक मारी. त्या दोन बैलांच्या डोळ्यांतून नेहमी अश्रू गळत. एके दिवशी सुरभीने ही सर्व हकीगत नंदीला सांगितली. नंदीने खिन्न होऊन भगवान शिवाला ती सांगितली. तेव्हा शंकर नंदीस म्हणाले, 'तुझी प्रत्येक गोष्ट खरी होईल.'

एवढे झाल्यावर नंदीने सर्व गायींना एकत्र जमवून समेट केला. स्वर्गलोक व मर्त्यलोक येथील सर्व गायी अदृश्य झाल्या. तेव्हा सर्व देव ब्रह्मदेवांस शरण जाऊन म्हणाले,

'भगवन्, गायींच्या खेरीज लोकांनी जगावं कसं ?'

'जा. तुम्ही सर्वांनी भगवान शंकरांची वाणी ऐका.'

त्यानंतर नंदीने भगवान शंकरांची स्तुती केली. गौतमीच्या तटावर देवांनी एक गोयज्ञ केला. तेव्हापासून गायींची वाढ झाली. तेव्हा

या तीर्थास गोवर्धनतीर्थं असे नाव पडले. येथील नुसते स्नानही सहस्र गोदानांचे फल देणारे आहे.

श्वेततीर्थ, शुक्रतीर्थ, इंद्रतीर्थ

श्वेततीर्थं तीन लोकांत श्रेष्ठ असून त्याच्या नुसत्या श्रवणानें मनुष्याची सर्वं पापे नष्ट होतात. फार पूर्वी श्वेत नावाचा एक ब्राह्मण महर्षी गौतमांचा मित्र होता. गोदातटावर राहून तो भगवान शिवांचे भजन पूजन करून अतिथींचा सत्कार करीत असे. शिवाच्या ध्यानात व पूजेतच त्याचे सर्वं आयुष्य संपत आले. अंतकाळी यमाचे दूत त्याच्या घरात पोचू शकले नाहीत. चित्रगुप्ताने मृत्यूस विचारले,

'मृत्यो, श्वेताचं जीवन समाप्त झालं आहे. तो अद्याप इथं का आला नाही ? तुझे दूत त्याला का आणीत नाहीत ?'

हे ऐकून श्वेतास आणण्यास स्वत: मृत्यूच क्रोधाविष्ट होऊन त्याच्या घरी आला. भयभीत झालेले दूत बाहेरच उभे होते. मृत्यूने त्यांना विचारले,

'दूतांनो, हे काय चाललं आहे ?'

'भगवान शिवानं श्वेताला रक्षण दिलं आहे. त्याच्याकडं आम्ही पाहूही शकत नाही. ज्याला भगवान शंकर प्रसन्न त्याला भय कसलं ?'

मृत्यूने स्वतःच ब्राह्मणाच्या घरात प्रवेश केला. श्वेताच्या शेजारी पाशधारी मृत्यूस पाहून दंडधारी भैरवाने विचारले,

'मृत्युदेवा, इथं काय पाहता ? '

'मी श्वेताला घेऊन जाण्यासाठी आलो आहे. त्यालाच पाहतो आहे '

'आपण परत जावं.' भैरवाने सांगितले.

मृत्यूने आपला फासा श्वेतावर टाकला. हे पाहून भैरवास फार राग आला. त्याने शिवाने दिलेल्या दंडाने मृत्यूला एक भयंकर जखम केली. पाश हातात धरूनच मृत्यू जमिनीवर पडला. मृत्यूला मार बसला हे पाहून यमदूत पळून गेले. मृत्यूच्या वधाची बातमी त्यांनी यमराजास दिली. महिषवाहन यमराजास अतिशय क्रोध आला. त्याने बलवान

चित्रगुप्त, महिष, भूत, वेताल इत्यादींना घेऊन द्विजश्रेष्ठ श्वेताच्या घरी प्रयाण केले. यमराज व शिवगण यांच्यांत भयानक संग्राम झाला. कार्तिकेयाने यमराजाच्या दूतांना विदीर्ण केले. मृत्यूतून बचावलेल्या यमदूतांनी हा सारा वृत्तान्त भगवान सूर्याला कळविला. सूर्याने सर्व देवांना बरोबर घेऊन भगवान विष्णू, इंद्र, अग्नी, वरुण इत्यादींच्या सह यमराजाकडे येणे केले. ते गोदावरीच्या तीरावर मरून पडले होते. देवांना या घटनेचा धक्का बसला. ते भगवान शिवाची प्रार्थना करताना म्हणाले,

'आपणांस आपले भक्त नेहमीच प्रिय आहेत. दुष्टांचा वध करणाऱ्या व सृष्टीचं रक्षण करणाऱ्या नीलकंठा, आपणांस नमस्कार असो. विप्रवर श्वेत आपला भक्त आहे. त्याचं आयुष्य क्षीण झालं तरी यम आदी त्याला घेऊन जाण्यास समर्थ नाहीत. आपलं आपल्या भक्तावरील हे प्रेम पाहून आम्हांस फार संतोष वाटतो. नाथ, आपण खरंच भक्तवत्सल आहात. आपणांस शरण आलं की यमाचंही भय उरत नाही. हे जाणून आता सर्व लोक आपलीच भक्ती करतील.'

इतकी प्रार्थना होताच भगवान शिवशंकर प्रकट झाले. ते म्हणाले,

'देवांनो, तुम्हांस काय हवंय ?'

'देवेश्वर, हा सूर्यपुत्र धर्म सर्व देहधारी माणसांच्या जीविताचं नियंत्रण करतो. धर्म व अधर्म यांची व्यवस्था हाच लावतो. हा लोकपाल आहे. अपराधी व पापी नाही. याचा वध होऊन कसं चालेल ? त्याच्या शिवाय ब्रह्मदेवाचं तरी काही चालेल का ? म्हणून या यमराजास त्याच्या सेनेसह जिवंत करावं.'

'देवांनो, माझं बोलणं ऐकता ? जो माझा भक्त आहे, भगवान विष्णूचा भक्त आहे, गौतमी गंगातीरावर जो निवास करतो, त्याचे स्वामी आम्ही स्वतः आहोत. त्याच्यावर मृत्यूचा अधिकार कधीच चालत नाही. यमराजानं वाटल्यास आपल्या अनुचरांसह त्याला प्रणाम करावा.'

भगवान शिवाने आपले वाहन नंदीस सांगितले,

'तुम्ही गौतमीचं जल यमराजाच्या अंगावर शिंपडावं.' नंदीने

असे जल शिंपडताच यमराज व दूत जिवंत झाले आणि ते दक्षिणेस निघून गेले. गौतमीच्या उत्तर तटावर सर्व देवदेवता महेश्वराची पूजा करू लागले. त्यावेळी एक लाख बारा हजार तीर्थे एकत्रित झाली. हेच श्वेततीर्थ, हेच मृत्युतीर्थ.

याच्यापुढे शुक्रतीर्थ आहे. मनुष्यास सर्व प्रकारच्या सिद्धी या तीर्थामुळे मिळतात. सर्व प्रकारच्या व्याधींचा नाश होतो. अंगिरा व भृगू हे दोन ऋषी परम धर्मात्मे म्हणून प्रसिद्ध होते. त्यांना दोन पुत्र होते. अंगिराच्या पुत्राचे नाव जीव व भृगूच्या पुत्राचे नाव कवी होते. हे दोन पुत्र आपल्या माता-पित्यांच्या अधीन होते. दोघांचे शिक्षण एकत्रच सुरू झाले. अंगिराचा पुत्र व भृगूचा पुत्र शुक्र एकत्र शिकू लागले. पण अंगिराने या पुत्रांना शिकविताना मनात विषम बुद्धी ठेवली. तो दोघांना वेगवेगळे शिकवू लागला. एके दिवशी शुक्राने म्हटले,

'गुरुदेव, आपण मला असं विषमभावानं का शिकविता ? आपणांस हे योग्य दिसत नाही. पुत्र व शिष्य यांत भेदभाव नसावा. विषमबुद्धी धारण करणाऱ्याच्या पापाची गणना नाही करता येणार. आचार्य, आपणांस मी नमस्कार करतो. मला आता दुसऱ्या गुरूकडं जाण्याची आज्ञा द्यावी.'

इतके म्हणून शुक्र बाहेर पडला. पण जावे कोठे ? विचारावे कोणास ? सर्वांत श्रेष्ठ गुरू कोण ? या सर्व प्रश्नांच्या उत्तरांत सापडणाऱ्या शुक्राने शेवटी गौतमऋषींना शरण जाऊन विचारले,

'मुनिश्रेष्ठा, सांगाल ? माझा गुरू कोण ?'

'जगद्गुरू भगवान शंकरच तुला गुरू योग्य आहेत.'

'मी या शंकरांची आराधना कुठं राहून करू ?'

'गौतमी गंगेचं स्नान करून पवित्र हो. स्तोत्रद्वारा भगवान शिवास संतुष्ट करून घे. संतुष्ट झाल्यावर शिव तुला विद्या देतील.'

शुक्राने गोदावरीच्या तटावर जाऊन स्नान केले. भगवान शिवाची स्तुती मनापासून करताना तो म्हणाला,

'प्रभो, मी बालक आहे. मला आपली स्तुती करण्याचं ज्ञान नाही. मी केवळ आपणांस नमस्कार करू शकतो. गुरूनं माझा त्याग

केला आहे. मला कुणीच सुहृद वा सखा नाही. आपणच माझे प्रभू. जगन्नाथा, आपणांस नमस्कार असो. आपणच सर्व गुरूंचे गुरू आहात. मी तर एक लहान बालक. माझ्यावर कृपा करावी. सुरेश्वरा, मी विद्येसाठी आपणांस शरण आलो आहे. मला आपल्या स्वरूपाचं ज्ञान नाही. लोकसाक्षी शिवा, आपणांस नमस्कार असो.'

एवढी स्तुती ऐकून भगवान शिव प्रसन्न झाले व म्हणाले,

'वत्सा, तुझं कल्याण असो. तुझी इच्छा असेल तसा वर माग.'

'नाथा, ब्रह्मदेवादी देवांनाही जी विद्या मिळाली नाही ती मला मिळावी. आपणच माझे गुरू. आपणच माझे देव.'

शुक्राने विनंती केल्यावर शंकरांनी त्याला मृतसंजीवनी विद्या प्रदान केली. शिवाय लौकिकी, वैदिकी व इतरही काही विद्या शंकरांनी शुक्रास दिल्या. या विद्या घेऊन शुक्र आपल्या पित्याकडे, गुरूकडे आला. तो दैत्यांचा गुरू झाला. एकदा काही कारणावरून बृहस्पतीचा पुत्र कच याने शुक्राचार्यांकडून संजीवनी विद्या प्राप्त केली. कचापासून बृहस्पतीने व त्याच्यापासून इतर देवांनीही विद्या मिळविली. गौतमीच्या तटावर जेथे शुक्राने महेश्वराची आराधना करून ही विद्या मिळविली त्याला शुक्रतीर्थ असे नाव मिळाले. मृत्युसंजीवनीतीर्थ असेही त्याला म्हणतात. येथे स्नान, दान केल्यास अक्षय असे पुण्य मिळते.

या शुक्रतीर्थानंतर इंद्रतीर्थ येते. हे तीर्थ ब्रह्महत्येच्या पातकाचा नाश करते. फार पूर्वकाळाची हकीगत आहे. जेव्हा इंद्राने वृत्रासुराचा वध केला तेव्हा त्याच्यामागे ब्रह्महत्येचे पातक लागले. हे पाहून इंद्राला मोठे भय वाटले. तो इकडे तिकडे भ्रमत फिरू लागला. पण ब्रह्महत्या त्याचा पाठलाग करीत राहिली. तेव्हा त्याने एका मोठ्या सरोवरात प्रवेश करून कमलाच्या देठात आश्रय मिळविला. तेथे त्याने तंतुरूप धारण केले व तो लपून राहिला. ब्रह्महत्या त्या सरोवराकाठी एक हजार वर्षे बसून राहिली. या काळात सर्व देव इंद्राशिवाय राहिले. इंद्र आता प्रकट कसा होणार ? ब्रह्मदेवांनी सांगितले, 'ब्रह्महत्येला दुसरं स्थान द्यावं व इंद्राला गोदावरीत स्नान करायला सांगावं. या स्नानानं इंद्र पुन्हा शुद्ध होऊन जाईल.'

इंद्राचा पहिला अभिषेक नर्मदा तटावर झाला होता. तेथे त्याच्या मळाची शुद्धी झाली म्हणून त्या प्रदेशाचे नाव मालव पडले. त्यानंतर तो गौतमीच्या तटावर आला. तेथे त्याने गौतमीच्या पाण्याने स्नान केले. सर्व देव, ऋषी, ब्रह्मदेव, विष्णू, वसिष्ठ, गौतम, अगस्त्य, अत्री, कश्यप, यक्ष, पन्नग इत्यादींनी इंद्राला अभिषेक केला. यातून पुण्या व सिक्ता या दोन नद्या निर्माण झाल्या व त्या गौतमी गंगेस जाऊन मिळाल्या. हा संगम मुनींच्या निवासामुळे विख्यात तीर्थ बनला. त्याला पुण्यासंगम असे नाव मिळाले. सिक्तासंगमाचे नाव इंद्रतीर्थ पडले. येथे सात हजार मंगलतीर्थे निवास करू लागली.

पौलस्त्य, अग्नी व ऋणमोचनतीर्थ

मनुष्याला सर्व प्रकारच्या सिद्धी देणारे पौलस्त्यतीर्थ आहे. हिरावून घेतलेले राज्यही हे तीर्थ परत मिळवून देते. विश्रवा मुनीचा ज्येष्ठ पुत्र कुबेर हा ऋद्धिसिद्धींनी संपन्न असून उत्तर दिशेचा स्वामी आहे. प्रथम तो लंकेचा राजा होता. त्याचे सावत्र भाऊ रावण, कुंभकर्ण, बिभीषण हे बलवान होते. या तीन बंधूंनी खडतर तपस्या करून ब्रह्मदेवाकडून वर मिळविला. स्वतःचे मामा मारीचाच्या सल्ल्याने त्यांनी कुबेरास लंकेचे राज्य मागितले. देव-दानवांत मोठे युद्ध झाले. रावणाने कुबेराचा पराभव केला. पुष्पक विमान व लंकापुरी यांवर अधिकार मिळवून जाहीर केले की, जो आपल्या बंधूंना मदत करील त्याचा घात आपण करू. कुबेराला म्हणून कोठेच आश्रय मिळाला नाही. तेव्हा तो आपले आजोबा पुलस्त्याकडे गेला. त्यांना प्रणाम करून तो म्हणाला,

'माझ्या दुष्ट भावांनी मला लंकेमधून हाकलून दिलं आहे. सांगा मी आता काय करू ? आता मला केवळ दैव, तीर्थ यांचाच आश्रय घ्यावा लागेल.'

'बेटा, तू गौतमीच्या तटावर जाऊन भगवान शंकरांची स्तुती कर. तेथे गंगाजलात रावणाचा प्रवेश होऊ शकत नाही.'

कुबेराने ही विनंती आज्ञेप्रमाणे मानली. आपली पत्नी, पिता, माता, वृद्ध ऋषी पुलस्त्य यांना घेऊन तो गौतमीच्या तीरावर गेला,

तेथे त्याने गंगेवर स्नान केले. पवित्र होऊन भोगमोक्षाचा दाता भगवान शिवांची त्याने प्रार्थना केली.

'शंभो, आपणच या चराचर जगताचे स्वामी आहात. आपण आपल्या आठ मूर्तींच्या द्वारा या जगताचं भरण-पोषण करता. एके दिवशी जगदंबा पार्वतीनं आपल्या शरीराच्या मळापासून एक पुतळा करून म्हटलं, 'हा पाहा आपला पुत्र,' त्यावर आपली कृपा होऊन त्याला आपण विघ्नहर्ता गणेश बनविलं. आपल्या दृष्टीचा केवढा अद्‌भुत प्रभाव आहे. एकदा आपण कामदेवास जाळून भस्म केलं. रतीचा विलाप सुरू झाला. तेव्हा दयामती पार्वती अश्रुपूर्ण डोळयांनी म्हणाली, 'भगवन्, या बिचाऱ्यांचं दांपत्यसुख संपविलंत.' तेव्हा आपण कामदेवावर कृपा केलीत. कामदेव मनोमय होऊन रतीच्या मनोभूमीत प्रवेश करू शकला.'

कुबेराने केलेली स्तुती ऐकून भगवान शंकर प्रसन्न होऊन पुढे प्रकट झाले. त्यांनी कुबेरास वर मागण्यास सांगितले. पण हर्षाच्या पोटी कुबेराच्या मुखातून शब्द बाहेर आला नाही. याच वेळी आकाशवाणी झाली. 'भगवन्, या लोकांना धन पाहिजे. त्यांचे शत्रू नाहीसे व्हावेत. त्यांना दिग्पालपद प्राप्त व्हावं. धन मिळावं. अपरिमित दानशक्ती त्यांना मिळावी. स्त्री व पुत्राचं सुखही असावं.'

या आकाशवाणीप्रमाणे कुबेराने मागितले ते शंकरांनी त्याला दिले. तेव्हापासून या तीर्थाला पौलस्त्यतीर्थ, धनदतीर्थ, वैश्रवसतीर्थ अशी तीन नावे मिळाली. हे तीर्थ शुभकामना पूर्ण करते.

पौलस्त्यतीर्थानंतर अग्नितीर्थ येते. सर्व यज्ञांचे फल देणारे अग्नितीर्थ सर्व विघ्नांचा नाश करणारे आहे. अग्नीचा भाऊ जातवेदा असून तो देवतांना हविष्य पोचते करी. एके दिवशी गोदावरीच्या तटावर ऋषींच्या मंडपात यज्ञ होत होता. अग्नीचा भाऊ जातवेदा देवांना हविष्य अर्पण करीत होता. याच वेळी अदितीच्या बलवान पुत्राने— मधूने प्रधान ऋषी व देव यांच्या देखतच जातवेदास मारले. तो मृत झाला तेव्हा देवदेवतांचा हविष्य बंद झाला. आपला भाऊ मरण पावला हे पाहून अग्नीस फार राग आला. तो गौतमी गंगेत सामावून गेला.

देव, मनुष्य यांना जीवन नकोसे झाले. सर्व देवांनी, ऋषींनी अग्नीची प्रार्थना केली. जलातील अग्नीचे त्यांना दर्शन झाले. देवांनी प्रार्थना केली,

'अग्ने, सर्वांना जीवदान द्यावं.'

'माझा छोटा बंधू या कार्यात मरण पावला. तीच माझी अवस्था होईल. म्हणून आपल्या कार्यात मला रस नाही.'

'हव्यवाहना, आम्ही आपणांस आयुष्य, कर्म करण्यासाठी उत्साह देऊ. प्रयाज व अनुयाजही देऊ. देवदेवतांचं मुख आपणच व्हाल. पहिली आहुती आपणांस मिळेल. आपण जे द्रव्य द्याल त्यातूनच आम्ही भोजन करू.'

अग्निदेव प्रसन्न झाले. ते सर्वव्यापक व शक्तिमान झाले. जातवेदा, बृहद्भानू, सप्तार्ची, नीललोहित, जलगर्भ, शशीगर्भ, यज्ञगर्भ इत्यादी नावांनी अग्नीचा बोध होऊ लागला. देवांनी जलातून आलेल्या अग्नीत जातवेदाच्या स्वरूपात अभिषेक केला. तेव्हापासून या तीर्थास वन्हितीर्थ नाव पडले. येथे सातशे उत्तम तीर्थे निवास करतात. येथे स्नान करणाऱ्यास अश्वमेध यज्ञाचे फल मिळते. यालाच देवतीर्थ, अग्नितीर्थ, जातवेदातीर्थ अशी नावे प्राप्त झाली.

यानंतर ऋणमोचन तीर्थ आहे. वेदवेत्ते पुरुष याचे महत्त्व जाणतात. कक्षीवानाचा ज्येष्ठ पुत्र पृथुश्रवा. वैराग्याच्या प्रभावामुळे त्याने विवाह केला नाही. अग्निहोत्रही त्याने केले नाही. कक्षीवानाचा कनिष्ठ पुत्रही अविवाहित राहिला. तेव्हा पितरांनी दोन्ही पुत्रांना म्हटले,

'देवऋण, ऋषिऋण व पितृऋण यांतून मुक्त होण्यासाठी विवाह करावा.'

'ऋण कसलं? त्यातून मुक्त कसं व्हायचं?' थोरला म्हणाला.

'थोरला भाऊ जर अविवाहित तर मी विवाह कसा करावा? नाहीतर परिवित्ती होण्याचं भय आहे. शास्त्रात हा दोषच.'

'तुम्ही गौतमीत स्नान करा. तुमच्या सर्व कामना पूर्ण होतील. गौतमीचं दर्शन घ्या. तिला वंदन करा. तिचं ध्यान करा. तुमच्या सर्व कामना पूर्ण होतील. या स्नानानं थोरल्या भावावर कसलंच ऋण राहणार नाही. छोटा बंधू परिवित्ती होणार नाही.'

पितरांच्या या आज्ञेवरून पृथुश्रवानें गौतमीत स्नान केले. तर्पण करून तो तीन ऋणांतून मुक्त झाला. तेव्हापासून हे तीर्थ ऋणमोचन-तीर्थ झाले. येथे स्नान व दान केल्याने मनुष्य ऋणांतून मुक्त होतो.

सुपर्णासंगम, वृद्धासंगमतीर्थ

यानंतर सुपर्णासंगम तथा काद्रवासंगम नावाचे तीर्थ आहे. येथे भगवान शंकर गंगेच्या तटावर असतो. अग्निकुंड, रुद्रकुंड, विष्णुकुंड, सूर्यकुंड, सोमकुंड, ब्रह्मकुंड, कुमारकुंड, वरुणकुंड येथेच असून अप्सरा नावाची एक नदी येथेच गौतमीस मिळते. यापुढे पुरूरवसतीर्थ आहे. त्याच्या दर्शनाने, स्मरणाने पाप नाहीसे होते. एकदा राजा पुरूरवा ब्रह्मदेवांकडे गेला. त्यावेळी देवनदी सरस्वती ब्रह्मदेवांजवळ बसली होती. या रूपवती मुलीस पाहून पुरूरव्याने उर्वशीस विचारले,

'ब्रह्मदेवांपाशी ही रूपवती कोण आहे? हिच्या सौंदर्याचा प्रकाश सर्वत्र पडतो.'

'राजा, ही कल्याणमयी ब्रह्मकुमारी देवनदी सरस्वती आहे.'

'तिला माझ्याकडं बोलाव ना.'

उर्वशीने राजाचा संदेश दिल्यावर सरस्वती पुरूरव्यापाशी आली. राजाने सरस्वती नदीच्या तटावर तिच्यासह अनेक वर्षे विहार केला. हे पाहून ब्रह्मदेवांनी सरस्वतीस शाप दिला. या शापामुळे सरस्वती मृत्युलोकातून लुप्त झाली. सरस्वती नदी जेथे गंगेस मिळते तेथे जाऊन राजा पुरूरव्याने तपस्या करून भगवान शिवांस प्रसन्न करून घेतले. तेव्हापासून या तीर्थास पुरूरवातीर्थ, सरस्वतीसंगम, ब्रह्मतीर्थ अशा नावांनी ओळखू लागले. येथे सिद्धेश्वराच्या स्वरूपात महादेवाचा निवास आहे.

याशिवाय येथे सावित्री, गायत्री, श्रद्धा, मेधा व सरस्वती ही पाच पुण्यतीर्थे आहेत. या पाच ब्रह्मदेवांच्या कन्या नदीरूप झाल्या आहेत. त्यांच्यांत स्नान केल्याने मनुष्य सर्व पापांतून मुक्त होतो. शमीतीर्थापासूनही सर्व पापांची शांती होते. फार पूर्वी प्रियव्रत नावाचा एक राजा होऊन गेला. त्यानें गोदावरीच्या तटावर एक अश्वमेधयज्ञ

करण्याची तयारी केली. यज्ञाचे पुरोहित वसिष्ठ होते. त्या यज्ञात एके दिवशी हिरण्य नावाचा एक दैत्य आला. महर्षी वसिष्ठांनी आपल्या ब्रह्मदंडाने त्याला मारून पिटाळून लावले. यज्ञास पुन्हा प्रारंभ झाला. शमीतीर्थ, विष्णुतीर्थ, अर्कतीर्थ, शिवतीर्थ, सोमतीर्थ व वसिष्ठतीर्थ यांनी अश्वमेधयज्ञाचे फल त्यास दिले.

गौतमीच्या एका स्थानावर अनेक नद्या मिळून अनेक तीर्थे झाली आहेत. सोमतीर्थ, गंधर्वतीर्थ, देवतीर्थ, पूर्णातीर्थ, शालतीर्थ, श्रीपर्णासंगम, स्वागतासंगम, कुसुमासंगम, पुष्टिसंगम, कर्णिकासंगम, वैष्णवीसंगम, कृशरासंगम, वासवीसंगम, शिवशर्मा, शिखी, कुसुंभिका, उपारथ्या, शांतिजा, देवजा, अज, वृद्ध, सुर, भद्र इत्यादी अनेक तीर्थे गौतमीच्या परिसरात आहेत. यांत स्नान केले, येथे जप, तप, होम, पितृतर्पण, नामांचा पाठ, स्मरण केले की सर्व पापांतून मुक्त होऊन मनुष्य विष्णुधामास जातो.

वृद्धासंगम हे असेच एक तीर्थ. येथे वृद्धेश्वर नावाचे महादेव आहेत. पूर्वी एक महान तपस्वी होते. त्यांचे नाव वृद्धगौतम होते. जेव्हा ते बालक होते तेव्हा त्यांची मुंज कशीतरी त्यांच्या पित्याने केली. यानंतर ते भ्रमणासाठी बाहेर पडले. त्यांना केवळ गायत्रीमंत्राचे स्मरण होते. वेदांचा, शास्त्रांचा अभ्यास त्यांनी केला नाही. केवळ गायत्रीने त्यांचे ब्राह्मणत्व सुरक्षित राहिले. त्यांचा विवाह झाला नाही. ते क्रमाक्रमाने वृद्ध झाले. विविध आश्रम, तीर्थे, वन यांतून भ्रमण करता करता ते शीतगिरीवर राहू लागले. तेथे त्यांनी एक रमणीय गुंफा पाहिली. त्या गुंफेत एक अतिशय वृद्ध दुर्बल तपस्विनी राहत होती. तिचे सर्व अंग शिथिल झाले होते. वीतरागा ब्रह्मचारिणी एकान्तवासात तपस्या करीत होती. तिला पाहून मुनिश्रेष्ठ गौतमांनी नमस्कार करण्याचा प्रयत्न केला. ती म्हणाली,

'आपण तर माझे गुरुदेव. आपण मला प्रणाम नका करू. ज्याला गुरू नमस्कार करतात त्याचं आयुष्य कमी होतं. विद्या, धन, कीर्ती, यश, धर्म, स्वर्ग इत्यादी सर्व नष्ट होतं.'

'आपणच वृद्धा तपस्विनी आहात. गुणांनीही आपण थोर आहात.

मी तर फारच थोडं लिहिणं वाचणं केलं आहे. वयानंही मी लहान आहे. मी आपला गुरू कसा ?'

'आर्ष्टिषेणाचा प्रिय पुत्र ऋतध्वज होता. तो मोठा गुणवान, बुद्धिमान, शूर वीर होता. एकदा तो शिकारीसाठी वनात गेला. आणि याच गुंफेत विश्रांतीसाठी आला. येथे त्याला एक सुंदर अप्सरा दिसली. तिचं नाव सुश्यामा होतं. ती गंधर्वराजाची कन्या होती. राजाने तिला निरखून पाहिलं. दोघांच्याही मनांत अनुरक्ती निर्माण झाली. ऋतुध्वजानं सुश्यामाच्या बरोबर विहार केला. भोगेच्छा निवृत्त झाली तेव्हा राजा तिचा निरोप घेऊन आपल्या घरी निघून गेला. त्यानंतर सुश्यामाच्या गर्भापासून माझा जन्म झाला. जेव्हा माता येथून निघाली तेव्हा म्हणाली, 'कल्याणी, जो पुरुष या गुहेत प्रथम येईल तो तुझा पती होईल.' आजपर्यंत आपल्याशिवाय कुणीच आलं नाही. ब्रह्मन्, माझं कुणीच नाही. मला माता नाही, पिता नाही. मीच माझी मालकीण. आजपर्यंत ब्रह्मचर्य पाळलं. आता मला पुरुषाची इच्छा आहे. आपण माझा स्वीकार करावा.'

'भद्रे, माझं तर वय झालं. माझी तर एक हजार वर्षं झाली. तूही नव्वद हजार वर्षांची झालीस. मी बालक, तू वृद्धा. हा संबंध योग्य नाही होणार.'

'पूर्वकालापासून आपणच माझे पती नियुक्त झाले आहात. विधात्यानंच मला आपणांस समर्पण केलं आहे. आता माझा स्वीकार करावा. माझ्यात दोष कसलाच नाही. माझी आपणांवर भक्ती आहे. आपण जर मला स्वीकारलं नाही तर मी आपणांकडे पाहून इथंच प्राण देईन. प्रेमीजनाच्या परित्यागाचं पातक मोठं असतं.'

'मला नाही तपस्या. नाही विद्या. मी दिसायला कुरूप. निर्धन आहे मी. मी तुला योग्य वर नाही. प्रथम मला सुंदर रूप व उत्तम विद्या यांची प्राप्ती करून घ्यायला हवी.'

'ब्रह्मन्, मी आपल्या तपस्येनं देवी सरस्वतीला प्रसन्न करून घेतलं आहे. रूप देणारा अग्नीही माझ्यावर प्रसन्न आहे. तो आपणांस रूप देईल. वागीश्वरी आपणांस विद्या देईल.'

वृद्धाने गौतम मुनींना रूप दिले. विद्या दिली. त्यांनी मग प्रसन्न होऊन त्या वृद्धेशी विवाह केला. कित्येक वर्षे त्यांनी या ठिकाणी विहार केला. एके दिवशी वसिष्ठ व वामदेव इतर अनेक ऋषींच्या बरोबर फिरत फिरत या गुंफेपाशी आले. गौतमाने पत्नीसह त्या सर्वांचे स्वागत केले. त्यांतील काहींनी थोड्या थट्टेने विचारले,

' बूढी माँ, हा गौतम तुझा मुलगा की नातू ? खरं सांग हं. वृद्ध पुरुषास युवती स्त्री विषासमान आहे. वृद्धा स्त्रीस युवक पुरुष अमृता-प्रमाणं आहे. '

या थट्टेच्या बोलण्याने गौतम व त्याची पत्नी गप्प बसले. आतिथ्य घेऊन सर्व ऋषी निघून गेले. ते गेल्यानंतर या दंपतीस फार दुःख झाले. एकदा आपल्या स्त्रीसह गौतमांनी अगस्ती ऋषींना विचारले,

' महर्षी, कल्याणाची प्राप्ती होईल असा प्रदेश कोणता ? '

' ब्रह्मन्, मी मुनींच्या मुखांतून ऐकलं आहे की, गोदावरी नदीत स्नान केल्यानं मनातील सर्व कामना पूर्ण होतात. '

अगस्तींचा सल्ला ऐकून गौतममुनी वृद्धेसह गौतमीतटावर आले. त्यांनी घोर तपश्चर्या केली. भगवान शंकर व विष्णू यांचे स्तवन केले. पत्नीसाठी गंगेलाही त्यांनी संतुष्ट केले. सर्वांना शरण देणारी गौतमी गंगा स्तोत्राने प्रसन्न झाली व म्हणाली,

' ब्रह्मन्, मंत्र म्हणत असताना माझ्या जलानं तुमच्या पत्नीस अभिषेक करा. त्यामुळं ती रूपवती होईल. हिचं सारं अंग मनोहर होईल. हिच्या डोळ्यांत एक प्रकारची चमक येईल. सर्व प्रकारची शुभ लक्षणं प्रकट होतील. '

गंगाजीच्या कृपेनें दोघे पति-पत्नी सुंदर रूपवान बनले. त्यांच्या अभिषेकाचे जल नदीरूपाने वाहू लागले. या नदीचे नाव वृद्धा झाले. गौतमांनी स्थापन केलेले शिवलिंग वृद्धेश्वर नावाने प्रसिद्ध झाले. वृद्धेच्या सहवासात गौतममुनींना अपार आनंद मिळाला. या तीर्थाचे नाव वृद्धासंगम असे झाले. येथील स्नानाने सर्व प्रकारचे मनोरथ पूर्ण होतात.

इलातीर्थाचा आविर्भाव

मनुष्यास सर्व सिद्धी देणारे, अनेक पापांपासून दूर करणारे, संपूर्ण इच्छा तृप्त करणारे असे हे इलातीर्थ आहे. वैवस्वत मनूच्या वंशात इल नावाचा एक राजा झाला. मोठी सेना घेऊन तो एकदा शिकार खेळण्यासाठी निघाला. वनात त्याच्या मनात दुसराच एक विचार आला. तो आपल्या मंत्र्यांना म्हणाला,

'तुम्ही सर्वजण माझ्या मुलानं सांभाळलेल्या नगरीस जावं. देश, कोश, बल, राज्य, माझा पुत्र यांचं तुम्ही रक्षण करावं. महर्षी वसिष्ठ आपणांस पित्यासमान आहेत. त्यांना माझ्या पत्नीसह त्वरित इथं पाठवून द्यावं. त्यांनी अग्निहोत्रासाठी अग्नी आणावा. मी आता या वनातच निवास करीन.'

सर्व लोक नगरीस निघून गेल्यावर राजा रत्नमय हिमालयावर जाऊन तेथे एकटाच राहू लागला. त्याने एकदा पर्वतावर एक गुहा पाहिली. नाना प्रकारच्या रत्नांनी ती सुशोभित झाली होती. त्या गुहेत यक्षांचा राजा समन्यू राहत होता. त्याच्या बरोबर त्याची पत्नी समा पण होती. त्यावेळी तो यक्ष मृगाचे रूप धारण करून आपल्या पत्नी-बरोबर विहार करीत होता. विविध रत्नांनी शोभिवंत झालेली ती गुहा रिकामीच होती. म्हणून राजा इलाने त्या गुहेत निवास केला. तो यक्ष अधर्माच्या कोपामुळे मृग होऊन राहिला होता. त्याने मनात विचार केला, या राजाने आपले घर घेतले. मी त्याला जिंकले नाही. तो काही मागितल्याने देणार नाही. आता मी काय करू ? तो आपल्या मृगीरूप-धारिणी पत्नीस म्हणाला,

'कान्ते, या राजाचं मन मृगयेत आसक्त आहे. तू मृगीचं रूप धारण करून या राजाच्या समोरून जा. तो तुझ्या मागोमाग येईल. त्याला आकृष्ट करून तू त्याला दूर अंबिकावनात घेऊन जा. त्या प्रदेशात जाताच हा राजा स्त्री होईल. भद्रे, तूच हे काम करावंस.'

'नाथ, अंबिकावन तर फारच सुंदर आहे ! तुम्हीच तिथं का नाही जात ? तिथं जाण्यानं काय दोष होतो ?'

' प्रिये, सांगतो सर्व तुला. एकदा पार्वतीनं एकान्तात बसलेल्या भगवान शंकरांना विचारलं, ' देवा, स्त्रियांची स्वाभाविक इच्छा असते की त्यांची रतिक्रीडा नेहमीच गुप्त असावी. म्हणून मला असं एक गुप्त स्थान द्यावं की आपल्या आज्ञेनं ते नेहमी सुरक्षित राहील. ते उमावन नावानं प्रसिद्ध होईल. तेथे आपण, गणेश, कार्तिकेय, नंदी यांच्याशिवाय कुणालाच प्रवेश असणार नाही. जर कुणी आला तर तो स्त्री होऊन जाईल. ' शंकरांनी त्याप्रमाणे वर दिला. यासाठी त्या वनात आपण जाणं उचित नाही. '

स्वामीच्या वचनानुसार ती यक्षिणी विशाल नेत्रांची मृगी बनून राजाच्या समोर आली. राजाने मृगीकडे पाहिले. त्याला आसक्ती मृग-येची होती. मृगीचा पाठलाग तो एकटाच घोड्यावर बसून करू लागला. धीरे धीरे राजास तिने अंबिकावनापर्यंत नेले. राजाने वनात प्रवेश केला तेव्हा यक्षिणीने सुंदर स्त्रीचे रूप धारण करून अशोक वृक्षाखाली उभी राहून हसून राजास म्हटले,

' सुंदरी इला, तू एकटीच अबला पुरुषाचा वेष धारण करून, घोड्यावर बसून कुठं निघालीस ? '

इला शब्द ऐकताच राजा क्रोधाने मूर्च्छित झाला. त्याने थोडे सावध होऊन यक्षिणीस तिचा पत्ता विचारला. यक्षिणी पुन्हा म्हणाली,

' इले, इले, तू स्वतः स्वतःकडं पाहा तरी. मी मिथ्यावादिनी की सत्यवादिनी हे तू नंतर सांग.'

तेव्हा राजाने स्वतःकडे पाहिले. त्याच्या छातीवर दोन स्तन उभारून आले होते. आपणांस झाले तरी काय ? म्हणून राजा चकित झाला. त्याने यक्षिणीस विचारले, ' सुव्रते, हे मला काय झालं ? तुला सारं माहीत असणार ! सांग ना. तू कोण आहेस ? '

' हिमालयाच्या एका श्रेष्ठ गुंफेत माझा पती यक्षराज समन्यू निवास करतो. मी त्याची पत्नी आहे. ज्या शीतल गुहेत आपण होता ती गुहा आमची आहे. मीच मृगी बनून आपणांस येथपर्यंत आणलं. हे आहे उमावन. महादेवानं पूर्वी वर दिला होता की, कुणी परका पुरुष इथं येईल तर तो स्त्री होईल. त्यानुसार आपण स्त्री झाला आहात.

आता आपण दुःखी न व्हावं.'

यक्षिणी सुंदरी इतके बोलून अदृश्य झाली. तिने सर्व हकीगत आपल्या पतीस सांगितली. यक्षासही आनंद झाला. इकडे इला गात गात, फिरत फिरत उमावनातच राहिली. स्त्रीस्वभावानुसार तिच्या चेष्टा, क्रीडा सुरू झाल्या. एकदा ती नृत्य करीत असताना बुधाने तिला पाहिले. आपल्या पित्यास नमस्कार करायला बुध निघाला होता, पण इलाला पाहताच तो थबकला व म्हणाला,

'देवी, तू माझी भार्या होशील ?'

इलाने त्याची विनंती मान्य केली. त्याने तिला आपल्या उत्तम स्थानावर नेले व तो विहार करू लागला. तिने सर्व प्रकारची सेवा करून बुधास संतुष्ट केले. संतुष्ट होऊन बुध मोठ्या प्रेमाने म्हणाला,

'कल्याणी, मी तुला काय देऊ ? तुझ्या मनात जे प्रिय असेल ते तू माग.'

'पुत्र द्यावा मला.'

'इला, माझं वीर्य अमोघ आहे. तुला विश्वविख्यात पुत्र होईल. तो चंद्रवंशाची वृद्धी करील. तो तेजानं सूर्य, बुद्धीनं बृहस्पती, क्षमेनं पृथ्वी, पराक्रमात विष्णू व क्रोधात अग्नीसमान होईल.'

वेळ येताच बुधाला पुत्र झाला. देवलोकातून जयजयकाराचा ध्वनी उमटला. त्याच्या जन्मोत्सवास प्रमुख प्रमुख देव आले. बालक जन्मतःच उच्च स्वरांनी रडत होता. जमलेले ऋषी व देव म्हणू लागले,

'या बालकानं पुरू (अत्यंत उच्च स्वरानं) रव (शब्द) केला आहे. म्हणून याचं नाव पुरूरवा ठेवावं.'

या बालकाचे नाव पुरूरवा ठेवण्यात आले. त्याला क्षत्रियोचित अशी विद्या प्राप्त झाली. प्रयोगासह धनुर्विद्या शिकवण्यात आली. पण त्याची माता नेहमी दुःखी-कष्टी असायची. त्याने एकदा तिला विचारले,

'माताजी, बुध माझा पिता, तुझा परमप्रिय पती. माझ्यासारखा तुझा पुत्र. असं असताना तुला एवढी चिंता कसली ?'

'बेटा, तुझं बोलणं ठीक आहे. बुध माझे स्वामी. तू पुत्र. पण

माझ्या मनात खूप जुनं असं एक दुःख आहे. त्याचं स्मरण मला वारंवार होतं.'

'मा, मला सांगतेस ते दुःख ?'

'बेटा, तुझ्या अनुग्रहानं मी पुरुषत्वाची इच्छा करते. उत्तम राज्य, पुत्रांना अभिषेक, दानधर्म, यज्ञ, मुक्तीचा मार्ग इत्यादीही मला हवं. तू तुझ्या पित्याला सर्व काही विचार.'

पुरूरवा बुधापाशी गेला तेव्हा बुध म्हणाला,

'महामते, मी इल राजाला जाणतो. त्याची इला कशी झाली हेही मला समजलं आहे. बेटा, भगवान शिव, माता पार्वती यांच्या कृपेनं हा शाप दूर होईल. गोदावरीच्या तीरावर जाऊन तपस्या कर. तेथे शिवपार्वती आहेत.'

पित्याचे बोलणे ऐकून पुरूरव्याला आनंद झाला. मातेला पुरुषत्व प्राप्त व्हावे म्हणून तो त्रिभुवनपावनी गौतमी गंगेकडे गेला. पुत्राच्या मागोमाग बुध व इला होतेच. स्नान करून भगवंताची स्तुती त्यांनी केली. स्तुतीने महादेव प्रसन्न झाले. ते प्रकट झाले. उमा म्हणाली,

'तुमची इच्छा काय आहे ? तुमची इच्छा पूर्ण करू. तुमचं कल्याण असो. देवादिकांना दुर्लभ असणारी वस्तू मी तुम्हांला देईन.'

'जगदंबिके,' पुरूरव्याने सांगितले, 'देवी, राजा इल अज्ञानवश बनून आपल्या वनात घुसला. देवेश्वरी, आपण त्याला क्षमा करावी. त्याला पुन्हा पुरुषत्व द्यावं.' शंकरांच्या सांगण्यानुसार इलाने गौतमी गंगेत स्नान केले. स्नान करताना जे जल वाहून गेले त्यातून स्त्रीचे सौंदर्य, नृत्य, संगीत इत्यादी गोष्टी गेल्या. त्यांच्या नृत्या, गीता व सौभाग्या या नद्या झाल्या. या नद्या गौतमी गंगेस मिळाल्या. या संगमावर स्नान करणाऱ्यास इंद्रपदाची प्राप्ती होते. शिवपार्वतीच्या प्रसादाने इलास पुन्हा पुरुषत्वाची प्राप्ती झाली. राजा इलने अभ्युदयासाठी अश्वमेधयज्ञ केला. पुरोहित, वसिष्ठ, पुत्र, अमात्य, सेना, कोश यांचे प्रमुख यज्ञात सहभागी झाले. दंडकारण्यात इलने चतुरंग सेनेसह राज्याची स्थापना केली. सूर्यवंशाची ही परंपरा असली तरी चंद्रवंशी पुरूरव्यासही राज्याभिषेक केला. राजाला जेथे पुरुषत्व प्राप्त झाले तेथे

गौतमीतटावर सोळा हजार तीर्थे निर्माण झाली. इलेश्वर या नावाने शंकर तेथे राहिले.

चक्रतीर्थ व पिप्पलतीर्थ

ब्रह्महत्यादी पापे नाहीशी करणारे चक्रतीर्थ असून तेथे महादेव चक्रेश्वर नावाने निवास करीत आहेत. त्यांच्यापासूनच भगवान विष्णूस चक्र प्राप्त झाले. याच ठिकाणी विष्णूने चक्रप्राप्तीसाठी भगवान शंकरांची आराधना केली. या चक्रतीर्थानंतर पिप्पल तीर्थ येते. चक्रेश्वरच पिप्पलेश्वर आहे. दधीची नावाचे एक थोर मुनी सर्व गुणांनी संपन्न होते. त्यांची गभस्तिनी नावाची पत्नी श्रेष्ठ वंशातील व पतिव्रता होती. ही लोपामुद्रेची बहीण. दधीचींची पत्नी नेहमी तपस्येत मग्न असे. दधीचींचा आश्रम गंगेच्या तटावर असून ते प्रत्येक दिवशी अग्नीची उपासना करीत, गृहस्थधर्माचे पालन करीत. देव व अतिथी यांची सेवा करीत. त्यांचे स्वतःच्या पत्नीवर प्रेम होते. ते शांत स्वभावाचे असून त्यांच्या प्रभावाने त्या प्रदेशावर कोणी शत्रू अथवा दैत्य-दानव आक्रमण करीत नसे.

एके दिवशीची गोष्ट. दधीची मुनींच्या आश्रमात रुद्र, आदित्य, अश्विनीकुमार, इंद्र, विष्णू, यम, अग्नी इत्यादी देव दैत्यांचा पराभव करून आले होते. मुनिवर दधीचींना सर्वांनी नमस्कार केला. दधीचींनी पण पत्नीसह सर्व देवांचा गृहस्थधर्माला उचित असा सत्कार केला. त्यांचे कुशल विचारले. देव म्हणाले,

'मुनें, आपण या पृथ्वीवरील कल्पवृक्ष आहात. आपण असताना या जगात दुर्लभ अशी कोणती गोष्ट आहे ?'

एतदेव फलं पुंसां जीवतां मुनिसत्तम ।
तीर्थाप्लुतिर्भूतदया दर्शनं च भवादृशाम् ।।

'जीवित पुरुषाच्या जगण्याचं फल इतकंच की, त्यानं तीर्थात स्नान करावं, सर्व प्राण्यांवर दया करावी व आपल्यासारख्या महात्म्यांचं दर्शन घ्यावं. मुने, आम्ही मोठमोठ्या राक्षसाना व दैत्यांना जिंकून आलो आहोत. आता आम्हांला शस्त्रास्त्रं सांभाळून उपयोग

काय ? आता त्यांचा भार वाटतो. स्वर्गात ती ठेवली तर शत्रू हल्ला करून ती घेऊन जातात. तेव्हा आम्ही आपली शस्त्रास्त्रं इथंच आपल्या आश्रमात ठेवतो. ब्रह्मन्, इथं दानवांचं, राक्षसांचं भय बिलकूल नाही. आपल्या प्रभावानं हा सर्व प्रदेश सुरक्षित आहे. आपण ही शस्त्रास्त्रं सांभाळावीत. आम्ही इंद्राबरोबर परत चाललो.'

'एवमस्तु' दधीची म्हणाले.

'मुने,' दधीचींची पत्नी मध्येच पडून म्हणाली,

'मुने, देवांच्या या सांगण्यामुळं विरोध उत्पन्न होईल. आपण या भानगडीत न पडणं चांगलं. ज्यानं परमार्थाचं चिंतन केलं आहे, ज्याला जगताच्या इतर कार्यात आसक्ती नाही, त्यानं हे एक नवं संकट कशासाठी घ्यायचं ? विप्रवर, माझं बोलणं ध्यान देऊन ऐका. जर आपण या शस्त्रास्त्रांना ठेवून घेतलं तर देवांचे शत्रू आपला द्वेष करतील. जर यांतील एखादं चोरीस गेलं तर हे देवही आपले शत्रू बनतील. आपण वेदवेत्त्यांत श्रेष्ठ आहात. आपण या भानगडीत पडू नये. साधू-पुरुषानं केवळ वाणी, मन व शारीरिक क्रिया यांनी दुसऱ्याचं कार्य करावं.'

'भद्रे, देवांनी प्रार्थना केल्यावर मी होय म्हटलं. आता नाही म्हटलं तर मला सुख होणार नाही.'

देवांनी आपली शस्त्रास्त्रे मुनींच्या आश्रमात ठेवून ते आपापल्या लोकांत निघून गेले. मुनी आपल्या पत्नीसह कित्येक वर्षे सुखाने राहिले. एक हजार वर्षे गेल्यावर एकदा मुनी म्हणाले,

'देवी, देव इथून अस्त्र घेऊन जात नाहीत. आणि दैत्य तर माझा द्वेष करायला लागलेत. आता मी काय करावं ?'

'नाथ, मी तर प्रथमच सांगितलं होतं. आता आपणच जे उचित असेल ते करावं. दैत्यांतील मोठे मोठे वीर, तपस्वी, बलवान या शस्त्रास्त्रांना नक्कीच घेऊन जाणार.'

दधीचींनी त्या अस्त्रांच्या रक्षणासाठी एक युक्ती केली. त्यांनी पवित्र मंत्र म्हणून पवित्र जलाने ती अस्त्रे व शस्त्रे धुतली. आणि ते जल त्यांनी पिऊन टाकले. त्या शस्त्रास्त्रांचे तेज निघून गेले असल्यामुळे

ती शक्तिहीन बनली. आणि हळूहळू ती नष्ट होऊन गेली. त्यानंतर देव परत आले व म्हणाले,

' मुनिवरा, आमच्यावर शत्रूचं भय मोठंच निर्माण झालं आहे. आमची सारी शस्त्रास्त्रं परत हवीत आम्हांला. '

' आपण कित्येक वर्षांत आला नाहीत. दैत्यांच्या भयानं मी ती अस्त्रं पिऊन टाकली. आता ती माझ्या शरीरात आहेत. जे उचित असेल ते तुम्ही करावं. '

' मुनीश्वरा, आमची शस्त्रं व अस्त्रं आम्हांस हवीत, इतकंच आम्ही म्हणतो. '

' पण आपली सारी शस्त्रास्त्रं माझ्या हाडांत भिनून गेली आहेत. माझी हाडं घेऊन जा.' यावेळी दधीचींची पत्नी जवळ नव्हती. हे पाहून देव म्हणाले,

' मुने, जे काय करायचं असेल ते लौकर करा. '

' देवांनो, तुम्ही सुखपूर्वक माझं हे शरीर घेऊन चला. मला या देहाचं काय काम ? माझी हाडं तुम्ही न्यावीत. '

असे म्हणून दधीची पद्मासन घालून बसले. नाकाच्या अग्रावर त्यांनी आपली दृष्टी स्थिर केली. त्यांच्या मुखावर प्रकाश व शांती यांचें दर्शन झाले. हृदयाकाशात स्थित असणाऱ्या अग्नीसहित वायूला हळूहळू वर खेचून अप्रमेय अशा परमपद ब्रह्मात स्थापन केले. महात्मा दधीची अशा रीतीने ब्रह्मसायुज्यपदास गेले. त्यांचे शरीर निष्प्राण झाले. देवांनी उतावळेपणाने विश्वकर्म्यास सांगितले,

' आता तुम्ही खूप चांगली शस्त्रं यापासून बनवावीत. '

' देवांनो, हे शरीर ब्राह्मणाचं आहे. मी याचा उपयोग कसा करू ? जेव्हा यांची केवळ हाडंच उरतील तेव्हा मला अस्त्रं निर्माण करता येतील. '

तेव्हा देवांनी गायींना म्हटले,

' आम्ही तुमची मुखं वज्रासारखी करतो. तुम्ही या दधीचीच्या देहास विदीर्ण करा व केवळ त्यांची हाडंच काढून आम्हांस द्या. '

गायींनी दधीचींच्या देहास चाटून चाटून त्यांची हाडे काढून

देवांना दिली. देव हाडे घेऊन उत्साहाने निघून गेले, गायीही आपापल्या स्थानांवर गेल्या.

त्यानंतर बऱ्याच वेळाने दधीचींची पत्नी आश्रमाकडे येण्यास निघाली. तिच्या हातात भरलेला कलश होता. पार्वतीची पूजा तिने फुलांनी नुकतीच केली होती. या वेळी तिच्या पोटात एक गर्भ होता. आश्रमात ती आली तेव्हा तिला तिचे स्वामी दिसले नाहीत. मोठ्या विस्मयात पडून तिने अग्नीस विचारले,

'माझे पतिदेव गेले कुठं ?'

अग्नीने तिला सर्व वृत्तान्त सांगितला. पतीच्या मृत्यूचे वृत्त ऐकून दुःखाने ती जमिनीवर पडली. अग्नीने तिला धीर देऊन तिचे थोडे सांत्वन केले. ती म्हणाली,

'देवांना शाप देण्यास मी समर्थ नाही. मी स्वतःच अग्नीस माझा देह अर्पण करणार. आता जगून काय करू ? जगात निर्माण झालेली प्रत्येक वस्तू नष्ट होते. शोक तरी कशाचा करावा ? गाय, ब्राह्मण, देव यांच्यासाठी देह समर्पण झाला तर पुण्य तरी मिळेल. देह धारण करणाऱ्याचा प्राण कधी तरी जाणारच.'

इतके म्हणून तिनें अग्नीत प्रवेश करण्याची तयारी केली. अग्नीचे पूजन करून तिने स्वतःचे पोट चिरून गर्भ बाहेर काढला. नंतर तिनें गंगा, पृथ्वी, आश्रम, आश्रमातील वनस्पती यांना नमस्कार करून पतीची त्वचा आदी बरोबर घेऊन अग्नीत प्रवेश करण्यास सुरुवात करण्यापूर्वी म्हटले,

'माझ्या गर्भातील हे बालक पिताहीन आहे. याला कुणी सगोत्र बंधू नाही. तेव्हा संपूर्ण भूतगण, औषधी वनस्पती, लोकपाल यांनीच याचं रक्षण करावं.'

असे म्हणून तिने तो गर्भ एका पिंपळाजवळ ठेवून दिला. स्वामींना चित्तात आठवून तिने त्यांना प्रणाम केला. अग्नीला प्रदक्षिणा घालून यज्ञपात्रांच्यासह तिने चितेत प्रवेश केला. पतीसह ती दिव्य लोकास निघून गेली. त्यावेळी आश्रमातील वनवासी वृक्षपण रडत होते. तिने व महर्षी दधीचींनी त्यांचे मुलाप्रमाणे पालन केले होते. मृग, पक्षी, वृक्ष

रडत एकमेकांना म्हणाले,

'आपण आता मातेशिवाय, पित्याशिवाय जिवंत कसं राहावं ? दधीची व त्यांची पत्नी यांचा केवढा लोभ आपल्यावर, आमचा धिक्कार असो. आम्हीच पापी. त्यांच्या दर्शनापासून आम्ही असं वंचित झालो ना ? आम्ही आता या गर्भस्थ बालकाचं रक्षण करावं. हाच आमचा सनातन धर्म आहे.'

आश्रमातील वनस्पती, औषधी वृक्ष यांनी सोमाकडे जाऊन अमृताची याचना केली. सोमाने उत्कृष्ट असे अमृत दिले. वनस्पतींनी ते अमृत बालकास पाजले. अमृत पिऊन तृप्त झालेले बालक शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे वाढू लागले. पिंपळाच्या वृक्षाने त्याचे पालन केले. म्हणून बालक पिप्पलाद या नावाने ओळखले जाऊ लागले. तो मोठा झाला तेव्हा पिंपळाच्या वृक्षांना उद्देशून म्हणाला, 'मनुष्यापासून मनुष्य, वनस्पतीपासून वनस्पती अशी निर्मिती दिसते. पण मी मात्र पाहा. या वृक्षाचा पुत्र असूनही मला हातपाय आहेत.' पुत्राचे हे बोलणे ऐकून वृक्षांनी त्याला हळूहळू दधीचींची व त्यांच्या पत्नीची हकीगत सांगितली. ऐकता ऐकताच दुःखाने बालक जमिनीवर पडला. त्यावेळी वृक्षांनी धर्म व अर्थ यांनी युक्त अशी वचने सांगून त्याचे सांत्वन केले. थोडा सावध होताच तो म्हणाला, 'ज्यांनी माझ्या पित्याची हत्या केली त्यांचा वध मी करीन. पित्याचे शत्रू, मित्र, मुलाचेही शत्रू व मित्र असतात. याच्या विरुद्ध आचरण करणारा पुत्र नसून पुत्ररूप शत्रूच असतो.'

त्यावेळी भोवतीचे वृक्ष त्याला म्हणाले,

'तुझ्या मातेनं परलोकात जाताना म्हटलं होतं, जो दुसऱ्यांचा द्रोह करतो, जो आपलं कल्याण विसरतो, तो भ्रांतचित्त होऊन इकडं तिकडं भटकून शेवटी नरकाचा धनी होतो.' आईची ही वार्ता ऐकून पिप्पलाद कुपित होऊन म्हणाला, 'ज्याच्या अंतःकरणात अपमानाची आग प्रज्वलित झाली आहे त्याला साधुत्वाच्या गोष्टींचा काय उपयोग?' तो चटकन चक्रेश्वर महादेवाजवळ जाऊन म्हणाला, 'शत्रूंचा नाश करता येईल एवढी शक्ती मला दे.' याच वेळी शंकराच्या त्रिनेत्रांतून

एक भयंकर कृत्या निर्माण झाली. तिची आकृती घोडीप्रमाणे होती. संपूर्ण जीवांचा नाश करण्यासाठी तिने आपल्या पोटात भयंकर अग्नी साठविला होता. रौद्र स्वरूपाची ती कृत्या पिप्पलादास म्हणाली,

'सांग, तुला काय हवंय ?'

'देव माझे शत्रू आहेत. त्यांना तू जाऊन खावंस.'

तेव्हा त्या घोडीच्या गर्भातून भयानक अग्नी प्रकट झाला. तो सर्व लोकांचा प्रलय करण्यास समर्थ होता. त्याकडे पाहताच देव थरारून गेले. भयभीत होऊन त्यांनी शिवाला प्रार्थना केली,

'शंभो, आपण आमचं रक्षण करावं. ही कृत्या व तिच्यापासून निघालेला अग्नी, यांच्यामुळं आम्हांस फारच कष्ट होतात. सर्वेश्वरा, आपण भयभीत मानवाला अभय देता. शिवा, जो सर्व बाजूंनी सतावला गेला, पीडला गेला, त्यांना आपणच रक्षणकर्ते आहात. भगवान, आपण या पिप्पलादास शांत करावं.' प्रार्थना ऐकून शिव पिप्पलादाकडे येऊन म्हणाले,

'बेटा, देवांचा नाश केला तरी तुझा पिता काही परत येणार नाही. देवांच्याच कार्यसिद्धीसाठी त्यांनी प्राण समर्पण केले. या जगात त्यांच्या समान दीनदु:खितांना दयामय बंधू कोण आहे ? तुझी पतिव्रता माता पण त्यांच्याबरोबर दिव्य लोकात गेली. तिच्याएवढी स्त्री आता इथं कोण आहे ? लोपामुद्रा, अरुंधती काय तिची बरोबरी करू शकतात ? ज्यांच्या हाडांमुळे सर्व देव विजयी व सुखी आहेत ते तुझे पिताजी किती शक्तिशाली होते ! त्यांचं हे दिव्य यश तुझ्या मातेनं आपल्या त्यागानं अक्षय बनवलं आहे. त्यांचा तू पुत्र. त्यांच्याहून अधिक असं तू काय केलंस ? तुझा प्रताप व तुझं भय यांनी देव स्वर्गभ्रष्ट होत आहेत. तू त्यांना वाचव. देवांचं रक्षण कर. या कृत्याने यशस्वी हो. असं यश ज्यांनी मिळविलं नाही ते मुड्द्याप्रमाणे आहेत. ते अंध आहेत. नपुंसक आहेत. ज्यांना धर्मपालन माहीत नाही, जे दान देत नाहीत, त्यांच्याबद्दल शोक करावा.'

महादेवांच्या या उपदेशाने पिप्पलाद मुनी शांत झाले. त्यांनी हात जोडून भगवान शंकरांना नमस्कार करून म्हटले, 'भगवान

आपणास नमस्कार असो. ज्यांनी माझं रक्षण केलं, मला पाळून मोठं केलं, त्यांचा मनोरथ भगवान शिवांनी पूर्ण करावा. माता-पित्याप्रमाणं माझं पालन केलं, त्यांची नावं तीनही लोकांना तीर्थाप्रमाणं व्हावीत. असं झालं तर मी त्यांच्या ऋणातून मुक्त होईन. सर्व तीर्थांत या तीर्थास महत्त्व द्यायला देव तयार असतील तर मी त्यांचा अपराध क्षमा करीन.'

सर्व देवांनी पिप्पलादांची ही सूचना मान्य केली. त्या मुनींची बुद्धी, विनय, विद्या, शौर्य, बल, साहस, सत्यभाषण, माता-पिता-प्रीती, शुद्ध भाव जाणून भगवान शिव त्यांना म्हणाले,

'बेटा, तुझं अभीष्ट सांग. ते तुला प्राप्त होईल.'

'महेश्वरा, जो धर्मनिष्ठ पुरुष गंगेत स्नान करून आपल्या चरण-कमलांचं दर्शन घेईल त्याला सर्व अभीष्ट प्राप्त होईल व शरीराच्या अंतानंतर तो शिवधामास जाईल. नाथा, माझा पिता, माझी माता आपल्याच चरणी आहेत. हे पिंपळादी वृक्ष व देव आपल्याच स्थानावर आले आहेत. या सर्वांना आपलं दर्शन व्हावं, आपल्या धामास त्यांनी यावं.'

पिप्पलादांच्या या भाषणाने देव संतुष्ट होऊन म्हणाले,

'ब्रह्मन्, तुम्ही देवांचं अभीष्ट केलं आहे. देवाधिदेव शिवांची आज्ञा तुम्ही मानलीत. पहिलं वरदानही तुम्ही दुसऱ्यांसाठी मागितलंत, यासाठी आम्हीही संतुष्ट होऊन तुम्हांला काही देऊ इच्छितो. तुम्ही एखादा वर आम्हांस मागावा.

'देवांनो, मी आपल्या माता-पित्यास पाहू इच्छितो, मी केवळ त्यांचं नाव ऐकलं. माता-पित्याच्या अधीन राहून त्यांची सेवा करणारे प्राणी धन्य आहेत. आपली सर्व इंद्रियं, शरीर, कुल, शक्ती, बुद्धी माता-, पित्याच्या हितासाठी लावून पुत्र कृतकृत्य होतो. मी त्यांच्या दर्शनानं धन्य होईन.'

देवांनी थोडा वेळ परस्परांशी चर्चा करून म्हटले,

'ब्रह्मन्, तुझे माता-पिता दिव्य विमानातून तुला पाहाण्यासाठी येत आहेत. तू त्यांना पाहावंस. मनातील विषाद सोडून द्यावा. आपलं मन शांत करावं. पाहा, पाहा ना, ते विमानातून येत आहेत. त्यांच्या

दिव्य शरीरावर स्वर्गीय आभूषणं आहेत.'

पिप्पलादमुनींनी शिवाजवळ जाऊन आपल्या माता-पित्यास वंदन केले. त्यावेळी त्यांचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. ते करुणापूर्ण वाणीने म्हणाले,

'इतर कुलीन पुत्र आपल्या आई-बापास तारतात, पण मी असा अभागी की, माझ्यासाठी माझ्या मातेला उदर विदीर्ण करावं लागलं.'

त्यावर त्यांच्या माता-पित्याने म्हटले,

'पुत्रा, तू धन्य आहेस. तुझी कीर्ती स्वर्गलोकापर्यंत पोचली आहे. तू प्रत्यक्ष भगवान शंकरांचं दर्शन घेतलंस, देवांना सुख दिलंस. तुझ्या-सारख्या पुत्रामुळंच आमचा उत्तम लोक कधीच क्षीण होणार नाही.'

याचवेळी पिप्पलादांच्या मस्तकावर आकाशातून फुलांची वृष्टी झाली. देवांनी त्यांचा जयजयकार केला. पत्नीसहित दधीचींनी त्यांना आशीर्वाद दिला. शंकर, गंगा, देव यांना नमस्कार करून ते पिप्पलादांना म्हणाले,

'बेटा, विवाह करून भगवान शिवाची भक्ती कर. गंगेचं सेवन कर. पुत्रांची उत्पत्ती करून विधिपूर्वक दक्षिणेसह यज्ञांचं अनुष्ठान कर. यामुळं तुला दीर्घकालासाठी दिव्यलोकात स्थान मिळेल.'

'पिताजी, आपण सांगितलं तसंच मी करीन.

यानंतर पुत्राला वारंवार आशीर्वाद देऊन दधीची पत्नीसह पुन्हा दिव्यलोकात गेले. देव शंकरास म्हणाले,

'जगदीश्वर, आता दधीचींच्या हाडांच्या, आमच्या, गायींच्या पावित्र्यासंबंधी काही सांगावं.'

'गंगेत स्नान करून सर्व देव व गायी पापातून मुक्त होतील. दधीचींच्या हाडांनाही गंगेत धुतल्यानं पावित्र्य येईल.'

शिवशंकरांच्या सांगण्यानुसार देवांनी स्नान करून हाडे धुऊन काढली. जेथे देव पापमुक्त झाले ते स्थान पापनाशनतीर्थ म्हणून प्रसिद्ध झाले. जेथे गायी पवित्र झाल्या ते स्थान गोतीर्थ म्हणून विख्यात झाले. जेथे दधीचींची हाडे पवित्र झाली ते पितृतीर्थ म्हणून ओळखले जाऊ लागले. ज्या पापी प्राण्याच्या शरीराची राख, त्याची नखे, त्याचे केस

या तीर्थात पडतात तो स्वर्गात जातो. पिप्पलमुनींनी या ठिकाणी शंकरांची स्थापना केली. गौतमीच्या कन्येस पत्नी म्हणून स्वीकारून त्यांनी वंश चालविला. लक्ष्मी, यश मिळवून तेही स्वर्गास गेले. हे क्षेत्र पिप्पलेश्वरतीर्थं म्हणून प्रसिद्ध झाले. सर्व यज्ञांचे फल देणारे हे तीर्थ स्मरणावरोबर सर्व पापांचा नाश करते. येथील महादेवांची दोन नावे आहेत. एक चक्रेश्वर, दुसरे पिप्पलेश्वर. येथे सूर्याचेही अधिष्ठान असल्यामुळे देवांना हे फार प्रिय झाले.

नागतीर्थाचा महिमा

नागतीर्थात भगवान नागेश्वर निवास करीत असल्याने ते सर्व अभीष्ट वस्तू देणारे व मंगलमय आहे. प्रतिष्ठानपुरात पूर्वी चंद्रवंशी राजा शूरसेन राज्य करीत होता. तो बुद्धिमान असून सर्व गुणांचा सागर होता. पुत्र व्हावा म्हणून त्याने पत्नीस बरोबर घेऊन अनेक यज्ञ केले. दीर्घकाळानंतर त्याला एक पुत्र झाला. पण तो भयानक आकाराचा सर्प होता. राजाने त्याला लपवून ठेवले. राजाचा पुत्र सर्प आहे हे कुणासच माहीत नव्हते. माता-पित्याशिवाय अमात्य व पुरोहित यांनाही ही गोष्ट माहीत नव्हती. त्या सर्पाच्या भयंकर रूपास पाहून राजास संताप येई. सर्परूप पुत्र होण्यापेक्षा पुत्रहीन राहतो तर अधिक चांगले असे त्याला वाटे. पुत्र सर्प असला तरी मनुष्यासारखा बोलायचा. त्याने एकदा पित्यास सांगितले,

'माझे चूडाकरण, उपनयन, वेदाध्ययनसंस्कार इत्यादी विधी करावेत. द्विज वनल्याशिवाय कसं राहाता येईल ? मी शूद्र कुठवर राहू ?'

पुत्राचे हे बोलणे ऐकून राजा शूरसेन फार कष्टी झाला. त्याने कोणा ब्राह्मणास बोलावून काही संस्कार केले. वेदांचे अध्ययन समाप्त झाल्यावर सर्पाने आपल्या पित्यास म्हटले,

'नृपश्रेष्ठा, आता माझा विवाह करावा. मला स्त्रीची प्राप्ती व्हावी. मला असं वाटतं की, माझा विवाह झाल्याशिवाय कोणतंच कार्य सिद्धीस जाणार नाही.'

पुत्राची ही इच्छा जाणून राजाने अमात्यांना बोलावून म्हटले,

'माझा पुत्र युवराज नागेश्वर सर्व गुणांची खाण आहे. तो बुद्धिमान आहे. तो शूर व दुर्जय आहे. आता त्याचा विवाह करायचा आहे. मी तर आता वृद्ध झालो. आता या पुत्रावर राज्यकारभार सोपवून मी निश्चिन्त व्हावं असं वाटतं. आपण सर्वांनी याच्या विवाहासाठी प्रयत्न करावेत.'

राजाची विनंती ऐकून अमात्यगण हात जोडून म्हणाले,

'महाराज, आपला पुत्र सर्वगुणसंपन्न आहे. त्याच्या विवाहाची चिंता कसली ?'

अमात्यांचे हे बोलणे ऐकून राजा गंभीर झाला. आपला पुत्र सर्प आहे हे तो त्यांना सांगू इच्छीत नव्हता. एक अमात्य म्हणाला.

'महाराज, पूर्वदेशात विजय नावाचा एक राजा आहे. त्याच्या जवळ घोडे, हत्ती, रत्नं भरपूर आहेत. त्याचे आठ पुत्र मोठे धनुर्धर आहेत. त्यांची बहीण भोगवती तर साक्षात लक्ष्मी आहे. राजन्, तीच आपल्या पुत्रास योग्य पत्नी होईल.'

'राजा विजयाची ही कन्या माझ्या पुत्रासाठी कशी प्राप्त होईल ?'

'महाराज, मला कार्यसिद्धीसाठी अनुज्ञा तर द्यावी.'

महाराज शूरसेनाने भूषण, वस्त्रे, सेना यांच्यासहित अमात्याला पूर्वदेशास पाठविले. तो महाराज विजयास भेटला. त्याने मधुर भाषणाने राजास संतुष्ट केले, त्याने राजकुमारी भोगवती व युवराज नाग यांचा विवाह पक्का केला. शूरसेनास अमात्याने सर्व वृत्तान्त सांगितला. ठरल्याप्रमाणे शास्त्ररीतीने विवाह झाला. राजा विजयने मोठ्या हर्षाने पुष्कळ गायी, सुवर्ण, हत्ती, अश्व इत्यादी सामग्री देऊन कन्येस पाठविले. प्रतिष्ठानात येऊन पोचल्यावर शूरसेनाने सर्वांचे स्वागत केले.

राजा विजयची कन्या रूपवती होती. आपल्या सासू-सासऱ्यांच्या सेवेत ती सदा मग्न असायची. भोगवतीचा पती अत्यंत भीषण नाग रत्नांनी सुशोभित होऊन एकान्तात सुगंधित पुष्पांच्या शय्येवर आराम करून पत्नीची वाट पाहात होता. क्षत्रियांच्या विवाहाच्या एका प्रकारात

वर विवाहसमयी उपस्थित नसतो. याही विवाहप्रसंगी नागराज उपस्थित नव्हता. पति-पत्नींची भेट आता प्रथमच होणार होती ! वाट पाहाणारा नागराज वारंवार म्हणू लागला, 'माझी माता राजकुमारीस माझ्याकडं का नाही पाठवीत?' त्यावर माता एका दासीस म्हणाली,

'तू हे भोगवतीस समक्ष सांग की, तुझा पती सर्प आहे. मग पाहा ती काय करते ते.' दासी भोगवतीपाशी गेली. एकान्तात तिला म्हणाली,

'कल्याणी, मी तुझ्या पतीस जाणते. तो देव आहे. पण एक बातमी गुप्त ठेव. तो मनुष्य नाही. तो सर्प आहे.'

यावर भोगवती म्हणाली,

'मनुष्याच्या कन्येस सामान्यतः मनुष्यच पती मिळतो. पण देव पती मिळाला तर त्यात काय बिघडलं? मोठं पुण्य करूनही मिळत नाही.'

दासीने ही बोलणी मातेस, महाराजा शूरसेनास व त्या सर्पास सांगितली. भोगवतीने त्या दासीस सांगितले,

'तुझं कल्याण असो. मला माझ्या स्वामींचं दर्शन तर होऊ दे.'

तेव्हा दासीने तिला बरोबर घेतले व त्या भयानक सर्पाचे दर्शन घडविले. तो सुगंधित फुलांच्या शय्येवर विराजमान झाला होता. एकांतात रत्नांनी नटलेला व भयंकर सर्परूपाचा आपला पती पाहून भोगवतीने हात जोडून म्हटले,

'मी धन्य आहे. जिचा पती देव आहे ती धन्यच. पती हीच स्त्रीची गती.'

हे ऐकून नागास आनंद झाला. तो म्हणाला,

'सुंदरी, मी तुझ्या भक्तीनं संतुष्ट झालो आहे. सांग तुला काय अभीष्ट वरदान देऊ? तुझ्या अनुग्रहानं माझी संपूर्ण स्मरणशक्ती जागी झाली आहे. मला पिनाकधारी देवाधिदेव शंकरांनी शाप दिला होता. शेषनागाचा पुत्र महाबलवान नाग जो शंकरांच्या हातातील कंकण होता, तोच मी तुझा पती आहे ! आणि तूच पूर्वजन्माची माझी पत्नी भोगवती आहेस. एके दिवशी भगवान शंकर पार्वतीबरोबर एकांतात

बसले होते. तेथे पार्वतीनें शंकरांना एक गोष्ट सांगितली, ती ऐकून भगवान शंकर मोठ्यानें हसले. त्यावेळी मलाही हसू आलं. त्यामुळं रागावून शंकरांनी मला शाप दिला– 'तू मनुष्ययोनीत सर्परूप घेऊन जन्मास येशील– कल्याणी, हा शाप ऐकून तू व मी भगवान शंकरांची प्रार्थना केली. तेव्हा भगवान प्रसन्न होऊन म्हणाले, ' जर तू गौतमीच्या तटावर जाऊन माझं पूजन करशील तर तू शापमुक्त होशील. कल्याणी, तू आता गौतमीच्या तटावर चल. आपण दोघे भगवान शिवांची पूजा करू. माझा शाप संपेल व आपलं दोघांचं आयुष्य सुखाचं होईल.'

पतीचे बोलणे ऐकून भोगवती त्याच्याबरोबर निघाली. गौतमी-तटावर येऊन तिने गौतमीत स्नान केले. तिच्या प्रार्थनेवरून भगवान शिवांनी तिच्या पतीस दिव्य रूप दिले. तो शिवलोकास जाण्यासाठी उत्सुक होता. पण पित्याच्या आग्रहावरून आपल्या पत्नीसह तो राज्य करू लागला. तेव्हापासून या तीर्थास नागतीर्थ असे नाव मिळाले. भोगवतीमुळे स्थापन झालेल्या या तीर्थावर भगवान नागेश्वरांचा निवास असतो. येथील स्नान व दान सर्व तीर्थांची फळे देणारे आहे.

मातृतीर्थ, अविघ्नतीर्थ, शेषतीर्थ

गौतमीच्या तटावर मातृतीर्थ नावाचे एक विख्यात तीर्थ आहे. सर्व प्रकारच्या सिद्धी येथे मनुष्यास मिळतात. त्याचे स्मरण करताच जीवाच्या सर्व मानसिक चिंता संपतात. पूर्वी देव व असुर यांच्यांत फार मोठा संग्राम झाला. त्या वेळी देव दानवांचा पराभव करू शकले नाहीत. तेव्हा ब्रह्मदेवांनी सर्व देवांच्याबरोबर भगवान शिवांना हात जोडून विनंती केली, 'देवा, महेशा, जेव्हा देवदानवांनी समुद्राचं मंथन केलं तेव्हा समुद्रातून महाभयंकर असे विष निघालं. ते खाण्यासाठी आपल्यापेक्षा दुसरं समर्थ कोण होतं ? तुमच्यापुढेच सारे देव मस्तक झुकवितात. फुलांच्या मारानं जो सर्व जगावर स्वामित्व गाजवितो तो कामदेवही आपण नष्ट केलात. आपणांपेक्षा शक्तिशाली दुसरा आहे तरी कोण ?'

इतकी प्रार्थना ऐकून महादेव प्रसन्न होऊन बोलले,

'तुम्हांस काय हवंय ? बोला, मी वर देईन.'

'वृषभध्वजा, आमच्यावर दानवांचं फार मोठं संकट आलं आहे. आपणच आता शत्रूचा नाश करून आमचं रक्षण करावं.'

इतके ऐकताच भगवान शिवशंकर युद्धभूमीवर आले. दैत्यांशी त्यांनी घनघोर युद्ध केले. दैत्य इकडे-तिकडे पळून जाऊ लागले. युद्ध करता करता शंकरांच्या ललाटापासून घामाच्या धारा वाहू लागल्या. जेथे जेथे यांचे थेंब पडले तेथे तेथे शिवाच्या आकाराच्या माता प्रकट झाल्या. या मातांनी रसातलापर्यंत जाऊन सर्व दैत्यांचा पराभव केला व त्या परत देवांपाशी आल्या. तोपर्यंत देव गौतमीतटावर उभे होते. मातांना पाहाताच देवांनी त्यांना वर दिला,

'या जगात जशी शिवाची पूजा होती तशीच तुमचीही होत राहील.'

देव अंतर्धान पावले व तेथे फक्त माता राहिल्या. जेथे त्या स्थिरावल्या तेथे मातृतीर्थ या नावाने एक पवित्र तीर्थ निर्माण झाले. येथील तीर्थात स्नान, दान, तर्पण करून अनेकांना दीर्घायुष्य व सुख यांची प्राप्ती होते.

या मातृतीर्थानंतर सर्व विघ्नांचा नाश करणारे अविघ्नतीर्थ येते. एकावेळी गौतमीच्या उत्तरतटावर देवांचा यज्ञ सुरू झाला. पण विघ्न-दोषामुळे त्याची समाप्ती झाली नाही. म्हणून देवांनी ब्रह्मदेवांना व विष्णूंना याचे कारण विचारले. तेव्हा या यज्ञात गणेशजी विघ्न आणतो हे ध्यानात आले. मग सर्वांनी आदिदेव गणेशाची स्तुती करावी असे ठरले. सर्व देवांनी गौतमीच्या तटावर येऊन गणेशाची स्तुती सुरू केली.

'सर्व कार्यांत सर्व देव व शिव, विष्णू, ब्रह्मदेव ज्याचं पूजन करतात, ज्याला नमस्कार करतात, ज्याचं चिंतन करतात, त्या विघ्न-राज गणेशास आम्ही शरण आहोत. विघ्नराज गणेशाशिवाय मनो-वांच्छित फल देणारा दुसरा देव नाही. असा निश्चय जाणून भगवान महादेवांनीही त्रिपुरासुराच्या वधाच्या वेळी प्रथम गणेशाचं पूजन केलं होतं. गणेशा, आपलं ध्यान करताच सर्वांचे मनोरथ पूर्ण होतात. अंबिकानंदना, गणेशा, आमच्या या यज्ञातील विघ्न तू दूर करावंस.'

देवांनी गणेशाची सर्व बाललीला गाऊन त्याची प्रार्थना केली. तेव्हा गणेश देवांना म्हणाला,

'देवांनो, आता तुमच्या यज्ञात विघ्न येणार नाही.'

याप्रमाणे यज्ञ निर्विघ्न पार पडल्यावर गणेश देवांना म्हणाला,

'जे लोक भक्तिस्तोत्रानं माझी स्तुती करतील त्यांना कधी दारिद्रय येणार नाही. कधी दुःख होणार नाही. आळस सोडून जे या तीर्थात स्नान करतील, दान देतील, त्यांच्या शुभकार्यास विघ्न येणार नाही. तेव्हापासून या तीर्थाचे नाव अविघ्नतीर्थ झाले. मनुष्याच्या सर्व कामना पूर्ण करणारे व सर्व विघ्न दूर करणारे हे तीर्थ आहे.'

अविघ्नतीर्थानंतर शेषतीर्थ येते. या तीर्थाच्या सेवनानेंही सर्व अभीष्ट वस्तूंची प्राप्ती होते. रसातलाचा स्वामी महानाग शेष सर्व नागांच्या बरोबर रसातलात राहावयास गेला. पण येथे राक्षस, दैत्य, दानव यांचा आधीच प्रवेश झाला होता. तेथून नागराजास परत यावे लागले. तेव्हा नागराज ब्रह्मदेवास म्हणाला,

'भगवान, रसातलात दैत्य, राक्षस आम्हांस राहू देत नाहीत. आम्ही काय करावं ?'

'तुम्ही गौतमीच्या तटावर जावं. तिथं महादेवांची स्तुती करावी. तुमचे मनोरथ पूर्ण होतील.'

शेषनाग तेथे गेला. त्याने गंगेत स्नान करून, हात जोडून देवेश्वराची प्रार्थना केली, 'तीन लोकांचा स्वामी भगवान, आपणांस नमस्कार असो. ज्याला सहस्र मस्तकं आहेत अशा भगवान सदाशिवास नमस्कार असो. सर्वांचा संहार करणाऱ्या रुद्रदेवास नमस्कार असो. भववन्, आपणच सोम, सूर्य, अग्नी, जलरूप आहात. कालरूप आहात. सर्वेश्वरा, शंकरा, माझं रक्षण करा. जगन्नाथा, आपणांस नमस्कार असो.'

या प्रार्थनेने संतुष्ट होऊन महेश्वर भगवानांनी नागराजास मनोवांच्छित वर दिला. देवांशी शत्रुत्व राखणारे दैत्य, दानव, राक्षस यांच्या विनाशास या वराचे साह्य झाले. या वराच्या मदतीने शेषनाग सर्पांच्या सह पुन्हा रसातलास गेला. आपल्या शत्रूंचा त्याने शूलाने वध केला व

तो पुन्हा शेषेश्वराचे दर्शन करण्यासाठी गौतमीच्या तटावर आला. नागराज ज्या मार्गाने आला तेथे एक मार्ग झाला. त्यातून गौतमीचे गंगाजल पातालगंगेत जाऊन मिसळले. शेषेश्वराच्या समोर एक विशाल कुंड बनवून शेषनागाने तेथे हवन केले. त्या कुंडात अग्निदेव सतत राहू लागला. हे तीर्थ नागतीर्थ, शेषतीर्थ या नावांनी प्रसिद्ध झाले. रोग व दारिद्र्य यांचा नाश या तीर्थामुळे होतो. आयुष्य व लक्ष्मी यांची प्राप्ती होते. सर्व प्रकारची संपत्ती देणारी एकवीस तीर्थे येथेच गौतमीच्या तटावर आहेत.

अश्वत्थतीर्थ, रेवतीसंगमतीर्थ

गोदावरीच्या उत्तर तटावर अश्वत्थतीर्थ, पिप्पलतीर्थ, शनैश्चर-तीर्थ अशी काही तीर्थे आहेत. फार पूर्वीची हकीगत आहे, विंध्यपर्वत वर येत होता. त्याला थांबविण्यासाठी देवांनी अगस्त्यमुनींना विनंती केली. महर्षी अगस्त्य हजारो मुनींना घेऊन विंध्यपर्वताच्या समीप आले. नगश्रेष्ठ विंध्यावर असंख्य वृक्ष होते. त्याला शेकडो शिखरे असून तो फारच उंच होता.

मुनी येत आहेत असे पाहाताच विंध्याने त्यांचे स्वागत केले. मुनिवर्यांनीही विंध्याचे स्वागत करताना म्हटले,

'पर्वतश्रेष्ठा, मी अनेक मुनींच्यासह दक्षिणदेशाची यात्रा करण्या-साठी जात आहे. मला जाण्यासाठी तू मार्ग द्यावास. तुझं हेच आतिथ्य आम्ही समजू. आम्ही जोपर्यंत परत येत नाही तोपर्यंत तू असाच आम्हांस मार्ग देणारा राहा.' महर्षी अगस्त्यांची विनंती विंध्याने मान्य केली. मुनींच्यासह अगस्त्य मुनी दक्षिणेकडे गेले. हळूहळू ते गौतमीच्या तटावर पोचून सांवत्सरिक यज्ञात दीक्षित बनले. ऋषींच्यासह त्यांनी तेथे एक वर्षभरासाठी यज्ञ आरंभिला.

त्या वेळी कैटभाचे दोन पापी पुत्र राक्षसधर्मास अनुसरून उप-द्रव देत होते. अश्वत्थ व पिप्पल अशी त्यांची नावे होती. ब्राह्मणांना पीडा देण्यात त्यांना आनंद वाटे. ब्राह्मणांना कष्ट होऊ लागले तेव्हा

महर्षिगण गोदावरीच्या दक्षिणतटावर सूर्यपुत्र शनैश्चर तप करीत होता त्याच्याकडे गेले. त्यांनी शनैश्चरास राक्षसांनी केलेले अत्याचार सांगितले. शनैश्चर ब्राह्मण बनून ब्राह्मणाच्या वेषात राहाणाऱ्या अश्वत्थ नावाच्या राक्षसापाशी गेले. शनीची दृष्टी पडताच तो पापात्मा राक्षस वज्राच्या माऱ्याप्रमाणे क्षणभरात जळून गेला. ब्राह्मणरूपधारी शनैश्चर दुसऱ्या राक्षसाकडे गेला. पिप्पलास त्याने गुरू मानून वेदांचे अध्ययन करण्याचे निमित्त केले. पण हा पिप्पल राक्षसही जळून भस्म झाला. यानंतर शनैश्चराने मुनींना विचारले,

'आता माझ्याकडं आणखी कार्य कोणतं आहे?'

मुनींना मोठा हर्ष झाला. त्यांना शनीला वर द्यायचा होता. शनैश्चर म्हणाला,

'जो नियमपूर्ण राहून माझ्या दिवशी अश्वत्थाला स्पर्श करील त्याचं सर्व कार्य सिद्धीस जाईल. जो या अश्वत्थतीर्थात स्नान करील त्याचंही कार्य सिद्धीस जाईल.' त्या वेळेपासून त्या तीर्थास अश्वत्थतीर्थ, पिप्पलतीर्थ व शनैश्चरतीर्थ अशा नावांनी लोक ओळखू लागले. अगस्त्य, सात्रिक, याज्ञिक, सामग इत्यादी सोळा हजार एकशे आठ तीर्थे येथे वास करतात.

याच्यापुढे विख्यात असे सोमतीर्थ आहे. त्यात स्नान केल्याने सोमपान करण्याचे फल मिळते. औषधी वनस्पती पूर्वकाळापासून सर्व जगाच्या माता आहेत. औषधी वनस्पतीच सर्व रोगांचे निवारण करतात. त्यांच्यापासूनच अन्नाची उत्पत्ती होते व प्राणांचे रक्षण होते. एकदा औषधींनी ब्रह्मदेवास विचारले,

'सुरश्रेष्ठा, आम्हांला असा एक पती द्यावा की तो राजा असावा.'

'तुम्हां सर्वांनाच राजा पतिरूपानं मिळेल.'

'यासाठी आम्ही जावं तरी कुठं?'

'मातांनो, तुम्ही गौतमीतटावर जावं. ती जर प्रसन्न झाली तर लोकपूजित राजाची प्राप्ती तुम्हांस होईल.'

हे ऐकून औषधी वनस्पती गौतमीच्या तटावर जाऊन स्तुती करू

लागल्या.

'भगवान शंकरांची प्रियतमा पुण्यसलिला, गौतमी, तू जर या भूतलावर आली नसतीस तर ह्या जगातील प्राणी काय करणार होते ? नदीश्वरी, या भूमंडलावरील मनुष्यांची पातकं नाहीशी करण्यासाठी तू जगन्माता गंगेच्या रूपानं इथं सुलभ आहेस. मनोवांच्छित फल देणारी माता, तुला नमस्कार असो. पापांचा नाश करणारी ब्रह्ममयीदेवी, तुला नमस्कार असो.'

'वनस्पती औषधी, सांगा मी काय करू तुमच्यासाठी ?'

'जगन्माते, आम्हांस अत्यंत तेजस्वी राजा पतिरूपात हवा.'

'मातांनो, मी अमृतरूप आहे. तुम्हीही अमृतस्वरूपा आहात. तुम्हांस योग्य असा अमृतात्मा सोम पतिरूपानं देईन.'

गौतमीच्या या वरदानास देव, ऋषी, चंद्रमा इत्यादींनीही अनुमोदन दिले. ज्या स्थानावर औषधी वनस्पतींनी अमृतस्वरूप राजा सोमास पती म्हणून स्वीकारले ते स्थान सोमतीर्थ या नावाने प्रसिद्ध झाले.

यानंतर धान्यतीर्थ येते. सुकाळ निर्माण करणारे, कल्याणप्रद, मनुष्याची सर्व प्रकारच्या आपत्तींतून सुटका करणारे असे हे तीर्थ सर्व अभीष्ट वस्तू देणारे आहे. राजा सोमास पती म्हणून प्राप्त केल्यानंतर औषधी वनस्पती प्रसन्न झाल्या. त्यांनी सर्व लोक व गंगा यांच्यासमोर म्हटले,

'वेदात असं सांगितलं आहे की, ज्या भूमीत पीक येतं ती भूमी मातेसारखी अथवा प्रत्यक्ष माताच आहे. गंगेजवळ जो तिचं दान करतो त्याला सर्व अभीष्ट वस्तूंची प्राप्ती होते. पिकानं भरलेली जमीन, गायी, औषधी वनस्पती इत्यादींचं दान शिवरूप ब्राह्मणास भक्तिपूर्वक जो देतो त्याला सर्व प्रकारचं सुख मिळतं. सोम राजाची प्रिया औषधी वनस्पती आहेत. या वनस्पतींचं, अन्नाचं दानही करावं.'

या औषधी वनस्पती एकदा सोमराजास म्हणाल्या,

'राजन्, आम्ही ब्रह्मरूपिणी व प्राणरूपिणी आहोत. हव्य, कव्य, अमृत इत्यादी आमचाच अंश आहे. राजा या वैदिक गाथेचं श्रवण,

स्मरण, पाठ करावा व त्याचं फल मिळवावं.'

गंगेच्या किनाऱ्यावर राजा सोमाच्याबरोबर औषधींनी या वैदिक गाथेचा पाठ केला. त्या स्थानास धान्यतीर्थ हे नाव मिळाले. औषधतीर्थ, सौम्यतीर्थ, अमृततीर्थ, वेदगाथातीर्थ, मातृतीर्थ अशीही नावे या तीर्थस्थानास आहेत. या ठिकाणी मनुष्याची पापे हरण करणारी एक हजार सहाशे तीर्थे गंगेच्या दोनही तटांवर आहेत.

येथेच विदर्भासंगम व रेवतीसंगम ही तीर्थे आहेत. महर्षी भरद्वाज एक मोठे तपस्वी महात्मा होऊन गेले. त्यांच्या बहिणीचे नाव रेवती होते. ती कुरूप असून तिचा स्वरही विकृत होता. प्रतापी भरद्वाज गंगेच्या दक्षिण तटावर बसून चिंता करू लागले की, या भयानक रूपाच्या बहिणीचा विवाह मी कसा करू ? हिला कोणीच पत्करणार नाही. कन्या कुणालाच न व्हावी. कन्या केवळ दुःख देणारीच. ज्याला कन्या होते त्या प्राण्यास पदोपदी मृत्यूची आठवण होते. भरद्वाजमुनी अशा विचारात असतानाच कठ नावाचा एक मुनी त्यांच्या सुंदर आश्रमात आला. तो सोळा वर्षांचा असून त्याचा देह सुंदर, सुडौल होता. तो शांत, जितेन्द्रिय व सद्गुणांची खाण होता. कठाने आश्रमात येताच भरद्वाजांना नमस्कार केला. भरद्वाजांनीही त्याचे विधिपूर्वक स्वागत केले. आश्रमात येण्याचे कारण त्यांनी त्याला विचारले. कठ म्हणाला,

'मी एक विद्यार्थी, या विद्येसाठी मी आपणांकडे आलो. आपण उचित ते करावं.'

'महामते, तुझी जशी इच्छा होईल तसा अभ्यास तू कर. मी पुराण, स्मृती, वेद, अनेक प्रकारची धर्मशास्त्रं यांना जाणतो. तू तुझी आवड सांग. कुलीन, धर्मपरायण, गुरुसेवारत, सांगितलेलं त्वरित ग्रहण करणारा शिष्य मोठ्या पुण्याईनं प्राप्त होतो.'

'ब्रह्मन्, मी निष्पाप आहे, सेवापरायण, कुलीन व सत्यवादी आहे. मला शिकवावं.'

भरद्वाजांनी कठाला संपूर्ण विद्या शिकविली. संतुष्ट झालेला कठ म्हणाला,

'गुरुदेव, आपणांस नमस्कार असो, मी आपणांस पसंत अशी दक्षिणा

देईन. आपण कोणतीही दुर्लभ वस्तू मागावी. सांगा. मी काय देऊ?'

'कठा, माझी बहीण अद्यापि कुमारी आहे. तिला तू विधिपूर्वक स्वीकारावंस. पत्नी म्हणून तिला सांभाळ, हीच माझी दक्षिणा.'

कठाने स्वीकृती देऊन विधिपूर्वक रेवतीशी विवाह केला. तिला सुंदर रूप प्राप्त व्हावे म्हणून त्याने तेथेच राहून देवदेवेश्वर शंकरांची आराधना केली. रेवतीनेही शंकरांचे मनोभावे पूजन केले. यामुळे रेवती सुंदर झाली. तिचे प्रत्येक अंग मनोहर दिसू लागले. रेवतीच्या स्नानामुळे जी धारा प्रकट झाली तिला रेवती नदी असे नाव मिळाले. या नदीच्या स्नानाने रूप व सौभाग्य यांची प्राप्ती होते. कठाने या ठिकाणी नाना प्रकारच्या कुशांनी म्हणजे दर्भांनी अभिषेक केला. त्यातून विदर्भा नावाची नदी निर्माण झाली. येथील उत्तम तीर्थांनी सर्व प्रकारची पापे नष्ट होतात.

पूर्णतीर्थ, गोविंदतीर्थ

याच गौतमी गंगातटावर उत्तरेस पूर्णतीर्थ आहे. येथे मनुष्य अजाणता जरी स्नान करून गेला तरी त्याचे कल्याण होते. येथे चक्रधारी भगवान विष्णू व पिनाकधारी भगवान शंकर यांचा निवास असतो. फार पूर्वी आयूचा पुत्र धन्वंतरी राजा होता. त्याने अश्वमेधादी अनेक यज्ञ केले होते. पुष्कळ प्रकारची दाने केली होती. परंतु भोगांतील विषमता अनुभवून त्याला वैराग्य प्राप्त झाले. गंगासागर संगमावर त्याने मोठी तपस्या केली.

एकदा राजा धन्वंतरीने राज्य करीत असताना एका महान असुरास रणभूमीवर मारून पिटाळून लावले होते. त्याचे नाव तम होते. तो राजाच्या भयामुळे एक हजार वर्षेपर्यंत समुद्रात लपला होता. त्याला समजले की राजा धन्वंतरीस वैराग्य आले असून तो तपस्या करीत आहे. त्याचा पुत्र सिंहासनावर बसला आहे. तम समुद्रातून निघाला व जेथे धन्वंतरी तप करीत होता तेथे तो येऊन पोचला. राजास होमहवनात रमलेला पाहून तम मनाशी म्हणाला, या राजाने मला वारंवार नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आज मी या माझ्या शत्रूला नष्ट करणार आहे. असा विचार करून तमाने मायारूपाने स्त्रीचा वेष धारण केला.

ही मायामयी सुंदरी दिसायला अतिशय चांगली होती. तिने राजा-भोवती हसायला, नाचायला सुरुवात केली. राजाने तिच्याकडे लक्ष देऊन कृपापूर्वक वाणीने विचारले,

'कल्याणी, तू कोण आहेस ? या वनात का आली आहेस ? तुला एवढा उल्हास तरी का वाटतो ?'

'राजन्, आपणांशिवाय मला कोण आहे ? दुसरा कसला उल्हास ? मी इंद्राची लक्ष्मी आहे. आपले सर्व भोग पाहून मी आपल्या-समोर आले.'

राजाने आपली कठोर तपस्या सोडून दिली. तो या तरुणीच्या चिंतनात राहू लागला. तिच्या मनाप्रमाणे तो वागू लागला. त्याची थोर तपश्चर्या भंग पावल्यानंतर तम अंतर्धान पावला. याच वेळी ब्रह्म-देव राजाला वर देण्यासाठी गेले होते. तो योगभ्रष्ट राजा विव्हळ होऊन मेल्यासारखा पडला होता. ब्रह्मदेवांनी राजाचे सांत्वन अनेक प्रकारांनी केले. ते म्हणाले,

'राजन्, तुझा शत्रू तम तुझी तपश्चर्या भंग करून निघून गेला आहे. तू आता शोक कशासाठी करतोस ? प्राय: सर्व तरुण स्त्रिया पुरुषास प्रथम थोडा आनंद व नंतर भारी संताप देतात. आणि ती तर मायावी होती. ती तापदायक झाली यात नवल काय ?'

'ब्रह्मन्, मी आता काय करू ? तपश्चर्या पूर्ण कशी करू ?'

'देवाधिदेव जनार्दनाची स्तुती कर. त्यामुळं तुला सिद्धी मिळेल. भगवान विष्णू वेदवेद्य पुरातन परमात्मा आहे. संपूर्ण जगाची निर्मिती त्यांनीच केली.'

ब्रह्मदेवाची आज्ञा पाळण्यासाठी राजा धन्वंतरी गिरिराज हिमालयात गेला व तेथे दोनही हात जोडून भगवान विष्णूंची स्तुती करू लागला. तो म्हणाला,

'सर्वत्र व्याप्त असणाऱ्या विष्णू, आपला जय असो. अचिंत्य परमेश्वरा, आपला विजय असो. विजयशील अच्युता, गोपाळा, लक्ष्मीचे स्वामी, जगन्मय श्रीकृष्णा, भूपते, नाथा, आपला विजय असो. शेष-नागाच्या शय्येवर शयन करणाऱ्या सर्वव्यापी गोविंदा, विश्वाची निर्मिती

करणाऱ्या, विश्वाचं पालन करणाऱ्या, सदसत्स्वरूपा, माधवा, धर्मनिष्ठा, आपला विजय असो. कामना पूर्ण करणाऱ्या कामस्वरूपा केशवा, गुणांच्या सागरा श्रीरामा, पुष्टी देणाऱ्या कल्याणदात्या, आपला जय असो. सर्व भूतांच्या पालका, मौन धारण करणाऱ्या, कर्मफलांच्या दात्या, पीतांबरधारी प्रभो, सर्वेश्वरा, आपला जय असो. नाथा, आपणच सत्त्वगुणांचे नाथ आहात. आपण सर्व वेदांचे ज्ञाते आहात. आपणच जन्मदाते आहात. परमात्मन्, मुक्तिदात्या, केशवा, लोकप्रद परमेश्वरा, पाप नाहीसे करणाऱ्या लोकेश्वरा, भक्तवत्सला, चक्र धारण करणाऱ्या, मानदात्या, आपला विजय असो.'

'विश्ववंदित देवा, धर्मदात्या, संसारातून पार करणाऱ्या, वाचस्पते, शक्तिदात्या, विजयाचा वर देणाऱ्या, यज्ञदात्या, आपला जय असो. आपले नेत्र पद्मपत्रांप्रमाणे विशाल आहेत. दान देणाऱ्या, कैटभाचा नाश करणाऱ्या देवा, आपला जय असो. कीर्तिदात्या, मूर्ती धारण करणाऱ्या, सौख्यस्वरूपा, पावनासही पावन बनविणाऱ्या, ज्योतिःस्वरूपा, आपला जय असो. परमेश्वरा, पुंडरीकाक्षा, क्लेश निवारण करणाऱ्या कृपानिधे, आपणांस नमस्कार असो.'

अशी प्रार्थना ऐकल्यावर भगवान विष्णू प्रकट झाले. त्यांनी राजास वर मागण्यास सांगितले. राजा म्हणाला,

'मी देवांचा राजा होऊ इच्छितो.'

'तथास्तु.'

भगवंतांच्या वरानुसार राजा धन्वंतरी उन्नतीस पावून इंद्रपदास पोचला. पूर्वजन्मी केलेल्या पापांमुळे इंद्रास तीन वेळा स्थानावरून भ्रष्ट व्हावे लागले. वृत्रासुराचा वध झाल्यानंतर नहुषाने इंद्रपद हिरावून घेतले. सिंधुसेनाची हत्या केल्याने आणखी एकदा इंद्राचे पद गेले. अहल्याशी संग केल्यानेही इंद्राचे पद गेले. या सर्व घटनांचा विचार करीत इंद्र उदास झाला होता. त्याने एकदा बृहस्पतीस विचारले,

'वागीश्वर, असं मधून मधून मला राज्यापासून भ्रष्ट का व्हावं लागतं ? असं पदभ्रष्ट होण्यापेक्षा दरिद्री राहिलेलं काय वाईट? '

'तू हा प्रश्न ब्रह्मदेवांस विचार. भूत, वर्तमान व भविष्य काळ

ते जाणतात. ज्या कारणामुळं तुझं पद जातं ते तुला बरोबर सांगतील.'

अशा निश्चयामुळे बृहस्पती व इंद्र असे दोघेही ब्रह्मदेवांजवळ आले. नमस्कार करून म्हणाले,

'भगवन्, अशा कोणत्या दोषामुळं शचिपती इंद्र राज्यापासून भ्रष्ट होतो ?' या प्रश्नाचे चिंतन ब्रह्मदेव बराच वेळ करीत होते. ते बृहस्पतीस म्हणाले,

'ब्रह्मन्, खंडधर्म नावाच्या दोषामुळं इंद्रास राज्यपदापासून च्युत व्हावं लागतं. हा धर्म खंडित कसा होतो ? देश–काळाचा दोष, श्रद्धा व मंत्र यांचा अभाव, यथावत् दक्षिणा न देणे, असत् वस्तूचं दान देणे, देवब्राह्मणांची अवहेलना करणे, इत्यादीमुळं धर्म खंडित होतो. त्यामुळं पदास धक्का पोचतो. क्षोभपूर्ण चित्तानं केलेला धर्मही या अनिष्टास निमित्त होतो. धर्मच पूर्ण नाही तर काय अनिष्ट नाही होणार ?'

ब्रह्मदेवांनी इंद्रास त्याचा पूर्वजन्माचा वृत्तान्तही सांगितला. पूर्वजन्मात इंद्र राजा आयूचा पुत्र धन्वंतरी होता. त्याची तपस्या तम नावाच्या राक्षसाने नष्ट केली. भगवान विष्णूने त्याचे विघ्न दूर केले. या अशा फलांमुळे इंद्रास आपल्या पदापासून भ्रष्ट व्हावे लागते. इंद्र व बृहस्पती यांनी विचारले,

'सुरश्रेष्ठा, हा खंडधर्मत्वाचा दोष निवारण कसा होईल ?'

'ऐका, एक उपाय सांगतो, सर्व दोष हरण करणारा, सर्व सिद्धी देणारा, दुःखमय संसारसागरातून तारणारा एक उपाय आहे. आपण गौतमीच्या तटावर जाऊन भगवान विष्णू व शिव यांची आराधना करावी.'

ब्रह्मदेवांच्या सांगण्यानुसार गौतमीतटावर जाऊन दोघांनी स्नाने केली. इंद्राने विष्णूची व बृहस्पतीने शिवाची स्तुती केली. इंद्र म्हणाला, 'मत्स्य, कूर्म, वराहरूप धारण करणाऱ्या भगवान विष्णूस वारंवार नमस्कार असो. नरसिंह देव व वामन यांनाही नमस्कार असो. हयग्रीवरूपधारी भगवानांस नमस्कार असो. त्रिविक्रमा, आपणांस नमस्कार असो. श्रीराम, बुद्ध, कल्की यांना नमस्कार असो. परमेश्वरा, आपण अनंत व अच्युत आहात. परशुरामरूपधारी परमेश्वरा, आपणांस नमस्कार असो.

इंद्र, वरुण, यम ही आपलीच रूपं आहेत. त्रिलोकीरूपधारी देवा, परमेश्वरा, आपणांस नमस्कार असो. भगवन्, आपण आपल्या मुखात सरस्वती धारण करता. आपण सर्वज्ञ आहात. आपण लक्ष्मीपती आहात. पापताप आपणांस शिवत नाहीत. आपणांस अनेक बाहू, अनेक चरण आहेत. कान, नेत्र, मस्तकही आपणांस अनेक आहेत. हरे, आपण करुणासागर आहात. मनुष्य आपणांस जोपर्यंत शरण आला नाही तोपर्यंतच तो निर्धन, मलिन, दीन असतो. '

बृहस्पती म्हणाला,

' ईशा, आपण परम सूक्ष्म, ज्योतिर्मय, अनंत, ओंकाररूप, प्रकृतीच्या पलीकडे, चित्स्वरूप, आनंदमय व पूर्णरूप आहात. मुमुक्षू पुरुष आपलं वर्णन असंच करतात. भगवन्, पंचमहायज्ञांच्या द्वारे आपली आराधना करून फलस्वरूपात आपल्या दिव्य धर्माची प्राप्ती मनुष्यास होते. शंभो, निष्काम व आप्तकाम पुरुष समत्वबुद्धीच्या द्वारा सर्व प्राण्यांत आपलंच दर्शन घेतात. त्यामुळं त्यांची क्षुधा, पिपासा, शोक-मोहवृत्ती, जरा-मृत्युरूप सहा ऊर्मी यांतून मोकळीक होऊन ते शांती मिळवितात. मला वेद माहीत नाहीत. माझा ध्यानाचा अभ्यास नाही. मी समाधी लावत नाही. केवळ शांतचित्त भगवान शिवास रुद्र, सोम, शिव इत्यादी नावांनी पुकारून भक्तीनं प्रणाम करतो. ज्ञान, यज्ञ, तप, ध्यान, होम इत्यादी कर्मांचं फल हेच की, सोमनाथावर निरंतर भक्ती जडावी. दयाळा, यासाठी आपली भक्ती अंतःकरणात दृढ व्हावी. '

या दोघांनी केलेली ही स्तुती ऐकून भगवान विष्णू व शिव प्रसन्न झाले व म्हणाले,

' तुम्ही दोघांनी एखादा वर मागावा. '

' भगवान्, माझं राज्य वारंवार घेतलं जातं.' इंद्र म्हणाला, 'ज्या पापानं असं घडतं ते पाप नाहीसं व्हावं. आपण दोनही देव प्रसन्न झाला आहात, तर माझं सर्व काही सदा स्थिर असावं.'

यावर भगवान विष्णू व शिव हसून म्हणाले,

' ही गोदावरी नदी ब्रह्मा, विष्णू व शिव या तीन देवांचा संबंध दर्शविणारी महान तीर्थ आहे. सर्वांचे मनोरथ ती पूर्ण करील. तुम्ही

दोघांनी श्रद्धापूर्वक इथं स्नान करावं. तुम्ही असा मंत्र म्हणावा–

इह जन्मनि पूर्वस्मिन् यत्किंचित् सुकृतं कृतम् ।
तत् सर्वं पूर्णतामेतु गोदावरि नमोऽस्तुते ।।

गोदावरी, मी या जन्मात वा पूर्वजन्मात जे काही पुण्यकर्म केलं असेल ते सर्व पूर्णत्वाला जावो. तुला नमस्कार असो. '

इंद्र व बृहस्पती यांनी भगवानांची आज्ञा स्वीकारून पुढील कार्य आरंभिले. देवगुरूने इंद्राला महाभिषेक केला. त्यातून एक मंगला नावाची नदी निर्माण होऊन जो संगम गोदावरीशी झाला ते स्थान फारच कल्याणदायक बनले. इंद्राने विष्णूकडून त्रिलोकीचे राज्य संपादन केले. येथील भगवान गोविंद या नावाने प्रसिद्ध झाले. देवगुरू बृहस्पतीने जेथे महादेवाचे स्तवन केले ते स्थान सिद्धेश्वर या नावाने विख्यात झाले. मंगलातीर्थ, पूर्णतीर्थ, इंद्रतीर्थ, बार्हस्पत्यतीर्थ अशीही नावे या स्थानास असून स्नान व दान यांनी सर्व काही साध्य होते. गौतमीच्या या तटावर छत्तीस हजार तीर्थे आहेत. सर्व प्रकारच्या सिद्धी ती देतात.

श्रीरामतीर्थाची महत्ता

रामतीर्थ भ्रूणहत्या नाश करणारे तीर्थ आहे. इक्ष्वाकूच्या वंशात दशरथ नावाचा राजा विख्यात झाला. तो इंद्राप्रमाणे बलवान, बुद्धिमान, शूरवीर होता. त्याला तीन राण्या होत्या. एक कौसल्या, दुसरी सुमित्रा, तिसरी कैकेयी. ह्या तीनही कुलीन, सौभाग्यशालिनी, रूपवती व सुलक्षणा होत्या. राजा दशरथ जेव्हा राज्यावर होता तेव्हा व वसिष्ठांसारखे प्रतिष्ठित पुरोहित होते तेव्हा त्या देशात रोग नव्हते की मानसिक चिंता नव्हत्या. कधी अनावृष्टी नव्हती की दुष्काळ नव्हता. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व चार आश्रम यांना मोठे सुख होते.

एकदा देव व दानव यांच्यांत राज्यपदासाठी युद्धाचा प्रसंग आला. जय देवांना मिळत नव्हता की दानवांना. कित्येक दिवसपर्यंत हे युद्ध चालले होते. इतक्यात एक आकाशवाणी झाली, ' राजा दशरथ ज्यांचा पक्ष घेईल त्यांचा विजय होईल. दुसऱ्यांचा नाही. ' ही वाणी ऐकताच देव व दानव राजा दशरथाकडे मदतीसाठी गेले. देवांतर्फे वायुदेव

शीघ्रतेने जाऊन म्हणाला, ' महाराज, देव-दानवांच्या संग्रामात आपण यायला हवं. ज्या बाजूस आपण त्या बाजूस जय आहे. आपण देवांचा पक्ष घ्यायला हवा. ' यावर राजा दशरथ म्हणाला,

' वायुदेवा, आपण सुखपूर्वक जावं. मी अवश्य येईन. '

वायू निघून गेल्यावर राजापाशी दैत्यगण आले व म्हणू लागले,

' महाराज, आम्हांस साह्य करावं. विजय आपणांवर अवलंबून आहे. दैत्यराजास आपण साह्य करावं.'

' वायुदेवानं पहिल्यानं मला प्रार्थना केली. मी त्याला साह्य देण्याचं वचनही दिलं आहे. '

ऐन युद्धाच्या प्रसंगी राजा दशरथाच्या रथाची धुरी मोडली. राजा वेगाने युद्ध करीत होता. त्याला रथाची धुरी तुटली आहे याचे भान राहिले नाही. यावेळी राणी कैकेयी राजाजवळ बसली होती, तिला रथाची अवस्था ध्यानात आली. तिने धुरीच्या जागी आपला हात देऊन रथ सावरून धरला. राजा दशरथाने दैत्य व दानव यांच्यावर विजय मिळविला. देवांकडून अनेक वर प्राप्त करून घेऊन तो अयोध्येस परत निघाला. मार्गात त्याला कैकेयीचे साहसकृत्य समजले. प्रसन्न होऊन राजाने कैकेयीस वर दिले. कैकेयी म्हणाली, ' महाराज, आपण दिलेले वर आपणांपाशीच ठेवा. योग्य वेळ येताच मी ते मागीन. '

राजाने कैकेयीला अनेक भूषणे दिली. विजयामुळे तो संतुष्ट होता. मुनीश्वर ऋष्यश्रृङ्गाच्या कृपेने राजास चार देवोपम पुत्र झाले. कौसल्येच्या पोटी राम, कैकेयीस भरत व सुमित्रेस लक्ष्मण व शत्रुघ्न असे हे पुत्र बुद्धिमान, आज्ञाधारक होते. त्यांनी महर्षी विश्वामित्रांबरोबर वनात जाऊन यज्ञांचे रक्षण करावे म्हणून विश्वामित्रांनी त्यांची मागणी केली. त्यावर राजा म्हणाला,

' मुने, या म्हातारपणी कसेतरी दैवयोगानं हे माझे पुत्र जन्मास आले. ते माझ्या मनास भारी आनंद देतात. मी आपलं शरीर देईन. राज्य देईन. पण हे दोन पुत्र मी देऊ शकणार नाही. '

यावेळी महर्षी राजा दशरथास म्हणाले,

' राजन्, रघुवंशीयानं कुणाची प्रार्थना आजपर्यंत वृथा दवडली

नाही.'

यावर राजाने राम व लक्ष्मण यांना विश्वामित्रांच्या बरोबर यज्ञरक्षणार्थ जाण्यासाठी अनुज्ञा दिली. रामाने व लक्ष्मणाने राजा दशरथास नमस्कार करून विश्वामित्राबरोबर ते नगराबाहेर पडले. विश्वामित्रांनी या दोन बंधूंना माहेश्वरी विद्या, धनुर्वेद, शस्त्रविद्या, अस्त्रविद्या, लोकविद्या, रथविद्या, गजविद्या, अश्वविद्या, गदाविद्या व मंत्रद्वारा अस्त्रांचे आवाहन व विसर्जन इत्यादी शिक्षण दिले. राम व लक्ष्मण यांनी वनात त्राटिकेस मारून यज्ञाचे रक्षण केले. या दोन राज-कुमारांना घेऊन विश्वामित्र जनकराजाकडे गेले. रामाची धनुर्विद्या पाहून राजा जनक संतुष्ट झाला व त्याने आपली अयोनिजा कन्या सीता श्रीरामास विवाहात समर्पण केली. याच वेळी लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांचेही विवाह जनकाच्या वाड्यात झाले. त्यानंतर दीर्घ काळ लोटल्यावर दशरथाने श्रीरामास राज्यपदावर बसवावे असा विचार केला.

याच वेळी मंथरारूपी दुर्दैवाने प्रेरित होऊन कैकेयीस ईर्षा निर्माण झाली. तिने रामास होणाऱ्या राज्याभिषेकात विघ्न आणले. तिने रामास वनवासास धाडून भरतास राज्य द्यावे असे सुचविले. दशरथाने स्वीकार केला नाही तरी पित्याच्या सत्यरक्षणासाठी राम स्वतःच घोर वनात निघून गेला. सीता व लक्ष्मणही त्याच्या बरोबर गेले. राम, लक्ष्मण व गुणशालिनी सीता यांचे स्मरण करीत करीत राजा दशरथाने प्राण सोडले. रामचंद्र फिरत फिरत चित्रकूटास आले. तेथे त्यांनी तीन वर्षे काढली. तेथून ते दक्षिणेस दंडकारण्यात आले. हे वन दैत्यांनी सेवित असल्याने महाभयंकर होते. ऋषींनी भयभीत होऊन ते सोडून दिले होते. श्रीरामाने तेथील दैत्य व राक्षस मारून ते वन ऋषिमुनींना राहण्यासाठी योग्य केले. हळूहळू ते गौतमीच्या तटावर आले. शिवाची पुंजीभूत अनिर्वचनीय शक्ती म्हणजेच ही जलस्वरूपा गौतमी नदी पाहून श्रीरामांच्या मनास हर्ष झाला. त्यांनी तेथे महादेवाची स्थापना करून त्याची पूजा केली व ते म्हणाले,

'मी पुराणपुरुष शंभूला नमस्कार करतो. ज्याच्या सत्तेला पार

नाही, अंत नाही त्याला मी नमस्कार करतो. अविनाशी प्रभू रुद्रास मी नमस्कार करतो. सर्वांचा संहार करणाऱ्या शिवास माझा नमस्कार असो. अविनाशी परमदेवा, लोकगुरू उमापती, दारिद्र्याचा नाश करणाऱ्या शिवा, रोगांचे अपहरण करणाऱ्या शिवा, तुला नमस्कार असो. नित्य, क्षरअक्षरस्वरूप शंकरास प्रणाम असो. जो चिन्मय आहे, जो अप्रमेय आहे, त्या भगवान त्रिलोचनास नमस्कार असो. मनोवांच्छित फल देणाऱ्या महेश्वरास, भगवती उमेच्या स्वामीस नमस्कार असो. सत्-असत्हून पृथक असणाऱ्या परमात्म्यास नमस्कार असो. पापांचे अपहरण करणाऱ्या, संपूर्ण विश्वाच्या हितास तत्पर असणाऱ्या देवास नमस्कार असो. पुष्कळ रूपं धारण करणाऱ्या, जगताच्या रक्षका, सत् व असत्च्या निर्मात्या, तुला नमस्कार असो. विश्वाचा स्वामी विश्वनाथास नमस्कार असो. हव्यकव्यस्वरूप यज्ञेश्वरास नमस्कार असो. दानप्रिय इष्टदेवास नमस्कार असो. भगवान सोमनाथास प्रणाम असो. जो भक्ताधीन आहे, त्या उमापतीस नमस्कार असो. विघ्नराज गणेश व नंदी यांच्या स्वामीस नमस्कार असो. जगाचे दुःख नाश करणाऱ्या या चंद्रशेखरास नमस्कार असो. स्तुती करण्यास योग्य अशा व मस्तकावर गंगा धारण करणाऱ्या महेश्वरा, तुला नमस्कार असो. ब्रह्मा, इंद्र, देव, असुर ज्याच्या चरण-कमलांची पूजा करतात त्याला नमस्कार असो. पंचामृत, चंदन, उत्तम तूप, दीप, विविध विचित्र पुष्पे, मंत्र, अन्न इत्यादी उपचारांनी पूजित अशा सोमास माझा नमस्कार असो.'

श्रीरामांची ही प्रार्थना ऐकून भगवान शिव प्रकट होऊन म्हणाले, 'तुझं कल्याण असो. एखादा वर माग.'

'सुरश्रेष्ठा, महेश्वरा, जे लोक या भक्तिपूर्ण स्तोत्रानं तुझी पूजा करतील, स्तुती करतील, त्यांचं सर्व कार्य सिद्धीस जावं. शंभो, ज्यांचे पितर नरकाच्या समुद्रात बुडाले आहेत त्यांचे ते पितर इथं पिंड दिल्यानं स्वर्गात जावेत. जन्मभरची मानसिक, वाचिक, शारीरिक पापं इथं स्नान केल्यानं नष्ट व्हावीत.'

ही प्रार्थना ऐकून शंकर प्रसन्न झाले. त्यांनी रामचंद्रांना तसा वर दिला व ते अंतर्धान पावले. त्यानंतर रामांनी आपल्या अनुयायांसह

गोदावरीचा परिसर पाहिला. हे स्थान तेव्हापासून श्रीरामतीर्थ या नावाने प्रसिद्ध झाले. जेथे लक्ष्मणाने स्नान केले, शिवाची पूजा केली ते लक्ष्मणतीर्थ झाले. जेथे सीतेने स्नान केले ते सीतातीर्थ बनले.

पुत्रतीर्थाचे महत्त्व

गौतमीच्या तटावर एक पुण्यतीर्थ पुत्रतीर्थ या नावाने प्रसिद्ध आहे. जेव्हा दिती व दनूचे पुत्र दैत्य व दानव यांचा क्षय देवांकडून होऊ लागला तेव्हा पुत्रवियोगाने कष्टी झालेली दिती आपली बहीण दनूच्या जवळ आली व म्हणाली,

'भद्रे, आपले दोघींचे पुत्र क्षीण होत चालले. आपलं हे संकट दूर कसं होणार ? पाहा ना, अदितीचा वंश किती संघटित व उत्तम आहे ! त्याचा क्षय कधीच होणार नाही. ते उत्तम राज्य, सुयश, विजय-लक्ष्मी यांनी सुशोभित आहेत. या अदितीच्या संतानांचं वैभव, त्यांचा अभ्युदय पाहून मी दुबळी बनत राहिले आहे. कदाचित मी जगूही शकणार नाही. अदितीच्या महान ऐश्वर्यानं मला फार दुःख होतं. यापेक्षा दावानलात प्रवेश करणं सुखाचं होईल. पण स्वप्नातही या सवतीची समृद्धी पाहणं नको.'

तिला यावर दनू म्हणाली, 'भद्रे, तू आपल्या गुणांनी पतिदेव कश्यपांना संतुष्ट कर. तुझा स्वामी जर संतुष्ट झाला तर तो तुझी मनकामना पूर्ण करील.'

दितीने सर्व प्रकारांनी कश्यपांना संतुष्ट ठेवले. तेव्हा कश्यप म्हणाले,

'सुव्रते, मी तुला काय देऊ ? एखादा अभीष्ट वर माग.'

'नाथा, मला अनेक गुणांनी संपन्न, विश्वविजयी व जगद्वन्द्य पुत्र हवाय. त्याच्या जन्मानं जग मला वीरजननी म्हणू लागेल.'

'देवी, मी तुला एका श्रेष्ठ व्रताचा उपदेश करतो. बारा वर्षं ते तू केलंस तर तुला त्याचं फल मिळेल. व्रतानं निष्पाप झालीस की तुझा मनोरथ पूर्ण होईल.'

कश्यपांनी सांगितल्याप्रमाणे दितीने व्रताचे पालन केले. ती

गर्भवती झाली. एकान्तात आपल्या प्रिय पत्नीस कश्यप एकदा म्हणाले,

'शुचिस्मिते, तपस्वी मुनीही विहित कर्माची अवहेलना करून मनोवांच्छित पदार्थ मिळवू शकत नाहीत. तू कधीच निंद्य कर्म करू नकोस. दोनही संध्यासमयांस झोपणं, कुठं जाणं, किंवा केस सोडून वसणं निषिद्ध आहे. संध्याकाळ भूतांनी व्याप्त असते. म्हणून या वेळी शिंकणं, जांभई देणं, भोजन करणं हे सर्व उपयोगी नाही. दुसऱ्यासमोर हसू नये. संध्याकाळी कधी खोलीत वसून राहू नये. उत्तरेस डोके करून कधी झोपू नये. खोटं बोलू नये. दुसऱ्याच्या घरी जाऊ नये. पतीशिवाय अन्य कोठल्या पुरुषावर कधी दृष्टी देऊ नये. हे सर्व नीट पाळशील तर तुला त्रिभुवनांचं ऐश्वर्य प्राप्त होईल.'

दितीने हा सर्व उपदेश ऐकण्याची प्रतिज्ञा केली. कश्यप देवांच्याकडे गेल्यावर दितीचा पुण्यजनित गर्भ दिवसेंदिवस वाढू लागला. या सर्व गोष्टी मय नावाच्या दैत्याला समजल्या. त्याची इंद्रावरोबर मैत्री होती. त्याने इंद्राजवळ एकान्तात बोलणे केले, 'दिती व दनू यांनी विशेष हेतूनं कश्यपांना संतुष्ट करून घेतलं आहे. दितीचा गर्भ वाढतो आहे. त्याला नाना प्रकारच्या शक्ती आहेत.' हा महाबली मय नावाचा दैत्य नमुचीचा बंधू होता. नमुची इंद्राच्या हातून मारला गेला. आपल्या वंधूचा शत्रू मयाचा मित्र कसा झाला ? ब्रह्मदेवांनी या प्रश्नाचे उत्तर दिले.

पूर्वकाळात नमुची दैत्यांचा राजा होता. इंद्रावरोबर त्याचे मोठेच वैर होते. एकदा इंद्र युद्ध सोडून कोठेतरी निघाला होता. दैत्य नमुची त्याचा पाठलाग करू लागला. त्याला पाहून इंद्र भयभीत झाला. त्याने ऐरावत हत्तीला सोडून दिले व तो समुद्राच्या फेसात घुसून त्याने आपल्या शत्रूचा पराभव केला तेव्हा नमुची इंद्राकडून मारला गेला. तेव्हा त्याचा छोटा भाऊ नमुची याने आपल्या थोरल्या बंधूच्या शत्रूचा नाश करण्यासाठी घोर तपस्या केली. त्याने देवांना अत्यंत भयंकर असणारी माया प्राप्त करून घेतली. त्याने भगवान विष्णूपासूनही वर मागून घेतला. मय मोठा दानशूर व प्रियभाषी होता. इंद्राला जिंकण्यासाठी त्याने अग्नी व ब्राह्मण यांचे पूजन सुरू केले. याचकांना तो वाटेल

तशा विविध वस्तू द्यायला लागला. बंदीजनांनी त्याची स्तुती केली. वायूकडून इंद्राला आपल्या शत्रूचे, मयाचे सामर्थ्य समजत होते. इंद्राने ब्राह्मणाचे रूप घेतले व तो मयापाशी येऊन म्हणाला,

'दैत्यराज, मी एक याचक आहे. मला मनोवांच्छित वर द्यावा.'

'दिला म्हणून समज.'

'मी तुमच्याबरोबर मैत्री इच्छितो.'

'विप्रवर, हा कसला वर ? तुमच्यात व माझ्यात वैर आहे कुठं ?'

इंद्रानें आपले वास्तविक रूप प्रकट केले. इंद्राला ओळखून मयास भारी नवल वाटले. अशी इंद्र व मय यांची मैत्री झाली. इंद्र प्रसन्न झाला. त्याला मय म्हणाला,

'तू अगस्त्यांच्या आश्रमात जा. तिथं गर्भवती दिती आहे. तिची सेवा करण्याच्या निमित्तानं तू तिथं राहा. आणि संधी पाहून तिच्या गर्भाचे तुकडे तुकडे करून टाक. तुझ्या वज्रानं तू तुकडे केलेस की तुझा शत्रूही नाश पावेल.'

असे ठरल्यावर इंद्र माता दितीपाशी येऊन तिची सेवा करू लागला. या नव्या सेवकाच्या मनात काय आहे याचा पत्ता दितीस नव्हता. इंद्र अनुकूल संधीची वाट पाहत होता. एके दिवशी संध्याकाळी दिती उत्तरेकडे डोके करून निजली होती. इंद्राला वाटले ही वेळ योग्य आहे. त्याने दितीच्या गर्भास मारण्यासाठी प्रयत्न केला. गर्भस्थ बालक निर्भय होऊन म्हणाले,

'वज्रधारी इंद्र, तुझा मी भाऊ आहे. मला कशासाठी मारतोस ? युद्धाशिवाय मारणं पाप आहे. मी गर्भातून बाहेर येईन. तेव्हा वाटल्यास तू युद्ध कर. असं इथं मला मारणं तुला शोभत नाही. मी तर अजून कोणतीच विद्या घेतली नाही. शस्त्रांचं शिक्षण घेतलं नाही. माझ्या-जवळ आयुधं नाहीत. तुझ्या हातात मात्र वज्र आहे. मला मारताना तुला लाज वाटत नाही ? मला मारून तुला काय मिळणार ? यश ? पुण्य ? इंद्रा, मला तू मारलंस तर बालघातकी, ब्रह्मघातकी, विश्वास घातकी म्हणून तुझा लौकिक वाढेल.'

गर्भस्थ बालकाचे हे बोलणे ऐकूनही इंद्राने त्याचे आपल्या वज्रानें

तुकडे केले. क्रोधान्ध व लोभी माणसास दया कोठून असणार ? परंतु इतके करूनही त्या बालकाचा मृत्यू झाला नाही. ते तुकडेच जिवंत राहून बोलत राहिले,

'अरे भाई, मारतोस का ?' इंद्राने हे न ऐकून त्या तुकड्यांचेही पुन्हा तुकडे केले. ते तुकडेही सांगू लागले, 'इंद्रा, मारू नकोस रे. मी मातेच्या गर्भात आहे. का मारतोस ?' पण हे ऐकणार कोण ? इंद्राच्या चित्तात करुणेचा एक कणही निर्माण झाला नाही. गर्भाचे सर्व तुकडे हात-पाय निघून जिवंत झाले. ते सर्व रडत आहेत हे पाहून इंद्र म्हणाला, 'मा रुत, रडू नकोस.' त्यांचे नाव यामुळे मरुत् झाले. गर्भातच त्यांचे बल व ऐश्वर्य वाढले. त्या गर्भस्थ बालकांनी आपल्या पित्यास पुकारले. अगस्त्यमुनी धावत आले. त्यांनी दितीकडे पाहिले. ती वेदनांनी पीडित झाली होती. अत्यंत कुपित होऊन अगस्त्यांनी इंद्रास शाप देताना म्हटले,

'इंद्रा, संग्रामात तुझा पराभव तुझे शत्रू करतील.'

दितीनेही इंद्राला रोषपूर्वक शाप देऊन म्हटले,

'तू माझ्या मुलांना मारून काही मोठा पुरुषार्थ नाही केलास. तू राज्यभ्रष्ट होशील.'

याच वेळी प्रजापती कश्यप तेथे आले. अगस्त्यांच्या मुखातील वाणी ऐकून त्यांना फार दु:ख झाले. ते इंद्राला म्हणाले,

'बेटा, तू बाहेर ये पाहू. तू हे काय पापकर्म केलंस !'

पित्याचा आदेश ऐकून इंद्र लज्जेनें चूर होऊन आला. तो म्हणाला, 'माझं कल्याण कसं होईल ? काही उपाय सांगा मला.'

कश्यप ब्रह्मदेव यांच्या सांगण्यावरून इंद्र गौतमीच्या तटावर आले. त्यांनी महादेवाची प्रार्थना करताना म्हटले,

'देवेश्वर शंकर, माझं रक्षण करा. लोकवंदित परमेश्वरा, सर्पांचं आभूषण वापरणाऱ्या देवा, तीन वेदांच्या नेत्रा, त्रिलोचना, गोधरा, लक्ष्मीशा, गजचर्म धारण करणाऱ्या देवा, त्रिपुरहरा, अर्धचंद्राने विभूषित होणाऱ्या नाथा, यज्ञेश्वरा, सोमनाथा, करुणाधामा, मंगलदात्या, भास्करा, वित्तेशा, ब्रह्मवंदित शिवा, विश्वेश्वरा, सिद्धेश्वरा, करुणा-

सागरा शिवा, मी आपणांस शरण आहे. आपण माझं रक्षण करावं.'

भगवान शिव प्रसन्न झाले. त्यांनी मरुद्गण व इंद्र यांना यज्ञात समान आहुती मिळेल असे सांगितले. मरुद्गणांबरोबर असताना इंद्राला कुणीच जिंकणार नाही. तो नेहमीच विजयी राहील.' भगवान शिवांनी अगस्त्यांनाही सांगितले,

'मुने, तुम्ही शचिपती इंद्रावर कधी क्रोध धरू नका.' शिवांनी दितीचीही समजूत घातली. या पितृतीर्थावर स्नान केल्यास स्त्री पुत्रवती होते. येथे पितरांना पिंडदान केल्याने, तर्पण केल्याने, सुवर्णदान केल्याने, संतानाची प्राप्ती निश्चित होते. मरुद्गणांच्यासह इंद्राची येथे मैत्री झाल्यामुळे या तीर्थास मित्रतीर्थ असेही नाव मिळाले. येथे इंद्र निष्पाप झाल्यामुळे कोणी यास इंद्रतीर्थ वा शक्रतीर्थही म्हणतात. येथे स्नान केल्याने सर्व कामना पूर्ण होतात.

यम, आग्नेय, कपोत व उलूकतीर्थ

यमतीर्थ पितरांची प्रतिष्ठा वाढविणारे आहे. एक अनुल्हाद नावाचा मोठा कपोत होता. त्याची पत्नी हेती या नावाची एक यक्षिणी होती. अनुल्हाद हा मृत्यूचा पुत्र व हेती मृत्यूची कन्या होती. समयानुसार दोघांना अनेक पुत्रपौत्र झाले. पक्ष्यांचा राजा उलूक हा अनुल्हादाचा मोठा शत्रू होता. गंगेच्या उत्तरतटावर कपोताचा आश्रम व दक्षिण तटावर पक्षिराज उलूक राहत होता. कपोत व उलूक यांच्यात पुष्कळ दिवसपर्यंत युद्ध होत राहिले. कपोताने मृत्यूची आराधना करून याम्य अस्त्र संपादन केले होते. उलूकानेही अग्नीपासून सामर्थ्य मिळविले होते. वर प्राप्त केल्याने दोघेही उन्मत्त होऊन एकमेकांशी लढत. उलूकाने कपोतावर आग्नेय अस्त्र टाकले तर कपोताने उलूकावर यमपाश टाकून यमदंडाचा प्रहार केला. कपोताची स्त्री हेती मोठी पतिव्रता होती. आपल्या पतीच्या भोवती अग्नी निर्माण झाला असे पाहून ती दुःखाने विव्हळ झाली. ती अग्निदेवास प्रार्थना करून म्हणत राहिली,

'यज्ञभोक्ता अग्नी आहे. देवांचा मुख्य आहे. आदिदेव भगवान अग्नीस मी शरण आले आहे.'

'पतिव्रते, माझं हे अस्त्र अमोघ आहे. हे ज्याच्यावर रोखले आहे त्याला सांग.... '

'अग्निदेवा, तू तुझं अस्त्र माझ्यावरच रोखून धर. माझ्या पतीवर वा पुत्रांवर नको. मला आपण मारावं.'

'देवी, तुझं वचन ऐकून मी संतुष्ट झालो आहे. तुझा स्वामी व तुझे पुत्र यांना मी नाही मारणार. त्यांच्या रक्षणाचं मी वचन देतो. तू आता सुखानं परत जावंस.'

याच वेळी पतिव्रता उलूकीही यमराजापाशी जाऊन म्हणाली,

'सुरश्रेष्ठा, माझ्या स्वामींना आपण पाशानं बांधलं आहे. आपण माझ्या पुत्रांचं व पतीचं रक्षण करावं. वाटल्यास आपण मला बांधावं.'

'शुभे, तुझा पती, तुझे पुत्र व तू निश्चित होऊन राहा.'

इतके म्हणून यमराजाने आपला पाश आवरून घेतला. अग्नीने आपले अस्त्र परत घेतले. कपोत व उलूक यांच्यात प्रेमभाव निर्माण झाला. यम व अग्नी यांच्या वरदानाने गंगेच्या काठावरील कपोत व उलूक यांचे आश्रम तीर्थरूप बनले. येथे यमाची, अग्नीची स्तुती करून जे दान करतील, स्नान करतील त्यांना सर्व प्रकारची संपत्ती मिळेल. या स्तोत्राचा पाठ जे करतील ते हजारो व्याधींपासून मुक्त होतील. या तीर्थात स्नान केल्याने साध्वी स्त्री गर्भवती होईल. वंध्या स्त्री गर्भवती होईल. गर्भिणी वीरपुत्रास जन्म देईल. येथे पिंड दिल्याने पितर मुक्त होतील. येथे अग्नीचे स्तोत्र म्हटल्याने आयुष्य, आरोग्य, ऐश्वर्य, लक्ष्मी यांची प्राप्ती होईल. अग्नीची भीती नष्ट होईल असे माहात्म्य या तीर्थाचे वाढून याम्यतीर्थ, आग्नेयतीर्थ, कपोततीर्थ, उलूकतीर्थ अशी नावे या तीर्थास मिळाली.

तपस्तीर्थ, इंद्रतीर्थ, वृषाकपी, अब्जकतीर्थं

तपस्येची वृद्धी करणारे, सर्व अभिलाषा पूर्ण करणारे एक मोठे तीर्थ म्हणून तपस्तीर्थ प्रसिद्ध आहे. एकदा ऋषींच्यात अग्नी व जल यांत श्रेष्ठ कोण याविषयी वादविवाद झाला. अग्नीशिवाय कोणीच श्रेष्ठ नाही, जीवच अग्निरूप आहे. आत्मा व हविष्य अग्नीच असून

अग्नीपासूनच जगाची निर्मिती होते. अग्नी ज्योतिर्मय जगत आहे. म्हणून पाच भूतांत अग्नी श्रेष्ठ आहे, असे एक पक्ष प्रतिपादन करी. दुसरा पक्ष जलाचे महत्त्व सांगू लागला. जलापासून अन्नाची उत्पत्ती, जलापासून मनुष्याची शुद्धी. जल हेच आपली माता, जलापासूनच अमृताची निर्मिती, जलापासूनच औषधी वनस्पती तयार होतात, असे दुसरा पक्ष प्रतिपादन करू लागला.

दोनही पक्ष ब्रह्मदेवांपाशी आले व म्हणाले,

'भगवन्, आपण तीन लोकांचे प्रभू आहात. आपणच सांगा. अग्नी श्रेष्ठ की जल श्रेष्ठ ?'

'या जगतात दोनही वस्तू पूजनीय आहेत. दोहींपासूनच हे जग निर्माण झालं. दोघांपासून अमृत प्रकट झालं. दोनांपासून जीवन पूर्ण आहे. दोनही समान रूपानं श्रेष्ठ आहेत.'

ऋषींच्या मनास हा निर्णय पटला नाही. ते क्षीरसागर निवासी भगवान विष्णूपाशी गेले. त्यांनी मनोभावे विष्णूची स्तुती केली तेव्हा जगज्जननी देवो वाणीने सांगितले, 'तपस्या, भक्ती, आराधना यांनी तुम्ही दोघांची सेवा करावी. ज्याच्या आराधनेनं पहिल्यानं सिद्धी प्राप्त होईल तो श्रेष्ठ समजावा.'

ऋषी तेथून निघाले. परिश्रमाने ते थकले होते. ते तपस्या करण्यासाठी गौतमी गंगेच्या तटावर आले. जलदेवता व अग्निदेवता यांची वेगवेगळी आराधना त्यांनी सुरू केली. अग्नीची पूजा जलाने सुरू झाली. त्यावेळी वेदमाता दैवीवाणी सरस्वती प्रकट होऊन म्हणाली, 'जलानंच शुद्धी होते. अग्नीच्या पूजकांनी विचार करावा. जलाशिवाय पूजन कसं होईल ? जल आहे म्हणूनच सर्व कर्मांचं अनुष्ठान सिद्धीस जातं. यासाठी जलच सर्वश्रेष्ठ आहे. त्याला मातेची पदवी आहे म्हणून ते श्रेष्ठ.'

ऋषींनी ही आकाशवाणी ऐकली. जेथे त्यांनी तपस्या केली होती ते स्थान तपस्तीर्थ, समतीर्थ, अग्नीतीर्थ, सारस्वततीर्थ इत्यादी नावांनी ओळखले जाऊ लागले. येथे चौदाशे तीर्थांचा निवास असून येथील स्नानदान मोक्षाची प्राप्ती करून देणारे आहे.

याच गोदावरीच्या तटावर एक इंद्रतीर्थ आहे. येथेच वृषाकपि-तीर्थ आहे. यालाच फेनासंगम, हनुमत्तीर्थ, अब्जकतीर्थ अशी नावे आहेत. भगवान त्रिविक्रमाचा येथे निवास असतो. येथे स्नान व दान केले तर परत जगतात यावे लागत नाही. गंगेच्या दक्षिण व उत्तर तटांवर इंद्रेश्वरतीर्थ आहे. पूर्वी नमूची नावाचा एक दैत्य देवराज इंद्राचा प्रबळ शत्रू होता. तो मदोन्मत्त झाला होता. एकदा इंद्राशी त्याचे युद्ध झाले. इंद्राने नमूचीचे मस्तक कापले. वज्ररूपधारी ते शस्त्र मस्तक कापून गंगेच्या दक्षिण किनाऱ्यावर जाऊन पृथ्वी छेदून रसा-तलास गेले. रसातलात असलेले गंगाजल सर्व विश्वाला पावन करणारे आहे. वज्राने पृथ्वी छेदून जो मार्ग बनविला त्याच मार्गाने त्या पाताळ-गंगेचे पाणी पृथ्वीच्या पृष्ठभागावर आले. त्यालाच फेनानदी असे नाव मिळाले. गंगेशी या नदीचा संगम झाला. येथे स्नान केल्याने सर्व पापांचा नाश होतो. येथेच स्नान करून हनुमानाची उपमाता, जिचे मुख मांजरासारखे होते—ती संकटातून मुक्त झाली. याच तीर्थाला मार्जारतीर्थ व हनुमत्तीर्थ अशीही नावे आहेत.

आता वृषाकपी व अब्जकतीर्थ यांचा महिमा समजावून घेऊ. दैत्यांचा एक पूर्वज हिरण्य नावाचा होता. तपस्या केल्याने तो देवांनाही अजिंक्य बनला होता. त्याचा एक बलवान पुत्र महाशनी या नावाने विख्यात होता. त्याच्या स्त्रीचे नाव पराजिता होते. एकदा महाशनीने इंद्रावर विजय मिळवून ऐरावतासह त्याला त्याने आपल्या पित्याच्या स्वाधीन केले. महाशनीने असेच वरुणावरही आक्रमण केले. पण वरुण बुद्धिमान होता. त्याने महाशनीस आपली कन्या दिली. इकडे सर्व जग इंद्राशिवाय राहिले. या इंद्राची पुन्हा स्थापना भगवान विष्णूच करतील या कल्पनेने त्यांनी विष्णूंची प्रार्थना केली. विष्णूने सांगितले,

'महादैत्य महाशनी मला अवध्य आहे.'

तेव्हा ते सर्व देव महाशनीचे श्वशुर वरुणापाशी गेले. वरुणाने देवराज इंद्राच्या सुटकेचे प्रयत्न केले. दैत्यराज महाशनीने ऐरावतासह इंद्रास सोडून दिले व म्हटले, 'इंद्रा, आज तू शिष्य व माझे श्वशुर वरुण तुझे गुरू झाले. कारण, त्यांनीच तुला मुक्त केलं आहे. तुम्ही

वरुणाला स्वामी मानावं. सेवकाप्रमाणं त्यांची सेवा करावी. नाहीतर पुन्हा तुला पकडून रसातलात पाठवून देईन.'

अपमानाने लज्जित होऊन इंद्र घरी आला. त्याने सर्व हकीगत इंद्राणीला सांगितली. इंद्र म्हणाला,

'सखी, शत्रूनं माझ्याशी असं अपमानकारक वर्तन केलं. माझ्या हृदयात आग पेटली आहे. सांग सुमुखी, मी काय करू ? हृदय शांत कसं करू ?'

'बलसूदना, या दानवांची उत्पत्ती, पराजय, माया, वरदान, मृत्यू हे सर्व मी जाणते. महाशनीस तपस्येमुळं ही शक्ती प्राप्त झाली आहे. प्राणनाथा, भूमी व जल यांच्या अधिष्ठात्री देवींच्या द्वारे कोणतेही कार्य असाध्य नाही. एखाद्या तीर्थभूमीवर जाऊन तेथे भगवान विष्णू व शिव यांची आराधना करावी. पृथ्वीवर एक दंडकवन आहे. तेथे गंगा वाहते. तिच्या तीरावर आपण विष्णूची व शिवाची आराधना करावी. माझ्याबरोबर राहून आपण तेथे तपस्या करावी. एकटचा पुरुषानं केलेली साधना पूर्ण होत नाही. चला माझ्याबरोबर. आपण भूतलावर जाऊन गौतमी गंगेच्या काठावर तपस्या करू.'

आपली पत्नी, शची, गुरू बृहस्पती यांना घेऊन इंद्र गौतमीच्या तटावर आला. गंगेत स्नान करून त्याने भगवान शिवांची स्तुती केली. तो म्हणाला,

'पिनाकधारी शिवा, माझ्यावर आपण प्रसन्न व्हावं. आपणच या सृष्टीची रचना केली. आपणच रक्षण करता, आपणच संहार करता. आपणच एक, स्वतंत्र व अद्वैत चिदानन्दस्वरूप आहात. पाप, ताप, दारिद्र्य, लोभ, याचना, मोह, विपत्ती यांना आपण पार्वतीच्या साह्यानं दूर केलंत. शिव व शक्ती यांच्या सुंदर अद्वैत रूपास नमस्कार असो.'

इंद्राची ही प्रार्थना ऐकून भगवान शिव प्रसन्न झाले व म्हणाले,

'देवराज, तुला काय हवंय ? तुझा मनोरथ पूर्ण करीन.'

'भगवन्, माझा शत्रू बलवान महाशनी आहे. मला बांधून रसातलात त्यानं नेलं होतं. त्यानं माझा विविध प्रकारांनी अपमान केला. मी त्याचा नाश करू इच्छितो. देवा, मी त्याचा वध कसा करू शकेन ?'

'केवळ माझ्या एकट्याच्या साह्यानं तुझ्या शत्रूचा वध नाही होणार. तू त्या अविनाशी जनार्दनाची प्रार्थना कर. शचीनं पण अशी प्रार्थना करावी.'

गंगेच्या दक्षिण तटावर येऊन इंद्राने शचीसह मनुश्वर आपस्तंब यांना घेऊन फेना-गंगा संगमावर भगवान जनार्दनांची स्तुती केली. जनार्दन विष्णू तृप्त होऊन प्रकट झाले व म्हणाले,

'इंद्रा, तुला वरदान काय देऊ ?'

'मला असा एक वर हवाय की ज्यानं माझ्या शत्रूचा वध होईल.'

'तुझ्या मनाप्रमाणे वर दिला.'

शिव, विष्णू व गंगा यांच्या प्रसादाने गंगेच्या पाण्यातून एक पुरुष प्रकट झाला. त्याने भगवान शिव व विष्णू यांची रूपे धारण केली होती. त्याच्या हातात चक्र होते, आणि त्रिशूलही होता. त्याने रसातलात जाऊन इंद्राचा शत्रू महाशनीचा वध केला. याचे नाव अब्जक व वृषाकपी झाले. तो इंद्राचा सखा बनला. स्वर्गात राहूनही इंद्र वारंवार वृषाकपीजवळ येत राहिला. आपला पती इतरत्र आसक्त झाला की काय अशी एक शंका शचीच्या मनात निर्माण झाली. इंद्राने तिचे सांत्वन करून म्हटले,

'प्रिये, मी शपथ घेऊन सांगतो की, मित्रवर वृषाकपीच्या घराशिवाय मी अन्यत्र कुठंच जात नाही. तू पतिव्रता व माझी प्रियतमा आहेस. तूच मला नेहमी सल्ला देतेस. तू संतानवती व कुलीन पण आहेस. तुझ्याशिवाय माझी प्रियतमा आणखी दुसरी कोण होऊ शकते ? तुझ्याच प्रयत्नानं मला हे यश मिळालं. मी या पदावरून आता कधीच च्युत होणार नाही. तुझ्यासारखी पतिव्रता साह्यास असताना कोणतं कार्य असाध्य आहे ? तेथे मोक्षही दुर्लभ नाही. अर्थ, काम आदींची गोष्टच कशाला ? पत्नीच लोकपरलोकात हितकारिणी असते. पत्नी जर कुलीन, प्रिय बोलणारी, पतिव्रता, रूपवती, गुणवती, संपत्ती-विपत्तीत साथ देणारी असेल तर त्रैलोक्यात असाध्य असं दुसरं काही नाही ! प्रिये, तुझ्याच बुद्धीनं मला हे मंगलकारक वैभव प्राप्त झालं आहे. संकटात पडलेल्या पुरुषाला स्त्रीशिवाय दुसरं कोणतंच औषध नाही. प्रिये, हे

त्रिलोकविख्यात तीर्थ प्रसन्नता वाढविणारं आहे. या इंद्रेश्वरतीर्थात भगवान शिव राहातील व अब्जकतीर्थात भगवान विष्णू राहातील. ते आपल्या उपस्थितीनं दंडकवन पवित्र बनवतील. ही तीर्थं, त्यांचं हे आख्यान सर्वांना धन, यश, आयुष्य, आरोग्य, पुण्य यांची वृद्धी करणारं होईल.' इंद्राच्या या भाषणाप्रमाणेच हे तीर्थ सर्वांना उपकारक व सर्वांची पापराशी संहार करणारे झाले.

आपस्तंबतीर्थ, शुक्लतीर्थ, विष्णुतीर्थ

आपस्तंबतीर्थ तीनही लोकांत विख्यात आहे. स्मरण करताच पापांचा नाश करणारे आहे. आपस्तंब नावाचे एक मुनी होते. ते परम बुद्धिमान व महायशस्वी होते. त्यांची धर्मपरायण व पतिव्रता स्त्री अक्षसूचा नावाची होती. कर्की नावाचा एक सुविख्यात असा पुत्रही त्यांना होता. तो मोठा विद्वान व तत्त्ववेत्ता होता. एके दिवशी त्यांच्या आश्रमात शिष्यांसह मुनिश्रेष्ठ अगस्त्य आले. योग्य तो आदरसत्कार करून आपस्तंब मुनी म्हणाले,

'मुनिवरा, तीन देवांत श्रेष्ठ कोण आहे ? पूज्य कोण आहे ? अनादी व अनंत कोण आहे ?'

'धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांच्या सिद्धीनं प्रमाण सांगितलं जातं. त्यातही वैदिक शब्द सर्वांत श्रेष्ठ आहे. वेदांच्या द्वारा ज्याचं यशोगान होतं तो परात्पर पुरुष परमात्मा आहे. जो मृत्यूच्या अधीन होतो तो अपर (क्षर) पुरुष व जो अमृत आहे तो पर (अक्षर) पुरुष जाणावा. ब्रह्मा, विष्णू, महेश हे तीन असूनही एकच आहेत. त्यांचे वेद्यतत्त्व एकच आहे. त्यालाच परब्रह्म म्हणतात. गुणकर्माच्या भेदांनुसार एकच अनेक रूपांनी अभिव्यक्त होतं. लोकांवर उपकार करण्यासाठी एकाच ब्रह्माची तीन रूपे होतात. या परमतत्त्वास जो जाणतो तो विद्वान. सुखस्वरूपी शिवापासून संपूर्ण सिद्धी प्राप्त होतात. दंडकारण्यात गौतमी नदीच्या तटावर जाऊन शिवांची आराधना करावी.'

अगस्त्यांचा हा उपदेश ऐकून आपस्तंब मुनी प्रसन्न झाला. त्याने गंगेत स्नान करून भगवान शंकराचे स्तवन केले. ते म्हणाले,

'जो काष्ठात अग्नी आहे, फुलांत सुगंध आहे, बीजात वृक्ष आहे, पत्थरात सुवर्ण आहे, संपूर्ण भूतांत आत्मा आहे, त्या भगवान सोमनाथास मी शरण आहे. त्यानं खेळता खेळताच या विश्वाची रचना केली. त्याचं स्मरण करताच देहधारी जीवाचं दारिद्र्य संपतं. त्या भगवान सोमनाथास मी शरण आलो आहे. ज्याच्या आज्ञेनं हे विचित्र, अचिंत्य, नाना प्रकारचं महान विश्व एकाच कार्यात संलग्न होऊन निरंतर चालतं त्या भगवान सोमनाथास मी शरण आहे. ऐश्वर्य, सर्वांचं आधिपत्य, कर्तृत्व, दातृत्व, महत्त्व, प्रीती, यश, सौख्य हे अनादी धर्म वाहणाऱ्या सोमनाथास मी शरण आहे. तोच शरण जाण्यास योग्य, सर्वांना पूजनीय, शरणागतांना प्रिय, नित्य कल्याणमय व सर्वस्वरूप आहे. त्या भगवान सोमनाथास मी पूर्णपणानं शरण आहे.'

या स्तुतीने भगवान शंकर प्रसन्न झाले व म्हणाले,

'मुने, एखादा वर मागावा.'

'माझं व दुसऱ्यांचं कल्याण व्हावं.'

भगवानांनी 'तथास्तु' म्हटले. तेव्हापासून हे तीर्थ आपस्तंबतीर्थ म्हणून प्रसिद्ध झाले. अनादी, अविद्यामय अंधकार राशीचे उन्मूलन करण्यास ते समर्थ आहे.

शुक्लतीर्थ माणसाची सर्व प्रकारची तृप्ती करून सिद्धी देणारे तीर्थ आहे. भरद्वाज नावाचा एक धर्मात्मा मुनी होता. त्याच्या पत्नीचे नाव पैठीनसी. पतिव्रताधर्माचे पालन करीत ती गौतमीच्या तटावर आपल्या पतीसह राहात होती. एके दिवशी मुनीने अग्नी व सोम या देवांसाठी, इंद्र व अग्नी यांच्याकरिता पुरोडाश (खीर) बनविला. पुरोडाश शिजत असतानाच धुरातून एक पुरुष प्रकट झाला. तीनही लोकांना भय वाटावे असे त्याचे रूप होते. त्याने पुरोडाश खाऊन टाकला. मुनीने क्रोधपूर्वक वाणीने विचारले,

'तू आहेस तरी कोण ? माझं यज्ञकर्म नष्ट का करतोस ?'

'माझं नाव हव्यघ्न अथवा यज्ञघ्न. मी संध्येचा पुत्र. प्राचीन बर्हिषचा ज्येष्ठ पुत्र मीच आहे. ब्रह्मदेवानं मला वर दिला आहे की, मी सुखानं यज्ञाचं भक्षण करावं. माझा धाकटा भाऊ कली हा पण अत्यंत

बलवान व भीषण आहे. मी, माझा पिता, माझी आई, माझा बंधू आम्ही सर्व काळे आहोत. मी कृतान्त बनून यज्ञाचा नाश करतो. यूपाचा छेद करून टाकतो.'

'पण तू माझ्या यज्ञाचं रक्षण करावंस. हा आमचा सनातन धर्म आहे. तू यज्ञाचा नाश करतोस हे मी जाणतो, पण तू माझ्या यज्ञाचं रक्षण करावंस–'

'भरद्वाज, संक्षेपानं तू माझी हकीगत ऐक. पूर्वी देव व दानव यांच्यासमक्ष ब्रह्मदेवांनी मला शाप दिला होता. तेव्हा मी लोकपितामह ब्रह्मदेवांची प्रार्थना केली. तेव्हा ते म्हणाले– 'जेव्हा एखादा श्रेष्ठ मुनी तुझ्यावर अमृताचा थेंब टाकील तेव्हा तू शापातून मुक्त होशील.' ब्रह्मन् आपण जर असं कराल तर मी आपली विनंती जरूर ऐकेन.'

'महामते, तू माझा सखा आहेस. या यज्ञाचं रक्षण कसं करू ते तू सांग. व देवांनी व दैत्यांनी मोठ्या कष्टानं समुद्राचं मंथन करून अमृत मिळविलं होतं. ते मला सुलभतेनं कसं मिळेल ? तुला काही उपाय माहीत आहे ?'

'गौतमी गंगेचं जल अमृत आहे. सुवर्णास अमृत म्हणतात. गायीचं तूपही अमृत असतं. सोमासही अमृत म्हणतात. या सर्वांचा मला अभिषेक कर. सर्वांत चांगलं अमृत आहे गंगेचं जल.'

भरद्वाज मुनीस फार संतोष झाला. त्याने मोठ्या आनंदाने गंगेचे जल हातात घेतले. त्याने त्या जलाने राक्षसास अभिषेक केला. तेव्हा तो महाबली राक्षस शुक्लवर्णाचा बनून प्रकट झाला. जो काळा होता तो क्षणार्धात गोरा बनला. या तीर्थास शुक्लतीर्थ असे नाव मिळाले.

श्रीविष्णुतीर्थाचा वृत्तान्तही ऐकण्यासारखा आहे. मुद्‌गलाचे पुत्र मौद्‌गल्य एक महान ऋषी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या पत्नीचे नाव जाबाला होते. ती उत्तम पुत्रांची जननी होती. मुद्‌गल ऋषींच्या पत्नीचे नाव भागीरथी होते. मौद्‌गल्य ऋषी प्रातःकालीच गंगेचे स्नान करीत. कुश, माती, शमीची फुले यांनी ते भगवानांची पूजा करीत. गुरूने सांगितल्याप्रमाणे ते आपल्या हृदयस्थ भगवान विष्णूला जागवीत. त्यांनी

आवाहन करताच शंख, चक्र, गदा, पद्म धारण करून लक्ष्मीपती जगन्नाथ गरुडावर आरोहण करून त्वरित त्यांच्यापुढे उपस्थित होत. मौद्गल्य ऋषींनी केलेले पूजन संपल्यावर त्यांना भगवान नाना प्रकारच्या चित्रविचित्र कथा ऐकवीत. कथा ऐकता ऐकता दुपारची वेळ होई. मग विष्णू म्हणत, 'बेटा, आता तू थकला आहेस. घरी जा.' मग मौद्गल्य घरी येत व आपल्या पत्नीस उपार्जित धन देत. मौद्गल्यांची पत्नी जावाला मोठी पतिव्रता होती. शाक, फल, मूल जे काही पती घरी आणीत ते ती नीट रांधून, शिजवून उत्तम पदार्थ करून पतीला वाढीत असे. त्यांचे भोजन झाले की, नंतर ती स्वत: भोजन करी. सर्वांची भोजने झाली की मौद्गल्यमुनी त्यांना श्रीविष्णूकडून ऐकलेल्या कथा ऐकवीत. अशा प्रकारे मुनींनी पत्नी, पुत्र, भाई, बांधव, मातापिता यांच्यासह उत्तम भोग भोगून अंतकाळी मोक्षाची प्राप्ती करून घेतली. तेव्हापासून या तीर्थास मौद्गल्यतीर्थ अथवा विष्णुतीर्थ अशी नावे मिळाली. येथे गौतमीच्या तटांवर अकरा हजार तीर्थे असून स्नान, दान, जप आदी करून सर्व पापांतून मुक्तता मिळते.

लक्ष्मीतीर्थ व भानुतीर्थ

विष्णुतीर्थानंतर लक्ष्मीतीर्थ येते. या तीर्थाच्या सेवनाने लक्ष्मीची वृद्धी होऊन दारिद्र्याचा नाश होतो. फार पूर्वीची हकीगत आहे. लक्ष्मी व दरिद्रा देवीत एक संवाद झाला. 'मी मोठी, मी मोठी' असे दोघी म्हणू लागल्या. लक्ष्मी म्हणाली, 'देहधारी माणसाचं कुल, शील, जीवन मीच. माझ्याशिवाय जीवंतही मृतासमान असतो.' दरिद्रा म्हणू लागली, 'मीच सर्वांपेक्षा मोठी. माझ्या अधीन सतत मुक्ती असते. जिथं मी तिथं काम, क्रोध, मद, लोभ, मत्सर हे दोष कधीच नसतात. भय, उन्माद, ईर्ष्या, उद्दण्डता यांचा अभाव असतो.' त्यावर लक्ष्मी म्हणाली, 'माझ्या-कडून अलंकृत झालेले सर्व प्राणी सन्मानित होतात. निर्धनाचा तर सर्वजण तिरस्कार करतात. 'मला काहीतरी द्या' असं वाक्य मुखातून येताच बुद्धी, श्री, लज्जा, शांती, कीर्ती या पाच देवता त्वरित निघून जातात. दुसऱ्याच्या समोर जोपर्यंत हात पसरला जात नाही तोपर्यंतच

गुण व गौरव यांची महत्ता. पुरुष एकदा याचक बनला की गुण कुठले ? गौरव कुठला ? प्राण्यासाठी सर्वांत निर्धनता ही अतिशय कष्ट-दायक बाब आहे. त्याला कुणी आदर दाखवीत नाही. कुणी त्याच्याशी भाषण करीत नाही. त्याला कुणी स्पर्शही करीत नाही. म्हणून दरिद्रे, मीच श्रेष्ठ आहे. चांगलं कान उघडून तू ऐक माझं. '

' लक्ष्मी, मीच मोठी आहे हे सांगायला तुला लाज नाही वाटत ? तू श्रेष्ठ पुरुषांना सोडून नेहमीच पापी पुरुषांत रमतेस. जो तुझ्यावर विश्वास ठेवतो त्याची तू वंचना करतेस. तू प्राप्त झालीस की माणसास वारंवार पश्चात्ताप करावा लागतो. त्याला तसं सुख कसं मिळणार ? लक्ष्मी, तू नेहमीच पापी लोकांत क्रीडा करतेस. मी मात्र नेहमी धर्मशील पुरुषांशी संबंध ठेवते. भगवान शिवाचे व विष्णूचे भक्त, कृतज्ञ, महात्मा, सदाचारी, शांत, गुरुसेवापरायण, साधू, विद्वान, शूरवीर, पवित्र बुद्धिमान अशा श्रेष्ठ पुरुषांत माझा निवास असतो. म्हणून मीच श्रेष्ठ. तेजस्वी ब्राह्मण, व्रतपरायण संन्यासी, निर्भय मनुष्य यांच्याबरोबर मी राहाते. तू कुठं राहतेस ? सांगू ? पापपरायण राजकर्मचारी, निष्ठुर, खल, चहाडखोर, लोभी, विकृतांग, अनार्य, कृतघ्न, धर्मघातकी, मित्रद्रोही, हृदयहीन माणसात तुझा निवास असतो. '

असे भांडता भांडता दोघीही ब्रह्मदेवांपाशी आल्या. त्यांचे म्हणणे ऐकून ब्रह्मदेवांनी सांगितले, ' पृथ्वी व आप म्हणजे जल या दोन देवी माझ्यापासूनच प्रकट झाल्या. स्त्री असल्यामुळं त्यांना तुमचा विवाद समजेल. त्यातूनही जी कमंडलूतून प्रकट झाली ती देवी सर्वश्रेष्ठ आहे. त्या नद्यांत श्रेष्ठ गौतमी आहे. तुम्ही तिला विचारावं. ' ब्रह्मदेवांचा हा सल्ला मानून त्या दोघी पृथ्वी व जल यांना घेऊन गौतमीदेवीच्या जवळ आल्या. भूदेवी, आपोदेवी यांनी गौतमीला लक्ष्मी व दरिद्रा यांच्यातील विवाद समजावून दिला. गंगेने दरिद्राला म्हटले,

' ब्रह्मश्री, तपःश्री, यज्ञश्री, कीर्ती, धनश्री, यशःश्री, विद्या, प्रज्ञा, सरस्वती, भोगश्री, मुक्ती, स्मृती, लज्जा, धृती, क्षमा, सिद्धी, तुष्टी, पुष्टी, शांती, जल, पृथ्वी, अहंशक्ती, औषधी, श्रुती, शुद्धी, रात्री, द्युलोक, ज्योत्स्ना, आशीः, स्वस्ती, व्याप्ती, माया, उषा, शिवा आदी या जगात

जे काही आहे ते सारं लक्ष्मीच्यामुळं आहे. ब्राह्मण, धीट, क्षमावान, साधू, विद्वान, भोगपरायण, मोक्षपरायण पुरुषांत जे जे रमणीय व सुंदर आहे तो सर्व लक्ष्मीचा विस्तार आहे. अधिक ऐकून काय लाभ ? सर्व जगच लक्ष्मीमय आहे. व्यक्तीत जे काही उत्कृष्ट दिसतं ते सारं लक्ष्मीमय असतं. लक्ष्मीनं शून्य असणारी वस्तूच नाही. दरिद्रे, तुला या सुंदर लक्ष्मीबरोबर स्पर्धा करताना लाज नाही वाटली ? चल जा. निघ इथून.'

या वेळेपासून गंगेचे पाणी दरिद्राचे शत्रू बनले. दरिद्राला आता कष्ट पडू लागले. त्या वेळेपासून लक्ष्मीतीर्थ अलक्ष्मीचे नाशक बनले. तेथे स्नान, दान केल्याने मनुष्य लक्ष्मीवान बनला. देव व ऋषिगण यांनी सेवन केलेली येथे सहा हजार तीर्थे असून ती सर्व सिद्धी देणारी आहेत.

यानंतर विख्यात असे भानुतीर्थ येते. याचा वृत्तान्त महापातकांचा नाश करणारा आहे. शर्याती नावाचा एक परम धर्मात्मा राजा होता. त्याच्या स्त्रीचे नाव स्थविष्ठा. ही राणी या भूतलावर अतिशय सुंदर होती. संयमी पुरुषांत श्रेष्ठ विश्वामित्रकुमार ब्रह्मर्षी मधुच्छंदा हे राजा शर्यातीचे पुरोहित होते. एकदा या पुरोहितांच्या बरोबर राजा शर्याती दिग्विजयासाठी निघाला. संपूर्ण दिशांवर विजय मिळवून परत येताना राजाच्या सेनेचा मुक्काम एके ठिकाणी असताना राजाने आपल्या पुरोहितास उदास असण्याचे कारण विचारले. तो म्हणाला,

'विप्रवर, आपण खिन्न का ? मी पृथ्वी जिंकली, मोठमोठ्या राजांचा पराभव केला, हा तर मोठ्या हर्षाचा समय. पण आपण याच वेळी असे दु:खी-कष्टी का दिसता ? खरं सांगाल ?'

'राजन्, जेव्हा एक प्रहर दिवस राहील तेव्हा आपण पुन्हा प्रवास करू. यात अर्धी रात्र जाईल. तिकडं या शरीराची स्वामिनी माझी प्रियतमा कामानं वशीभूत होऊन माझी वाट पाहाते आहे. तिचं स्मरण होऊन माझं शरीर सुकून जातं. कामजनित विकार उत्पन्न झाल्यामुळं ती कमलाप्रमाणे मुख असलेली माझी सुंदरी जिवंत तरी राहील ?'

यावर राजा थोडे हसून पुरोहितास म्हणाला,

'ब्रह्मन्, आपण माझे गुरू व मित्र आहात. पण आपण आज हे

'काय म्हणता ? संसाराचं सुख तर क्षणभंगुर आहे.'

'राजन्, जिथं पती, पत्नी परस्परास अनुकूल आहेत तिथंच धर्म, अर्थ, काम यांचा निवास असतो. पत्नीविषयी अनुराग हे दूषण नाही, भूषणच मानायला हवं.'

त्यानंतर राजा आपल्या विशाल सेनेसह आपल्या देशात आला. त्यानें आपल्या पत्नीच्या प्रेमाची परीक्षा पाहण्यासाठी नगरात एक संदेश पाठविला. तो असा– 'राजा शर्याती दिग्विजयासाठी गेला होता. तिथं एका राक्षसाकडून पुरोहितासह तो मारला गेला.' दूताकडून हा संदेश ऐकताच तो खरा की खोटा याचा तपास राणी करू लागली. पण मधुच्छंदाच्या पत्नीने मात्र त्वरित प्राण सोडून दिला. दूताने या मृत्यूची हकीगत राजास सांगितली. राणीने काय केले हेही सांगितले. यामुळे राजास आश्चर्य वाटले व दुःखही झाले. त्याने आपल्या दूतांना सांगितले, 'तुम्ही नगरात जावं आणि त्या ब्राह्मणीच्या शरीराचं रक्षण करावं व नगरात राजा आपल्या पुरोहितासह परत आला आहे असे सर्वत्र पसरवावं.'

राजा चिंतेने व्याकुळ बनलेला असतानाच आकाशवाणी झाली, 'राजन्, या पृथ्वीवर गौतमी गंगा सर्व प्रकारच्या संकटांचा नाश करणारी आहे. ती तुझा मनोरथ पूर्ण करील.' आकाशवाणी ऐकून शर्याती राजा गौतमीच्या तटावर आला. त्यानें ब्राह्मणांना धन दिले. पितर व द्विज यांना तृप्त केले. राजाने नंतर गंगा, सूर्य व देव यांना म्हटले,

'माझं दान, होम, प्रजापालन जर सत्याने असेल तर ती पतिव्रता ब्राह्मणी जिवंत व्हावी.' असे म्हणून राजाने अग्निप्रवेशाची तयारी केली. त्याने अग्नीत प्रवेश केला तेव्हा पुरोहिताची पत्नी जीवंत झाली. महाराजांनी आपल्या पत्नीसाठी जीवनाचा त्याग केला हे पुरोहित मधुच्छंदाला कळताच तोही कर्तव्यतत्पर झाला. त्यानेही आपल्या मित्राबरोबर अग्नीत प्रवेश करण्याची तयारी केली. प्रथम आपल्या पुण्याईने राजास जीवंत करू व मगच प्रिय पत्नीला भेटायला जाऊ अशी त्याच्या मनाची धारणा होती. मधुच्छंदाने सूर्याची स्तुती करून म्हटले, 'मुक्तिस्वरूप, अमित तेजस्वी सूर्यनारायणा, तुला नमस्कार असो. ओंकाराच्या

अर्थभूत छंदोमय देवा, तुला नमस्कार असो.' या स्तोत्राने सूर्यदेव प्रसन्न झाला. त्याने पुरोहितास म्हटले,

'कोणता तरी वर माग ना.'

'देवेश्वरा, या राजास जीवदान द्यावे.'

सूर्यदेवाने राजा शर्यातीस व ब्राह्मणीस जीवदान दिले.

या ठिकाणी तीन हजार पुण्यतीर्थ आहेत. याच स्थानास भानुतीर्थ, मृतसंजीवनतीर्थ, शर्याततीर्थ, माधुच्छन्दसतीर्थ इत्यादी नावे मिळाली.

खड्गतीर्थ व आत्रेयतीर्थ

गौतमीच्या उत्तरतटावर खड्गतीर्थ असून येथे स्नान, दान केल्याने मनुष्यास मोक्ष मिळतो. कवषाचा पुत्र पैलूष नावाचा एक विख्यात ब्राह्मण होता. कुटुंबाच्या भाराने विवश होऊन तो इकडे तिकडे भटकत होता. पण त्याला कोठूनही फारशी मदत मिळत नव्हती. त्याचे दैव विमुख बनले. पुरुषार्थ निष्फळ झाला. यामुळे पैलूषाला वैराग्य निर्माण झाले. तो मनात विचार करू लागला, 'ही तृष्णा मला बलपूर्वक पापाकडे खेचून नेत आहे. तृष्णे, तुला दुरूनच नमस्कार असो.' या तृष्णेचा नाश करण्यासाठी त्याने आपल्या पित्यास विचारले. पित्याने त्याला महादेवाची आराधना करण्यास सांगितले.

पैलूषाने ज्ञानप्राप्तीसाठी महेशाची आराधना केली. त्याला ज्ञानाची प्राप्ती झाल्यावर तो म्हणाला,

क्रोधस्तु प्रथमं शत्रुर्निष्कलो देहनाशनः ।
ज्ञानखड्गेन तं छित्वा परमं सुखमाप्नुयात् ॥
तृष्णा बहुविधा माया बन्धनी पापकारिणी ।
छित्त्वैतां ज्ञानखड्गेन सुखं तिष्टति मानवः ॥

'माणसाचा पहिला शत्रू क्रोध आहे, तो माणसाचं शरीर नाहीसं करतो. म्हणून ज्ञानरूपी खड्गानं त्याचा नाश करून परम आनंदाला प्राप्त करून घ्यावं. नाना प्रकारच्या तृष्णा बंधनांत घालणाऱ्या माहेत. त्या पापांस प्रवृत्त करतात. म्हणून ज्ञानरूपी खड्गानं त्यांचा नाश केल्यासच मनुष्य सुखानं राहतो. आसक्ती देवादिकांसाठी फार मोठा

अधर्म आहे. आत्मा असंग असल्यामुळे त्यास आसक्ती शत्रूप्रमाणे आहे. ज्ञानरूपी खड्गानं या आसक्तीचाही नाश करायला हवा. संशय महानाशाचं एक मोठं कारण आहे. धर्म व अर्थ यांचा तो नाश करतो. या संशयाचा नाश करून जीव परम अभीष्ट अशी सिद्धी प्राप्त करून घेतो. आशा-पिशाच्चाप्रमाणे शरीरात शिरून संपूर्ण सुखाला भस्म करून टाकते. पूर्ण आत्मबोधरूपी खड्गानं तिचा नाश करून जीवन्मुक्ती प्राप्त करून घ्यावी.'

ज्ञानाची प्राप्ती झाल्यानंतर पैलूष गंगातटावर राहू लागला. ज्ञानरूपी खड्गामुळे त्याचा मोह नष्ट झाला होता. त्याने मोक्ष प्राप्त करून घेतला. या स्थानास खड्गतीर्थ या नावाने महत्त्व आले. ज्ञानतीर्थ, कवषतीर्थ, पैलूषतीर्थ, सर्वकामदतीर्थ इत्यादी नावांनी प्रसिद्ध असलेल्या या स्थानावर सहा हजार तीर्थांचा निवास आहे.

यानंतर आत्रेयतीर्थ येते. अग्निन्द्रतीर्थ असेही याला नाव आहे. याच्या सेवनामुळे गेलेले राज्य परत मिळते. एकदा गौतमीच्या तटावर आत्रेय ऋषींनी अनेक ऋत्विज मुनींच्यासह एक सत्र सुरू केले. त्यात हव्यवाहन अग्नी होता. सत्र पुरे होताच महर्षींनी माहेश्वरी यष्टीचे अनुष्ठान केले. यामुळे त्यांना अणिमा आदी सिद्धी प्राप्त होऊन सर्वत्र येण्याजाण्याची शक्ती आली. इंद्रभवन, स्वर्गलोक, रसातल अशा ठिकाणी ते आपल्या तपस्येच्या प्रभावाने जाऊ लागले. एकदा ते इंद्रलोकात गेले होते. देवांनी घेरलेला इंद्र त्यांनी तेथे पाहिला. तेथे अप्सरांचे नृत्य चालले होते. सिद्ध व साध्यगण स्तुती करीत होते. ते सर्व पाहून महर्षी आपल्या आश्रमात परत आले.

त्यांच्या मनात आले, अनेक रत्नांनी भरलेली इंद्रपुरी कोठे आणि आपला हा श्रीहीन, सुवर्णरहित आश्रम कोठे ? असा विचार त्यांच्या मनात येऊन ते वैराग्यशाली बनले. देवांचे राज्य प्राप्त व्हावे अशी एक अभिलाषा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. त्यांनी आपल्या प्रियेस सांगितले,

'देवी, आता मी उत्तमांतील उत्तम फूल-मूल नाही खाणार. मला स्वर्गलोकीचं अमृत हवंय. परम पवित्र भक्ष्य भोज्य, श्रेष्ठ आसन,

स्तुती, दान, सुंदर सभा, अस्त्र-शस्त्र, मनोहर वस्त्र, अमरावतीपुरी, नंदनवन यांची आठवण मला फार होते.'

आपल्या तपस्येच्या प्रभावाने त्यांनी विश्वकर्म्यास बोलावून म्हटले, 'महात्मन्, मी इंद्रपदास जाऊ इच्छितो. आपण त्वरित इथं इंद्रपुरी निर्माण करावी. यात हयगय करू नये.'

आत्रेयांची आज्ञा मिळताच विश्वकर्म्यानें तात्काळ मेरुपर्वत, देवपुरी, कल्पवृक्ष, कल्पलता, कामधेनू, वज्र इत्यादींनी सुशोभित अशी सुंदर सभा तयार केली. सर्वांगसुंदर अशी एक शचीची आकृतीही त्याने बनविली. ती तर कामदेवाची विहारशाला भासत होती. क्षणभर ती सुधर्मा सभाच वाटली. मनोहर अप्सरा, उच्चैःश्रवा अश्व, ऐरावत हत्ती, वज्र आदी शस्त्र, संपूर्ण देवदेवता यांची निर्मिती झाली. पत्नीने मना केले तरी आत्रेय ऋषींनी शचीसमान असलेल्या त्या रूपवती स्त्रीला आपली भार्या बनविले. इंद्रपुरीप्रमाणे नृत्य, संगीत यांचे कार्यक्रम त्यांनी सुरू केले. स्वर्गलोकातील संपूर्ण सुख मिळाल्यामुळे आत्रेय ऋषींना फार सुख झाले.

परंतु स्वर्गसुख पृथ्वीवर अवतरले हे पाहून दैत्य व देव यांना फार वैषम्य वाटले. क्रोधाने त्यांनी, विशेषतः दैत्यांनी महर्षी आत्रेय यांच्या इंद्रपुरीस घेरा घातला. त्यांच्यावर मोठमोठ्या शस्त्रांचा मारा होत राहिला. भयभीत होऊन आत्रेय म्हणाले,

'मी इंद्र नाही. माझी ही पत्नी शची नाही. ही इंद्रपुरी नाही, की इथं इंद्राचं नंदनवनही नाही. वृत्रहन्ता, वज्रधारी, सहस्रलोचन इंद्र तर स्वर्गात आहे. मी तर एक वेदवेत्ता ब्राह्मण या गौतमीतटावर निवास करणारा आहे. दुर्दैवाच्या प्रेरणेनं मी हे कर्म केलं आणि मला यापासून वर्तमानकालात सुख मिळणार नाही की भविष्यातही नाही.'

'मुनिश्रेष्ठा, इंद्राचं हे अनुकरण सोडून द्यावं. येथील सारं वैभव संपवावं.'

'मी अग्नीची शपथ घेतो. आपण जसं सांगाल तसं मी करीन. विश्वकर्म्या, हे सारं वैभव संपवून तू या ब्राह्मणाचं रक्षण कर. माझा

आपला जुना आश्रम तेथील मृग, पक्षी, वृक्ष, जल यांच्यासहित परत दे. मला या भोगांची काहीच जरुरी नाही. शास्त्राची मर्यादा सोडून मिळालेली कोणतीही वस्तू सुखद होत नाही.'

आत्रेय मुनींच्या सांगण्यावरून प्रजापतीने त्या इंद्रपुरीचे सारे वैभव आवरून ठेवले. दैत्य आपल्या स्थानी निघून गेले. आत्रेय मुनी पुन्हा आपल्या पत्नीसह गौतमी तटावर नित्याप्रमाणे तपस्येत मग्न झाले. आपल्या यज्ञाकडे पाहून त्यांनी उद्‌गार काढले, 'मोहाचा महिमा पाहा कसा आहे! माझ्या चित्तास भ्रांती आली. मी इंद्रपदाचा लोभ धरला. किती चमत्कारिक हा मोह!'

त्यावर इतर ऋषिमुनी म्हणाले,

'महाबाहू, आता खंत सोडावी. आपली कीर्ती मोठीच वाढेल. जे लोक या आपल्या आत्रेय तीर्थात स्नान करतील त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण होऊन त्यांना इंद्रपुरीचं सौख्य लाभेल.'

परुष्णीतीर्थ, शंखतीर्थ इत्यादी

तीन लोकांत परुष्णीतीर्थ प्रसिद्ध असून पापनाशक म्हणून त्याची ख्याती आहे. एकदा महर्षी अत्रींनी ब्रह्मा, विष्णू, महेश यांची आराधना केली. हे तीन देव संतुष्ट झाले तेव्हा अत्री म्हणाले, 'आपण तिघांनी माझे पुत्र व्हावे. मला एक परम सुंदर कन्या व्हावी.' या वरदानानुसार अत्रींच्या घरी हे तीन देव पुत्ररूपाने आले. महर्षींच्या कन्येचे नाव आत्रेयी. अत्रींच्या तीन पुत्रांची नावे दत्त, सोम व दुर्वास अशी होती. अग्नीपासून अंगिराची निर्मिती झाली. महर्षी अत्रींनी आपल्या कन्येचा विवाह अंगिराशी लावून दिला. अंगिरात अग्नीच्या तीव्रतेचा प्रभाव होता. ते आत्रेयीशी नेहमीच कठोर भाषण करीत. आत्रेयी सतत पतीशी एकनिष्ठ असे. या आत्रेयीस महान बलवान पुत्र अंगिरस नावाचा झाला. अंगिरा आपल्या पत्नीस सतत कडवट शब्दांनी बोलत व अंगिरस आपल्या पित्यास शांत करी. एकदा आत्रेयी पतीच्या कठोर वचनांनी उद्‌विग्न झाली. दीन वृत्तीने ती आपल्या सासऱ्यास म्हणाली,

'भगवान अग्निदेवा, हव्यवाहा, मी अत्रींची कन्या. आपल्या

पुत्राची पत्नी. पती व पुत्र यांच्या सेवेत सदा असते. तरी पतिदेव मला फार कठोर बोलतात. व्यर्थ रोष करतात. सुरश्रेष्ठा, आपण पतिदेवांना समजवावं.'

'कल्याणी, तुझा पती अंगिराऋषी अंगारातून प्रकट झाला आहे. तो शांत राहील असंच वागणं बोलणं हवं. तुझा पती अंगिरा जेव्हा अग्नीत प्रवेश करील तेव्हा तू माझ्या आज्ञेनं जलरूप होऊन त्याला वाहून नेशील.'

'भगवन्, मी त्यांची कठोर वाणी सहन करीन. पण माझ्या स्वामींनी अग्नीत प्रवेश न करावा. स्वामींच्या विरुद्ध वागून पत्नीच्या जीवनात लाभ तो कोणता ? त्यांनी थोडं शांत व्हावं, मृदू बोलावं एवढंच मी म्हणत होते.'

'जलात, शरीरात, स्थावर जंगमरूप जगात सर्वत्र माझाच निवास असतो. मी त्या तुझ्या पतीत नित्य आहे. मी त्याचा पिताच आहे. मी जसा आहे तसा तोही आहे. हे सर्व जाणून तू चिंता सोडून दे. आणखी एक गोष्ट ध्यानात धर. जलास तू माता समज. व अग्नी हा तुझा श्वशुर. तू विषाद करणं सोडून दे.'

'भगवन्, आपण जलास माता समजता. मी आपल्या पुत्राची वधू. जलरूप धारण केलं की मी माता होईन. मग पत्नी म्हणून कशी राहू ?'

'स्त्री प्रथम पत्नी. स्वामीचं भरणपोषण करून भार्या बनते. पुत्राला जन्म देऊन ती जाया होते. आपल्या गुणांनी ती या प्रकारे कलत्र पण होते. भद्रे, तूही ही रूपं धारण करतेस. म्हणून माझ्या आज्ञेचं पालन कर. पुत्राच्या जन्मानंतर नारी पत्नी न राहाता जननी व माता बनते हे वैदिक तत्त्व ध्यानात ठेव.'

श्वशुरांच्या सांगण्यावरून अग्निरूपानें आलेल्या आपल्या पतीस आत्रेयीने जलरूप बनून वेढून टाकले. ते दोघे पति-पत्नी गंगाजलात न्हाले. लक्ष्मीबरोबर विष्णू, उमेबरोबर शंकर, रोहिणीबरोबर चंद्र, त्याप्रमाणे ते दोघे शोभू लागले. पतीला आप्लावित करून टाकणारी ही जलमय आत्रेयी आता पुरुष्णी नदीच्या नावाने विख्यात झाली. या

नदीत स्नान केल्यानें शंभर गोदान करण्याचे पुण्य लाभते. अंगिरस नावाच्या पुत्रांनी या गंगा व परुष्णीसंगमावर अनेक यज्ञ केले.

गंगेच्या उत्तर तटावर नारसिंह नावाचे एक तीर्थ आहे. पूर्वी हिरण्यकशिपू नावाचा एक दैत्य होता. त्याचा पुत्र भगवानांचा भक्त झाला. त्याचा द्वेष केल्यामुळे हिरण्यकशिपूचे अंतःकरण मलीन झाले होते. यावेळी भगवान सभामंडपाच्या एका खांबातून नरसिंहाच्या रूपाने प्रकट झाले. त्यांनी दैत्याचा वध केला. भगवान नरसिंहांनी सर्व दैत्यांचा नाश केला. त्यांची नखे वज्रापेक्षा कठोर होती. गर्दन व मुख यांवर मोठमोठे केस होते. त्यांची गर्जना ऐकून दैत्यपत्नींचे गर्भ गळून पडत. सर्व दैत्यांचा विनाश करून भगवान नरसिंह गौतमीच्या तटावर आले. तेथे दंडकारण्याचा स्वामी आंबर्य्य नावाचा एक दैत्य राहात होता. देवांनाही तो दुर्जय असून त्याची सेना फार मोठी होती. भगवान नरसिंहांनी त्याच्याशी घनघोर युद्ध केले. गोदावरीच्या उत्तर तटावर शत्रूंचा संहार नरसिंहांनी केला. हे स्थान नारसिंहतीर्थ या नावाने विख्यात झाले.

गंगेच्या उत्तर तटावर पैशाचनाशनतीर्थ आहे. फार पूर्वी एक ब्राह्मण पिशाच्चयोनीतून मुक्त झाला होता. सुयज्ञाचा पुत्र अजीगर्ती एक विख्यात ब्राह्मण होता. एकदा दुष्काळ पडला. कुटुंबाचे पालन करणे अवघड झाले. तेव्हा ब्राह्मणाने आपला मधला पुत्र शुनःशेप क्षत्रियांना वधासाठी विकला! अजीगर्तीस खूपसे धन मिळाले. शुनःशेप ब्रह्मवेत्ता होता. पण आपत्ती आल्यामुळे अजीगर्तीस हे कृत्य करावे लागले. मृत्यूनंतर तो नरकात गेला. अनेक पापयोनींत हिंडून अजीगर्ती भयंकर आकाराचे पिशाच्च बनला. निर्जल व निर्जन वनात तो भटकत राही. एके दिवशी त्याचा पुत्र शुनःशेप त्याच मार्गाने चालला होता. त्यानें रडणाऱ्या एका पिशाचाची कातर वाणी ऐकली. त्याने शोध घेऊन विचारले,

'आपण कोण आहात? असं रडता कशासाठी?'

'मी शुनःशेपाचा पिता आहे. मोठ्या पापकर्मामुळं मी या प्रेतयोनीत पडलो आहे.

पिशाचाची ही वाणी ऐकून शुनःशेपास भारी दुःख झाले. तो म्हणाला,

'पिताजी, मीच आपला पुत्र शुनःशेप. माझ्यामुळं काय ही आपली अवस्था ? मी आता आपणास स्वर्गात पोचवितो.'

त्याने गंगेची प्रार्थना केली. तो गंगेच्या तीरावर आला. तेथे स्नान करून त्याने विष्णू व शिव यांचे चिंतन केले. प्रेतरूपी दुःखी पित्यास त्याने जल दिले. तेव्हा अजीगर्तीस दिव्य शरीर प्राप्त झाले. विमानात बसून तो वैकुंठलोकास गेला. स्मरण करताच मनोकामना पूर्ण करणारे हे स्थान पैशाचनाशनतीर्थ या नावाने प्रसिद्ध झाले. भोग व मोक्ष देणारी तीनशे तीर्थे येथे आहेत.

सर्व पापांचा नाश करणारे निम्नभेद नावाचे एक तीर्थ गंगेच्या उत्तर तटावर आहे. या वेदद्वीपाच्या दर्शनाने मनुष्य वेदतज्ज्ञ बनतो. परम धर्मात्मा राजा पुरूरव्याने एकदा उर्वशी नावाच्या अप्सरेची कामना केली. उर्वशी राजापाशी येऊन पोचली. तिने राजास एक अट घातली की, राजास जोपर्यंत ती नग्न पाहणार नाही तोपर्यंतच ती त्याच्या-जवळ राहील. ही अट स्वीकारून राजाने त्या सुंदर अप्सरेचा स्वीकार केला. पलंगावर ती एकदा झोपली असताना राजा पुरूरवा जागा झाला. त्यावेळी राजास नग्न असलेला तिने पाहिले. तेव्हा ती निघून गेली. राजास फारच दुःख झाले. त्याचे अग्निहोत्र संपले, त्याचे भोजन कमी झाले. तो कोणाशी बोलेना, कोणाकडे पाहीना. मृताप्रमाणे तो निर्विकार बनला. त्याच्या पुरोहितांनी त्याला नीट समजावून सांगताना म्हटले,

' राजन्, आपण तर बुद्धिमान आहात. तुम्हांस हे माहीत नाही की स्त्रियांचं हृदय लांडग्याप्रमाणे कठोर असतं ! आपण शोक करू नये,

को नाम लोके राजेन्द्र कामिनीभिर्न वंचितः ।
वंचकत्वं नृशंसत्वं चंचलत्वं कुशीलता ॥
इति स्वाभाविकं यासां ताः कथं सुखहेतवः ।
कालेन को न निहतः कोऽर्थी गौरवमागतः ॥
श्रिया न भ्रामितः को वा योषिद्‌भिः को न खंडितः ॥

'महाराज, जो कामिनी स्त्रियांकडून फसविला गेला नाही असा या जगात कोणता पुरुष आहे ? वंचना, क्रूरता, चंचलता व दुश्चरित्रता हे तर स्त्रियांचे स्वाभाविक दुर्गुण आहेत. ते सुखदायिनी होतील तरी कसे ? कालानं कुणाला मारलं नाही ? याचक बनून कुणाचा गौरव झाला ? धनसंपत्तीनं कुणाचं मन भ्रान्त बनलं नाही ? युवती स्त्रियांनी कुणास धोका दिला नाही ? राजा, ज्याचं हृदय मदानं उन्मत्त बनलं आहे त्या युवती स्वप्न व माया यांच्याप्रमाणे मिथ्याच आहेत. महामते, आपण भगवान शंकर, विष्णू, गोदावरी नदी यांचा आश्रय घ्यावा.'

पुरोहितांची वचने ऐकून राजाने यत्नपूर्वक आपले दुःख कमी केले. त्याने गोदावरीच्या मध्यभागी राहून भगवान शिव, विष्णू, ब्रह्मदेव, सूर्य, गंगा व इतर देव यांची आराधना केली. जगातील विषयांवरून त्याचे मन उपासनेत दृढ झाले. त्याने ऋत्विजांची मदत घेऊन अनेक यज्ञांचे अनुष्ठान केले. तेव्हापासून हे स्थान वेदद्वीप वा यज्ञद्वीप या नावांनी ओळखले जाऊ लागले. पौर्णिमेच्या रात्री येथे उर्वशी येत असते. यासच ऐलतीर्थ, पुरूरवातीर्थ, वसिष्ठतीर्थ, निम्नभेदतीर्थ अशी नावे आहेत. राजा पुरूरवा कोणत्याही कार्यात काही निम्नता (न्यूनता) राहू देत नसे. त्याचे एकही कार्य निम्न श्रेणीचे झाले नाही. म्हणून या स्थानास निम्नभेदतीर्थ असे म्हणतात.

त्याच्यापुढे शंखहृद नावाचे एक तीर्थ आहे. येथे शंख व गदाधारी विष्णू यांचा निवास आहे. पूर्वी सत्ययुगाच्या आरंभी अनेक रूपधारी राक्षस निर्माण झाले. हे राक्षस सामवेदाचे गायन करीत. भगवान विष्णूंनी आपल्या चक्राने या राक्षसांचा नाश केला व अत्यंत हर्षभराने त्यांनी शंख वाजविला. तेव्हा उरलेले सर्व राक्षस नष्ट झाले. ते हे शंखतीर्थ. याचे स्मरण होताच सर्व मंगलदायक वस्तूंची, आरोग्याची, पुत्रांची वृद्धी होते.

किष्किधातीर्थ, व्यासतीर्थ

मनुष्याच्या सर्व कामना पूर्ण करणारे, सर्व पापांचा नाश करणारे प्रसिद्ध तीर्थ म्हणजे किष्किधातीर्थ. येथे भगवान शिवांचा निवास आहे. पूर्वी दशरथनंदन श्रीरामाने किष्किधानिवासी वानरांचे साह्य घेऊन

रावणास मारले व सीतेस परत मिळविले. कुबेराच्या पुष्पक विमानातून रामचंद्र अयोध्येस येत असताना त्यांना मार्गात लोकपावनी गौतमी गंगा दृष्टीस पडली. तिच्या दर्शनासाठी रामचंद्र गंगेच्या किनाऱ्यावर उतरले, हनुमानासह सर्व वानरांना उद्देशून ते हर्षगद्‌गद वाणीने म्हणाले,

'ही गौतमी गंगा सर्व जीवांची जननी आहे. ही भोग देते, मोक्षही देते. भयंकर पापांचा ही संहार करते. सर्व जगतात ही पवित्र नदी आहे. सर्व सरितांचं दर्शन आज या गंगेमुळं झालं.'

रामचंद्रांचे हे भाषण ऐकून सर्व वानरांनी गंगेत स्नान करून मनोभावे तिचे पूजन केले. रामचंद्रांनी भगवान महादेवांचे पूजन केले. सर्व वानर प्रसन्न होऊन नृत्य करू लागले. वानर व पत्नी जानकी यांच्यासह भगवान रामचंद्रांनी तेथे एक रात्र काढली. सकाळी उठून त्यांनी गोदावरीची स्तुती केली. सेवक लोकांचा त्यांनी सन्मान केला. निर्मल प्रभातीचा सूर्योदय पाहून बिभीषण म्हणाला,

'भगवन्, या तीर्थात राहून आमचं समाधान पूर्णत्वानं झालेलं नाही. आणखी काही काळ इथं राहावं असं वाटतं. आणखी चार रात्री आपण इथं राहू.'

या बेतास सर्व वानरांनी संमती दिली. भगवान शिवाची पूजा करून रामचंद्र गौतमीतटावर चार रात्री राहिले. येथील महादेव सिद्धेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे. त्याच्याच प्रभावाने रावण अत्यंत प्रबल झाला होता. याच शिवापुढे रामचंद्रांनी सर्व सहकाऱ्यांसह मस्तक झुकविले. किष्किंधानिवासी सर्व वानरांनी या शिवाची आराधना केली म्हणून हे स्थान किष्किंधातीर्थ या नावाने प्रसिद्ध झाले. 'माते गौतमी, माझ्यावर प्रसन्न हो.' अशी प्रार्थना सर्वांनी केली.

त्यानंतर व्यासतीर्थ, प्राचेतसतीर्थ येतात. या जगताची निर्मिती करण्यासाठी ब्रह्मदेवांनी दहा मानसपुत्र तयार केले. या पृथ्वीचा अंत कोठे आहे याचा शोध घेण्यासाठी ते दहा पुत्र निघून गेले. ब्रह्मदेवांनी पुन्हा पुत्र निर्माण केले. आपल्या बंधूंचा शोध घेण्यासाठी तेही निघून गेले. याच वेळी परम बुद्धिमान असे आंगिरस नावाचे एक तत्त्व

जाणणारे, सर्व शास्त्रांत प्रवीण असे ऋषी होते. त्यांनी आपल्या मातेस न विचारता तपस्या करण्याचा प्रयत्न केला म्हणून मातेने शाप दिला, 'माझी अवहेलना करून तपस्या करणाऱ्या माझ्या पुत्रांना कधीच फल प्राप्त होणार नाही.'

आंगिरसाच्या तपस्येस फल मिळाले नाही. सर्वत्र त्यांनी संचार केला. पण जेथे तेथे त्यांना अडचणी आल्या. राक्षस, मनुष्य, युवती यांच्या अडचणींना वैतागून आंगिरसांनी अगस्त्य मुनींना विचारले,

'भगवन्, आमची तपस्या सिद्ध का होत नाही ? आपण ज्ञानी आहात.'

'आपण शांतचित्त महात्मा आहात. ब्रह्मदेवानं आपणांस प्रजापती बनवलं. आजपर्यंत आपली तपस्या पूर्ण झाली नाही याचं कारण शोधलं पाहिजे. आपण येथून गौतमीतटावर जावं. शिववल्लभा गंगा आपले मनोरथ पूर्ण करील. ब्रह्मदेवांनी जे पहिले मानसपुत्र निर्माण केले ते तर निघून गेले. जे त्यांच्या शोधासाठी गेले ते आपण आंगिरस आहात.'

'भगवन्, ज्ञानद कुणास म्हणतात ? ब्रह्मा, विष्णू, महेश, आदित्य, चंद्रमा, अग्नी, वरुण यांत ज्ञानद कोण आहे ?'

'ज्ञानद कोण आहे ते सांगतो. जे जल तेच अग्नी. जो अग्नी तोच सूर्य आहे. जो सूर्य तोच विष्णू. जो विष्णू तोच सूर्य. जो ब्रह्मा तोच रुद्र. जो रुद्र आहे तोच सर्व काही. असं एकाच्या सर्वतारूपाचं ज्ञान ज्याला झालं तो ज्ञानद.'

मुनींचे हे भाषण ऐकून आंगिरसऋषी तेथून निघाले. पाच उत्तर-गंगा तटावर व पाच दक्षिण तटावर आले. अगस्त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी आराधना केली. सर्व देव त्यांच्यावर प्रसन्न झाले. देव त्यांना म्हणाले, 'तुम्हा सर्वांना जगत्स्रष्टयांची पदं मिळतील.' यानुसार ते सर्व ऋषी प्रजापती झाले. अधर्म वाढेल, वेदांचा पराभव होईल, तेव्हा वेदांचा उद्धार करण्यासाठी तेच भावी व्यास बनतील. हे आंगिरस धर्मव्यास व वेदव्यास या नावांनी प्रसिद्ध झाले. त्यांचे स्थान व्यासतीर्थ म्हणून प्रसिद्ध झाले. या तीर्थात स्नान केल्याने पापरूपी चिखल धुऊन जातो. मोहाचा अंधार दूर होतो. मदाचा नाश होतो. मनुष्यास सर्व

प्रकारच्या सिद्धी मिळतात.

कुशतर्पण, प्रणीता संगमतीर्थ

कुशतर्पण व प्रणीतासंगम ही दोन तीर्थे भोग व मोक्ष देणारी असून सर्व लोकांत प्रसिद्ध आहेत. विंध्य पर्वताच्या दक्षिणेस सह्य नावाचा एक महान पर्वत आहे. त्याच्याच शाखापर्वतांतून गोदावरी, भीमरथी या नद्या उगम पावल्या आहेत. येथेच विरजतीर्थ, एकवीरा नदी इत्यादी आहेत. या सह्याद्रीच्या प्रदेशात जो वृत्तान्त घडला तो गोपनीय असून ब्रह्मदेवांनी तो प्रकट केला.

जो अव्यक्त अक्षर परमात्मा आहे तोच परम पुरुष आहे. तोच प्रथम निराकारातून साकाररूपात आला. त्याच्यापासून जलाची उत्पत्ती झाली. जलापासून पुरुष. पुन्हा जलापासून व पुरुषापासून कमल प्रकट झाले. कमलापासून ब्रह्मदेव. पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश ही पाच तत्त्वे ब्रह्मदेवापासून झाली. त्यावेळी वेद प्रकट झाले नव्हते. ब्रह्मदेवही मौनच होते. 'ब्रह्मन्, तुम्ही स्थावर, जंगम जगाची निर्मिती करावी' अशी आकाशवाणी झाली. ब्रह्मदेव म्हणाले,

'सृष्टी कशी करू ? कुठं करू ? कोणत्या साधनांनी करू ?'

'यज्ञ करा. तुम्हांस शक्ती येईल.' आकाशवाणी झाली.

'यज्ञ कुठं करू ? कसा करू ?'

'कर्मभूमीत यज्ञेश्वर यज्ञपुरुषाचं यजन करावं. यज्ञ, स्वाहा, स्वधा, मंत्र, ब्राह्मण, हविष्य हे सर्व श्रीहरीच समजावं.'

त्यावेळी भागीरथी, नर्मदा, यमुना, तापी, सरस्वती, गौतमी, समुद्र, नद, सरोवर आणि इतर नद्या यांपैकी काहीच नव्हते. ब्रह्मदेवांनी विचारले,

'कर्मभूमी कुठं आहे ?'

'मेरूगिरीच्या दक्षिणेस हिमालय, विंध्य, सह्य पर्वत आहेत. त्यांच्या दक्षिणेस कर्मभूमी आहे.' आकाशवाणीने सांगितले.

ब्रह्मदेव सह्यगिरीच्या आसपास आले. ते म्हणाले,

'कुठं मुक्काम करू ?'

'इथं यावं. इथंच वसून यज्ञ करावा. संकल्प करताच वेद प्रकट होतील. मग ते जे सांगतील ते करावं.' आकाशवाणीनें सांगितले.

त्यानंतर इतिहास, पुराण, अन्य शास्त्रे, वेदार्थ यांचे ज्ञान ब्रह्मदेवांना झाले. लोकविख्यात पुरुषसूक्ताचे स्मरण झाले. वेदोक्त पद्धतीने यज्ञाची सुरुवात झाली. तेच स्थान ब्रह्मगिरी म्हणून प्रसिद्ध झाले. पत्नी-शिवाय यज्ञ पूर्ण कसा होणार ? म्हणून ब्रह्मदेवांनी आपल्या अंगाच्या पूर्वार्धापासून पत्नी प्रकट केली. यज्ञातही सहधर्मिणी बनली. पत्नी अशी अर्धांग झाली. वसंतऋतूपासून उत्तम तूप मिळविले. ग्रीष्मापासून इंधन आणले. शरद्ऋतूपासून हविष्य आणले. वर्षापासून कुश प्राप्त करून घेतले. समिधा, पात्र, कुश यांची जमवाजमव झाली. अनादी अनंत काल यूपरूप झाला. पशू बांधण्यासाठी सत्त्वादी गुणांची दोरी तयार झाली. आता पशू कोठून आणायचा ? ब्रह्मदेवांनी पुरुषसूक्त म्हटले. परम-पुरुषालाच पशू केले. त्याला प्रोक्षित केले. या पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, हातांपासून क्षत्रिय, मुखापासून इंद्र व अग्नी, प्राणापासून वायू, कानांपासून दिशा, मस्तकापासून स्वर्गलोक यांची निर्मिती झाली. मना-पासून चंद्रमा, नेत्रांपासून सूर्य, नाभीपासून अंतरिक्ष, दोन मांड्यांपासून वैश्य व चरणांपासून शूद्र असा सृष्टीचा आविर्भाव झाला. रोमकूपांपासून ऋषी व केसांपासून औषधी वनस्पती, नखांपासून ग्रामीण व जंगली पशू, पायू (गुद) व उपस्थ (जननेंद्रिय) यांच्यापासून कृमी, कीटक, पतंग यांची निर्मिती झाली.

अशी सृष्टी तयार झाली तेव्हा ब्रह्मदेवांनी क्रमशः गार्हपत्य, दक्षिणाग्नी, आह्वनीय अग्नी यांच्यात हवन केले. भगवान विष्णूंचे नित्य स्तवन-पूजन झाले. या समयी यज्ञात प्रणीतापात्राचे संपादन झाले. प्रणीताचे जल प्रणीता नदीच्या रूपाने वाहू लागले. कुशांनी मार्जन करून ते प्रणीता नदीत फेकले गेले. मार्जन करताना प्रणीतेचे थेंब इकडेतिकडे गेले. त्यांची गुणवान तीर्थे झाली. संमार्जनानंतर जेथे जमिनीवर कुश सांडले होते ते स्थान कुशतर्पण नावाने प्रसिद्ध झाले. जेथे यूप होता तेथे विष्णूचे स्थान अक्षयवटाच्या रूपात परिणत झाले. ब्रह्मदेवांचे हे यजनस्थान चोवीस योजनांचे आहे. यज्ञेश्वर स्वरूप अशी तीन कुंडे तेथे

आहेत. प्रणीतासंगम, कुशतर्पणतीर्थ येथे स्नान व दान करणारे परमपदास जाऊन पोचतात. कुशतर्पणतीर्थ काशीहूनही श्रेष्ठ आहे. त्याच्या स्मरणानेच ब्रह्महत्येसारखी पापे नष्ट होतात.

सारस्वत व चिञ्चिकतीर्थ

सर्व अभीष्ट वस्तूंची प्राप्ती व मोक्ष यांचा लाभ करून देणारे सारस्वततीर्थ असून ते सर्व पापांचा, रोगांचा नाश करून सर्व सिद्धी देणारे आहे. पुष्पोत्कटाच्या पूर्वेस व गौतमीच्या दक्षिण तटावर शुभ्रगिरी नावाचा एक विश्वविख्यात पर्वत आहे. या पर्वतावर शाकल्य नावाचा एक थोर निष्ठावान मुनी तपस्या करीत होता. त्याला रोज सर्व भूतगण प्रणाम करीत. त्याचे स्तवन करीत. याच पर्वतावर देव व ब्राह्मण यांना सतावणारा परशू नावाचा एक राक्षस यज्ञाचा द्वेष करी. ब्राह्मणांची हत्या करी. इच्छेनुसार अनेक रूपे धारण करून तो वनांतून हिंडत असे. विद्वान ब्राह्मण शाकल्य जेथे तपस्या करीत होता तेथेही हा राक्षस येत असे. विप्रवर शाकल्य मोठे तेजस्वी होते. त्यामुळे पापाचारी परशू अयशस्वी होत गेला.

एके दिवशी द्विजश्रेष्ठ शाकल्य देवांची पूजा करून भोजन करण्यासाठी आश्रमात आला. याच वेळी परशूने ब्राह्मणरूप धारण करून, कोणा एका कन्येस हाती धरून तेथे येणे केले. त्याचे शरीर शिथिल झाले होते. डोक्याचे केस पिकून गेले होते. अत्यंत दुर्बल दिसणारा तो शाकल्यास म्हणाला,

'ब्रह्मन्, मला व माझ्या या कन्येला भोजन देणार ? अतिथीची अभिलाषा जे पूर्ण करतात ते धन्य होत. अतिथीला अन्नदान करणं म्हणजे पृथ्वीचं दान देण्यासारखं आहे.'

'मी तुम्हांस भोजन देईन.'

शाकल्याने त्याला आसनावर बसविले. पूजा करून त्याला अन्नही वाढले. परशूने हातात आचमनासाठी पाणी घेऊन म्हटले,

'थकलेल्या अतिथीच्या मागे कधी देवही येतात. अतिथी तृप्त झाला की ते देवही संतुष्ट होतात. अतिथी अतृप्त राहिला की तेही

अतृप्त राहातात. यासाठी मी एक थकलेला, भागलेला अतिथी आपणांस काही मागू इच्छितो. आपण मला अभीष्ट वस्तू दिली तरच मी भोजन करीन, नाही तर नाही.'

'तुला मी दिलं असं समज. निश्चित मनानं भोजन कर.'

'मुने, मी केस पिकलेला एक दुर्बल ब्राह्मण नाही. मी तुझा शत्रू आहे. तुला मारून खाण्यासाठी मी कित्येक वर्षं वाट पाहत होतो. आता मी तुझ्या अनुचरांसह तुला घेऊन जाईन व आपला आहार बनवीन.'

'जो उत्तम कुलात उत्पन्न झाला आहे, ज्याला संपूर्ण शास्त्रांचं ज्ञान आहे, त्याची प्रतिज्ञा खोटी ठरत नाही. म्हणून मित्रा, तुला जसं उचित वाटेल तसं तू कर. पण त्यापूर्वी माझं एक सांगणं ऐक. एक गोष्ट ध्यानात धर की मी ब्राह्मण आहे. माझं शरीर वज्राप्रमाणे कठोर असून भगवान श्रीहरी माझं रक्षण सर्व बाजूंनी करतात. भगवान विष्णू माझ्या पायांचं, देव जनार्दन माझ्या मस्तकाचं, भगवान वराह माझ्या भुजांचं, कूर्म पृष्ठभागाचं, श्रीकृष्ण हृदयाचं, नृसिंह अंगुलींचं, वाणीचा अधीश्वर मुखाचं, गरुडवाहन नेत्रांचं, धनेश दोनही कानांचं, असं माझं सगळ्यांकडून रक्षण होत असतं. राक्षसराज, आता तुझी इच्छा असेल तर मला इथून घेऊन जा. अथवा तू इथून निघून जा.'

इतके शाकल्याने सांगितले तरी तो राक्षस त्याला खाण्यासाठी उत्सुक बनला. पापी माणसाच्या हृदयात दयेचा एक कणही नसतो हेच खरे. मोठमोठ्या दाढा व विकराल मुख यांनी युक्त असलेला तो राक्षस शाकल्याजवळ गेला. त्याला पाहून तो म्हणाला,

'विप्रवर, शंख, चक्र, गदा हातात असलेला तू दिसतोस. तुला सहस्र चरण, सहस्र मस्तके, सहस्र नेत्र, सहस्र हात दिसतात. तू तर सर्वव्यापी दिसतोस. तुझं रूप मला छंदोमय दिसतंय. तुझं पहिलं शरीर आज मला इथं दिसत नाही. मी आज तुला प्रार्थना करतो. मी तुला शरण आलो आहे. महामते, मला क्षमा कर. माझ्या पापाचा नाश होईल असं एखादं तीर्थ मला सांग.'

'दैत्यराज, तुला लवकरच सरस्वतीचं वरदान प्राप्त होईल. तुला

भगवंतांचं स्तवन करण्याची शक्ती येईल. तू भगवान जनार्दनाची स्तुती करशील-'

परशू यानंतर गौतमीच्या तटावर आला. त्याने गंगेचे स्नान केले. त्याने समोर पाहिलं. समोर साक्षात देवी सरस्वती उभी होती. जगन्माता, भुवनेश्वरीचे दर्शन होताच परशूने नम्रत्वाने म्हटले,

'देवी, माझ्या गुरूनं, शाकल्यानं सांगितलं आहे की मी लक्ष्मीकान्त गरुडध्वजाची स्तुती करावी. आपण मला प्रसाद द्यावा.'

'तथास्तु.'

देवी सरस्वतीच्या कृपेनें प्रभावित होऊन परशूने भगवान जनार्दनांची स्तुती केली. भगवान संतुष्ट होऊन म्हणाले, 'तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील.'

तेव्हापासून या तीर्थास सारस्वततीर्थं असे नाव मिळाले. येथे स्नान व दान करून मनुष्य श्रीविष्णुलोकात जातो. शाकल्य मुनी गौतमीगंगा, सरस्वतीदेवी, यांचे स्मरण करणारा मोक्षास जातो.

सर्व रोगांचा नाश करणारे, सर्व चिंता निवारण करणारे चिच्चिक नावाचे एक तीर्थ गौतमीतटावर आहे. शुभ्रगिरीवरच जेथे गौतमीच्या उत्तर तटावर भगवान गदाधर विराजमान आहे तेथेच पक्षिराज चिच्चिक राहत होता. त्याला भेरूंड असेही नाव होते. तो मांसाहारी पक्षी त्या पर्वतावर सुखाने राहात होता. नाना प्रकारची फुले, फळे यांनी समृद्ध असणारे वृक्ष भोवती होते. श्रेष्ठ ब्राह्मणही तेथे निवासास होते.

एके दिवशी पूर्वदेशाचा राजा पवमान मोठी सेना घेऊन त्या वनात आला. तो राजा क्षत्रियधर्मपरायण, श्रीसंपन्न, देवब्राह्मणांचा रक्षणकर्ता असून त्याच्याबरोबर त्याचा पुरोहितही होता. वनात फिरता फिरता तो एका वृक्षापाशी आला. वृक्ष गौतमीच्या तटावर असून त्यावर पुष्कळ पक्ष्यांचा निवास होता. तेथे राजाने दोन तोंडांचा चिच्चिक पक्षी पाहिला. तो स्थूलकाय असून सुंदर होता. त्याला चिंतामग्न पाहून राजाने विचारले,

'दोन मुखांच्या पक्ष्याच्या रूपात तू कोण आहेत ? असा चिंता-

मग्न का ? इथं तर कोणतंच संकट वा दुःख नाही दिसत. मग तुला कष्ट कसले ?'

'राजन्,' दीर्घ श्वास घेऊन पक्षी म्हणाला,

'राजन्, मला तर कुणा दुसऱ्याचे भय नाही व माझ्याकडूनही दुसऱ्यास भय वाटण्याचे कारण नाही. हा पर्वत फुलं व फळं यांनी संपन्न आहे. इथं ऋषिमुनींचा निवास आहे. पण हा पर्वत मला शून्यसा वाटतो. मी माझ्यासाठीच शोक करतो. मला मात्र इथं कोणतंच सुख नाही की माझी कधी तृप्ती होत नाही. इतकंच नाही तर मी निद्रा, विश्राम व शांती यांच्यापासून वंचित आहे.'

'पण तू आहेस कोण ? तू कोणतं पाप केलंस ? तुला हा पर्वत सुनासुना तरी का वाटतो ? इथं राहणारे सर्व प्राणी तृप्त आहेत. तुला तर दोन मुखं आहेत. मग तृप्ती का नाही ? या जन्मात वा पूर्वजन्मात असं कोणतं पाप घडलं ? मी तुला तुझ्या भयापासून वाचवीन.'

पुन्हा एक लांब श्वास घेऊन चिञ्चिक म्हणाला,

'महाराज, मी आपणांस माझा पूर्वजन्मीचा वृत्तान्त सांगतो. पूर्वजन्मी मी वेदवेदांगांत पारंगत असा ब्राह्मण होतो. उत्तम कुलात माझा जन्म होता. एक थोर पंडित म्हणून माझी कीर्ती होती. पण मी सर्व कार्यं बिघडवून टाकणारा व कलहप्रिय होतो. मी कृतघ्न, असत्यवादी, परनिंदाकुशल, मित्रद्रोही, स्वामिद्रोही, गुरुद्रोही, दंभाचारी व अत्यंत निर्दय होतो. मन, वाणी व क्रिया यांनी मी पुष्कळांना कष्ट दिले. दुसऱ्याची हिंसा करण्यात मला आनंद वाटे. स्त्री-पुरुषांत फूट पाडणे, समूहाचा नाश करणे, मर्यादा सोडणे, यांत मला संतोष वाटायचा. यासाठी मला ही दोन मुखं प्राप्त झाली. मला हे असं पक्ष्याचं रूप घ्यावं लागलं.'

'तुला कोणत्या कर्मानं मुक्ती मिळेल ?'

'गौतमीच्या उत्तर तटावर गदाधर नावाचं एक तीर्थ आहे. तिथं मला घेऊन चल. ते तीर्थ अतिशय पवित्र व सर्व पापांचा नाश करणारं आहे.'

पक्ष्याची विनंती ऐकून पवमान राजाने त्याला उचलून घेतले व

तो गौतमीच्या तटावर आला. त्याला भगवान गदाधराचे दर्शन करविले. चिच्चिकाने स्नान करून त्रैलोक्यपावनी गंगेस म्हटलं, 'माता गौतमी, मी सर्व प्रकारची पापं केली असली तरी मी आता तुला शरण आलो आहे. माझा तू उद्धार कर.'

श्रद्धेने त्या पक्ष्याचे अंत:करण शुद्ध झाले. तो पक्षी भगवान गदाधरास प्रणाम करून राजा पवमानाचा निरोप घेऊन स्वर्गात गेला. तेव्हापासून या तीर्थास पावमानतीर्थ, चिच्चिकतीर्थ, गदाधरतीर्थ अशी नावे पडली. या तीर्थात केलेले पुण्यकर्म कोटिकोटिगुणांनी वाढत जाते.

भद्रतीर्थ, पतत्रितीर्थ, विप्रतीर्थ

सर्व पापांचा, अनिष्टांचा नाश करणारे भद्रतीर्थ परम शांतिदायक आहे. विश्वकर्म्याची पुत्री उषा भगवान सूर्याची पतिव्रता भार्या होती. त्याची एक भार्या छाया या नावाची होती. छायेचा पुत्र शनैश्चर. शनैश्चराची बहीण विष्टी. तिची आकृती भयानक होती. ती पापमयी होती. भगवान सूर्याने मनात म्हटले, 'ही कन्या आता कुणास देऊ?' तो तिला जो वर पाही तो तिचे भयानक रूप पाहून नाकारी. अशा अवस्थेत विष्टीनेच आपल्या पित्यास म्हटले,

'पिताजी, धनवान, विद्वान, तरुण, कुलीन, यशस्वी, उदार व सनाथ वराला कन्या द्यावी. याविपरीत जो पिता आचरण करील तो नरकात जाईल. सूर्यदेवा, विद्वानांसाठी कन्या एक धर्मसाधन आहे. एका बाजूस पर्वत, वन, काननं यांच्यासहित संपूर्ण पृथ्वी व दुसऱ्या बाजूस वस्त्राभूषणांनी अलंकृत निरोगी कन्या, दोनही समान आहेत. कन्यादानानं पृथ्वीच्या दानाचं फल मिळतं. कन्येच्या विवाहास कधी विलंब करता कामा नये.'

'बेटी, मी काय करू? तुझी आकृती भयंकर आहे. तुझा स्वीकार कुणी करीत नाही. स्त्री-पुरुषांच्या विवाहाच्या वेळी कुल, रूप, वय, धन, विद्या, सदाचार, सुशीलता यांचा विचार केला जातो. माझ्याकडं सर्व काही आहे. पण तुझ्यातच या गुणांचा अभाव आहे. काय करू? तुझा विवाह कसा करू? जर कुणी तुझा स्वीकार करील तर

आजच मी तुझा विवाह करीन.'

'पती, पुत्र, धन, सुख, आयू, रूप, परस्पर प्रेम हे सर्व पूर्वजन्माच्या केलेल्या कर्मानुसार प्राप्त होतं. आपणांस फल मिळतं ते पूर्वजन्मीच्या कर्मानुसार.'

कन्येचे हे वचन ऐकून भगवान सूर्याने कन्येचा विवाह विश्वकर्म्याचा पुत्र विश्वरूपशी केला. विश्वरूपही तसाच दिसायला भयंकर होता. त्या दोघांचे शील, रूप, यांत मात्र समानता होती. या दंपतीपासून गंड, अतिगंड, रक्ताक्ष, क्रोधन, व्यय व दुर्मुख या नावांचे पुत्र झाले. यांहून एक छोटा पुत्र हर्षण नावाचा होता. तो मोठा पुण्यात्मा, सुशील, सुंदर, शांत, शुद्धचित्त व आंतर्बाह्य पवित्र होता. एके दिवशी तो आपल्या मामास पाहाण्यासाठी यमराजाच्या घरी आला. त्याने तेथे सुखी व दुःखी जीव पाहिले. त्याने मामास विचारले,

'यांतील कोण सुखी आहे ? कोण दुःखी आहे ?'

हा प्रश्न ऐकून धर्मराज यमाने संपूर्ण कर्मगतीचे निरूपण केले. तो म्हणाला,

'जो मनुष्य विहित कर्मांचं कधी उल्लंघन करीत नाही त्याला कधीच नरकात जावं लागत नाही. जो शास्त्र व सदाचार यांना मानीत नाही, जो बहुश्रुत विद्वानांचा आदर करीत नाही, जो विहित कर्मांचं उल्लंघन करतो, तोच मनुष्य मुख्यतः नरकात जातो.'

'सुरश्रेष्ठा, माझा पिता विश्वरूप फार भयंकर आहे. माझी माता विष्टी हीसुद्धा फार भयंकर आहे. माझे महाबली बंधूही तसेच आहेत. कोणत्या उपायानं त्यांची बुद्धी शांत होईल ? त्यांची बुद्धी शांत होऊन ते सुरूप, निर्दोष, मंगलदायक कसे होतील ?'

'हर्षणा, तू वास्तवातही हर्षणच आहेस. पुत्र पुष्कळ असतात. पण सर्व कुलाचा विचार करणारे फार नसतात. तुझ्यासारखा एखादाच. कुलाचा आधार, माता-पित्याचा प्रियकारक, पूर्वजांचा उद्धार करणारा, तू एकटाच आहेस. हर्षणा, तू आता गौतमीच्या तटावर जाऊन स्नान कर. तेथील विष्णूची आराधना कर. ते जर प्रसन्न झाले तर तुझ्यावर त्यांची पूर्ण कृपा होईल.'

याप्रमाणे हर्षण गौतमीच्या तटावर आला. स्नान करून पवित्र झाल्यावर त्याने भगवान विष्णूंची प्रार्थना केली. विष्णूंनी त्याला प्रसन्न होऊन म्हटले,

'तुझ्या कुलाचं कल्याण असो. सर्व अभद्रांची शांती होऊन भद्रची म्हणजे मंगलाची वृद्धी होईल.'

'भद्रम् अस्तु' या वचनानुसार हर्षणाचा पिता भद्र झाला. माता विष्टी भद्रा झाली. तेव्हापासून हे स्थान भद्रतीर्थ या नावाने प्रसिद्ध झाले. सर्वमंगलांचे भांडार भद्रपती नावाने देवाधिदेव जनार्दन श्रीहरी या ठिकाणी निवास करतात.

सर्व रोगांचा व पापांचा नाश करणारे पतत्रितीर्थ आहे. त्याच्या नुसत्या स्मरणानेही मनुष्य कृतकृत्य होतो. कश्यपाचे दोन पुत्र. एक अरुण व दुसरा गरुड. त्यांच्या कुलात पक्ष्यांत श्रेष्ठ असा संपाती झाला. संपातीच्या छोट्या भावाचे नाव जटायू होते. ते दोघेही आपल्या बलाने उन्मत्त व एक दुसऱ्यास दटावणारे होते. एकदा त्यांनी भगवान सूर्याचे दर्शन घेण्यासाठी आकाशात उंच भरारी घेतली. सूर्याच्या जवळ जाताच दोघांचेही पंख जळून गेले. दोघेही थकून पर्वताच्या शिखरावर आदळले. त्यांच्या या पतनामुळे दुःखी झालेला अरुण सूर्यास म्हणाला,

'भगवान, हे दोन पक्षी जमिनीवर पडले आहेत. यांना अभय द्यावं. यांचा मृत्यू होऊ नये.

'तथास्तु' म्हणून सूर्याने त्यांना जीवंत केले. जटायू, अरुण, संपाती, गरुड, सूर्य, भगवान विष्णू यांनी गंगातटावर भ्रमण केले. तेव्हापासून हे स्थान पतत्रितीर्थ या नावाने प्रसिद्ध झाले. हे तीर्थ विष-नाशक असून सर्व अभीष्ट वस्तू देणारे आहे. साक्षात सूर्य, विष्णू, गरुड, अरुण येथे गौतमीतटावर राहातात. म्हणून हे तीर्थ आधिव्याधींपासून मुक्त करणारे आहे.

या गौतमीतटावरचे एक तीर्थ विप्रतीर्थ या नावाने प्रसिद्ध आहे. त्यालाच नारायणतीर्थ असेही नाव आहे. गंगा-यमुनेच्या मधल्या भागात एक वेदपारंगत विद्वान ब्राह्मण राहत होता. त्याचे अनेक पुत्र विद्वान,

गुणवान, रूपवान व दयाळू होते. त्यांच्यांतील सर्वांत लहान भाऊ अधिक गुणसंपन्न, शांत, सर्वज्ञ व बुद्धिमान होता. त्याचे नाव आसंदिव होते. त्याचा विवाह करावा म्हणून त्याचे वडील प्रयत्नात होते. याच सुमारास एकदा रात्री ब्राह्मणकुमार आसंदिव झोपला होता. त्या दिवशी त्याने भगवान विष्णूंचे स्मरण केले नव्हते. उत्तरेस डोके करून झोपलेल्या या कुमाराचे चित्त स्थिर नव्हते. याच वेळी इच्छेनुसार रूप धारण करणारी एक क्रूर राक्षसी तेथे आली व तिने आसंदिवास घेऊन त्वरित ती गौतमीच्या तटावर गेली. ती त्या ब्राह्मणकुमारावरोबर इच्छेनुसार रूप धारण करून हिंडू लागली. तिच्या शरीरास आता वृद्धत्व आले होते. एके दिवशी त्या भयानक राक्षसीने ब्राह्मणाला म्हटले,

'विप्रवर, ही गंगा आहे. तू अन्य ब्राह्मणांच्या बरोबर इथं संध्योपासना कर. जे ब्राह्मण वेळेवर संध्योपासना करीत नाहीत ते नीच ठरतात. चांडाळांपेक्षा हीन ठरतात. या सर्व लोकांसमोर मी तुझी जन्मदायिनी माता आहे असं तू सांग. नाहीतर तुझा नाश आताच होईल. विप्रा, माझं ऐकशील तर मी तुला सुख देईन. तुला जे प्रिय ते मी करीन. काही कालानंतर मी पुन्हा तुला तुझ्या देशात, तुझ्या घरी पोचवीन. मी हे सत्य सांगते.,

'तू कोण आहेस ?'

'माझं नाव कंकालिनी आहे मी जगात प्रसिद्ध आहे.'

तिचे नाव ऐकताच मुनिकुमार आसंदिवाचे चित्त भयाने व्याकुळ झाले. पण राक्षसीने अनेक प्रकारे त्याच्या मनात विश्वास निर्माण केला. तेव्हा तो म्हणाला,

'तू जसं सांगशील तसं मी करीन. तुला प्रिय असेल ते बोलीन.'

ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून ती बुढ्ढी राक्षसी मनोहर रूप धारण करून दिव्य वस्त्रांनी व आभूषणांनी नटून ब्राह्मणास बरोबर घेऊन इकडे तिकडे भटकू लागली ती सर्वांना सांगे, 'हा माझा पुत्र गुणाकर आहे.' ब्राह्मणकुमार रूप, सौभाग्य, वय, विद्या यांनी विभूषित होताच. पण ती वृद्धाही आता गुणवती दिसू लागली. सर्व लोक तिला ब्राह्मणाची माता समजू लागले. तेथील एक श्रेष्ठ ब्राह्मणाने आपली सुंदर कन्या

त्या राक्षसीस दाखवून आसंदिवाचा तिच्याशी विवाह केला. असा सुयोग्य पती मिळवून ती कन्या कृतार्थ झाली. पण तो ब्राह्मण आपल्या गुणवती पत्नीकडे पाहून फारच कष्टी झाला. त्याने मनातल्या मनात म्हटले, 'ही पापिणी राक्षसी एक दिवस मला खाऊन टाकील. मी काय करू ? कुठं जाऊ ? ही चिंता कुणास सांगू ? फार मोठ्या संकटात मी सापडलो आहे. माझं रक्षण आता कोण करील ? ही माझी कल्याण-मयी पत्नी गुणवती आहे, रूपवती आहे, तरुण आहे. ही राक्षसी हिला एके दिवशी खाऊन टाकील.'

दरम्यान ती वृद्धा राक्षसी कोठे तरी निघून गेली. आपला पती दुःखीकष्टी पाहून ब्राह्मणाची पतिव्रता पत्नी एकान्तात आपल्या पतीस म्हणाली,

'नाथ, आपण एवढ्या दुःखात का दिसता ? खरं सांगा ना.'

ब्राह्मणाने आपल्या पत्नीस सर्व मनोव्यथा सांगितली. पतीस ती म्हणाली,

'प्राणनाथा, ज्याचं मन स्ववश नाही त्याला सर्व बाजूंनी भय असतं. तो स्वतःच्या घरीही निर्भय राहू शकत नाही. पण ज्यानं स्वतःच्या आत्म्यावर विजय मिळविला आहे त्याला भय कसलं ? आणि तेही या गौतमी तटावर ? इथं तर किती वैष्णव, किती विरक्त, किती विवेकी पुरुष आहेत. आपण इथं स्नान करून पवित्र व्हावं आणि भगवान नारायणांची स्तुती करावी.'

ब्राह्मणाने गौतमीचे स्नान केले. भगवान नारायणाचे स्तवन केले. तो म्हणाला,

'नाथ, आपण या जगताचे अंतरात्मा आहात. मुकुंदा, आपणच या सृष्टीची निर्मिती करता, संहार करता. अनाथबंधू नृसिंहा, आपणच सर्वांचे पालक आहात. मी हीन आहे. माझं रक्षण का नाही करीत ?'

ही प्रार्थना ऐकून जगाचा शोक हरण करणाऱ्या भगवान नारायणाने आपल्या तेजोमय सुदर्शनचक्राने त्या पापिणी राक्षसीचा नाश केला. त्या ब्राह्मणास अभीष्टाचे दान दिले व त्याला त्याच्या माता-पित्यांकडे पोचविले. तेव्हापासून हे स्थान विप्रतीर्थ या नावाने

प्रसिद्ध झाले. नारायणतीर्थ म्हणूनही यास ओळखतात. येथे स्नान, दान, पूजा आदी केले की मनोवांच्छित फलाची प्राप्ती होते.

चक्षुस्तीर्थाचा महिमा

चक्षुस्तीर्थ रूप व सौभाग्य देणारे आहे. गौतमीच्या दक्षिण तटावर जेथे भगवान योगेश्वर निवास करतात तेथेच पर्वतशिखरावर भौवननगर हे एक विख्यात स्थान आहे. क्षात्रधर्मपरायण राजा भौवन तेथे निवास करीत होता. त्याच नगरात वृद्धकौशिक नावाचा एक ब्राह्मण होता. त्याचा वेदवेत्ता मुलगा गौतम नावाचा होता. गौतमाची मैत्री एक वैश्याशी होती. वैश्याचे नाव मणिकुंडल होते. एक दरिद्री व दुसरा धनिक असला तरी दोघांच्यांत चांगली मैत्री होती. एकदा गौतमाने आपल्या धनिक मित्रास म्हटले,

'मित्रा, आपण धन मिळविण्यासाठी पर्वत व समुद्र यांची यात्रा करू. जर अनुकूल सुख प्राप्त झालं नाही तर जवानी व्यर्थ समजावी. धनाशिवाय सौख्य कुठलं ? निर्धन माणसाचा धिक्कार असो.'

'माझ्या पित्यानं खूप धन कमावून ठेवलं आहे. आता आणखी धन कशासाठी ?'

'धर्म, अर्थ, काम, ज्ञान यांनी तृप्त झालेला मनुष्यच प्रशंसनीय असतो. जो प्राणी आपल्या स्वतःच्या व्यवसायानं जीवननिर्वाह करतो तोच धन्य आहे. दुसऱ्यानं दिलेल्या धनावर जगणारा कष्टी होतो. जो पुत्र स्वतःच्या सामर्थ्यानं मिळविलेल्या धनावर जगतो, पित्याच्या धनाला शिवतही नाही तोच कृतार्थ मानावा.'

धनाभिलाषी ब्राह्मणाचे हे वचन ऐकून वैश्याने घरात जाऊन एक रत्न आणले व आपल्या मित्रास देऊन म्हटले, 'मित्रा, या धनाच्या साह्यानं आपण खूप प्रवास करू. धन कमवून परत आपल्या घरी येऊ.' वैश्य आपल्या स्वभावानुसार सर्व सत्य सांगत होता. पण ब्राह्मणाच्या मनात पाप होते. माता-पित्यास सांगितल्यावाचूनच देशांतरास जावे असे दोघांनी ठरविले व त्याप्रमाणे ते घराबाहेर पडले. ब्राह्मणाने मनात विचार केला, 'कोणत्या उपायानं या वैश्याचं धन घेऊ ? या पृथ्वीवर

सहस्त्र सुंदर नगरं आहेत. तिथं कामाची अधिष्ठात्री देवीप्रमाणे अभीष्ट भोग देणाऱ्या अनेक युवती आहेत. त्यांना जर धन देऊन वश केले तर त्या नेहमी भोग देतील व आपलं जीवन सफल होईल. या वैश्याचं धन कसं लुबाडावं ?' अशा विचारात असणाऱ्या ब्राह्मणाने वैश्य मित्रास म्हटले,

'मणिकुंडला, पापापासूनच जीवांची उन्नती होते. मनोवांच्छित सुखं मिळतात. या जगात धर्मात्मा लोक दुःख भोगताना दिसतात. ज्याचं फल दुःख भोगणं हेच आहे त्या धर्माचा तरी काय उपयोग ?'

'अशी गोष्ट नाही. धर्मामुळंच सुख मिळतं. पाप केवळ दुःखमयच असतं. दुःख, भय, शोक, दरिद्रता, क्लेश ही पापांची फळं. जिथं धर्म तिथं मुक्ती आहे. आपला धर्म कधी नष्ट होतो की काय ? मित्रा, ध्यानात असू दे,

पापे दुःखं भयं शोको दारिद्रयं क्लेश एव च।
यतो धर्मस्ततो मुक्तिः स्वधर्मः किं विनश्यति ।।

असा दोघांचा वादविवाद चालू झाला. दोघांत एक शर्त ठरली. ज्याचा पक्ष श्रेष्ठ ठरेल त्याने दुसऱ्याचे धन घ्यायचे. पृथ्वीवर धर्म श्रेष्ठ की अधर्म श्रेष्ठ ? एकाने सांगितले, 'धर्मानं चालणाऱ्यास फार दुःख भोगावं लागतं. फार मोठं पाप करणारे सुखानं राहतात.' हा निर्णय ऐकून वैश्याने आपले सारे धन ब्राह्मणास दिले. मणिकुंडल धर्म जाणणारा होता. बाजू हरली तरी त्याने धर्माची प्रशंसा करणे सोडले नाही. ब्राह्मणाने विचारले,

'काय तू अजून धर्माची प्रशंसा करतोस ?'

'होय.'

'वैश्या, मी तुझं सारं धन घेतलं. तरी निर्लज्ज बनून धर्माची प्रशंसा करतोस ? पाहा, मी स्वेच्छाचारी बनून धर्मालाच जिंकलं आहे.'

'धान्यात जसा कोंडा, पंखधारी प्राण्यांत जशा माशा, त्याप्रमाणे मी धर्महीन माणसास मानतो. चार पुरुषार्थांत धर्म हा पहिला पुरुषार्थ आहे. अर्थ व काम नंतर येतात. तो धर्म श्रेष्ठ आहे. तू धर्माला कसं जिंकणार ?'

यानंतर दोघांनी पुन्हा शर्त लावली. पराजित माणसाचे हात कापण्याची शर्त होती. याही वेळी ब्राह्मणाचा जय होऊन त्याने वैश्याचे हात कापून पुन्हा विचारले,

'आता तू धर्माला मानतोस ?'

'माझा प्राण जरी कंठाशी आला तरी मी धर्मालाच श्रेष्ठ मानीन. देहधारी प्राण्याची धर्म ही माता आहे. पिता, सुहृद व बंधू आहे.'

असा वादविवाद करीत करीत ते दोघे गौतमीच्या तटावर आले. ब्राह्मण धनवान बनला होता. वैश्य निर्धन झाला होता. गंगातटाकी श्रीहरीच्या निवासस्थानी आल्यावर पुन्हा दोघांचा वाद सुरू झाला. गंगा, योगेश्वर, धर्म यांची प्रशंसा वैश्य करीत होता, त्यामुळे ब्राह्मणास राग येत गेला. तो वैश्याला म्हणाला,

'तुझं धन गेलं. दोन हात कापले गेले. आता फक्त तुझा प्राण शिल्लक आहे. आता जर तू माझ्या मताविरुद्ध बोललास तर या तलवारीनं मी तुझी मान कापून टाकीन.'

वैश्य हसू लागला. तो पुन्हा गौतमास म्हणाला,

धर्ममेव परं मन्ये यथेच्छसि तथा कुरु ।
ब्राह्मणांश्च गुरून् देवान् वेदान् धर्मं जनार्दन ।।
यस्तु निन्दयते पापो नासौ स्पृश्योऽथ पापकृत् ।
उपेक्षणीयो दुर्वृत्तः पापात्मा धर्मदूषकः ।।

'मित्रा, मी तर धर्मालाच श्रेष्ठ मानतो. तुला जसं वाटेल तसं तू कर. जो ब्राह्मण, गुरू, देव, वेद, धर्म, भगवान विष्णू यांची निंदा करतो तो पापाचारी मनुष्य पापरूपच आहे. त्याला स्पर्शही करू नये. धर्माला दूषित करणाऱ्या त्या दुराचारी पापात्म्याचा त्याग करायला हवा.'

रागावलेला ब्राह्मण म्हणाला,

'ठीक आहे. तू धर्माची प्रशंसा कर. आता प्राणाची शर्त ठरवायची ?'

'काहीच हरकत नाही.'

याही वेळेस ब्राह्मणाचा जय झाला. त्याने वैश्यास गौतमीच्या तटावर योगेश्वराच्या समोरच मारले. त्याचे डोळे काढून घेतले.

व म्हटले,

'वैश्या, धर्माची प्रशंसा करून तुला ही दशा प्राप्त झाली. तुझं धन गेलं, दोनही हात गेले, डोळे गेले. मित्रा, आता मी तुझा निरोप घेतो. यापुढं कधी धर्माची प्रशंसा करू नकोस.' इतके म्हणून ब्राह्मण निघून गेला.

इकडे वैश्याचे मन शोकाकुल झाले. अशाही अवस्थेत त्याची धर्मावरील निष्ठा प्रबळ होती. अनेक प्रकारच्या चिंतांनी ग्रस्त होऊन तो जमिनीवर निश्चेष्ट होऊन पडला होता. त्याच्या मनास उत्साह नव्हता. दिवस मावळला. रात्रीचा चंद्र प्रकाशू लागला. शुक्ल पक्षाची एकादशी होती. एकादशीस लंकेहून बिभीषण येतो. त्या दिवशीही तो आपल्या पुत्रांसह, राक्षसांसह आला. त्याने गंगेत स्नान केले. भगवान योगेश्वर विष्णूची पूजा त्याने केली. बिभीषणाचा पुत्र बैभीषणी नावाचा होता. त्याने कष्टी वैश्यास पाहिले. सर्व वृत्तान्त त्याने लंकापती महात्मा बिभीषणास सांगितला. लंकेश्वर आपल्या गुणी पुत्रास प्रसन्नतेनें म्हणाला,

'बेटा, भगवान श्रीराम माझे आराध्य गुरू. त्यांचा एक भक्त-सेवक आदरणीय हनुमान. त्यानं एक पर्वतच एका प्रसंगी औषधींचं भांडार म्हणून उचलून आणला होता. विशल्यकरणी व मृतसंजीवनी या दोन महत्त्वाच्या वनस्पती त्यावर होत्या. काम होताच हनुमानाने तो पर्वत परत नेला. पण जाताना त्यावरील मृतसंजीवनी ही वनस्पती इथं या गंगा तटावर पडली. ती तू शोधून आण. भगवंताचं नाव घेऊन ती त्या वैश्याच्या हृदयावर ठेव. त्या उदारबुद्धी वैश्याचं अभीष्ट पूर्ण होईल.'

बिभीषणाने आपल्या पुत्रास औषधी मिळवून दिली. 'इषेत्वा' इत्यादी मंत्र म्हणून त्याची एक फांदी तोडून ती वैश्याच्या हृदयावर ठेवून दिली. तिचा स्पर्श होताच त्या वैश्याला हात फुटले, डोळे आले. वैश्याने धर्माचे चिंतन करून गौतमीत स्नान केले. भगवान योगेश्वर विष्णूस मनोभावे नमस्कार केला. त्याने ती औषधी बरोबर घेतली व तो देशांतरास गेला. महापूर नावाच्या एका विख्यात राजधानीस तो

येऊन पोचला. तेथील राजा बलवान होता. त्याला पुत्र नव्हता. एक कन्या होती, पण तिचे डोळे गेले होते. ती कन्याच राजाला पुत्राप्रमाणे होती. राजाने निश्चय केला होता की, 'देव, ब्राह्मण, दानव, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, गुणवान वा गुणहीन जो कुणी भेटेल त्यास ही कन्या देईन. मात्र त्यानं तिचे डोळे सुंदर करायला हवेत. राज्यासहित कन्येचं दान करीन.'

महाराजांची ही घोषणा सर्वत्र पसरली. वैश्याने विचार केला की, आपण या राजकन्येचे डोळे चांगले करून द्यावेत. त्याने राजवाडयात जाऊन राजकुमारीस त्या औषधी काष्ठाचा स्पर्श करून तिचे डोळे चांगले केले. तिला दिसू लागल्यावर कौतुकाने व नवलाने राजाने विचारले,

'तू कोण आहेस ?

'मी एक वैश्य. ब्राह्मणांच्या प्रसादानं धर्म, तपस्या, ज्ञान, यज्ञ, दिव्य औषधी यांमुळं मला ही शक्ती प्राप्त झाली.'

राजाने प्रसन्न होऊन त्या वैश्यास आपली मुलगी विवाह करून दिली. त्याला राज्य मिळाले. पण मणिकुंडल संतुष्ट नव्हता. आपल्या मित्राशिवाय या राज्यास काय शोभा ? तो सतत गौतम ब्राह्मणाचे चिंतन करू लागला. त्याने एकदा एका वनात गौतमास पाहिलं. पापी जुवेदारांनी त्याचे सर्व धन लुबाडले होते. धर्मज्ञ मणिकुंडलाने आपल्या धनहीन मित्रास घरी आणले. त्याची पूजा करून त्याने धर्माचा प्रभाव त्याला सांगितला. सर्व प्रकारच्या पापांपासून मुक्तता मिळावी म्हणून गौतमाने गंगेत स्नान केले. वैश्याने ब्राह्मणाचे बंधुबांधव, वृद्धकौशिक आदींना बोलावून एक मोठा यज्ञ केला. त्यानंतर तो स्वर्गलोकात सुखाने गेला. या स्थानास मृतसंजीवनीतीर्थ, चक्षुस्तीर्थ, योगेश्वरतीर्थ अशी नावे मिळाली. स्मरण केले तरी मन प्रसन्न होते. दुर्वासनांचा नाश होतो, असा या स्थानाचा महिमा आहे.

सामुद्र, ऋषिसत्र आदी तीर्थे, गौतमीमाहात्म्य

सामुद्रतीर्थ सर्व तीर्थांचे फल देणारे आहे, गौतमांचा निरोप घेऊन पापनाशिनी गंगा तीनही लोकांवर उपकार करण्यासाठी ब्रह्मगिरीच्या पूर्वेस समुद्राकडे निघाली. समुद्राने गौतमी येत आहे असे पाहून विचार केला, 'ही वंदनीया नदी ब्रह्मा, शिव आदी देवांनी पूजित अशी आहे. तिच्या स्वागतासाठी मला थोडं दूर पुढे जायला हवंय. नाही तर माझ्या धर्मात दोष निर्माण होईल.' इतके मनात आणून समुद्र मूर्तिमान झाला व हात जोडून गंगेजवळ आला व म्हणाला,

'देवी, तुझं हे जल आकाश, पाताल, मर्त्यलोक इत्यादी ठिकाणी पसरलं आहे. तू मला येऊन मिळावंस. माझ्यात रत्न, अमृत, पर्वत, राक्षस, असुर राहतात. इतरही जलजंतूंना मी धारण करतो. माझ्या जलात लक्ष्मीसहित भगवान विष्णू शयन करतात. मी तुझं स्वागत करतो. भगवती गंगे, मी तुला एक प्रार्थना करतो. तू सात धारांनी मला येऊन मिळावंस. तू एकाच धारेनं मिळशील तर मी तुझा वेग सहन करू शकणार नाही.'

'समुद्रा, तू माझी एक गोष्ट ऐक. सप्तर्षींच्या अरुंधती आदी पाच पत्नी आहेत. त्यांना त्यांच्या पतींसह तू इथं घेऊन ये.'

समुद्राने सप्तर्षींना त्यांच्या पत्नींसह आणले. तेव्हा गोदावरी गंगा सप्त धारांत विभागून समुद्रास मिळाली. हे सप्तगंगातीर्थ या नावाने विख्यात झाले. समुद्रतीर्थ असेही त्याला म्हणतात. येथे सात ऋषींनी भीमेश्वराच्या साक्षीने तपस्या केली. गंगेस सात धारांत विभक्त केली. वासिष्ठी, वैश्वामित्री, वामदेवी, गौतमी, भारद्वाजी, आत्रेयी, जामदग्नी अशा नावांनी गौतमी शोभू लागली. या स्थानास ऋषिसत्रतीर्थ असेही म्हणतात. या ऋषींच्या सत्रात देवांचा प्रबल शत्रू विश्वरूप आला व म्हणाला,

'मुनिवर, मला बलवान पुत्र हवाय. देवांनाही ज्याचा पराभव करता येणार नाही असा पुत्र मिळण्यासाठी मी काय करू ?'

या प्रश्नाचे उत्तर देताना परम बुद्धिमान ऋषी विश्वामित्र

म्हणाले,

'कर्मामुळं नाना प्रकारची फलं मिळतात. कर्माच्या अधीन फलसिद्धी असते. कर्म ही दोन प्रकारची असतात. एक क्रियमाण व दुसरे कृत. क्रियमाण कर्माचं साधन आहे त्याला कर्तव्य म्हणतात. विद्वान पुरुष कर्म करताना जी जी धारणा करतात तीस अनुसरून त्यांना फल मिळतं. भावनेशिवाय कर्म केलं तर दुसरं फल मिळेल. अनुरूप भावानंच इष्ट ते फल मिळतं. सात्त्विक, राजस व तामस असे भावाचे तीन प्रकार आहेत. ज्या भावानुसार कर्म तसं त्याला फल मिळतं. अनुकूल भावानुरूप कर्म करावं, निष्काम भावानं केलेलं कर्म मुक्तीस कारण होतं. सकाम भावामुळं बंधन पडतं. तूही भाव जाणून कर्म करावंस.'

विश्वरूपाने तामस भावाचा आश्रय करून दीर्घकाल तप केले. अनेक ऋषींनी मना केले तरी त्याने क्रोधाने भयंकर कर्म केले. एक कुंड खोदून त्यात भयानक अग्नी प्रज्वलित केला. त्यात बसून त्याने रौद्रपुरुषाचे चिंतन केले. हा विश्वरूप अतिशय भयंकर होता. त्याचे कर्मही भयंकर झाले. त्याने भीमस्वरूप भगवानांचे, रुद्रांचे आवाहन करून स्वतःची आहुती दिली. तेव्हापासून या स्थानास भीमेश्वर असे नाव मिळाले. येथे आराधना केली की भगवान भीमेश्वर प्रसन्न होतात.

गोदावरी गंगा समुद्रास मिळाली तेव्हा सर्व ऋषिमुनी जमा झाले. वसिष्ठ, जाबाली, याज्ञवल्क्य, क्रतू, अंगिरा, दक्ष, मरीची, शातातप, शौनक, देवरात, भृगू, अग्निवेश, अत्री, मनू, गौतम, कौशिक, तुंबरू, पर्वत, अगस्त्य, मार्कंडेय, पिप्पल, गालव, योगीजन, वामदेव, आंगिरस, भार्गव, आदित्य, वसू, रुद्र, मरुद्गण, लोकपाल इत्यादींना शिव व विष्णू यांनी दर्शन दिले. त्यांनी हात जोडून शिव व विष्णू यांची स्तुती केली. समुद्र व गंगेचे सात प्रवाह यांच्या संगमावरील महादेव गौतमेश्वर नावाने प्रसिद्ध झाला. ब्रह्मदेवाने जेथे शिवाची स्थापना केली ते शिवलिंग ब्रह्मेश्वर नावाने विख्यात झाले. चक्रपाणितीर्थ, ऐन्द्रतीर्थ, हयग्रीवतीर्थ, सोमतीर्थ, आग्नेयतीर्थ, आदित्यतीर्थ, अद्रितीर्थ इत्यादी अनेक तीर्थांची निर्मिती येथे झाली. ब्रह्मदेवांनी गौतमीचे माहात्म्य सांगताना म्हटले,

'गंगा प्रथम माझ्या कमंडलूत होती. ती भगवानांच्या चरणांतून प्रकट झाली. त्यानंतर महादेवांच्या जटांतून ती व्यक्त झाली. महर्षी गौतमांच्या तपस्येनं ती ब्रह्मगिरीवर आली. भगवती गोदावरी सर्व-तीर्थमयी आहे. मनुष्यास ती मनोवांच्छित फल देते. तीन लोकांत गोदावरीएवढं मोठं तीर्थं नाही. ही नदी म्हणजे साक्षात ब्रह्म आहे. या गौतमीचा प्रभाव कोण वर्णन करणार ? प्रत्यक्ष सदाशिवही तिचं महत्त्व वर्णन करू शकत नाही. गंगा गंगा या उच्चारणामुळंही पुण्य लाभेल. गंगेचं हे माहात्म्य कलीचा कलंक नाहीसा करणारं आहे. सर्व प्रकारची सिद्धी देणारं आहे. ते वाचून, ऐकून मनोवांच्छित फलाची प्राप्ती होते. तीन लोकांत साडेतीन कोटी तीर्थं आहेत, ती सर्व बृहस्पती सिंह राशीत असताना गौतमी गंगेत स्नान करण्यासाठी येतात. ही गौतमी गंगा माझ्या आज्ञेनुसार सर्वांना स्नान केल्यानंतर मोक्ष देणारी आहे. हजार अश्वमेध, शंभर वाजपेय यज्ञ करून जे फल मिळतं तेच या गौतमी-माहात्म्याच्या श्रवणानं मिळतं. भोग व मोक्ष देणाऱ्या या माहात्म्याचं श्रवण, मनन, कीर्तन करावं. आपल्या हातांनी लिहून या माहात्म्याचं पुस्तक जो ब्राह्मणास देईल तो सर्व पापांपासून मुक्त होईल. पुन्हा गर्भवास त्याला नाहीत.'

अनंत वासुदेव व पुरुषोत्तमक्षेत्र यांचा महिमा

अनंत वासुदेवाचे माहात्म्य ऐकण्यासारखे आहे. ब्रह्मदेवाने देवांचा शिल्पी श्रेष्ठ विश्वकर्म्याला बोलावून म्हटले, 'भगवान वासुदेवाची शिलाप्रतिमा अशी बनीव की, त्याच्या दर्शनाला इंद्रादी देव व मनुष्य भक्तिपूर्वक येतील. त्याची आराधना करून कृपा मिळवतील.' विश्व-कर्म्याने एक सुंदर व सुदृढ प्रतिमा बनविली. तिच्या हातांत शंख, चक्र, गदा, पद्म यांची शोभा वाढत होती. भगवानांची ही मूर्ती सर्व प्रकारच्या शुभ लक्षणांनी युक्त होती. तिचे डोळे कमलदलांप्रमाणे विशाल होते. वक्षःस्थलावर श्रीवत्साचे चिन्ह होते. हृदयावर वनमाला रुळत होती. मस्तकावर मुकुट व भुजांत अंगद शोभा पावत होते. कानांत कुंडले चमकत होती. श्यामल अंगावर पीतांबर शोभत होता. गूढमय मंत्रांनी

मूर्तीची स्थापना झाली. इंद्राने, रावणाने, बिभीषणाने याच मूर्तीची आराधना केली.

द्वापर युगात कंसादिकांचा वध करण्यासाठी बलभद्राबरोबर वसुदेवाच्या कुलात भगवान अवतीर्ण झाले. त्यावेळी समुद्राने पुण्यमय पुरुषोत्तमक्षेत्रात त्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. मनोवांच्छित फल देणारी ही मूर्ती सर्वांना अभय देते. भगवान अनंताचे दर्शन, भक्तिपूर्वक पूजन, प्रणाम करून मनुष्य राजसूय व अश्वमेध यज्ञांपेक्षा दसपटींनी अधिक पुण्य संपादन करतो. या पुरुषोत्तमक्षेत्रात शंख, चक्र, गदा, पद्म व पीतांबर धारण करणारे कमलनयन भगवान श्रीकृष्ण विराजमान असतात. त्यांनीच कंस व केशी यांचा संहार केला. श्रीकृष्ण, बलभद्र, सुभद्रा यांच्या दर्शनाने मनुष्य मुक्त होतो. जो मनुष्य झोपेत, जागृत अवस्थेत श्रीकृष्ण, बलराम व सुभद्रा यांचे दर्शन घेतो तो श्रीहरीच्या धामास जातो. जो चार महिने पुरुषोत्तमक्षेत्रात निवास करतो तो पृथ्वीवरील सर्व तीर्थांचे फल मिळवितो. अन्य तीर्थांत दहा हजार वर्षे तपस्या केल्यामुळे जे फल मिळते ते या पुरुषोत्तमक्षेत्रात एका महिन्याच्या तपस्येने मिळते. कृमी, कीटक, पतंग आदी व पशुपक्षी जर देहत्यागासाठी येथे आले तर त्यांनाही परमगतीची प्राप्ती होते. हा भगवान प्रकृत व पुरुष यांच्यापेक्षा मोठा आहे. वेद, पुराणांत यालाच पुरुषोत्तम म्हणतात. सर्व जगावर उपकार करण्यासाठी ते या पुरुषोत्तमक्षेत्रात विराजमान आहेत.

प्रकृतेः स परो यस्मात् पुरुषादपि चोत्तमः ।
तस्मात् वेदे पुराणे च लोकेऽस्मिन पुरुषोत्तमः ।।
योऽसौ पुराणे वेदान्ते परमात्मेत्युदाहृतः ।
आस्ते विश्वोपकाराय प्रदेश पुरुषोत्तमः ।।

४ सृष्टि - रचना

जी नित्य, सदसत्स्वरूप तथा कारणभूत अव्यक्त प्रकृती आहे तीच प्रधान आहे. तिच्यापासूनच पुरुषाने या विश्वास निर्माण केले आहे. अमित तेजस्वी ब्रह्मदेव हाच पुरुष. तो सर्व सृष्टीची निर्मिती करतो. प्रकृतीपासून महत्तत्त्व, महत्तत्त्वापासून अहंकार, अहंकारापासून सर्व सूक्ष्मभूत उत्पन्न झाले. त्यानंतर स्वयंभू भगवान नारायणांनी नाना प्रकारची प्रजा निर्माण करण्याच्या इच्छेनें प्रथम जलाची निर्मिती केली. जलात त्यांनी आपली शक्ती निर्धारित केली. या जलास दुसरे नाव 'नारं' आहे. कारण त्याची उत्पत्ती 'नर'पासून आहे. पूर्वकाळात हे जल त्या भगवानांचे अयन म्हणजे निवासस्थान होते. म्हणून ते 'नारायण' झाले. या जलातून भगवंतांच्या शक्तीमुळे एक विशाल सुवर्णाचे अंडे निर्माण झाले. त्यातून स्वयंभू ब्रह्मदेव प्रकट झाले. या अंड्यात ब्रह्मदेव एक वर्ष होते. त्यांनी या अंड्याचे दोन तुकडे केले. एकाचा द्युलोक बनला, दुसरा भूलोक झाला. दोहोंच्या मध्ये आकाश झाले. जलाच्या वर तरंगती अशी पृथ्वी तयार झाली. दहा दिशा झाल्या. काळ, मन, वाणी, काम, क्रोध, रतिसृष्टी यांच्यामुळे ब्रह्मदेवांनी सृष्टीची रचना करून सात प्रजापती आपल्या मनापासून निर्माण केले. मरीची, अत्री, अंगिरा, पुलस्त्य, पुलह, क्रतू, वसिष्ठ हे ते सात ब्रह्मदेवांचे मानसपुत्र होत.

ब्रह्मदेवांनीच आपल्या रोषातून रुद्र प्रकट केला. सनत्कुमार निर्माण झाले. सात महर्षींपासून समस्त प्रजा निर्माण झाली. त्यानंतर ब्रह्मदेवांनी विद्युतवज्र, मेघ, रोहित, इंद्रधनुष्य, पक्षी यांना निर्माण केले. यज्ञाच्या सिद्धीसाठी त्यांनीच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद प्रकट केले. त्यानंतर सांध्य देवांची उत्पत्ती झाली. लहान-मोठी भूते ब्रह्मदेवांच्या अंगापासून तयार झाली.

तरी सृष्टीची निर्मिती नीट होईना म्हणून ब्रह्मदेवांनी आपल्याच शरीराचे दोन भाग केले. एक अर्धा भाग पुरुष झाला. अर्धा स्त्री झाला.

या पुरुषाचे नाव मनू होते. स्त्री अयोनिजा शतरूपा मनूची पत्नी झाली. हिने खूप वर्षे तप केले. स्वायंभुव मनू अथवा वैराजपुरुष हा तिचा पती असून तिला वीर, प्रियव्रत, उत्तानपाद नावांचे पुत्र झाले. वीरास काम्या नावाची एक कन्या झाली. हीच प्रजापती कर्दमाची पत्नी झाली. सम्राट, कुक्षी, विराट, प्रभू हे काम्याचे चार पुत्र. प्रजापती अत्रीने उत्तानपादास दत्तक घेतले. त्याला सुनृतेपासून ध्रुव, कीर्तिमान, आयुष्मान वसू असे पुत्र झाले. ध्रुवास त्याची पत्नी शंभूपासून श्लिष्टी व भव्य हे दोन पुत्र झाले. हाच वंश पुढे वाढत जाऊन त्यात पृथ्वीपालक राजा पृथू झाला.

चौदा मन्वन्तरे

प्रथम स्वायंभुव मनू, दुसरा स्वारोषिष, तिसरा उत्तम, चौथा तामस, पाचवा रैवत, सहावा चाक्षुष व सातवा वैवस्वत मनू झाला. वर्तमान कल्पाचा मनू वैवस्वतच आहे. यानंतर सावर्णी, भौत्य, रौच्य व मेरू सावर्ण्य नावाचे असे चार मनू होतील. भूत, वर्तमान, भविष्य अशा काळांतील हे चौदा मनू झाले. स्वायंभुव मन्वन्तरातील मरीची, अत्री, अंगिरा, पुलह, ऋतू, पुलस्त्य, वसिष्ठ हे सात ऋषी आहेत. आग्नीध्र, अग्निबाहू, मेध्य, मेधातिथी, वसू, ज्योतिष्मान, द्युतिमान, हव्य, सबल व पुत्र हे स्वायंभुव मनूचे महाबली पुत्र होत. स्वारोषिष मन्वन्तरात प्राण, बृहस्पती, दत्तात्रेय, अत्री, च्यवन, वायुप्रोक्त व महाव्रत हे सात ऋषी. तुषित नावाचा देव, हविर्ध्र, सुकृती, ज्योती, आप, मूर्ती, प्रतीत, नभस्य, नभ व ऊर्ज हे स्वारोषिष मनूचे बलवान व पराक्रमी पुत्र होत. उत्तम मन्वन्तरात वसिष्ठांचे सात पुत्र वासिष्ठ व हिरण्यगर्भाचा तेजस्वी पुत्र ऊर्ज हे ऋषी असून हष, ऊर्ज, तनूर्ज, मधू, माधव, शुची, शुक्र, सह, नभस्य व नभ हे उत्तम मनूचे पुत्र होत. भानू नावाचा देव याच मन्वन्तरातील.

चौथ्या तामसाचे काव्य, पृथू, अग्नी, जन्हू, धाता, कपिवान, अकपिवान हे सात ऋषी असून सत्य नावाचा देव होता. द्युती, तपस्य, सुतपा, तपोभूत, सनातन, तपोरती, अकलमाष, तन्वी, धन्वी व परंतप

हे याचेच दहा पुत्र होत. पाचवा रैवत मन्वन्तर. देवबाहू, यदुध्र, वेदशिरा, हिरण्यरोमा, पर्जन्य, सोमनंदन, ऊर्ध्वबाहू व अत्रिकुमार सत्येनेय हे ऋषी आणि अभूतरजा व प्रकृती नावांचे देव. धृतिमान, अव्यक्त, युक्त, तत्त्वदर्शी, निरुत्सुक, आरण्य, प्रकाश, निर्मोह, सत्यवाक् व कृती हे त्याचे पुत्र होत. भृग, नभ, विवस्वान, सुधामा, विरजा, अतिनामा, सहिष्णू हे सात ऋषी सहाव्या चाक्षुष मनूचे असून लेख नावाचे पाच देव होते. नाड्वलेय नावाचे प्रसिद्ध रूरू आदी चाक्षुष मनूचे दहा पुत्र सांगितले जातात. सातव्या वैवस्वत मन्वन्तराचे अत्री, वसिष्ठ, कश्यप, गौतम, भरद्वाज, विश्वामित्र, जमदग्नी हे वर्तमान मनूचे सप्तर्षी आकाशात विराजमान झाले आहेत. साध्य, रुद्र, विश्वेदेव, वसू, मरुद्गण, आदित्य, अश्विनीकुमार हे या मनूचे देव असून त्याचेच इक्ष्वाकू आदी दहा पुत्र होत.

वर सांगितलेल्या ऋषींपासूनच पुत्रांच्या, पौत्रांच्या रूपांनी सर्व दशदिशा भरून गेल्या आहेत. सावर्णी मन्वन्तरात परशुराम, व्यास, आत्रेय, भरद्वाज कुलातील द्रोणकुमार अश्वत्थामा, गौतमवंशी शरद्वान, काशिकवंशी गालव व कश्यपनंदन और्व हे सावर्णी मनूचे होणारे ऋषी असून वैरी, अध्वरीवान, शमन, धृतिमान, वसू, अरिष्ट, अधृष्ट, वाजी व सुमती हे सावर्णी मनूचे पुत्र होतील. सावर्ण नावाचे पाच मनू होतील. त्यांतील एक सूर्यपुत्र व चार प्रजापतीचे पुत्र. यांनी मेरूच्या शिखरावर तपस्या केली असल्याने यांना ‘ मेरूसावर्ण्यं ’ असे नाव मिळाले. भविष्यात रौच्य व भौत्य नावांचे आणखी दोन मनू होतील. प्रजापती रुचीचा पुत्र रौच्य व रुचीचाच भूतीच्या गर्भापासून झालेला भौत्य मनू होय. या सात मनूंच्या द्वारे द्वीपे व नगरे पूर्णपणे भरून जातील. सत्ययुग, त्रेतायुग, आदी चार युगे यांची एकाहत्तर वेळा बेरीज करून जो अधिक काळ होईल तेव्हा एक मन्वन्तर होईल. हे चौदा मनू यश व बल देणारे आहेत. या मन्वन्तरांच्या काळात कितीतरी सृष्टिरचना व संहार होत गेला आहे, जाईल. संहार झाल्यानंतर तपस्या, ब्रह्मचर्य, शास्त्रज्ञान यांनी संपन्न असे देव व सप्तर्षी फक्त उरतात. एक हजार चतुर्युग पूर्ण झाल्यावर कल्प समाप्त होते. त्यावेळी सूर्याच्या प्रचंड तप्त किरणांनी

सर्व प्राणी जळून जातात. सर्व देवदेवता, आदित्यगण सुरश्रेष्ठ भगवान नारायणात विलीन होतात. हेच भगवान कल्पाच्या अंती पुन्हा सर्व भूतांची सृष्टी तयार करतात.

वैवस्वत मनूचा वंश पाहाण्यासारखा आहे. महर्षी कश्यप व त्यांची भार्या दक्षकन्या अदिती यांच्यापासून विवस्वान् (सूर्य) जन्मास आला. विश्वकर्म्याची कन्या संज्ञा ही या विवस्वानाची पत्नी. यांना एक कन्या व दोन पुत्र झाले. प्रजापती श्राद्धदेवच वैवस्वत मनू झाला. यम व यमुना ही जुळी मुले यानंतर झाली. भगवान सूर्याचे तेज संज्ञा सहन करू शकली नाही. तिची छायाच सवर्णा नावाची झाली. तिच्यापासूनही सूर्याला सावर्णमनू नावाचा पुत्र झाला. दुसरा पुत्र शनैश्चर नावाचा झाला. सावर्णमनू प्रजापती झाला. येणाऱ्या सावर्णिक मन्वन्तराचा तोच स्वामी होईल. आज मेरूपर्वतावर तो तपस्या करीत आहे. त्याचा भाऊ शनैश्चर ग्रहाची पदवी प्राप्त करून आहे.

वैवस्वत मनूचे वंशज

इक्ष्वाकू, नाभाग, धृष्ट, शर्याती, नरिष्यन्त, प्रांशू, अरिष्ट, करूष, पृषध्र हे वैवस्वत मनूचे नऊ पुत्र. प्रजापती मनू एकदा पुत्रप्राप्तीसाठी मैत्रावरुणयाग करीत होता. त्यातून एक दिव्य आभूषणांनी युक्त अशी सुंदर रूपाची कन्या प्रकट झाली. हीच ती प्रसिद्ध इला होय. तिला बुधापासून पुरूरवा झाला. त्यानंतर ती सद्युम्नच्या रूपात परिणत झाली. सुद्युम्नास उत्कल, गय व विनताश्व असे तीन पुत्र झाले. उत्कलाची राजधानी उत्कला (उडिसा) झाली, विनताश्व पश्चिम दिशेस गेला. गय पूर्व दिशेचा राजा झाला. इक्ष्वाकूस मध्यप्रदेश मिळाला. मनुकुमार सुद्युम्न स्त्री व पुरुष अशा लक्षणांनी युक्त होता. नरिष्यन्ताचे पुत्र शक झाले. नाभागाचा अंबरीष. धृष्टाचा धार्ष्टक नावाचा क्षत्रिय-वंश झाला. करूषापासून कारूष झाले. प्रांशूचा एक पुत्र प्रजापती नावानेच प्रकट झाला. शर्यातीस जुळी मुले झाली. एक अनर्त नावाचा पुत्र व दुसरी सुकन्या नावाची कन्या. ही सुकन्या च्यवन ऋषींची पत्नी झाली. अनर्तांच्या पुत्राचे नाव रैव. त्याची राजधानी कुशस्थली

(द्वारका) झाली. रैवचा पुत्र रैवत हा मोठा धर्मात्मा होता. त्याचे दुसरे नाव ककुद्‌भी. तो एकदा आपली कन्या घेऊन ब्रह्मदेवांकडे गेला व तेथील गंधर्वांची गाणी ऐकत रमला. इकडे त्याच्या राजधानीत यादवांची वसती झाली. यदुवंशियांनी त्या नगरीचे नाव द्वारावती ठेवले. रैवताने प्रसंग ओळखून आपली रेवती नावाची कन्या बलरामास दिली व स्वत: मेरूपर्वतावर जाऊन तो तपश्चर्या करू लागला. पृषध्राने आपल्या गुरूचा वध केला होता म्हणून तो शापाने शूद्र बनला.

मनू एकदा शिंकत असताना इक्ष्वाकूची उत्पत्ती झाली. त्याला शंभर पुत्र झाले. विकुक्षी सर्वांत मोठा. त्याला अयोध्येचे राज्य मिळाले. त्याला शकुनी आदी पाचशे पुत्र होते. त्यांतील वशाती आदी अठ्ठावन राजपुत्र दक्षिण दिशेचे पालक झाले. या विकुक्षीचे दुसरे नाव शशाद होते. याचा पुत्र ककुत्स्थ, त्याचा अनेना, त्याचा पृथू, त्याचा विष्टराश्व, त्याचा आर्द्र, त्याचा युवनाश्व, व त्याचा श्रावस्त पुत्र होय. त्यानेच श्रावस्तपुरी वसविली. श्रावस्ताचा बृहदश्व व त्याचा पुत्र कुवलाश्व. यानेच धुंधू नावाच्या दैत्याचा नाश केला. म्हणूनच तो धुंधुमार नावाने प्रसिद्धीस आला. या धुंधुमाराचा एक पुत्र दृढाश्व, दुसरा चंद्राश्व, तिसरा कपिलाश्व. दृढाश्वाच्या पुत्राचे नाव हर्यश्व. त्याचा पुत्र निकुंभ, त्याचा युद्धविशारद पुत्र संहताश्व. त्याचे दोन पुत्र. एक अकृशाश्व व दुसरा कृशाश्व. त्याची हेमवती नावाची एक कन्या दृषद्वती या नावाने विख्यात झाली. तिचा पुत्र प्रसेनजित् नावाचा विख्यात झाला. याची गौरी नावाची एक स्त्री पतीच्या शापाने बाहुदा नावाची नदी झाली. प्रसेनजित्‌चा पुत्र युवनाश्व. त्याचा मान्धाता. हा त्रिभुवनविजयी झाला. मांधात्याची पत्नी शशबिंदूची कन्या चैत्ररथी वा बिंदुमती नावाची होती. ही फार रूपवती होती. यांना दोन पुत्र झाले. एक धर्मघ्न पुरुकुत्स्थ व दुसरा राजा मुचुकुंद. पुरुकुत्स्थास नर्मदा नावाच्या स्त्रीपासून त्रसदस्यू व त्यापासून संभूत याचा जन्म झाला. संभूताचा पुत्र त्रिधन्वा व त्याचा त्र्य्यारुण पुत्र. त्याचा पुत्र महाबली सत्यव्रत. याची बुद्धी खोटी असून तो बालस्वभावाचा, कामासक्त, मोही, साहसी व चंचल होता. त्याला

घरातून हाकलून दिले गेले. तो एका चांडालाच्या घरी राहिला. या अधर्मामुळे इंद्राने त्या राज्यातील वृष्टी बंद केली.

ब्रह्मपुराणात अशाच रीतीने सगर राजाचा वंश, इक्ष्वाकूचा वंश, चंद्रवंशातील प्रमुख राजे, भृगुवंश, नहुशाचा वंश, ययातिपुत्रांचा विस्तार इत्यादी माहिती आली आहे.

जंबुद्वीपात भारतवर्ष

जंबू, प्लक्ष, शाल्मल, कुश, क्रौंच, शाक व पुष्कर ही सात द्वीपे होत. ही क्रमाने लवण, इक्षुरस, सुरा, घृत, दधी, दुग्ध व जल या समुद्रांनी वेढलेली आहेत. या सर्वांत मध्यभागी जंबुद्वीप आहे. त्याच्या मध्यभागी सुवर्ण मेरूपर्वत आहे. त्याची उंची चौऱ्यांशी हजार योजने आहे. तो पृथ्वीच्या आत सोळा हजार योजने खोल गेला आहे. त्याच्या दक्षिणेस हिमवान्; हेमकूट व निषध पर्वत आहेत. व उत्तरेस नील, श्वेत व शृंगवान् पर्वत आहेत. मेरूच्या दक्षिणेस भारतवर्ष आहे. त्याच्या उत्तरेस किंपुरुष वर्ष, हरिवर्ष आहेत. मेरूच्या उत्तरेसच सर्वांत शेवटी रम्यकवर्ष, त्याच्या दक्षिणेस हिरण्मयवर्ष, त्याच्याही दक्षिणेस उत्तर-कुरू आहे. या सह वर्षांच्यामध्ये इलावृत वर्ष आहे. त्याच्या मध्यभागी मेरूपर्वत आहे. मेरूपर्वताच्या पूर्वेस मंदराचल, दक्षिणेस गंधमादन, पश्चिमेस विपुल व उत्तरेस सुपार्श्व पर्वत आहेत. या चारही पर्वतांवर क्रमशः कदंब, जंबू, पिंपळ व वट असे वृक्ष आहेत.

जंबू वृक्षामुळे या द्वीपास जंबू हे नाव पडले. त्याचे फल विशाल गजराजाएवढे असते. गंधमादन पर्वतावर पडून ती फळे फुटतात. त्यांच्या रसापासून जंबू नदी वाहते. तेथील निवासी हेच जल पितात. त्यामुळे त्यांचे शरीर व मन स्वस्थ राहते. त्यांना कधी खेद होत नाही. त्यांच्या शरीरास कधी दुर्गंध येत नाही. त्यांची इंद्रिये कधी क्षीण होत नाहीत. जंबूच्या रसामुळे नदीकाठची जमीन जांबूनद नावाच्या सुवर्णाची बनली असून सिद्धांना तिचे मोठे आकर्षण वाटते. मेरूच्या पूर्वेस भद्राश्व व पश्चिमेस केतुमाल वर्ष आहे. चैत्ररथ, गंधमादन, वैभ्राज, नंदनवन; अरुणोद, महाभद्र, असितोद, मानस ही चार सरोवरे यांनी हा परिसर

गजबजलेला आहे. शांतवान्, चक्रकुंज, कुररी, माल्यवान् व वैकंक आदी पर्वत मेरूच्या पूर्वभागात आहेत. त्रिकूट, शिशिर, पतंग, रुचक, निषध आदी दक्षिण भागात आहेत. शिखिवास, वैदूर्य, कपिल, गंधमादन, जारुधी इत्यादी पश्चिम भागात व शंखकूट, ऋषभ, हंस, नाग व कालंजर पर्वत उत्तरभागात आहेत. मेरू पर्वताच्यावर चौदा हजार योजनेपर्यंत एक विशाल पुरी असून तिला ब्रह्मसभा असे नाव आहे.

भगवान विष्णूच्या चरणांपासून निघालेली गंगा ब्रह्मपुरीत आल्यावर चार भागांत विभागली गेली आहे. याचवेळी तिला सीता, अलकनंदा, चक्षू व भद्रा अशी नावे मिळाली भारत, केतुमाल, भद्राश्व, कुरू ही द्वीपे लोकरूपी कमलाची पाने असून जठर, देवकूट हे दोन मर्यादा-पर्वत आहेत. नीलापासून निषधपर्वतापर्यंत उत्तरदक्षिण असे हे पसरलेले आहेत. त्रिशृंग व जारुधी हे उत्तरेतील वर्षपर्वत आहेत. मेरूपर्वताच्या सर्व बाजूंनी जे पर्वत आहेत त्यांवर सुंदर व मनोहर गुंफा आहेत, त्यांत सिद्ध व चारण निवास करतात. तेथेच सुरम्यवते व नगरे आहेत. लक्ष्मीने विष्णू, अग्नी, सूर्य, इंद्र आदी देवांची मोठी सुंदर मंदिरे आहेत. हे देव किन्नरांनी सेवित असून गंधर्व, यक्ष, राक्षस, दैत्य, दानव येथे रात्रं-दिवस विहार करतात. ते या पृथ्वीचा हा स्वर्गच मानतात. भद्राश्व-वर्षात भगवान विष्णू हयग्रीवाच्या रूपाने विराजमान आहे. केतुमालात वराह, भारतवर्षात कच्छप, उत्तर कुरूत मत्स्यरूप धारण करून विष्णू राहतात. किंपुरूषादी आठ वर्षांत शोक, आयास, उद्वेग, क्षुधा इत्यादी दोष नाहीत. तेथील प्रजा निर्भय व दुःखरहित आहे. सर्वांचे स्थिर आयुष्य दहा-बारा हजार वर्षांचे आहे.

समुद्राच्या उत्तरेस व हिमालयाच्या दक्षिणेस भारतवर्ष आहे. भरताचे संतान त्याचे राजे आहेत. त्याचा विस्तार नऊ हजार योजने आहे. भरतवर्ष कर्मभूमी आहे. इच्छेनुसार साधना करणाऱ्यास येथे स्वर्ग अथवा मोक्ष मिळतो. महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमान, ऋक्ष, विंध्य, पारियात्र हे सात कुलपर्वत यात आहेत. येथे सकाम साधनेने स्वर्ग व निष्काम साधनेने मोक्ष मिळतो. येथील लोक पाप केल्यावर तिर्यग्योनीत वा नरकात जातात. या भारतवर्षाचे नऊ भेद आहेत. इंद्रद्वीप, कसेतुमान

ताम्रवर्ण, गभास्तिमान, नागद्वीप, सौम्यद्वीप, गंधर्वद्वीप, वारुणद्वीप, समुद्राने वेढलेले भरतद्वीप असे हे नऊ भेद. नववे द्वीप भरत दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत एक हजार योजने लांब आहे. याच्या पूर्वेस किरात, पश्चिमेस यवन, मध्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र जातीचे लोक राहतात. शतद्रू (सतलज) चंद्रभागा (चनाब) या दोन नद्या हिमालयातून निघाल्या आहेत. पारियात्रापासून वेदस्मृती आदी नद्या निघाल्या. विंध्यातून नर्मद, सुरमा इत्यादी नद्या उगम पावल्या. तापी, पयोष्णी, निर्विंध्या कावेरी इत्यादी नद्या ऋक्षपर्वतापासून निघाल्या. सह्यपर्वतापासून गोदावरी, भीमरथी, कृष्णावेणी आदी नद्या उगम पावल्या. कृतमाला, ताम्रपर्णी, इत्यादींचे उगमस्थान मलयपर्वत आहे. शुक्तिमानापासून ऋषिकुल्या, कुमारा इत्यादी नद्या निघाल्या. त्रिसांध्य, ऋषिकुल्या इत्यादी नद्या महेंद्र पर्वतापासून उगम पावल्या. या नद्यांच्या आणखी सहस्र शाखा आहेत.

कुरू, पांचाल, मध्यदेश, कामरूप (आसाम), पौण्ड्र, कलिंग (उडिसा), मगध, दक्षिणदेश, अपरान्त, सौराष्ट्र, शूद्र, आभीर, अर्बुद (आबू), मरु (मारवाड), मालवा, पारियात्र, सौवीर, सिंध, शाल्व, शाकल्य, मद्र, अबष्ठ, पारसीक आदी प्रदेश याच भारतात आहेत. सत्ययुग, त्रेता, द्वापर, कलियुग ही युगे याच भारतवर्षात होतात. येथे नाना प्रकारचे यज्ञ होतात. येथेच श्रीविष्णूची आराधना, उपासना केली जाते.

प्लक्ष आदी सहा द्वीपे

ज्याप्रकारे जंबू द्वीप खाऱ्या पाण्याच्या समुद्रानें वेढलेले आहे त्याप्रमाणेच समुद्रासही घेरणारे प्लक्षद्वीप आहे. जंबुद्वीपाचा विस्तार एक लाख योजने तर प्लक्षाचा याच्या दुप्पट आहे. या द्वीपाचा राजा मेधातिथी. त्याला सात पुत्र झाले. ज्येष्ठ पुत्राचे नाव शांतमय. त्यानंतर क्रमाने शिशिर, सुखोदय, आनंद, शिव, क्षेमक व ध्रुव अशी नावे येतात. हे सर्व प्लक्षद्वीपाचे राजे झाले. यांच्याच नावांनी येथील सात वर्षे आहेत. त्यांच्या सीमा सांगणारे सात वर्षपर्वत आहेत. गोमेद, चंद्र, नारद,

दुंदुभी, सोमक, सुमना, वैभ्राज हे ते सात वर्षपर्वत. या रमणीय पर्वतांवर देवदेवता व गंधर्व यांची प्रजा निवास करते. त्यात पवित्र जनपद आहे. वीर पुरुष आहे. येथे कोणाचा मृत्यू होत नाही. मानसिक चिंता व व्याधी येथे नसतात. येथे अनुतप्ता, शिखा, विप्राशा, त्रिदिवा, क्रमू, अमृता व सुकृता या सात नद्या वाहतात.

या द्वीपात युगांची व्यवस्था नाही. त्रेतायुगाप्रमाणे येथील जीवन असते. येथे वर्णाश्रमधर्मानुसार चार प्रकार आहेत. चार वर्ण आहेत. आर्यक, कुरू, विविश्व, भावी हे ते चार वर्ण. या द्वीपाच्या मध्यभागी प्लक्षवृक्ष असून येथील लोक जगत्स्रष्टा सर्वेश्वर भगवान श्रीहरीची चंद्रम्याच्या स्वरूपात उपासना करतात.

शाल्मल द्वीपाचा स्वामी वीर वपुष्मान आहे. त्याला सात पुत्र. त्यांच्या नावे सात पर्वत आहेत. श्वेत, हरित, जीमूत, रोहित, वैद्युत, मानस व सुप्रभ ही त्यांची नावे. शाल्मल द्वीपाच्या द्वारा सर्व बाजूंनी इक्षुरसाच्या समुद्रास वेढले आहे. येथे सात वर्षपर्वत आहेत. रत्नांच्या खाणी आहेत. कुमुद, उन्नत, बलाहक, द्रोण, कंक, महिष व कुकुद्मान हे सात पर्वत असून द्रोणपर्वतावर खूप औषधी आहेत. श्रोणी, तोया, वितृष्णा, चंद्रा, शुक्रा, विमोचनी, निवृत्ती या येथील नद्या असून या द्वीपात कपिल, अरुण, पीत, कृष्ण या वर्णांचे लोक राहातात. हे लोक यज्ञपरायण असून भगवान विष्णूची वायुरूपात आराधना करतात. येथे शाल्मली नावाचा एक महान वृक्ष आहे.

कुशद्वीपाचा राजा ज्योतिष्मान. उद्भिद्, वेणुमान्, सुरथ, रंधन, धृती, प्रभाकर, कपिल हे त्याचे पुत्र असून यांच्या नावे पर्वत आहेत. मनुष्यांच्या बरोबर येथे दैत्य, दानव, देव, गंधर्व, यक्ष, किन्नर इत्यादींचा निवास आहे. दमी, शुष्मी, स्नेह व मंदेह या चार वर्णांचे लोक येथे आहेत. विद्रुम, हेमशैल, द्युतिमान्, पुष्टिमान्, कुशेशय, हरी व मंदराचल हे सात या द्वीपाचे वर्षपर्वत. धूतपापा, शिवा, पवित्रा, संमती, अंभस् व मही या येथील नद्या. कुशद्वीपात कुशांचे मोठे बनच आहे.

क्रौंचद्वीपाचा राजा द्युतिमान असून त्यालाही सात पुत्र आहेत. या पुत्रांच्या नावांनी द्वीपाचे सात विभाग झाले आहेत. कुशग, मंदग,

उष्ण, पीवर, अंधकारक, मुनी व दुंदुभी ही ती नावे. येथे क्रौंच, वामन, अंधकारक, देवव्रत, धर्म, पंडरीकवान, दुंदुभी हे येथील सात वर्ष पर्वत. येथेही पुष्कळ, प्रखर, धन्य व ख्यात या चार वर्णांचे लोक राहातात. गौरी, कुमुद्वती, संध्या, रात्री, मनोजवा, ख्याती व पंडरीका या येथील प्रमुख नद्या. येथील लोक यज्ञ करून रुद्रस्वरूपात भगवान जनार्दनाची उपासना करतात.

शाकद्वीपाचा स्वामी भव्य असून त्याने आपले द्वीप आपल्या सात मुलांत विभागून दिले आहे. जलद, कुमार, सुकुमार, मनीरक, कुसुमोद, मोदाकी व महाद्रुम या सात पुत्रांच्या नावांवर सात वर्षे आहेत. उदयगिरी, जलधार, रैवतक, श्याम, अंभोगिरी, आस्तिकेय, केसरी हे येथील पर्वत असून येथे शाक (सागवान) वृक्षांची वने मोठी आहेत. या वनांत गंधर्व व सिद्ध राहतात. सुकुमारी, कुमारी, नलिनी, रेणुका, इक्षू, धेनुका, गभस्ती या येथील प्रमुख नद्या होत. मग, मागध, मानस व मंदग या चार वर्णांचे लोक येथे राहतात. येथील लोक इंद्रियसंयम राखून सत्कर्मांच्या द्वारे सूर्यरूपधारी भगवान विष्णूची आराधना करतात.

पुष्करद्वीपाचे महाराज सवन असून त्याला महावीर व धातकी हे दोन पुत्र. यांच्याच नावांनी द्वीपाचे दोन विभाग झाले. मानसोत्तर नावाचा एकच वर्षपर्वत आहे. येथील माणसे दहा हजार वर्षे जगतात. रोगद्वेषाने वर्जित असे त्यांचे जीवन आहे. ईर्ष्या, असूया, भय, रोष, दोष, लोभ इत्यादी येथे नाहीत. या द्वीपात एकही मोठी नदी नाही. पुष्करद्वीपात वडाचा एक विशाल वृक्ष असून तो ब्रह्मदेवाचे उत्तम स्थान मानला गेला आहे. देव व असुर यांनी पूजित असा ब्रह्मदेव येथे आहे. पुष्कराच्या पुढे सुवर्णमयी भूमी आहे. तेथे कोणाचाच निवास नाही. त्याच्यापुढे लोकालोक पर्वत आहे. त्याच्या नंतर अंधकार आहे. अंडकटाहद्वारा तो सर्वत्र फैलावला आहे.

पाताल व नरक

या पृथ्वीच्या पाठीवर अतल, वितल, नितल़, सुतल, तलातल, रसातल, पाताल या नावांचे सात तल आहेत. त्यांची भूमी अनुक्रमे

काळी, पांढरी, लाल, पिवळी, रेताड, खडकाळ व सुवर्णमयी आहे. या सात तलांवर मोठमोठे महाल असून त्यांत दानव व दैत्य यांच्या शेकडो जाती निवास करतात. विशालकाय नागांची कुटुंबेही येथेच आहेत. पाताळातून आलेल्या नारदांनी एकदा या भूमीचे वर्णन स्वर्गलोकीच्या सभेत केले होते. हा लोक रमणीय आहे. येथे सुंदर प्रभायुक्त चमकदार मणी आहेत. येथील सूर्यकिरणे सौम्य प्रकाश देणारी आहेत. येथील चंद्रप्रकाश उजेड देणारा आहे. सर्दी वाढविणारा नाही. येथील नद, नद्या, सरोवरे, कमलवने अत्यंत मनोहर आहेत. त्यांचा उपयोग येथील दानव, दैत्य, सर्पगण यांना नेहमी होतो. येथे भगवान विष्णूचा तमोमय अवतार शेषनागाच्या रूपाने असून त्याची उपासना मनोभावे केली जाते. तो सहस्र मस्तकांनी शोभतो. त्याच्या कानांत एकच कुंडल असून मस्तकावर किरीट आहे. गळयात मण्यांची माळ आहे. त्याचे वस्त्र नीलवर्णाचे असते. या शेषभगवानाचे वास्तव्य पातालाच्या मूलभागात असून त्याने आपल्या मस्तकावर समस्त भूमंडल धारण केले आहे. जेंव्हा हा नागराज जांभई देतो तेंव्हा पर्वत, वने, समुद्र यांच्यासहित पृथ्वी डळमळते.

या पातालानंतर रौरव आदी नरक आहेत. रौरव, शौकर, रोध, तान, विशसन, महाज्वाल, तप्तकुंभ, महालोभ, विमोहन, रुधिरांध, वसातप्त, कृमीश, कृमिभोजन, असिपत्रवन, लालाभक्ष्य, पूयवह, वन्हिज्वाल, अधःशिरा, संदंश, कृष्णसूत्र, तम, अवीची, श्वभोजन, अप्रतिष्ठ, अवीची असे अत्यंत भयंकर नरक असून तेथे यमाचे राज्य असते. शस्त्र, अग्नी, विष यांच्या द्वारे येथे पापी माणसास यातना दिल्या जातात. निरनिराळ्या पापांसाठी निरनिराळे नरक असतात.

ब्रह्मांडाचा विस्तार

सूर्य व चंद्र यांच्या किरणांनी समुद्र, नदी, पर्वत यांच्यासहित पृथ्वी चमकते. पृथ्वी विस्तृत असून गोलाकार आहे. पृथ्वीपासून एक लाख योजने सूर्यमंडल व सूर्यमंडलापासून लाख योजने चंद्रमंडल आहे. चंद्रमंडलापासून लाख योजने नक्षत्रमंडल आहे. नक्षत्रमंडलात दोन लाख

योजनांवर बुध आहे. बुधापासून दोन लाख योजने शुक्र व शुक्रापासून दोन लाख योजने मंगळ, मंगळापासून इतक्याच अंतरावर देवगुरू बृहस्पती आहे. त्यानंतर दोन लाख योजने शनैश्चर व तेथून एक लाख योजने उंचीवर सप्तर्षिमंडल आहे. येथून लाख योजने ध्रुव आहे. ध्रुवाच्या नंतर महर्लोक असून त्याचा विस्तार एक कोटी योजने आहे. त्याच्यावरील जनलोकात ब्रह्मकुमार सनंदन आदी महात्मे राहतात. जनलोकाच्या नंतर तपोलोक येतो. तेथे शरीररहित असे वैराज आदी देव राहतात. तपोलोकाच्या वर सत्यलोक असून तेथे सिद्ध व मुनिजन राहतात. पायी जाता येण्यासारखा भूलोक असून भूमी व सूर्याच्या मध्ये भुवर्लोक आहे. ध्रुव व सूर्य यांच्यामध्ये स्वर्गलोक भूः, भुवः व स्वः या तीन लोकांना त्रैलोक्य म्हणतात. सात पाताळ व सात महा-लोक यांचा विस्तार म्हणजे हे ब्रह्मांड होय.

हे ब्रह्मांड सर्व बाजूंनी अंडकटाहद्वारे घेरलेले असून त्यानंतर जलाचे आवरण आहे. त्यानंतर अग्नीचे आवरण येते. नंतर वायू, आकाश, महत्तत्त्व अशी आवरणे उत्तरोत्तर आहेत. याच महत्तत्त्वाला आवरण घालून प्रधान-प्रकृती स्थित आहे. प्रधान अनंत आहे. संपूर्ण जगाचे उपादान प्रधान असून त्यालाच परा प्रकृती म्हटले आहे. त्याच्या आत कोटिकोटी ब्रह्मांडे आहेत. प्रधान-प्रकृतीत चेतनपुरुष व्यापून आहे. भगवान विष्णूची शक्ती प्रकृतिपुरुषरूप सर्व जगाची निर्मिती करते. प्रथम अव्याकृत प्रकृतीतून महत्तत्त्व आदी उत्पन्न होतात. त्यांतून देव निर्माण होतात. भगवान श्रीहरी स्वतः अविकृत राहून संपूर्ण विश्वाचे कारण होतात. या परब्रह्म विष्णूपासूनच सर्व जगताची निर्मिती झाली आहे.

आकाशात शिशुमाराच्या आकारात भगवानांचे जे तारामय स्वरूप आहे, त्याच्या पुच्छभागात ध्रुव स्थित आहे. ध्रुव स्वतः आपल्या परिधीत भ्रमण करून सूर्य, चंद्र व अन्य ग्रह यांनाही फिरवितो. समस्त नक्षत्रचक्र फिरू लागते. सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्र, ग्रह हे सर्व वायुमयी दोरीने ध्रुवाशी बांधले गेले आहेत. सूर्य आठ महिने आपल्या किरणांनी रसात्मक जलाचा संग्रह करतो व ते वर्षाकाली बरसतो. या जलाने अन्न

तयार होते. अन्नाने संपूर्ण जगाचे भरणपोषण होते. धूम, अग्नी व वायु-रूप मेघात स्थापन झालेले जल अपभ्रष्ट होत नाही. म्हणूनच मेघांना अभ्र म्हणतात. वायूच्या प्रेरणेने मेघस्थ जल पृथ्वीवर पडते. सर्व प्रकारच्या औषधी वनस्पती मग तयार होतात. यज्ञांची अनुष्ठाने होतात. सूर्याचा आधार ध्रुव, ध्रुवाचा शिशुमारचक्र व शिशुमारचक्राचा आधार स्वतः भगवान नारायण आहे.

तीर्थमय भारतवर्ष

या पृथ्वीवर अनेक तीर्थे, अनेक मंदिरे असून ज्यांचे मन शुद्ध आहे त्यांनाच या तीर्थांचा उपयोग होतो. अंतरंग शुद्ध नसेल तर तीर्थांचा काय उपयोग ? ज्याची इंद्रिये चंचल त्याला या तीर्थांचा, स्नानांचा, दानांचा, व्रतांचा, आश्रमांचा काहीच फायदा होणार नाही. पुष्कर, नैमिषारण्य, प्रयाग, धर्मारण्य, चंपकारण्य, दंडकारण्य, गया, प्रभास, कनखल, हिरण्याक्ष, चक्रतीर्थ, योगतीर्थ, मेरुकुंड, विष्णुपद, केदार, ऋणमोचनतीर्थ, मनसतीर्थ, नीलपर्वत, वसिष्ठपद, इंद्रमार्ग, शुक्रतीर्थ, रेणुकतीर्थ, अक्षयवट, धर्मतीर्थ, गायत्रीस्थान, बदरिकाश्रम, पितृवन, देवकूप, कुशप्रथन; अशा शेकडो तीर्थस्थानांची यादी देण्या-सारखी आहे.

भारतवर्ष ही तर कर्मभूमी आहे. येथे पुण्य कर्मे करून स्वर्ग वा मोक्ष याची प्राप्ती करून घेता येते. या भारतवर्षात महेन्द्र, मलय, शुक्तिमान इत्यादी पर्वत असून लहान-मोठे आणखीही पर्वत आहेत. कोलाहल, वैभ्राज, मंदर, दर्दुलाचल, वातंधय, वैद्युत, मैनाक, सुरस, तुंगप्रस्थ, नागगिरी, गोधन, पांडुराचल, पुष्पगिरी, वैजयंत, रैवत, अर्बुद, ऋष्यमूल, गोमंत, कृतशैल, कृताचल, श्रीपर्वत, चकोर इत्यादी पर्वत प्रसिद्ध आहेत. गंगा, सिंधू, सरस्वती, चंद्रभागा (चनाब), यमुना, शतद्रू (सतलज), विपाशा (ब्यास), वितस्ता (झेलम) इरावती (रावी), कुहू (गोमती), धूतपापा, बहुदा, दृषद्वती, देविका, चक्षू, निष्ठीवा, गंडकी, कौशिकी अशा अनेक नद्या भारतवर्षात आहेत. या हिमालयातून निघालेल्या नद्या. देवस्मृती, देववती, वातघ्नी, सिंधू, वेण्या, चंदना,

सदानीरा, मही, चर्मण्वती, वृषी, विदिशा, वेदवती, क्षिप्रा, अवंती या नद्या पारियात्र पर्वतापासून निघाल्या. शोण, महानदी, नर्मदा, सुरथा, क्रिया, मंदाकिनी, दशार्णा, चित्रकूटा, चित्रोत्पला, वेत्रवती, कर्मोदा, पिशाचिका, अतिलघुश्रोणी, विपाप्मा, शैवला, सधेरुजा, शक्तिमती, शकुनी, त्रिविदा, क्रमू, वेगवाहिनी या नद्या ऋक्षपर्वतातून निघाल्या. चित्रा, पयोष्णी, निर्विंध्या, तापी, वेणा, वैतरणी, सिनीवाली, कुमुद्वती, तोया, महागौरी, दुर्गा, अन्तश्शिला या विंध्याचलातून निघालेल्या नद्या. गोदावरी, भीमरथी, कृष्णवेणा, तुंगभद्रा, सुप्रयोगा, पापनाशिनी या नद्या सह्यगिरीपासून निघाल्या. कृतमाला, ताम्रपर्णी, पुष्पवती, उत्पलावती या मलयाचलात उगम पावल्या. पितृकुल्या, सोमकुल्या, ऋषिकुल्या, वंजुला, त्रिदिवा, लांगलिनी व वंशधरा या महेंद्रपर्वतातून उगम पावल्या. सुविकाला, कुमारी, मनुगा, मंदगामिनी, क्षया, पलाशिनी या शुक्तिमान पर्वतातून आल्या. यांखेरीज अनेक छोटचा मोठचा नद्या असून त्या सर्व सरस्वती, गंगा या नद्यांप्रमाणे पवित्र आहेत. मत्स्य, मुकुटकुल्य, कुंतल, काशी, कोसल, अंध्रक, कलिंग, शमक, वृक ही सर्व मध्यप्रदेशाची जनपदे होत. या भारतवर्षाचे संपूर्ण वर्णन कोण करू शकेल ?

५ सदाचार दर्शन

गृहस्थाचा सदाचार

गृहस्थ पुरुषाने हव्य, कव्य व अन्न यांनी देव, पितर, अतिथी यांचे पूजन करावे. संपूर्ण भूत, भरणपोषण योग्य कुटुंबी जन, पशू, पक्षी, मुंग्या, संन्यासी, भिक्षुक, पथिक, सदाचारी ब्राह्मण या सर्वांचा परामर्श गृहस्थाने घ्यावा. गृहस्थाने नेहमीच सदाचाराचे पालन करावे. आचारहीन मनुष्यास सुख कोठले ? गृहस्थाने धर्म, अर्थ, काम या तीन साधनांचे पालन करावे. आपल्या प्राप्तीचा एक चतुर्थांश भाग पारलौकिक कल्याणासाठी राखून ठेवावा. ब्राह्ममुहूर्तास उठावे. जागे झाल्यावर धर्म व अर्थ यांचे चिंतन करावे. शय्येवरून उठून नित्यकर्मे करून, स्नानादी उरकून पूर्वाभिमुख बसून संध्योपासन करावे. आकाशात तारे

दिसत आहेत तोवर प्रातःकालची संध्या करावी. सूर्यास्ताच्या आधी संध्याकाळी करावी. वाईट गोष्टी बोलणे, खोटे बोलणे, मुखातून कठोर वचन काढणे, असत् शास्त्र पढणे, नास्तिकता स्वीकारणे, दुष्ट पुरुषाची सेवा करणे, या गोष्टी सोडून द्याव्यात. मन वश करून प्रतिदिन प्रातः-काली व सायंकाली हवन करावे. उदय व अस्त या वेळी सूर्याकडे पाहू नये. केस विंचरणे, दर्पण पाहाणे, दात घासणे, अंजन घालणे, देवांना तर्पण करणे या गोष्टी पूर्वाण्हकालातच कराव्यात.

ग्राम, निवासस्थान, तीर्थ, क्षेत्र, शेत, गोशाला येथे मलमूत्र विसर्जित करू नये. परक्या स्त्रीस नग्न पाहू नये. आपल्याच विष्ठेकडे पाहू नये, रजस्वला स्त्रीचे दर्शन, तिचा स्पर्श, तिच्याशी भाषण या गोष्टी वर्जित आहेत. पाण्यात मलमूत्राचा त्याग करू नये. तेथे मैथुन करू नये. गृहस्थाने आपल्या वैभवानुसार देव, पितर, मनुष्य, अन्य प्राणी यांचे पूजन करून मग भोजन करावे. आचमन करून, हात-पाय धुऊन, उत्तरेस तोंड करून मौनभावाने भोजन करावे. भोजनाच्या वेळी मनास अन्यत्र नेऊ नये. अन्नाच्या दोषांची चर्चा करू नये. उष्टे अन्न खाऊ नये. दुसऱ्याचे आसन, दुसऱ्याची शय्या, त्याचे भांडे यांना स्पर्श करू नये.

गुरुजन येताच त्यांना बसण्यासाठी आसन द्यावे. उठून त्यांना प्रणाम करावा. त्यांना अनुकूल असा वार्तालाप करावा. एक वस्त्र धारण करून भोजन वा देवपूजन करू नये. नग्न होऊन कधी स्नान व शयन करू नये. दोनही हातांनी डोके खाजवू नये. ब्राह्मण, अग्नी, गाय, सूर्य यांच्याकडे मुख करून मूत्रत्याग करू नये. दिवसा उत्तरेस व रात्री दक्षिणेस तोंड करून मलमूत्राचा त्याग करावा. गुरूच्या दुष्कर्माची चर्चा करू नये. ते क्रुद्ध झाले तर विनयाने त्यांना प्रसन्न करून घ्यावे. ब्राह्मण, राजा, दुःखी मनुष्य, विद्यावृद्ध, गर्भिणी, रोगव्याकुल, मुका, आंधळा, बहिरा, मत्त, उन्मत्त, व्यभिचारिणी स्त्री, उपकारी, बालक, पतित; यांपैकी कोणी समोरून आले तर त्यांना वाट देण्यासाठी आपण बाजूस सरून चालावे. विद्वान पुरुष, देवालय, चैत्यवृक्ष पुरुष व गुरू यांना उजवीकडे ठेवून चालावे. दुसऱ्यांनी वापरलेल्या माला, पादत्राणे, वस्त्रे स्वतः वापरू नयेत. चतुर्दशी, अष्टमी, पौर्णिमा व पर्वदिन या

दिवशी तैलाभ्यंग व स्त्रीसहवास करू नये. पाय हालवीत बसू नये. पायाने पाय दाबू नये. कोणास लागेल असे बोलू नये. निंदा व चहाडी करू नये. दंभ, अभिमान, कडवट व्यवहार करू नये. मूर्ख, उन्मत्त, व्यसनी, कुरूप, हीनांग, निर्धन यांची चेष्टा करू नये. आसनास पायाने खेचून त्यावर बसू नये.

पूर्व वा उत्तर दिशेकडे तोंड करून दात धुवावेत. धुताना मौन राहावे. दातांना निषिद्ध असलेले वृक्ष व लतावेली यांचा त्याग करावा. उत्तर व पश्चिम दिशांकडे डोके करून कधी झोपू नये. दुर्गंधी येणाऱ्या पाण्यात स्नान करू नये. ग्रहणाच्या वेळी रात्री स्नान करावे. एऱ्हवी दिवसा स्नान करावे. स्नान केल्याशिवाय चंदन कधी लावू नये. वस्त्रे व आभूषणे यांची अदलाबदल करू नये. कमजोर वा फाटके वस्त्र नेसू नये. ज्यात किडे पडले आहेत, केस पडले आहेत, कुत्र्याने तोंड लावले आहे, ज्याचा सारभाग गेला आहे असे दूषित अन्न खाऊ नये. शिळे वास येणारे अन्न खाऊ नये. सूर्योदय व सूर्यास्त यावेळी झोपू नये. विद्वान पुरुषाने कधी परक्या स्त्रीशी समागम करू नये. परस्त्रीसंगम इष्ट, पूर्त आयुष्य यांचा नाश करणारा आहे. परस्त्रीगमन हे फार विघातक आहे.

स्वच्छ, फेसाशिवाय, दुर्गंधीशून्य पवित्र जलाने आगमन करावे. यानंतर देवपूजा, श्राद्धविधी इत्यादी करावे. दात वाजवू नयेत. आपल्याच शरीरावर ताल धरू नये. संध्याकाळी मैथुन व रस्ता चालणे मना आहे. पूर्व वा उत्तर दिशेस तोंड करून क्षौर करावे. जी कन्या अंगहीन, रोगिणी असेल तिच्याशी विवाह करू नये. ईर्ष्येचा त्याग करावा. दिवसा झोपू नये, मैथुन करू नये. कधी कोणत्याही जीवास पीडा देऊ नये. रजस्वला स्त्री सर्व वर्णांच्या पुरुषांसाठी चार रात्रींसाठी त्याज्य आहे. कन्येचा जन्म नको असेल तर पाचव्या रात्रीही स्त्रीसहवास करू नये. सहाव्या रात्री समागम करावा. पुत्र होतो. पर्व आदी समयी मैथुन केल्यास विधर्मी संतती होईल. संध्याकाळी समागम केल्यास नंपुसक संतान होईल. चतुर्थी, नवमी, चतुर्दशी या दिवशी क्षौर करू नये. विनयरहित उद्दंड पुरुषाशी संभाषण करू नये. हजामत केल्या

वर, वमन झाल्यावर, स्त्रीसंग केल्यावर, स्मशानातून आल्यावर वस्त्रा-सहित स्नान करावे. नेहमी मंगलकारक वेष धारण करावा. स्वच्छ वस्त्र वापरून पांढरी पुष्पमाला घालावी. उद्धट, उन्मत्त, मूढ, अविनीत, शीलहीन, अपव्ययी, वैरी, कार्यात असमर्थ, निंदित, निर्धन, विवादप्रिय अशा पुरुषांची संगत धरू नये. सुहृद, यज्ञदीक्षित, राजा, स्नातक, श्वशुर यांचा आदा करावा.

आपल्या घरी देवाचे पूजन करावे. आहुती द्यावी. पहिली ब्रह्म-देवास, दुसरी प्रजापतीस, तिसरी गृह्यास, चौथी कश्यपास, पाचवी अनुमतीस द्यावी. बलिवैश्वदेव करावा. पर्जन्य, जल, पृथ्वी वायू, ब्रह्मा, अंतरिक्ष, सूर्य यांना बली द्यावा. विश्वदेव, विश्वभूत यांना बली द्यावा. विद्वान पुरुषाने जल व अग्नी बरोबर घेऊ नये. गुरू, देव, पिता, ब्राह्मण यांच्याकडे पाय पसरून बसू नये. बछडयास दूध पाजणाऱ्या गायीस सतावू नये. ओंजळीने पाणी पिऊ नये. शौचास विलंब लावू नये. मुखाने आग फुंकू नये. जेथे ऋण देणारा धनी, चिकित्सा करणारा वैद्य, श्रोत्रिय ब्राह्मण, जलपूर्ण नदी नसेल तेथे निवास करू नये. दुष्ट राजाच्या राज्यात सुख कोठून मिळणार ? ज्या राष्ट्रात किसान खूप आहेत, पण ते घमेंडखोर नाहीत, जेथे सर्व प्रकारचे अन्न पिकते तेथे निवास करावा. जेथे शेजारी चांगले असतील, शेती पिकणारी असेल तेथेच राहावे.

तूप व तेल यांत केलेले अन्न फार वेळचे असेल, वास येत असेल तर ते खाऊ नये. गहू, जव, गोरसमय पदार्थ ग्रहणयोग्य आहेत. शंख, पत्थर, सोने, चांदी, रस्सी, कपडा, साग मूल, फल, मणी, हिरा, मोती इत्यादींची शुद्धी जलाने होते. ज्या पात्रात तूप वा तेल ठेवले होते त्याची शुद्धी गरम पाण्याने होईल. सूप, मृगचर्म, मुसळ, उखळी, कपडयांचा ढीग यांची शुद्धी पाणी शिंपडून होते. वल्कलाची शुद्धी जल व माती यांनी होते. भिक्षेचे अन्न, कारागिराचा हात, बाजारातील भाजी, या वस्तू नेहमीच शुद्ध मानाव्यात. वाहाते जल, त्यास दुर्गंधी येत नसेल तर शुद्ध मानावे. धूळ, अग्नी, घोडा, गाय, छाया, किरणे, वायू, भूमी, पाण्याचे थेंब, माशी यांचा संबंध अशुद्ध वस्तूशी आला तरी त्या दूषित होत नाहीत. बकरे, घोडा यांची मुखे शुद्ध आहेत, पण

गायीचे नाही. अजाणता दूषित अन्न खाल्ले तर तीन रात्र उपवास केला म्हणजे शुद्धी होते. रजस्वला स्त्री, नवप्रसूता स्त्री, चांडाल व प्रेतवाहक यांचा स्पर्श झाला तर स्नान करावे. देवासंबंधीची सरोवरे, नद्या यांत स्नान करावे. लोकनिंदित पुरुष व विधवा स्त्रिया यांच्याशी भाषण करू नये. रजस्वला स्त्री, पतित, प्रेत, विधर्मी, प्रसूता स्त्री, नपुंसक, चांडाळ, प्रेत नेणारा, परस्त्रीगामी पुरुष यांचे दर्शन झाल्यास विद्वान पुरुषाने सूर्याचे दर्शन घ्यावे. अभक्ष्य पदार्थ, भिक्षुक, पाखंडी, मांजरी, गाढव, कोंबडा, पतित, जातिबहिष्कृत, चांडाल, ग्रामडुक्कर इत्यादींचा स्पर्श झाल्यास स्नान केल्याने शुद्धी होईल. ज्या घरात प्रतिदिन नित्य-कर्मांची अवहेलना होते व जे ब्राह्मणांनी सोडले आहे, तेथे राहणारा पापभोगी समजावा. नित्यकर्माचा त्याग कधी करू नये. मरणाशौच, जननाशौच असेल तर मात्र नित्य कर्म न करावे.

वर्णाश्रमधर्माचे निरूपण

ब्राह्मणाने नेहमी दान, दया, तपस्या, देवयज्ञ, स्वाध्याय यांत तत्पर व्हावे. तर्पण व अग्निहोत्र प्रतिदिन व्हावे. सर्व लोकांचे हित साधणे, कोणाचेही अहित न करणे, हे ब्राह्मणाचे कर्तव्य आहे. सर्व प्राण्यांशी त्याने मैत्री ठेवावी. केवळ ऋतुकालातच ब्राह्मणाने पत्नीशी समागम करावा. क्षत्रियांनी ब्राह्मणास दान करावे, यज्ञांच्या द्वारा भगवानाचे यजनपूजन करावे. शस्त्र चालवून जीवनाचे रक्षण करावे. पृथ्वीचे पालन करावे. पृथ्वीचे पालन केल्यानेच राजा कृतार्थ होतो. पशुपालन, शेती, व्यापार ही वैश्यांची कामे. वेदांचे अध्ययन, यज्ञ, दान धर्म इत्यादी गोष्टी वैश्यानेही कराव्यात. शूद्राने सेवाभाव पत्करून अर्थार्जन करावे. खरेदी-विक्री, शिल्पकर्म ही कामेही शूद्रांनी करावीत.

उपनयन संस्कार झाला की ब्रह्मचारी बालकाने एकचित्त बनून गुरूच्या घरी राहून वेदांचे अध्ययन करावे. सूर्योपस्थान, अग्निहोत्र, गुरूस अभिवादन यांत तत्पर असावे. गुरूचा आदेश मिळाल्यानंतरच भिक्षेचे अन्न ग्रहण करावे. आचार्यांसाठी समिधा आणाव्यात. पाणी आणावे. गुरूची दक्षिणा द्यावी. त्याची अनुज्ञा घ्यावी व मग गृहस्थाश्रम

स्वीकारावा. विधिपूर्वक स्त्रीशी विवाह करून आपल्या वर्णास उचित असे कर्म करून धन मिळवावे. श्राद्धाच्या द्वारे पितर, यज्ञद्वारे देव, अन्नाने अतिथी, स्वाध्यायाने मुनी, संतानोत्पत्तीने प्रजापती, बलिवैश्वदेवाने संपूर्ण भूते व सत्यवचन यांनी संपूर्ण जगाचे पूजन करावे. भिक्षेवर निर्वाह करणारा ब्रह्मचारी व संन्यासी गृहस्थांवरच अवलंबून असतो. म्हणून गृहस्थधर्म हा सर्वांत श्रेष्ठ आहे. वेदांचे अध्ययन करणारा, तीर्थस्नान करणारा, पृथ्वीच्या दर्शनासाठी भूतलावर भ्रमणारा, ज्याला घर नाही, जो निराहार राहतो अशा लोकांना आधार गृहस्थाचा असतो. असा ब्राह्मण घरी आला तर गृहस्थाने त्याचा आदरसत्कार करावा. त्याला शय्या, आसन, भोजन द्यावे. गृहस्थाने दुसऱ्याची अवहेलना, आपल्यांतील अहंकार, दंभ, परनिंदा, कटुवचन यांचा त्याग करावा.

गृहस्थ वृद्ध झाला की त्याने आपल्या स्त्रीचा भार पुत्रांवर सोपवून स्वतः तपस्येसाठी वनात जावे. स्त्री बरोबर असली तरी चालेल. तेथे पाने, फळे, मुळे यांचा आहार घेऊन भूमीवर निजावे. डोक्याचे केस, दाढी, मिशा कापल्या नाही तरी चालेल. एखाद्या पुरुषाने संन्यास घेतला तर सर्व त्रैवर्णिक कर्मांचा त्याग त्याने करावा. मित्र व शत्रू यांच्यांत समभाव राखावा. सर्व प्राणिमात्रांचे मित्र बनावे. सर्व आसक्तींचा त्याग करावा. गावात एक रात्र, नगरात पाच रात्र राहावे. जीवननिर्वाहासाठी संन्यासी माणसाने भिक्षा मागावी. भिक्षा मिळाली नाही तर खेद मानू नये. प्राणयात्रा सुरू राहील इतकीच भिक्षा मागावी. विषयासक्तीपासून त्याने दूर असावे. आदरसस्कार, कामक्रोधादी विकार यांच्यापासून त्याने अलिप्त असावे.

उच्च वर्णाची अधोगती, नीच वर्णाची ऊर्ध्वगती

ब्रह्मपुराण चातुर्वर्ण्याची व्यवस्था वर्णन करीत असले तरी ही काही पक्की जलबंद व्यवस्था नाही. पार्वतीनेच एकदा शंकरांना विचारले,

‘ वैश्य शूद्रभावास कसे येतात ? क्षत्रिय वैश्य कसे होतात ? ब्राह्मण कोणत्या कर्मांनुसार क्षत्रिय होतात ? ब्राह्मण-क्षत्रिय शुद्र कसे

होतात ?

'देवी, ब्राह्मणत्वाची प्राप्ती अत्यंत कठीण आहे. शुभे, ब्राह्मण स्वभावानुसार होतो. याच प्रकारे क्षत्रिय, वैश्य, शूद्र स्वभावानुसार होतात. ब्राह्मण पापकर्म करून भ्रष्ट होतात, उत्तम वर्ण मिळूनही ते पतित होतात. जे विप्र लोभ व मोह यांचा आश्रय करतात ते वैश्य होतात. वैश्यानं शूद्रोचित कर्म केलं तर तो शूद्र बनतो. आपल्या धर्मापासून भ्रष्ट झालेला ब्राह्मण शूद्र होतो. वर्णापासून भ्रष्ट झाला की तो ब्रह्मलोकातूनही नरकात जातो वा शूद्रजातीत जन्म घेतो. कर्मभ्रष्ट ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तीनही शूद्रभावास प्राप्त होतात. आणि जो शूद्र ज्ञानाविज्ञानाचा व पवित्र धर्माचा अवलंब करून जीवननिर्वाह करतो, धर्म जाणतो त्याला धर्माचं फल मिळतं.

'देवी, जन्मानं ब्राह्मण असूनही जो दुराचारी आहे तो ब्राह्मणत्व सोडून शूद्रच बनतो आणि शुद्धात्मा व जितेन्द्रिय शूद्र शुद्ध कर्मांनी अनुष्ठान करून द्विज जातीपेक्षाही अधिक शुद्ध बनतो. जन्म, संस्कार, वेदाध्ययन, संतती हे काही द्विजत्वाचं लक्षण वा कारण नाही. द्विजत्वाचं मुख्य कारण सदाचार आहे. जगतात आचरणानंच ब्राह्मण मानले जातात. उत्तम आचरणाचा शूद्रही ब्राह्मणत्व प्राप्त करू शकतो. पार्वती, ब्रह्मभाव सर्वत्र सम आहे. निर्मल, निर्गुण ब्रह्मस्थिती द्विज आहे. ब्राह्मणत्व प्राप्त करून यत्नपूर्वक त्याचे जतन करावे. शूद्र धर्माचरणामुळे ब्राह्मण होतो व ब्राह्मण धर्मभ्रष्ट बनून शूद्रत्वास जातो. देवी,

स ब्राह्मण्यं समुत्सृज्य शूद्रो भवति तादृशः
कर्मभिः शुचिभिर्देवि शुद्धात्मा विजितेन्द्रियः ।
शूद्रोऽपि द्विजवत्सेव्य इति ब्रह्माब्रवीत्स्वयम् ।
स्वभावकर्मणा चैव यश्च शूद्रोऽधितिष्ठति ॥

असा एक भक्त चांडाल

ब्राह्मण व शूद्र यांच्या गुणावगुणांचा केवळ तात्त्विक विचारच ब्रह्मपुराण करते असे नव्हे, तर एका भगवद्भक्त चांडालाची कथाही

ब्रह्मपुराण विस्ताराने सांगते. अवन्तिकापुरीत एक चांडाल भक्त राहत होता. संगीतात त्याला मोठी रुची असून एकादशीस तो मोठ्या निष्ठेने उपवास करी. भजनात व नामस्मरणात दंग होई. भगवंतांच्या गुण-लीला तन्मयतेने तो गात असे. एकदा चैत्र वद्य एकादशी आली. भगवान विष्णूसाठी उत्तमोत्तम फुले मिळविण्यासाठी तो एका जंगलात गेला. क्षिप्रा नदीच्या तटावर एक वृक्ष त्याला दिसला. याच ठिकाणी एका राक्षसाने त्याला पाहिले व पकडून खाण्यासाठी राक्षस सिद्ध झाला. चांडाल दीनवाणीने म्हणाला,

‘ बंधो, आज तू मला खाऊ नकोस. उद्या सकाळी खा ना. शपथ-पूर्वक सांगतो की, मी उद्या सकाळी परत येथे येईन. भगवान विष्णू-साठी मला आज रात्रभर जाग्रण करायचे आहे, तू या कामात विघ्न आणू नकोस. ’

राक्षसाने चांडालाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्याला सोडून दिले. फुले वगैरे घेऊन चांडाल भगवान विष्णूच्या मंदिराशी आला. भगवंताला फुले अर्पण करण्यासाठी त्याने ती ब्राह्मणाला दिली. ब्राह्मणाने ती चांगली पाण्यात धुऊन भगवंताला वाहिली व तो परत घरी गेला. पण चांडाल मात्र मंदिराच्या बाहेर उपवासी राहून रात्रभर प्रभूचे नामचिंतन करीत जागत राहिला. रात्रभर भगवत्-चिंतन करून तो सकाळी वचन दिल्याप्रमाणे राक्षसाकडे आला. त्याला पाहून राक्षसाला नवल वाटले. चांडालाचे भगवत्प्रेम पाहून तो ब्रह्मराक्षस नरमला व म्हणाला,

‘ भय्या, तू बरंच पुण्य संपादन केलं आहेस. ते मला देशील तर त्या बदल्यात मी तुला सोडून देईन. ’

‘ बंधो, मी तुला माझं शरीर केव्हाच अर्पण केलं आहे. आता इतर व्यर्थ गोष्टी कशासाठी बोलतोस ? तू मला खुशाल खाऊन टाक.’

‘ भय्या, तू खरंच पुण्यवान आहेस. तू आपल्या धर्मकर्मानं सुरक्षित आहेस. कोण असा दुष्ट व दुराचारी असेल की तो तुला त्रास देईल ? पण तू खरंच माझ्यावर कृपा कर, मला तुझं पुण्य दे ना. मी काही

तुला खाणार नाही. वाटल्यास तू घरी परत जा.'

'निशाचरा, मी तुला वचन दिलं आहे. मी घरी कसा परत जाऊ? आणि तुला पुण्य तरी कसं देऊ?'

'भय्या, रात्र संपता संपता तू एक भगवंताचं गीत गायिलंस, त्याचं तरी पुण्य मला देऊन माझा उद्धार करशील?'

'राक्षसा, मी तुला या माझ्या शेवटच्या भक्तिगीताचं पुण्य देऊ शकेन, पण एक अट आहे; तू कोणत्याही प्राण्याचा वध करता कामा नये.'

ब्रह्मराक्षसाने चांडालाचे म्हणणे मान्य केले. चांडालानेही अर्ध्या रात्री गायिलेल्या भक्तिगीताचे पुण्य राक्षसास दिले. ब्रह्मराक्षसाने चांडालास प्रणाम केला व तो पृथूदकतीर्थाकडे निघून गेला. पण त्याच्या मनाची खंत गेली नाही. या तीर्थस्थानी निराहार राहून संकल्पपूर्वक राक्षसाने प्राण सोडला. इकडे चांडालाच्या मनातही या सर्व प्रसंगाने वैराग्य निर्माण झाले व त्यानेही आपला सर्व परिवार सोडून पापरहित होऊन तीर्थाटन सुरू केले.

भगवंताच्या भक्तीत जातपात, उच्चनीच असा भेदभाव नाही. पण भक्तीबरोबर आचारही शुद्ध पाहिजे, असाच एक थोर निष्कर्ष ब्रह्मपुराणातील ही चांडाळकथा दर्शविते.

यमलोक व विविध नरक

कर्म जसे ज्या भावनेने कराल त्यानुसार कर्त्यास त्याचे फल मिळेल. या दृष्टीने यमलोकाचा मार्ग, त्याची चार द्वारे, नरक इत्यादींचा विचार ब्रह्मपुराणाने केला आहे. यमलोक व मनुष्यलोक यांच्यांत शहाऐंशी हजार योजनांचे अंतर आहे. त्याकडे जाण्याचा मार्ग तापलेल्या लोखंडाप्रमाणे तप्त असतो. प्रत्येक जीवास यमलोकाच्या मार्गाने जावे लागते. पुण्यात्मा पुरुष पुण्यलोकात व नीच पापाचारी मनुष्य पापलोकात जातो. यमलोकात बावीस नरक आहेत. त्यांत माणसास निरनिराळ्या यातना भोगाव्या लागतात. नरक, रौरव, रौद्र, शूकर, ताल, कुंभीपाक, महाघोर, शाल्मल, विमोहन, कीटाद, कृमिभक्ष,

लालाभक्ष, भ्रम, रक्ताची नदी, अग्निज्वाला, महारौद्र, संदंश, शुनभोजन, घोर वैतरणी अशी काही नावे या नरकांची आहेत. या मार्गावर वृक्षांची छाया नाही, विहिरी नाहीत, तलाव नाहीत, धर्मशाळा नाहीत, पुष्करणी नाहीत, नदी नाही की पर्वत नाही. या रस्त्यावरून प्रत्येक पापी माणसास जावेच लागते. जल, अग्नी, विष, क्षुधा, रोग, पर्वतावरून पडणे, असे एखादे निमित्त होऊन देहधारी जीवाचा मृत्यूही होतो. ज्याच्या त्याच्या कर्मानुसार ज्याला त्याला मृत्यू येतो.

या मृत्यूच्या वेळी यमराजाचे दूत हातांत हातोडी, मुद्‌गल अशी आयुधे घेऊन येतात. ते भयंकर असतात. त्यांच्या अंगांतून दुर्गंधी येत असते. यमदूत जीवाला त्याच्या कर्मानुसार फासाने बांधतात. मृत्यूच्या वेळी जीवास फारच वेदना होतात. तो अत्यंत व्याकुळ होतो. हा असा यममार्ग अंधाराने भरलेला, अपार, अत्यंत भयंकर, दुर्गम आहे. यमदूत जीवाला पाशबद्ध करून मुद्‌गलाने पिटतात. हे यमदूत दिसायला मोठे क्रूर, भयानक, विकराल असतात. त्यांच्या हातांतील आयुधांतून आग बाहेर पडत असते. हे यमदूत जीवास पाशात अडकवितात. त्याच्या पायांत बेडचा घालतात. बेडीची साखळी वज्राप्रमाणे कठोर असते. यमदूत जीवास जोराची मारपीट करतात. जीव बिचारा दुःखी होऊन मूर्च्छित होऊन पडतो. भयाने कंपित होतो. यमदूत त्याला ओढीत, फरफटत नेतात. शक्ती, भिंदिपाल, खड्‌ग, तोमर, बाण, शूल इत्यादी आयुधांनी ते जीवाचे अंग विदीर्ण करतात. कुत्री, वाघ, लांडगे, कावळे मग त्या जीवाच्या शरीरातील मांस लचके तोडून खातात. ज्याच्या त्याच्या कर्मानुसार ही फळे भोगावी लागतात.

असा हा यमलोकीचा मार्ग अत्यंत दुर्गम व अग्नीसारखा प्रज्वलित आहे. जीवाला रडविणारा हा रौरव नरक आहे. येथे यमदूत विविध अस्त्रांनी जीवास मारतात. यमाची ही नगरी फार मोठी, लाख योजनांची आहे. यमपुरीस चार मोठे दरवाजे आहेत. तिचे पूर्वद्वार फारच सुंदर आहे. त्यावर शेकडो ध्वजा फडकत असतात. हिऱ्यामोत्यांच्या माळा तेथे लावलेल्या असतात. गंधर्व व अप्सरा तेथे गीत व नत्य करतात. या द्वाराने देव, ऋषी, योगी, गंधर्व, सिद्ध, यक्ष, विद्याधर

यांना प्रवेश असतो. या पुरीचे उत्तरद्वार घंटा, छत्री, चवरी व नाना रत्ने यांनी अलंकृत झालेले असते. वीणा व वेणू यांचा मधुर ध्वनी उमटत असतो. गीत, मंगलगान, ऋग्वेद, आदींचे सुमधुर शब्द उमटत असतात. या द्वाराने पुण्यात्मे, धर्मज्ञ, सत्यवादी यांचा प्रवेश होतो.

पश्चिमद्वारही रत्नांनी विभूषित असते. चित्रविचित्र मण्यांच्या पायऱ्या येथे असतात. भेरी, मृदंग, शंख इत्यादी वाद्यांचा ध्वनी येथे होत असतो. भक्त, शूर-वीर, तपस्वी या द्वाराने प्रवेश करतात. या पुरीचे दक्षिणद्वार अत्यंत भयानक आहे. तेथे निरंतर हाहाकार माजलेला असतो. नेहमीच अंधार असतो. काटे, विंचू, साप, वाघ, लांडगे, सिंह, गिधाडे, कुत्री इत्यादी प्राणी येथे असून त्यांच्या मुखांतून आग निघत असते. सर्व प्रकारची पापे करणाऱ्यांना हा मार्ग असतो. ब्राह्मण, गाय, बालक, वृद्ध, रोगी, शरणागत, विश्वासू, स्त्री, मित्र इत्यादींची हत्या करणे, अगम्या स्त्रीचा भोग घेणे, दुसऱ्याचे धन हरण करणे, दुसऱ्यास विष देणे, दुसऱ्याच्या घरास आग लावणे, दुसऱ्याची भूमी, गृह, शय्या, वस्त्र, आभूषण चोरणे, खोटे बोलणे, ग्राम, नगर, राष्ट्र यांना दुःख देणे, खोटी साक्ष देणे, कन्या विकणे, अभक्ष्य भक्षण करणे, पुत्री व पुत्रवधू यांच्याशी समागम करणे, माता-पित्यास कटू वचन ऐकविणे; इत्यादी महापातकांचे धनी या दक्षिणद्वाराने यमपुरीत येतात.

हे दक्षिणद्वार अतिशय भयानक व घोर आहे. हिंस्र प्राणी, भूत, प्रेत, पिशाच, राक्षस इत्यादींनी हे द्वार नेहमीच गजबजलेले असते. त्यांना पाहूनच पापी जीव मूर्च्छित होतो. यमदूत त्याला बांधून चांगले मारतात. तीक्ष्ण काटे, बोचरे दगड, भयानक चिखल, दावानल, बर्फ, वाळू, दूषित जल, विषारी प्राणी यांनी हा मार्ग नेहमी भरलेला असतो. धूलिमिश्रित वायू, चमकणारी वीज, बाणांची वृष्टी, वादळी धूळ, अत्यंत वर्षा, थंड हवा, निर्जल, दुर्गम प्रदेश यांतून जीवाला रडत-खडत मार्ग काढावा लागतो. त्याचा कंठ सुकून जातो. ओठ व टाळू कोरडी पडतात. शरीर दुर्बल बनते. खाण्यास अन्न नाही. पिण्यास पाणी नाही. यमधर्म जीवाला दरडावत असतो. यमदूत शस्त्रांनी त्याला मारहाण करतात. यमराजापुढे चित्रगुप्त या पापी जीवाच्या दुष्कृत्यांचा

पाढा वाचतो. धर्मराज यमाच्या आज्ञेनुसार या जीवास शिक्षा सहन करावी लागते. नाना प्रकारच्या नरकांत त्याची रवानगी होते. ज्याच्या त्याच्या कर्मानुसार जीवाला त्या त्या नरकात जावे लागते. महावीची नरक रक्ताने भरलेला असून त्यात वज्राप्रमाणे काटे असतात. कुंभीपाक नरकातील भूमी तप्त असते. गरम वाळू व निखारे यांनी ती आच्छादलेली राहाते. ब्राह्मणाची हत्या, पृथ्वीचे अपहरण इत्यादी पापे करणाऱ्यांना या नरकात यावे लागते. रौरव नरक वज्रमय बाणांनी भरलेला असतो. मंजूष नावाचा नरक तप्त लोखंडाने भरलेला असतो. पू, मूत्र, विष्ठा यांनी भरलेला अप्रतिष्ठ नावाचा नरक असतो. महाप्रभ, जयन्ती, शाल्मल, महारौरव, तामिस्र, असिपत्रवन, काकोल, कुड्मल, महाभीम, महावट, तिलपाक, वज्रकपाट, निरुच्छ्वास, अंगारोपचय, महापायी, महाज्वाल, क्रकच, क्षुरधार, अंबरीष, वज्रकुठार, परिताप, कालसूत्र, कश्मल, उग्रगंध, दुर्धर, वज्रमहापीड, अशा शेकडो नरकांची योजना विविध प्रकारच्या पापांनुसार यमपुरीत केली आहे.

या नरकांतून सुटण्याचेही मार्ग आहेत. धर्मपरायण होऊन अहिंसेचे पालन करावे, गुरुजनांची सेवा करावी, देवब्राह्मणांची पूजा करावी, दान द्यावे, सत्य बोलावे, दुसऱ्यावर उपकार करावा, फलपुष्पांची उद्यानें सजवावीत, विष्णूवर भक्ती ठेवून जितेन्द्रियभावाने यात्रा करावी, यज्ञ करावा, असे काही उपाय आहेत. मुख्य म्हणजे,

ये च मांसं न खादन्ति सत्यशौचसमान्विताः ।
तेऽपि यान्ति सुखेनैव धर्मराजपुरं नराः ।।
गोसहस्रं तु यो दद्याद्यस्तु मांसं न भक्षयेत् ।
समावेतौ पुरा प्राह ब्रह्मा वेदविदां वरः ।।
सर्वतीर्थेषु यत्पुण्यं सर्वयज्ञेषु यत्फलम् ।
अमांसभक्षणे विप्रास्तच्च तच्च च तत्समम् ।।

जे सत्य व पवित्रता यांनी युक्त राहून मांसाहार करीत नाहीत तेच धर्मराजाच्या नगरीची यात्रा सुखाने करतात. जो एक हजार गायींचे दान करतो, जो कधी मांस भक्षण करीत नाही, ते दोनही समान आहेत असे पूर्वीच वेदवेत्ता ब्रह्मदेवाने सांगितले आहे. सर्व तीर्थांत स्नान

करण्याने जे पुण्य मिळते, सर्व यज्ञांमुळे ज्या फलाची प्राप्ती होते तेंच फल मांस न खाण्यानेही मिळते. दान, व्रत, यांत रमणारा मनुष्य यमपुरीत सुखाने जातो. प्रत्येकानें धर्माचे महत्त्व ओळखावे. धर्मामुळेच अर्थ, काम, मोक्ष यांची प्राप्ती होते. धर्म हाच माता, पिता, भ्राता, रक्षक, व सुहृद आहे. स्वामी, सखा, पालक, धारण– पोषण करणारा धर्म आहे.

तस्माद्धर्मः सेवितव्यः सदामुक्तिफलप्रदः ।
धर्मादर्थस्तथा कामो मोक्षश्च परिकीर्त्यते ।
धर्मो माता पिता भ्राता धर्मो नाथः सुहृत्तथा ।
धर्मः स्वामी सखा गोप्ता तथा धाता च पोषकः ।

धर्माधर्माची गती व श्राद्धकल्प

ब्रह्मपुराणाने आचारधर्माचे निरूपण विविध अंगांनी केले आहे. धर्माचे महत्त्व, अधर्माची गती, अन्नदानाचे महत्त्व पदोपदी वर्णन केले आहे. कर्मानुसार जी फले भोगावी लागतात त्याचेही वर्णन आले आहे. विविध प्रकारची पापे व त्यांनुसार फलप्राप्ती यांचे सविस्तर वर्णन ब्रह्मपुराण करते. दही चोरणारा मनुष्य बगळा अथवा बेडूक होतो. फलमूल चोरणारा मुंगी होतो. जलाची चोरी करणारा कावळा, चांदीची चोरी करणारा कबूतर होतो. सुवर्णपात्राची चोरी करणारा कृमियोनीत जन्म घेतो. रेशमाचा किडा चोरणारा मनुष्य वानर होतो, वस्त्र चोरणारा पोपटाच्या योनीत जन्म घेतो. साडी चोरणारा मनुष्य हंस होतो. रूईचे वस्त्र चोरणारा मनुष्य क्रौंच होतो. जी स्त्री दुधाची चोरी करते ती बगळी होते. हे जन्म कोणास किती वर्षे येतात याचाही विचार झालेला आहे. या अधर्माबरोबर धर्माचेही फल सांगितले गेले आहे. अन्नदान सर्वांत महत्त्वाचे.

अन्नस्य हि प्रदानेन नरो याति परां गतिम् ।
सर्वकामसमायुक्तः प्रेत्य चाप्यश्नुते सुखम् ।।

अन्नदानानेच माणसास परमगती प्राप्त होते. या लोकात त्याच्या सर्व कामना पूर्ण होतात व मृत्यूनंतर तो सुखाचा भागीदार होतो.

श्राद्ध कसे, केव्हा, कोठे करावे यासंबंधी खूप विस्ताराने ब्रह्मपुराण मार्गदर्शन करते. आपल्या कुलास अनुसरून, आपापल्या वर्णास अनुरूप असे वेदोक्त मंत्रांनी श्राद्धाचे अनुष्ठान करावे. पुष्कर, पवित्र मंदिर, पर्वतशिखर, पावन प्रदेश व नदी, सरोवर, समुद्रतट, दिव्य वृक्षांचे मूळ, यज्ञकुंड इत्यादी ठिकाणी श्राद्ध करावे. किरात, कलिंग, कोकण, क्रमी, दशार्ण, कुमार्य, ऋथ, सिंधू नदीचा उत्तर तट, नर्मदेचा दक्षिण तट इत्यादी प्रदेशांत श्राद्ध करू नये. प्रत्येक महिन्याची अमावास्या व पौर्णिमा हे श्राद्धासाठी योग्य दिवस आहेत. नित्यश्राद्धात विश्वेदेवांचे पूजन होत नाही. नैमित्तिक श्राद्धाच्या वेळी हे पूजन होते. नित्य, नैमित्तिक व काम्य या तीन प्रकारांनी श्राद्धे होतात. जातकर्मादी संस्कारांच्या वेळी आभ्युदयिक श्राद्ध करावे. सूर्य कन्याराशीत येतो तेव्हा कृष्णपक्षाच्या पंधरा दिवसपर्यंत श्राद्ध करावे. प्रतिपदेस श्राद्ध केल्याने धनाची प्राप्ती होते. द्वितीयेस संतान होते. तृतीयेस पुत्रप्राप्ती होते. चतुर्थीस शत्रूचा नाश होतो. पंचमीस श्राद्ध केल्याने मनुष्यास लक्ष्मीची प्राप्ती होते. षष्ठीस श्राद्ध केल्याने पूज्यता प्राप्त होते. सप्तमीस गणांचे आधिपत्य, अष्टमीस उत्तम बुद्धी, नवमीस स्त्री, दशमीस मनोरथपूर्तता, एकादशीस संपूर्ण वेदांचे ज्ञान, द्वादशीस विजयाचा लाभ, त्रयोदशीस संतानवृद्धी, ऐश्वर्यप्राप्ती, उत्तम पुष्टी, पशु व मेधा यांची प्राप्ती होते.

श्राद्धप्रसंगी पितरांना प्रसन्न करण्यासाठी काय काय द्यावे ? श्राद्धकर्मात गुडमिश्रित अन्न, तिल, मधू यांचे दान करावे. कृत्तिका नक्षत्रात पितरांची पूजा करणारा स्वर्गलोकात जातो. रोहिणी नक्षत्रावर श्राद्ध करणारा संतान प्राप्त करून घेतो. मृग राशीत श्राद्ध करणारा मनुष्य तेजस्वी होतो. आर्द्रात व पुनर्वसूत श्राद्ध करणाऱ्यास स्त्रीची प्राप्ती होते. पुष्यात अक्षय धनाची, आश्लेषात उत्तम आयुष्याची, मघात संतानाची, हस्तात शास्त्रज्ञानात श्रेष्ठता, चित्रात रूप, तेज, संतती, स्वातीत व्यापारात लाभ, अनुराधात चक्रवर्तीपद, ज्येष्ठात प्रभुत्व. मूलात आरोग्य, पूर्वाषाढात यश यांची प्राप्ती होते. उत्तराषाढात शोक दूर होतो. श्रवणात उत्तम लोकाची प्राप्ती होते.

अष्टका, मन्वन्तरा, अन्वष्टका या तिथींना श्राद्ध करावे. ग्रहण,

व्यतिपात, एका राशीत सूर्य व चंद्राचा संगम, जन्मनक्षत्र या प्रसंगी पार्वण श्राद्ध करावे. श्राद्धांचे विविध प्रकार, त्यांचे विधी, त्यांचे फल इत्यादींचे वर्णन ब्रह्मपुराणाने केले आहे. सपिण्डीकरण श्राद्धाचा विधी सविस्तर सांगितला आहे. श्राद्धाचे दान संयमी, अग्निहोत्री, शुद्धचरित, विद्वान, श्रोत्रिय ब्राह्मणास द्यावे. श्राद्धात वस्त्रदान महत्त्वाचे आहे. कोणी कोणाचे श्राद्ध करावे, श्राद्धास कोणता ब्राह्मण नसावा, दान किती प्रकारांचे असावे याचा विस्ताराने निर्देश या पुराणाने केला आहे.

कलिधर्माचे निरूपण

कलियुगात वर्णाश्रमधर्मावर माणसाची श्रद्धा राहणार नाही. सामवेद, ऋग्वेद व यजुर्वेद यांच्या आज्ञा पालन करण्याची प्रवृत्ती राहणार नाही. कलियुगात विवाहास धर्म मानणार नाहीत. शिष्य गुरूच्या आधीन राहणार नाहीत. पुत्र आपले कर्तव्य करणार नाहीत. अग्निहोत्रांचे नियम टिकणार नाहीत. कोणी कोणत्याही कुलात जन्मास येणारा बलवान असेल तर तोच कलियुगात स्वामी होईल. सर्व वर्णांचे लोक कन्येची विक्री करून पोट भरतील. कलियुगात कोणाचेही वचन शास्त्र मानले जाईल. कलियुगात सर्वच देव होतील व सर्वांना सर्व आश्रम खुले होतील. आपल्या रुचीनुसार अनुष्ठान करून लोक उपवास, परिश्रम, धनाचा खर्च यांनाच धर्म मानतील. थोड्याशा धनामुळे लोकांना घमेंड चढेल. स्त्रियांना आपल्या केसांमुळे रूपवती आहोत असा गर्व चढेल. सुवर्ण, मणी, रत्न व उंची वस्त्रे नसल्याने स्त्रिया केसांचाच शृंगार करतील. कलियुगातील स्त्रिया धनहीन पतीचा त्याग करतील. त्यावेळी धनवान पुरुषच त्यांचा स्वामी होईल. जो जास्त देईल त्याला माणसे स्वामी मानतील. सत्तेमुळे संबंध बांधले जातील. द्रव्यराशी घर बांधण्यात खर्च होईल. दान, पुण्य काहीच उरणार नाही. द्रव्याच्या संग्रहातच बुद्धी व्यग्र राहील. ती कधी आत्मचिंतनात रमणार नाही. सारे धन उपभोगात संपून जाईल. धर्माच्या अनुष्ठानास त्याचा उपयोग होणार नाही. कलियुगात स्त्रिया स्वेच्छाचारिणी होतील. हावभाव, विलास यांतच त्यांना गोडी वाटेल. अन्यायाने धन मिळणाऱ्या पुरुषा-

बद्दल त्यांना आसक्ती वाटेल. सुहृदांचा निषेध असतानाही एका पैशा-साठी मनुष्य दुसऱ्याच्या स्वार्थाची हानी करतील.

कलियुगात सर्व लोक नेहमीच सर्वांना समानतेचा दावा करतील. गाय जोवर दूध देत आहे तोवर तिचा गौरव होईल. कलियुगातील प्रजा प्राय: अनावृष्टी व क्षुधा यांच्या भयाने व्याकुळ होईल. सर्वांचे डोळे आकाशाकडे लागतील. वर्षाऋतू न आल्यामुळे माणसे मूळ फल, पाने खातील. कित्येक आत्मघात करतील. कलीत नेहमीच दुष्काळ पडेल. लोकांना क्लेश होतील. कोणत्याही माणसास थोडेही सुख मिळणार नाही. सर्व लोक स्नान न करताच भोजन करतील. अग्निहोत्र, देवपूजा, अतिथिसत्कार, श्राद्ध, तर्पण-विधी हे कोणी करणार नाही. कलियुगातील स्त्रिया लोभी, अधिक खाणाऱ्या, पुष्कळ संतानांना जन्म देणाऱ्या व मंद भाग्याच्या होतील. त्या दोनही हातांनी आपले डोके खाजवतील. गुरुजन वा पती यांची आज्ञा न मानता त्या पडद्याच्या बाहेर येतील. आपलेच पोट भरून त्या क्रोधी होतील. देहशुद्धीकडे त्या लक्ष देणार नाहीत. असत्य व कटू वचन बोलतील. त्या दुराचरणी होऊन दुराचारी पुरुषांना भेटण्याची अभिलाषा करतील. कुलवती स्त्रियाही अन्य पुरुषांच्या बरोबर व्यभिचार करतील. ब्रह्मचारी लोक वेदोक्त व्रताचे पालन न करताच वेदाध्ययन करतील. गृहस्थ लोक हवन करणार नाहीत की उचित दान करणार नाहीत. वानप्रस्थ आश्रमात राहाणारे लोक कंदमूलांचा आहार न घेता ग्रामीण आहार घेतील. संन्यासीही मित्रांच्या स्नेहसंबंधात बांधले जातील. कलियुगात राजे प्रजेचे रक्षण करणार नाहीत. कर घेण्याच्या निमित्ताने ते प्रजेचेच धन हरण करतील.

त्या वेळी ज्याच्याजवळ हत्ती, घोडे, रथ असतील तेच राजा होतील. जे निर्बल असतील ते सेवक होतील. वैश्यलोक कृषी, वाणिज्य आदी कर्मे सोडून शूद्रवृत्तीने राहातील. शिल्पकर्म करून जीवनाचा निर्वाह करतील. शूद्रही संन्याशाची चिन्हे धारण करून भिक्षेवर जीवन जगतील. दुर्भिक्ष्य व करांची पीडा यांनी त्रस्त झालेले प्रजाजन जेथे गहू आदींची विपुलता असेल त्या देशात जातील. त्या वेळी वेदमार्गाचा लोप होईल. पाखंडवृत्ती वाढेल, अधर्माची वृद्धी होईल. लोकांचे आयुष्य पुष्कळच

कमी होईल. कलियुगात पाच, सहा, सात वर्षांची स्त्री व आठ, नऊ, दहा वर्षांचे पुरुष संतान निर्माण करतील. बारा वर्षांच्या आयुष्यातच केस पांढरे व्हायला लागतील. घोर कलियुग आल्यावर कोणताही मनुष्य वीस वर्षांपर्यंत जिवंत राहाणार नाही. लोक मंदबुद्धी, दुष्ट अंतःकरणाचे होतील.

पाखंडी वृत्ती वाढली की कलियुगाची वृद्धी झाली असे समजावे. वैदिक मार्गाचे अनुसरण करणारांची हानी होत गेली की कलियुग वाढले असे समजावे. धर्मबंधने शिथिल होतील. यज्ञ थांबतील. वेदां-विषयी प्रेम राहाणार नाही, पाखंडी मताबद्दल अनुराग वाढत जाईल. भगवान विष्णूंची आराधना संपेल. देवापासून काय लाभ ? ब्राह्मण व वेद यांच्यापासून काय लाभ ? पाण्याने शुद्धी होण्यात काय आहे ? असे प्रश्न विचारले जातील. कलियुगात मेघ थोडीशीच वृष्टी करतील. शेतीत धान्य कमी येईल. वृक्षांवर फळे थोडी येतील. सारहीन येतील. लोक प्रायः गुढग्यांपर्यंत वस्त्र नेसतील. शमी वृक्षाची अधिकता होईल. चारही वर्णांचे लोक शूद्रांप्रमाणे वागतील. बकरीचे दूध विपुल होईल. खस हे एकच अनुलेपन राहील. कलियुगात सासू व सासरा हेच गुरुजन होतील. या वेळी मनोहारिणी भार्या व मेहुणा आदी सुहृद होतील. लोक आपल्या सासुरवाडीच्या बाजूने होऊन म्हणतील,

कस्य माता पिता कस्य यदा कर्मात्मकः पुमान् ।
इति चोदाहरिष्यन्ति श्वशुरानुगता नराः ।।

कोण कोणाची माता ? कोण कोणाचा पिता ? सर्व जीव आपल्या कर्मांनी बांधले असून त्यांनुसार जन्मतात व मरतात. कलियुगात अल्प बुद्धी धारण करणारेही मन, वाणी व शरीर यांच्या दोषांनी प्रभावित बनून पापकर्मे करतील. स्वाध्याय, वषट्कार, स्वधा, स्वाहा यांचा शब्दही ऐकू येणार नाही. स्वधर्मनिष्ठ ब्राह्मण विरळाच दिसेल.

पण हे कलियुग धन्य आहे. थोड्याशा क्लेशाने, प्रयत्नाने माणसास मोठे फल प्राप्त होईल. स्त्रिया व शूद्र धन्य होतील. सत्य-युगात ध्यान, त्रेतायुगात यज्ञ, द्वापारात पूजन व कलियुगात श्रीहरीचे कीर्तन करून लोक तृप्त होतील. कलियुगात थोड्याच परिश्रमाने

माणसास महान फलाची प्राप्ती होईल.

युगान्तकालाची अवस्था

युगान्तकालात राजे प्रजेचे रक्षण न करता केवळ कर घेणारे होतील. स्वतःच्या रक्षणातच ते रमतील. त्यावेळी प्रायः क्षत्रियेतर राजा असेल. ब्राह्मण शूद्राच्या आश्रयास राहून उदरनिर्वाह करतील. युगान्तकालात श्रोत्रिय व कांडपृष्ठ (आपल्या कुलाचा त्याग करून दुसऱ्या कुलात समाविष्ट होणारा) एका पंक्तीत बसून हीन असे हविष्य भोजन करतील. मनुष्ये अशिष्ट, स्वार्थपरायण, नीच, मद्यमांसप्रेमी होऊन मित्राच्या पत्नीबरोबर व्यभिचार करतील. चोर राजाच्या वृत्तीत राहातील व राजा चोरासारखे वर्तन करील. सेवक स्वामीच्या धनाचा उपयोग त्याची अनुज्ञा न घेताच करतील. सर्वांनाच धनाची अभिलाषा होईल. साधुसंतांच्या वर्तनाचा आदर राहाणार नाही. युगान्तकाळात स्त्रिया धन घेऊन परक्या पुरुषाशी समागम करतील. शूद्र वक्ता होईल व ब्राह्मण चांडाल बनेल. शूद्र शठतापूर्ण बुद्धीने वागेल व भगवे वस्त्र परिधान करून धर्माचा उपदेश करील. शिकारी जीव अधिक होतील.

गायींची संख्या घटेल. साधूंच्या स्वभावात परिवर्तन होईल. चांडाल गावात राहील व उच्च वर्णाचे लोक नगराबाहेर राहातील. सारी प्रजा लज्जेस तिलांजली देऊन उच्छृंखलतापूर्ण वागेल. प्रायः कोणी मनुष्य धर्माचे आचरण करणार नाही. अधिकांश भूमी निकामी होईल. सर्व मार्गांत वाटमारी होईल. सर्व वर्णांचे लोक वाणिज्य वृत्तीचे होतील. पित्याचे धन त्याच्या अनुज्ञेशिवायच मुले आपसांत वाटून घेतील. स्त्रिया केसांनी शृंगार करतील. वीर्यहीन पुरुषाबद्दल त्यांना प्रेम वाटेल. युगान्तकाळात पुरुष थोडे व स्त्रिया अधिक होतील. याचना वाढेल. शेतीत धान्य येणार नाही. वर्षाकाळात वादळ होऊन शिलाखंडांची वृद्धी होईल. बंधुबांधवांची नाती संपतील. प्रतिज्ञा, शपथ यांचे पालन होणार नाही. प्रत्येक मनुष्य स्वतःस पंडित समजेल. जारज, क्रूरकर्मे, शराबी ब्रह्मवादी होतील. अध्ययन संपेल. तारांचा प्रकाश मंद होईल. पुत्र पित्याला, सून सासूला आपली कामे सांगतील. पतीस झोप

लागलीसे पाहून स्त्रिया धोका देऊन अन्य पुरुषांकडे जातील.

धर्माचा नाश झाल्यामुळे सर्व प्रजा गुणहीन होईल. शीलाचा नाश होऊन आयुष्य कमी होईल. शरीर रोगपीडित होईल. त्यामुळे निर्वेद (वैराग्य) निर्माण होऊन परत धर्माकडे प्रवृत्ती होईल. युगान्त-काळात लोक वर्तमानावर विश्वास ठेवतील. शास्त्र-ज्ञानरहित होतील. दंभी व अज्ञानी होतील. मोठमोठी युद्धे, प्रचंड वृष्टी, प्रचंड वादळे होतील. चोऱ्या होतील. चोर चोरांचीही चोरी करतील. लोक दुर्बल, क्षीण, कृश व शोकग्रस्त होतील. हळूहळू त्यांची प्रवृत्ती धर्माकडे वळेल. लोक सत्य-युगाकडे वळतील. युगांचे हे परिवर्तन अखंड होत राहील. उत्पत्ती व संहार यांच्या द्वारे नित्य परिवर्तनशील हे जगत क्षणभरही स्थिर नसते.

६. तत्त्वज्ञानदर्शन

नैमित्तिक व प्राकृत प्रलय

कथा, उपकथा, आख्याने, वंशावळी, सृष्टीची रचना, संहार, सदाचार हे पुराणांचे मुख्य विषय आहेत. एखादी कथा, उपकथा ज्या हेतूने सांगितली असेल त्या हेतूवरून तत्त्वाचा बोध होण्यासारखा आहे. पुराणांतून उत्तमोत्तम स्तोत्रे असतात, त्यांतील भगवंतांची संबोधनात्मक विशेषणे काही तत्त्वांचे निर्देश करतात. सृष्टीची निर्मिती सांगताना आधी काय होते, कशातून काय निर्माण झाले, विविध रूपांत्मक या जगाचा विस्तार कसा झाला, पापपुण्याची, स्वर्गनरकाची, मोक्षाची, भक्तीची कल्पना कशी उदयास आली, या प्रश्नांची तात्त्विक बाजू समजावून घेण्यासारखी असते. परंतु ज्याला निखळ तत्त्वचर्चा म्हणता येईल असेही अंग पुराणांना बहुधा असते. केवळ तत्त्वज्ञानाचे दर्शन घेता

येईल असे काही विभाग ब्रह्मपुराणातही आहेत. प्रलयकालवर्णन, त्रिविध तापांचे वर्णन, भगवत्तत्त्वाची चर्चा, योग व सांख्य यांचा तत्त्वविचार, कर्ममार्ग-ज्ञानमार्ग, परमात्मतत्त्व, अध्यात्मज्ञान, क्षराक्षरविचार; अशा काही विषयांच्या संदर्भात ब्रह्मपुराणाने तत्त्वचर्चा केलेली आहे.

युगान्त कालाचा विचार झाल्यानंतर ब्रह्मपुराणात नैमित्तिक व प्राकृत प्रलयाचे वर्णन तत्त्वचर्चेच्या स्वरूपात आले आहे. कल्पाचा अंत होत असताना जो ब्राह्म प्रलय होतो तो नैमित्तिक प्रलय. मोक्षास आत्यंतिक प्रलय व दोन परार्ध व्यतीत झाल्यानंतर जो होतो तो प्राकृत प्रलय होय. परार्धाची संख्या दुप्पट झाली की प्राकृत प्रलय होत असल्याने परार्ध या संख्येचा निर्णय करणे अगत्याचे आहे. एकापासून मोजून अठराव्या स्थानापर्यंत मोजणी केली की अंतिम संख्या परार्ध होते. एक, दश, शत, सहस्र, अयुत, लक्ष, प्रयुत, कोटी, अर्बुद, अब्ज, खर्व, निखर्व, महापद्म, शंकू, समुद्र, अंत्य, मध्य, परार्ध होय. कोटिकोटी सहस्र म्हणजे परार्ध. १००००००००००००००००० म्हणजे परार्ध. परार्धाची दुप्पट केली की काल ही संख्या देते. प्राकृत प्रलयाचा हाच काळ. या वेळी संपूर्ण दृश्य जगत आपल्या कारणभूत अव्यक्तात विलीन होते.

पापणी हालण्यास जेवढा वेळ लागतो त्याला मात्रा म्हणतात. एका मात्रेचे अक्षर उच्चारण्यास एवढा वेळ लागतो. पंधरा निमेषांची एक काष्ठा, तीस काष्ठांची एक कला. पंधरा कलांची एक नाडी. साडे बारा पळे तांब्याचे जलपात्र नाडीच्या बरोबरीने असते. त्या पात्रास चार अंगुली लांब, चार माशांची सुवर्णशलाका घेऊन छिद्र पाडलेले असते. या छिद्रातून पाणी झिरपून पात्रात येण्यास व पात्र भरलेल्या अवस्थेत बुडण्यास जेवढा वेळ जातो तो एका नाडीचा समय होय. मगधदेशीय मापाने यास जलप्रस्थ म्हणतात. दोन नाडींचा एक मुहूर्त, तीस मुहूर्तांचा एक दिवसरात्र व तीस दिवसरात्रांचा एक महिना, बारा महिन्यांचे एक वर्ष. देवलोकात ही मर्यादा एका दिवसरात्रीची आहे. अशा तीनशे साठ वर्षांचे देवांचे एक वर्ष होते. बारा हजार दिव्य वर्षांचे एक चतुर्युग होते. एक हजार चतुर्युगांचा ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. हाच एक कल्पाचा काल. या एका कल्पात चौदा मनू होतात. त्यानंतर जो प्रलय होईल

त्याला ब्राह्म अथवा नैमित्तिक प्रलय म्हणतात.

एक सहस्र चतुर्युगे झाली की हे भूतल प्राय: क्षीण होते. कित्येक वर्षे घोर अनावृष्टी होते. अनावर्षणामुळे पार्थिव जीव नष्ट होण्याच्या मार्गास लागतात. भगवान सूर्यनारायण आपल्या किरणांनी पृथ्वीवरील संपूर्ण जल शोषून घेतो. समुद्र, पृथ्वी, नद्या, पर्वत, सरोवरे पार सुकून जातात. संपूर्ण पृथ्वी कासवाच्या पाठीप्रमाणे शुष्क बनते. कालाग्निरुद्र रूपधारी श्रीहरी समस्त पातालसृष्टीही जाळून टाकतो. सर्व विश्वच जळून जाण्याच्या बेतात असते. शेवटी श्रीहरी जनार्दन आपल्या नि:श्वासांपासून मेघांची निर्मिती करतात. आकाशात मोठमोठ्या गज-राजांप्रमाणे संवर्तक मेघ जमतात. विजेचा कडकडाट होतो. मुसळधार पाऊस पडून जळणारे विश्व शांत होते. संपूर्ण जगत पाण्याने आप्लावित होते. भुवर्लोक, स्वर्लोकही बुडून जातात. चर व अचर संपूर्ण अंधारात बुडून जाते. यानंतर अनादी, अचिंत्य सर्वभूतमय भगवान संपूर्ण वाय पिऊन एकार्णवाच्या जलात शेषनागाच्या शय्येवर स्थित होतात. जन-लोकातील सनकादी सिद्ध त्यांची स्तुती करतात. यावेळी हा परमेश्वर आपल्या मायामयी दिव्य योगनिद्रेत असून आपल्याच वासुदेव नावाच्या स्वरूपाचे चिंतन करीत असतो. हाच नैमित्तिक प्रलय.

अनावृष्टी व अग्नी यांनी संपूर्ण सृष्टीचा संहार झाल्यावर भगवान विष्णूंच्या इच्छेनुसार प्राकृत प्रलयाची वेळ होते. यात संपूर्ण विकारांचा क्षय होतो. भूमीचे गंधादी गुण जलात लीन होतात. पृथ्वी नष्ट होते. गंधतन्मात्राचा नाश झाल्यावर सारी पृथ्वी जलरूपात परिणत होते. घोर शब्द करून जल मोठ्या वेगाने वाढते व संपूर्ण जगताला व्यापून टाकते. जलातील रसतत्त्वास तेज पिऊन टाकते. रसतन्मात्राचा नाश झाल्यावर जल तप्त बनून सुकून जाते. संपूर्ण जल तेजोरूप बनते. संपूर्ण जग हळूहळू अग्नीच्या स्वाधीन होते. अग्नीचा प्रकाशक गुण जो रूप त्याला वायुतत्त्व आपल्यात सामावून घेते. अग्नितत्त्व रूपहीन होऊन प्रचंड वेगाने वायू फिरू लागतो. या वायूचा गुण स्पर्श. या स्पर्शास आकाश ग्रासते व शेवटी केवळ आवरणशून्य आकाश राहते. रूप, रस, स्पर्श, गंध, आकार यांनी रहित असे महान आकाशच सर्वत्र

उरते. शब्द हा आकाशाचा गुण. शब्दतन्मात्रायुक्त आकाश संपूर्ण विश्वास व्यापून राहते. त्यानंतर या आकाशास भूतादीस, भूतादीस महत्तत्त्व व या सर्वांना मूल प्रकृती आपणा स्वतःत सामील करून घेते. न्यूनता व अधिकता यांच्या रहित जी सत्त्वादी गुणांची साम्यावस्था तीच प्रकृती, प्रधान प्रकृती होय. हीच संपूर्ण सृष्टीचे प्रधान कारण आहे. ही प्रकृती व्यक्ताव्यक्तस्वरूपिणी आहे.

या प्रकृतीहून भिन्न असा एक सिद्ध, अक्षर, नित्य व सर्वव्यापी पुरुष आहे. तोच सर्वभूतमय परमात्म्याचा अंश आहे. तो सत्तामात्रस्वरूप, ज्ञेय, ज्ञानात्मा, देहात्मसंघाताच्या पलीकडचा असून त्यालाच परब्रह्म, परमधाम, परमात्मा, परमेश्वर इत्यादी नावे आहेत. तोच विष्णू. प्रकृती व हा पुरुष हे दोघेही परमात्म्यात लीन होतात. हाच परमात्मा सर्वांचा आधार. वेदांत व वेदान्तग्रंथांत याच परमात्म्यास विष्णू या नावाने कल्पून त्याचा महिमा गायिलेला असतो. प्रवृत्ती (कर्मयोग), निवृत्ती (सांख्ययोग) या दोन भेदांनुसार वैदिक कर्मे होतात. या दोन कर्मांनुसार मनुष्य यज्ञस्वरूप भगवानाची पूजा करतो. प्रवृत्तिमार्गी लोक ऋक्, यजुः, सामवेद यांच्या साह्याने यज्ञपुरुष भगवानाची उपासना करतात, तर निवृत्तिमार्गी योगमार्ग पत्करून ज्ञानयोगाच्या द्वारे भगवान विष्णूची आराधना करतात. ऱ्हस्व, दीर्घ व प्लुत स्वरांच्या द्वारे ज्या वस्तूचे प्रतिपादन होते, जो विषय वाणीचा नाही, तो अविनाशी भगवान विष्णूच आहे तोच व्यक्त, तोच अव्यक्त, तोच अव्यय, तोच परमात्मा, विश्वात्मा, विश्वरूप श्रीहरी आहे. परार्ध हा सर्वेश्वर भगवान विष्णूचा एक दिवस होय. व्यक्त जगताचे अव्यक्त प्रकृतीत व प्रकृतीचे पुरुषात लीन होणे झाले की परमात्म्याची, विष्णूची रात्र होते. वास्तविक पाहता नित्यस्वरूप परमात्मा विष्णूस ना दिवस ना रात्र. पण केवळ सोयीसाठी असे बोलले जाते.

त्रिविध ताप व भगवत्तत्त्व

आध्यात्मिक आदी तीन तापांचे ज्ञान झाले की वैराग्य उत्पन्न होऊन विद्वान मनुष्य आत्यंतिक लयाची प्राप्ती करून घेतो. आध्यात्मिक

तापाचे दोन प्रकार आहेत. एक शारीरिक व दुसरा मानसिक. शारीरिक तापाचेही अनेक भेद आहेत. शिरोरोग, प्रतिश्याय (पडसे), ज्वर, शूल, भगंदर, गुल्म, अर्श (मूळव्याध), श्वयथू (सूज), श्वास (दमा), छर्दी (वमन), नेत्ररोग, अतीसार, कुष्ठ आदी शारीरिक कष्टदायक ताप आहेत. काम, क्रोध, भय, द्वेष, लोभ, मोह, विषाद (चिंता), शोक, असूया, अपमान, ईर्ष्या, मत्सर, पराभव इत्यादी मानसिक ताप आहेत. मृग, पक्षी, मनुष्य, पिशाच, सर्प, राक्षस, विंचू आदीपासून माणसास होणारी पीडा आधिभौतिक ताप आहे. शीत, उष्ण, वायू, वर्षा, जल, विद्युत इत्यादींपासून होणारी पीडा आधिदैविक ताप आहे. याशिवाय गर्भ, जन्म, वृद्धत्व,अज्ञान, मृत्यू इत्यादी अनेक प्रकारची दुःखे माणसास आहेत.

अत्यंत मलाने भरलेल्या गर्भाशयात सुकुमार शरीरास मातेच्या खारट, आंबट, तिखट पदार्थ खाण्याने अधिक क्लेश होतात. मलमूत्राच्या चिखलात त्याला झोपावे लागते. चेतनायुक्त असूनही त्याला खुला श्वास घेता येत नाही. अनेक कर्मांच्या बंधनात जखडलेला जीव गर्भवासात मोठे दुःख भोगीत असतो. जन्माच्या वेळी त्याचे मुख मल, मूत्र, रक्त, वीर्य यांनी माखलेले असते. मोठ्या क्लेशदायक अवस्थेत तो मातेच्या उदरातून बाहेर येतो. जन्म होताच वायूच्या स्पर्शाने तो शुद्ध हरवून बसतो. त्याला आपले अंग खाजवता येत नाही की कूस बदलता येत नाही. स्तनपानादी आहारही त्याला दुसऱ्याच्या साह्याने करावे लागतात. त्याला अपवित्र बिछान्यावर पडून राहावे लागते. ढेकूण व डास यांचा त्रास सहन करावा लागतो.

बाल्यकाली तो दुःखच भोगतो. आधिभौतिक व्याधींची पीडा त्यास होते. अज्ञानाच्या अंधारातच तो चाचपडतो. मी आलो कोठून ? मी कोण आहे ? कोठे निघालो आहे ? माझे स्वरूप काय ? कोणत्या बंधनात मी आहे ? मला काय करायला हवंय ? माझा धर्म काय ? अधर्म काय ? कर्तव्य काय ? अकर्तव्य काय ? अशा प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडलेला हा जीव केवळ मूढ व शिश्नोदरपरायण बनतो. त्याला अज्ञानजनित अशा तामसिक भावाच्या अनुष्ठानाची ओढ लागते.

वृद्धावस्थेत त्याचे शरीर दुर्बल होते. प्रत्येक इंद्रिय कमजोर व शिथिल होते. दात पडून जातात. अंगावर सुरकत्या उमटतात. नेत्रांना दूरचे दिसत नाही. नाकातून लांब लांब केस वाढलेले असतात. शरीर कापते. सर्व हाडे दिसायला लागतात. पाठीचा कणा वाकतो. त्याचा आहार कमी होत जातो. त्यांच्याकडून कामकाजही कमी होते. कान व नेत्र यांची कार्यशक्ती कमी होते. लाळ गाळणारे मुख सतत मलिन राहते. स्मृती नाहीशी होते. मृत्यूकडेच त्याची वाटचाल असते. दमा, खोकला इत्यादी विकारांनी तो रात्रभर जागतो. सेवक, पुत्र, पत्नी यांच्याकडून त्याचा अपमान होतो. त्याचा शौचाचार बिघडून जातो. नोकरमाणसेही त्याची थट्टा करतात.

मृत्यूच्या वेळी तर त्याचा कंठ, हातपाय शिथिल होतात. शरीर थरथरत असते. अनेकदा त्याला मूर्च्छा येते. त्याला सावध होताच सुवर्ण, धान्य, पुत्र, पत्नी, सेवक, घर आदीविषयी ममत्व वाटून माझ्याशिवाय आता यांचे होणार कसे, अशा चिंतेत तो पडतो. त्याचा कंठ सुकतो. डोळे खोल जातात. ताप, भूक, तहान यांनी तो व्याकुळ होतो मृत्यूच्या समयी अशी भारी दुःखे त्याला सहन करावी लागतात. नरकात तर त्याला फारच कष्ट होतात. स्वर्गातही जोवर पुण्य आहे तोवरच त्याला सुख मिळते. मनुष्यास जी जी वस्तू प्रीतिकारक वाटते ती ती त्याच्या दुःखरूपी वृक्षाचे बीज असते. स्त्री, पुत्र, मित्र, गृह, क्षेत्र, धन यांच्यापासून सुखापेक्षा दुःखच अधिक मिळते.

अशा या सांसारिक दुःखांनी तप्त झालेल्या जीवास मोक्षरूपी वृक्षाच्या शीतल छायेखेरीज अन्यत्र सुख आहे कोठे ? म्हणूनच विद्वानांनी गर्भ, जन्म व वृद्धत्व इत्यादींत होणाऱ्या दुःखापासून मुक्त होण्यासाठी भगवत्प्राप्तीचे अमोघ औषध सांगितले आहे. भगवंताच्या प्राप्तीची साधने दोन. एक ज्ञान व दुसरे कर्म. ज्ञान दोन प्रकारचे. एक शास्त्रजन्य व दुसरे विवेकजन्य. शास्त्रजन्य ज्ञान शब्दब्रह्माचे व विवेकजन्य ज्ञान परब्रह्माचे स्वरूप आहे. शास्त्रजन्य दिव्याप्रमाणे आणि विवेकजन्य ज्ञान साक्षात सूर्याप्रमाणे आहे.

ब्रह्माची दोन रूपे जाणण्यासारखी आहेत. एक शब्दब्रह्म, दुसरे परब्रह्म. जो शब्दब्रह्मात पारंगत आहे तो परब्रह्मास प्राप्त करून घेऊ शकतो. अथर्ववेदात सांगितले आहे की, परा व अपरा या दोन विद्या जाणून घेण्यासारख्या आहेत. परा विद्येपासून अक्षरब्रह्माची प्राप्ती होते. ऋग्वेदादी शास्त्र ही अपरा विद्या आहे. जो अव्यक्त, जरावस्थेशिवाय अचिंत्य, अजन्मा, अविनाशी, अनिर्देश्य, अरूप, हस्तपादादीरहित, सर्व व्यापक, नित्य, सर्व भूतांचे कारण, स्वयं कारणरहित तोच परब्रह्म, परमधाम आहे. मोक्षाची अभिलाषा करणाऱ्यांनी त्याचेच चिंतन करणे अगत्याचे आहे. तोच भगवान विष्णूचे वेदवाक्यद्वारे प्रतिपाद्य असे परमपद आहे. जो संपूर्ण भूतांची उत्पत्ती, प्रलय, आगमन, गमन, विद्या, अविद्या जाणतो तोच भगवान म्हटला पाहिजे. त्रिविध गुणरहित ज्ञान, समग्र शक्ती, समग्र बल, समग्र ऐश्वर्य, समग्र वीर्य, समग्र तेज हाच ‘भगवान’ शब्दाचा अर्थ आहे. या दृष्टीने श्रीविष्ण भगवान आहे.

त्या परमात्मा श्रीहरीत संपूर्ण भूतांचा निवास आहे. व तो सर्वात्मारूपाने सर्व भूतांत स्थित आहे. म्हणूनच त्याला ‘वासुदेव’ नाव शोभते. संपूर्ण जगाचा धाता, विधाता भगवान श्रीहरी संपूर्ण भूतांत निवास करतो व संपूर्ण भूते त्याच्यात वास करतात म्हणूनच तो ‘वासुदेव’ आहे. तो परमात्मा निर्गुण, सर्व आवरणाच्या पलीकडचा, सर्वांचा आत्मा आहे. सर्व कल्याणमय गुण त्याचेच रूप आहे. तो आपल्या मायाशक्तीने संपूर्ण प्राण्यांची सृष्टी निर्माण करतो. आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणे तो अनेक शरीरे धारण करून जगताचे कल्याण करतो. तो तेज, बल, ऐश्वर्य यांचे महान भांडार आहे. तो पराक्रम, शक्ती आदी गुणांची एक राशी असून परेच्या पलीकडचा आहे. त्या परमेश्वरात क्लेशादींचा संपूर्ण अभाव आहे. व्यष्टी व समष्टी तोच आहे. तो अव्यक्त आहे, व्यक्त आहे. सर्वांचा ईश्वर, सर्वांचा द्रष्टा, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, परमेश्वर तोच आहे. ज्याच्या द्वारे दोषरहित, परमशुद्ध निर्मल परमात्म्याचे ज्ञान, साक्षात्कार प्राप्ती होते त्यालाच ज्ञान म्हणतात. त्याच्या विपरीत सारे अज्ञान होय.

योग व सांख्य तत्त्वज्ञान

संसारबंधनाचा नाश करणाऱ्या योगाचे थोडक्यात वर्णन करता येते. गुरूची भक्तिपूर्वक आराधना करून पुरुषाने योगशास्त्र, इतिहास, पुराणे, वेद यांचा अभ्यास करावा. आहार, देशकालाचे ज्ञान इत्यादींचे ज्ञान प्राप्त करून निर्द्वंद्व व परिग्रहशून्य होऊन योगाचा अभ्यास करावा. सातू, जव, मूल, फल, दूध इत्यादींचा आहार योगसिद्धी सुलभ करणारा आहे. ज्या वेळी मन व्याकुळ नसते, कानांवर इतर शब्द येत नाहीत, तहानभुकेचे कष्ट नाहीत, हर्षशोकादी विकार नाहीत, सर्दी, गर्मी यांची बाधा नाही, अशा वेळीच योगसाधना करावी. जेथे शब्द फार होतात, तुटक्या फुटक्या गोशाळेत, चौकात, सर्पविंचवाच्या स्थानांवर स्मशानात, नदीतटावर, अग्नीच्या समीप, देववृक्षांच्या खाली, भयदायक स्थानावर, विहिरीच्या समीप, वाळलेल्या पानांवर कधी योगाचा अभ्यास करू नये. या स्थानांची पर्वा न करता जो योगसाधना करील त्याला बहिरेपण, मुकेपण, आंधळेपण, ज्वर इत्यादी दोष लागतील. भोजन थोडे व नियमित असावे. इंद्रियांवर पूर्ण नियंत्रण असावे. सुंदर आसनावर पूर्वाभिमुख बसून योगसाधना करावी. आसन सुखद व स्थिर असावे. अधिक उंच, अधिक खाली नसावे. योगसाधक निःस्पृह, सत्यवादी, पवित्र असावा. निद्रा व क्रोध यांवर त्याचे नियंत्रण असावे. संपूर्ण भूतांच्या हिताबद्दल त्याने तत्पर असावे. शरीर, चरण, मस्तक समान स्थितीत ठेवून दोनही हात नाभिस्थानी राखून शांत वृत्तीने पद्मासन घालून बसावे. दृष्टी नाकाच्या शेंड्यावर असून प्राणायामपूर्वक मनन करावे.

विद्या, तप, इंद्रियनिग्रह, सर्वस्वाचा त्याग यांच्याशिवाय कोणतीच सिद्धी प्राप्त होत नाही. सर्व महाभूते ही विधात्याची पहिली सृष्टी आहे. पृथ्वीपासून देह निर्माण झाला. घाम आदी जलाचा अंश आहे. अग्नीपासून नेत्र, वायूपासून प्राण व अपान, आकाशापासून नाक, कान आदी छिद्रे, अशी निर्मिती झाली. चरणांत विष्णू, हातांत इंद्र व उदरात अग्नी भोक्तारूपात आहेत. कानांत श्रोत्र इंद्रिय व दिशा आहेत. जिव्हेत

वाक्इंद्रिय व सरस्वती आहे. कान (शब्द), त्वचा (स्पर्श), नेत्र (रूप), जिव्हा (रस), नाक (गंध) हे इंद्रियविषयक आहेत. त्या महान आत्म्याचे दर्शन नेत्र अथवा सर्व इंद्रिये यांच्यामार्फत होणार नाही. विशुद्ध मनरूपी दिव्यानेच तो प्रकाशित होतो. परमात्मा शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांनी सापडत नाही. तो शरीर व इंद्रियरहित आहे. तरी या शरीराच्या साह्यानेच त्याचे अनुसंधान असावे. या विनाशशील शरीरात अव्यक्त भावाने स्थित असलेल्या परमेश्वरास ज्ञानमयी दृष्टीने जाणतो तो मृत्यूच्या नंतर ब्रह्मभावास प्राप्त होतो. ज्ञानीजन विद्यासंपन्न ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा, चांडाल यांना समभावाने पाहातो.

सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
यदा पश्यति भूतात्मा ब्रह्म सम्पद्यते तदा ।।
यावानात्मनि वेदात्मा तावानात्मा परात्मनि ।
य एवं सततं वेद सोऽमृतत्वाय कल्पते ।।

ज्याने हे संपूर्ण जगत व्यापले आहे तो परमात्माच समस्त चराचर प्राण्यांत निवास करतो. जेव्हा जीवात्मा संपूर्ण प्राण्यांत स्वतःस व स्वतःत संपूर्ण प्राण्यांना पाहातो त्यावेळी तो ब्रह्मभावास पोचलेला असतो. आपल्या शरीरात जसा आत्मा आहे तसाच तो दुसऱ्यांच्याही शरीरात आहे, हे ज्ञान ज्या पुरुषास निरंतर असते तो अमृतत्व म्हणजे मोक्ष मिळवितो.

परब्रह्म परमात्मा वर नाही की खाली नाही. येथे नाही की तेथे नाही. सर्व लोक त्याच्यात सामावलेले आहेत. त्याच्याबाहेर काहीच नाही. धनुष्यापासून सुटलेला बाण कधी परमेश्वरापर्यंत पोचत नाही. त्याच्यापेक्षा अधिक सूक्ष्म, अधिक स्थूल दुसरे काहीच नाही. तो आहे तरी कसा ?

सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ।।
तदेवाणोरणुतरं तन्महद्भ्यो महत्तरम् ।
तदन्तः सर्वभूतानां ध्रुवं तिष्ठन्न दृश्यते ।।

त्याला सर्व बाजूंनी हातपाय आहेत. सर्व बाजूंनी डोळे आहेत. सर्व

वाजूंनी मुखे आहेत. कान आहेत. या जगात तो सर्वांना व्यापून राहिला आहे. तो छोटयांहून छोटा व मोठ्याहून मोठा आहे. जरी तो सर्व प्राण्यांत निवास करून असला तरी तो कोणासही दिसत नाही. क्षर व अक्षर हे पुरुषाचे दोन भेद आहेत. संपूर्ण भूते क्षर म्हणजे अविनाशी आहेत तर दिव्य अमृतस्वरूप चेतन आत्मा अक्षर (अविनाशी) आहे. नऊ दारांच्या या शरीररूपी पुरात जितेंद्रिय व नियमपरायण हंस (आत्मा) निवास करतो. अजन्मा आत्मा निरनिराळ्या विकल्पांचा त्याग व शरीरांचा संचय करतो म्हणून विद्वान त्याला हंस म्हणतात.

इंद्रिय, मन, बुद्धी यांच्या वृत्तींना आत्म्याच्या बरोबर स्थापित करणे हे ज्ञान योगशास्त्र जाणल्याने येते. शमदमसंपन्न योगी पुरुष असावा. काम, क्रोध, लोभ, भय, स्वप्न हे योगाचे पाच दोष असून त्यांचा उच्छेद करायला हवा. धीर पुरुषाने मनाला वश करून क्रोधावर व संकल्पाचा त्याग करून कामावर विजय मिळवावा. सत्त्वगुणाचे सेवन करून निद्रेवरही नियंत्रण ठेवता येते. धैर्याने योगी शिश्न व उदर रक्षण करतो. नेत्रांच्या साह्याने तो हात व पाय यांचे रक्षण करतो. मनाच्या द्वारे तो नेत्र व कान यांचे व कर्माच्या द्वारे मन व वाणी यांचे रक्षण करतो. प्रमादाच्या त्यागाने भयाचा व विद्‌वान पुरुषांच्या सेवेने दंभाचा त्याग तो करतो. योगी पुरुष अग्नी, ब्राह्मण, देव यांना प्रणाम करतो. मनावर प्रभाव टाकणारी हिंसायुक्त उद्धट वाणी तो बोलत नाही. ध्यान, वेदाध्ययन, दान, सत्य, लज्जा, सरलता, क्षमा, शौच, आत्म-शुद्धी व इंद्रियसंयम यांनी तेजाची वृद्धी होऊन पापांचा नाश होतो.

योग्याने सर्व प्राण्यांशी समभाव ठेवावा. जे काही मिळेल त्यावर निर्वाह करावा. पापरहित, तेजस्वी, मिताहारी, जितेन्द्रिय बनून, काम क्रोध जिंकून तो ब्रह्मपदाचे सेवन करतो. योग्याने मनास वश करून घ्यावे. त्यानंतर कान, नेत्र, जिव्हा, नासिका यांना ताब्यात आणावे. योगी पुरुष धूमरहित अग्नी, दीप्तिमान सूर्य व आकाशातील चमकणारी वीज यांच्याप्रमाणे हृदयस्थ आत्म्याचे दर्शन घेतो. योगसाधना चालू असताना मोह, भ्रम, आवर्त यांची विघ्ने येतात. दिव्य सुगंध येतो. दिव्य वाणी ऐकू येते. दिव्य दृश्ये दिसू लागतात. अलौकिक रसाचा व

स्पर्शाचा अनुभव येतो. इच्छानुकूल सर्दी व गर्मी प्राप्त होते. वायूप्रमाणे आकाशात चालण्याची, फिरण्याची शक्ती येते. प्रतिभा वाढते. उपद्रवांचा अभाव होतो. अशा सिद्धी प्राप्त होऊनही योगी महात्मा त्यांची उपेक्षा करून त्यांना परतवून लावतो. योग्याचे मन एकांतात स्थिर होते. सर्वत्र तो उपेक्षाभावानेच पाहातो. नियमित भोजन करून लाभ व अलाभ तो समान समजतो. निंदक व स्तुती करणारा त्याला समान वाटतो. तो कुणाचेच भले वा वाईट चिंतीत नाही. लाभ झाला की त्याला हर्ष होत नाही, की नुकसान झाल्याने तो कष्टी होत नाही. वायूचा सहधर्मी बनून तो सर्व प्राण्यांशी समभावाने वागतो. सहा महिने असा योगाभ्यास केला तरी त्याला ब्रह्माचा साक्षात्कार होतो. मातीचे ढीग, पत्थर व सुवर्ण यांना तो समान मानतो. कोणत्याच मोहास तो वश होत नाही. योगी पुरुष अजन्मा, पुरातन, जरारहित, सनातन, इंद्रियातीत व अगोचर ब्रह्मपदास जातो.

प्रवृत्तिधर्म, निवृत्तिधर्म, परमात्मतत्त्व, अध्यात्मज्ञान

शास्त्रांत दोन मार्गांचे वर्णन आले आहे. एकाचे नाव प्रवृत्तिधर्म आहे व दुसऱ्याचे नाव निवृत्ति-धर्म आहे. प्रवृत्तिमार्गास कर्म व निवृत्तिमार्गास ज्ञान म्हणतात. कर्माने मनुष्य बंधनात पडतो, ज्ञानाने मुक्त होतो. म्हणून पारदर्शी यती कर्म करीत नाही. कर्माने पुनः जन्म येतो. सोळा तत्त्वांचे शरीर धारण करावे लागते. पण ज्ञानाने नित्य, अव्यक्त व अविनाशी परमात्मा प्राप्त होतो. कर्माची फले सुख, दुःख, जन्म, मृत्यू अशी मिळतात. पण ज्ञानाने शोकमुक्त स्थिती प्राप्त होते. देह, इंद्रिये, मन आदी प्रकृतीचे विकार क्षेत्रज्ञाच्या आधारावर स्थित आहेत. ते जड असल्यामुळे क्षेत्रज्ञास जाणीत नाहीत. पण त्यांना क्षेत्रज्ञ मात्र जाणतो. इंद्रियांपेक्षा त्यांचे विषय सूक्ष्म व श्रेष्ठ आहेत. विषयांपेक्षा मन श्रेष्ठ, मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ, बुद्धीहून महत्तत्त्व श्रेष्ठ, महत्तत्त्वापेक्षा अव्यक्त मूल प्रकृती श्रेष्ठ आहे. अव्यक्तापेक्षा परमात्मा श्रेष्ठ आहे. अविनाशी परमात्म्यापेक्षा श्रेष्ठ कोणीच नाही.

अध्यात्माचे रूपही समजावून घेण्यासारखे आहे. पृथ्वी, जल, तेज

वायू व आकाश ही पंचमहाभूते सर्व प्राण्यांच्या शरीरांत आहेत. शब्द, श्रवणेन्द्रिय व शरीराची छिद्रे आकाशापासून प्रकट झाली. प्राण, क्रिया, स्पर्श यांची निर्मिती वायूपासून झाली. रूप, नेत्र, जठरानल यांची उत्पत्ती अग्नीपासून आहे. रस, रसना हे जलाचे गुण, गंध, नासिका, देह हे पृथ्वीचे गुण. असे हे पंचभौतिक विकार आहेत. स्पर्श वायूचा, रस जलाचा, रूप तेजाचा, शब्द आकाशाचा व गंध भूमीचा गुण आहे. मन, बुद्धी व स्वभाव हे स्वयोनिज गुण आहेत. मनुष्याच्या शरीरात पाच इंद्रिये आहेत. सहावे तत्त्व मन आहे. सातवे बुद्धितत्त्व आहे, क्षेत्र आठवे समजावे. डोळा पाहण्यासाठी, मन संदेहासाठी, बुद्धी निश्चयासाठी व क्षेत्रज्ञ साक्षीसाठी आहे. सत्त्व, रज, तम हे तीन गुण आपल्या कारण-भूत प्रकृतीतून प्रकट झाले आहेत. संपूर्ण प्राण्यांत ते समान भावाने असतात. प्रीती, शांती सत्त्वगुणात्मक असते. रजोगुणाने संताप वाढतो. अव्यक्त, अतर्क्य व अज्ञेय मोहामुळे तमोगुण ध्यानात येतो. हर्ष, प्रेम, आनंद, समत्व, स्वस्थता हे सात्त्विक गुण होत. अभिमान, असत्य भाषण, लोभ व असहनशीलता हे गुण रजाचे. मोह, प्रमाद, निद्रा, आलस्य, अज्ञान हे तमोगुणाचे दुर्गुण होत.

ज्ञानी पुरुष संसारात राहूनही तेथील गुणदोषांनी लिप्त होत नाही. ते सदा परमात्म्याच्या चिंतनात असतात. ते विषयांत कधीच आसक्त नसतात. गुण आत्म्याला जाणीत नाहीत, पण आत्मा त्यांना नेहमीच जाणतो. कारण तो गुणांचा द्रष्टा आहे.

ऋषींच्या द्वारे प्राचीन श्रेष्ठ धर्माचे वर्णन ऐकण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे पिता आपल्या छोटचा बालकास अधीन ठेवतो त्याप्रमाणे मनुष्य बुद्धिबळाने आपल्या प्रमाथी इंद्रियांना संयमित करतो. मन व इंद्रिये यांची एकाग्रताच सर्वांत मोठी तपस्या आहे. त्यालाच सर्व धर्मांत श्रेष्ठ धर्म मानावा. सर्व इंद्रिये विषयांपासून निवृत्त होऊन बुद्धीत स्थिर होतील तेव्हा सनातन परमात्म्याचे दर्शन होईल. आत्म्याचा साक्षात्कार होऊन आपण संसारापासून विरक्त व्हावे. साप जसा कातेतून मुक्त होतो तसे आपण पापांपासून मुक्त व्हावे. अविद्या एक भयंकर नदी आहे. तिच्या अनेक प्रवाहांत लोक पडतात व फसतात. या नदीत पाच

इंद्रिये हे मकराप्रमाणे आहेत. मानसिक संकल्प-विकल्प या नदीचे तट आहेत. लोभमोहरूपी शेवाळाने ही नदी आच्छादित आहे. काम व क्रोध-रूपी सर्प त्या नदीत असतात. सत्य हे या नदीतून पार करणारे तीर्थ आहे. या नदीवर कधी कधी असत्याचे तुफान उठते. या नदीत क्रोधाचा चिखल माजतो. ही नदी संसाररूपी समुद्रास मिळते. स्थिर बुद्धीचे पुरुषच ही नदी पार करू शकतात. ही नदी पार झाली की जितात्मा पुरुष उत्तम बुद्धी प्राप्त करून ब्रह्मस्वरूप होतो. सर्व प्रकारच्या क्लेशां-पासून त्याची सुटका होते. तो पापरहित होऊन त्याचे अंतःकरण प्रसन्न असते. त्याला कधी क्रोध येत नाही. त्याची बुद्धी कधी क्रूर होत नाही.

या आत्मतत्त्वाचा नीट बोध व्हावा. ते स्त्री नाही, पुरुष नाही, नपुंसक नाही. सुख नाही की दुःखही नसते. ते साक्षात ब्रह्मच असते. भूत, भविष्य, वर्तमान ही सर्व त्याचीच रूपे होत. जो त्याला जाणतो त्याला पुनर्जन्म येत नाही. क्षमेच्या साह्याने क्रोधाचा नाश करावा. धैर्याने इच्छा, द्वेष, काम यांचा नाश करावा. तत्त्ववेत्ता योगी ज्ञानाच्या अभ्यासाने निद्रा व भेदबुद्धी यांचा नाश करतो. हितकर, सुपक्व व स्वल्प भोजनाने सर्व प्रकारचे उपद्रव मिटतात. तेजस्वी, मिताहारी, जितेन्द्रिय पुरुष काम व क्रोध यांना जिंकून ब्रह्मरूप होतो. अविवेक व आसक्ती यांचा अभाव, दीनतेचा त्याग, अविनयापासून दूर राहणे, चित्तात उद्वेग न आणणे, स्थिरता राखणे, मन, वाणी, शरीर यांचा संयम राखणे, हा सर्व मोक्षाचा निर्मल व पवित्र मार्ग आहे.

वसिष्ठ व करालजनक यांचा क्षराक्षरविवेक

सूर्यासमान तेजस्वी वसिष्ठमुनी आपल्या आसनावर विराजमान झाले होते. परमात्मतत्त्वाच्या प्रतिपादनात ते कुशल होते. अध्यात्म-तत्त्वाचे त्यांचे ज्ञान निश्चयात्मक होते. राजा करालजनक एकदा त्यांच्या आश्रमात आला व हात जोडून त्यांना नमस्कार करून विनयपूर्वक वाणीने म्हणाला,.

'भगवन्, जेथून ज्ञानी पुरुषास या जगतात परत यावं लागणार नाही त्या सनातन ब्रह्माचं रूप कसं आहे ? क्षर कशास म्हणतात ?

ज्यात या जगताचा लय होतो ते अनामय, कल्याणमय, अक्षरतत्त्वाचं ज्ञान मला सांगावं.'

'राजन्, या जगाचा लय (क्षरण) कसा होतो, कोठे होतो हे सर्व मी थोडक्यात सांगतो. देवांच्या बारा हजार वर्षांचं एक चतुर्युग होतं. एक हजार चतुर्युगं म्हणजे ब्रह्मदेवांचा एक दिवस. यालाच कल्प म्हणतात. या दिवसाबरोबरच ब्रह्मदेवांची रात्र असते. रात्र संपली की ते झोपून उठतात व या जगताची निर्मिती करतात. त्यांच्यात अणिमा, लघिमा, प्राप्ती आदी शक्तींचा निवास स्वाभाविकपणानं आहे. ते अविनाशी ज्योतिर्मय परमेश्वर आहेत. त्यांना सर्व बाजूंनी हातपाय आहेत. नेत्र, मस्तकं व मुखं आहेत. या जगात सर्वत्र तेच व्यापून आहेत. तेच भगवान हिरण्यगर्भ आहेत. योगशास्त्रात तेच ज्ञाते असून विरंची आदी नावांनी प्रसिद्ध आहेत. सांख्यशास्त्रात त्यांची अनेक नावं येतात. तेच विश्वाचे आत्मा व एकाक्षर आहेत. त्यांनीच हे त्रैलोक्य धारण केलं आहे. त्यांच्यामुळेच नाना रूपधारी हे विश्व प्रकट झालं आहे. तेच आपल्या शक्तीनं महत्तत्त्वाची सृष्टी करून अहंकार व त्याचे अभिमानी देव प्रजापती यांना उत्पन्न करतात. राजस, तामस, सात्त्विक भेदांतून तीन प्रकारांच्या अहंकारांपासून आकाश, वायू, तेज, जल व पृथ्वी ही पाच महाभूते व शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पाच विषय व कान, त्वचा, नेत्र, जिव्हा, नासिका ही पाच ज्ञानेंद्रियं, वाणी, हात, पाय, गुद, लिंग ही पाच कर्मेंद्रियं मनासहित निर्माण झाली. ही चोवीस तत्त्वं सर्व शरीरात असतात.

'नरश्रेष्ठा, हा त्रिलोक याच तत्त्वांचा बनला आहे. देव, मनुष्य, यक्ष, भूत, गंधर्व, किन्नर, महानाग, चारण, पिशाच, देवर्षी, निशाचर, दंश, कीट, मशक, दुर्गन्धित, किडे, उंदीर, कुत्री, चांडाल, हत्ती, घोडे, हरिण, गाढवे, वाघ, गायी आदी जे मूर्तिमान पदार्थ आहेत त्यांच्यांत याच तत्त्वांचं दर्शन होतं. पृथ्वी, जल व आकाश यांतच प्राण्यांचा निवास आहे, अन्यत्र नाही. हे सर्व जगात व्यक्त आहे. प्रतिदिन त्याचं क्षरण (लय) होतं. म्हणून याला क्षर म्हणतात. याहून भिन्न तत्त्व अक्षर आहे. सर्व भूतांचा आत्मा परमेश्वरच अक्षर आहे. त्या अव्यक्त अक्षरा-

पासूनच उत्पन्न झालेलं हे नामधारी मोहात्मक जग सदा क्षयशील असल्यानं क्षर हे नाम धारण करतं. क्षर तत्त्वांत पहिल्यानं महत्त्वाची सृष्टी झाली. क्षराचं निरूपण हेच. क्षर-अक्षराचं हे असं संक्षेपानं वर्णन आहे.

'महाराज, अक्षर तत्त्व पंचविसावं तत्त्व आहे. ते नित्य, निराकार आहे. ते प्राप्त झालं की या जगात पुन्हा येण्याचं कारण पडत नाही. जे अव्यक्त तत्त्व या व्यक्त जगाची निर्मिती करतं तेच प्रत्येक शरीरात साक्षीरूपानं निवास करतं. चोवीस तत्त्वांचा समुदाय व्यक्त आहे, पण त्यांचं साक्षी पंचविसावं तत्त्व परमात्मा निराकार असल्यानं अव्यक्त आहे. तोच सर्व देहधारी प्राण्यांच्या हृदयात निवास करतो. तोच चेतनरूपानं सर्वांना चेतना देतो. ते स्वतः अमूर्त असूनही सर्वमूर्तिस्वरूप आहे. सृष्टी व प्रलयरूप धर्मानं ते सृष्टिस्वरूप आहे व प्रलयस्वरूप पण आहे. ते या विश्वरूपात दृष्टिगोचर होतं. ते निर्गुण असूनही गुणरूप आहे. तो परमात्मा करोडो सृष्टी निर्माण करतो व तितकेच प्रलय करतो. पण त्याला कर्तृत्वाचा अभिमान नसतो.

'अज्ञानी पुरुष तमोगुण, सत्त्वगुण व रजोगुण यांनी युक्त होऊन तदनुकल योनीत जन्म घेतो. अभिमानामुळं तो प्राकृत गुणांचं अनुसरण करतो. तमोगुणांच्या सेवनानं तो नाना प्रकारच्या तामसिक भावांची प्राप्ती करून घेतो. काळे, लाल व श्वेत या तीन प्रकारची रूपे आहेत. ती सर्व प्राकृतच समजावीत. तमोगुणी पुरुष नरकात जातो. रजोगुणी मनुष्यलोकात येतो. सत्त्वगुणी देवलोकात जातो. केवळ पापच केले तर त्याला पशुपक्ष्यांची योनी मिळते. केवळ पुण्यामुळं पुरुषास देवत्वाची प्राप्ती होते. अव्यक्त परमात्म्यात जी स्थिती आहे तिलाच मनीषी पुरुष मोक्ष मानतात. तो परमात्माच पंचविसावं तत्त्व आहे. ज्ञानानं त्याची प्राप्ती होते.

'या तत्त्वांचं यथार्थ ज्ञान योगी व सांख्य विद्वान यांना होतं. बीजापासून जसं बीज, तसंच द्रव्यापासून द्रव्य, इंद्रियापासून इंद्रिय, देहापासून देह याची प्राप्ती होते. पण परमात्मा तर इंद्रिय, बीज, द्रव्य, देहरहित असून निर्गुण आहे. मग त्याच्यात गुण कसे? आत्मा तर

जन्म, मृत्यूरहित असून तो अनंत, सर्वांचा स्रष्टा व अद्वितीय आहे. तोच सत्त्वादी गुणांचा केवळ आत्माभिमान करण्यानं गुणरूप होतो. हा अभिमान सुटला की तो आपल्या विशुद्ध परमात्मस्वरूपात शोभतो. तो परमात्मा बुद्धीच्या पलीकडचा असून तो सांख्य-योगरूप आहे. तो सत्त्वादी गुणांच्या रहित, अव्यक्त, नियामक ईश्वर, निर्गुण, नित्य, प्रकृती व तिचे गुण यांचा अधिष्ठाता पंचविसावं तत्त्व आहे. सांख्य व योग यांत कुशल असणारे या परमतत्त्वाचा शोध घेतात. असं या परस्पर संबंध राखणाऱ्या क्षराक्षराचं (प्रकृति-पुरुषाचं) स्वरूप थोडक्यात आहे. सदा एकरूपात राहणारा परमात्मा अक्षर व नाना रूपांत प्रतीत होणारं प्राकृत जग हे क्षररूप आहे. सारांश, एकत्व हे अक्षर व नानात्व हे क्षर आहे. या दोनही रूपांत त्या परमात्म्याचंच दर्शन होतं.

'राजन्, ध्यान हे योगाचं प्रधान कर्तव्य आहे. एकाग्रता व प्राणायाम या दोन मार्गांनी योगी ध्यान करतात. सर्व प्रकारची आसक्ती सोडून मिताहारी व जितेन्द्रिय होऊन योगी ध्यान करतात. त्यांच्या मनात कसले संकल्प नसतात. आपल्या योगयुक्त स्थितीत ते स्थिर राहतात. धैर्यवान, मनीषी, वेदवेत्ता, महात्मा ब्राह्मणच त्या अजन्मा व अमृतस्वरूप ब्रह्माचं दर्शन करून घेतात. ते ब्रह्म अणूपेक्षाही अणू व महानपेक्षा महान आहे. ते निर्मल व लिंगरहित आहे. याला प्राप्त करून घेणं हाच योग्यांचा योग.'

वसिष्ठांनी याप्रमा जनकराजासाठी क्षर-अक्षराचे विवेचन केले. योग व सांख्य तत्त्वांचे विवरण केले. क्षेत्र-क्षेत्रज्ञविचारही समजावून दिला. प्रकृती व तिचे विकार यांना क्षेत्र म्हणतात. चोवीस तत्त्वांहून भिन्न असं पंचविसावं तत्त्व म्हणजे महान आत्मा. तोच या क्षेत्रात अधिष्ठाता आहे. तो या क्षेत्राला जाणतो म्हणून त्याला क्षेत्रज्ञ म्हणतात. क्षेत्रज्ञ प्रकृतिजनित पुरात म्हणजे शरीरात शयन करतो, म्हणून त्याला पुरुष म्हणतात. क्षेत्र वेगळी वस्तू, क्षेत्रज्ञ वेगळा. क्षेत्र अव्यक्त प्रकृती व क्षेत्रज्ञ तिचा ज्ञाता, पंचविसावे तत्त्व. तोच परमात्मा. या प्रकृतीपासून जेव्हा पुरुष स्वत:स भिन्न मानतो तेव्हा तो त्या अद्वितीय परमात्मस्वरूपात स्थिर होतो. शुद्ध, सनातन आदि ब्रह्माचे हे असे वर्णन योग

व सांख्य तत्त्वज्ञानाच्या रूपानें वसिष्ठांनी जनकासाठी केले, मोक्षवेत्ता पुरुषास याचा आश्रय घ्यावा लागतो.

उपसंहार व महिमा

व्यासांच्या कृपेने लोमहर्षणमुनींनी हे ब्रह्मपुराण ऋषिमुनींना सांगितले. या पुराणात अनेक शास्त्रांच्या शुद्ध व निर्मल सिद्धान्तांचा समावेश आहे. हे सहज, शुद्ध व अनेक अर्थगर्भ शब्दांनी समृद्ध आहे. यथास्थान पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून सिद्धान्त प्रतिपादन केले आहेत. पुराण ऐकणारे मुनी श्रीकृष्णद्वैपायन व्यासांची अनेकदा प्रसन्न वृत्तीने स्तुती करीत म्हणाले,

'वेदांना तुल्य असणारे व संपूर्ण अभीष्ट देणारे सर्वपापहारी श्रेष्ठ पुराण आम्ही ऐकलं. आम्ही या पवित्र पुराणाचं अक्षर अन् अक्षर मन लावून ऐकलं. महाभाग, आपण देवांत बृहस्पती आहात. ब्रह्मनिष्ठ आहात. आपणांस नमस्कार असो. आपल्या संपूर्ण गुणांचं वर्णन कोण करू शकणार ?

नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र ।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ।।

प्रफुल्ल कमलदलांप्रमाणे मोठे डोळे असणाऱ्या विशाल बुद्धीच्या व्यासांना नमस्कार असो. आपण या जगास प्रकाश देण्यासाठी महाभारतरूपी तेलाने भरलेल्या या ज्ञानमय दीपास प्रकाशित केले आहे.'

इतके म्हणून मुनींनी व्यासांचे पूजन केले. व्यासांनीही त्यांचा सन्मान केला. तत्पश्चात ते आपल्या आश्रमाकडे कृतार्थ होऊन गेले.

गृहस्थ, संन्यासी, ब्रह्मचारी, या सर्वांनी या पुराणाचे श्रवण-मनन केले पाहिजे. माणसांना धन व सुख देणारे, परमपवित्र व सर्व पापांना दूर करणारे हे पुराण आहे. हे ऐकून ब्राह्मण विद्या, क्षत्रिय संग्रामात विजय, वैश्य अक्षय्य धन व शूद्र सुख मिळवितात. पवित्र

बुद्धीने जी जी कामना मनात धरून पुरुष हे पुराण वाचील ती ती पूर्ण होईल. हे ब्रह्मपुराण भगवान विष्णूशी संबंध असणारे आहे. सर्व पापांचा नाश याच्या श्रवणामुळे होईल. हे पुराण ऐकून सर्व प्रकारचे दोष पापांसह नाहीसे होतील. प्रयाग, पुष्कर, कुरुक्षेत्र, अर्बुदारण्य (आबू) येथे उपवास करून जे फल मिळते ते या पुराणाच्या श्रवणाने मिळेल. एक वर्षभर अग्नीत हवन केल्याने जे पुण्य मिळते ते या पुराणाचे एकदा श्रवण केल्याने मिळेल. ज्येष्ठ महिन्याच्या शुद्ध द्वादशीस यमुनेत स्नान करून मथुरापुरीतील श्रीकृष्णाच्या दर्शनाने जे पुण्य मिळते ते एकाग्र चित्ताने ब्रह्मपुराण ऐकले तरी मिळेल. जो मनुष्य रोज या वेदसंमित पुराणाचा पाठ श्रद्धापूर्वक करील तो भगवान विष्णुधामास जाईल. जो ब्राह्मण मन व इंद्रिये यांचा संयम करून विशेष पर्वांत वा एकादशी–द्वादशी तिथींना ब्रह्मपुराण वाचून इतरांना ऐकवील तो वैकुंठधामास जाईल.

इदं यः श्रद्धया नित्यं पुराणं वेदसम्मितम् ।
यः पठेच्छृणुयान्यर्त्यः स याति भुवनं हरेः ।।
श्रावयेद्ब्राह्मणो यस्तु सदा पर्वसु संयतः ।
एकादश्यां द्वादश्यां च विष्णुलोकं स गच्छति ।।

हे पुराण माणसास यश, आयुष्य, सुख, कीर्ती, बळ, पुष्टी, धन देईल व अशुभ स्वप्नांचा नाश करील. प्रतिदिन जो संध्यासमयास यातील उपाख्यानांचा पाठ करील त्याला सर्व अभीष्ट वस्तूंचा लाभ होईल. याच्या पाठाने पूर्वजन्मांची स्मरणशक्ती, विद्या, पुत्र, धारणावती बुद्धी, पशू, धैर्य, धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांची प्राप्ती होईल.

यान् यान् कामानभिप्रेत्य पठेत्प्रयतमानसः ।
तांस्तान् सर्वानवाप्नोति पुरुषो नात्र संशयः ।।

ज्या ज्या कामना मनात धरून मनुष्य संयतचित्तानें या पुराणाचा पाठ करील त्या त्या कामना पूर्ण होतील. यात थोडाही संशय नाही.

मुक्तिमार्गाची इच्छा ठेवणारे स्वधर्मपरायण ब्राह्मण, मन व इंद्रिये यांना वश करणारे उत्तम क्षत्रिय, विशुद्ध कुलात उत्पन्न होणारे वैश्य व धर्मनिष्ठ शूद्र यांनी या पुराणाचे श्रवण रोज करावे. त्यांना

धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांची प्राप्ती होईल. सर्वांची वृत्ती धर्मात रमलेली असावी. एकमात्र धर्मंच परलोकात जीवास बंधूप्रमाणे साह्य देतो. मनुष्य धर्मानेच राज्य मिळवितो. धर्मानेच तो स्वर्गात जातो. धर्मानेच मानव आयुष्य, कीर्ती, तपस्या, मोक्ष यांची प्राप्ती करून घेतो. या लोकात वा परलोकात माणसास धर्मंच आईबाप व सखा आहे. हा धर्मंच रक्षक व मोक्षाची प्राप्ती करून देणारा आहे. धर्माशिवाय कशाचाच उपयोग होत नाही. हे श्रेष्ठ पुराण परम गोपनीय व वेदांप्रमाणे प्रामाणिक आहे. खोटी बुद्धी धारण करणारे व नास्तिक यांना याचा उपदेश करू नये. पापांचा नाश व धर्मबुद्धीचा विकास करणारे हे पुराण आहे. याला अत्यंत गोपनीय मानले गेले आहे.

धर्मेण राज्यं लभते मनुष्यः स्वर्गं च धर्मेण नरः प्रयाति ।
आयुष्य कीर्ति च तपश्च धर्मं। धर्मेण मोक्षं लभते मनुष्यः ।।
धर्मोऽत्र मातापितरौ नरस्य धर्मः सखा चात्र परे च लोके ।
त्राता च धर्मस्त्विह मोक्षदश्च धर्मादृते नास्ति तु किंचिदेव ।।



७ स्तोत्रमंजूषा

१. ब्रह्मदेवांनी केलेली सूर्यस्तुती

विकर्तनो विवस्वांश्च मार्तण्डो भास्करो रविः ।
लोकप्रकाशकः श्रीमाँल्लोकचक्षुर्महेश्वरः ।।
लोकसाक्षी त्रिलोकेशः कर्ता हर्ता तमिस्रहा ।
तपनस्तापनश्चैव शुचिः सप्ताश्ववाहनः ।।
गभस्तिहस्तो ब्रह्मा च सर्वदेवनमस्कृतः ।
एकविंशतिरित्येष स्तव इष्टः सदा रवेः ।।

(३१।३१-३३)

ब्रह्मदेव म्हणाले,

मी आता भगवान सूर्यांचे कल्याणमय सनातन स्तोत्र सांगतो. हे सर्व स्तुतींचे सारभूत आहे. याचा पाठ करणाऱ्यांना सहस्रनामांची आवश्यकता उरत नाही. भगवान भास्कराची जी शुभ, पवित्र, गोपनीय नावे आहेत ती अशी– निकर्तन, विवस्वान्, मार्तण्ड, भास्कर, रवी, लोकप्रकाशक, श्रीमान्, लोकचक्षू, महेश्वर, लोकसाक्षी, त्रिलोकेश, कर्ता, हर्ता, तमिस्वहा, तपन, तापन, शुची, सप्ताश्ववाहन, गभस्तिहस्त, ब्रह्मा व सर्वदेवनमस्कृत. या एकवीस नामांचे हे स्तोत्र भगवान सूर्यास नेहमीच प्रिय वाटते.

२. अदितीने केलेली सूर्यस्तुती

नमस्तुभ्यं परं सूक्ष्मं सुपुण्यं बिभ्रतेऽतुलम् ।
धाम धामवतामीशं धामाधारं च शाश्वतम् ।।

जगतामुपकाराय त्वामहं स्तौमि गोपते ।
आददानस्य यद्रूपं तीव्रं तस्मै नमाम्यहम् ।।
ग्रहीतुमष्टमासेन कालेनाम्बुमयं रसम् ।
बिभ्रतस्तव यद्रूपमतितीव्रं नतास्मि तत् ।।
समेतमग्निसोमाभ्यां नमतस्मै गुणात्मने ।
यद्रूपमृग्यजु:साम्नामैक्येन तपते तव ।।
विश्वमेतत्त्रयीसंज्ञं नमस्तस्मै विभावसो ।
यत्तु तस्मात्परं रूपमोमित्युक्त्वाभिसंहितम् ।
अस्थूलं स्थूलममलं नमस्तस्मै सनातन ।।

(३१।१२–१६)

भगवन्, आपण अत्यंत सूक्ष्म, परम पवित्र व अनुपम तेज धारण करणारे आहात. तेजस्वींच्या ईश्वरा, आपण तेजाचा आधार असून सनातन देव आहात. आपणाला नमस्कार असो. गोपते, जगावर उपकार करण्यासाठी मी आपली स्तुती, प्रार्थना करीत आहे. प्रचंड रूप धारण करताना आपली जशी आकृती होते तिला माझा प्रणाम असो. क्रमश: आठ महिन्यांपर्यंत पृथ्वीला जलरूपरसाचे रूप प्राप्त व्हावे म्हणून आपण जे अत्यंत तप्त रूप धारण करता त्याला मी प्रणाम करते. आपले हे रूप अग्नी व सोम यांचे संयुक्त असते. आपण गुणात्मा आहात. आपणांस नमस्कार असो. आपले जे रूप ऋक्, यजुष व साम यांच्या एकतेपासून त्रयीसंज्ञात्मक बनून या विश्वात तापत राहते त्या रूपास नमस्कार असो. सनातना, याच्याही पलीकडे जे ॐ नामाने प्रदिपादित स्थूल व सूक्ष्म निर्मल स्वरूप आणले आहे त्याला माझा प्रणाम असो.

२ ब्रह्मदेवांनी केलेली सूर्यस्तुती

जीवन: सर्वभूतानां देवगन्धर्वरक्षसाम् ।
मुनिकिंनरसिद्धानां तथैवोरगपक्षिणाम् ।।

आदिदेवोऽसि देवानामैश्वर्याच्च त्वमीश्वरः ।
आदिकर्तासि भूतानां देवेदेवो दिवाकरः ॥
जीवनः सर्वभूतानां देवगन्धर्वरक्षसाम् ।
मुनिकिनरसिद्धानां तथैवोरगपक्षिणाम् ॥
त्वं ब्रह्मा त्वं महादेवस्त्वं विष्णुस्त्वं प्रजापतिः ।
वायुरिन्द्रश्च सोमश्च विवस्वान् वरुणस्तथा ॥
त्वं कालः सृष्टिकर्ता च हर्ता भर्ता तथा प्रभुः ।
सरितः सागराः शैला विद्युदिन्द्रधनूंषि च ॥
प्रलयः प्रभवश्चैव व्यक्ताव्यक्तः सनातनः ।
ईश्वरात्परतो विद्या विद्यायाः परतः शिवः ॥
शिवात्परतरो देवेस्त्वमेव परमेश्वरः ।
सर्वतःपाणिपादान्तः सर्वतोऽक्षिशिरोमुखः ॥
सहस्रांशुः सहस्रायः सहस्रचरणेक्षणः ।
भूतादिर्भूर्भुवः स्वश्च महः सत्यं तपो जनः ॥
प्रदीप्तं दीपनं दिव्यं सर्वलोकप्रकाशकम् ।
दुर्निरीक्षं सुरेन्द्राणां यद्रूपं तस्य ते नमः ॥
सुरसिद्धगणैर्जुष्टं भृग्वत्रिपुलहादिभिः ।
स्तुतं परमसव्यक्तं यद्रूपं तस्य ते नमः ॥
वेद्यं वेदविदां नित्यं सर्वज्ञानसमन्वितम् ।
सर्वदेवादिदेवस्य यद्रूपं तस्य ते नमः ॥
विश्वकृद्विश्वभूतं च वैश्वानरसुरार्चितम् ।
विश्वस्थितमचिन्त्यं च यद्रूपं तस्य ते नमः ॥
परं यज्ञात्परं वेदात्परं लोकात्परं दिवः ।
परमात्मेत्यभिख्यातं यद्रूपं तस्य ते नमः ॥

अविज्ञेयमनालक्ष्यमध्यानगतमव्ययम् ।
अनादिनिधनं चैव यद्रूपं तस्य ते नमः ।।
नमो नमः कारणकारणाय नमो नमः पापविमोचनाय ।
नमो नमस्ते दितिजार्दनाय नमो नमो रोगविमोचनाय ।।
नमो नमः सर्ववरप्रदाय नमो नमः सर्वसुखप्रदाय ।
नमो नमः सर्वधनप्रदाय नमो नमः सर्वमतिप्रदाय ।।
(३३.९-२३)

भगवन्, आपण आदिदेव आहात. ऐश्वर्याने संपन्न असल्यामुळे आपण सर्व देवांचे देव आहात. संपूर्ण भूतांचे आदिकर्ताही आपणच आहात. आपणच देवाधिदेव दिवाकर आहात. संपूर्ण भूते, देव, गंधर्व, राक्षस, मुनी, किन्नर, सिद्ध, नाग तथा पक्षी यांचे जीवन आपणांमुळेच चालते. आपण ब्रह्मा आहात, महादेव आहात, विष्णू आहात, प्रजापती आहात. आपणच वायू, इंद्र, सोम, विवस्वान, वरुण आहात. आपण काल आहात. सृष्टीचा कर्ता, धर्ता, संहर्ता व प्रभूही आपणच आहात. नदी, समुद्र, पर्वत, वीज, इंद्रधनुष्य, प्रलय, सृष्टी, व्यक्त, अव्यक्त, सनातन पुरुष आपणच आहात. आपण साक्षात परमेश्वर आहात. आपणांस हात व पाय सर्व बाजूंनी आहेत. नेत्र, मस्तक, मुखही सर्व बाजूंनी आहेत. आपणांस सहस्र किरणे आहेत. सहस्र मुखे आहेत. सहस्र पाय व सहस्र नेत्र आहेत. आपण सर्व भूतांचे आदिकारण आहात. भुः, भुवः, स्वः महः, जनः, तपः व सत्य ही सारी आपलीच रूपे आहेत. आपले जे स्वरूप अत्यंत तेजस्वी, सर्वप्रकाशक, दिव्य, संपूर्ण लोकांत प्रकाश पसरविणारे, देवदेवेश्वरांनाही पाहण्यास कठीण असणारे आहे. त्याला माझा नमस्कार असो. देव व सिद्ध ज्यांचे सेवन करतात, भृगू, अग्नी, पुलह आदी महर्षी ज्याची स्तुती करण्यात मग्न आहेत, जे अत्यंत अव्यक्त आहे, त्या आपल्या रूपास प्रणाम असो. संपूर्ण देवांत आपले रूप उत्कृष्ट असून वेदवेत्ते पुरुषच ते जाणतात. ते नित्य व सर्वज्ञानसंपन्न आहे, त्याला माझा नमस्कार असो. आपले रूप या विश्वाची सृष्टी निर्माण करणारे आहे. विश्वमय आहे, देवांद्वारे पूजनीय आहे, संपूर्ण विश्वात व्यापक वा

अचिंत्य आहे त्याला प्रणाम असो. आपले रूप, यज्ञ, वेद, लोक तथा द्युलोक यांच्याही पलीकडचे असून ते परमात्मा या नावाने विख्यात आहे. त्याला माझा नमस्कार असो. आपण अविज्ञेय आहात, अलक्ष्य, अचिंत्य, अव्यय, अनादी व अनंत आहात. या आपल्या स्वरूपास प्रणाम असो. प्रभो, आपण कारणाचेही कारण आहात. आपणांस वारंवार नमस्कार असो. पापांपासून मुक्त करणाऱ्या प्रभो, आपणांस प्रणाम असो. आपण दैत्यांना पीडा देता, रोगांपासून सोडविता, आपणांस अनेकदा नमस्कार असोत. आपण सर्वांना वर, सुख, धन, उत्तम बुद्धी देता. आपणांस वारंवार नमस्कार असो.

४. सूर्याची एकशेआठ नामे

ॐ सूर्योऽर्यमा भगस्त्वष्टा पूषार्कः सविता रविः ।
गभस्तिमानजः कालो मृत्युर्धाता प्रभाकरः ।।
पृथिव्यापश्च तेजश्च खं वायुश्च परायणम् ।
सोमो बृहस्पतिः शुक्रो बुधोऽङ्गारक एव च ।।
इन्द्रो विवस्वान्दीप्तांशुः शुचिः सौरिः शनैश्चरः ।
ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च स्कन्दो वैश्रवणो यमः ।।
वैद्युतो जाठरश्चाग्निरैन्धनस्तेजसां पतिः ।
धर्मध्वजो वेदकर्ता वेदाङ्गो वेदवाहनः ।।
कृतं त्रेता द्वापरश्च कलिः सर्वामराश्रयः ।
कलाकाष्ठामुहूर्ताश्च क्षपा यामास्तथा क्षणाः ।।
संवत्सरकरोऽश्वत्थः कालचक्रो विभावसुः ।
पुरुषः शाश्वतो योगी व्यक्ताव्यक्तः सनातनः ।।
कालाध्यक्षः प्रजाध्यक्षो विश्वकर्मा तमोनुदः ।
वरुणः सागरोऽशश्च जीमूतो जीवनोऽरिहा ।।

भूताश्रयो भूतपतिः सर्वलोकनमस्कृतः ।
स्रष्टा संवर्तको वन्हिः सर्वस्यादिरलोलुपः ॥
अनन्तः कपिलो भानुः कामदः सर्वतोमुखः ।
जयो विशालो वरदः सर्वभूतनिषेवितः ॥
मनः सुपर्णो भूतादिः शीघ्रगः प्राणधारणः ।
धन्वन्तरिर्धूमकेतुरादिदेवोऽदितेः सुतः ॥
द्वादशात्मा रविर्दक्षः पिता माता पितामहः ।
स्वर्गद्वारं प्रजाद्वारं मोक्षद्वारं त्रिविष्टपम् ॥
देहकर्ता प्रशान्तात्मा विश्वात्मा विश्वतोमुखः ।
चराचरात्मा सूक्ष्मात्मा मैत्रेयः करुणान्वितः ॥
(३३.३४-४५)

ब्रह्मदेव म्हणाले, 'ब्राह्मणांनो, भगवान भास्कराची परम गोपनीय अशी एकशे आठ नामं आहेत. ती स्वर्ग व मोक्ष देणारी असल्यानं मी ती सांगतो.

ॐ सूर्य, अर्यमा, भग, त्वष्टा, पूषा (पोषक), अर्क, सविता, रवी, गभस्तिमान् (किरणांनी युक्त), अज, काल, मृत्यू, धाता (धारण करणारा), प्रभाकर (प्रकाशाचा साठा), पृथ्वी, आप, तेज, ख (आकाश), वायू, परायण (शरण देणारा), सोम, बृहस्पती, शुक्र, बुध, अंगारक (मंगळ), इंद्र, विवस्वान, दीप्तांशू (प्रज्वलित किरणांनी युक्त), शुची, सौरी (सूर्यपुत्र मनू), शनैश्चर, ब्रह्मा, विष्णू, रुद्र, स्कंद (कार्तिकेय), वैश्रवण (कुबेर), यम, वैद्युत (विजेत राहणारा) अग्नी, जाठराग्नी, ऐन्धन (इंधनात राहणारा) अग्नी, तेजःपती, धर्मध्वज, वेदकर्ता, वेदांग, वेदवाहन, कृत (सत्ययुग), त्रेता, द्वापर, कली, सर्वामराश्रय, कला, काष्ठा, मुहूर्त, क्षमा (रात्री) याम (प्रहर), क्षण, संवत्सरकर, अश्वत्थ, कालचक्र, विभावसू (अग्नी), पुरुष, शाश्वत, योगी, व्यक्ताव्यक्त, सनातन, कालाध्यक्ष, प्रजाध्यक्ष, विश्वकर्मा, तमोनुद (अंधकारास घालविणारा), वरुण, सागर, अंश, जीमूत (मेघ), जीवन,

अरिहा (शत्रूंचा नाश करणारा), भूताश्रय, भूतपती, सर्वलोकनमस्कृत, स्रष्टा, संवर्तक (प्रलयकालीन) अग्नी, सर्वादी, अलोलुप (निर्लोभी), अनंत, कपिल, भानु, कामद (कामना पूर्ण करणारा), सर्वतोमुख (सर्व बाजूंनी मुखे असलेला), जय, विशाल, वरद, सर्वभूतनिषेवित, मन, सुपर्ण (गरुड), भूतादी, शीघ्रग (शीघ्र चालणारा), प्राणधारण, धन्वन्तरी, धूमकेतू, आदिदेव, अदितीपुत्र, द्वादशात्मा (बारा रूपांचा), रवी, दक्ष, पिता, माता, पितामह, स्वर्गद्वार, प्रजाद्वार, मोक्षद्वार, त्रिविष्टप (स्वर्ग), देहकर्ता, प्रशान्तात्मा, विश्वात्मा, विश्वतोमुख, चराचरात्मा, सूक्ष्मात्मा, मैत्रेय, करुणान्वित (दयाळू). ही एकशे आठ नामे जपणाऱ्यास मनोवांच्छित फल देतात.

५. दक्षाने केलेली शिवस्तुती

नमस्ते देवदेवेश नमस्तेऽन्धकसूदन।
देवेन्द्र त्वं बलश्रेष्ठ देवदानवपूजित ॥
सहस्राक्ष विरूपाक्ष त्र्यक्ष यक्षाधिपप्रिय।
सर्वतःपाणिपादस्त्वं सर्वतोऽक्षिशिरोमुखः ॥
सर्वतः श्रुतिमाँल्लोकं सर्वमावृत्य तिष्ठसि।
शङ्कुकर्णो महाकर्णः कुम्भकर्णोऽर्णवालयः ॥
गजेन्द्रकर्णो गोकर्णः शतकर्णो नमोऽस्तु ते।
शतोदरः शतावर्त शतजिह्वः सनातनः ॥
गायन्ति त्वां गायत्रिणो अर्चयन्त्यर्कमर्किणः।
देवदानवगोप्ता च ब्रह्मा च त्वं शतक्रतुः ॥
मूर्तिमांस्त्वं महामूर्तिः समुद्रः सरसां निधिः।
त्वयि सर्वा देवता हि गावो गोष्ठ इवासते ॥
त्वत्तः शरीरे पश्यामि सोममग्निजलेश्वरम्।
आदित्यमय विष्णुं च ब्रह्माणं सबृहस्पतिम् ॥

क्रिया करणकार्ये च कर्ता कारणमेव च ।
असच्च सदसच्चैव तथैव प्रभवाप्ययौ ।।
नमो भवाय शर्वाय रुद्राय वरदाय च ।
पशूनां पतये चैव नमोऽस्त्वन्धकघातिने ।।
त्रिजटाय त्रिशीर्षाय त्रिशूलवरधारिणे ।
त्र्यम्बकाय त्रिनेत्राय त्रिपुरघ्नाय वै नमः ।।
नमश्चण्डाय मुण्डाय विश्वचण्डधराय च ।
दण्डिने शंकुकर्णाय दण्डिदण्डाय वै नमः ।।
नमोऽर्धचण्डिकेशाय शुष्काय विकृताय च ।
विलोहिताय धूम्राय नीलग्रीवाय वै नमः ।।
नमोऽस्त्वप्रतिरूपाय विरूपाय शिवाय च ।
सूर्याय सूर्यपतये सूर्यध्वजपताकिने ।।
नमः प्रमथनाशाय वृषस्कन्धाय वै नमः ।
नमो हिरण्यगर्भाय हिरण्यकवचाय च ।।
हिरण्यकृतचूडाय हिरण्यपतये नमः ।
शत्रुघाताय चण्डाय पर्णसंघशयाय च ।।
नमः स्तुताय स्तुतये स्तूतमानाय वै नमः ।
सर्वाय सर्वभक्षाय सर्वभूतान्तरात्मने ।।

देवेश्वरा, आपणांस नमस्कार असो. अंधकासुरास मारणाऱ्या रुद्रा, देवेन्द्रा, आपण बलवंतांत श्रेष्ठ आहात, आपण देव व दानव यांनी पूजित आहात. आपणांस नमस्कार असो. आपण सहस्राक्ष (हजार नेत्रांचे), विरुपाक्ष (विकराल नेत्रांचे) व त्र्यक्ष (तीन नेत्रांचे) आहात. यक्षराज कुबेराचे आपण इष्टदेव आहात. आपणांस हात व पाय सर्व बाजूंनी आहेत. नेत्र, मस्तक, मुखही आपणांस सर्व बाजूंनी आहेत. आपणांस सर्व बाजूंनी कान आहेत. आपण या जगात सर्वांना व्यापून आहात. शंकुकर्ण, महाकर्ण, कुंभकर्ण, अर्णवालय, गजेन्द्रकर्ण, गोकर्ण,

शतकर्ण, शतोदर, शतावर्त, शतजिव्ह, सनातन ही आपलीच नावे आहेत. आपणांस नमस्कार असो. गायत्रीचे उपासक आपलेच गायन करतात. सूर्याचे भक्त आपलीच अर्चना सूर्यरूपात करतात. आपण देव व दानवांचे रक्षक आहात. ब्रह्मदेव व इंद्र आहात. आपणच मूर्तिमान, महामूर्ती, जलाचे भांडाररूप समुद्र आहात. जशा गोशाळेत गायी राहतात तसे सर्व देव आपल्यांत निवास करतात. आपल्या शरीरात मी चंद्र, अग्नी, वरुण, सूर्य, विष्णू, ब्रह्मा व बृहस्पती यांना पाहतो. क्रिया करणे, कार्य, कर्ता, कारण, असत्, सदसत्, उत्पत्ती व प्रलय आपणच आहात. भव, (सृष्टिकर्ता), शर्व, रुद्र, वरद, पशुपती, अंधकासुरघाती, त्रिजट, त्रिशीर्ष, त्रिशूलधारी, त्र्यंबक, त्रिनेत्र, त्रिपुरनाशक आपणच असून आपणांस नमस्कार असो.

आपण चंड (अत्यंत क्रोधी), मुंड, प्रचंड विश्वास धारण करणारे, दंडी, शंकुकर्ण व दंडिदंड आहात. आपणांस नमस्कार असो. आपण अर्धचंडिकेश, शुष्क, विकृत, विलोहित, धूम्र व नीलग्रीव आहात. आपणांस नमस्कार असो. आपण अप्रतिरूप आहात. आपल्यासारखे दुसरे कोणी नाही. आपणांस नमस्कार असो. आपण विरूप असूनही शिव (कल्याणमय) आहात. आपणच सूर्य व त्याचे स्वामी आहात. आपल्या ध्वजावर व पताकावर सूर्याचे चिन्ह आहे. आपणांस नमस्कार असो. प्रथमगणांच्या स्वामी, आपणांस नमस्कार असो. आपले खांदे वृषभाच्या खांद्याप्रमाणे मांसल आहेत. आपणांस नमस्कार असो. आपण हिरण्यगर्भ व हिरण्यकवच आहात. आपणांस नमस्कार असो. आपण हिरण्याची चूडा (शेंडी) धारण करणारे व हिरण्यपती आहात. आपणांस नमस्कार असो. आपण शत्रूंचा घात करता. आपण अत्यंत क्रोधी आहात. आपण पानांच्या ढिगावर शयन करता. आपणांस नमस्कार असो. आपली स्तुती केली गेली आहे. यावेळीही आपली स्तुती करीत आहे. आपणच स्तुतिस्वरूप आहात. आपणांस नमस्कार असो. आपण सर्वस्वरूप, सर्वभक्षी व सर्व भूतांचे अंतरात्मा आहात. आपणांस नमस्कार असो.

६. दक्षाने केलेली शिवस्तुती

सर्वस्त्वं सर्वगो देवः सर्वभूतपतिर्भवः ।
सर्वभूतान्तरात्मा च तेन त्वं न निमंत्रितः ।।
त्वमेव चेज्यसे देव यज्ञैर्विविधदक्षिणैः ।
त्वमेव कर्ता सर्वस्य तेन त्वं न निमंत्रितः ।।
अथवा मायया देव मोहितः सूक्ष्मया तव ।
तस्मातु कारणद्वापि त्वं मया न निमंत्रितः ।।
प्रसीद मम देवेश त्वमेव शरणं मम ।
त्वं गतिस्त्वं प्रतिष्ठा च न चान्योऽस्तीति मे मति. ।।

(४०.२–१००)

भगवन्, आपण सर्वस्वरूप, सर्वव्यापी देव, संपूर्ण भूतांचे स्वामी, सर्वांची उत्पत्ती करणारे कारण व संपूर्ण भूतांचे अंतरात्मा आहात. यासाठी आपणांस पृथक् निमंत्रित केले जात नाही. विविध प्रकारची दक्षिणा देणाऱ्या यज्ञांच्या द्वारे आपलेच यजन केले जाते. आपणच सर्वांचे कर्ता, धर्ता आहात. म्हणूनच मी आपणांस निमंत्रित केले नाही. अथवा देवा, आपल्या सूक्ष्म व दुर्बोध मायेने मी मोहित होतो. यासाठी मी आपणांस निमंत्रण दिले नाही. देवेश्वरा, आपण माझ्यावर प्रसन्न व्हावे. आपणच मला शरण देणारे आहात. आपणच माझी गती व प्रतिष्ठा आहात. दुसरा कोणी नाही, असा माझा दृढ विश्वास आहे.

७. इंद्रद्युम्नाने केलेली विष्णुस्तुती

वासुदेव नमस्तेऽस्तु नमस्ते मोक्षकारण ।
त्राहि मां सर्वलोकेश जन्मसंसारसागरात् ।।
निर्मलाम्बरसंकाश नमस्ते पुरुषोत्तम ।
संकर्षण नमस्तेऽस्तु त्राहि मां धरणीधर ।।

नमस्ते हेमगर्भाय नमस्ते मकरध्वज ।
रतिकान्त नमस्तेऽस्तु त्राहि मां शम्बरान्तक।।
नमस्तेऽञ्जनसंकाश नमस्ते भक्तवत्सल ।
अनिरुद्ध नमस्तेऽस्तु त्राहि मां वरदो भव ।
नमस्ते विबुधावास नमस्ते विबुधप्रिय ।
नारायण नमस्तेऽस्तु त्राहि मां शरणागतम् ।।
नमस्ते बलिनां श्रेष्ठ नमस्ते लाङ्गलायुध ।
चतुर्मुख जगद्धाम त्राहि मां प्रपितामह ।।
नमस्ते नीलमेघाभ नमस्ते त्रिदशार्चित ।
त्राहि विष्णो जगन्नाथ मग्नं मां भवसागरे ।।

(४९. १-७)

वासुदेवा, तुम्हांस नमस्कार असो. तुम्ही मोक्ष देणारे आहात. तुम्हांला माझा नमस्कार असो. संपूर्ण लोकांचे स्वामी तुम्ही आहात. जन्ममृत्युरूपी संसारसागरातून तुम्ही माझा उद्धार करा. पुरुषोत्तमा, तुमचे स्वरूप निर्मल आकाशाप्रमाणे स्वच्छ आहे. तुम्हांला नमस्कार असो. सर्वांना आपणांकडे आकर्षित करून घेणाऱ्या संकर्षणा, तुम्हांस नमस्कार असो. धरणीधरा, तुम्ही माझे रक्षण करा. हेमगर्भाप्रमाणे कांती असणाऱ्या प्रभो, तुम्हांला नमस्कार असो. मकरध्वजा, तुला नमस्कार असो. रतिकान्ता, तुम्हांला नमस्कार असो. शंबरासुराचा वध करणाऱ्या परमेश्वरा, माझे रक्षण कर. भगवन्, तुमचे अंग अंजना-प्रमाणे श्यामल रंगाचे आहे. भक्तवत्सला, तुम्हांस नमस्कार असो. अनिरुद्धा, तुम्हांस नमस्कार असो. वरदायक बनून तुम्ही माझे रक्षण करावे. सर्व देवदेवतांच्या निवासस्थाना, तुम्हांस माझा नमस्कार असो. देवप्रिया, तुम्हांस माझा प्रणाम आहे. नारायणा, तुम्हांस नमस्कार असो. मजसारख्या शरणागताचे तुम्ही रक्षण करावे. बलवानांतील श्रेष्ठ बलरामा, तुम्हांस नमस्कार असो. हलायुधा, तुम्हांस नमस्कार असो.

चतुर्मुखा, जगद्धामा, प्रपितामहा, माझे तुम्ही रक्षण करावे. निळ्या मेघाप्रमाणे कांती असणाऱ्या घनश्यामा, तुम्हांस नमस्कार असो. देव-पूजित परमेश्वरा, तुम्हांस नमस्कार असो. सर्वव्यापी जगन्नाथा, मी या भवसागरात डुबत आहे, माझा तुम्ही उद्धार करावा.

८. हेतीने केलेली अग्नीची स्तुती

रूपं न दानं न परोक्षमस्ति
यस्यात्मभूतं च पदार्थजातम् ।।
अश्नन्ति हव्यानि च येन देवाः ।
स्वाहापतिं यज्ञभुजं नमस्ये ।।
मुखभूतं च देवानां देवानां हव्यवाहनम् ।
होतारं चापि देवानां देवानां दूतमेव च ।।
तं देव शरणं यामि आदिदेवं विभावसुम् ।
अन्तःस्थितः प्राणरूपो बहिश्चान्नप्रदो हि यः ।
यो यज्ञसाधनं यामि शरणं तं धनंजयम् ।।

(१२५.१५-१७)

ज्याचे रूप व दान प्रत्यक्ष आहे, संपूर्ण पदार्थ ज्याचे आत्मरूप आहेत व देव ज्याच्या द्वारा हवनीय पदार्थांचे भोजन करतात त्या यज्ञभोक्त्या स्वाहापती, अग्नीस मी नमस्कार करते. जो देवांचे मुख आहे, जो देवांचे हविष्य वहन करणारा आहे, जो देवांचा होता आहे, जो देवांचा दूत आहे, त्या आदिदेव भगवान अग्नीस मी शरण आले आहे. जो शरीराच्या आत प्राणरूपाने स्थित आहे, जो बाहेर अन्नदात्याच्या रूपाने विद्यमान आहे, जो यज्ञाचे साधन आहे, त्या धनंजय अग्निदेवास मी शरण आले आहे.

९. व्यासकृत धर्ममाहिमा

एकः प्रसूयते विप्रा एक एव हि नश्यति ।
एकस्तरति दुर्गाणि गच्छत्येकस्तु दुर्गतिम् ।।
असहायः पिता माता तथा भ्राता सुतो गुरुः ।
ज्ञातिसम्बधिवर्गश्च मित्रवर्गस्तथैव च ।।
मृतं शरीरमुत्सृज्य काष्ठलोष्टसमं जनाः ।
मुहूर्तमिव रोदिता ततो यान्ति पराङमुखाः ।।
तैस्तच्छरीरमुत्सृष्टं धर्म एकोऽनुगच्छति ।
तस्माद्धर्मः सहायश्च सेवितव्य सदा नृभिः ।।

(२१७.४-७)

व्यास म्हणतात.

हे विप्रांनो, प्राणी हा एकटाच जन्मतो व एकटाच मरण पावतो. एकटाच तो दुर्गम अशा कठिण समस्या पार करतो. एकटाच तो दुर्गतीला जातो. पिता, माता, भ्राता, पुत्र, गुरू, जातवाले, संबंधी व मित्रवर्ग यांत कोणीही मरणाऱ्यास साथ देत नाही. घरातील लोक मृत व्यक्तीच्या शरीरास काष्ठ व मातीचा ढीग समजून त्याचा त्याग करतात. घटकाभर रडून, तोंड फिरवून चालू लागतात. ते सर्व त्याला सोडतात. पण धर्म त्याला सोडत नाही. तोच एकटा जीवाच्या बरोबर जातो. म्हणून धर्म हाच खरा सहायक आहे. यासाठी मनुष्याने धर्माचे सेवन नेहमी केले पाहिजे.

१० अष्टाक्षर मंत्रविधी

(१) आवाहनमंत्र

मीनरूपो वराहश्च नरसिंहोऽथ वामनः ।
आयातु देवो वरदो मम नारायणोऽग्रतः ।
ॐ नमो नारायणाय नमः

मीन, वराह, नरसिंह व वामनावतारी वरदायक देवा, भगवान नारायणा, माझ्यापुढे आपण यावे. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(२) आसनमंत्र

कर्णिकायां सुपीठेऽत्र पद्मकल्पितमासनम् ।
सर्वसत्त्वहितार्थाय तिष्ठ त्वं मधुसूदन ।।
ॐ नमो नारायणाय नमः

येथे कमलाच्या कर्णिकेत सुंदर पीठावर कमलाचे आसन तयार आहे. मधुसूदना, सर्व प्राण्यांच्या हितासाठी आपण या आसनावर विराजमान व्हावे. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(३) अर्घ्यमंत्र

ॐ त्रैलोक्यपतीनां पतये देवदेवाय हृषीकेशाय विष्णवे नमः
ॐ नमो नारायणाय नमः

त्रिभुवनपतींच्या स्वामी, देवांच्याही देवा, इंद्रियांचे स्वामी भगवान विष्णूस नमस्कार असो. सच्चिदानंदस्वरूप नारायणाला नमस्कार असो.

(४) पाद्यमंत्र

ॐ पाद्यं पादयोर्देव पद्नाभ सनातन ।
विष्णो कमलपत्राक्ष गृहाण मधुसूदन ।।
ॐ नमो नारायणाय नमः

देवा पद्मनाभा, सनातन विष्णू, कमलनयन मधुसूदना, आपल्या चरणांवर हे पाय धुण्यासाठी पाणी सर्मपित आहे. आपण याचा स्वीकार करावा. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(५) मधुपर्कमंत्र

मधुपर्कं महादेव ब्रह्माद्यैः कल्पितं तव ।
मया निवेदितं भक्त्या गृहाण पुरुषोत्तम ।।
ॐ नमो नारायणाय नमः

महादेवा, पुरुषोत्तमा, ब्रह्मदेवादी देवांनी आपणांसाठी ज्याची व्यवस्था केली होती तो मधुपर्क मी भक्तिपूर्वक आपणांस समर्पण करतो. कृपया आपण याचा स्वीकार करावा. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(६) आचमनीयमंत्र

मन्दाकिन्याः सितं वारि सर्वपापहरं शिवम् ।
गृहाणाचमनीयं त्वं मया भक्त्या निवेदितम् ।।
ॐ नमो नारायणाय नमः

भगवन्, सर्व पापांना दूर करणारे, कल्याणमय असे गंगेचे स्वच्छ जल मी आपणांस आचमनासाठी अर्पण करीत आहे. कृपया आपण स्वीकार करावा. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(७) स्नानमंत्र

त्वमापः पृथिवी चैव ज्योतिस्त्वं वायुरेव च ।
लोकेश वृत्तिमात्रेण वारिणा स्नापयाम्यहम् ।।
ॐ नमो नारायणाय नमः

लोकेश्वरा, आपणच जल, पृथ्वी, अग्नी व वायुरूपाने आहात. मी जीवनरूपी जलाने आपणांस स्नान घालतो आहे. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(८) वस्त्रमंत्र

देवतत्त्वमायुक्त यज्ञवर्णसमन्वित ।
स्वर्णवर्णप्रभे देव वाससी तव केशव ।।
ॐ नमो नारायणाय नमः

देवतत्त्वसमायुक्ता, यज्ञवर्णसमन्विता केशवा, मी सोनेरी रंगाची दोन वस्त्रे आपल्या सेवेसाठी अर्पण करतो. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(९) विलेपनमंत्र

शरीरं ते न जानामि चेष्टां चैव न केशव ।
मया निवेदितो गन्धः प्रतिगृह्य विलिप्यताम् ।।
ॐ नमो नारायणाय नमः

केशवा, मला आपल्या शरीराचे व क्रियेचे ज्ञान नाही. मी हा गंध आपणांस दिला आहे तो आपण आपल्या अंगास लावावा. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(१०) यज्ञोपवीतमंत्र

ऋग्यजुःसाममंत्रेण त्रिवृतं पद्मयोनिना ।
सावित्रीग्रन्थिसंयुक्तमुपवीतं तवार्पये ।।
ॐ नमो नारायणाय नमः

भगवान, ऋक्, यजुः, सामवेद यांच्या मंत्रांनी ज्याला ब्रह्म-त्रिगुण बनविले आहे असे हे सावित्रीग्रंथीने युक्त असलेले यज्ञोपवीत मी आपणांस अर्पण करीत आहे. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(११) अलंकारमंत्र

दिव्यरत्नसमायुक्त वन्हिभानुसमप्रभ ।
गात्राणि तव शोभन्तु सालंकाराणि माधव ।।
ॐ नमो नारायणाय नमः

अग्नी व सूर्य यांच्या समान प्रभा असणाऱ्या दिव्यरत्नविभूषित माधवा, हे अलंकार अंगावर धारण करून तू ते सुशोभित कर. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(१२) धूपमंत्र

वनस्पतिरसो दिव्यो गन्धाढ्यः सुरभिश्च ते ।
मया निवेदितो भक्त्या धूपोऽयं प्रतिगृह्यताम् ।।
ॐ नमो नारायणाय नमः

भगवन्, हा धूप सुगंधी द्रव्यांनी मिश्रित अशा वनस्पतीचा दिव्य रस आहे. म्हणून तो अत्यंत सुगंधित आहे. मी मोठ्या भक्तीने आपणांस अर्पण केला आहे. आपण त्याचा स्वीकार करावा. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(१३) दीपमंत्र

सूर्यचंद्रमसोर्ज्योतिर्विद्युदग्न्योस्तथैव च ।
त्वमेव ज्योतिषां देव दीपोऽयं प्रतिगृह्यताम् ।।
ॐ नमो नारायणाय नमः


देवा, आपणच सूर्य, चंद्र, बिजली, अग्नी, ग्रह, नक्षत्र यांची ज्योती आहात. आपण हा दीप स्वीकारावा. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.

(१४) नैवेद्यमंत्र

अन्नं चतुर्विधं चैव रसैः षड्भिः समन्वितम् ।
मया निवेदितं भक्त्या नैवेद्यं तव केशव
ॐ नमो नारायणाय नमः

केशवा, मी सहा रसांनी युक्त असे चार प्रकारचे (भक्ष्य, भोज्य, लेह्य, चोष्य) अन्न आपणांस भक्तिपूर्वक समर्पण केले आहे. आपण हा नैवेद्य ग्रहण करावा. सच्चिदानंदस्वरूप नारायणास नमस्कार असो.








प्रसाद प्रकाशन
पुणे ४११०३०



प्रसाद प्रकाशन